# एकच देव
# एकच संदेश



रहस्य शोधा
प्रवास सुरु करा

# एकच देव
# एकच संदेश


**लेखक : पी. डी. ब्रॅमसेन**

**डी. सी. ब्रॅमसेन** द्वारे सचित्र

**अनुवादक : सॅमसन लंकेश्वर**




ROCK INTERNATIONAL

पी. डी. ब्रॅमसेन द्वारे **एकच देव एकच संदेश**

**Marathi** Edition of **ONE GOD ONE MESSAGE**

Copyright © 2007, 2008, 2014, **2024** ROCK International

सर्व हक्क राखीव.

सॅमसन लंकेश्वर द्वारे मराठी भाषेत अनुवादित

*First Printing*

ISBN 978-1-62041-030-1

रॉक इंटरनॅशनलचे प्रकाशन

- मुलांसाठी मदत, संधी आणि काळजी
- महत्वपूर्ण ज्ञानाची संसाधने

P.O. Box 4766, Greenville, SC 29608 USA

**www.rockintl.org** • resources@rockintl.org

बायबल सोसायटी ऑफ इंडिया, पुन्हा-संपादित २०२१

डी. सी. ब्रॅमसेन द्वारे पृष्ठरचना आणि चित्रे

क्रिस्टन गोलसन, झरीफ मिना, पी. डी. ब्रॅमसेन यांच्याकडून पृष्ठ मांडणी

एकच देव एकच संदेश इतर भाषांमध्ये उपलब्ध आहे.

**www.one-god-one-message.com**

**www.rockintl.org/resource-library**

या पुस्तकाचे भाषांतर करण्यास परवानगीसाठी pdbramsen@rockintl.org  वर संपर्क साधा.

भारतात मुद्रित



“तान्हेल्या जिवाला जसे गार पाणी तसे दूर देशाहून आलेले शुभवर्तमान होय.”

संदेष्टा शलमोन
(नीतिसूत्रे २५:२५)



# अनुक्रमणिका


प्रस्तावना . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १

## पहिला भाग : प्रवासाची तयारी

### *अडथळ्यांना सामोरे जाताना*

१. *सत्य विकत घ्या* . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ६

२. अडथळ्यांवर मात करणे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १७

३. भ्रष्ट किंवा जतन केलेले? . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३०

४. विज्ञान आणि बायबल . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ४२

५. देवाची स्वाक्षरी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ५१

६. सातत्यपूर्ण साक्ष . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ६१

७. आधारपाया . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ७०

## दुसरा भाग : प्रवास

### *रहस्य शोधणे*

८. देव कसा आहे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ७९

९. त्याच्यासारखे कोणीही नाही . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ९४

१०. एक विशेष निर्मिती . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १०९

११. वाइटाचे प्रवेशद्वार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १२०

१२. पाप आणि मृत्यूचा नियम . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १२९

१३. दया आणि न्याय . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १३८

१४. शाप . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १४५

१५. दुहेरी समस्या. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १५३

१६. स्त्रीचे संतान . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १६५

१७. हा कोण आहे? . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १७५

१८. देवाची सार्वकालिक योजना . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १९४

१९. अर्पण करण्याचा नियम . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २०२

२०. एक महत्त्वपूर्ण अर्पण. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २१२

२१. जास्त रक्त वाहिले. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २२२

२२. कोकरा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २३२

२३. शास्त्रलेख पूर्ण करणे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २४४

२४. पूर्ण भरपाई केली . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २५३

२५. मृत्यूचा पराभव झाला . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २६४

२६. धार्मिक आणि देवापासून फार दूर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २७६

## तिसरा भाग : प्रवासाचा शेवट

### *शापाला उलटणे*

२७. टप्पा १ : देवाचा भूतकाळातील कार्यक्रम . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २९५

२८. टप्पा २ : देवाचा वर्तमान काळातील कार्यक्रम . . . . . . . . . . . . . . . . . . . ३१५

२९. टप्पा ३ : देवाचा भावी काळातील कार्यक्रम . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३३४

३०. स्वर्गाचे पूर्वावलोकन. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३५३

समारोप . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३६८

अंतिम टिप्पण्या . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३७०

प्रवासावर चिंतन करावे. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ४१०



# प्रस्तावना

“**तु**म्ही केलेल्या चांगल्या कामांसाठी तुम्ही स्वर्गात जाण्यास पात्र आहात, परंतु तुम्ही दिलेल्या संदेशासाठी, तुम्ही नरकास जाण्यास पात्र आहात!” गावातील वयस्कर गृहस्थ माझ्या मित्राला म्हणाले.

गेली दहा वर्षे माझा मित्र आणि त्याची पत्नी सहाराच्या सीमेवर असलेल्या या गृहस्थाच्या गावात राहत होते. त्यांनी एक सिंचन प्रकल्प आणि एक दवाखाना स्थापन केला होता. जे ऐकण्यास इच्छुक होते त्यांना संदेष्ट्यांची कथा आणि संदेश देखील त्यांनी सांगितले.

गावातील वयस्कर गृहस्थाच्या मते, माझ्या मित्राने *“स्वर्गात जाण्यास पात्र होण्यासाठी काय केले होते”*? त्याने चांगली कामे केली होती.

आणि *“नरकात जाण्यास पात्र”* म्हणून त्याने काय केले? त्याने बायबलनुसार संदेष्ट्यांच्या संदेशाचे शिक्षण दिले होते.

गावातील वयस्कर गृहस्थाने माझ्या मित्राच्या कामाचे आणि संदेशाचे केलेले मूल्यमापन योग्य होते का? ते अर्धे बरोबर होते की पूर्णपणे चूक होते का?

काय विचार करायचा हे तुम्हांला समजत नसल्यास, हे पुस्तक तुमच्यासाठी आहे.

## कुठे

मी अमेरिकेत जन्मलो, पण या पुस्तकाचा जन्म आफ्रिकेत झाला.

स्थळ : साहेल[१] सेनेगलचे क्षेत्र, पश्चिम आफ्रिका.

देखावा : भल्या पहाटेच्या प्रार्थनेची वेळ संपली. वालुकामय, काटेरी झुडुपांच्या क्षितिजावर सकाळची गुलाबी आणि केशरी किरणे पसरली होती. हवा छान आल्हादायक होती पण ती लवकरच बदलणार होती. मी लॅपटॉप घेऊन आमच्या गावातील घराच्या ओसरीवर बसलो आहे. सहाराची धूळ हवेत तरंगत असते, पण कीबोर्ड वर लावलेल्या पारदर्शक प्लास्टिकमुळे त्याचे संरक्षण होते. अधून मधून गाढवाचे ओरडणे आणि कोंबड्यांचे आरवणे सोडले तर गावात शांतता आहे. विचार शब्द होऊन त्यांचा मजकूर होतो आणि कीबोर्डवर तो

टाईप करतानाचा आवाज एवढाच काय तो माझ्या कानी पडत आहे.

## का

मी लिहितो कारण मला जीवन, आनंद, शांती आणि उद्देश देऊन आशीर्वादित करणाऱ्याने मला लिहायला विषय दिला आहे.

सेनेगलमधील मुस्लीम मित्रांबद्दलचा आदर आणि प्रेम हाच माझ्या लेखनाचा उगम आहे. शिवाय आम्ही उभयतांनी येथे बराच काळ व्यतीत केला आणि आमची मुले तिथेच लहानाची मोठी झाली.

अलीकडच्या काळात मला जगभरातील मुस्लिम बांधवांकडून हजाराहून अधिक ई-मेल आले आहेत. त्यांची मते-अभिप्राय आणि प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येत नाही, म्हणून मी लिहितो.

*"बायबल सत्य आहे कारण त्यामध्ये तसे सांगितले आहे!"* किंवा, *"कुराण सत्य आहे कारण त्यासारखे पुस्तक इतर कोणीही लिहू शकत नाही!"* असे साचेबंदपणे सांगणाऱ्या धार्मिक नेत्यांना लोक कंटाळले आहेत. त्यांना सहानुभूती म्हणून मी लेखन करतो.

एका सत्य देवाच्या सातत्यपूर्ण संदेशाशिवाय इतर कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवण्याच्या मानवी प्रवृत्तीने मला धक्का बसल्यामुळे मी लेखन करू लागलो.

## काय

एकच देव एकच संदेश आयुष्यभराची संधी देतो : जगातील सर्वाधिक खपाच्या पुस्तकाच्या माध्यमातून सावकाश प्रवास करायचा आणि तो लिहिणाऱ्या संदेष्टयांच्या संदेशाचा मागोवा घ्यायचा. या यात्रेत सहभागी होणाऱ्यांना अगणित अडथळे पार करण्याची (भाग I), रहस्यमय क्षेत्रांमध्ये प्रवेश करण्याची (भाग II), आणि सतत बदलणारा भव्य देखावा आणि समाधानकारक सत्याच्या वैभवशाली राज्यात प्रवेश करण्याची (भाग III) संधी दिली जाईल.

## कोणासाठी

हा प्रवास प्रामुख्याने एकेश्वरवादी-जे एकाच देवावर विश्वास ठेवतात, यांच्यासाठी तयार करण्यात आला आहे. तरीही, अनेकेश्वरवादी आणि सर्वेश्वरवादी आणि मानवतावादी आणि नास्तिक[२] यांचे प्रवासात स्वागत आहे. आपल्या सार्वकालिक जीवनासाठी बारा तास गुंतवणूक करण्यास तयार असणाऱ्या सर्वांसाठी हे पुस्तक आहे. कारण हे पुस्तक मोठयाने वाचण्यास तेवढा वेळ लागेल.

तुमची पार्श्वभूमी काहीही असो, तुमचा विश्वास असो वा नसो, तुम्हांला पवित्र पुस्तकाच्या

माध्यमातून या प्रवासात सामील होण्यासाठी आमंत्रित केले जात आहे, अनेकांनी ज्याचा सन्मान करण्याचा दावा केला आहे, तरीही थोडेच विचार करणे पसंत करतात.

तीन हजार वर्षांपूर्वी, एका संदेष्टयाने विश्वाचा निर्माता आणि स्वामीची प्रार्थना केली : *''तू माझे नेत्र उघड, म्हणजे तुझ्या नियमशास्त्रातील अद्भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील.''* (स्तोत्र. ११९:१८)

आपल्याला दिसणाऱ्या गोष्टी आवडत नसल्या तरी ते पाहण्यास आपण चुकता कामा नये.

तुमचा सहप्रवासी



**पी. डी. ब्रॅमसेन.**

# पहिला भाग
# प्रवासाची तयारी

## अडथळ्यांना सामोरे जाताना




१. सत्य विकत घ्या
२. अडथळ्यांवर मात करणे
३. भ्रष्ट किंवा जतन केलेले?
४. विज्ञान आणि बायबल
५. देवाची स्वाक्षरी
६. सातत्यपूर्ण साक्ष
७. आधारपाया



# धडा १

# सत्य विकत घ्या

*"सत्य ........ विकत घे, विकू नकोस."* *-संदेष्टा शलमोन* (नीतिसूत्रे २३:२३)[३]

**अ**ब्जावधी लोकांची गर्दी असलेल्या बाजारपेठेत फिरत आहात अशी कल्पना करा.

होय, अब्जावधी.

दूरवर नजर टाकली तर हजारो दुकाने मांडलेली दिसत आहेत. प्रत्येक कोपऱ्यातून, कधी हळुवार, तर कधी लाऊडस्पीकरवरून उत्साही विक्रेते बोलावत आहेत, ओरडत आहेत, काही पुटपुटत आहेत, वाद घालत आहेत, विनवणी करत आहेत, प्रार्थना करत आहेत. प्रत्येक जण तुम्ही जे खरेदी करण्यासाठी आला आहात तेच देण्याचा दावा करत आहेत :

**सत्य!**

हसू नका. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने जगभरातील दहा हजार भिन्न धर्मांची ओळख करून देणारा ज्ञानकोश प्रकाशित केला आहे. आणि त्यात त्या धर्मांमध्ये आढळणाऱ्या हजारो पंथ आणि संप्रदायांचा समावेश नाही.[४]

मग आपण काय खरेदी करावे? कोणावर विश्वास ठेवावा?

जर फक्त एकच सत्य देव असेल आणि जर त्याने स्वतःबद्दलचे सत्य आणि मानवजातीसाठी त्याची योजना उघड केली असेल, तर आपल्याला ती कशी समजेल?

चार हजार वर्षांपूर्वी, ईयोब संदेष्ट्याने असाच प्रश्न उपस्थित केला :

"तरीपण ज्ञान कोठून मिळेल? बुद्धीचे स्थान कोणते? त्याचे मोल मानवाला कळत नाही; ते जिवंताच्या भूमीत सापडत नाही.....

उत्कृष्ट सोने देऊन ते मिळत नाही; चांदी तोलून देऊन त्याचे मोल होत नाही.....
ज्ञानाचे मोल मोत्यांहून अधिक आहे.” (ईयोब २८:१२-१३, १५, १८)

आपण गोंधळलेल्या आणि अनिश्चित जीवनातून अडखळावे का? किंवा एका खऱ्या देवाचे ज्ञान आणि सत्य आपल्याला जाणून घेता येईल का?

आपण ते आता शोधणार आहोत.

## पुस्तकांचे पुस्तक

बायबल हा शब्द बिब्लीया या ग्रीक शब्दापासून आला असून त्याचा अर्थ पुस्तकांचे पुस्तक किंवा ग्रंथालय, असा आहे.

आदाम, नोहा आणि अब्राहाम यांच्याशी तोंडी संवाद साधण्याला दोन हजारांपेक्षा अधिक काळ लोटल्यानंतर, देवाने १५ शतकांहून अधिक काळ सुमारे ४० पुरुषांचा वापर करून आपला संदेश लिखित स्वरुपात मांडला. या संदेशवाहकांना संदेष्टे किंवा प्रेषित म्हटले गेले. संदेष्टा शब्दाचा शब्दशः अर्थ बोलणारा असा आहे. प्रेषित म्हणजे संदेशवाहक. आज त्यांनी एका खंडामध्ये लिहिलेले पवित्र शास्त्र आपल्याकडे आहे. पवित्र शास्त्रलेख, संदेष्टयांचे लेखन आणि देवाचे वचन ह्या शब्दांनीही पवित्र शास्त्राचा उल्लेख केला जातो. तोरा, स्तोत्र आणि शुभवर्तमान हे बायबलमधील विशेष भागाला संबोधित करते. अरबीमध्ये, ह्या पवित्र शास्त्रांना अल-किताब-अल-मुकद्दस म्हणतात, म्हणजे पवित्र पुस्तक.



शतकानुशतके, पवित्र शास्त्र जगातील इतर सर्व पुस्तकांना मागे टाकत सर्वाधिक खपाचे पुस्तक आहे. आजपर्यंत, पवित्र शास्त्रातील शास्त्रलेखांचे अंशतः किंवा संपूर्णपणे, २४०० पेक्षा अधिक भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे, शिवाय इतर १९४० भाषांमध्ये भाषांतराचे काम सुरु आहे.[५] अन्य कोणत्याही पुस्तकाच्या बाबतीत असे म्हणता येणार नाही.

इतकी अतुलनीय लोकप्रियता असूनही, बायबल हे मानवी इतिहासातील सर्वात तिरस्करणीय आणि भयभीत करणारे पुस्तक आहे. शतकानुशतके, जागतिक सरकारे आणि नेत्यांनी, धर्मनिरपेक्ष आणि धार्मिक लोकांनी मिळून सर्वाधिक खप असलेले हे पुस्तक बेकायदेशीर म्हणून जाहीर केले आणि ते जवळ बाळगणाऱ्या[६] नागरिकांचा छळ केला आणि संहारही केला. तसेच, काही

*"ख्रिस्ती"* देशांमध्ये[७], सार्वजनिक शाळा आणि संस्थांमध्ये बायबल वाचण्यास मनाई आहे.

**छळ झाला**

मी लहान होतो. माझ्या वडिलांचे रिचर्ड नावाचे एक मित्र होते. ते पूर्व युरोपमध्ये चौदा वर्षे कम्युनिस्टांच्या तुरुंगात होते. तिथे झोपू न देणे, उपाशी ठेवणे नेहमीचेच होते. उलटे लटकवून मारण्यात येई, शीतगृहाच्या खोलीत बंद केले जाई, लालबुंद सळयांनी डागण्या देत आणि सुऱ्यांनी भोसकण्यात येई. त्यांच्या शरीरावरचे खोल आणि विद्रूप व्रण मी स्वतः पाहिले आहेत. रिचर्ड यांच्या पत्नीलाही अटक केली होती आणि पतीप्रमाणे[८] त्याच *"अपराधी कृत्यासाठी"* तुरुंगाच्या छावणीत सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली होती.

नास्तिक राज्याविरुद्ध त्यांचा गुन्हा काय होता?

इतरांना बायबल शिकवताना त्यांना पकडण्यात आले होते.

**बहिष्कृत**

माझा मित्र अली मोठया संकटात सापडला होता. त्याच्या वडिलांनी कुटुंबातील पुरुषांची बैठक आयोजित केली होती.

मोठे काका उपस्थित होते.

धाकटया भावांना बोलावले गेले होते.

कुटुंबातीला पहिल्या मुलाला अलीला मध्यभागी बसवले होते.

अलीच्या वडिलांनी उत्कट भाषण दिले, समारोप करताना ते म्हणाले : *"तू आमच्या कुटुंबाला लाज आणली आहे! तू आमच्या धर्माचा विश्वासघात केला आहे! तू आता घर सोडले पाहिजे आणि पुन्हा कधीही परत येऊ नकोस. मला तुझे तोंडही पाहायचे नाही!"*

काकाने मध्येच म्हटले, *"हो, आणि जर तू उद्या बाहेर गेला नाहीस, तर मी तुझे सामान रस्त्यावर फेकून देईन!"*

राग का?

जवळजवळ एक वर्ष बायबल वाचल्यानंतर अलीने त्यावर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतला.

**जिवंत वचन**

बायबल इतके वादग्रस्त पुस्तक का आहे?

सरकारने त्यावर बंदी घालण्याचे आणि त्यावर विश्वास ठेवल्यामुळे आई-वडिलांनी मुलांशी नाते तोडण्यामागे काय कारण आहे?

या पुरातन लिखाणावर अविश्वास दाखवण्याचा आत्मविश्वास नास्तीकांसह लाखो एकेश्वरवाद्यांना कोठून मिळतो?

देवाचे वचन जिवंत, सक्रीय, भेदक आणि न्याय करणारे आहे असा बायबल दावा करते त्याचा ह्यांच्याशी काही संबंध असू शकतो का?

*"कारण देवाचे वचन सजीव, सक्रीय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे."* (इब्री. ४:१२)

## पुस्तकाशी दृढ राहावे

माझी पत्नी आणि मी आणि आमच्या आता मोठे झालेल्या मुलांनी, गेली पंचवीसहून अधिक वर्षे पश्चिम आफ्रिकेतील सेनेगलमध्ये व्यतीत केली आहेत. आमचे शेजारी इस्लाम धर्माचे अनुयायी आहेत. इस्लाम म्हणजे आत्मसमर्पण किंवा शरण जाणे. मुस्लीम म्हणजे शरण जाणारा. कुराण हे मुस्लीम लोकांसाठी पवित्र पुस्तक आहे. मी जे काही लिहितो ते सेनेगल आणि जगभरातील मुस्लीम मित्र आणि ओळखीच्या लोकांशी  झालेल्या वैयक्तिक संवादाचे फलित आहे.

मी बायबल आणि कुराण या दोन्हींचा अभ्यास केला आहे, तरी एकच देव एकच संदेश हे पुस्तक बायबलवर केंद्रित असेल. काही वर्षांपूर्वी, सेनेगलमधील एक मित्र आणि मी सेनेगलच्या[९] वोलोफ भाषेत १००-भागांची कालक्रमानुसार रेडीओ मालिका तयार केली. प्रत्येक प्रसारणामध्ये बायबलच्या संदेष्ट्यांची एक कथा आणि संदेश असतो. काही श्रोत्यांनी विचारले, *"तुम्ही कुराण का शिकवत नाही?"* यावर माझे उत्तर असे होते :

या देशात मुले तीन-चार वर्षांची झाल्यावर कुराण पठण करू लागतात. कुराण शिकवणारे शिक्षक आणि शाळा प्रत्येक परिसरात आढळतात. पण तोरा, स्तोत्र आणि शुभवर्तमानामधील कथा आणि संदेश शिकवण्यास कोण सक्षम आणि इच्छुक आहे? कुराण म्हणते की बायबलची ही पुस्तके देवाने सर्व मानवजातीला दिली आहेत ***"मार्गदर्शक** आणि **प्रकाश**..... आणि **उपदेश** म्हणून"* (सूरह ५:४६[१०]) हे तुम्हांला माहित आहेच. कुराण असेही सांगते : *"आणि जर तुम्हांला तुमच्याकडे पाठवण्यात आलेल्या या ग्रंथाविषयी* (जराशीही) *शंका असेल, तर तुमच्यापूर्वी प्रकट झालेल्या ग्रंथांचे **पठण करणाऱ्यांना विचारा** ... ."* (सूरह १०:९४[११]). आणि जे बायबलवर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी, कुराण म्हणते: *"*(तुम्ही त्यांना) *सांगा पूर्वीच्या ग्रंथांना मानणाऱ्यांनो! तुमच्या श्रद्धेला तोपर्यंत कुठलाही वैध आधार प्राप्त होत नाही,* **जोपर्यंत तुम्ही नियमशास्त्र [तौरात], इंजील**

**यांचे तसेच तुमच्या पालनकर्त्याकडून जे काही पाठवण्यात आलेले आहे त्याचे अनुपालन करत नाही**" (सूरह ५:६८). तीन दशकांहून अधिक काळापासून पुस्तक वाचत असलेल्या आणि त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या  पुस्तकातील लोकांपैकी एक म्हणून, तुम्ही क्वचित ऐकलेल्या संदेष्टयांच्या कथा आणि संदेश सांगणे हा माझा विशेषाधिकार आहे. पवित्र शास्त्रामध्ये सापडणारे सत्य अन्यत्र कोठेही आढळत नाही, जे कुराणपेक्षा किमान २००० वर्षांपूर्वी लिहिले गेलेले आहे .

## त्याची कथा

तुमच्या आईवडिलांनी तुम्हांला शिकवले असेल, *"अनोळखी व्यक्तींवर कधीही विश्वास ठेवू नका."* त्यांना माहित होते की तुम्ही एखाद्यावर ठामपणे विश्वास ठेवण्याआधी, तुम्हांला त्याच्या किंवा तिच्या इतिहासाबद्दल काही माहित असणे आवश्यक आहे.

थोडे लोक ज्यांवर तुम्ही भरवसा ठेवता त्यांचा विचार करा.

तुम्ही त्यांच्यावर भरवसा का ठेवता?

तुम्ही त्यांच्यावर भरवसा ठेवता कारण काही कालावधीनंतर ते विश्वसनीय आहेत अशी तुमची खात्री पटलेली आहे. त्यांनी तुमचे वाईट नाही, तर चांगले केले. जेव्हा त्यांनी सांगितले की ते काहीतरी करतील, तेव्हा ते त्यांनी केले. जेव्हा त्यांनी तुम्हांला काहीतरी देण्याचे वचन दिले, तेव्हा त्यांनी ते दिले. ते विश्वसनीय आहेत कारण तुम्हांला त्यांची माहिती आहे. बायबलमध्ये देव पुरुष, स्त्रिया आणि मुलांशी संवाद साधत असल्याचे अनेक ऐतिहासिक वृत्तांत आहेत. प्रत्येक कथा स्वर्ग आणि पृथ्वीच्या निर्मात्याला भेटण्याची, त्याचे शब्द ऐकण्याची आणि हजारो वर्षांच्या मानवी इतिहासाच्या संदर्भात त्याच्या कार्याचे निरीक्षण करावे अशी संधी देते. तो कसा आहे? होय, तो महान आहे, परंतु कोणत्या मार्गाने तो महान आहे? तो न बदलणारा आहे का? तो कधी स्वतःच्या विरोधात जातो का? तो दिलेली अभिवचने पाळतो का? तो आपल्याला फसवेल का? त्याच्यावर भरवसा ठेवावा का?

त्याची कथा या आणि यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे देते.

बायबल हे देवाचे इतिहासाचे पुस्तक असून ते मानवी इतिहासाचे मोठे चित्र केवळ प्रकट करण्याबरोबरच ते त्याची कथा सांगते.

## अंतिम नाटक

प्रत्येकाला एक चांगली कथा आवडते.

बायबलमध्ये अनेक कथा आहेत ज्या सगळयांची मिळून आजवर सांगितलेली सर्वात मोहक

कथा तयार होते. देव आणि मनुष्य यांच्याविषयीचा बायबलमधील वृत्तांत हे महत्वपूर्ण रहस्यमय नाटय आहे, प्रीती आणि युद्ध, चांगले आणि वाईट, संघर्ष आणि विजयाची ही कथा आहे. उत्पत्तीपासून भविष्यातील घटनांपर्यंत, ते जीवनातील मोठया प्रश्नांची तर्कशुद्ध, समाधानकारक उत्तरे देते. इतर कोणासारखाही नाही असा त्यांचा शेवट आणि निष्कर्ष आहे.

काही वर्षांपूर्वी, सेनेगलमधील आमच्या घरात पुरुष आणि स्त्रियांच्या गटाला देवाची कथा सांगण्याचे मी संपविल्यावर, एक स्त्री, तिच्या डोळ्यात अश्रू आले होते, ती म्हणाली, *"किती अद्भुत कथा! जरी लोकांनी देवावर विश्वास ठेवला नाही, तरी त्यांनी कमीत कमी हे स्वीकारले पाहिजे की तो आतापर्यंतचा सर्वोत्कृष्ट पटकथा लेखक आहे!"* युगानुयुगे नाटक सादर करण्यासाठी शास्त्रांचे अनेक भाग कसे जुळतात याची झलक या स्त्रीला मिळाली होती, ज्यामध्ये देव स्वतः लेखक आणि नायक असे दोन्हीही होता.

## महान संदेश

आतापर्यंत सांगितलेल्या सर्वात मनमोहक कथांपेक्षा अधिक कथा बायबलमध्ये आहेत. त्याच्या कथांमध्ये बसवलेला हा आतापर्यंतचा सर्वात आकर्षक संदेश आहे-देवाकडून एक संदेश.

गेल्या काही वर्षांत मी हजारो मुस्लिमांशी बायबलच्या संदेशावर चर्चा केली आहे. बरेच वैयक्तिक मित्र आहेत, इतरांना मी फक्त ई-मेलद्वारे ओळखतो. आमच्या बहुतेक चर्चा एकाच प्रश्नात मांडल्या जाऊ शकतात :

एका सत्य देवाचा संदेश काय आहे?

## ई-मेल प्रतिसाद

हा प्रश्न अनेक मार्गांनी विचारला आहे.

पुढील ई-मेल मला मध्य पूर्व भागातून आला आहे, ज्यास आपण अहमद[१२] म्हणू त्या माणसाने लिहिला आहे.

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

सलाम. येशू, मसीहा म्हणून आला आणि माझा त्यावर विश्वास आहे, पण तो देव आहे असे त्याने कधीच म्हटले नाही. मुहम्मद (पीबीयुएच[१३]) आधी तो देवाकडे जाण्याचा मार्ग होता, पण त्यानंतर, सर्व ख्रिस्ती लोकांनी मुस्लीम झाले पाहिजे होते कारण जेव्हा जगाच्या शेवटास ख्रिस्त परत येईल, तेव्हा तो नवीन कराराने नाही तर कुराण द्वारे शासन करेल.

ख्रिस्ताला कधीही वधस्तंभावर खिळले नाही. जर तुम्हांला तर्कमय व्हायचे असेल, तर जरी येशूला वधस्तंभावर खिळले गेले, तरी त्याचा अर्थ असा होत नाही की त्यामुळे लोकांची पापे

सहज पुसून टाकली गेली आहेत. हे माझ्यासाठी मूर्खपणा आहे. त्याव्यतिरिक्त, जर तुम्ही मला हे सांगणार असाल की देवाने त्याच्या प्रिय एकुलत्या एका पुत्राचे अर्पण केले, तर मग मी तुम्हांला सांगेन : देव इतका महान नाही का की त्याला काय हवे आहे ते लोकांना सांगता येईल आणि त्याच्या प्रिय पुत्राचा बळी न देता आणि त्याचा छळ न करता त्यांची पापे नष्ट करू शकेल??? ! सर्व लोक पापी आहेत या गोष्टीचा मला अर्थ लागत नाही. इस्लाम हा एकमेव परिपूर्ण धर्म आहे जो कधी पृथ्वीवर पाठवला गेला होता, आणि हेच खरे आहे असे मला वाटण्याचे कारण आहे, आणि देवाने पाठवलेला हा शेवटचा धर्म आहे. हाच फक्त एकमेव धर्म आहे ज्याकडे आयुष्याच्या प्रत्येक पैलूसाठी उपाय आहे. एखाद्या विशिष्ट गोष्टीत देवाचे मत काय असेल याचा अंदाज लावणे हे तुमच्यावर सोडलेले नाही.

कुराण हा एका संदेष्ट्याला आतापर्यंत पाठवलेला सर्वोत्कृष्ट चमत्कार आहे ! ठीक, एक वचन जे त्याच्यासारखे आहे, किंवा कुराणच्या वचनाशी अगदी साम्य असलेले असे बनवा!! तुम्ही उच्चस्तरीय अरबी भाषेतील सर्वात अस्खलित व्यक्ती असला तरीही तुम्ही कधीही सक्षम होणार नाही....

याव्यतिरिक्त येथे तुमच्या बायबलमध्ये भविष्यवाण्या आहेत, अस्सल, मुहम्मदच्या येण्याबद्दल......

माझा विश्वास आहे आणि माहित आहे की बायबल सध्या बहुतेक खोटे आहे आणि त्यातील सर्व पुस्तकांमध्ये फेरफार केल्यामुळे ते भ्रष्ट आहे....

मित्रा तुझ्या माहितीकरता, मी नवीन करार वाचला आहे, ते सत्याचा शोध घेण्यासाठी नाही, तर व्यक्तिगत आवड आहे, आणि एकदा नाही, तर दोनदा, आणि मी पाहतो की कुराणच्या महानतेच्या अगदी जवळ पोहचू शकणारे असे काहीही या जगात नाही, जे वास्तवात देवाचे वचन आहे, त्याच्या देवदूताकडून मुहम्मदला पाठवण्यात आले, आणि जर तुम्ही या उलट सिद्ध करू शकता, तर तसे करा. [त्याचठिकाणी[१४]]

सलाम,

"अहमद"

अहमदचे आव्हान आणि टिप्पण्यांकडे दुर्लक्ष करता कामा नये.

आपला निर्माणकर्ता अशा विषयांना हलकेपणाने घेत नाही आणि तुम्ही सुद्धा तसे नाही केले पाहिजे. संदेष्ट्यांच्या प्राचीन शास्त्रलेखांत, देवाने अहमदद्वारे विचारलेल्या प्रत्येक विषयावर स्पष्टपणे उत्तरे पुरवली आहेत कारण प्रत्येक समस्या अनंतकाळच्या- सर्वात महत्वाच्या प्रश्नाशी संबंधित आहे :

*एका सत्य देवाचा संदेश काय आहे?*

संदेष्टा ईयोबाने दोन समान प्रश्न उपस्थित केले :

*ज्ञान कोठे मिळू शकते?"* (ईयोब २८:१२)

*"माणूस देवासमोर **कसा** काय नीतिमान ठरू शकतो?"* (ईयोब ९:२)

## प्रवास

हजारो विरोधाभासी प्रतिसादांनी भरलेल्या गोंधळलेल्या जगात, माझ्या कल्पना मिश्रणात जोडणे हा माझा उद्देश नाही. त्याऐवजी, मी तुम्हांला आमंत्रित करतो की पुस्तकांच्या पुस्तकाद्वारे या प्रवासात माझ्याबरोबर सामील व्हा की  जीवनाच्या अंतिम प्रश्नांवर उत्तरे शोधावीत. जेव्हा आपण एकत्र प्रवास करतो, तेव्हा आपण पाहणार आहोत की पवित्र शास्त्रानुसार काय खरे आहे, आणि आपण अहमद आणि इतरांनी उपस्थित केलेल्या आव्हानांवर संदेष्ट्याच्या प्रतिसादावर चिंतन करू.

नवीन विषयाची तोंडओळख केल्यावर पुढे (पहिला भाग : धडे १-७), आपला प्रवास अधिकृतपणे सुरु होईल जेथे बायबल प्रारंभ होतो : जगाच्या इतिहासाची सुरुवात. तेथून आपण कालांतराने आणि अनंतकाळापर्यंत प्रवास करणार आहोत (दुसरा भाग आणि तिसरा भाग : धडे ८-३०)

स्वर्ग भेटीने या प्रवासाची सांगता होईल.

## प्रवास पर्याय

एकच देव एकच संदेश या पुस्तकाला एकामधील तीन पुस्तके म्हणून पाहिले जाऊ शकते. पहिला भाग बहुतेक लोकांना बायबलचा शोध घेण्यापासून रोखणाऱ्या अडथळयांचा सामना करते. दुसरा भाग आतापर्यंत सांगितलेल्या सर्वोत्तम कथेचा मध्यवर्ती संदेश अनावरण करते. तिसरा भाग लोकांसाठी देवाच्या अद्भुत उद्देशांकडे जवळून पाहण्यासाठी पडद्यामागे जाते.

बहुतेक प्रवाशांना प्रवासाच्या तयारीसाठी पहिला भाग अत्यंत फायदेशीर वाटेल. तरीसुद्धा, तुम्हांला संदेष्ट्यांची शास्त्रवचने विश्वसनीय असल्याचे माहित असल्यास किंवा जर तुम्ही देवाची कथा ऐकण्यासाठी आणि त्याचा संदेश विलंब न लावता समजून घेण्यासाठी उत्सुक असाल, तर मोकळ्या मनाने थेट दुसऱ्या भागाकडे जा. एकदा की तुम्ही संपूर्ण प्रवास पूर्ण केला, तुम्ही पहिल्या भागावर परत येऊ शकता.

जर तुम्ही बिनधास्त वेगाने प्रवास करण्यास प्राधान्य देत असाल, तर तुम्ही एका महिन्याच्या कालावधीत पुस्तकाच्या ३० धडयांना विभागण्याची निवड करू शकता, दररोज एका धडयावर चिंतन करा.

जर तुम्ही मुस्लीम असाल, तर तुम्हांला रमझानच्या ३० दिवसांच्या कालावधीत ही यात्रा करावीशी वाटेल. तुम्ही आत्मविश्वासाने यास सुरुवात करण्यास सक्षम असले पाहिजे कारण कुराण म्हणते : *''धर्माच्या बाबतीत कोणतीही जबरदस्ती नाही. सदाचरणी मार्ग आणि दुराचरणी मार्ग यातील फरक आता* (चांगल्याप्रकारे) *स्पष्ट झालेला आह. ''*..... आणि तुम्ही (त्यांना) सांगा की आम्ही अल्लाहवर आणि आमच्याकडे जे प्रकट करण्यात आले आहे त्यावर, आणि इब्राहीम व इस्माईल व इसहाक व याकुब व त्याची मुले यांच्याकडे जे प्रकट करण्यात आले त्यावर, आणि मूसा व ईसा (येशू) यांना जे काही देण्यात आले होते त्यावर, आणि इतर सर्व पैगंबरांना त्यांच्या पालनकर्त्याकडून जे काही देण्यात आले होते त्यावर श्रद्धा ठेवतो. त्या सर्व पैगंबरांदरम्यान आम्ही कोणताच भेदभाव करत नाही. आणि आम्ही स्वतःला, अल्लाहला समर्पित करतो.'' (कुराण, सूरह २:२५६, १३६ अनुवादक मौलाना वहिदुद्दिन खां, प्रकाशन- दिल्ली, २०१४[१५])

तुम्ही कोणताही मार्ग निवडा, येथे एक महत्वाची प्रवास सूचना आहे : एकदा तुम्ही प्रवासाला सुरुवात केली, की प्रवासाचा कोणताही भाग वगळू नका.

प्रत्येक नवीन टप्पा मागील टप्प्यावर तयार होतो. तुम्ही जे पाहता ते तुम्हांला लगेच समजत नसले तरीही, शेवटच्या पानापर्यंत वाचत आणि चिंतन करत राहा. प्रवासाचा काही भाग अनोळखी आणि आव्हानात्मक असेल, पण वाटेत ताजेतवाने होण्याचे मरुवन असेल.

तुम्ही किती अडथळयांना सामोरे जात आहात याची पर्वा करू नका, प्रवास करत राहा.

## सत्य

जगभरातील बहुसंख्य लोकांना असे वाटते की जीवनातील मोठया प्रश्नांबाबत खरे किंवा खोटे काय आहे हे कोणालाही कळू शकत नाही, जसे : मानवजातीचा उगम कोठे झाला? मी पृथ्वीवर का आहे? माझा शेवट कोठे होणार? बरोबर काय आहे आणि चूक काय आहे?

आज पाश्चिमात्य जगामध्ये, *''सर्वकाही सापेक्ष आहे,''* किंवा : *''एखाद्या व्यक्तीला पूर्ण सत्य कळू शकते असा विचार करणे चुकीचे आहे''* अशी विधाने करणे लोकप्रिय आहे. अशा घोषणांचे परस्पर विसंगत स्वरूप ओळखण्यासाठी तर्कशास्त्रात पीएचडी करण्याची गरज नाही. जर येथे परिपूर्ण सत्य नाही तर असे मत असलेले लोक *''सर्वकाही''* बद्दल कसे प्रतिपादन करू

शकतात किंवा काहीही *"चुकीचे"* आहे यावर कसा आग्रह धरू शकतात?

विश्वाचा निर्माणकर्ता, ज्याने त्याचे सत्य मानवजातीला प्रकट केले आहे, त्याचे लोक मत मांडत नाहीत याबद्दल आपण आभारी असू शकतो. जे सर्व त्याला प्रामाणिक अंत:करणाने शोधतात, त्यांना तो म्हणतो :

*"तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील."* (योहान ८:३२)

## योग्य निवड

काहीं वर्षांपूर्वी, ७९ वर्षाचा मुसा शेजारी राहत होता, तो आजारी होता, त्याला बायबल वाचवून दाखवण्यासाठी त्याने मला आठवडयातून तीन दिवस येण्यास सांगितले. मुसाने त्याच्या संपूर्ण आयुष्यभर कुराण वाचले होते, पण मोशेचा तोरा, दाविदाचे स्तोत्र, आणि येशूबद्दल सुवार्तेविषयी विचार करण्यासाठी कधीही वेळ काढला नव्हता-ही पुस्तके ज्याबद्दल कुराण कडकपणे स्वीकारण्याचा आणि विश्वास ठेवण्याचा सल्ला देते.[१६]

आम्ही कालक्रमानुसार मुख्य कथा शोधल्या आणि अशुद्ध पापी लोकांना त्यांच्या निर्मात्याने आणि न्यायाधीशाद्वारे नीतिमान कसे घोषित केले जाऊ शकते हे शिकलो तेव्हा मुसाने ते लक्षपूर्वक ऐकले. एकापेक्षा अधिक प्रसंगी मुसाने मला सांगितले, *"प्रत्येक सत्रानंतर, आपण ज्या गोष्टींचा अभ्यास केला त्याबद्दल मी केवळ विचार करत नाही, तर मी त्यांच्यावर चिंतन करतो!"*

एके दिवशी, शास्त्रवचनातून प्रकट झालेले आणखी एक महत्वाचे सत्य जाणून घेतल्यावर, स्पष्ट निराशेसह, मुसा त्याच्या शेजारीच बसलेल्या त्याच्या पत्नी व मुलीला म्हणाला, *"या गोष्टी आपल्याला कोणी का शिकवल्या नाहीत?"*

नंतर, जेव्हा मुसाच्या शेजाऱ्यांना समजले की तो एका परदेशीयाबरोबर बायबलचा अभ्यास करत आहे, तेव्हा निंदा सुरु झाली. दबाव इतका तीव्र होता की माझ्या वयोवृद्ध मित्राने काही वेळेकरता मी येऊ नये म्हणून सांगितले, हे स्पष्ट करत, *"मी सत्य नाकारत नाही, पण माझ्या कुटुंबावर खूप ताण आहे."*

सहा आठवडे थांबल्यावर (निंदा संपूपर्यंत), माझी पत्नी आणि मी मुसा आणि त्याच्या कुटुंबाला भेट देण्यास गेलो. त्याने आमचे मनापासून स्वागत केले आणि काही सुविचारीत प्रश्ने विचारली. आम्ही निघण्यापूर्वी, त्याने म्हटले, *"महत्वाची गोष्ट म्हणजे मी मरण्यापूर्वी योग्य करत आहे!"*

*"सत्य विकत घ्या आणि... ते विकू नका"*[१७] हे किती महत्वाचे आहे हे मुसाला समजले. चार महिन्यानंतर, आमचा प्रिय मित्र मरण पावला.

आम्ही एकत्र घालविलेल्या वेळेची आठवण केली, माझ्या प्रश्नाला त्याचा प्रतिसाद मी कधी विसरू शकणार नाही, *"मुसा, जर आज रात्री तुझा मृत्यू झाला, तर तू अनंतकाळ कोठे घालवशील?"*

काहीशा संकोचाने, त्याने उत्तर दिले, *"मी स्वर्गात जाईन."*

*"तुला हे कसे माहित आहे?"* मी विचारले. दोन्ही हातात पवित्र शास्त्र घेऊन तो म्हणाला, *"कारण यावर माझा विश्वास आहे!"*

## अभिवचन

शोध घेण्याचा हा प्रवास मी तुम्हा सर्वांना समर्पित करतो, मुसा सारखे, तुम्ही मरण्यापूर्वी योग्य निवड करा. एकच सत्य देव तुमचा हात हातात घेवो, प्रत्येक अडथळ्यावर तुम्हांस मदत करो, आणि तो कोण आहे आणि त्याने तुमच्यासाठी काय केले आहे हे स्पष्ट आणि अचूक समजण्यासाठी तुम्हांला मार्गदर्शन करो.

*"तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हांला पावेन."* (यिर्मया २९:१३)

हे *तुमच्यासाठी* देवाचे निश्चित अभिवचन आहे.



# धडा २

# अडथळ्यांवर मात करणे

*"तुम्ही हे जाणून घेण्याआधीच, अज्ञान तुम्हांला मारून टाकेल." वोलोफ म्हण*

**सु**मारे तीन सहस्र वर्षांपूर्वी, देवाने घोषित केले, *"ज्ञानाच्या अभावी माझ्या लोकांचा नाश झाला आहे. ....* " (होशेय ४:६). आजपर्यंत, बहुतेक लोक, ज्यांत महाविद्यालयीन पदवीधर आहेत, ते बायबलसंबंधी संदेष्ट्यांनी जे लिहिले आहे त्याकडे दुर्लक्ष करत जगतात आणि मरतात.

बायबलची प्राचीनता आणि प्रभाव लक्षात घेता, बायबल काय म्हणते याच्या मुलभूत आकलनाशिवाय एखाद्या व्यक्तीला खरोखरच सुशिक्षित म्हणता येईल का?

ज्याप्रमाणे जगाची लोकसंख्या हजारो धर्मांसह आली आहे, त्यामुळे शास्त्राकडे दुर्लक्ष करण्याची हजारो कारणे समोर आली आहेत. या आणि पुढील धडयात आपण त्यापैकी दहा कारणांवर विचार करणार आहोत. आणि एकदा आपण आपला प्रवास सुरु केल्यावर, आपण अशा अनेक अडथळ्यांना तोंड देणे आणि त्यावर मात करण्याची अपेक्षा करू शकतो.

**लोक बायबल नाकारतात याची दहा "कारणे" :**

**१. "दंतकथा"**

धर्मनिरपेक्ष युरोपियन आणि पाश्चात्य राष्ट्रांमध्ये, पुष्कळ लोक बायबल हे माणसांनी शोधलेल्या दंतकथा आणि सुंदर म्हणींच्या संग्रहापेक्षा थोडे अधिक असल्याचे घोषित करतात. बहुतेकांनी पवित्र शास्त्राचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास न करता हे मत धारण केले आहे.

सर आर्थर कॉनन डॉयलच्या काल्पनिक क्लासिक, शेरलॉक होम्सच्या सेलिब्रेट केसेसमध्ये, गुप्तहेराचा सहकारी डॉ. वॉटसन, होम्सला विशिष्ट गुन्हेगारी प्रकरणाबदल प्रश्न करतात :

*"तुम्ही त्यावरून काय शोधले?"*

*"माझ्याकडे अजून काही माहिती नाही,"* होम्सने उत्तर दिले. *"एखाद्याकडे माहिती असण्यापुर्वी सिद्धांत मांडणे ही मोठी चूक आहे. संवेदनाशून्यपणे, तथ्यांना अनुरूप असलेल्या सिद्धांतांऐवजी, सिद्धांतांना अनुकूल करण्यासाठी तथ्ये वळवणे सुरु होते."*[१८]

पुष्कळ लोक ही *"भांडवली चूक"* पवित्र शास्त्रासोबत करतात. पुरेशा माहितीशिवाय ते त्यांचे निष्कर्ष काढतात आणि त्यांच्या जागतिक दृष्टीकोन आणि जीवनशैलीला त्रास देणार नाही अशा सिद्धातांना अनुरूप तथ्ये वळवतात.

## २. "विविध स्पष्टीकरणे"

काही लोक पवित्र शास्त्र वाचत नाहीत कारण एक गट असे घोषित करताना ते ऐकतात, *"बायबल हे म्हणते!"* तर दुसरे त्याच्या उलट बोलतात, *"नाही, त्याचा अर्थ असा नाही! असा आहे!"* पवित्र शास्त्र समजू शकत नाही असे गृहीत धरण्यात काही नवल नाही.

ज्यावेळेस बायबल जीवनाच्या काही मुद्दयांवर वेगवेगळया दृष्टीकोनाची परवानगी देते[१९], मग जेव्हा शाश्वत परिणामाचा मुद्दा येतो तेव्हा ते विविध अनुवादांसाठी काही जागा सोडत नाही. देवाचे पुस्तक समजते, परंतु ते काय म्हणते याचे आपण निरीक्षण केले पाहिजे.

दिग्गज शेरलॉक होल्म्सनेही वॉटसनला सांगितले, *"तुम्ही पाहता, परंतु तुम्ही निरीक्षण करत नाही. फरक हा स्पष्ट आहे. उदाहरणार्थ, हॉलपासून या खोलीपर्यंतच्या पायऱ्या तुम्ही वारंवार पाहिल्या आहेत."*

*"वारंवार."*

*"किती वेळा?"* होल्म्सने विचारले.

*"साधारण शंभर वेळा,"* वॉटसनने उत्तर दिले.

*"मग ते किती आहेत?"*

*"किती आहेत! हे माहित नाही."*

*"अगदी तसेच! तुम्ही निरीक्षण केलेले नाही! आणि तरीही तुम्ही पाहिलेले आहे. तोच तर माझा मुद्दा आहे. आता, मला माहित आहे तेथे सतरा पायऱ्या आहेत, कारण त्या मी पाहिल्या आणि निरीक्षण असे दोन्हीही केल्या आहेत."*[२०]

त्याचप्रमाणे, अनेकांना बायबलमध्ये वेगवेगळी विधाने दिसतात, परंतु ते खरेच काय म्हणतात हे थोडेच निरीक्षण करतात. परिणामस्वरूप, यात आश्चर्य नाही की लोक  निरनिराळे अर्थ सांगतात.

*येथे स्पष्टीकरणात्मक प्रश्न आहे : मला देवाचा संदेश समजून घ्यायचा आहे का? ज्याप्रमाणे लपवलेल्या खजिन्याचा शोध घेण्यासाठी मी जी उत्कटता आणि तपासणीचा वापर करतो त्याप्रमाणेच देवाच्या सत्याचा शोध घेण्यासाठी मी तयार आहे का?*

शलमोन राजाने लिहिले *: "जर तू विवेकाला हाक मारशील, सुज्ञतेची आराधना करशील, जर तू रुप्याप्रमाणे त्याचा शोधकरशील, व गुप्त निधींप्रमाणे त्याला उमगून काढशील, ........आणि देवाविषयीचे ज्ञान तुला प्राप्त होईल."* (नीतिसूत्रे २:३-५)

## ३. "ख्रिस्ती लोक"

बायबलचे अनुसरण करण्याचा दावा करणाऱ्या लोकांनी केलेल्या वाईट गोष्टींमुळे बरेच लोक बायबल नाकारतात. *"धर्मयुद्धाचे काय ज्यामध्ये* "अविश्वासणाऱ्यांची" *वधस्तंभाच्या निशाणाखाली कत्तल केली गेली?"* त्यांनी विचारले. *"चौकशीबद्दल काय? बायबलवर विश्वास ठेवण्याचा दावा करणाऱ्या लोकांद्वारे आज अन्याय करण्याबद्दल काय?"* सत्य हे आहे की कोणीही जो ख्रिस्ती (त्याचा अर्थ ख्रिस्ता-समान) नाव धारण करतो आणि ख्रिस्ताची प्रीती आणि करुणा प्रतिबिंबित करण्यास चुकतो तो येशू ख्रिस्ताने जो आदर्श दाखवला आणि शिकवले त्याचा जिवंत विरोधाभास आहे. येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले : *"आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर, असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा आणि जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा."* (मत्तय ५:४३-४४)

इतरांनी विचारले, *"अप्रामाणिकपणा, दारूबाजी आणि अनैकतेचे जीवन जगणाऱ्या ख्रिस्ती लोकांबद्दल काय?"* पुन्हा, एक व्यक्ती नैतिक अशुद्धपणामध्ये जगत आहे हे पवित्र शास्त्राची थेट अवज्ञा आहे जे घोषित करते : *"अनीतिमान माणसांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही हे तुम्हांला ठाऊक नाही काय? फसू नका; जारकर्मी, मूर्तिपूजक, व्यभिचारी, स्त्रीसारखा संभोग देणारे, पुरुषसंभोग घेणारे, चोर, लोभी, मद्यपी, चहाड व वित्त हरण करणारे ह्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही. आणि तुमच्यापैकी कित्येक तसे होते; तरी तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात व आपल्या देवाच्या आत्म्यात धुतलेले, पवित्र केलेले व नीतिमान ठरवलेले असे झालात"* (१ करिंथ. ६:९-११). *"न्यायी"* ठरविले जाणे म्हणजे नीतिमान घोषित केले जाणे आहे. नंतर, पवित्र शास्त्राच्या आपल्या प्रवासात, पापी लोकांना क्षमा कशी केले जाऊ शकते आणि देवाकडून नीतिमान कसे घोषित केले जाऊ शकते याबद्दल आपण शोध घेणार आहोत.

आणखी इतरांनी विचारले, *"मग त्या ख्रिस्ती लोकांबद्दल काय जे मूर्तीला नमन करतात आणि मरीया आणि संतांकडे प्रार्थना करतात?"* थोडक्यात, कोणीही जे असे आचरण ठेवतात ते

देवाच्या वचनाऐवजी त्यांच्या चर्चच्या परंपरेचे पालन करतात जे म्हणते : *"तू आपल्यासाठी मूर्ती करू नयेत; त्याचप्रमाणे कोरीव मूर्ती अथवा स्तंभ उभारू नयेत अथवा आकृती कोरलेला पाषाण पुजण्यासाठी आपल्या देशात स्थापन करू नये, कारण मी परमेश्वर तुमचा देव आहे"* (लेवीय २६:१). मूर्तीसमोर नतमस्तक होणे, देवाच्या अधिकारापेक्षा माणसांच्या अधिकाराला महत्व देणे, आणि एक सत्य देवाला न जाणता यंत्राप्रमाणे प्रार्थना करणे हे सर्व मूर्तिपूजेचे प्रकार आहेत. बहुतेक लोक गोंधळलेले आहेत कारण ते गृहीत धरतात की ख्रिस्ती लोक आणि कॅथोलिक हे समान शब्द आहेत. ते नाहीत. तसेच ख्रिस्ती लोक आणि प्रॉटेस्टंट समान नाहीत. खळ्यात आत आणि बाहेर करणारा व्यक्ती घोडा बनत नाही तसेच चर्चच्या इमारतीत जाणे आणि बाहेर जाणे एखाद्या व्यक्तीला ख्रिस्ती बनवत नाही.

## ४. ढोंगी"

बायबल न वाचण्यासाठी दुसरे कारण काही देतात ते *"कारण सर्व ढोंगी लोकांमुळे"* आहे. दु:खदपणे, बहुतेक जे बायबलवर विश्वास ठेवण्याचा दावा करतात ते बोलतात एक आणि जगतात वेगळ्या मार्गाने. ते देवाच्या संदेशाचा विपर्यास करतात आणि त्याच्या नावाचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करतात. अनेक धर्मोपदेशक हे स्वैराचार करणारे आणि अनैतिक असल्याचे समोर आले आहे. काही तुम्हांला सांगतात की जर तुम्ही त्यांना पैसे पाठवले तर तुम्ही आरोग्य आणि संपन्नतेसह आशीर्वादित व्हाल. बायबल अशा ढोंगी लोकांचा पर्दाफाश असे करते, *"मन बिघडलेल्या, सत्यास मुकलेल्या, भक्ती हे कमाईचे साधन आहे अशी कल्पना करणाऱ्या माणसांची एकसारखी भांडणे होतात; त्यांच्यापासून दूर राहा."* (१ तीमथ्य. ६:५)

येशूला त्याच्या काळातील स्वार्थी, वरकरणी धार्मिक नेत्यांना हे सांगावयाचे होते :

*"अहो ढोंग्यांनो, तुमच्याविषयी यशयाने यथायोग्य संदेश दिला की, 'हे लोक तोंड घेऊन माझ्याकडे येतात व ओठांनी माझा सन्मान करतात, परंतु त्यांचे अंत:करण माझ्यापासून दूर आहे. ते व्यर्थ माझी उपासना करतात; कारण ते शास्त्र म्हणून जे शिकवतात ते असतात मनुष्याचे नियम."* (मत्तय १५:७-९)

आणि त्याच्या शिष्यांना, येशूने म्हटले,

*"तसेच जेव्हा जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा तेव्हा ढोंग्यांसारखे असू नका; कारण लोकांनी आपणांस पाहावे म्हणून सभास्थानात व चवाठयावर उभे राहून प्रार्थना करणे त्यांना आवडते....."* (मत्तय ६:५)

कारण आपल्यापैकी प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या ढोंगीपणासाठी दोषी आहे (आपण जे नाहीत ते असण्याचा ढोंग करत असतो), तर दुसऱ्याच्या ढोंगीपणाने आपल्याला

आपल्या निर्माणकर्त्याला ओळखण्यापासून दूर ठेवले पाहिजे का आणि आपण जसे लोक असावेत असा त्याचा हेतू आहे त्यामध्ये त्याच्या वचनाने आपल्याला परिवर्तीत करू नाही दिले पाहिजे का?

## ५. "जातिवाद"

काही बायबलला नाकारतात कारण ते त्यास इतर लोकांपेक्षा काही निश्चित लोकांच्या गटाला पसंती देत आहे असे पाहतात. जरी आपल्यापैकी बहुतेकांना वंशवाद (आपल्या वंशाच्या गटाला इतरांपेक्षा पसंती देणे) किंवा जातीयवादाच्या काही स्तरासाठी दोषी मानले पाहिजे, बायबल हे स्पष्ट आहे : *"देव पक्षपाती नाही."* (प्रेषित. १०:३४)

उदाहरणार्थ, मोशे संदेष्टयाने एका इथियोपियन स्त्रीशी[२१] विवाह केला होता हे तुम्हांला माहित आहे का? तुम्ही ही कथा वाचली आहे का की देवाने, अलीशा संदेष्टयाद्वारे, अरामी सेनेचा सेनापती जो कोडी होता तो देवासमोर नम्र झाल्यावर त्याला कसे शुद्ध केले होते?[२२] किंवा देवाने यहूदी संदेष्टा योनाला आज्ञा दिली की निनवे (इराकमध्ये) नगराला पश्चात्ताप आणि तारणाचा त्याचा संदेश सांगावे" *योना निनवेच्या लोकांचा द्वेष करत होता आणि त्याची इच्छा होती की देवाने त्यांचा नाश करावा, परंतु देवाने त्यांच्यावर प्रीती केली आणि त्यांना दया दाखवली.*[२३] *जगासाठी देवाच्या तारणाच्या कथेला प्रकट करण्यात पर्शियाने* (इराण) *महत्वाची भूमिका पार पाडली याबद्दल तुम्ही परिचित आहात का?*[२४] *पापी शोमरोनी स्त्रीला सार्वकालिक जीवनाचा संदेश सांगण्याच्या येशूच्या हृदयस्पर्शी वृत्तांताचा तुम्ही विचार केला का, जरी यहूदी लोक शोमरोनी लोकांना टाळत होते आणि सर्व शोमरोनी लोकांना* "अशुद्ध" असे मानले होते?[२५]

आपले जग जातीयवादाने ग्रासलेले आहे, परंतु आपला निर्माणकर्ता नाही. त्याच्या दृष्टीसमोर केवळ एकच जात आहे-मानव जात.

*"ज्या देवाने जग व त्यातले अवघे निर्माण केले तो स्वर्गाचा व पृथ्वीचा प्रभू असून हातांनी बांधलेल्या मंदिरात राहत नाही; आणि त्याला काही उणे आहे, म्हणून माणसांच्या हातून त्याची सेवा घडावी असेही नाही; कारण जीवन, प्राण व सर्वकाही तो स्वतः सर्वांना देतो. आणि त्याने एकापासून माणसांची सर्व राष्ट्रे निर्माण करून त्यांनी पृथ्वीच्या संबंध पाठीवर राहावे असे केले आहे; आणि त्यांचे नेमलेले समय व त्यांच्या वस्तीच्या सीमा त्याने ठरवल्या आहेत; अशासाठी की, त्यांनी देवाचा शोध करावा, ....तो आपल्यापैकी कोणापासूनही दूर नाही; कारण आपण त्याच्या ठायी जगतो, वागतो व आहोत...."* (प्रेषित १७:२४-२८)

ही घोषणा देवाने सर्व लोकांसाठी केली आहे *"एकाच रक्ताने"* हे आधुनिक विज्ञान द्वारे

पुष्टी केले गेले आहे, जे स्पष्ट करते : *“मानवी अनुवांशिक कोड किंवा जीनोम, हे संपूर्ण जगभर ९९.९ % समान आहेत. जे काही उरते त्या वैयक्तिक फरकासाठी डीएनए जबाबदार आहे- उदाहरणार्थ, डोळ्यांचा रंग, किंवा रोगाचा धोका.”*[२६]

*“स्वर्ग आणि पृथ्वीचा”* निर्माणकर्ता आणि मालक, जो आपल्यापैकी कोणापासूनही दूर नाही,*” तो तुमची आणि माझी काळजी घेतो आणि त्याची इच्छा आहे की आपण “*प्रभूचा शोध घ्यावा” आणि त्याचा संदेश समजावा. त्याने आपल्या जन्माच्या प्रत्येक तपशीलाची मांडणी केली आहे. तो प्रत्येक राष्ट्र, भाषा, संस्कृती आणि रंगाच्या लोकांवर प्रेम करतो, आणि त्यांच्या स्वतःच्या भाषेत त्याच्या नावाने हाक मारण्यास तो त्यांना आमंत्रित करतो.

## ६. “पवित्र शास्त्राचा देव खून करण्यास मंजुरी देतो”

हा ई-मेल एका नास्तिकाकडून आला (किंवा धर्मनिरपेक्ष मानवतावादी, जसे म्हणावे म्हणून तो प्राधान्य देतो) :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

बायबल म्हणते, “मी परमेश्वर, देव जो करुणा आणि दयेने पूर्ण आहे, ज्यास लवकर क्रोध येत नाही आणि जो महान प्रीती आणि विश्वासूपणा दाखवतो.” स्वयं-प्रशंसेचे सुंदर शब्द, परंतु त्यातील एकही त्याच्या कृतीसह मेळ करू शकत नाही. देव इतका प्रेमळ दिसत नाही जेव्हा त्याने दक्षिणपूर्व आशियामध्ये डिसेंबर २००४ च्या सुनामीमध्ये जवळजवळ एक चतुर्थांश दशलक्ष लोकांना मरू दिले....कनान देशातील तथाकथित प्रवेशामध्ये, पवित्र शास्त्राचा देव शांतीप्रिय आणि निष्पाप पुरुष, स्त्रिया, मुले आणि तान्ह्या बाळांच्या खुनास मंजुरी देतो... हे असे का, मी एक केवळ मर्त्य मनुष्य, त्यास माझ्या तथाकथित “निर्माणकर्त्या” पेक्षा अधिक करुणा का? मी संघर्ष, द्वेष, युद्धे, मारणे, आपत्ती, गरिबी, भूक, आजार, यातना, दूःख आणि दुर्दशा कधीही होऊ दिले नसते जे आपल्या ग्रहावर घडत आहेत जर त्यांस रोखणे हे माझ्या शक्तीमध्ये असते.

बहुतेक विचारतात, *“जर देव हा चांगला आणि सर्व-शक्तिमान दोन्हीही आहे, तर वाईटाचा तो अंत का करत नाही?”* तरीही थोडे विचारतात, *“जर देव चांगला आणि सर्व-शक्तिमान आहे, तर जेव्हा मी वाईट कृत्ये करतो तेव्हा तो मला का थांबवत नाही?”* आपली इच्छा आहे की देवाने वाईटाचा न्याय करावा, परंतु त्याने आपला न्याय करावा ही आपली इच्छा नाही.

ही विसंगती लक्षात घेऊन, आपण मान्य करतो की आपल्या मानवतावादी मित्राने काही कठीण आव्हाने उभी केली आहेत. कोणतीही साधी उत्तरे नसली तरी, समाधानकारक उत्तरे आहेत. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासात नंतर, जेव्हा आपण देवाचे चरित्र आणि पापाच्या दूरगामी परिणामांना सामोरे जातो, तेव्हा देवाची उत्तरे ही स्पष्ट होतील. त्यावेळे दरम्यान, पुरुष, स्त्रिया, मुले आणि बाळांचे जीवन हिरावून घेणाऱ्या आपत्तींना जेव्हा तो अनुमती देतो आणि आदेश देखील देतो तेव्हा आपल्याला आपल्या निर्माणकर्त्याचा न्याय करण्यापासून रोखण्यासाठी येथे तीन तत्वे आहेत :

**१) मनुष्य फक्त काही अंश पाहतो, परंतु देव अवश्य संपूर्ण चित्र पाहतो.**

लोक ज्यास *"अन्यायी"* दुर्घटना म्हणून वर्गवारी करतात ज्यामध्ये *"निष्पाप"* बळी *"त्यांच्या वेळेआधी"* मरतात, त्यास देव सार्वकालिकतेच्या दृष्टीकोनातून पाहतो. तो घोषित करतो की व्यक्तीचे पृथ्वीवरील क्षणभंगुर अस्तित्व हे केवळ मुख्य घटनेसाठी प्रस्तावना असे आहे.[२७] डोळ्यांना दिसण्यापेक्षा जीवनात बरेच काही आहे. हे स्पष्ट करण्यासाठी, आईच्या उदरातील गर्भाची कल्पना करा. जर तो त्याच्या मर्यादित जागतिक दृष्टिकोनावर आधारित तर्कसंगत करू शकला तर तो देवाला सांगू शकेल : *"मी आणि इतर अजन्मलेल्या बाळांनी काय केले आहे की आम्ही भ्रूण पिशवीत बंदिस्त होण्यास पात्र आहोत? आम्ही बाहेर लेकरांना हसताना आणि खेळताना ऐकत आहोत, आणि येथे आम्ही या अंधारात कबरेत, पाण्याच्या जगात आहोत! हे न्याय नाही! असे का आहे, की मी, केवळ एक भ्रूण, ते मला माझ्या निर्माणकर्त्यापेक्षा अधिक करुणा आहे?"*

उघडपणे, अजन्मलेली बालके त्यांच्या निर्माणकर्त्याला अशा प्रकारे आव्हान देत नाहीत, परंतु प्रौढ देतात. *"हे मानवा, देवाला उलटून बोलणारा तू कोण? घडलेली वस्तू आपल्या घडवणाऱ्याला, 'तू मला असे का केलेस,"* असे म्हणेल काय?" (रोम. ९:२०)

**२) मनुष्यासाठी जे चूक आहे ते देवासाठी चुकीचे असेलच असे नाही.**

जीवनाचा स्त्रोत आणि पालनकर्ता म्हणून, त्याला ते संपविण्याचा अधिकार देखील आहे. ईयोब संदेष्टा, ज्याने त्याची सर्व मालमत्ता आणि त्याची सर्व दहा मुले एका पाठोपाठ आपत्तींमध्ये गमावली, त्याने घोषित केले : *"मी मातेच्या उदरातून नग्न आलो आणि तसाच जेथून नग्न आलो तेथे परत जाणार आहे; परमेश्वराने दिले, आणि परमेश्वराने नेले; धन्य परमेश्वराचे नाम!"* ह्या सर्व प्रसंगात ईयोबाच्या हातून पाप झाले नाही व अनुचित कृत्य केल्याचा आरोप त्याने देवावर केला नाही." (ईयोब १:२१-२२)

आपला आगामी प्रवास दृष्यांमागील देवाच्या काही अनोळखी तरीही ज्ञानी रचनांची

अंतर्दृष्टी देईल.[२८] आपण विश्वाच्या सर्वसत्ताधारी शासकास भेटणार आहोत, जो मानवास त्याजवर प्रीती करण्यास व त्याची आज्ञा पाळण्यास बळजबरी करत नाही. जग या वर्तमान दुर्दशेच्या अवस्थेत का आहे याचा देखील आपण शोध घेणार आहोत.

**३) शेवटी, देव सर्वांना परिपूर्ण न्याय देईल.**

भूतकाळ आणि वर्तमानकाळातील घटनांचा अर्थ काढण्यासाठी जेव्हा आपण संघर्ष करतो, तेव्हा हे लक्षात ठेवणे उपयुक्त आहे की आपल्या निर्माणकर्त्याजवळ प्रत्येक आत्म्याबद्दल सर्वकाही माहिती आहे; आपल्याकडे नाही. देव आपल्या नैतिक मानकांनुसार नाही, तर त्याच्या मानकांनुसार कार्य करतो. काय बरोबर आणि चूक आहे हे आपण त्याला सांगत नाही; तो आपल्याला सांगतो. जरी देव लोकांना चुकीच्या निवडी करू देतो ज्याचा इतरांवर विपरीत परिणाम होतो, तरी वाईट गोष्टींबद्दल तो उदासीन नाही. न्यायाचा दिवस येत आहे जेव्हा देव प्रत्येक पुरुष, स्त्री आणि मुलांना त्याच्या नीतिमत्वाच्या मानकानुसार न्याय करेल. त्याच्या प्रेमाची आणि न्यायाची परिसीमा अनंत आहेत.[२९] *"…. परमेश्वर देव न्यायी देव आहे; जे त्याची वाट पाहतात ते सर्व धन्य."* (यशया ३०:१८)

जर तुम्हांला, आमचा ई-मेल संवाददाता आवडला, तर तुमच्या स्वतःला [तुमच्या] निर्माणकर्त्यापेक्षा अधिक करुणामय असे पाहा, वाचत राहा. देव त्याचे रहस्य त्यांना प्रकट करतो जे त्याचे ऐकण्यासाठी नम्र आणि संयमी आहेत.

*"गुप्त गोष्टी आपला देव परमेश्वर ह्याच्या स्वाधीन आहेत, पण प्रकट केलेल्या गोष्टी आपल्या व आपल्या वंशजांच्या निरंतरच्या आहेत….."* (अनुवाद २९:२९)

## ७. "देवाच्या पुस्तकात सामावणार नाहीत…"

काही पवित्र शास्त्राचा अस्वीकार न्याय्य ठरवतात हे बोलत, *"जर बायबल हे देवाकडून प्रेरित आहे, तर त्यामध्ये लोक व्यभिचार करत आहेत, अनाचार, नरसंहार, विश्वासघात, मूर्तीपूजा आणि यासारख्या गोष्टी समाविष्ट नसत्या."* प्रेरणा आणि प्रकटीकरणाच्या त्यांच्या कल्पनेनुसार, देवाचे पुस्तक हे देवाकडून सरळ संदर्भांपुरतेच मर्यादित असले पाहिजे.

तथापि, जर पवित्र शास्त्राचा हेतू लोकांना त्यांच्या निर्माणकर्त्याला इतिहासाच्या रचनेमध्ये परिचित करण्याचा आहे, तर बायबलमध्ये केवळ देवाचे शब्द आणि कृत्येच नाहीत तर मानवजातीची पापे आणि उणीवाही नोंदवल्या जातात हे आश्चर्यकारक वाटले पाहिजे का? देवाला अधिकार नाही का की त्याचे गौरव, शुद्धता, न्याय, दया आणि विश्वासूपणा मानवजातीच्या अपयशाच्या अंधाऱ्या पार्श्वभूमीच्या विरोधात प्रकट करावे? त्याने स्वतःला आणि त्याचा संदेश कसा प्रकट करावा किंवा करू नये हे सर्वशक्तीमानाला सांगण्याची हिंमत आपण करतो का?

*“धिक्कार असो तुमच्या उलटया समजाला! माती कुंभाराशी समान असे गणतील काय? “तू मला केले नाहीस” असे कर्त्याला कर्म म्हणेल का? ‘तुला अक्कल नाही’ असे घडलेली वस्तू घडवणाऱ्यास म्हणेल काय?”* (यशया २९:१६)

बायबल अनेक ऐतिहासिक घटनांची नोंद करते जे देवाने होऊ दिले परंतु त्यास मान्यता दिली नाही. सत्य आणि जिवंत देव हा तो आहे जो वाईट परिस्थितीला काहीतरी चांगल्यामध्ये परिवर्तीत करण्यात आनंद करतो. कदाचित तुम्ही योसेफ, याकोबाचा अकरावा मुलगा, याची वेधक कथा वाचली असेल (उत्पत्ती ३७-५०). त्याच्या दहा वडील भावांनी त्याचा द्वेष केला आणि त्याच्याशी गैरव्यवहार केला आणि इश्माएली लोकांना त्यास गुलाम म्हणून विकले. योसेफाला अन्यायकारक तुरुंगात टाकण्यात आले, परंतु हे त्याच संकटातून योसेफ मिसर देशाच्या सिंहासनापर्यंत उंच केला गेला आणि त्याचे बंधू, मिसरी लोक आणि सभोवालच्या राष्ट्रांना उपासमारीपासून वाचवले. पुढे, नंतर त्याच्या भावांच्या हृदयात अमुलाग्र बदल झाला, योसेफाने त्यांना सांगितले : *“तुम्ही माझे वाईट योजले, पण आज पाहता त्याप्रमाणे अनेक लोकांचे प्राण वाचावे म्हणून देवाने ते चांगल्यासाठीच योजले होते.”* (उत्पत्ती ५०:२०)

## ८. “विरोधाभास पूर्ण”

बहुतेक लोक यावर जोर देतात की बायबल हे विरोधाभासांनी भरलेले आहे, तरीही काही वस्तुनिष्ठपणे त्याचा अभ्यास करण्यासाठी वेळ काढतात. इतर कोणीतरी पवित्र शास्त्राबद्दल काय म्हणतो यावरून त्याचा निषेध करणे योग्य आहे का? एखादे वाक्य येथे तेथे केवळ वाचण्याने कोणतेही पुस्तक समजले जाऊ शकते का? एखादे उत्तम पुस्तक केवळ टायपोग्राफिकल त्रुटी किंवा मजकुरातील विसंगती शोधण्यासाठी वाचले पाहिजे का? अर्थातच नाही. तरीही हे अशा प्रकारे अनेक लोक बायबल वाचतात.

अनेक वर्षांपूर्वी, मला बायबलमधील सहसा चुका आणि विरोधाभासांच्या मोठया यादीसह एक ई-मेल मिळाला जे एका वार्ताहराने कोणत्या तरी वेबसाईटवरून नक्कल केला होता.

येथे एक उतारा आहे :

पाठव **विषय** : ई-मेल प्रतिसाद

तुमचे बायबल स्वतःच विरोधाभास करते. उदाहरणार्थ :

- पहिल्या दिवशी, देवाने प्रकाश निर्माण केला, मग अंधाराला प्रकाशापासून वेगळे केले (उत्पत्ती १:३-५). सूर्य, जो रात्र व दिवसाला वेगळा करतो, त्यास

चवथ्या दिवसापर्यंत निर्माण केले नव्हते. (उत्पत्ती १:१४-१९)

- आदामाला त्याच दिवशी मेले पाहिजे होते ज्यादिवशी त्याने मनाई केलेले फळ खाल्ले होते (उत्पत्ती २:१७). आदाम ९३० वर्षे जगला (उत्पत्ती ५:५)
- येशू न्याय करत नाही (योहान ३:१७; ८:१५; १२:४७). येशू न्याय करतो (योहान ५:२२, २७-३०; ९:३९; प्रेषित. १०:४२; २ करिंथ. ५:१०).
- इत्यादी.

आता मी तुम्हांला एक प्रश्न विचारू इच्छितो : स्वीकारण्याआधी तुमचा धर्म मला प्रश्न विचारू देतो आणि माझ्या मेंदूचा वापर करू देतो का किंवा प्रश्न निर्माण करण्यापासून माझे डोळे बंद करावे आणि मेंदूने कार्य करण्याचे थांबवावे हे तो मला सांगतो का? कारण मी स्वतःला विचारत आहे की देवाने त्याच्या पुस्तकात इतक्या चुका केल्या असण्याची शक्यता आहे का आणि मी स्वाभाविकपणे नाही असे उत्तर देतो!? [मूळ अर्थ]

तरीही, तोच देव जो म्हणतो, *"चला या, आपण बुद्धिवाद करू;...."* (यशया १:१८). हे माझ्याकडून मागणी करते की *"प्रश्न विचारावेत आणि माझ्या मेंदूचा वापर करावा."* देव आपल्यापैकी प्रत्येकाला त्याच्या वचनावर स्वतःसाठी चिंतन करण्यास आमंत्रित करतो. इतर कोणाच्या *"विरोधाभासांच्या"* यादीची नक्कल करणे व चिकटवणे चालणार नाही. शलमोनाने म्हटले, *"भोळा प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवतो; शहाणा नीट पाहून पाऊल टाकतो."* (नीतिसूत्रे १४:१५)

संवाददात्याच्या "विरोधाभासांचे' निराकरण केले जाईल कारण आपण पवित्र शास्त्राद्वारे विचार करतो.[३०] आत्तासाठी, तथापि, कदाचित आपण सर्व जण यावर सहमत होऊ शकतो : आपले स्वतःचे संशोधन न करण्यासाठी आयुष्य हे खूप लहान आहे आणि अनंतकाळ खूप मोठे आहे.

जर तुम्ही एखादा स्वादिष्ट, रसभरीत आंबा खाल्ला असेल, तर तुम्हांला माहित आहे की इतर कोणाला त्याच्या चवीचे वर्णन करण्याचा प्रयत्न पुरेसा नाही. त्याचा आस्वाद घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे, देवाच्या वचनाबद्दल इतर कोणीतरी जे म्हणतो ते स्वीकारणे हे पुरेसे चांगले नाही. त्याचा आस्वाद तुम्हीच घेतला पाहिजे.

*"परमेश्वर किती चांगला आहे ह्याचा अनुभव घेऊन पाहा!"* (स्तोत्र. ३४:८)

हे एका व्यक्तीच्या स्वतःच्या सार्वकालिक रुचीमध्ये आहे की पवित्र शास्त्राचे काळजीपूर्वक विद्यार्थी व्हावे, एक *"जो सत्याच्या वचनाची योग्य विभागणी करून नीट सांगणारा, लाज*

*वाटण्यास कसलेही कारण नसलेला,....."* (२ तीमथ्य. २:१५). संदर्भाकडे लक्ष न देणे (संपूर्ण विभाग ज्यामध्ये कथित विरोधाभास आढळतो) हे सत्याच्या वचनास हाताळण्याचा योग्य मार्ग नाही.

स्पष्टीकरण करण्यासाठी, येथे पवित्र शास्त्रातील विधाने आहेत जी आपल्याला न्याय करू नका अशी आज्ञा देते, तर इतर आज्ञा देतात की न्याय करा.[३१] नाही, ते पूरक आहेत. एका बाजूने, देवाचे पुस्तक मला सांगते, एक निर्मित वस्तू म्हणून ज्ञानात मर्यादित आहे, स्वयं-नीतिमान, चुका शोधणाऱ्या आत्म्यापासून इतर व्यक्तीचा हेतू किंवा कृत्याचा न्याय करू नये (दोषी). दुसऱ्या बाजूने, पवित्र शास्त्र काय म्हणते त्यावरून योग्य व अयोग्य गोष्टींची ओळख करण्याची आणि सत्य आणि असत्य यांमध्ये भेद करण्याची मला आज्ञा दिली आहे.

म्हणून मग बायबलमधील कथित विरोधाभासांबद्दल काय?

अशा सर्व उघड विरोधाभासांना मी स्वतः समाधानकारक उत्तरे मिळवली आहेत. मी याचा देखील शोध घेतला आहे की जोपर्यंत लोकांना पवित्र शास्त्र समजण्याची इच्छा आहे, त्यांचा जुना विरोधाभास जितक्या लवकर दूर होईल तितक्या लवकर त्यांना नवीन विरोधाभास सापडेल.[३२]

तुम्हांला देवाचा संदेश समजून घ्यायचा आहे का? मग देवाच्या पुस्तकाकडे तुमच्या स्वतःच्या कल्पनेचा शोध घेण्यासाठी जाऊ नका; त्याच्यासाठी संशोधन करा. बायबलच्या एक एक पुस्तकाचा अभ्यास करा. तुम्ही जे वाचले आहे त्याचा अर्थ लावण्याचा कठीण प्रयत्न करू नका. पवित्र शास्त्र, शतकानुशतके अनेक संदेष्टयांकडून लिहिले गेलेले आहे, हे त्यांचे स्वतःचे उत्तम भाष्य आहे.[३३]

*"तो गहन व गूढ गोष्टी प्रकट करतो; अंधारात काय आहे हे त्याला ठाऊक असते; त्याच्याजवळ प्रकाश वसतो."* (दानीएल २:२२)

## ९. "मी नवीन करारावर विश्वास ठेवत नाही"

काही काळापूर्वी, मला एका महिलेकडून हा ई-मेल आला :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

मी नवीन करारावर विश्वास ठेवत नाही. मी फक्त मूळ करारावरच विश्वास ठेवते. माझा विश्वास नाही की देवाच्या कोणत्याही शब्दांचे नवीन काळासाठी संपादन केले जाऊ शकतात आणि पुन्हा लिहिले जाऊ शकतात. [मूळ अर्थ]

अनेकांप्रमाणे, हिलाही हे समजले नव्हते की देवाच्या पुस्तकात जुना आणि नवीन करार

का आहे. पवित्र शास्त्राच्या ह्या दोन आधारभूत भागांचा अर्थ हा नाही की देवाच्या वचनाचे *''संपादन''* केले आणि पुन्हा लिहिले'' गेले आहे, परंतु त्याऐवजी मानवजातीसाठी देवाची योजना, जी आधीच सांगितली गेली होती, ती पूर्ण झाली आहे आणि पूर्ण होत आहे.

इतिहासातील घटनांचा संदर्भ त्या घडलेल्या तारखेनुसार दिला जातो. उदाहरणार्थ, अब्राहाम संदेष्टयाचा जन्म साधारणपणे ख्रि.पू. २००० मध्ये घडल्याची नोंद आहे, परंतु न्युयॉर्कचे ट्वीन टॉवर्स इ. स. २००१ मध्ये उडवून देण्यात आले.[३४] जगाचा इतिहास दोन भागांमध्ये विभागलेला आहे. तसेच देवाचे पुस्तक आहे.

बायबलमध्ये जुना करार आणि नवीन करार आहे. कायदेशीर दस्तऐवज, सौदा किंवा कंत्राट- दोन पक्षांमधील संमती यासाठी आणखी एक शब्द करार आहे.[३५] आतासाठी, चला आपण पवित्र शास्त्राच्या ह्या दोन भागांचा धावता आढवा घेऊ या. जसे आपण जुना आणि नवीन करारातून प्रवास करतो, ह्या भागांचा उद्देश आणि सामर्थ्य हे स्पष्ट होईल.

**पहिला भाग : जुना करार :** इब्री आणि अरामी भाषेत लिहिला आहे, जुन्या कराराच्या पुस्तकांत *''मोशेचे नियमशास्त्र''* [त्यास तोरा देखील म्हणतात] आणि संदेष्टे आणि स्तोत्र'' आहेत (लूक २४:४४). हे लेखन, एक हजार वर्षांहून अधिक काळ देवाने काही तीस संदेष्टयांना प्रसारित केले, जे मानव इतिहासात देवाच्या मध्यस्थीची नोंद पुरवते-आदामाच्या निर्मितीपासून ते पर्शियन साम्राज्याच्या काळापर्यंत (सुमारे ख्रि.पू. ४००)

भविष्यसूचक अर्थाने, जुना करार जगाच्या शेवटापर्यंतच्या कालखंडाकडे पाहतो, शेकडो ऐतिहासिक घटना घडण्यापूर्वी त्यांची घोषणा करतो.[३६]

जुना करार येशू ख्रिस्ताच्या जन्माच्या पूर्वी (ख्रि.पू.) देवाने लोकांना दिलेल्या कराराचे वर्णन करतो. इब्री शब्द मसीहासाठी ख्रिस्त हा ग्रीक शब्द आहे ज्याचा अर्थ अभिषिक्त एकमात्र किंवा निवडलेला एकमात्र. अजून घडणाऱ्या घटनांचे भाकीत करून, पवित्र शास्त्र मसीहाकडे इशारा करते जो जगात येणार आहे की लोकांना पाप व त्याच्या परिणामांपासून सोडवावे. जुन्या करारात हे महत्वाचे अभिवचन देखील समाविष्ट आहे :

*''परमेश्वर म्हणतो, पाहा, असे दिवस येत आहेत की ........मी नवा करार करीन.''* (यिर्मया ३१:३१)

**दुसरा भाग : नवीन करार.** ग्रीक भाषेत लिहिला गेला, नवीन कराराच्या पुस्तकांना शुभवर्तमान (किंवा इंजील, ''सुवार्ते'' साठी अरबी) देखील म्हणतात. इ. स. सनाच्या पहिल्या शतकादरम्यान आठ पेक्षा कमी माणसांनी लिहिलेले, नवीन करार मसीहाचे पृथ्वीवर प्रारंभाच्या

आगमनाची नोंद करते. ते जुन्या कराराच्या पुस्तकांवर एक दैवी भाष्यग्रंथ देखील पुरवते आणि जगाचा इतिहास कसा पूर्ण होईल याचे भाकीत करते. यातील सर्व भविष्यवाण्या जुन्या करारात आढळणाऱ्यासह पूर्णपणे सुसंगत आहेत.

नवीन करारामध्ये मसीहाच्या आगमनामुळे (इ. स.) लोकांना देवाचे महान असे दान देण्याचे वर्णन आहे. ही वचने मागच्या दिशेने इशारा करतात, संदेष्टयांनी भाकीत केलेल्या शेकडो मुख्य घटनांचे ऐतिहासिकदृष्ट्या पूर्ण होणे दाखवते.

जुन्या कराराप्रमाणे, नवीन करार देखील त्या दिवसाकडे इशारा करतो जेव्हा मसीहा पृथ्वीवर परत येईल. मसीहाने हे चांगल्या कारणासाठी म्हटले होते, *"नियमशास्त्र किंवा संदेष्टयांचे ग्रंथ रद्द करण्यास मी आलो आहे असे समजू नका; मी रद्द करण्यास नव्हे तर **पूर्ण** करण्यास आलो आहे."* (मत्तय ५:१७)

जुना आणि नवीन करारात कोणताही विरोधाभास नाही. ज्याप्रमाणे बी रुजते आणि एका परिपक्व झाडामध्ये वाढते, त्याप्रमाणेच मानवजातीसाठी देवाची जुनी योजना जुन्या करारात रुजते आणि नवीन करारात परिपक्वतेपर्यंत वाढते. देवाच्या पुस्तकाचा प्रत्येक भाग आपण जे समजावे अशी त्याची इच्छा आहे त्या संदेशाकडे इशारा करतो.

महिला जिने ई-मेल लिहिला ती तिच्या विश्वासात योग्य आहे की *"नवीन काळाकरता देवाच्या कोणत्याही वचनाचे संपादन आणि पुन्हा लिहिले जाणे होऊ शकत नाही."* ती काय ओळखण्यास चुकली ते हे आहे की *"देवाचे वचन"* हे पूर्ण केले जाऊ शकते आणि पूर्ण होईल.

### **१०. "भ्रष्ट"**

या मुद्यापर्यंत, आपण नऊ अडथळ्यांना सामोरे गेलो जे लोकांना बायबल वाचणे आणि त्यावर विश्वास ठेवण्यास रोखते. परंतु माझ्या मुस्लीम मित्राकडून जो सर्वात सामान्य आक्षेप आहे तो अद्याप सोडवला गेला नाही. अहमदने आधीच त्याच्या ई-मेलमध्ये हे व्यक्त केले आहे :

> पाठव **विषय** : ई-मेल प्रतिसाद
>
> माझा विश्वास आहे आणि माहित आहे की बायबल सध्या बहुतेक खोटे आहे आणि त्यातील सर्व पुस्तकांमध्ये फेरफार केल्यामुळे ते भ्रष्ट आहे.....

अहमद बरोबर आहे का? मूळ पवित्र शास्त्र भ्रष्ट झाले आहे का?

पुढील भाग उत्तर पुरवतो.



# धडा ३

# भ्रष्ट किंवा जतन केलेले?

"गवत सुकते, फुल कोमेजते, पण आमच्या देवाचे वचन सर्वकाळ कायम राहते."

- यशया संदेष्टा (यशया ४०:८)

**पु**ढे जगाच्या चार वेगवेगळ्या भागातून आलेल्या ई-मेल्सचा सारांश दिला आहे. त्यातून जगभरातील एक अब्जाहून अधिक लोकांचे विचार व्यक्त होतात :

पाठव विषय : ई-मेल प्रतिसाद

आम्ही दैवी पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवतो, परंतु त्याच्या मूळ स्वरूपात.

पाठव विषय : ई-मेल प्रतिसाद

हे विसरू नका की तुम्हांला जुना करार आणि नवीन करार मिळाला आहे ज्यात शब्द बदलले आहेत. पवित्र कुराणमध्ये वचने वर्षानुवर्षे समान आहेत.

पाठव विषय : ई-मेल प्रतिसाद

तुमचे बायबल हे भ्रष्ट वचन आहे जे पुन्हा लिहिले गेलेले आहे, त्यात जोडले गेले आहे आणि तुमच्या कमकुवत विश्वासाशी जुळण्यासाठी प्रारंभापासून पुन्हा संपादित केले गेले आहे.

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

मी मानतो की बायबल शतकानुशतके आणि हजारो वर्षांपूर्वी भ्रष्ट होते, आणि बहुतेक सर्व नवीन करार पौल नावाच्या खोटया संदेष्ट्याने तयार केलेला पूर्णपणे निरर्थक आहे. त्यामुळे, मला बायबलचा संदर्भ देणे म्हणजे टायपिंग आणि किंवा कट आणि पेस्ट करण्यासारखे व्यर्थ आहे.

हे आरोप योग्य आहेत का? अनंत देवाने सीमित मनुष्याला आपल्या संदेष्टयांना फार पूर्वी प्रकट केलेल्या शास्त्रवचनांना भ्रष्ट आणि फेरफार करण्याची परवानगी दिली आहे का?

## मुस्लीम लोकांसाठी एक वैयक्तिक वचन

येथे मी माझ्या मुस्लीम वाचकाशी थेट बोलू इच्छितो.

तुम्हांला माहित असेलच, कुराण स्पष्टपणे हे घोषित करते की पवित्र शास्त्र-तोरा (तौरेत), स्तोत्र (जबुर) आणि शुभवर्तमान (इंजील)- हे देवाकडून *"**मार्गदर्शन आणि प्रकाश**"* म्हणून देण्यात आले आहे (सूरह ५:४४-५१). ते तसेच स्पष्ट करते, "(पैगंबर) *आम्ही तुमच्याकडे सत्यावर आधारित हा ग्रंथ [कुराण] पाठवला आहे, आणि **आधीच्या ग्रंथांपैकी** [बायबल] जे काही अद्याप शिल्लक आहे, **ते प्रमाणित करणारा आहे**, आणि त्यातील सत्य उघड करणारा **आणि त्याचे रक्षण करणारा आहे**....* " (सूरह ५:४८). आणि " (पैगंबर) *तुमच्यापूर्वीही ज्या कोणाला आम्ही पैगंबर बनवून पाठवले तर तीही* (तुमच्यासारखीच) *माणसे होती. **ज्यांच्याकडे आम्ही** (आमचे) **संदेश प्रकट केले होते**. तुम्हांला या गोष्टीचे ज्ञान नसेल तर **आधीच्या ग्रंथांना अनुसरणाऱ्या लोकांपैकी** (कोणालाही) **विचारा"*** (सूरह २१:७). कुराण हा देखील इशारा देते : *"ते ज्यांनी या* (ईश्वरीय) *ग्रंथांना खोटे ठरविले, तसेच **(त्या संदेशांनाही)** ज्यासह आम्ही आमच्या* (आधीच्या) ***पैगंबरांना** पाठवले होते........त्यांना आगीत* (जळत राहण्यासाठी) *फेकून दिले जाईल."* (सूरह ४०:७०-७२)

कुराण वारंवार घोषित करते की बायबलची पुस्तके देवाने प्रेरित केलेली आहेत आणि ते जे त्यांचा नकार करतात त्यांना नरकात पाठवण्यात येईल. कुराण हेच म्हणते.[३७]

कुराणच्या अशा घोषणांनी सर्वत्र मुस्लीम लोकांसाठी एक दुविधा निर्माण केली आहे, कारण बायबल आणि कुराण देवाचे चरित्र आणि मानवजातीसाठी त्याच्या योजनेसंबंधी दोन पूर्णपणे भिन्न संदेश सादर करतात. यामुळेच अधिकतर मुस्लिमांनी निष्कर्ष काढला आहे की बायबलची पुस्तके ही भ्रष्ट झाली आहेत.

खालील प्रश्नांनी अनेकांना त्या निष्कर्षावर विचार करण्यास मदत केली आहे.

## फक्त मुस्लिमांसाठीच प्रश्न

- तुम्हांला असे वाटते का की देव स्वतःच्या पवित्र शास्त्राचे रक्षण करण्यास सक्षम आहे?
- तसे असल्यास, तो त्यांचे संरक्षण करण्यास तयार आहे असे तुम्हांला वाटते का?
- जर तुमचा विश्वास असेल की संदेष्टयांचे पवित्र शास्त्र भ्रष्ट झाले आहे :

O ते केव्हा भ्रष्ट झाले?

O ते कुठे भ्रष्ट झाले?

O त्यांना कोणी भ्रष्ट केले? तुम्हांला वाटते की ख्रिस्ती लोक किंवा यहूद्यांनी पवित्र शास्त्रात बदल केला आहे, तर तुम्हांला असे का वाटते की त्यांनी पवित्र शास्त्राच्या पुस्तकांशी छेडछाड केली असेल ज्यासाठी त्यांच्यापैकी बरेच जण स्वेच्छेने मरण पावले?[३८]

O तुम्ही कोणते पुरावे सादर करू शकता?

O सर्वशक्तिमान देवाने सीमित पुरुषांना त्याचे लिखित रेकॉर्ड आणि मानवजातीसाठी प्रकटीकरण भ्रष्ट करण्याची परवानगी का दिली असावी?

- जर देवाने मानवांना मोशे आणि दाविदासारख्या संदेष्टयांची पुस्तके भ्रष्ट करण्याची परवानगी दिली असेल, तर तुम्ही ज्या पुस्तकावर विश्वास ठेवता त्या पुस्तकाला समान अपमान सहन करावा लागला नाही हे तुम्हांला कसे कळले?

उद्देश येथे कोणालाही प्रश्नांनी भारावून टाकण्याचा नाही, परंतु हा भ्रष्टाचाराचा आरोप अनेकांनी मानला आहे आणि त्याचा शाश्वत परिणाम आहे, येथे आणखी एक आहे :

- तुम्हांला असे वाटते का की कुराण देण्याआधी किंवा नंतर बायबलच्या वचनांमध्ये छेडछाड करण्यात आली होती?

तुम्ही वाचण्यापूर्वी, या आधी किंवा नंतरच्या प्रश्नावर तुमचा प्रतिसाद तयार करण्यासाठी थोडा वेळ घ्या. पुढे सुरु ठेवण्यापूर्वी तुम्ही तुमचे उत्तर लिहू इच्छित असाल.

## आधी?

जर तुमचा प्रतिसाद असा असेल की कुराण लिहिण्यापूर्वी पवित्र शास्त्राची वचने भ्रष्ट झाली होती, तर मग कुराण त्या पवित्र शास्त्रांना मानवजातीसाठी *"मार्गदर्शन"* आणि *"प्रकाश"* म्हणून फसवणूक नाही, आणि *"अंधार नाही"* म्हणून का घोषित करते? कुराण हे का म्हणते, *"आणि गॉस्पेलचे अनुसरण करणाऱ्यांनी* (गॉस्पेलमध्ये) *अल्लाहने जे काही प्रकट केलेले आहे त्यानुसार* (आपसांतील वादासंबंधाने)*निर्णय करावेत"* (सूरह ५:४६-४७). आणि ते असे का घोषित करते: *"... अल्लाहच्या शब्दात* (कधीही) *बदल होत नसतो. ...."* (सूरह १०:६४)

जर बायबलची पुस्तके अविश्वसनीय मानली जात असतील तर कुराण ने आज्ञा का दिली : *"आणि जर तुमच्याकडे पाठवण्यात आलेल्या या ग्रंथाविषयी* (जराशीही) *शंका असेल तर तुमच्यापूर्वी प्रकट झालेल्या ग्रंथांचे पठण करणाऱ्यांना विचारा. ....."* (सूरह १०:९४[३९]), आणि *".... त्यांना सांगा, 'तुम्ही सत्य बोलत असाल, तर तोरा घेऊन या, आणि तो वाचा"* (सूरह ३:९३)

आणि निश्चितच त्यांच्यापैकी काही लोक असे आहेत, जे ग्रंथात (म्हणजे बायबलमध्ये) विपर्यास करतात" (सूरह ३:७८), तर पवित्र शास्त्र स्वतःच अखंड आणि अभ्रष्ट मानले गेले आहे.

**नंतर?**

दुसरीकडे, जर तुमचा प्रतिसाद असा असेल की कुराण लिहिल्यानंतर पवित्र शास्त्राची वचने भ्रष्ट झाली आहेत, तर मग हे निदर्शनास आणणे आवश्यक आहे की आज प्रचलित अनेक बायबल प्राचीन हस्तलिखितांमधून अनुवादित केली गेली आहेत जी कुराणपेक्षा अनेक शतकांपूर्वीची आहेत.

कुराणचे प्रथम पठण होईपर्यंत पवित्र शास्त्र युरोप, आशिया आणि आफ्रिकेत वितरीत केले गेले होते, आणि लॅटिन, सिरीयक, कॉप्टिक, गॉथिक, इथिओपिक आणि आर्मेनियन सारख्या अनेक भाषांमध्ये अनुवादित केले गेले होते.[४०]

याचा विचार करा. अशा ख्यातनाम व्यक्तींच्या पुस्तकांमध्ये, अनेक भाषांमध्ये अनुवादित केलेली पुस्तके, शेकडो हजारांनी नक्कल केलेली आणि जगभर झपाटयाने वितरीत करण्यात आलेल्या पुस्तकांमध्ये माणसांच्या गटाने भ्रष्टाचार कसा घातला असेल? सर्व मूळ भाषेच्या प्रती तसेच अगणित भाषांतरे गोळा करण्याचा प्रयत्न करण्याची कल्पना करा-आणि मग आज या अनुवादांमध्ये आपल्याला आढळणारी एकसमानता निर्माण करण्यासाठी प्रत्येकास बदलण्याचा प्रयत्न करणे. हे एक अशक्य काम होईल.

निष्कर्ष हा स्पष्ट आहे :

O कुराण लिहिण्यापूर्वी बायबल भ्रष्ट होते असा दावा करणे म्हणजे कुराणच्या डझनभर वचनांचा विरोध करणे होय.[४१]

O कुराण लिहिण्यानंतर बायबल भ्रष्ट झाल्याचा दावा करणे हे हजारो प्राचीन हस्तलिखितांद्वारे समर्थित ऐतिहासिक आणि पुरातत्व पुराव्यांच्या विरोधात आहे.

हा निष्कर्ष प्रश्नांची एक नवीन मालिका निर्माण करतो.

बायबलसंबंधी ही हजारो हस्तलिखिते आणि भाषांतरे कोठून आली?

मूळ लेखन कोठे आहे?

## मूळ आणि त्यांचे "वंशज"

पुस्तकांसह पृथ्वीवरील सर्व गोष्टी फिकट झाल्यामुळे, बायबलची मूळ हस्तलिखिते (ज्याला ऑटोग्राफ देखील म्हणतात) आता उपलब्ध नाहीत. तथापि, जगभरातील संग्रहालये आणि विद्यापीठांमध्ये संरक्षित केलेल्या हजारो प्रारंभिक प्रती आहेत ज्या संदेष्टयांनी लिहिलेल्या उगमापासून *"आल्या आहेत"*.

तोरा, गॉस्पेल, तत्वज्ञानी अरिस्टॉटल, इतिहासकार फ्लेवियस जोसेफस किंवा अगदी अलीकडच्या कुराणाचा संदर्भ असो,[४२] सर्व मूळ कागदपत्रे जीर्ण होऊन गेली आहेत. असेच पुरातन काळातील सर्व पुस्तकांचे आहे. मूळचे *"वंशज"* केवळ शिल्लक राहिले आहेत.

सेनेगलमध्ये, बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की बायबल खोटे ठरले आहे. ते त्यावर विश्वास ठेवत नाहीत. विरोधाभास म्हणजे, ते त्यांच्या ग्रीयोट्सवर विश्वास ठेवतात. ग्रीयोट हा एक मौखिक इतिहासकार आहे ज्याचे मुख्य कार्य म्हणजे त्याचे कुटुंब, कुळ आणि गाव यांची वंशावळी आणि मौखिक इतिहास लक्षात ठेवणे आणि तो इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहचवणे. तपशीलवार कौटुंबिक माहिती राखून ठेवण्याची आणि वाजवी प्रमाणात अचूकतेसह संवाद साधण्याची ग्रीयोटची क्षमता प्रभावी आहे. तरीही जे करतात त्यात ग्रीयोट जितके चांगले असतात तितकेच अचूकता आणि तपशील कालांतराने गमावले जातात. माणसांमधील सत्य टिकवून ठेवण्याची मौखिक पद्धत लिखित पद्धतीच्या अचूकतेशी जुळू शकत नाही.

पुष्कळ लोक माणसांच्या तोंडी साक्षीवर विश्वास ठेवण्याची घाई करतात पण देवाच्या लेखी साक्षीवर विश्वास ठेवण्यास मंद का असतात?

ते शहाणपणाचे आहे का?

*"आपण माणसांची साक्ष स्वीकारतो, पण तिच्यापेक्षा देवाची साक्ष मोठी आहे; ...... ज्याने देवाचा विश्वास धरला नाही त्याने त्याला लबाड ठरवले आहे; कारण जी साक्ष देवाने आपल्या पुत्राविषयी दिली आहे तिच्यावर त्याने विश्वास ठेवला नाही."* (१ योहान ५:९-१०)



## धर्मग्रंथ लिखाणाच्या गुंडाळ्या आणि शास्त्री

पवित्र शास्त्र हे कागद, छापखाने आणि संगणकाच्या काळाच्याही खूप आधी लिहिले गेले आहे. संदेष्टयांनी प्राण्यांच्या कातडीवर आणि पॅपिरस झाडापासून बनवलेल्या गुंडाळ्यांवर देवाचे



वचन लिहिले आहे. ह्या मूळ गुंडाळ्या नंतर शास्त्र्यांनी हाताने नक्कल केल्या होत्या. शास्त्री हे प्राचीन जगातील प्रतिष्ठित व्यवसायिक लोक होते जे कायदेशीर कागदपत्रे वाचू, लिहू, चित्रित करणे आणि नक्कल करू शकत होते. काही शास्त्र्यांनी पवित्र शास्त्राच्या वचनांची देखील नक्कल केली. त्यांचे ध्येय हे त्यांस पूर्ण अचूकतेसह नक्कल करणे होते. "काही पुस्तकांच्या शेवटी, शास्त्र्यांनी पुस्तकातील एकूण शब्दांची संख्या दिली आणि अचूक मधला शब्द कोणता हे सांगितले, जेणेकरून नंतरच्या शास्त्र्यांना एकही अक्षर वगळले नाही याची खात्री करण्यासाठी दोन्ही बाजूंनी मोजता येईल.[४३]

त्यांनी अत्यंत काळजी घेतलेली असतानाही, किरकोळ विविधता त्यांच्या प्रतींमध्ये सापडल्या : वगळलेला शब्द, वाक्यांश, किंवा परिच्छेद, किंवा चुकीची नक्कल केलेली संख्या.[४४] तथापि, प्राचीन हस्तलिखितांमध्ये आढळलेल्या कोणत्याही भिन्नतेमुळे एकही मुलभूत सत्य प्रभावित होत नाही.

विद्वानांना प्राचीन ग्रंथ, धर्मनिरपेक्ष किंवा पवित्र यांस नक्कल करण्याच्या क्षुल्लक चुकांमुळे समस्या कधीच आली नाही. हाताने कॉपी केलेल्या मजकुरात अशी विविधता शिल्लक राहिल्याने बायबलसंबंधी वचनांमध्ये छेडछाड झालेली नाही हे प्रकरण बळकट होते. कुराणच्या विपरीत, बायबलमध्ये कोणीही, *"एक परिपूर्ण प्रत"* बनवण्याचा प्रयत्न केल्याचा, आणि मग उरलेल्या हस्तलिखितांना जाळून टाकल्याचा इतिहास नाही.[४५]

देवाने आपला संदेश आपल्यासाठी जपून ठेवला आहे. पण, आजचे पवित्र शास्त्र हे संदेष्टयांनी आणि प्रेषितांनी लिहिलेले आहे याची खात्री कशी बाळगता येईल?

## मृत समुद्राजवळच्या धर्मग्रंथ लिखाणाच्या गुंडाळ्या

अगदी अलीकडेपर्यंत जुन्या करारातील वचनांच्या (ख्रि.पू. १५०० ते ४०० दरम्यान संदेष्टयांनी लिहिलेल्या) सर्वात जुन्या ज्ञात प्रती सुमारे इ. स. ९०० च्या आहेत. प्रती आणि मूळ प्रतींमधील

मोठया काळामुळे आणि ह्या प्राचीन वचनांना शतकानुशतके पुन्हा पुन्हा नक्कल केले गेल्यामुळे, टीकाकार दावा करतात की संदेष्टयांनी काय लिहिले आहे हे जाणून घेणे अशक्य होते.[४६]

मग मृत समुद्राजवळच्या धर्मग्रंथ लिखाणाचा शोध लागला.

वर्ष : १९४७.

ठिकाण : मृत समुद्राजवळील खिरबत कुम्रान

अचंभित करणारी बातमी : हरवलेल्या बकऱ्याच्या शोधात असलेला एक बेडूइन मेंढपाळ मुलगा एका गुहेत अडखळतो, ज्यामध्ये इब्री, अरामी, आणि ग्रीक भाषेतील अनेक प्राचीन गुंडाळया होत्या.

१९४७ ते १९५६च्या दरम्यान, अकरा गुहांमध्ये २२५ पेक्षा जास्त बायबलसंबंधी हस्तलिखिते सापडली. विद्वानांनी या गुंडाळयांना ख्रि.पू. २५० ते इ. स. ६८च्या दरम्यान लिहिलेले आहे असे नमूद केले. यातील बहुतेक हस्तलिखिते २,००० वर्षाहून अधिक जुनी होती. अद्भुत शोध!

इ. स. ७०च्या सुमारास (रोमन लोकांनी यरुशलेमेचा विध्वंस केला) इसेन्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यहूद्यांच्या गटाने या गुंडाळया कुम्रानच्या गुहांमध्ये लपवून ठेवल्या होत्या. या माणसांनी संकल्प केला की वैयक्तिकरित्या काहीही झाले तरी हे लिखाण भावी पिढ्यांसाठी जपलेच पाहिजे. यहूदी स्वतः एकतर मारले गेले किंवा राष्ट्रांमध्ये विखुरले गेले, पण पवित्र शास्त्र जतन केले गेले. मृत समुद्राच्या आदर्श कोरडया हवामानात सुमारे १,९०० वर्षे पॅपिरस आणि चर्मपत्राच्या गुंडाळया मातीच्या भांडयांमध्ये लपलेले राहिले.

या प्राचीन दस्तावेजांच्या शोधाची बातमी जगासमोर आली तेव्हा, बऱ्याच जणांना वाटले की त्यात अलीकडच्या हस्तलिखितांमध्ये लक्षणीय फरक असेल, जे हजारो वर्षे नवीन होते. कदाचित *"बायबल बदलले आहे"* या दाव्याला पुष्टी मिळेल!

संशयवादी निराश झाले. शुद्धलेखन आणि व्याकरणात फक्त क्षुल्लक फरक आढळला. या प्राचीन हस्तलिखितांमध्ये सध्याच्या बायबलप्रमाणेच शब्द आणि संदेश आहेत.



मृत समुद्राजवळच्या धर्मग्रंथ गुंडाळया :
ख्रि.पू. २५०- इ. स. ६८

पूर्वीचे ज्ञात हस्तलिखित :
इ. स. ९००

सध्याचे बायबल :
**न बदलणारे**

या शास्त्रवचनांमध्ये छेडछाड किंवा बदल करण्यात आला आहे या कल्पनेबद्दल मृत समुद्राजवळच्या धर्मग्रंथ गुंडाळयांच्या विद्वानांचा अधिकृत निर्णय काय आहे? *"आजपर्यंतचे पुरावे असे सूचित करतात की असा बदल झाला नाही."*[४७]

## इतिहासातील सर्वोत्तम संरक्षित पुस्तक

नवीन करारासाठी, २४,००० पेक्षा जास्त प्राचीन हस्तलिखिते आहेत, ज्यात ५,३०० ही मूळ ग्रीक भाषेतील आहेत, त्यापैकी २३०, ही ६व्या शतकापूर्वीची आहेत. हे नवीन करारास इतिहासातील सर्वोत्तम-दस्तऐवजीकरण मजकूर म्हणून स्थापित करतात.

तुलनेने ग्रीक तत्ववेत्ता अरिस्टॉटलच्या लिखाणांचा विचार करा, जो ख्रि.पू. ३८४ ते ३२२च्या दरम्यान होऊन गेला. अरिस्टॉटल हा सर्व काळातील सर्वात प्रभावशाली विचारवंतांपैकी एक आहे. तरीही त्याच्या तत्वज्ञानाबद्दल आणि तर्कशास्त्राबद्दल आपल्याला जे काही माहित आहे ते काही हस्तलिखितांमधून आले आहे ज्याची सर्वात जुनी तारीख इसवी सन

१,१०० पर्यंत आहे-मूळ लेखनाच्या काळापासून १,४०० वर्षांचे अंतर. तरीही अरिस्टॉटलच्या विचारांची आणि शब्दांची सत्यता किंवा जतन यावर कोणीही प्रश्न विचारत नाही.

नवीन कराराच्या हजारो हस्तलिखितांसोबत, विद्वानांनी गैर-पवित्र शास्त्र ग्रंथांमध्ये नवीन करारातून हजारो संदर्भ आढळले आहेत जे इ. स. ३२५च्या आधी लिहिले गेले आहे. (नवीन कराराच्या जतन केलेली सर्वात जुन्या हस्तलिखिताची तारीख). हे संदर्भ इतके विस्तृत आहेत की जवळजवळ संपूर्ण नवीन कराराची पुनर्रचना केवळ या लिखाणातून केली जाऊ शकते.[४८]

पुरावा दर्शवितो की नवीन करार हा पुरातन काळातील सर्वोत्तम संरक्षित मजकूर आहे.

## भिन्न बायबल?

कदाचित तुम्ही एखाद्याला असे म्हणताना ऐकले असेल, *"पण अनेक भिन्न बायबल आहेत! कोणती आवृत्ती बरोबर आहे?"*

प्राचीन बायबलसंबंधी हस्तलिखिते आणि त्या लिपींची विविध भाषांतरे यांच्यातील फरक समजून घेणे महत्वाचे आहे. कुराणच्या अनेक शतकांपूर्वी, शास्त्र्यांनी हस्तलिखितांची नक्कल केली होती. सध्याचे छापील बायबल या प्राचीन ग्रंथांमधून भाषांतरित केले जातात.[४९] संपूर्ण किंवा अंशतः, बायबलचे त्याच्या मूळ भाषांमधून (इब्री, अरामी, आणि ग्रीक) २, ४०० हून अधिक वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतर केले गेले आहे.

त्यापैकी एक भाषा ही मराठी आहे.

या पुस्तकात बायबल सोसायटीने पुन्हा संपादन करून २०२१ मध्ये प्रकाशित केलेली आवृत्ती वापरली आहे.

## देव महान आहे

उपरोधिकपणे, देवाचे लिखित वचन माणसांनी खोटे ठरवले या आरोपाचे कदाचित सर्वोत्तम खंडन जगभरातील मशिदींमधून दिवसभर जाहीर केले जाते.

मी आज सकाळी ऐकले.

*"अल्लाह-हू अकबर! अल्लाह-हू अकबर!"* (देव महान आहे! देव महान आहे!)

होय, देव महान आहे-मनुष्य आणि काळाच्या युगापेक्षा महान. सर्व राष्ट्रांच्या आशीर्वादासाठी आणि स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी, सत्य आणि जिवंत देवाने प्रत्येक पिढीसाठी त्याचा संदेश सुरक्षित ठेवला आहे.

देव केवळ आपल्या सृष्टीचा निर्माणकर्ता आणि पालनकर्ता नाही, तर त्याच्या वचनाचा तो लेखक आणि संरक्षक आहे.

*"हे परमेश्वरा, तुझे वचन स्वर्गात सर्वकाळ स्थिर आहे."* (स्तोत्र. ११९:८९)

## अंतहीन अडथळे

या क्षणी, प्रवासाची तयारी करणाऱ्या प्रत्येकाने देवाचे वचन ऐकण्यापासून रोखणाऱ्या अडथळयांवर मात केली आहे, असा विचार करून आनंद होईल. तरीही अनुभव वेगळेच दाखवतो. अनेकांसाठी, सत्याच्या मार्गावर नेहमीच एखादा अडथळा असेल, आणि दुसरा, आणि दुसरा.[५०] नुकताच मला हा ई-मेल मिळाला :

> पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद
>
> तुमच्या उत्तरांसाठी धन्यवाद. मला कुठेतरी आठवते की देव म्हणाला: 'आपण मनुष्याला आपल्या प्रतिमेचे बनवू या.' मी नेहमीच आश्चर्य केले की 'आपण' हे कोणाला संबोधले गेले आहे. बायबलच्या वेगवेगळया आवृत्त्या नाहीत का? बरोबर कोणते? बरेच धर्म नाहीत का? धर्म नसता तर ट्वीन टॉवर्स अस्तित्वात असते का? अनेक मृत्यूंना ख्रिस्ती धर्म जबाबदार नाही का? आणि तुमचा विश्वास आहे याची खात्री आहे का? का, का, का, का? पैसे येत राहण्यासाठी जसे अनेक प्रचारक करतात त्याप्रमाणे आपण एखाद्या दंतकथेवर कायमचे प्रश्न विचारू शकतो आणि उत्तरे शोधू शकतो. आणि देवाला कोणी निर्माण केले? मी विसरलो आहे. धन्यवाद.

देवाचे पुस्तक मनुष्याच्या कठीण प्रश्नांची उत्तरे देत असताना, कधीतरी, ज्यांना कबरेच्या या बाजूला शाश्वत सत्य शोधायचे आहे त्यांनी मनुष्याच्या **कारणांवर** लक्ष केंद्रित करणे थांबवले पाहिजे आणि देवाच्या **वचनांवर** विचार करणे सुरु केले पाहिजे.

## लोक बायबलकडे दुर्लक्ष करतात याची खरी कारणे

लोक देवाचे सत्य नाकारण्याचे खरे कारण बायबल प्रकट करते.

येथे तीन कारणे आहेत :

### १. भ्रष्ट हृदय

काही लोक शास्त्रवचनांवर कधीही चिंतन करत नाहीत कारण त्यांना त्यांचा निर्माणकर्ता-मालक यास जाणून घ्यायची इच्छा नसते.

मानवी हृदयाचे मुल्यमापन करताना (हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी पंप नाही परंतु आंतरिक नियंत्रण केंद्र-आत्मा) पवित्र शास्त्र घोषित करते :

*"...लोक दुष्ट व अमंगळ कर्मे करतात, ........कोणी समंजस आहे की काय, कोणी देवभक्त आहे की काय, हे पाहण्यासाठी परमेश्वराने स्वर्गातून मानवांकडे अवलोकन केले; ते सर्व मार्गभ्रष्ट झाले आहेत......."* (स्तोत्र. १४:१-३)

मनुष्याने बायबलला नाकारले याचा भ्रष्ट शास्त्रवचनांशी काहीही संबंध नाही; भ्रष्ट हृदयाशी त्याचा संबंध आहे.

शलमोन राजाने लिहिले : *"पाहा, एवढेच मला आढळले की देवाने मनुष्य सरळ असा उत्पन्न केला आहे, पण तो अनेक कल्पनांच्या मागे लागला आहे"* (उपदेशक ७:२९). जर आपल्या स्वाभाविक प्रवृत्तीवर सोडले तर आपण आपल्या मार्गाने जाणे, स्वतःच्या योजना आखणे आणि आपल्या पालकांच्या धर्मात जगणे आणि मरणे निवडू. देवाला न जाणण्याची कारणे आपण प्रत्यक्षात शोधू. आपण पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपला प्रवास सुरु केल्यानंतर लवकरच, आपण असे का आहोत हे आपल्याला कळेल. आत्तासाठी हे जाणून घ्या की देवाकडे त्याच्या पुस्तकात वारंवार चेतावनी देण्याचे चांगले कारण आहे: *"ज्याला कान आहेत तो ऐको!"* (मत्तय १३:९)[५१]

## २. काळजी आणि संपत्ती

पुष्कळ लोक देवाचा संदेश समजण्यात अयशस्वी ठरतात कारण त्यांचे संपूर्ण लक्ष येथे आणि आता यावर आहे. *"संसाराची चिंता व द्रव्याचा मोह वचनाची वाढ खुंटवतात..."* (मत्तय १३:२२)

नासरेथच्या येशूने एका श्रीमंत माणसाची कथा सांगितली ज्याने आपल्या संपूर्ण आयुष्यात संदेष्टयांच्या पवित्र शास्त्राकडे दुर्लक्ष केले होते. कदाचित या माणसाने पवित्र शास्त्र अविश्वसनीय असल्याचा दावा करून आपल्या मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला असावा. काहीही असो, तो माणूस मरण पावला, आणि शेवटी नरकात गेला. जिवंत लोकांना स्पष्ट इशारा देण्यासाठी या माणसाला स्वर्गात अब्राहाम संदेष्टयाशी थोडक्यात संवाद साधण्याची परवानगी दिली. श्रीमंत माणसाने आपली जीभ थंड करण्यासाठी पाण्याचा थेंब मागितला, पण त्याला काहीच मिळाले नाही. या माणसाला जेव्हा समजले की तो कायमचा आशेशिवाय आहे, तेव्हा त्याने त्याच्या पाच जिवंत भावांना सावध करण्यासाठी मेलेल्यांतून परत पाठविण्याची अब्राहामाला विनंती केली,

*"नाही तर तेही या यातनेच्या ठिकाणी येतील!"*

अब्राहामाचे उत्तर स्पष्ट होते.

*"अब्राहामाने त्याला म्हटले, त्यांच्याजवळ मोशे व संदेष्टे आहेत, त्यांचे त्यांनी ऐकावे. तो म्हणाला, हे बापा अब्राहामा, असे नाही; पण मेलेल्यांतून कोणी त्यांच्याकडे गेला तर ते पश्चात्ताप करतील. तेव्हा त्याने त्याला म्हटले, 'ते मोशेचे व संदेष्ट्यांचे ऐकत नसतील तर मेलेल्यांमधूनही कोणी उठला तरी त्यांची खातरी होणार नाही."* (लूक १६:२७-३१)

देवाने त्याचे लिखित वचन हे चमत्कारिक चिन्हे आणि चमत्कारांपेक्षा त्याच्या सत्याची अधिक खात्रीशीर पुष्टी असल्याचे घोषित केले आहे. त्याने आपल्यासाठी त्याच्या संदेष्ट्यांचे पवित्र शास्त्र दिले आणि जतन करून ठेवले आहे आणि आपण *"ते ऐकावे"* अशी तो अपेक्षा करतो.

**३. माणसाची भीती**

काही लोक बायबलचा कधीही अभ्यास करत नाहीत कारण त्यांना भीती वाटते की इतर काय म्हणतील.

एका शेजाऱ्याने एकदा मला म्हटले, *"जर हे माझ्या कुटुंबासाठी नसते, तर मी बायबल वाचले असते!"* त्यादरम्यान, बायबल मला सांगते, *"मनुष्याची भीती पाशरूप होते; पण जो परमेश्वरावर भाव ठेवतो त्याचे संरक्षण होते."* (नीतिसूत्रे २९:२५)

तुमच्याबद्दल काय? ज्या संदेष्ट्यांचा सन्मान करण्याचा दावा करतात त्यांचे लिखाण वाचताना कुटुंब आणि मित्र काय विचार करतील, म्हणतील किंवा करू शकतील अशी भीती तुम्हांला वाटते का?

भिऊ नका. *"जो कोणी देवावर विश्वास ठेवतो तो सुरक्षित असेल."* देवाच्या दृष्टिकोनानुसार, त्याच्या संदेशाकडे दुर्लक्ष करण्याचे येथे कोणतेही कायदेशीर कारण नाही.



# धडा ४

# विज्ञान आणि बायबल

*"....त्याने पृथ्वी निराधार टांगली आहे."* -संदेष्टा ईयोब (ईयोब २६:७)

**का**ही वर्षांपूर्वी, मी आणि माझी पत्नी पृथ्वीच्या खोलवर असलेल्या गुहेत गेलो होतो. आमच्या मार्गदर्शकाने प्रभावशाली खडक रचना, स्टॅलेक्टाईट्स आणि स्टॅलेग्माइट्स या गोष्टींकडे लक्ष वेधले म्हणून तिने असे काहीतरी सांगितले : *"हे सर्व पाण्याच्या थेंबापासून सुरु झाले. ३३० दशलक्ष वर्षांपूर्वी एका उथळ अंतर्देशीय समुद्राने हे क्षेत्र व्यापले होते, गाळाचे थर जमा केले होते जे कालांतराने चुनखडीत घट्ट झाले...."*

हे इतकं वैज्ञानिक वाटत होतं, जणू काही माणूस तेथे सुरुवातीला निरीक्षक म्हणून आला होता. जसे ती बोलत होती, ईयोब संदेष्ट्याला दिलेले देवाचे वचन माझ्या मनात प्रतिध्वनित झाले : *"मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हा तू कोठे होतास? तुला समजण्याची अक्कल असेल तर सांग!"* (ईयोब ३८:४). सहलीच्या शेवटी, मी आमच्या मार्गदर्शकाचे सहलीबद्दल आभार मानले आणि मग तिला विचारले की गुहा इतकी लाखो वर्षे जुनी आहे हे भूगर्भशास्त्रज्ञांना कसे कळते. तिने कबूल केले की त्यांना खरोखर माहित नाही आणि नंतर पुढे म्हणाली, *"मी केवळ तेच तुम्हांला सांगितले जे बोलण्यासाठी मला प्रशिक्षण दिले आहे."*

## अस्सल विज्ञान

विज्ञान हा शब्द लॅटिन नाम सायंटियापासून आला आहे, म्हणजे ज्ञान.[५२] क्रियापद सायर याचा अर्थ म्हणजे जाणून घेणे. जाणून घेणे म्हणजे कोणत्याही संशयापलीकडे सत्य मानणे. जरी कोणी एखादा शास्त्रज्ञ एखाद्या गृहीतकाला विज्ञान म्हणून लेबल करणे निवडू शकतो, परंतु तो विज्ञान बनत नाही.

१९७०च्या मध्यात, राजा फैझलचे वैयक्तिक चिकित्सक फ्रेंच डॉक्टर मॉरिस बुकेल यांनी बायबल, कुराण आणि विज्ञान नावाचे पुस्तक लिहिले. हे पुस्तक मुस्लीम जगाच्या पुस्तकांच्या दुकानात आणि मशिदींमध्ये ठळकपणे प्रदर्शित केले जाते, असे प्रतिपादन केले आहे की बायबल आधुनिक विज्ञानाच्या विरोधात आहे. बुकेल असे सुचवितो की बायबलच्या पहिल्या अध्यायात नोंदवलेले सृष्टी कथन *"प्रोबेबलमेंट ला ट्रेडक्शन डी 'अन मिथ"* (ते कदाचित दंतकथेतून भाषांतरित केले आहे), कारण ते विश्वाच्या उत्पत्तीबद्दल माणसाच्या बदलत्या सिद्धांतांशी जुळत नाही.[५३] बऱ्याच जणांप्रमाणे, बुकेलने चुकून उत्क्रांती सिद्धांतची[५४] खऱ्या विज्ञानाशी बरोबरी केली.

हे समजून घेणे महत्वाचे आहे की पवित्र शास्त्र भौतिक विज्ञान शिकवण्यासाठी दिले गेले नाही, तर आध्यात्मिक विज्ञान प्रकट करण्यासाठी दिले गेले. तो कोण आहे, तो कसा आहे आणि त्याने आपल्यासाठी काय केले आहे हे दाखवण्यासाठी देवाने आपल्याला त्याचे पुस्तक दिले. आपण कोठून आलो आहोत, आपण पृथ्वीवर का आहोत आणि आपला शेवट कोठे होणार हे शिकवण्यासाठी त्याने ते दिले. संशोधन प्रयोगशाळेत अशी माहिती शोधली किंवा सत्यापित केली जाऊ शकत नाही. तरीसुद्धा, बायबल जीवनाच्या प्रत्येक पैलूंशी संबंधित असल्यामुळे, हे आश्चर्य नाही की त्यात नैसर्गिक जगाविषयीची माहिती देखील समाविष्ट आहे जे मनुष्याला माहित नव्हते तेव्हा पवित्र शास्त्र लिहिले गेले.

## देवाने हे प्रथम सांगितले

आधुनिक काळातील वैज्ञानिकांनी ते शोधण्यापूर्वी देवाच्या पुस्तकात नोंद केलेल्या वैज्ञानिक माहितीची सात उदाहरणे आपण विचारात घेऊ या. पुढे, आपण पवित्र शास्त्राचा विचार करत असताना, बायबलमधील विज्ञानाची इतर उल्लेखनीय उदाहरणे आपल्याला मिळतील.

## १. गोल पृथ्वी



बहुतेक आधुनिक इतिहासाची पुस्तके असे शिकवतात की ग्रीक लोक ख्रि.पू. ५०० मध्ये, *"पृथ्वी गोल असल्याचे सिद्धांत मांडणारे पहिले होते... ग्रीक तत्ववेत्त्यांनीही असा निष्कर्ष काढला की पृथ्वी हा केवळ एक गोल असू शकतो कारण त्यांच्या मते, तो 'सर्वात परिपूर्ण' आकार होता.*[५५] *तरीही एक सहस्राब्दी पूर्वी, ईयोब संदेष्ट्याने हे आधीच घोषित केले होते की देवाने **पृथ्वी***

***निराधार टांगली आहे*** *......प्रकाश व अंधकार ह्यांमधील हद्दीशी त्याने जलनिधीची सीमा भिडवली आहे''* (ईयोब २६:७, १०). आणि ग्रीक लोकांच्या ४०० वर्षांपूवी, शलमोन संदेष्टयाने स्पष्ट केले होते की देवाने **जलाशयाची चक्राकार** मर्यादा ठरवली'' (नीतिसूत्रे ८:२७). *आणि ख्रि. पू. ७०० मध्ये, ग्रीक तत्वज्ञान्याच्या अजूनही २०० वर्षांपूर्वी, यशयाने घोषणा केली होती :* ''हाच तो पृथ्वीच्या वरील नभोमंडळावर आरूढ झाला आहे....'' (यशाया ४०:२२). इब्री भाषेत वर्तुळ साठी शब्दाचे भाषांतर गोल किंवा गोलाकार देखील केले जाऊ शकते. तर मग पृथ्वीच्या गोल आकाराबद्दल बोलणारा कोण प्रथम होता- ग्रीक किंवा देव? होय, हा देव होता, पृथ्वीचा रचनाकार.

**२. जल चक्र :** ईयोबाचे पुस्तक जलविज्ञान चक्राबद्दल देखील वर्णन करते : ***"तो जलबिंदू आकर्षतो; त्यांची वाफ होऊन ते पर्जन्यरूपाने पडतात;*** *मेघ त्यांची वृष्टी करतात; ते लोकसमूहावर विपुल वर्षाव करतात. मेघांचा पसारा, मेघमंडपातील गडगडाट ह्याचे ज्ञान कोणाला होईल?''* (ईयोब ३६:२७-२९). अशा प्रकारे बायबल पाऊस चक्राचे वर्णन करते, ज्यामध्ये बाष्प हे वाफ होतात, ढगांमधील लहान द्रव पाण्याच्या थेंबामध्ये घनीभूत होतात आणि नंतर मोठया थेंबांमध्ये एकत्रित होतात जे त्यांना हवेत निलंबित करणाऱ्या भारावर मात करण्यासाठी पुरेसे आहे. पाण्याचे अविश्वसनीय प्रमाण जे ढगांमध्ये संक्षेपण म्हणून धरले जाऊ शकते त्याबद्दल देखील ईयोब संबोधतो : *''तो पाणी मेघमंडळात कोंडून ठेवतो; मेघ त्याच्या भाराने भंग पावत नाहीत.''* (ईयोब २६:८)[५६]

**३. समान पूर्वज** : पस्तीसशे वर्षांपूर्वी, मोशे संदेष्टयाने लिहिले : *''आदामाने आपल्या बायकोचे नाव हव्वा ठेवले कारण* ***ती अवघ्या जीवधारी जनांची माता होय''*** (उत्पत्ती ३:२०). बायबलनुसार, सर्व मानव एकाच समान मातेपासून आले आहेत. १९८७पर्यंत उत्क्रांतीवादी शास्त्रज्ञांना या वस्तुस्थितीबद्दल खात्री पटली नव्हती. माइटोकॉन्ड्रियल डीएनएच्या (मानवी अनुवांशिक संहितेचा विभाग आईकडून मुलाकडे अखंडपणे जातो) विस्तृत विश्लेषणानंतर, जे जगभरातील नाळेतून घेतलेले आहे, तेव्हा संशोधनाने असा निष्कर्ष काढला आहे की आज सर्व मानव एका सामान्य पूर्वज स्त्रीकडून आले आहेत.[५७] अनेक वर्षानंतर अभ्यासाने असा निष्कर्षही काढला आहे की सर्व मानव एका सामान्य पुरुष पालकापासून येतात.[५८] या संशोधकांना हे फारसे कळले नाही की त्यांचे सर्व प्रयत्न आणि खर्च बायबलच्या अचूकतेची पुष्टी करेल.

**४. जीवन रक्त** मोशेनेही स्पष्ट केले आहे **:** *''शरीराचे जीवन* ***रक्तात*** *असते, ....''* (लेवीय १७:११). हे तथ्य अगदी अलीकडेच वैद्यकीय समुदायाला समजले होते, ज्याने १९व्या शतकापर्यंत रक्तस्रावाच्या संभाव्य तंत्राचा सराव केला होता.[५९]

**५. वृद्ध होणारी पृथ्वी :** तीन हजार वर्षांपूर्वी, दावीद संदेष्ट्याने लिहिले होते की एके दिवशी पृथ्वी **नाहीशी** होईल आणि *"ती वस्त्रासारखी **जीर्ण** होईल"* (स्तोत्र. १०२:२६). आधुनिक विज्ञान सहमत आहे की आपला ग्रह मंद होत आहे, त्याचे चुंबकीय क्षेत्र क्षीण होत आहे आणि त्याचा संरक्षणात्मक ओझोन थर पातळ होत आहे.

**६. समुद्रशास्त्र :** दाविदाने देखील याबद्दल लिहिले *" जलात **संचार**"* (स्तोत्र. ८:८) हे लहान वाक्यांश होते ज्याने अडमिरल मॅथ्यू फॉन्टेन मौरी (१८०६-१८७३) यांना प्रेरित केले की या सागरी प्रवाहांचा शोध आणि दस्तऐवजीकरण करण्यासाठी आपले जीवन समर्पित करावे. त्याने तर्क केला की देवाने समुद्रातील *"मार्ग"* याबद्दल सांगितले असल्याने, तो त्याचे मोजमाप करण्यास सक्षम असावा. मौरीने तेच केले आणि ते *"समुद्रशास्त्राचे जनक"* म्हणून ओळखले जाऊ लागले.[६०]

**७. खगोलशास्त्र :** जवळजवळ २,००० वर्षांपूर्वी, प्रेषित पौलाने लिहिले, *"सूर्याचे तेज निराळे, चंद्राचे तेज निराळे, ताऱ्यांचे तेज निराळे; **कारण ताऱ्याताऱ्यांच्या तेजांत भेद आहे**"* (१ करिंथ. १५:४१). उघडया डोळ्यांना सर्व तारे एकसारखे दिसतात. तरीही आज, शक्तिशाली दुर्बिणी आणि प्रकाश स्पेक्ट्रा विश्लेषणाद्वारे मिळवलेल्या माहितीसह, खगोलशास्त्रज्ञ आम्हाला सांगतात, *"तारे रंग आणि चमकमध्ये खूप भिन्न आहेत. काही तारे सूर्यासारखे पिवळे दिसतात. इतर निळे किंवा लाल चमकतात."*[६१] प्रत्येक वैयक्तिक तारा हा अनोखा आहे."[६२] पौलाला हे पहिल्या शतकात कसे कळले असेल?

## अंधळा विश्वास?

बायबलमधील विज्ञानाच्या इतर असंख्य उदाहरणांचा संदर्भ दिला जाऊ शकला तरी या सात प्रकरणांमधील सरळ शिकवण ही आहे : जरी बायबल हे पाठ्यपुस्तक नसले, तरी जेव्हा जेव्हा ते विज्ञानावर बोलते, ते अचूक आणि खरे आहे.

बायबलवरील विश्वासाला काही लोक *"अंधविश्वास"* असे लेबल देतात. खरंच का? किंवा तो अविवादीत माहितीवर आधारित बुद्धिमान विश्वास आहे का? पुरावे सातत्याने बायबलमध्ये लिहिलेल्या गोष्टींशी जुळणारे असल्याने, ह्या लिखाणांना खरे मानण्यास आपण मूर्ख किंवा बुद्धिमान आहोत का-जरी जेव्हा ते त्यागोष्टी शिकवतात ज्या आपण पूर्णपणे स्पष्ट किंवा सिद्ध करू शकत नाही?

देव आपल्याला बौद्धिक आत्महत्त्या करण्यास सांगत नाही. त्याने आपल्याला *"अनेक अचूक पुरावे"* दिले आहेत (प्रेषित. १:३), जे या पुस्तकाच्या विश्वसनीयतेची पुष्टी करतात.

## इतिहास, भूगोल, पुरातत्वशास्त्र

मागील अध्यायात आपण काही पुरावे तपासले जे जुन्या आणि नवीन कराराच्या पुस्तकांना पुरातन काळातील सर्वोत्तम जतन केलेली पुस्तके म्हणून स्थापित करते. परंतु पवित्र शास्त्रात असलेल्या या खऱ्या माहितीबद्दल काय? तिच्यावर विश्वास ठेवला जाऊ शकतो का?

बायबल विद्वानांना आणि संशयी लोकांना त्याची अचूकता तपासण्यासाठी हजारो संधी प्रदान करते, कारण जवळजवळ प्रत्येक पृष्ठावर एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीचे, ठिकाणाचे किंवा घटनेचे नाव दिलेले आहे.

इतिहास, भूगोल आणि पुरातत्वशास्त्र काय प्रकट करते?

शतकानुशतके, अनेक माणसांनी बायबलच्या ऐतिहासिक अचूकतेला बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. असाच एक संशयवादी सर विल्यम मिशेल रामसे होता (१८५१-१९३९), जगातील एक सर्वोत्कृष्ट पुरातत्वशास्त्रज्ञ. विद्यापीठाचा विद्यार्थी असताना, रामसेने बायबलच्या विश्वसनीयतेवर शंका केली. परंतु त्याच्या संशोधनाने सावकाशपणे त्याचे विचार बदलले, ३० वर्षांच्या अभ्यासानंतर त्यास हे लिहिण्यास भाग पाडले, *"लूक हा पहिल्या क्रमांकाचा एक इतिहासकार आहे; त्याची विधाने ही केवळ वस्तुस्थितीविषयी विश्वसनीय नाहीत.. तर या लेखकास महान इतिहासकारांसोबत स्थान दिले पाहिजे."*[६३]

लूक हा एक वैद्य, एक इतिहासकार, येशूचा एक अनुयायी, आणि लूककृत शुभवर्तमान आणि प्रेषितांची कृत्ये या दोन्ही पुस्तकांचा लेखक आहे. पवित्र शास्त्रातील ह्या दोन्ही पुस्तकात ९५ भौगोलिक स्थाने (३२ राष्ट्रे, ५४ नगरे आणि ९ बेटे), तसेच असंख्य ऐतिहासिक व्यक्तिमत्वे आणि घटनांचा संदर्भ आहे. लूकाने काय नोंदले, आणि पुरातत्व, भूगोल आणि बायबलच्या अतिरिक्त इतिहासात काय विसंगती आहे हे शोधण्यासाठी समीक्षकांनी कठीण परिश्रम केले आहेत. ते निराश झाले. लूकाचे लिखाण प्रत्येक बाबतीत अचूक सिद्ध झाले आहे.

लूककृत शुभवर्तमानातील एक वाक्य या मुद्याला स्पष्ट करेल. हे नासरेथच्या येशूच्या पृथ्वीवरील सेवाकार्यासाठी ऐतिहासिक रचना स्थापित करण्यासाठी रचलेले एक वाक्य आहे.

*"**तीबिर्य कैसर** ह्याच्या राज्याच्या पंधराव्या वर्षी **पंतय पिलात** यहूदियाचा अधिकारी होता; हेरोद गालीलाचा मांडलिक, त्याचा भाऊ फिलीप्प हा इतुरीया व त्राखोनाती ह्या देशांचा मांडलिक व **लूसनिय** अबिलेनेचा मांडलिक होता; आणि हन्ना व **कयफा** हे प्रमुख याजक होते; तेव्हा जखऱ्याचा मुलगा योहान ह्याला रानात देवाचे वचन प्राप्त झाले."* (लूक ३:१-२)

## लूक बरोबर होता का?

अनेक नावे आणि तपशील स्वाभाविकपणे हे विचारायला लावतात की, *"लूक बरोबर होता का?"* परीक्षा म्हणून, चला आपण उल्लेख केलेल्यांपैकी चार लोकांची तपासणी करू- मागील संदर्भात ठळकपणे मांडलेली नावे.

प्रथम, रोम सम्राट तीबिर्य कैसर आणि प्रांतीय राज्यपाल पंतय पिलात यांचा लूक उल्लेख करतो. ते ऐतिहासिक व्यक्ती होते का? त्यांनी त्यावेळी राज्य केले होत का? १९६१मध्ये, हेरोदाच्या क्षेत्रातील कैसरीयामधील नाटकगृहाला पुनर्स्थापित केले (लूकने देखील त्याचा उल्लेख केला [प्रेषित १२:१९-२४]), एक एक-मीटर उंच स्तंभ हा सापडला ज्यावर कोरलेले होते जे पुष्टी करते की पंतय पिलात हा खरोखर राज्यपाल होता जेव्हा तीबिर्य कैसर सम्राट होता. पवित्र शास्त्रात नसलेल्या योसेफस इतिहासकाराने देखील (इ. स. ३७-१०१) हेच लोक, ठिकाणे आणि घटनांबद्दल लिहिले होते.[६४]

लूक बरोबर होता.

सिरीयामधील प्रांत अबिलेनेचा लूसनिय मांडलिक होता (सह-राज्यपाल) याचा देखील लूकने उल्लेख केला आहे. अनेक वर्षे विद्वानांनी लूक चुकीचा होता या कथित वास्तविकतेचा चुकीचा उपयोग केला कारण इतिहासकारांना केवळ ज्ञात लूसनिय हा ग्रीस, चाल्सीसचा शासक होता, जो त्या काळाआधी जवळजवळ इ. स. ६०मध्ये मारला गेला होता ज्याबद्दल लूकाने लिहिले (सुमारे इ. स. २७). दमास्कसजवळ इ. स. १४ आणि २९च्या दरम्यान शिलालेख सापडेपर्यंत इतिहासकारांना सिरीयायेथील अबिलेनेच्या मांडलिकबद्दल काहीही माहिती नव्हते. त्यावर त्याचे नाव आहे, लूसनियचा मांडलिक.[६५] म्हणून लूसनिय नावाचे येथे दोन व्यक्ती आहेत.

लूक बरोबर होता.

लूकाने, येशू येथे पृथ्वीवर असताना, यहूदी मंदिरातील सहाय्यक-मुख्य याजक कयफा होता याबद्दल देखील लिहिले. १९९०च्या डिसेंबरमध्ये, कामगारांनी जुन्या यरुशलेमेच्या दक्षिणेकडे एक रस्ता बनवला तेथे योगायोगाने कयफाची कौटुंबिक कबर सापडली होती. पुरातत्वशास्त्रज्ञांना घटनास्थळी बोलावण्यात आले. कबरेमध्ये बारा अस्थिबंधी (चुनखडीच्या हाडांची खोकी होती). सर्वात सुंदर सुशोभित केलेल्या अस्थिबंधनावर कयफाचा मुलगा योसेफ हे नाव कोरलेले होते. ते त्या मुख्य याजकाचे पूर्ण नाव होते ज्याने येशूला अटक केली होती.[६६] खोक्यामध्ये ६० वर्षाच्या पुरुषाचा सांगाडा होता, जवळजवळ निश्चितच ते नवीन करारातील कयफाचे होते.[६७]

लूक बरोबर होता.

प्रसिद्ध पुरातत्वशास्त्रज्ञ नेल्सन ग्लुक यांनी निरीक्षण केले, *“हे स्पष्टपणे नमूद केले जाऊ शकते की कोणत्याही पुरातत्व शोधाने कधीही बायबलसंबंधी एकही संदर्भावर विवाद केला नाही. अनेक पुरातत्व शोध काढण्यात आले आहेत जे बायबलमधील स्पष्ट रूपरेषा किंवा अचूक तपशीलवार ऐतिहासिक विधानांची पुष्टी करतात.”*[६८] जगातील धर्मांद्वारे आदरणीय असलेल्या पुस्तकांच्या बाबतीत हे म्हटले जाऊ शकत नाही. उदाहरणार्थ, पुरातत्वशास्त्राच्या शोधांनी मोर्मोनचे पुस्तक इतिहास आणि भूगोलाशी विसंगत असल्याचे दर्शवले आहे.[६९]

पुरातत्वशास्त्रज्ञ योसेफ फ्री, व्हिटन कॉलेजच्या पुरातत्वविभागाचे अध्यक्ष, यांनी ‘पुरातत्वशास्त्र आणि बायबल इतिहास’, या त्यांच्या पुस्तकात ह्या शब्दांनी समारोप केला आहे, मी उत्पत्तीच्या पुस्तकातून वाचले आणि मानसिकदृष्टया लक्षात घेतले की ५० अध्यायांपैकी प्रत्येक एकतर काही पुरातत्वीय शोधांद्वारे प्रकाशित किंवा पुष्टी करण्यात आला होता- बायबलच्या- जुन्या आणि नवीन करार दोन्हींमधील राहिलेल्या अध्यायांच्या बाबतीत तेच खरे आहे.”[७०]

## विज्ञानाने काय सिद्ध करता येत नाही

अस्सल पुरातत्वीय माहिती एक अचूक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून बायबलच्या विश्वसनीयतेची पुष्टी करत असताना, पुरातत्वशास्त्र दैवी प्रेरणेस सिद्ध करू शकत नाही. आणि प्रभावी वैज्ञानिक विधाने बायबलमध्ये आढळत असताना, देवाचे सत्य वचन म्हणून विज्ञान कोणत्याही पुस्तकाला सिद्ध करू शकत नाही. हे सांगणे आवश्यक आहे कारण असे काही लोक आहेत जे इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न करतात की त्यांचे पवित्र पुस्तक देवाकडून प्रेरित आहे कारण त्यात काही वैज्ञानिक-भासणारी विधाने आहेत.

आध्यात्मिक सत्य वैज्ञानिक शोधाने सिद्ध केले जाऊ शकत नाही, तसेच एखाद्या पुस्तकातील वैज्ञानिक वस्तुस्थिती ते देवाकडून आहे हे सिद्ध करू शकत नाही. सैतान, जो खूप काळापासून अस्तित्वात आहे, तो विज्ञानाबद्दल बरेच काही जाणतो. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासात अगदी सुरुवातीला आपण ह्या पूर्वीच्या स्वर्गीय देवदूताला भेटणार आहोत, ज्यास आता सैतान आणि भूत म्हणतात, जो देवाचा वैरी झाला आहे. आतासाठी, केवळ एवढेच मनात ठेवा की सैतान हा अविश्वसनीयरित्या बुद्धिमान आहे आणि प्रभावी गोष्टी लिहिण्यासाठी मानवांना प्रेरित करण्यात तो सक्षम आहे.

दानीएल संदेष्टा हा एक बुद्धिमान माणूस होता ज्याचा उपयोग देवाने पवित्र शास्त्रातील

गहन पुस्तकांपैकी एकाचे लेखन करण्यास केला, तरीही जेव्हा स्वाभाविक क्षमतेचा विषय येतो, तेव्हा सैतान, जो आत्मा जो देवाच्या सत्याचा विरोध करतो, तो *''दानीएलापेक्षा बुद्धिमान''* आहे (यहेज्केल २८:३). सैतान हा खोटया धर्मामागील सूत्रधार आहे. तो फसवणुकीच्या कलेमध्ये निपुण आहे. सैतान ह्या शब्दाचा अर्थच दोष देणारा किंवा निंदा करणारा आहे.

एका अरबी म्हणीचा धोक्याविषयी सारांश असा आहे : *''सावधान! काही खोटे बोलणारे सत्य बोलतात.''*

## कविता काय सिद्ध करू शकत नाही

काही धर्म दावा करतात की त्यांचे पुस्तक हे देवाकडून आहे कारण ते एका शैलीमध्ये लिहिलेले आहे ज्यास कोणी माणूस पुन्हा बनवू शकत नाही.[७१] जसे अहमदने त्याच्या ई-मेलमध्ये लिहिले :

> पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद
>
> कुराण हे पैगंबराला पाठवलेला सर्वात मोठा चमत्कार आहे! असो, एक वचन जे त्याच्या समान आहे, किंवा कुराणच्या वचनातील एकातरी वचनाच्या अगदी जवळीक आहे ते बनवून दाखवा!! तुम्ही कधीही तसे करण्यास सक्षम होणार नाही जरी तुम्ही उच्च स्तराच्या अरबी भाषेतील सर्वात बुद्धिमान व्यक्ती असाल,.... येथे जगात असे काहीही नाही जे कुराणच्या महानतेच्या जवळ येऊ शकते.... आणि जर तुम्ही याच्या उलट सिद्ध करू शकता, तर तसे करून दाखवा.

अहमदचे आव्हान कुराणच्या दुसऱ्या अध्यायावर आधारित आहे जे म्हणते : *''आणि आम्ही आमच्या सेवकाकडे* (म्हणजे पैगंबर मुहम्मद याच्याकडे) *जे काही* (ईश-संदेश) *पाठवले आहे त्याविषयी तुमच्या मनात काही शंका असेल, तर* ***तशाच गुणवत्तेचा एक अध्याय तुम्ही तयार करून प्रस्तुत करा.....*** *''* (सूरह २:२३)

या दाव्याची अडचण ही आहे की ते सिद्ध करू शकत नाही किंवा नाकारू शकत नाही. स्पष्टीकरणासाठी, समजा मी एक कला स्पर्धा आयोजित केली, माझ्या स्वतःचे रंगवलेले चित्र त्यात ठेवले, न्यायाधीश म्हणून काम केले, माझ्या स्वतःला विजेता म्हणून घोषित केले आणि मग इतर स्पर्धकांना आव्हान दिले की, *''इतर कोणीही माझ्यासारखे चित्र काढू शकत नाही. जर तुम्ही त्यावर शंका घेता की मी जगातील सर्व मोठा चित्रकार आहे तर मग माझ्या सारख्या चित्राला बनवून दाखवा.''*

मी रंगवेलेले चित्र उत्तम आहे हे सिद्ध होईल का? मी महान चित्रकार आहे हे सिद्ध होईल का? नाही, तरीही कोणीही मला चुकीचे सिद्ध करू शकणार नाही! का नाही? सुंदरता ही पाहणाऱ्याच्या डोळ्यात आहे.

तसेच हे लयबद्ध, साहित्यिक सौंदर्याबाबत आहे. ते व्यक्तीनिष्ठ आहे.

बायबल हे आश्चर्यकारक इब्री कविता आणि चित्तथरारक असंख्य नमुन्यांनी भरलेले आहे.[७२] तरीही अशा साहित्यिक वक्तृत्वामुळे देव आपल्याकडून त्याच्या वचनावर विश्वास ठेवण्याची अपेक्षा करत नाही.

ज्याप्रमाणे विज्ञान जसे दैवी प्रेरणेस सिद्ध करू शकत नाही, त्याप्रमाणेच, सुंदर-भासणारे गद्य हे पुस्तक देवाचे आहे असे सिद्ध करू शकत नाही.

हे मनात ठेवणे शहाणपणाचे आहे की सैतान, हा महान साहित्यिक आणि अनुकरण करणारा, मंत्रमुग्ध करणारी कविता आणि उत्तम फुशारकी मारणारे शब्द" (यहूदा १६) दे*खील प्रेरित करू शकतो. पवित्र शास्त्र आपल्याला ताकीद देत की* "गोड व लाघवी भाषणाने भोळ्याभाबडयांची अंत:करणे भूलविणाऱ्यांद्वारे" (रोम १६:१८) फसवले जाऊ नये, विशेषतः जेव्हा ते शब्द काळाच्या सुरुवातीपासून निर्माणकर्त्याने दिलेल्या योजनेच्या आणि संदेशाच्या विरोधात असतात.

ना विज्ञान, ना पुरातत्वशास्त्र, ना कविता कोणत्याही पुस्तकाला देवाचे सत्य वचन म्हणून सिद्ध करू शकत नाही. दैवी प्रेरणेचे असे पुरावे न्यायाच्या-बळकट, अविवादीत पुराव्यांवर, उच्च न्यायालयावर आधारित असले पाहिजे.

हे ते पुरावे आहेत ज्यांचा आपण विचार करणार आहोत.



# धडा ५

# देवाची स्वाक्षरी

*“सर्व राष्ट्रे एकत्र जमोत,.....त्यांनी ते ऐकून म्हणावे की हे खरे आहे.”  –देव* (यशया ४३:९)

**ब**हुतेक कायदेशीर दस्तऐवजांना अधिकृत स्वाक्षरी आवश्यक असते. जुना आणि नवीन करारातील शास्त्रलेख, ही देवाचे अधिकृत नोंद आणि करार असल्याचा दावा करतात, त्यावर लेखणीने नाही, तर पूर्ण झालेल्या भविष्यवाणीच्या द्वारे स्वाक्षरी केलेली आहे.



*“.....सेनाधीश परमेश्वर म्हणतो : ‘मी आदी आहे, आणि मी अंत आहे; माझ्यावाचून देव नाहीच. मी प्राचीन काळच्या लोकांची स्थापना केली तेव्हापासून माझ्यासारखा संदेश प्रकट करणारा कोण आहे? कोणी असला तर त्याने बोलावे व माझ्यापुढे प्रतिपादन करावे; त्यांनी भावी गोष्टी व आता होणाऱ्या गोष्टी सांगाव्यात... बोला, त्यांना समोर आणा; त्यांना आपापसांत विचार करू द्या; हे कोणी पूर्वीपासून कळवले? हे कोणी पुरातन काळापासून ऐकवले? मी परमेश्वरानेच नव्हे काय?.....”* (यशया ४४:६-७; ४५:२१)

देवाचे तर्क समजून घेण्यात आपण चुकू नये. कारण बायबलमध्ये तपशीलवार भविष्यवाण्या आहेत ज्या तंतोतंत पूर्ण झाल्या आहेत की आपण भूतकाळ, वर्तमान आणि भविष्याबद्दल जे घोषित करतो त्यावर आपण विश्वास ठेवू शकतो.

## सकारात्मक पुरावा

काळाच्या बाहेर जो अस्तित्वात आहे तोच इतिहास घडण्यापूर्वी त्याची घोषणा आणि नोंद करू शकतो.

नश्वर पुरुष आणि स्त्रियांनी कधीकधी भविष्यात काही घडू शकते याबद्दल अभ्यासपूर्ण अंदाज लावले आहेत, परंतु फक्त देवच भविष्य पाहतो जणू काही ते घडले आहे. आतापासून हजार वर्षांनंतर काय घडेल हे फक्त देवालाच माहित आहे. दैवी प्रकटीकरणाशिवाय, मानव, देवदूत, भुते किंवा सैतान यापैकी कोणीही भविष्यातील घटना अधिकृतपणे सांगू शकत नाही.

काही जण म्हणतील, *“परंतु माध्यमे, जादूटोणा करणारे वैद्य आणि ज्योतिष्यांबद्दल काय? ते भविष्याचा अंदाज लावतात!”*

प्रथम, हे समजणे महत्वाचे आहे की सैतानाने ज्यांना *“त्याच्या इच्छेनुसार कैद करून ठेवले आहे”* (२ तीमथ्य. २:२६) त्यांना पृथ्वीबाह्य ज्ञान आणि शक्ती देण्यास सक्षम आहे.

दुसरे म्हणजे, सैतान-हा हजारो वर्षांपासून मानवी इतिहासाचे निरीक्षण करणारा निपुण अनुकरण करणारा आणि मानसशास्त्रज्ञ-देवाची खोटी *“स्वाक्षरी”* करण्यात प्रवीण झाला आहे.

तिसरे म्हणजे, काही घटना घडू शकतात यांचा अंदाज लावण्यात सैतान तुलनेने चांगला असला तरी त्याला भविष्य माहित नाही. त्याच्या *“भविष्यवाण्या”* अनेकदा चुकीच्या सिद्ध झाल्या आहेत. शिवाय, त्या अस्पष्ट आहेत. उदाहरणार्थ, भविष्य सांगणारा एखाद्या तरुणीला सांगू शकतो, *“पुढच्या काही वर्षात तुझे लग्न होईल आणि खरे प्रेम मिळेल. तुम्हांला आणि मला माहित आहे की अशी* “भविष्यवाणी” काही प्रमाणात खरी होईल याची शक्यता खूपच चांगली आहे. बायबलसंबंधी पूर्ण झालेल्या भविष्यवाण्यांबद्दल बोलत असताना, आम्ही अशा प्रकारच्या अस्पष्ट भविष्यवाण्यांबद्दल बोलत नाही.

चला आपण पवित्र शास्त्रातील तीन उदाहरणांचा विचार करू या- एक ठिकाण, लोक आणि एका व्यक्तीबद्दल.

## एका ठिकाणाविषयी भविष्यवाण्या

ख्रि.पू. ६००च्या जवळपास, संदेष्टा यहेज्केलने सोर या प्राचीन फोनीशीयन नगराच्या विरोधात भविष्यवाणी केली. जे लेबनानच्या किनाऱ्यावर स्थित आहे, सोर हे दोन हजार वर्षांसाठी जागतिक राजधानी होते. समुद्राची राणी म्हणून ते ओळखले जात होते. तरीही ते त्याच्या सत्तेमध्ये अत्युच शिखरावर असताना, देवाने यहेज्केलला सोरच्या दुष्टपणामुळे आणि देवासमोर उद्धटपणाचा परिणाम म्हणून होणाऱ्या विनाशाबद्दल तपशीलवार भविष्यवाणी घोषित

करण्यास आणि लिहून ठेवण्यास सांगितले.

संदेष्टा यहेज्केलने भविष्यवाणी केली :

१. बहुत राष्ट्रे सोरच्या विरोधात येतील. (यहेज्केल २६:३)

२. बाबेल, नबुखद्नेस्सरच्या शासनात, त्यावर हल्ला करणारा पहिला असेल. (वचन ७)

३. सोरेच्या तटांचा विध्वंस करतील आणि तिचे बुरुज पाडून टाकतील. (वचने, ४, ९)

४. सोरचे लोक तलवारीने ठार केले जातील. (वचन ११)

५. तुझे पाषाण, लाकूड, माती वगैरे सर्वकाही पाण्यात बुडवून टाकतील. (वचन १२)

६. तिच्यावरील माती खरडून काढून तिचा *“उघडा खडक”* होईल. (वचन ४)

७. ती समुद्रात *“जाळी पसरण्याचे”* ठिकाण होईल. (वचने ५, १४)

८. सोर या महान नगराला *“पुन्हा बांधणार नाहीत, मी परमेश्वराने हे म्हटले आहे.”* (वचन १४)

धर्मनिरपेक्ष इतिहास सर्व आठ भविष्यवाण्या खऱ्या झाल्याबद्दल नोंद करते:

१. अनेक राष्ट्रे सोर विरोधात आली.

२. पहिले हे बाबेल होते, ज्याचे नेतृत्व राजा नबुखद्नेस्सरने केले.

३. १३ वर्षांच्या वेढयानंतर ( ख्रि.पू. ५८५-५७२), नबुखद्नेस्सरने सोरच्या मुख्य भूभागाच्या भिंती आणि बुरुज पाडून टाकले, यहेज्केलच्या भविष्यवाणीतील पहिली पूर्ण केली.

४. नबुखद्नेस्सरने सोरच्या बेटावरील किल्ल्यावर निसटून जाण्यास असमर्थ असलेल्या रहिवाशांची कत्तल केली, जे मध्य सागरात जवळजवळ एक किलोमीटरवर होते.

५. धर्मनिरपेक्ष इतिहास नोंद करतो की ख्रि.पू. ३३२ मध्ये, “महान अलेक्झांडर सोरच्या बेटाच्या काही भागावर ताबा घेणारा पहिला व्यक्ती होता. नगराच्या मुख्य भूभागाचा काही भाग नष्ट करण्याद्वारे आणि बेटाकडे जाण्यासाठी मातीच्या ढिगाऱ्याचा वापर करून रस्ता बनविण्याद्वारे त्याने ते प्राप्त केले होते.[७३] अशा प्रकारे, त्याने नकळत उध्वस्त झालेल्या नगराचा ढिगारा समुद्रात टाकून भविष्यवाणीचा आणखी एक भाग पूर्ण केला. अलेक्झांडरच्या विजयाने फोनिशियन साम्राज्याचा कायमचा शेवट केला होता.[७४]

६. हे नगर *“खडकाच्या शिखरासारखे”* उखडलेले होते.

७. ते *“जाळी पसरविण्याचे ठिकाण”* झाले होते.

८. त्यानंतरच्या वर्षांमध्ये सोरची पुनर्बांधणी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले,

फक्त तो वारंवार नष्ट झाला.

आज लेबनानमध्ये एक आधुनिक नगर आहे ज्याचे नाव सोर आहे, परंतु प्राचीन फोनिशियन नगर ज्याच्याविरुद्ध यहेज्केलने भविष्यवाणी केली होती ते कधीही सावरले नाही. दगडी फुटपाथच्या फोटोखाली नॅशनल जिओग्राफिक मासिकाने हे मथळे दिले आहेत, *''आज फोनिशियनचे सोर रोमन महानगराच्या या फरसबंदी दगड आणि स्तंभांच्या खाली गाडले गेले आहे. फक्त थोडेसे खोदणे फोनिशियनच्या जगात पोहचते.''*[७५]

यहेज्केल या माणसाने स्वतःच्या बुद्धीने सोर नगराविषयी या आठ अचूक भविष्यवाण्या केल्या असण्याची शक्यता काय आहे?

इतिहास घडण्यापूर्वी केवळ देवच पाहतो म्हणून, केवळ देवच यहेज्केलला ही माहिती देऊ शकला असता.

## लोकांविषयी भविष्यवाण्या

बायबलमध्ये असंख्य लोक, आणि राष्ट्रांबद्दल शेकडो अचूक भविष्यवाण्या आहेत : मिसर, इथिओपिया, अरब, पर्शिया, रशिया, इस्राएल आणि इतर.

आपण पूर्ण झालेल्या भविष्यवाणीच्या पुढील उदाहरणासह पुढे जातो तेव्हा, चला आपण हे लक्षात घेऊ की आपला उद्देश हा आपणांस काय ऐकायचे आहे ते या भविष्यवाणींनी बोलावे हा नाही, तसेच राजकीय किंवा धार्मिक विषयास चालना देणेही नाही. पवित्र शास्त्र काय घोषित करते ते शोधणे हा आपला उद्देश आहे.

येथे एका विशिष्ट राष्ट्राविषयी पूर्ण झालेल्या भविष्यवाणीचे स्पष्टीकरण करणे सोपे परंतु अनेकांना हे स्वीकारणे कठीण आहे.

ख्रि.पू. १९२०च्या जवळपास, देवाने अब्राहामाला आश्वासन दिले, *''हा देश मी तुझ्या संतानाला देणार.''* (उत्पत्ती १२:७)

नंतर देवाने तेच आश्वासन इसहाक आणि याकोबाला दिले.[७६]

अब्राहाम, इसहाक आणि याकोबाचे वंशज यांना प्रथम इब्री म्हटले जात होते, नंतर इस्राएली, आणि त्याहीनंतर यहूदी.

त्यानंतर शेकडो वर्षांनी, देवाने मोशेला म्हटले त्यांना काय होईल जर त्यांनी त्यांच्या देवावर विश्वास ठेवला नाही व त्याची आज्ञा पाळली नाही:

*''परराष्ट्रांमध्ये मी तुमची पांगापांग करीन, मी तलवार उपसून तुमच्या पाठीस लागेन; तुमचा देश उध्वस्त होईल आणि तुमचे नगरे ओसाड पडतील.''* (लेवीय २६:३३)

*"आणि ज्या ज्या राष्ट्रांमध्ये परमेश्वर तुला नेईल त्या त्या सर्वांना तू आश्चर्याचा, म्हणीचा व थट्टेचा विषय होशील.......त्या राष्ट्रांत तुला स्वास्थ्य मिळणार नाही, तुझ्या पायांना विसावा मिळणार नाही; तेथे तुझे हृदय थरथर कापत राहील, तुझे डोळे क्षीण होतील व तुझा जीव झुरत राहील, असे परमेश्वर करील."* (अनुवाद २८:३७, ६५)

जुन्या करारामध्ये अशा अनेक भविष्यवाण्या आहेत.

इसवी सन ३०च्या जवळपास, संदेष्टयांच्या वचनाची पुष्टी करत, नासरेथच्या येशूने यरुशलेमेच्या नाशाचे भाकीत केले : *"मग तो शहराजवळ आल्यावर त्याच्याकडे पाहून त्याकरता रडत रडत म्हणाला, ...कारण पुढे तुला असे दिवस येणार आहेत की त्यांत तुझे शत्रू तुझ्याभोवती मेंढेकोट उभारतील व तुला वेढतील, तुझा चहूकडून कोंडमारा करतील, तुला व तुझ्या मुलाबाळांना धुळीस मिळवतील आणि तुझ्यामध्ये चिऱ्यावर चिरा राहू देणार नाहीत; कारण तुझ्यावर कृपादृष्टी केल्याचा समय तू ओळखला नाहीस."* (लूक १९:४१-४४). आणि खुद्द मंदिराविषयी बोलत, येशूने भाकीत केले : *"असे दिवस येतील की, जे तुम्ही पाहत आहात त्यांतला पाडला जाणार नाही असा चिऱ्यावर चिरा राहणार नाही."* (लूक २१:६)

चाळीस वर्षानंतर, ह्या घटना घडल्या.

इतिहासकार फ्लावियस जोसेफस, इसवी सन ३७ मध्ये जन्मलेला, त्याने त्याचा प्रत्यक्षदर्शी जबाब नोंदवला. त्याने लिहिले की इसवी सन ७० मध्ये रोमन सेनेने यरुशलेमेचा घेराव केला, शहराभोवती तटबंदी बांधली, आणि तीन वर्षांच्या वेढयानंतर, सैन्याने यरुशलेम पूर्णपणे नष्ट केले. जरी कैसराने स्वतः त्याच्या तुकडीला आज्ञा दिली होती की महान मंदिराला काही करू नये, तरी क्रोधाविष्ट रोमन सैनिकांनी तिला आग लावून दिली होती, आणि जे यहूदी आतमध्ये लपून राहिले होते त्यांना मारले होते. मंदिराचे सोने आणि चांदी वितळले आणि दगडांच्या कपारीत वाहिले. मंदिराला पूर्णपणे उध्वस्त केले, जसे येशूने भाकीत केले होते. *"चिऱ्यावर चिरा राहू दिला नाही."*[७७] आणि जसे मोशे आणि संदेष्टयांनी भविष्यवाणी केली होती, यहूदी लोक जगभर विखुरले. पुढील दोन सहस्त्र वर्षांमध्ये, इतिहास या भविष्यवाण्यांच्या पूर्णतेचा साक्षीदार असेल कारण भटकणारा यहूदी *"विश्रांतीची जागा"* नसताना *"सर्व राष्ट्रांसाठी हेटाळणी व उपहासाचा विषय"* बनले होते.

आपल्या वैयक्तीक भावना काहीही असो, बायबलसंबंधी या भविष्यवाणीची दुसरी बाजू आहे जी कोणीही नाकारू शकत नाही. देवाने त्याच्या संदेष्टयांना हे पण सांगितले की, सर्व शक्यतांविरुद्ध, विविध राष्ट्रांमध्ये यहूदी लोक एक विशिष्ट लोक म्हणून संरक्षित केले जातील आणि देवाने अब्राहाम, इसहाक आणि याकोबाला दिलेल्या देशाकडे एके दिवशी परत येतील.

मोशेने इस्राएलींना ही भविष्यवाणी केली : *"तेव्हा तुझा देव परमेश्वर ........ ज्या ज्या राष्ट्रांमध्ये त्याने तुझी पांगापांग केली असेल तेथून तुला पुन्हा एकत्र आणील"* (अनुवाद ३०:३). *"मी आपल्या सर्व इस्राएल लोकांचा बंदिवास पालटीन; ते ओसाड झालेली नगरे बांधतील व त्यांत वस्ती करतील; ते द्राक्षाचे मळे लावतील व त्यांचा द्राक्षारस पितील; ते बाग लावतील व त्यांची फळे खातील. मी त्यांना त्यांच्या भूमीत रूजवीन व जी भूमी मी त्यांना दिली आहे तिच्यातून त्यांना ह्यापुढे उपटून टाकण्यात येणार नाही..."* (आमोस ९:१४-१५)

जगभरातील बातमी नेटवर्क ह्या घटनांच्या पूर्ततेचा अहवाल देतात.

इब्री राष्ट्रासोबत जे घडले ते जगाच्या इतिहासात अद्वितीय आहे. एका गोष्टीसाठी, ते थेट विलीन करण्याच्या कायद्याच्या विरोधात जाते. जेव्हा जेव्हा एखादे राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राने जिंकले तेव्हा हा कायदा पाळला जाऊ शकतो. काही पिढयांमध्ये विखरून वाचलेले लोक ज्या राष्ट्रांमध्ये स्थायिक होतात ते त्यांच्यात विलीन होतात. ते परस्पर विवाह करतात, नवीन भाषा आणि संस्कृती स्वीकारतात आणि त्यांची राष्ट्रीय ओळख गमावतात. यहूदी लोकांच्या बाबतीत असे घडले नाही. लाखो लोकांनी एकत्र येण्याचा आणि गढून जाण्याचा आटोकाट प्रयत्न केला तरी ते शक्य झाले नाही.[७८]

साहजिकच, अनेकांना ही वस्तुस्थिती स्वीकारणे वेदनादायक वाटते. अलीकडे, लेबनानमधील एका मित्राने लिहिले, *"भविष्यवाणीच्या पूर्णतेशी संबंधित [यहूदी लोकांना देशात परत आणण्याच्या देवाच्या प्रतिज्ञासंबंधी], असा विश्वास स्वीकारण्याचे परिणाम मी दुर्लक्ष करू शकत नाही. ते स्वीकारणे माझ्यासाठी हानिकारक ठरेल."*

चला आपण सविस्तर पाहू या. एक लोक आणि राष्ट्र म्हणून यहूदी लोकांचे अस्तित्व आणि पुन: स्थापना ओळखण्याचा अर्थ असा नाही की आपण इस्राएली सरकाच्या धोरणांचे समर्थन केले पाहिजे. मी माझ्या लेबनानच्या मित्राला समजतो आणि सहानुभूती देतो. १९४८मध्ये त्याच्या आईचे कुटुंब आणि शेजारी, इतर अनेकांसोबत, त्यांना त्यांच्या घरातून हाकलून देण्यात आले. त्याच्या देशाला जबर फटका बसला. असे असले तरी, समजून घेण्याचा मुद्दा हा आहे : पवित्र शास्त्रातील संदेष्टयांनी भविष्यवाणी केलेल्या घटना ह्या आपल्या डोळयासमोर घडत आहेत.

आज बहुतेक यहूदी ज्या संदेष्टयांचा सन्मान करण्याचा दावा करतात त्यांचा संदेश नाकारतात ही वस्तुस्थिती देखील पवित्र शास्त्राची पूर्णता आहे. एक राष्ट्र म्हणून ते आध्यात्मिकदृष्टया आंधळे आहेत : *"आजपर्यंत मोशेचा ग्रंथ वाचून दाखवण्यात येतो तेव्हा त्यांच्या अंत:करणावर आच्छादन राहते"* (२ करिंथ. ३:१५). येणाऱ्या दिवसापर्यंत ते देवाच्या पूर्ण आशीर्वादात प्रवेश

करणार नाहीत, जोपर्यंत ते पश्चात्ताप करणार नाही (मन आणि हृदयात आमुलाग्र बदल करणे) आणि देवाच्या जुन्या संदेशावर विश्वास ठेवणार नाहीत.[७९]

पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासाच्या अगदी शेवटी, ह्या घटना शेवटच्या काळासाठी देवाच्या कार्यक्रमात कसे व्यवस्थित बसतात हे आपण पाहू, मध्य पूर्व आणि संपूर्ण जगासाठी देवाने ठेवलेल्या आशीर्वादांबद्दल आपण काही भविष्यवाण्या देखील ऐकणार आहोत.

*"परमेश्वर म्हणतो, तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत."* (यिर्मया २९:११)

## एका व्यक्तीविषयी भविष्यवाण्या

जुन्या करारामध्ये विखुरलेल्या शेकडो भविष्यवाण्या एक मसीहा-तारणाऱ्याबद्दल आहेत ज्याला देवाने जगात पाठवण्याचे आश्वासन दिले होते. पवित्र शास्त्र मसीहाच्या जन्माच्या शेकडो वर्षांपूर्वी लिहिलेले आहे याविषयी मृत समुद्राजवळील शास्त्रांची गुंडाळी पुष्टी करते. येथे त्या भविष्यवाणीचे नमुने आहेत.

- **ख्रि.पू. १९००मध्ये, अब्राहामाला भविष्यवाणी : अब्राहाम आणि इसहाक यांच्या वंशातून मसीहा जगात प्रवेश करणार.** (उत्पत्ती १२:२-३; २२:१-१८. पूर्ण झाले : मत्तय १)
- यशयाची भविष्यवाणी, ख्रि. पू. ७०० : **तो एका कुमारीकेतून जन्माला येईल, त्याला पृथ्वीवरील जैविक पिता नसेल.** (यशया ७:१४; ९:६. पूर्ण झाले : लूक १:२६-३५; मत्तय १:१८-२५)
- मीखाची भविष्यवाणी, ख्रि.पू. ७०० : **तो बेथलेहममध्ये जन्मेल**. (मीखा ५:२. पूर्ण झाले: लूक २:१-२०; मत्तय २:१-१२)
- होशेयची भविष्यवाणी, ख्रि. पू. ७०० : **त्याला मिसरमधून बोलावण्यात येईल.** (होशेय ११:१. पूर्ण झाले : मत्तय २:१३-१५)
- मलाखीची भविष्यवाणी, ख्रि.पू. ४००: **मसीहाचा एक अग्रदूत असेल.** (मलाखी ३:१; यशया ४०:३-११. पूर्ण झाले : लूक १:११-१७; मत्तय ३:१-१२)
- यशयाची भविष्यवाणी, ख्रि.पू. ७००: **तो आंधळ्यांना पाहायला, बहिऱ्यांना ऐकायला, लंगड्यांना चालायला लावेल, आणि गरिबांना सुवार्ता सांगेल.** (यशया ३५:५-६; ६:१. पूर्ण झाले : लूक ७:२२; मत्तय ९; इत्यादी.)
- यशयाची भविष्यवाणी, ख्रि. पू. ७०० : **त्याला त्याच्याच लोकांकडून नाकारले**

**जाईल.** (यशया ५३:२-३; तसेच: स्तोत्र ११८:२१-२२. पूर्ण झाले : योहान १:११; मार्क ६:३; मत्तय २१:४२-४६; इत्यादी)

- जखऱ्याची भविष्यवाणी, ख्रि. पू. ५०० : **३० चांदीच्या नाण्यांकरता त्याचा विश्वासघात करण्यात येईल, ज्याचा उपयोग एक शेत विकत घेण्याकरता करण्यात येईल.** (जखऱ्या ११:१२-१३. पूर्ण झाले : मत्तय २६:१४-१६; २७:३-१०)
- यशयाची भविष्यवाणी, ख्रि. पू. ७०० : **मसीहाचा नाकार केला जाईल, खोटे आरोप ठेवले जातील, आणि यहूदी व परराष्ट्रीयांकडून चौकशी होईल आणि मारले जाईल.** (यशया ५०:६; ५३:१०१२; तसेच : स्तोत्र २ आणि २२; जखऱ्या १२:१०. पूर्ण झाले : योहान १:११; ११:४५-५७; मार्क १०:३२-३४; मत्तय २६ आणि २७)
- दाविदाची भविष्यवाणी, ख्रि. पू. १००० : **त्याचे हातपाय विंधले जातील, पाहणारे लोकांकडून त्याची निंदा करण्यात येईल आणि त्याच्या वस्त्रांसाठी चिठ्ठया टाकण्यात येईल, इत्यादी.** (स्तोत्र २२:१६, ८, १८. पूर्ण झाले : लूक २३:३३-३७; २४:३९) (हे लक्षात घ्या की फाशीच्या शिक्षेचा एक प्रकार म्हणून वधस्तंभावर खिळण्याचा शोध लावण्याच्या खूप आधी हे भविष्य केले होते.)
- यशयाची भविष्यवाणी, ख्रि. पू. ७०० : **जरी एखाद्या वाईट अपराध्याप्रमाणे मारला गेला, तरी त्यास एका श्रीमंत माणसाच्या कबरेमध्ये पुरण्यात येईल.** (यशया ५३:८-९. पूर्ण झाले : मत्तय २७:५७-६०)
- दाविदाची भविष्यवाणी, ख्रि. पू. १००० : **मसीहाचे शरीर कबरेमध्ये कुजणार नाही, तो मृत्यूवर विजयी होईल.** (स्तोत्र १६:९-११ [हे देखील पाहा : मत्तय १६:२१-२३; १७:२२-२३; २०:१७-१९; इत्यादी.] पूर्ण झाले : लूक २४; प्रेषित १ आणि २)

संभाव्यतेचे नियम असे ठरवतात की कोणतीही व्यक्ती अशा विशिष्ट, सत्यापित भविष्यवाण्या पूर्ण करू शकत नाही.

तरीही तेच घडले.

नंतर, तुम्हांला या यादीकडे परत यावेस वाटेल, एक बायबल उचला, आणि जुन्या कराराची प्रत्येक भविष्यवाणी आणि नवीन करारात पूर्ण झाल्याच्या नोंदीला वाचा.

## भविष्यसूचक प्रतीके आणि नमुने

शेकडो भविष्यवाण्यांव्यतिरिक्त जुन्या करारात वचनात विखुरलेले शेकडो प्रतीके आणि नमुने आहेत (तसेच त्यांना प्रकार, चित्रे, छाया, पूर्वकल्पना, आणि उदाहरणे संबोधतात). देवाने स्वतःबद्दल जगाला आणि मानवजातीसाठी त्याची योजना शिकवण्यासाठी ह्या प्रत्येक दृश्याची रचना केली

आहे.

पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासात, आपण अशी अनेक प्रतीके आणि नमुन्यांना सामोरे जाणार आहोत. उदाहरणार्थ, एक प्रमुख प्रतिक हे एका अर्पण केलेल्या कोकऱ्याचे आहे, जे या पुस्तकाच्या १९ ते २६ धडयांमध्ये स्पष्टपणे समजावले आहे.

२१व्या धडयामध्ये, आपण एका विशेष तंबूबद्दल शिकणार आहोत ज्यास निवासमंडप म्हणतात, जे देवाने त्याच्या लोकांना एक नमुना म्हणून बनवण्यास आज्ञा दिली होती. निवासमंडप आणि जे सर्व त्याच्यासह असते ते लोकांना देव कसा आहे आणि पापी लोकांना क्षमा कशी केली जाऊ शकते आणि त्याच्याबरोबर सदैव राहण्यास कसे पात्र ठरविले जाऊ शकते हे समजण्यास मदत करणारे शक्तिशाली दृश्य आहे.

याकोबाचा मुलगा योसेफ आणि नासरेथचा येशू यांच्या जीवनातील तुलनात्मक अभ्यास पवित्र शास्त्रात आढळलेल्या पूर्वआकृतीच्या प्रकाराचे एक उल्लेखनीय उदाहरण उलगडते. योसेफाचे जीवन आणि येशूच्या जीवनामध्ये शेकडोपेक्षा अधिक समानता आहेत. येशू जो जगात १,७०० वर्षांच्यानंतर येणार होता त्याचे चित्र रंगवण्यासाठी देवाने योसेफाच्या जीवनाचा उपयोग केला.[८०]

असे नमुने आणि भविष्यवाण्यांसाठी फक्त एक वाजवी स्पष्टीकरण आहे : देव.

## भविष्यवाणीचा उद्देश

पृथ्वीवर असताना, मसीहाने म्हटले :

*"हे मी तुम्हांला आता म्हणजे हे घडण्यापूर्वी सांगतो, ह्यासाठी की, जेव्हा हे घडेल तेव्हा तुम्ही विश्वास ठेवावा की, मी तो आहे."* (योहान १३:१९)

भविष्यातील घडामोडींचे भाकीत, इतिहासात त्यांची अनुभूती होणे, हा एक मार्ग आहे ज्याद्वारे देवाने त्याचा संदेश आणि त्याच्या संदेशवाहकांना आणि प्रमाणित केले आहे. त्याच्या वचनात आपला विश्वास मजबूत करण्यासाठी, सत्य आणि जिवंत देव *"आरंभीच शेवट कळवतो. होणाऱ्या गोष्टी घडवण्यापूर्वी त्या प्राचीन काळापासून सांगत आला आहे ...."* (यशया ४६:१०)

पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या येणाऱ्या प्रवासात आपण बायबलचे पहिले पुस्तक, उत्पत्तीपासून सुरुवात करू, जे जग कसे सुरु झाले हे ते सांगते. बायबलचे शेवटचे पुस्तक, प्रकटीकरण, जे जगाच्या इतिहासाच्या शेवटच्या घटनांचे भाकीत करते त्यामध्ये प्रवासाचा शेवट होईल.

अप्रमाणित भूतकाळ आणि अप्रत्याशित भविष्याविषयी बायबलमधील विधाने सत्य आहेत याची आपण खात्री कशी बाळगू शकतो? ज्या तर्काने आपल्याला खात्री आहे की उद्या

सूर्य उगवेल तोच तर्क लागू करून आपण खात्री बाळगू शकतो. हजारो वर्षांपासून आपल्या सूर्यमालेची अचूक नोंद आहे. पृथ्वी फिरण्यात कधीही अपयशी ठरली नाही. सूर्य सातत्याने उगवतो आणि मावळतो. तसेच हे बायबलसंबंधी भविष्यवाणीबाबत आहे. जे सर्वकाही सत्यापित केले जाऊ शकते, त्यांत देवाच्या पुस्तकाला एक चिरस्थायी स्वरूप आहे.

### देवाचे आव्हान

काही धार्मिक लोक असा दावा करतात की त्यांच्या पवित्र पुस्तकात भविष्यवाण्या आहेत ज्या पूर्ण झाल्या आहेत. लोक असा दावा करताना जर तुम्ही ऐकता, तर आदरपूर्वक त्यांना त्यांच्या पवित्र पुस्तकातील सर्वात विश्वसनीय भविष्यवाण्यांपैकी तीन किंवा चारची एक छोटी यादी देण्यास सांगा. ते त्याचे पालन करतील अशी शक्यता नाही, परंतु जर त्यांनी तसे केले तर, प्रथम ते सत्यापित करा की भविष्यवाण्या त्यांनी भाकीत केलेल्या घटनांपूर्वी लिहून ठेवल्या होत्या, आणि नंतर त्याच्या पूर्ततेची पुष्टी करण्यासाठी त्यांची धर्मनिरपेक्ष इतिहासाशी तुलना करा. माझ्या अनुभवावरून, अशा कोणत्याही भविष्यवाण्या, कितीही असल्या तरी, कमी आणि संदिग्ध आहेत.

सत्य आणि जिवंत देव सर्व धर्म आणि कल्पित दैवतांना पुढील आव्हान देतो हे योग्य कारण आहे :

*"परमेश्वर म्हणतो, आपला वाद पुढे आणा;...ते आणा व पुढे काय घडणार ते आम्हांला कळवा; प्रथम घडणाऱ्या गोष्टी कोणत्या ते सांगा, म्हणजे त्यांचा आम्ही विचार करू व त्यांचा अखेर परिणाम काय होतो हे पाहू; अथवा पुढे होणाऱ्या गोष्टी आम्हांला ऐकवा. पुढे काय होईल ते कळवा म्हणजे तुम्ही देव आहात असे आम्ही समजू; तुम्ही बरेवाईट काहीतरी करा, म्हणजे आम्ही तत्काळ चकित होऊन त्याकडे पाहू. पाहा, तुम्ही काहीच नाही, तुमच्या हातून काहीएक होणे नाही; तुमची निवड करणारा साक्षात अमंगळ होय."* (यशया ४१:२१-२४)

जेव्हा तंतोतंत पूर्ण झालेल्या अनेक, तपशीलवार भविष्यवाण्यांचा विचार केला जातो, तेव्हा बायबल एकटे, अद्वितीय असे स्थिर आहे.

सत्य आणि जिवंत देवाने मानवजातीसाठी आपला संदेश तो होण्यापूर्वी इतिहासात लिहून प्रमाणित केला आहे.

पूर्ण झालेली भविष्यवाणी ही त्याची स्वाक्षरी आहे.



# धडा ६

# सातत्यपूर्ण साक्ष

*"जर तुम्हांला पाणी कसे आहे हे जाणून घ्यायचे आहे तर माशांना विचारू नका." –*

*चीनी म्हण*

**या**ची कल्पना करा.

एका उष्ण दिवशी तुम्ही नदीच्या बाजूने चालत असताना तुम्ही पोहायला जाण्याचा विचार करता. तथापि, पाणी तुमच्या आवडीचे आहे की नाही हे तुम्हांला आश्चर्य वाटते. प्रवाह खूप वेगवान आहे का? तापमान खूप थंड आहे का किंवा परिस्थिती योग्य आहे का?

चीनी म्हण सल्ला देते, *"माशांना विचारू नका."*

त्याच नदीत राहणारे मासे तुम्हांला *"पाणी कसे आहे"* (ते तुमची भाषा बोलत नाही या वस्तुस्थितीशिवाय) सांगण्यास अयोग्य का आहेत? मासे आवश्यक माहिती देऊ शकत नाही कारण पाण्यावीणा जग म्हणजे त्यांच्यासाठी अंतकालच. ते मर्यादित, अस्पष्ट जग त्यांना माहित आहे.

त्याचप्रमाणे, आपण ज्या जगात राहतो आणि आपण येथे का आहोत हे आपल्याला समजून घ्यायचे असेल, तर अशी माहिती बाहेरील माणसांच्या मर्यादित, स्वयं-केंद्रित जागतिक दृष्टीकोनातून आली पाहिजे. आनंदाची बातमी अशी आहे की ज्यांना हे हवे आहे त्यांच्यासाठी स्वर्गातील देवाने ही माहिती प्रदान केली आहे.

*" **परमेश्वरप्रेरित** प्रत्येक शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखवणे, सुधारणूक, नीतिशिक्षण ह्यांकरता उपयोगी आहे."* (२ तीमथ्य. ३:१६)

बायबलसंबंधी शास्त्रवचने *"देवाने-श्वास घातलेली"* आहे, म्हणजे, देवाकडून प्रेरित आहेत हे आपण कसे ओळखू शकतो? मागील धडयात, आपण पाहिले की निर्माणकर्त्याने बायबलच्या पानांमध्ये शेकडो भविष्यवाण्या जोडून त्याच्या सत्यतेचा शिक्का बसवला आहे ज्या नंतर पूर्ण झाल्या आहेत. केवळ देवच १०० % अचूकतेसह दूरच्या भविष्याची वारंवार भविष्यवाणी करू शकतो.

देवाने त्याच्या प्रकटीकरणाची विश्वसनीयता प्रस्थापित करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे अनेक शतकांपासून अनेक संदेष्टयांना ते प्रकट करणे आहे.

## एक साक्ष पुरेशी नाही

देवाने मोशेला म्हटले, *"एखाद्याने काही गुन्हा किंवा अन्याय केला आणि त्याने केलेल्या त्या अपराधाबद्दल त्याच्याविरुद्ध **एकच साक्षीदार पुढे आला तर चालणार नाही; दोघा किंवा तिघा साक्षीदारांच्या साक्षीनेच कोणताही आरोप शाबित व्हावा.**"* (अनुवाद १९:१५)

हे तत्व जगभर मान्यताप्राप्त आहे. सत्य प्रस्थापित करण्यासाठी न्यायालयामध्ये एकापेक्षा जास्त साक्षीदारांची आवश्यकता असते. एखादे विधान तथ्यात्मक म्हणून स्वीकारले जाण्यापूर्वी ते अनेक विश्वसनीय स्त्रोतांद्वारे सिद्ध केले जाणे आवश्यक आहे.

त्याचे सत्य प्रकट करताना, देवाने स्वतःचा नियम बाजूला ठेवला नाही ज्यामध्ये सांगितले आहे : *"एक साक्ष पुरेशी नाही."* पवित्र शास्त्र घोषित करते की *"जिवंत देवाने गतकाळातील पिढयांमध्ये सर्व राष्ट्रांना आपापल्या मार्गांनी चालू दिले; तथापि त्याने स्वतःस साक्षीविरहित राहू दिले नाही, म्हणजे त्याने उपकार केले, आकाशापासून पर्जन्य व फलदायक ऋतू तुम्हांला दिले, आणि ......."* (प्रेषित. १४:१५-१७)

पृथ्वीवरील सर्वात अलिप्त जमातींना देखील निर्मितीचा बाह्य साक्षी (त्या गोष्टी पाहणे ज्या त्यांच्या निर्माणकर्त्याने बनवल्या आहेत) आणि अंतरात्म्याची साक्ष (योग्य, अयोग्य आणि अनंतकाळची जन्मजात भावना) आहे. पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीला काही प्रकाश काही सत्य दिले आहे. अशाप्रकारे, देव मानवजातीला *"बहाण्याशिवाय"*[८१] असल्याचे घोषित करतो. तरीसुद्धा, विश्वाचा निर्माणकर्ता त्याला आणि त्याचे सत्य जाणून घेण्याचा परिश्रम घेत असलेल्या सर्वांना आणखी प्रकाश देण्याचे वचन देतो.

## निरंतर साक्ष

देवाने स्वतःला कधीही साक्षीवाचून ठेवलेले नाही.

मानवी इतिहासाच्या सुरुवातीच्या हजार वर्षांच्या काळात, देव एकतर लोकांशी थेट

बोलला किंवा त्याने त्याचे सत्य पहिल्या मानवांच्या मौखिक साक्षीद्वारे प्रकट केले.

आदाम, पहिला माणूस, ९३० वर्षे जगला. मानवी इतिहासाच्या पहिल्या सहस्त्राब्दीमध्ये राहणाऱ्या लोकांना त्यांच्या निर्मात्या-मालकाबद्दलचे सत्य माहित नसल्याबद्दलचे कारण नाही कारण ते मूळ साक्षीदार आदाम व हव्वा यांची मुलाखत घेऊ शकले असते.[८२] पहिल्या माणसांचे दीर्घायुष्य आजच्या सरासरी आयुर्मानापेक्षा सुमारे अकरा पटींनी जास्त होते, जे नंतर निर्माणकर्त्याने *"जर आपल्याला शक्ती असेल तर सत्तर वर्षे किंवा ऐंशी असे बदलले."* (स्तोत्र ९०:१०)

ख्रि.पू. १९२०च्या सुमारास, देवाने एका वृद्ध माणसाला निवडले, ज्याला नंतर त्याने अब्राहाम हे नाव दिले. देवाने अब्राहामाला एक राष्ट्र बनवण्याचे वचन दिले ज्याद्वारे तो जगातील राष्ट्रांना स्वतःबद्दल आणि मानवजातीसाठी त्याच्या योजनेबद्दल महत्वाची शिकवण देईल. या निवडलेल्या राष्ट्राद्वारे देव संदेष्टे आणि पवित्र शास्त्र प्रदान करेल आणि मसीहाला जगात पाठवेल. ख्रि.पू. १४९०च्या सुमारास, देवाने त्या राष्ट्रामधून एका व्यक्तीला बोलावले की त्याचा प्रवक्ता व्हावे. त्या व्यक्तीचे नाव मोशे होते.

## लिखित साक्ष

देवाने मोशेला त्याच्या पुस्तकाचा पहिला भाग, तोरा लिहिण्यास प्रेरित केले. स्वर्ग आणि पृथ्वीच्या निर्माणकर्त्याने त्याचे सत्य भविष्यातील पिढयांसाठी लिखित स्वरुपात उपलब्ध करून देण्याचा उद्देश ठेवला होता-शेवटच्या काळापर्यंत. वचने जी लिहायची होती ती त्याने मोशेच्या मनात टाकली. देवाने मोशेच्या हातून शक्तिशाली चमत्कारांसह राष्ट्रांसाठी त्याचे वचन प्रमाणित केले होते. देवाने भविष्यातील घटनांना देखील प्रकट केले ज्याची घोषणा मोशेने मिसर आणि इस्राएली लोकांना केली. सर्वकाही वास्तवात तसेच घडले जसे मोशेने भविष्य केले होते. देवाने वाजवी संशयासाठी जागा सोडली नाही.

मोशे द्वारे बोलणारा हाच सत्य आणि जिवंत देव होता हे सर्वात कठोर संशयी लोकांनाही मान्य करावे लागले.[८३]

१,५००वर्षांच्या कालावधीत देवाच्या वचनाची नोंद करणाऱ्या संदेष्टयांच्या लांब पंक्तीतील मोशे हा पहिला होता.[८४] संदेष्टे विविध पार्श्वभूमीतून आले होते. काहींना औपचारिक शिक्षणही नव्हते.

जरी ते वेगवेगळया पिढयांमध्ये जगले होते, तरी त्यांनी जे लिहिले ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक परिपूर्ण संदेश देतात.

जुन्या कराराच्या शास्त्रवचनांना लिहिण्यासाठी देवाने मोशे, दावीद, शलमोन आणि सुमारे इतर तीस लोकांना निवडले. त्याचे वचन त्याने पूर्ण केलेली वचने आणि भविष्यवाण्या आणि चमत्कारिक चिन्हे अद्भूतांसह प्रमाणित केले.

नवीन करारात, मसीहाचा जन्म, जीवन, शब्द, कार्ये, मृत्यू आणि पुनरुत्थान यांची चार व्यक्तींनी नोंद केलेली आहे : मत्तय, मार्क, लूक आणि योहान. ह्या चार व्यक्तींनी शुभवर्तमानाची लिखित नोंद केली आहे (त्यास अरबी भाषेत इंजील म्हणतात), अशाप्रकारे जगाला चार वेगवेगळ्या साक्षी प्रदान केल्या. देवाने पेत्र (एक मच्छिमार), याकोब आणि यहूदा (येशूचे सावत्र भाऊ) आणि पौल (एक विद्वान आणि पूर्वीचा आतंकवादी) यांना देखील प्रेरित केले की देवाचे वर्तमान आणि भविष्यातील उद्देश त्याच्या लोकांसाठी गौरवी तपशीलवारपणे स्पष्ट करावे. प्रेषित योहानाने बायबलचे शेवटचे पुस्तक लिहिले, जे जगातील इतिहास जसे आपल्याला माहित आहे, त्याचा शेवट कसा होईल याचे हुबेहुबपणे भविष्य करते.

## सातत्यपूर्ण साक्ष

एकंदरीत, देवाने पंधरा शतकांहून अधिक काळ मानवजातीसाठी त्याच्या प्रकटीकरणाची नोंद करण्यासाठी सुमारे चाळीस लेखकांचा वापर केला. जरी यापैकी बहुतेक साक्षीदार एकमेकांना ओळखत नसले तरी, त्यांनी लिहिलेली प्रत्येक गोष्ट एक सुसंगत कथा आणि संदेश तयार करण्यासाठी एकत्र बसते.

कोण, पण एकमात्र जो एकाच आयुष्याच्या कालावधीने मुक्त असलेला, अशी कथा प्रसारित करू शकेल?

> *"कारण संदेश मनुष्यांच्या इच्छेने कधी आलेला नाही; तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या पवित्र मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे."* (२ पेत्र १:२१)

शतकानुशतके, अनेकांनी नवीन कराराच्या लेखकांना आणि त्यांच्या संदेशाला अविश्वसनीय मानण्याचा प्रयत्न केला आहे. प्रेषित पौलाच्या लिखाणावर विशेषतः आक्रमण केले आहे.

प्रेषित पेत्र आपल्याला पौलाचे लिखाण गांभीर्याने घेण्याचे आवाहन करतो, *"....आपला प्रिय बंधू पौल ह्याला देण्यात आलेल्या ज्ञानाप्रमाणे त्यानेही तुम्हांला असेच लिहिले आहे; आणि त्याने आपल्या सर्व पत्रांत ह्या गोष्टींचा उल्लेख केला आहे; त्यांत समजण्यास कठीण अशा काही गोष्टी आहेत. अज्ञानी व अस्थिर माणसे **इतर शास्त्रलेखांचा** जसा विपरीत अर्थ करतात तसा ह्यांचाही करतात; अशाने ते स्वतःच्या नाशाला कारणीभूत होतात."* (२ पेत्र ३:१५-१६)

जे सर्वकाही प्रेषित पौलाने लिहिले ते सर्व संदेष्टयांनी लिहिलेल्यासह सुसंगत आहे. जसे पौल स्वतः साक्ष देतो, *"तथापि देवापासून साहाय्य प्राप्त झाल्यामुळे मी आजपर्यंत लहानमोठयांस साक्ष देत राहिलो आहे; आणि* ***ज्या गोष्टी होणार आहेत म्हणून संदेष्टयांनी व मोशेने सांगितले, त्यांखेरीज मी दुसरे काही सांगत नाही.... ....संदेष्टयांवर आपला विश्वास आहे ना?*** (प्रेषित. २६:२२, २७)

## सुसंगत किंवा विसंगत?

साक्षीदारांची विश्वसनीयता ही व्यक्तीच्या साक्षीमध्ये असलेल्या सत्याच्या प्रमाणात नाही तर कोणत्याही विसंगतीच्या अनुपस्थितीमुळे होते. हे पुढील कथेद्वारे स्पष्ट केले आहे :

एके दिवशी, हायस्कूलच्या चार मुलांना वर्गाला न जाण्याचा मोह आवरता आला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी त्यांच्या शिक्षिकेला स्पष्ट केले की ते तिच्या वर्गाला येण्यास चुकले कारण त्यांची कार पंक्चर झाली होती. त्यांना दिलासा देण्यासाठी, ती हसली आणि म्हणाली, *"बर, तुमची कालची प्रश्नमंजुषा चुकली."* परंतु मग ती त्यासोबत म्हणाली, *"तुमच्या जागेवर जा आणि पेन्सिल आणि कागद काढा. पहिला प्रश्न हा आहे: कोणते टायर पंक्चर झाले होते?"*[८५]

या एका मुद्यावर मुलांनी दिलेल्या परस्परविरोधी उत्तरांनी त्यांची रचलेली कथा उघड झाली.

या चार मुलांच्या परस्परविरोधी साक्षीच्या उलट, देवाची साक्ष सुसंगत आहे. अगणित पिढयांमध्ये डझनभर साक्षीदार आणि लेखकांचा वापर करून, आपल्या निर्मात्याने स्वतःला आणि त्याच्या योजनेला सातत्याने निर्दोष प्रकट केले आहे.

माणसांचे परस्परविरोधी धर्म आणि तत्वज्ञानाच्या अशांत महासागराच्या मध्ये, देवाने आपल्यासाठी अचल खडक प्रदान केला आणि जतन करून ठेवला आहे ज्यावर आपण आत्म्यांना स्थिर करू शकतो.

तो खडक हे त्याचे वचन आहे.

> *"शिवाय अधिक* ***निश्चित असे संदेष्टयाचे वचन*** *आमच्याजवळ आहे; ते काळोख्या जागी प्रकाशणाऱ्या दिव्याप्रमाणे आहे;.....* ***तर आपल्या लोकांतही खोटे संदेष्टे*** *होते* ***तसे तुमच्यातही खोटे शिक्षक होतील****;....त्यांच्या कामातुर आचरणाचे अनुकरण पुष्कळ लोक करतील; त्यांच्यामुळे सत्य मार्गाची निंदा होईल. ते लोभ धरून बनावट गोष्टी सांगतील....."* (२ पेत्र १:१९-२:३)

## खोटे संदेष्टे

अशाप्रकारे, देवाचे वचन आपल्याला लोभी, स्वार्थी संदेष्टे आणि शिक्षकांच्या विरोधात चेतावणी देते जे *"लोभ धरून बनावट गोष्टी सांगतील."*[८६] बायबलमध्ये माणसांविषयी असंख्य कथा समाविष्ट आहेत जे देवासाठी बोलल्याचा दावा करतात, परंतु ज्यांचे संदेश हे, वास्तवात, *"एका खोट्या आत्म्याने"* प्रेरित होते. (१ राजे २२:२२)

पवित्र शास्त्र इस्राएलांच्या इतिहासकाळाचे वर्णन करते जेव्हा तेथे ८५० खोटे संदेष्टे होते आणि केवळ एलीया, हाच एकच खरा संदेष्टा होता. ७,००० इस्राएली लोक एका खऱ्या देवावर विश्वासू राहिलेले असताना, इतर लाखो लोकांनी स्वतःची सेवा करणाऱ्या, खोटया साक्षीदारांवर विश्वास ठेवण्याची निवड केली होती.[८७]

मीखा, देवाचा एक विश्वासू संदेष्टा, त्याने लिहिले :

> *"जे संदेष्टे माझ्या लोकांना बहकवतात, काही खाण्यास मिळाले तर 'कल्याण-असो,' असे जे म्हणतात व ज्यांच्यापासून त्यांना खाण्यास मिळत नाही त्याच्याबरोबर लढण्याची जे तयारी करतात, त्यांच्याविषयी परमेश्वर असे म्हणतो."* (मीखा ३:५)

तोच इतिसाहासाचा नमुना आहे, त्यामुळेच येशूने चेतावणी दिली :

*अरुंद दरवाजाने आत जा; कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा रुंद व मार्ग पसरट आहे आणि त्यातून आत जाणारे पुष्कळ आहेत; परंतु जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद व मार्ग संकुचित आहे आणि ज्यांना तो सापडतो ते थोडके आहेत.* ***खोटया संदेष्टयांविषयी जपून राहा.*** *ते* ***मेंढरांच्या वेषाने*** *तुमच्याकडे येतात, पण ते* ***अंतरी क्रूर लांडगे*** *आहेत. त्यांच्या फळांवरून तुम्ही त्यांना ओळखाल. काटेरी झाडांवरून द्राक्षे किंवा रिंगणीच्या झाडांवरून अंजीर काढतात काय? त्याप्रमाणे प्रत्येक चांगल्या झाडाला चांगले फळ येते आणि वाईट झाडाला* ***वाईट फळ*** *येते."* (मत्तय ७:१३-१७)

शतकानुशतके, अगणित वाईट संदेष्टे आणि शिक्षक आले आणि गेले. काहींनी शेकडोंना आणि हजारोंना प्रभावित केले आहे, तर काहींनी लाखो आणि कोटयावधी आत्म्यांना *"नाशाकडे नेणाऱ्या मार्गावर"* नेले आहे.

खोटया संदेष्टयांचा आंधळेपणाने *"नाश होण्यासाठी"* अनुसरण करणाऱ्या *"अनेकां"* पैकी एक होण्याचे तुम्हांला टाळायचे असेल तर, मग या चाळणीने त्या व्यक्तीचे शिक्षण तपासून घ्या.

खऱ्या संदेष्टयाचा संदेश नेहमी त्याच्या आधीच्या पुष्टी केलेल्या भविष्यसूचक शास्त्रवचनांशी सुसंगत असतो.

देवाचे संदेष्टे असल्याचा दावा करणाऱ्या माणसांच्या पुढील तीन प्रकरणांच्या अभ्यासाचा विचार करा. ते खरे की खोटे संदेष्टे होते?

**प्रकरण #१ : पुरलेला "मसीहा"**

इतिहास डझनभर स्वयं-घोषित संदेष्टे आणि मसीहा जे ख्रिस्ताच्या काळानंतर जगले त्यांची नोंद करते.[८८] त्यातील एक हा अबू इसा होता.

पर्शियाचा अबू इसा हा सातव्या शतकाच्या नंतरच्या काळात जगला होता. त्याच्या अनुयायांनी विश्वास ठेवला होता की तो मसीहा होता कारण त्याने म्हटले होते की तो त्यांना विजयी बनवेल, आणि जरी तो निरक्षर असला, तरी त्याने पुस्तके लिहिली. परंतु त्याचा संदेश पवित्र शास्त्राच्या विरोधात होता.

अबू इसाने त्याच्या अनुयायांना शिकवले की दिवसातून सात वेळा प्रार्थना करावी आणि युद्धात त्याचे अनुसरण करावे, त्यांना दैवी संरक्षणाचे वचन दिले. तथापि, युद्धात अबू इसा मरण पावल्यानंतर, त्याला पुरण्यात आले आणि तो पुन्हा जिवंत होण्यास अपयशी ठरला, त्याच्या अनुयायांना हे स्वीकारावे लागले की तो मसीहा नव्हता.

अबू इसाच्या काळाच्या खूप आधी, येशूने त्याच्या श्रोत्यांना चेतावणी दिली होती :

*''कारण खोटे ख्रिस्त व 'खोटे संदेष्टे' उठतील व साधेल तर निवडलेल्यांना देखील फसवावे म्हणून मोठी 'चिन्हे व अद्भुते दाखवतील.'* ***पाहा, मी हे अगोदरच तुम्हांला सांगून ठेवले आहे.''*** (मत्तय २४:२४-२५)

**प्रकरण #२ : एक आत्महत्त्या "संदेष्टा"**

जिम जोन्सने लोकांचे मंदिर नावाचा एक पंथ स्थापन केला. १९७०च्या अगदी प्रारंभी, जोन्स हा सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया येथील लोकप्रिय प्रचारक होता. राजकारणात आणि गरिबांना मदत करणाऱ्या प्रकल्पांमध्ये सहभागी होण्यासाठी लोकसमुदायाला एकत्रित करण्याच्या क्षमतेसाठी तो ओळखला जात होता. जोन्सने स्वतःला *''प्रेषित''* म्हटले आणि कर्करोगाच्या रुग्णांना बरे करण्याची आणि मृतांना उठवण्याची शक्ती असल्याचा दावा केला.

अखेरीस, जिम जोन्सने त्याच्या हजाराहून अधिक अनुयायांना दक्षिण अमेरिकेतील गयाना येथील *''जोन्सटाऊन''* येथे त्याचे अनुसरण करण्यास वळविले. या नवीन समाजात, *''संदेष्टा जिम''* ने त्याच्या शिष्यांना शांती आणि आनंदाच्या जीवनाचे वचन दिले. परंतु ते मोठे खोटे होते.

जोन्स हा मेंढराच्या पोषाखातला आधाशी लांडग्यापेक्षा काही अधिक नव्हता. सॅन फ्रान्सिस्को क्रॉनिकलने नोंदवल्याप्रमाणे, *''१८ नोव्हेंबर [१९७८] : जोन्सने त्याच्या कळपाला सायनाईड घेऊन आत्महत्त्या करण्याचा आदेश दिला. ते ज्यांनी नकार दिला त्यांना जबरदस्तीने*

*विष घेण्यास लावले. लेकरांना इंजेक्शनद्वारे मारण्यात आले. अखेरीस, जोन्सटाऊन येथे ९१४ शरीरे सापडली, त्यामध्ये जोन्स देखील होता."*[८९]

**प्रकरण #३ : पुष्टी न केलेले "पवित्र पुस्तक"**

जोसेफ स्मिथ १८०५मध्ये उत्तर अमेरिकेत जन्मला. दारिद्र्य आणि अंधश्रद्धेमध्ये वाढलेला, तरुण असताना तो लोकांना सांगू लागला की तो देवाचा संदेष्टा आहे. त्याने दावा केला की मोरोनी नावाच्या प्रकाशाच्या देवदूताद्वारे देव त्याच्याशी अनेक दृष्टांतामध्ये बोलला आहे.

स्मिथने लिहिले : *"माझ्यावर काही शक्ती होती ज्याने माझ्यावर पूर्णपणे मात केली आणि माझ्यावर इतका आश्चर्यकारक प्रभाव पडला की माझी जीभ बांधली गेली जेणेकरून मी बोलू शकलो नाही. दाट अंधार माझ्याभोवती जमा झाला आणि मला वाटले की मी एकाएकी नाश पावलो आहे."* पुढे स्मिथ सांगतो की त्याच्या डोक्यावर *"प्रकाशाचा स्तंभ"* कसा दिसला *"सूर्याच्या तेजापेक्षा अधिक, जो त्याच्यावर पडेपर्यंत हळूहळू खाली आला होता."*[९०] स्मिथने घोषित केले की देवाने त्याला एक नवीन पवित्र पुस्तक, मॉर्मोनचे पुस्तक प्रकट केले आहे. त्याने त्याच्या अनुयायांना सांगितले की बायबल देवापासून आले, परंतु त्याचे हे नवीन पुस्तक देवापासून शेवटचे प्रकटीकरण आहे. स्मिथने लोकांना प्रार्थना पठण, उपास, दानधर्म करणे, चांगली कार्ये करणे, आणि त्यास एक संदेष्टा म्हणून स्वीकार करावे हे शिकवले. त्यादरम्यान, त्याने स्वतः स्वार्थी आणि कामुक जीवनशैलीचे आचरण केले आणि ते कायदेशीर ठरवले.

जरी जोसेफ स्मिथचे *"प्रकटीकरण"* इतर कोणत्याही साक्षीद्वारे (जरी त्याने दावा केला की तशा तीन गोष्टी आहेत) पुष्टी केले गेले नाही, आणि त्याचे पुस्तक बायबल, इतिहास, आणि पुरातत्वशास्त्राच्या [९१] विरुद्ध असल्याची वस्तुस्थिती असतानाही, आज लाखो लोक मॉर्मोनिजमच्या धर्माचे पालन करतात. श्रीमंत मॉर्मोन चर्च जगभरात आपले मिशनरी पाठवतात आणि दररोज शेकडो लोक मॉर्मोन होत आहेत (त्यांना लैटर-डे सेंट देखील म्हणतात). अधिकतर मॉर्मोन हे प्रामाणिक, चांगले लोक आहेत, परंतु जर तुम्ही *"संदेष्टा योसेफाची"* तुलना बायबलमधील संदेष्टयांनी जे घोषित केले आणि लिहिले त्या संदेशाबरोबर केली, तर तुम्हांला दोन पूर्णपणे भिन्न संदेश मिळतील.

स्वयंघोषित संदेष्टयांच्या परस्परविरोधी, पुष्टी न केलेल्या संदेशावर आपले शाश्वत नशीब धोक्यात घालणे – मग तो कितीही स्पष्ट किंवा बुद्धिमान असला तरीही-मूर्खपणाचे आहे. *"कारण सैतान स्वतः तेजस्वी देवदूताचे सोंग घेतो."* (२ करिंथ. ११:१४)

## पुष्टी केलेला संदेश

भ्रमित जगात जेथे बहुसंख्य लोकांनी "देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली आहे" (रोम. १:२५), एकमात्र सत्य देवाने बहुसंख्य नकली-वाणींपासून त्याच्या सत्याला स्पष्टपणे वेगळे केले आहे.

देवाने त्याच्या संदेशाचे स्पष्टीकरण आणि पुष्टी करण्याचा एक मार्ग म्हणजे अनेक पिढयांमधील अनेक संदेष्टयांकडे उत्तरोत्तर परिपूर्ण सुसंगतेने प्रकट करणे आहे. काळाच्या बाहेर अस्तित्वात असलेल्या लेखकालाच असे प्रकटीकरण होऊ शकते.



या उदाहरणात चाळीस पुरुष संदेशवाहकांना प्रतिनिधित करतात, ज्यांनी, पंधरा शतकांहून अधिक काळात, पवित्र शास्त्रात देवाचा सुसंगत, पुष्टी केलेला संदेश नमूद केला आहे.



एकटा माणूस हा कोणत्याही संदेशवाहकाचे प्रतिनिधित्व करतो जो नंतर संघर्षपूर्ण, पुष्टी न केलेल्या संदेशासह आला.

मागील काही अध्यायांमध्ये बायबल हे देवाचे वचन असल्याचे दाखवणारे अनेक पुरावे आपल्याला मिळाले आहेत. तरीही हे आणि इतर पुरावे जेवढे खात्रीलायक आहेत, तेवढे देवाच्या संदेशाचे सर्वात आकर्षक प्रमाणीकरण फक्त ते ऐकणे, समजून घेणे आणि स्वीकारणे यात आढळते.

देवाच्या पुस्तकातील उलगडत जाणारे नाटक आपल्या कल्पनाशक्तींच्या पलीकडील आणि अमर्यादपणे अत्युच्च असलेल्या व्यक्तीला प्रकट करते. हे आपल्या निर्माणकर्त्याचा वैभवशाली आणि पूर्णपणे संतुलित स्वभाव प्रदर्शित करते. ते लोकांना मृत्यूच्या भीतीपासून मुक्त करते आणि त्यांना सार्वकालिक जीवनाची खात्रीशीर आशा प्रदान करते. ते त्यांचे चारित्र्य आणि आचरणात परिवर्तन आणते. ते त्यांना एका सत्य देवाकडे नेते.

कोणताही सैतान किंवा माणूस असा एक संदेश घेऊन येऊ शकला नसता.

परंतु त्यासाठी माझे म्हणणे ऐकू नका.

***"सर्व गोष्टींची पारख करा;*** *चांगले ते बळकट करा."* (१ थेस्सल. ५:२१)



# धडा ७

# आधारपाया

*"सुज्ञ मनुष्य....त्याचे घर खडकावर बांधतो."* (मत्तय ७:२४)

डोंगरावरील त्याचा संदेश, नासरेथच्या येशूने ह्या शब्दांनी पूर्ण केला :

*"ह्यास्तव जो प्रत्येक जण ही माझी वचने ऐकून त्याप्रमाणे वागतो तो कोणाएका सुज्ञ मनुष्यासारखा ठरेल; त्याने आपले घर खडकावर बांधले; मग पाऊस पडला, पूर आला, वाराही सुटला, व त्या घरास लागला; तरी ते पडले नाही, कारण त्याचा पाया खडकावर घातला होता. तसेच जो कोणी माझी वचने ऐकून त्याप्रमाणे वागत नाही तो कोणाएका मूर्ख मनुष्यासारखा ठरेल; त्याने आपले घर वाळूवर बांधले; मग पाऊस पडला, पूर आला, वाराही सुटला, व त्या घरास लागला; तेव्हा ते पडले, अगदी कोसळून पडले."* (मत्तय ७:२४-२७)

वादळाचा सामना करणारे घर आणि उध्वस्त झालेले घर यात काय फरक होता?

आधारपाया.

सुज्ञ माणसाने त्याचे घर एका भक्कम खडकावर बांधले; मूर्ख माणसाने त्याचे घर सरकणाऱ्या वाळूवर बांधले.

संदेष्टयांच्या पवित्र शास्त्रात, देवाने संदेश जो प्रत्येकाने समजावा आणि विश्वास ठेवावा अशी त्याची इच्छा आहे त्यासाठी खडकासारखा-भक्कम पाया ठेवला आहे. तो पाया हा तोरा आहे (त्यास मोशेचे नियमशास्त्र, पेंट्याट्युक किंवा तोरा देखील म्हणतात).

## सुरुवातीचे पुस्तक

मोशेच्या तोरामध्ये पवित्र शास्त्राची पहिली पाच पुस्तके आहेत. सुरुवातीच्या पुस्तकाला **उत्पत्ती** म्हटले आहे, त्याचा अर्थ उगम. उत्पत्ती हे सुरुवातीचे पुस्तक आहे, ज्यामध्ये देव पृथ्वीचा उगम, जीवन, मानव, विवाह, कुटुंबे, समाज, राष्ट्रे आणि भाषेंची ओळख करून देतो. उत्पत्ती आयुष्याच्या गहन रहस्यांना उत्तरे पुरवते. देव कसा आहे? मनुष्य कोठून आला? आपण येथे का आहोत? वाइटाचे स्त्रोत काय आहे? लोक दु:खात का राहतात? परीपूर्ण देव अपरिपूर्ण लोकांना कसा स्वीकारू शकतो?

या आणि इतर महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे पवित्र शास्त्रात नंतर विकसित केली गेलेली असताना, हे उत्पत्तीमध्येच निर्माणकर्त्याने त्याच्या उत्तरांसाठी पाया रचला आहे. बायबलचे पहिले पुस्तक हे पुढे जे काही येते त्यासाठी पाया आहे.

## देवाची कथा

बायबलमध्ये हजारो वर्षांपासून घडलेल्या शेकडो कथा आहेत. या कथा एकत्रितपणे एक कथा बनवतात, आतापर्यंतची सर्वोत्तम कथा. ह्या कथे मध्येच देवाने एक संदेश रचला आहे, आतापर्यंत जाहीर केलेली सर्वोत्तम बातमी.

देवाच्या नाट्यमय कथेमध्ये अनेक परमोच्च बिंदू समाविष्ट आहेत. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपण मार्गक्रमण करत असताना, शुभवर्तमान नोंदणीमध्ये आपला एका अत्युच्च शिखराशी सामना होईल. बायबलच्या अंतिम पुस्तकात आपल्याला आणखी एक परमोच्च बिंदूचा आघात होईल, ज्याचे शीर्षक प्रकटीकरण आहे, म्हणजे अनावरण.

देवाने मानवजातीसाठी त्याच्या योजनेचे अनावरण केले आहे असे असूनही, ती योजना बहुतेक लोकांसाठी एक रहस्य आहे.

## प्रथम गोष्टी प्रथम

उत्पत्तीच्या पुस्तकात बायबलच्या ११८९ अध्यायांपैकी ५० अध्याय आहेत.[९२] संपूर्ण बायबल न थांबता वाचण्यासाठी सुमारे तीन दिवस आणि तीन रात्री लागतील.

आपल्या येणाऱ्या प्रवासात, पवित्र शास्त्रात असणाऱ्या बहुतेक कथांमधून आपल्याला जाणे आवश्यक असले, तरी आपण अनेक उत्कृष्ट, मुख्य कथांना भेट देण्याची योजना करत आहोत जे मानवजातीसाठी देवाच्या योजनेचे *''मोठे चित्र''* प्रकट करते. आपल्या प्रवासाचा महत्वाचा भाग हा बायबलच्या पहिल्या चार अध्यायात घालविला जाईल कारण ही सुरुवातीची

पाने देवाच्या वचनात इतरत्र सापडणाऱ्या महान सत्यांना उजागर करतात.

बायबलच्या पहिल्या काही अध्यायांच्या महत्वावर जास्त जोर दिला जाऊ शकत नाही.

जेव्हा आपण एखाद्या मुलाला एखादी कथा सांगतो किंवा वाचतो, तेव्हा आपण कोठून सुरुवात करतो? आपण कथेच्या मध्यातून सुरु करतो आणि मग शेवटी जातो का, एखादी किंवा दोन ओळी येथे तेथे वाचतो का? नाही, आपण प्रारंभापासून सुरु करतो. तरीही मग जेव्हा पवित्र शास्त्राचा विषय येतो, तेव्हा बहुतेक वाचक जवळपास वगळत असतात. देवाच्या पुस्तकाच्या पहिल्या पानांकडे दुर्लक्ष केल्यामुळे देवाची कथा त्यांच्यासाठी रहस्यच राहिली असेल का? अहमद ज्याने त्याच्या ई-मेल मध्ये लिहिले आहे, *"सर्व लोक पापी आहेत याचा मला काही अर्थ लागत नाही"* (धडा १), त्याच्याशी बहुतेक लोक सहमत आहेत यात आश्चर्य आहे का?

जर आपण देवाच्या कथेला सुरुवातीपासून अनोळखी आहोत तर आपल्याला उर्वरित गोष्टींचे कौतुक करणे कठीण होईल. तथापि, एकदाचे आपण पहिले काही अध्याय समजले, तर उरलेल्या अध्यायांचा अद्भुत अर्थ कळेल.[१३]

**एक बीज क्षेत्र**

गव्हाच्या एका दाण्याचे चित्र काढा. ते अधिक असे वाटणार नाही, परंतु त्या साध्या दिसणाऱ्या बीजामध्ये धान्याने भरलेली परिपक्व रोपे तयार करण्यासाठी लागणारे जटील कोड आणि सुप्त शक्ती दडलेली आहे. पवित्र शास्त्र प्रक्रीयेचे वर्णन करते :

*"जमीन आपोआप पीक देते; पहिल्याने अंकुर, मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा."*(मार्क ४:२८)

देवाने धान्य, फळे आणि भाजीपाला ताबडतोब पिकण्यासाठी बनवलेले नाही ना ही त्याने त्याची कथा आणि संदेश एकाच वेळी प्रकट करण्यासाठी रचलेले आहे. ज्याप्रमाणे देवाने मनुष्याच्या शरीरासाठी अन्न पुरवण्यासाठी सातत्याने वाढणाऱ्या वनस्पतींना निवडले, त्याप्रमाणेच त्याने सातत्याने प्रकट होणाऱ्या सत्याद्वारे मनुष्याच्या आत्म्यासाठी आध्यात्मिक अन्न पुरवण्याचे निवडले आहे.

*"कारण नियमावर नियम, नियमावर नियम; कानुवर कानू, कानुवर कानू; थोडे येथे, थोडे तेथे; असे तो बोलत असतो."* (यशया २८:१०)

उत्पत्तीचे पुस्तक हे सुपीक भूखंडासारखे आहे ज्यामध्ये देवाने सत्याचे बीज व्यवस्थितपणे पेरले आहे. त्या सत्यावरून त्याचा संदेश वाढतो आणि पवित्र शास्त्राच्या उर्वरित पुस्तकांत परिपक्व होतो, जे जगाला जीवन आणि ताजेपणा प्रदान करते.

## एक भ्रूण

आधुनिक तंत्रज्ञानाचे आभार, एकेकाळी गूढ असलेल्या गोष्टी आता दिसू शकतात. उदाहरणार्थ, आज आपण विकसनशील मानवी गर्भाच्या स्पष्ट प्रतिमा पाहू शकतो. अभूतपूर्व! आठ आठवडयाच्या आंत, आईच्या गर्भाशयातील फलित अंडी शेंगदाणाच्या आकाराच्या बाळामध्ये विकसित होते, डोळे, कान, नाक, तोंड, बाहू, हात आणि पायाचे तळवे, आणि पाय यांनी पूर्ण होते. त्याचे स्वतःचे बोटांचे ठसे देखील आहेत. जरी पूर्ण तयार नसले तरी त्यात सर्व भाग आहेत.

त्याचप्रमाणे, आज आपल्याला माहित आहे की आपल्या निर्माणकर्त्याने स्वतःविषयी आणि मानवजातीसाठी त्याच्या योजनेबद्दल प्रत्येक महत्वाचे सत्य जे प्रकट केले आहे ते उत्पत्तीच्या पुस्तकात भ्रूण प्रकारात सापडले जाऊ शकतात. तथापि, *"देवाचे रहस्य"* (प्रकटीकरण १०:७) पवित्र शास्त्राच्या उर्वरित भागात पूर्ण केले आहे जे परिपक्वतेत वाढते.

आजच्या दिवसापर्यंत, देवाचे व्यक्तिमत्व आणि उद्देश हा बहुतेक लोकांसाठी रहस्यच राहून गेला आहे, परंतु हे अनावश्यकपणे झाले आहे, कारण *"जे रहस्य युगानुयुग पिढयानपिढया गुप्त ठेवलेले होते, परंतु आता त्याच्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले ....."* (कलस्सै. १:२६)

देव आपल्याला त्याचे रहस्य समजून घेण्यासाठी आमंत्रित करतो, परंतु आपल्याला ते समजून घ्यायचे आहे.

## अंश आणि तुकडे

बायबल हे काहीसे जिगसॉ कोडयासारखे आहे.

काही तुकडे ज्याप्रकारे एकत्र बसतात ते निर्विवाद आहे, तर काही इतके स्पष्ट नाहीत. संयम आणि चिकाटी आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, देवाच्या वचनावर चिंतन करण्यास वेळ देऊनच आपला गोंधळ दूर होईल आणि देवाची सुसंवादी रचना प्रकट होईल.

अलीकडे, मला लेबनानमधील एका महत्वाकांक्षी पत्रकाराशी पत्रव्यवहार करण्याचा विशेषाधिकार मिळाला आहे. आमची अजून भेट झाली नसली तरीही आमची मैत्री झाली आहे. मला त्याच्या पहिल्या ई-मेल मध्ये त्याने लिहिले :

> पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद
>
> मला विश्वास नाही की [अंतिम-सत्याबाबत] पुरावा-सकारात्मक निष्कर्षापर्यंत पोहचणे शक्य आहे.

मी त्याला सर्व पूर्वकल्पित कल्पना बाजूला ठेवून स्वतःसाठी बायबल वाचण्यास आणि ते स्वतःसाठी बोलू देण्यास प्रोत्साहित केले. तो हे करत होता, जसे नंतरच्या ई-मेलने प्रमाण दिले.

> पाठव **विषय** : ई-मेल प्रतिसाद
>
> मी नवीन करार अरबी भाषेत वाचला आहे आणि जुना करार वाचण्यास सुरु करण्याचा विचार आहे. **याआधी, मी फक्त काही भाग थोडे येथे-तेथे वाचले होते.** आता, अनेक प्रश्न जी मी विचारली होती त्याची उत्तरे मला मिळाली होती.... या वाचनामुळे मी काय प्राप्त केले होते? एक गहन आदर [बायबलच्या संदेशासाठी], एका व्यक्तीचे जीवन बदलण्यास एका शक्तीसारखे त्यास पाहिले होते, मी हे शोधले आहे की कठोर कर्तव्याच्या आचरणा व्यतिरिक्त त्याच्या/तिच्या जीवनात त्याला/तिला प्रत्यक्षात न बदलता..... एक खरा बदल घडवून आणावा, .... , कदाचित आपल्या हातात काय आहे हे निश्चित करण्याचा हा एक मार्ग आहे.

नुकतेच, त्याने निरीक्षण केले :

> पाठव **विषय** : ई-मेल प्रतिसाद
>
> मी एक पाऊल उचलले होते जे मी फार पूर्वी उचलले पाहिजे होते. मी हे ओळखले होते की 'मी बायबल वाचले आहे' एवढेच म्हणणे पुरेसे नाही. **हे एक पुस्तक आहे जे सतत वाचले पाहिजे**. माझे बरेच प्रश्न त्या पुस्तकाच्या छायेत कसे गायब झाले हे आश्चर्यजनक आहे.

या माणसासाठी, देवाचा संदेश प्रकट होऊ लागला आहे.

पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या येणाऱ्या प्रवासात, एका सत्य देवाची चित्तवेधक कथा आणि संदेश स्पष्ट होईल जेव्हा आपण इतिहासाच्या महान कोडयाचे सर्वात महत्वाचे भाग एकत्र करू. आपण स्वतःसाठी पवित्र शास्त्र सतत वाचत असताना इतर *"अंश आणि तुकडे"* कोठे बसतील हे आपल्याला कळेल.

## प्रेम पत्रे

ही कथा एका सैनिकाची आहे ज्याचे एका तरुणीवर प्रेम होते. त्याचा तिच्याबद्दलचा स्नेह खोल असला तरी तिला त्याच्याबद्दल कसे वाटत होते हे अस्पष्ट होते. योग्य वेळी सैनिकाला दूर पाठवण्यात आले. त्याने विश्वासपूर्वक त्या महिलेला पत्रे लिहिली, जरी तिने त्याला कधीही

उत्तरे पाठवली नाही.

शेवटी, त्याच्या परतीचा दिवस आला. आल्यानंतर, त्याचा पहिला मुक्काम, तो जिच्यावर प्रेम करतो तिला भेटणे होता. ती त्याला घरी मिळाली. तिला पाहून त्याला आनंद झाला, खोलीच्या कोपऱ्यात ठेवलेल्या, धुळीने माखलेल्या पेटीने तिच्या हृदयाची खरी अवस्था उघड केली.

ते न उघडलेल्या पत्रांनी भरलेले होते- त्याची पत्रे.

## स्वर्गातून पृथ्वीपर्यंत

पवित्र शास्त्र हे देवापासून तुमच्यासाठी पत्रांच्या मालिकेसारखे आहे. त्याच्या लिखाणात, स्वर्ग आणि पृथ्वीचा निर्माणकर्ता-स्वामी त्याच्या स्वतःची तुम्हांला ओळख करून देत आहे, त्याची प्रीती व्यक्त करत आहे, आणि गौरवात तुम्ही त्याच्यासोबत आणि त्याच्या सार्वकालिक घरात आनंदात कसे राहू शकाल हे तो तुम्हांला सांगत आहे .

२,७०० वर्षांपूर्वी त्याने पृथ्वीवर पाठवलेल्या *"पत्राचा"* येथे काही भाग आहे :

*"अहो तान्हेल्यांनो, तुम्ही सर्व जलाशयाकडे या, जवळ पैसा नसलेले तुम्ही या; सौदा करा, खा;... जे अन्न नव्हे त्यासाठी दाम का देता? ज्याने तृप्ती होत नाही त्यासाठी श्रम का करता? माझे लक्षपूर्वक ऐका आणि उत्तम ते खा; तुमचा जीव पौष्टिक पदार्थांचे सेवन करून संतुष्ट होवो. कान द्या, माझ्याकडे या; ऐका, म्हणजे तुमचा जीव वाचेल; आणि मी तुमच्याबरोबर सर्वकाळचा करार करीन,....कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत."* (यशया ५५:१-३, ९)

*प्रेम,*

## तुमचा निर्माणकर्ता

तुम्ही त्याची पत्रे तुमच्यासाठी उघडली आहेत का? तुम्ही ती वाचलीत का? तुम्ही त्याला प्रतिसाद दिला आहे का?

प्रवास सुरु होऊ द्या.

# दुसरा भाग
# प्रवास

## रहस्य शोधणे




८ - देव कसा आहे.
९ - त्याच्यासारखे कोणीही नाही
१० - एक विशेष निर्मिती
११ - वाइटाचे प्रवेशद्वार
१२ - पाप आणि मृत्यूचा नियम
१३ - दया आणि न्याय
१४ - शाप
१५ - दुहेरी समस्या
१६ - स्त्रीचे संतान
१७ - हा कोण आहे?
१८ - देवाची सार्वकालिक योजना
१९ - अर्पण करण्याचा नियम
२० - एक महत्वपूर्ण अर्पण
२१ - जास्त रक्त वाहिले
२२ - कोकरा
२३ - शास्त्रलेख पूर्ण करणे
२४ - पूर्ण भरपाई केली
२५ - मृत्यचा पराभव झाला
२६ - धार्मिक आणि देवापासून फार दूर



# धडा ८

## देव कसा आहे

**दे**वाचे पुस्तक जेथून सुरु होते तेथून प्रवास सुरु होतो, सर्व काळातील सर्वात महान घोषणांपैकी एक :

*"प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली."* (उत्पत्ती १:१)



देवाचे अस्तित्व सिद्ध करण्याचा कोणताही प्रयत्न केला जात नाही. तो स्वयं-सिद्ध आहे.

जर तुम्ही निर्जन समुद्रकिनाऱ्यावरून चालत असाल आणि वाळूमध्ये नुकतेच उमटलेल्या पावलांचे ठसे दिसले तर तुम्ही सहज निष्कर्ष काढता की तुम्ही एकटे नाही. तुम्हांला माहित आहे की ते समान अंतरावरील मार्ग स्वतः तयार करत नाहीत. तुम्हांला माहित आहे की वारा आणि पाण्याने त्यांची निर्मिती केली नाही. त्या पावलांचे ठसे कोणीतरी घडवले आहेत.

तुम्हांला माहित आहे.

तरी अनेकांचे म्हणणे आहे की त्यांना हे माहित नाही की ज्या वाळूमध्ये ठसे तयार झाले आणि ज्या माणसाच्या पावलांचे ठसे निर्माण झाले त्याला सुद्धा कोणीतरी कारणीभूत आहे. निर्मात्याशिवाय सृष्टीचे स्पष्टीकरण करण्याच्या प्रयत्नात, मनुष्याने अनेक विस्तृत सिद्धांत मांडले आहेत, काहींनी कोटयावधी कारणांची कल्पना केली आहे. पण एकदा ते ज्याला *"सुरुवात"*

म्हणतात त्या ठिकाणी पोहचल्यानंतर ते मूळ प्रश्नाचे उत्तर देण्याच्या जवळ नसतात : ते कशामुळे झाले? पवित्र शास्त्र म्हणते : *"कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत; अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये."* (रोम. १:१९-२०)

तर्क प्राथमिक आहे : रचनेसाठी रचनाकार आवश्यक आहे.

हे जसे पायांचे ठसे, कार आणि संगणक यांसारख्या मानवनिर्मित वस्तूंच्या बाबतीत खरे आहे, तसेच पाय, पेशी आणि नक्षत्र यांसारख्या यंत्रणांच्या बाबतीतही हे खरे आहे. उघडया डोळ्यांनी किंवा सूक्ष्मदर्शक दुर्बिणीद्वारे निरीक्षण केले तरीही, विश्वाची अपरिवर्तनीय जटीलता आणि गुंतागुंतीच्या रचनेचा निर्माणकर्ता- पालनकर्ता आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे पायांच्या ठशासाठी ठसा तयार करणारा आवश्यक आहे, त्याचप्रमाणे विश्वाचा एक विश्व निर्माणकर्ता आवश्यक आहे.

*"आकाश देवाचा महिमा वर्णिते; अंतरीक्ष त्याची हस्तकृती दर्शवते."* (स्तोत्र. १९:१)

तर हा विश्व निर्माणकर्ता कोण आहे? तो कसा आहे हे आपण कसे ओळखू शकतो? आपण जाणू शकतो कारण त्याने स्वतःची ओळख करून दिली आहे.[१४]

**शाश्वत**

यापूर्वी आपण एका ई-मेल वार्ताहराकडून ऐकले होते ज्याने उपहासाने विचारले होते, *"देवाला कोणी निर्माण केले? मी विसरलो आहे."* उत्तर हे : कोणीही नाही. देव शाश्वत आहे. *"प्रारंभी **देवाने**"* हे आपल्याला शिकवते की आपल्या निर्माणकर्त्यासारखा कोणी नाही आणि दुसरे काहीही नाही.

*"पर्वत उत्पन्न झाले त्यापूर्वी, तू पृथ्वी व जग निर्माण केलेस त्यापूर्वीच अनादिकालापासून अनंतकालापर्यंत तू देव आहेस."* (स्तोत्र. ९०:२)

भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हे सर्व देवासाठी समान आहेत. तो *"**जो होता, जो आहे व जो येणार** तो सर्वसमर्थ प्रभू देव आहे."* (प्रकटीकरण ४:८)

तो शाश्वत आणि अनाकलनीय आहे.

कोणत्याही सृष्ट वस्तूला देवाबद्दल सर्वकाही कळणार नाही. तो *"उच्च, परमथोर आहे, जो अक्षय स्थितीत वास करतो."* (यशया ५७:१५)

तो कधीच बदलत नाही. *"परंतु तू तोच आहेस तुझ्या वर्षांना अंत नाही."* (स्तोत्र. १०२:२७)

## महान

देव आपण कल्पना करू शकतो त्यापेक्षा महान आहे.

ज्याप्रमाणे शाश्वत आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा कोणताही प्रयत्न करत नाही, कारण तो स्वयं-सिद्ध आहे. म्हणून तो त्याचे अस्तित्व समजावून सांगण्याचा कोणताही प्रयत्न करत नाही, कारण आपली मर्यादित मने, वेळ, जागा आणि पदार्थ यांच्या व्यतिरिक्त अस्तित्वात असलेल्या कोणत्याही गोष्टीचे आकलन करण्यास असमर्थ असतात.

एक लहान मुलगा म्हणून, मला आठवते की मी आकाशाकडे पाहत आणि विचार करत असे की मी जर पुरेसा दूरवर प्रवास करू शकलो, तर मी शेवटी एका कमाल मर्यादेपर्यंत जाईन आणि विश्वाचा शेवट होईल. माझ्या काल्पनिक बाजूच्या पलीकडे अंतहीन अवकाश आहे हे समजण्यास मी चुकलो होतो!

निर्माणकर्त्याने जे प्रकट केले आहे त्यावर विश्वास ठेवूनच काही गोष्टी समजू शकतात.

देवाच्या सुसंगत आणि सिद्ध वचनावरील विश्वास ही उच्च बुद्धी आणि ज्ञानाची गुरुकिल्ली आहे.

> *"विश्वासावाचून त्याला संतोषवणे अशक्य आहे; कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की, तो आहे, आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे.....**विश्वासाने आपल्याला कळते** की, देवाच्या शब्दाने विश्वाची रचना झाली, अशी की, जे दिसते ते दृश्य वस्तूंपासून झाले नाही."*
> (इब्री. ११:६, ३)

आधुनिक विज्ञान पुष्टी करते की *"जे दिसते ते दृश्यापासून बनलेले नाही."* भौतिक शास्त्रज्ञ आपल्याला सांगतात की पदार्थ अदृश्य अणूपासून बनलेले आहेत, जे इलेक्ट्रॉनचे बनलेले आहेत, जे प्रोटॉन आणि न्यूट्रॉनपासून बनलेल्या केंद्रकाभोवती फिरतात, जे क्वार्कपासून बनलेले आहेत, जे बनलेले आहेत ...? मानवजातीने खूप काही शोधून काढले आहे, तरीही आपल्याला फार कमी माहिती आहे. जे ज्ञानी असतात ते मानवी बुद्धीच्या मर्यादा ओळखतात.

> *"विश्वाची निर्मिती देवाच्या आज्ञेने झाली" हे विज्ञान कधीच सिद्ध किंवा नाकारू शकणार नाही. आपण हे केवळ आपल्या देवाने दिलेल्या सहाव्या इंद्रियाद्वारेच जाणून घेऊ शकतो : विश्वास.*

*ही जीवनाची महान शीर्षके आणि रहस्ये "विश्वासाद्वारेच* ***आपल्याला कळतात****"*.

*याचे कारण स्पष्ट आहे :*

*"देव मानवाहून थोर आहे."* (ईयोब ३३:१२)

मग या महान व्यक्तीने स्वतःबद्दल आणखी काय प्रकट केले आहे?

**अमर्याद**

तो सर्वशक्तिमान आहे. *"अहा प्रभू परमेश्वरा! पाहा, तू आपल्या महासामर्थ्याने व आपल्या उभारलेल्या बाहूने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली; तुला अवघड असे काही नाही"* (यिर्मया ३२:१७). निर्माणकर्ता त्याच्या निर्मितीच्या पलीकडील आहे. तो आपण कल्पना करू शकत असलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक आणि त्यापलीकडील आहे.

तो सर्व ज्ञानी आहे. *"माझे बसणे व उठणे तू जाणतोस, तू दुरून माझे मनोगत समजतोस"* (स्तोत्र. १३९:२). निर्माणकर्ता सर्वकाही जाणतो-भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ. तो कालांतराने शहाणा होत नाही. *"त्याची बुद्धी* ***अमर्याद*** *आहे.'* (स्तोत्र. १४७:५)

तो सर्वत्र उपस्थित आहे. *"मी तुझ्या आत्म्यापासून कोठे निघून जाऊ? मी तुझ्या समक्षतेपासून कोठे निघून जाऊ?"* (स्तोत्र. १३९:७). अमर्याद एकमात्र हा तुमच्याबरोबर असू शकतो त्याचवेळी तो माझ्याबरोबर आहे. एकाच क्षणी तो स्वर्गातील देवदूतांबरोबर बोलत आहे, तर तो पृथ्वीवरील मनुष्यांबरोबर बोलू शकतो.

तो अमर्याद आहे.

**आत्मा**

या अमर्याद एकमात्रबद्दल येथे आणखी एक महत्वाच्या भागाची माहिती आहे.

*"देव* ***आत्मा*** *आहे."* (योहान ४:२४)

देव हा अदृश्य, अनंत, आणि वैयक्तिक आत्मा आहे जो सर्व ठिकाणी एकाचवेळी उपस्थित असतो. त्याला शरीराची गरज नसली तरी तो स्वतःला जसे निवडतो तसे प्रकट करण्यास सक्षम आणि मुक्त आहे. पवित्र शास्त्र अनेक प्रसंग सांगतात जेव्हा देव स्त्री आणि पुरुषांना अद्वितीय आणि दृश्यमान मार्गांनी प्रकट झाला, *"मित्राशी बोलावे तसे परमेश्वर मोशेशी समोरासमोर बोलत असे...."* (निर्गम ३३:११)

देव जो परम आत्मा याने निर्माण केलेल्या आध्यात्मिक जीवांनी त्यास ओळखावे, विश्वास ठेवावा आणि त्याची उपासना करावी अशी त्याची इच्छा आहे.

*“.....कारण असे आपले उपासक असावेत अशी पित्याची इच्छा आहे. देव आत्मा आहे; आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे.”* (योहान ४:२३-२४)

## आत्म्यांचा पिता

देवाच्या उपाधींपैकी एक म्हणजे *“आत्म्यांचा पिता”* आहे. (इब्री. १२:९)

त्याने पृथ्वी[९५] निर्माण करण्यापूर्वी, देवाने असंख्य लाखो शक्तिशाली, भव्य आत्मिक जीव निर्माण केले ज्यास देवदूत म्हणतात. त्याच्या स्वर्गीय घरात राहण्यासाठी त्याने त्यांना निर्माण केले. देवदूत म्हणजे संदेशवाहक किंवा सेवक. देव, ज्यास प्रेमळ प्रजेचे राज्य असावे असा उद्देश होता ज्यांच्याबरोबर तो अनंतकाळ व्यतीत करू शकेल, ज्यांनी त्यास ओळखावे, उपासना करावी, आज्ञापालन करावे, सेवा करावी आणि त्याचा सदैव आनंद घ्यावा यासाठी त्याने ह्या आत्म्यांना निर्माण केले.

*“तेव्हा मी पाहिले तो राजासन, प्राणी व वडील ह्यांच्याभोवती **अनेक देवदूतांची** वाणी ऐकू आली; आणि त्यांच्या संख्या अयुतांची अयुते व सहस्त्रांची सहस्त्रे होती.”* (प्रकटीकरण ५:११)

सुरुवातीपासूनच, देवाने त्यास पाहिजे तितके देवदूत निर्माण केले, कारण त्यांना पुनरुत्पादनासाठी तयार केलेले नव्हते. हे आत्मे कोणत्याही प्रकारे देवाच्या बरोबरीचे नव्हते, जरी त्यांच्या निर्माणकर्त्यासारखी त्यांची काही वैशिष्ट्ये होती. देवाने त्यांना उच्च दर्जाची बुद्धी दिली. त्याने त्यांना भावना, इच्छाशक्ती आणि त्याच्याशी संवाद साधण्याची क्षमता देखील दिली. त्यांच्या निर्माणकर्त्याप्रमाणे, देवदूत मनुष्याला अदृश्य असतात जोपर्यंत त्यांना एखाद्या सेवाकार्यासाठी पाठवेल जात नाही ज्यामध्ये ते दृश्यमान झाले पाहिजेत.[९६]

निर्मित आध्यात्मिक जीवांच्या त्याच्या राज्यात, देव हाच केवळ असृष्ट, अनंत, सर्वशक्तिमान, सर्वज्ञानी, अमर्याद आत्मा आहे.

## सर्वांवर

*“... आत्मा एकच आहे....प्रभू एकच, ...**सर्वांवर** आणि सर्वांमधून आणि तुम्हा सर्वांच्या ठायी असलेला देव जो सर्वांचा पिता तोही एकच आहे.”* (इफिस. ४:४-६)

जो *“सर्वांवर आहे”* तो काळ आणि अवकाशात मर्यादित नसला तरी विश्वात एक

वास्तविक स्थान आहे जेथे तो राहतो आणि राज्य करतो. *"परमेश्वराने आपले राजासन स्वर्गात स्थापले आहे; त्याचे राज्य सर्वांवर आहे"* (स्तोत्र. १०३:१९). देवाची महानता आणि जवळीक यावर चिंतन करताना, शलमोन राजाने त्याच्या निर्माणकर्त्याला ह्या शब्दात प्रार्थना केली:

> *"देव ह्या भूतलावर खरोखर वास करील काय? आकाश व नभोमंडळ ह्यांत तुझा समावेश होणे नाही;...."* (१ राजे ८:२७)

बायबल तीन वेगवेगळ्या स्वर्गांबद्दल बोलते. दोन माणसाला दिसतात; एक नाही.

वातावरणीय स्वर्ग आहे-आपल्या डोक्यावरील निळे आकाश.

आंतरतारकीय स्वर्ग आहे-काळी जागा जेथे देवाने ग्रह आणि तारे ठेवले आहेत.

आणि नभोमंडळ आहे-तेजस्वी क्षेत्र जेथे देव निवास करतो. आपल्या निर्माणकर्त्याचे स्वर्गीय घर आणि देवदूतांचे क्षेत्र यांना देखील सर्वोच्च स्वर्ग, तिसरा स्वर्ग, पित्याचे घर, त्याचे निवासस्थान, सुखलोक आणि सरळपणे, स्वर्ग म्हणतात.[१७]

> *"परमेश्वर **आकाशातून** पाहतो; सर्व मानवजातीला तो निरखतो. तो **आपल्या निवासस्थानातून** पृथ्वीवर राहणाऱ्या सर्वांना न्याहाळून पाहतो. त्या सर्वांची हृदये घडणारा व त्यांची सर्व कामे जाणणारा तो आहे."* (स्तोत्र. ३३:१३-१५)

## देव एकच आहे

बायबलचे पहिले वचन पुष्टी करते की केवळ एकच देव आहे : *"प्रारंभी **देवाने**."*

पवित्र शास्त्राचे जुना आणि नवीन हे दोन्ही करार घोषित करतात : *"आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे"* (अनुवाद ६:४).

*"देव एकच आहे"* (रोम. ३:३०)

देव एकच आहे.

त्याला स्पर्धा नाही. त्याची बरोबरी नाही.

या तत्वांवरील विश्वासाला एकेश्वरवाद म्हणतात, म्हणजेच केवळ एका देवावर विश्वास. एकेश्वरवाद हा बहुदेववाद (अनेक देवी-देवतांवर विश्वास) आणि सर्वेश्वरवाद (देव सर्वकाही आहे आणि सर्व काही देव आहे असा विश्वास) याच्या विरुद्ध आहे. बहुदेववादी आणि सर्वधर्मवादी निर्माणकर्ता आणि त्याची निर्मिती यांच्यातील फरक पुसट करतात. परिणामी, ते नाकारतात की देव हे चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व आहे.

## जटील

*"प्रारंभी **देवाने**"* हे एक प्राथमिक सत्य आहे, परंतु ते एक साधे सत्य नाही.

अनंत परमेश्वर हा साधा नाही. तो जटील आहे. त्याची एकता ही बहुआयामी एकता आहे.

*"देव"* साठी वापरलेला इब्री शब्द हा पुल्लिंगी अनेकवचनी नाम एलोहीम आहे. इब्री व्याकरणात एकवचनी (एक), दुहेरी (फक्त दोन), आणि अनेकवचनी (तीन किंवा त्यापेक्षा अधिक) नाम प्रकार आहेत. एलोहीम हे व्याकरणाच्यादृष्टीने अनेकवचनी आहे, परंतु त्याचा एकवचनी अर्थ आहे.

एकमात्र सत्य देव हा जटील आणि त्याच्या क्षमतेमध्ये अमर्यादित आहे. पवित्र शास्त्रातील पहिली तीन वाक्ये घोषित करतात :

> *"प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली. आणि पृथ्वी आकारविरहित व शून्य होती, जलनिधीच्या पृष्ठभागावर अंधकार होता आणि देवाचा आत्मा जलावर तळपत राहिला होता. तेव्हा देव बोलला, 'प्रकाश होवो," आणि प्रकाश झाला."*
> (उत्पत्ती १:१-३)

अशा प्रकारे, देवाच्या पुस्तकातील सुरुवातीचे वाक्य आपल्याला सांगते की त्याने निर्मितीचे त्याचे कार्य कसे पूर्ण केले. त्याने ते त्याचा आत्मा आणि त्याच्या वचनाद्वारे पूर्ण केले.

प्रथम, देवाचा स्वतःचा आत्मा स्वर्गातून पाठवला गेला की त्याची आज्ञा पूर्ण करावी. ज्याप्रमाणे एक कबुतर त्याच्या घरटयावर घिरटया घालतो, *"देवाचा आत्मा तळपत राहिला होता"* या नवजात जगावर. *"आत्मा"* साठी रूह हा इब्री शब्द वापरला आहे, जे आत्मा, श्वास, किंवा उर्जा दर्शवते. *"देवाचा आत्मा"* हा देवाच्या स्वतःची उर्जा-देणारी उपस्थिती आहे.

> *"तू आपला आत्मा पाठवतोस तेव्हा ते उत्पन्न होतात...."* (स्तोत्र. १०४:३०)

नंतर, देव बोलला. उत्पत्तीचा पहिला अध्याय दहा वेळा स्पष्ट करते : *"देव बोलला...."* जेव्हा देव बोलला, जे त्याने आज्ञापिले होते ते घडले.

*"परमेश्वराच्या शब्दाने आकाश निर्माण झाले; त्याच्या मुखश्वासाने आकाशातील सर्व सैन्य निर्माण झाले."* (स्तोत्र. ३३:६)

देवाने जगाला त्याचा शब्द आणि त्याच्या आत्म्याने निर्माण केले.

## संवादक

वास्तविकता ही आहे की देवाने सर्वकाही बोलण्याने निर्माण केले हे आपल्याला देवाबद्दल

काहीतरी वेगळे शिकवते :

तो संवाद साधतो.

निर्मितीच्या आधी तेथे संवाद होता.

*"प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता."* (योहान १:१-२)

शब्द हे नाम ग्रीक शब्द लोगॉस पासून येते, त्याचा अर्थ : विचाराचे व्यक्त करणे.[१८] पवित्र शास्त्रात, लोगॉस हे देवाच्या अनेक उपाधींपैकी एक आहे. देव आणि त्याचा शब्द एकच आहे.

सर्व गोष्टी शब्दाद्वारे निर्माण केल्या आहेत.

देवाला केवळ जगाच्या अस्तित्वाचा विचार करता आला असता आणि क्षणार्धात सर्व काही व्यवस्थित आणि कार्यरत झाले असते. पण त्याने तसे केले नाही. त्याने त्याचे विचार व्यक्त केले. तो बोलला.

शब्दाने जगाला सहा सुव्यस्थित दिवसांत अस्तित्वात येण्यासाठी बोलले.

हे कार्य पूर्ण करण्यासाठी सर्वशक्तीमान देवाला सहा दिवसांची आवश्यकता होती का?

नाही, अनंत परमेश्वराला वेळेची आवश्यकता नव्हती. तथापि, अशा प्रकारे, आपले जग निर्माण करून, देवाने केवळ सात दिवसांच्या आठवडयाची स्थापना[१९] केली नाही, तर त्याने आपल्याला त्याच्या व्यक्तिमत्वाची आणि चारित्र्याची माहिती दिली. हे महत्वाचे आहे कारण अज्ञात देवावर विश्वास ठेवणे, त्याच्यावर प्रेम करणे किंवा त्याची उपासना करणे हे सर्व केले जाऊ शकत नाही.

चला आपण आता उत्पत्तीच्या वृत्तांतामधून पाहू, ऐकू आणि शिकू या, जसे निर्माणकर्त्याने स्वतः नोंदवले आहे.

## पहिला दिवस : प्रकाश आणि वेळ-देव पवित्र आहे

*"तेव्हा देव बोलला, 'प्रकाश होवो,' आणि प्रकाश झाला. देवाने प्रकाश पाहिला की तो चांगला आहे; आणि देवाने प्रकाश व अंधकार हे एकमेकांपासून वेगळे केले. देवाने प्रकाशाला 'दिवस' व अंधकाराला 'रात्र' म्हटले; आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा पहिला दिवस."* (उत्पत्ती १:३-५)

पहिल्या दिवशी, देवाने सृष्टीच्या दृश्यावर प्रकाश आणला. त्याने वेळ देखील स्थापित केली, ज्यामुळे पृथ्वीचे २४ तासांचे फिरणे सुरु झाले, खगोलीय घडयाळ जे दिवस व रात्र नियंत्रित करते. अजून देवाने चौथ्या दिवसापर्यंत सूर्य, चंद्र आणि तारे निर्माण केले नव्हते.

एक काळ असा होता की शास्त्रज्ञांनी असा युक्तिवाद केला की सूर्याच्या अस्तित्वापूर्वी प्रकाशाचे अस्तित्व वैज्ञानिकदृष्टया चुकीचे आहे. आता ही स्थिति राहिलेली नाही. आज जे शास्त्रज्ञ देखील सृष्टीच्या नोंदीवर विश्वास ठेवत नव्हते ते मान्य करतात की प्रकाश पृथ्वीच्या सूर्यापूर्वी आणि स्वतंत्र होता.[१००]

पृथ्वीचे प्रकाशवाहक निर्माण करण्याआधी प्रकाश (पहिला दिवस) प्रदान करण्याने, निर्माणकर्ता हे दर्शवत होता की तोच प्रकाशाचा स्त्रोत आहे-भौतिक आणि आध्यात्मिक. त्याच्यावाचून, येथे केवळ अंधार आहे.

पवित्र शास्त्राच्या माध्यमातून जेव्हा आपण मार्गक्रमण करत राहतो, तेव्हा आपण प्रकाशाच्या स्त्रोताशी सतत सामना करणार आहोत, त्याचा शेवट स्वर्गातील अत्युच्च ठिकाणी होईल जेथे देवाच्या लोकांना *''रात्र असणार नाही आणि त्यांना दिव्याची अथवा 'सूर्याच्या प्रकाशाची' गरज नाही; ........''* (प्रकटीकरण २२:५)

अगदी उत्तम ज्ञानी लोकांसाठी देखील प्रकाश एक गूढच आहे. भौतिकशास्त्रज्ञांना ते काय करतात याबद्दल चांगली माहिती आहे, परंतु ते काय आहे याबद्दल फारच कमी माहिती आहे. ते ३००, ००० किलोमीटर (१८६, ००० मैल) प्रती सेकंद वेगाने प्रवास करते. भौतिकशास्त्रात, जेव्हा अल्बर्ट आईन्स्टाइनने E=mc२ (प्रकाशाच्या वर्गाच्या गतीने गुणाकार केलेल्या वस्तुमानाच्या बरोबरीची उर्जा) शोधून काढले तेव्हा अद्भुत आणि भयानक अणु-अणुयुग सुरु झाले. प्रकाश त्याच्या वातावरणामुळे प्रभावित होत नाही. दुर्गंधीयुक्त कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर ते चमकू शकते, परंतु प्रकाश स्वतः शुद्धच राहतो. प्रकाश अंधारासह एकत्र राहू शकत नाही. प्रकाश ते दूर करतो.

देव, प्रकाशाचे स्त्रोत, हा परम निरपेक्ष आहे. त्याचे विलक्षण वैभव त्याच्या सान्निध्यात राहण्यास सुसज्ज नसलेल्या कोणत्याही सजीवासाठी भयंकर आहे.

देव शुद्ध आणि पवित्र आहे.

शब्द पवित्र म्हणजे : एका प्रकारचा, वेगळा केलेला, किंवा दुसरा. देव दुसरा आहे. त्याच्यासारखा कोणी नाही. स्वर्गातील त्याच्या दिव्य राजासनाभोवती असलेले देवदूत सतत म्हणत आहेत, *''पवित्र, पवित्र, पवित्र सेनाधीश परमेश्वर!''* (यशया ६:३). पवित्रता हे देवाचे एकमात्र गुणवैशिष्टय आहे जे पवित्र शास्त्रात तीनच्या गटात घोषित केले गेले आहे- त्यावर जोर देण्यासाठी. तो पवित्र आहे, *''तो अगम्य प्रकाशात राहतो.''* (१ तीमथ्य. ६:१५)

देव वाईटाबरोबर एकत्र राहू शकत नाही. तो प्रकाश अंधारापासून वेगळा करतो. फक्त शुद्ध आणि धार्मिक जीवच त्याच्यासोबत राहू शकतात.

*“...**देव प्रकाश आहे** आणि त्याच्या ठायी मुळीच अंधार नाही. त्याच्याबरोबर आपली सहभागीता आहे असे जर आपण म्हणत असलो, पण अंधारात चालत असलो तर आपण खोटे बोलतो, सत्याने वागत नाही.”* (१ योहान १:५-६)

सृष्टी निर्मितीचा पहिला दिवस देव **पवित्र** आहे हे घोषित करतो.

## दुसरा दिवस : हवा आणि पाणी- देव सर्वशक्तिमान आहे

*“मग देव बोलला, ‘जलांच्या मध्यभागी अंतराळ होवो, व ते जलांना दुभागणारे होवो.’ असे देवाने अंतराळ केले आणि अंतराळाखालच्या व वरच्या जलांना वेगळे केले आणि तसे झाले. देवाने अंतराळाला ‘आकाश’ म्हटले; आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा दुसरा दिवस.”* (उत्पत्ती १:६-८)

सृष्टी निर्मितीचा दुसरा दिवस दोन घटकांवर लक्ष केंद्रित करतो ज्यावर सर्व सजीव अवलंबून असतील : हवा आणि पाणी.

अंतराळसाठी इब्री शब्द आपल्या डोक्यावरील विशाल कमानला संबोधते, ज्यामध्ये ढग ठेवलेले आहे आणि वातावरण ज्यात तारे दिसतात. वातावरणातील ऑक्सिजन आणि नायट्रोजन, पाण्याची वाफ आणि कार्बन डायऑक्साइड, ओझोन आणि बरेच काही यासारख्या वायूंच्या पूर्णपणे संतुलित रचनांचा विचार करा. मिश्रण बदला आणि आपण मृत आहोत. तो काय करत होतो ते देवाला ठाऊक होते.

आपल्या वरच्या वातावरणात ट्रिलीयन टन पाण्याच्या वाफांचा विचार करा. जीवनासाठी आवश्यक असलेले हे जड, नाजूक मिश्रण तयार करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी कोणत्या प्रकारचे शहाणपण आणि शक्ती आवश्यक होती-फक्त बोलण्याने?

*“**कारण तो बोलला, आणि अवघे झाले**; त्याने आज्ञा केली आणि सर्वकाही स्थिर झाले.”* (स्तोत्र. ३३:९)

सृष्टी निर्मितीच्या इतर प्रत्येक दिवसासारखे, दुसरा दिवस आपल्याला आपला निर्माणकर्ता **सर्वशक्तिमान** आहे याची आठवण देतो.

## तिसरा दिवस : समुद्र, भूमी आणि वनस्पती-देव चांगला आहे

*“मग देव बोलला, ‘आकाशाखालच्या जलांचा एका ठिकाणी संचय होवो, व कोरडी जमीन दृष्टीस पडो; आणि तसे झाले. ......देवाने पाहिले की हे चांगले आहे. तेव्हा देव*

*बोलला, 'हिरवळ, बीज देणारी वनस्पती आणि आपापल्यापरी सबीज फळे देणारी फळझाडे भूमी आपल्यावर उपजवो; आणि तसे झाले. ...... देवाने पाहिले की हे चांगले आहे."* (उत्पत्ती १:९-१२)

तिसऱ्या दिवशी देवाने समुद्रापासून भूमीला वेगळे केले आणि सर्व हिरवळीला अस्तित्वात येण्यासाठी बोलले. *" आणि देवाने पाहिले की हे चांगले आहे."* त्याने आपल्या ग्रहावर योग्य प्रमाणात द्रव पाणी ठेवले. त्या दिवसापासून त्याला कधीही त्यात भर घालण्याची गरज पडली नाही.[१०१]

देवाने प्रत्येक रोपाची आणि झाडाची रचना बियाणे आणि *"त्याच्या प्रकारानुसार"* भाजीपाला किंवा फळे उत्पन्न करण्यासाठी केली आहे. देवाने हे सर्व अन्न का बनवले. त्याने ते बनवले कारण त्याने *"पृथ्वी घडवली.....तिच्यात लोकवस्ती व्हावी"* (यशया ४५:१८). आपल्या सूर्यमालेत पृथ्वी ही अद्वितीय आहे. जीवन टिकवून ठेवण्यासाठी आणि समृद्ध करण्यासाठी तयार केलेला हा एकमेव ग्रह आहे.

उदाहरणार्थ विचार करा, वनस्पतींपासून जे लाभ आपण प्राप्त करतो : अत्यावश्यक ऑक्सिजन, पौष्टिक भाज्या, स्वादिष्ट फळे, ताजेतवाने करणारी सावली, उपयुक्त लाकडू, आवश्यक औषधे, रंगीबेरंगी, सुवासिक फुले, सुंदर निसर्गचित्रे आणि बरेच काही.

जेव्हा अन्नाचा विचार केला जातो, तेव्हा देव आपल्यासाठी केळी, सोयाबीन आणि तांदूळ यासारख्या काही गोष्टी बनवू शकतो. त्यावर आपण जगू शकतो. पण देवाने तसे केले नाही. शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे की आपल्या पृथ्वीवर दोन दशलक्ष प्रकारच्या वनस्पती अन्न व चारा यासाठी वापरल्या जातात.

उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायात, देवाने सात वेळा घोषित केले की त्याची निर्मिती *"चांगली"* होती. संपूर्ण पवित्र शास्त्रात सात अंक परिपूर्णता दर्शवतो. जे सर्वकाही देवाने निर्माण केले ते पूर्णपणे चांगले होते.

याचे कारण की तो पूर्णपणे चांगला आहे.

*"....देव आपणांस उपभोगासाठी सर्वकाही विपुल देतो..."* (१ तीमथ्य. ६:१७)

तिसरा दिवस आपल्याला देव **चांगला** आहे हे शिकवतो.

## चौथा दिवस : स्वर्गीय दिवे-देव विश्वासू आहे

*"मग देव बोलला, 'दिवस व रात्र ही भिन्न करण्यासाठी आकाशाच्या अंतराळात ज्योती होवोत; त्या चिन्हे, ऋतू, दिवस व वर्षे दाखवणाऱ्या होवोत. ......मग देवाने दोन मोठया ज्योती केल्या; दिवसावर प्रभुत्व चालवण्यासाठी मोठी ज्योत आणि रात्रीवर प्रभुत्व चालवण्यासाठी लहान ज्योत; आणि त्याने तारेही केले."* (उत्पत्ती १:१४-१६)

चौथा दिवस देव सुवस्थेचा म्हणून प्रकट करतो. हा तो एकमात्र आहे *"जो दिवसा प्रकाशासाठी सूर्य देतो व रात्री प्रकाशण्यासाठी चंद्र व नक्षत्रे ह्यांचे नियम लावून देतो,...."* (यिर्मया ३१:३५). रात्री, ताऱ्यांचा सुव्यस्थित क्रम जमिनीवरील आणि समुद्रावरील प्रवाशांसाठी एक विश्वसनीय नकाशा प्रदान करतो. दिवसा, सूर्य विश्वसनीयरित्या दिवस व वर्षे घडवून आणतो. चंद्र महिन्यांचे आणि भरतीचे नियमन करतो.

सूर्य आणि ताऱ्यांप्रमाणे पृथ्वीचा चंद्र ज्याने तो बनवला आहे त्याच्या विश्वसनीयतेची सतत साक्ष देतो. देवाने चंद्राला *"आकाशातील विश्वसनीय साक्षीदार"* म्हटले आहे (स्तोत्र. ८९:३७). पृथ्वीवरून प्रत्येक ठिकाणाहून, चंद्र ग्रह सतत पृथ्वीकडे तोंड करतो, त्याची मागील बाजू कधीही उघड करत नाही.[१०२] घड्याळयाच्या अचूकतेसह ते मोठे आणि लहान होते. चंद्र विश्वासू आहे कारण ज्या परमेश्वराने त्याला बनवले आहे तो विश्वासू आहे.

कारण देव विश्वासू आहे, म्हणून असे काहीतरी आहे जे तो करू शकत नाही. तो त्याच्या स्वतःच्या स्वभावाविरुद्ध जाऊ शकत नाही, किंवा तो त्याच्या स्वतःच्या नियमांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. *"तो विश्वासू राहतो; तो स्वतःला नाकार करू शकत नाही.....खोटे बोलणे देवासाठी अशक्य असे आहे"* (२ तीमथ्य. २:१३; इब्री. ६:१८). अनेक लोक विचार करतात देव इतका *"महान"* आहे की तो त्याच्या स्वतःच्या चारित्र्याच्या विरोधातील गोष्टी करू शकतो, किंवा त्याच्या शब्दापासून मागे वळू शकतो. ही देवाची महान व्याख्या नाही.

चंचलपणा हा त्याच्या चारित्र्याचा भाग नाही-विश्वासूपणा आहे. ग्रह आणि नक्षत्रांच्या सुव्यस्थित क्रमाप्रमाणे आपला निर्माणकर्ता-पालनकर्ता विसंबून राहण्याजोगा आहे.

तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू शकता.

*"प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे; ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून ते उतरते."* (याकोब १:१७)

सृष्टी निर्मितीचा चौथा दिवस देव **विश्वासू** आहे याची साक्ष देतो.

**पाचवा दिवस : मासे आणि पक्षी- देव जीवन आहे.**

पाचव्या दिवशी, त्याच्या अनंत ज्ञानात आणि शक्तीमध्ये, देवाने समुद्र व आकाशात राहण्यासाठी प्रत्येक प्रकारचे सृष्ट जीव निर्माण केले, त्यांना त्यांच्या एकमेव वातावरणात प्रभावीपणे संचार करण्यास सुसज्ज केले-पाण्यातील मासे त्यांचे कल्ले आणि पंखांसह आणि हवेतील पक्ष्यांना त्यांची पंखे आणि नरम हाडांसह बनवले.

*"मग देव बोलला, 'जीवजंतूंच्या थव्यांनी जले भरून जावोत आणि पृथ्वीवरून आकाशाच्या अंतराळात पक्षी उड्डाण करोत. प्रचंड जलचर, जलांत गजबजणारे व संचार करणारे प्रत्येक जातीचे सर्व जीव आणि प्रत्येक सपक्ष प्राणी देवाने निर्माण केले; देवाने पाहिले की हे चांगले आहे. ....."* (उत्पत्ती १:२०-२१)

शब्द लक्षात घ्या, *"जलांत गजबजणारे व संचार करणारे प्रत्येक जातीचे सर्व जीव होवोत."* संघटीत म्हणजे *" गर्दी करून, गजबजलेले"*. सुक्षजीवशास्त्रज्ञ आपल्याला सांगतात की तलावाच्या पाण्याच्या एका थेंबामध्ये लाखो सजीव सूक्ष्मजीव असू शकतात आणि ते काही मोठया प्राण्यांइतकेच जटील आहेत. महासागरातील सर्वात मोठा प्राणी, निळा व्हेल, संपूर्णपणे समुद्रात तरंगणाऱ्या वनस्पती आणि प्राणी यांवर जगतो.

महासागर हा देवाच्या जिवंत चमत्कारांचा एक मोठा संग्रह आहे.

आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांच्या आश्चर्यकारक वर्गीकरणाबद्दलही असेच म्हणता येईल.

हे शब्द देखील विचारात घ्या, *"त्यांच्या प्रकारानुसार"." हे वाक्य उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायात दहा वेळा वारंवार आलेले आहे, जे प्रत्येक प्रकारच्या सजीवांच्या स्थिरतेची घोषणा करते. जीवनाच्या लेखकाने असा निर्णय दिला की प्रत्येक वनस्पती आणि प्राण्याने* "त्याच्या प्रकारानुसार" *पुनरुत्पादन केले पाहिजे. उत्क्रांतीची मानवाची परिकल्पना या अपरिवर्तनीय नैसर्गिक नियमाच्या विरुद्ध आहे. प्रत्येक प्रकारच्या जिवंत प्राण्यांमध्ये भिन्नता, उत्परिवर्तन आणि अनुकूलन असू शकते, तरी निर्मात्याने निश्चित केलेल्या विशिष्ट मर्यादेपलीकडे कोणीही* "उत्क्रांत" होऊ शकत नाही. जीवाश्म ही त्याची प्रत्यक्ष साक्ष आहे.

जीवन नावाच्या अद्वितीय उर्जेचा स्त्रोत आणि पालनकर्ता एकमात्र देव आहे. त्याच्याशिवाय फक्त मृत्यू आहे.

*''सर्वकाही त्याच्या द्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही.* ***त्याच्या ठायी जीवन होते***, *व ते जीवन मनुष्यमात्राचा प्रकाश होते.''* (योहान १:३-४)

पाचव्या दिवशी निर्माण केलेल्या जिवंत प्राण्यांची विपुलता आपल्याला शिकवते की देव **जीवन** आहे.

## सहावा दिवस : प्राणी आणि माणूस-देव प्रीती आहे

सहाव्या दिवसाच्या सुरुवातीला निर्माणकर्त्याने हजारो आकर्षक सस्तन प्राणी, सरपटणारे प्राणी आणि कीटक तयार केले.

*''असे प्रत्येक जातीचे वनपशू, ग्रामपशू, व जमिनीवर रांगणारे जीव देवाने निर्माण केले; देवाने पाहिले की हे चांगले आहे.''* (उत्पत्ती १:२५)

देवाने त्या सर्वांना बनवले, काही मोठे आणि काही लहान, प्रत्येकाला जगण्यासाठी आणि नैसर्गिक जगामध्ये योगदान देण्यासाठी आवश्यक असलेले अंतर्ज्ञानी ज्ञान दिले, प्रत्येक जण त्याच्या स्वतःच्या प्रतीरुपात संतती उत्पन्न करतो, प्रत्येक आपल्या पिल्लांची काळजी घेतो.

जेव्हा देवाने प्राण्यांचे साम्राज्य  निर्माण केले तेव्हा ते *''चांगले होते.''* अद्याप घटनास्थळी कोणतेही वाईट किंवा रक्तपात झाला नव्हता. प्राण्यांची रचना शाकाहारी आहारावर जगण्यासाठी केली होती. देवाने म्हटले, *''पृथ्वीवरील सर्व पशू, आकाशातील सर्व पक्षी व पृथ्वीवर संचार करणारे सर्व जीवधारी प्राणी ह्यांना अवधी हिरवळ खाण्यासाठी देतो' आणि तसे झाले''* (उत्पत्ती १:३०). प्राण्यांना प्राणी खाण्याची अन्न-साखळी नव्हती. शत्रुत्व आणि भीती अज्ञात होती. देवाचा दयाळूपणा प्रत्येक गोष्टीत दिसून आला. सिंह कोकराच्या शेजारी चरत असे आणि मांजर आणि पक्षी एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेत असत. जग पूर्णपणे शांततेचे ठिकाण होते.

देवाने प्राण्यांची निर्मिती पूर्ण करण्याचे संपविल्यावर, आता त्याचा उत्कृष्ट नमुना तयार करण्याची वेळ आली : पुरुष आणि स्त्री. देवाकडे एक योजना होती ज्याद्वारे मानव एक गौरवशाली, आनंदी आणि सार्वकालिक प्रेमाच्या राज्यात त्याची समर्पित प्रजा बनतील.

आपल्या निर्माणकर्त्यासाठी, प्रेम जे तो करतो त्यापेक्षा जास्त आहे. प्रेम म्हणजे तो जे आहे.

*''देव प्रीती आहे.''* (१ योहान ४:८)

सहाव्या दिवशी देवाची क्रियाशील कृती घोषित करते की तो **प्रीती** आहे.

**"चला आपण"**

देव प्रीती आहे कारण त्याने त्यांच्यासाठी एक सुंदर जग निर्माण केले जे त्याच्या प्रेमाचे ध्येय आणि प्राप्तकर्ते बनले होते. आणि म्हणून, अजूनही सहाव्या दिवशी :

> *"मग देव बोलला, आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू...."* (उत्पत्ती १:२६)

थांबा! एक मिनिट थांबा! ते काय होते? देवाने खरेच असे म्हटले का, *"**आपल्या** प्रतिरूपाचा मनुष्य **आपण** करू"*?

कारण देव एकच आहे, तर *"आपण"* हा कोण आहे?
तो कोणाशी बोलत होता?



# धडा ९

# त्याच्यासारखे कोणीही नाही

*"तुमचा देव परमेश्वर हा देवाधिदेव, ....**महान, पराक्रमी व भययोग्य देव** आहे..."*

- संदेष्टा मोशे (अनुवाद १०:१७)

**चेतावणी** : प्रवासाचा हा पुढचा टप्पा प्रवाशांना त्यांच्या आरामदायक क्षेत्रातून बाहेर घेऊन जाईल. मनाला ताण पडेल आणि हृदयाची परीक्षा होईल. परंतु जे लोक या विभागातून जातील ते सर्व पुढे उरलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सुसज्ज असतील.

## देव देव आहे

आपल्यापैकी बहुतेकांचा असा विश्वास आहे की आपण स्वाभाविकरित्या तो काय आहे अशी कल्पना करतो त्यापेक्षा देव महान आहे

आपल्या प्रामाणिकपणाची परीक्षा होणार आहे.

सृष्टी निर्मितीच्या सहाव्या दिवशी, देवाने प्राण्यांच्या साम्राज्याला बनवणे संपविल्यावर, त्याने म्हटले : *"आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू."* (उत्पत्ती १:२६)

पुढील धडयात, देवाचे स्वरूप आणि समानता प्रतिबिंबित करण्यासाठी मूळ पुरुष आणि स्त्री बनवलेल्या काही मार्गांवर आपण विचार करू, परंतु प्रथम दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे.

कारण देव एकच आहे, तर त्याने असे का म्हटले, *"**आपण** आपल्या ....करू...?"* त्याने असे का घोषित केले नाही, *"मी मनुष्याला **माझ्या** स्वरूपात आणि **माझ्या** सदृश बनवेन?"* देव

कधीकधी स्वतःला आपण, आमचे आणि आम्ही असे का संबोधतो?[१०३]

काही विचार करतात की देवाचा *"आपण"* आणि *"आपल्या"* या शब्दांचा वापर हा *"भव्यतेचे अनेकवचन"* आहे, जसे जेव्हा एक राजा जो स्वतःबद्दल *"आम्ही"* म्हणून बोलतो. देव सामर्थ्यात आणि वैभवात अतुलनीयपणे भव्य आहे, इब्री व्याकरण या स्पष्टीकरणासाठी कोणताही ठोस आधार प्रदान करत नाही.

दुसरे विश्वास ठेवतात देव देवदूतांना बोलत आहे जेव्हा त्याने म्हटले, *"आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू"* जरी त्या वचनात देवदूतांचा उल्लेख केलेला नाही, तरी मनुष्याला देवदूताच्या प्रतिरूपात बनवलेले नाही.

पवित्र शास्त्राच्या सरळपणे वाचनातून आणि व्याकरणाच्या छाननीतून काय स्पष्ट होते ते म्हणजे आपल्या निर्माणकर्त्याने स्वतःचे वर्णन अनेकवचनी तसेच एकवचनी पद्धतीने करणे निवडले.

> ***अनेकवचनी*** *: देवाने म्हटले, **"आपल्या** प्रतिरूपाचा व **आपल्याशी** सदृश असा मनुष्य आपण करू."*
>
> ***एकवचनी*** *: "देवाने **आपल्या प्रतिरूपाचा** मनुष्य निर्माण केला."* (उत्पत्ती १:२६-२७)

देवाचे स्वतःबद्दल अनेकवचनी आणि एकवचनी असे दोन्हीही वर्णन हे तो कोण आहे आणि कोणासोबत तो नेहमीच होता याशी सुसंगत आहे.

देवाच्या एकत्वाची जटीलता आणि विशालता अनेक लोकांच्या *"परमेश्वराच्या"* वरवरच्या व्याख्येच्या पलीकडे आहे.

देव देव आहे.

> *"...अनादिकालापासून अनंतकालापर्यंत **तू देव आहेस.**"* (स्तोत्र. ९०:२)

## देवाची जटील एकता

देवाच्या पुस्तकाचा आरंभ ह्या शब्दांनी होतो :

> *"प्रारंभी **देवाने** [एलोहीम-पुल्लिंगी अनेकवचनी नाम] उत्पन्न केले [एकवचनी क्रियापद संयोजन].... आणि **देवाचा आत्मा** पाण्याच्या पृष्ठभागावर तळपत होता. मग **देव बोलला**, 'प्रकाश होवो; आणि प्रकाश झाला."*[१०४]

देवाने सर्व गोष्टींना त्याचा शब्द आणि त्याच्या आत्म्याने निर्माण केले.

*"परमेश्वराच्या शब्दाने आकाश निर्माण झाले; त्याच्या मुखश्वासाने आकाशातील सर्व सैन्य निर्माण झाले."* (स्तोत्र. ३३:६)

**त्याचा शब्द**

ज्यांना त्यांच्या निर्माणकर्त्याच्या जटील स्वरूपाविषयी जाणून घ्यायचे आहे त्यांच्यासाठी पवित्र शास्त्र पुरेशी माहिती पुरवते. उदाहरणार्थ, योहानकृत शुभवर्तमान या शब्दांनी उघडते :

*"प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. सर्वकाही त्याच्या द्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही."* (योहान १:१-३)

जसे आपण मागील धडयात विचार केला आहे, शब्द हे देवाच्या अंतर्मनातील विचारांचे बाह्य व्यक्त करणे आहे. जसे तुम्ही तुमचे विचार आणि शब्दासह एक आहात, तसेच देव त्याच्या शब्दासह एक आहे. शब्दाला *"देवासह"* (त्याच्यापासून वेगळा) आणि *"देव"* (त्याच्यासह एक) असे दोन्हीही घोषित केले आहे.

असे निरीक्षण करणे देखील साहाय्यक आहे की व्यक्तिगत नाम *"तो"* आणि *"त्याचे"* यांचा वापर केला जातो जेव्हा शब्दाला संबोधतात.

**त्याचा आत्मा**

ज्याप्रमाणे परमेश्वर देव त्याच्या वचनाचे विशिष्ट, वैयक्तिक पद्धतीने वर्णन करतो, त्याचप्रमाणे त्याच्या आत्म्याचे वर्णनही तितकेच वैयक्तिक आहे.

*"तू **आपला आत्मा** पाठवतोस तेव्हा ते उत्पन्न होतात, व तू पृथ्वीचा पृष्ठभाग पुन्हा नवा करतोस."* (स्तोत्र. १०४:३०)

*"**त्याच्या नि:श्वासाने** आकाशाची शोभा प्रकट होते."* (ईयोब २६:१३)

*"मी तुझ्या आत्म्यापासून कोठे निघून जाऊ? मी तुझ्या समक्षतेपासून कोठे पळून जाऊ?"* (स्तोत्र. १३९:७)

*"पवित्र आत्मा तुम्हांला सर्वकाही शिकवील..."* (योहान १४:२६)

शब्दाप्रमाणे (ज्याने सृष्टी निर्मिती होण्यास बोलले), पवित्र आत्मा (ज्याने शब्दाची आज्ञा पूर्ण केली) हे परिपूर्णपणे देवासोबत एक आहेत.

## देव महान आहे

बहुतेक एकेश्वरवाद्यांना दावीद राजाच्या नमूद केलेल्या प्रार्थनांपैकी या उताऱ्याशी सहमत होण्यास कोणतीही अडचण नाही : *"ह्यास्तव हे प्रभू परमेश्वरा, तू थोर आहेस; जे काही आम्ही आमच्या कानांनी आजवर ऐकले आहे त्यावरून पाहता तुझ्यासमान कोणी नाही; तुझ्याशिवाय अन्य देव नाही."* (२ शमुवेल ७:२२)

तरीही पुष्कळ लोक त्वरित पुष्टी करतात *"देव महान आहे! देव देव आहे, त्याच्यासारखा कोणी नाही!"* तेच लोक देव अनेकवचनी तरीही एकवचनी स्वरूपाच्या देवाच्या स्वतःच्या प्रकटीकरणाचा नाकार करण्यास तितकेच तत्पर आहेत.

कारण *"त्याच्यासारखा कोणीही नाही,"* तेव्हा सर्वशक्तिमान देवाने स्वतःला स्वाभाविकपणे कल्पनेपेक्षा मोठे आणि अधिक जटील असल्याचे प्रकट केले तर आपल्याला आश्चर्य वाटले पाहिजे का? देव आपल्याला त्याच्याबद्दल योग्य विचार करण्यास आग्रह करतो.

> *"...मी तुझ्यासारखा आहे असे तुला वाटले; तथापि मी तुझा निषेध करीन."* (स्तोत्र. ५०:२१)

## देव एकच आहे

परंपरानिष्ठ यहूदी नियमितपणे इब्री भाषेमध्ये शेमा म्हणून ओळखल्या जाणारी प्रार्थना वारंवार म्हणतात, ज्यामध्ये असे म्हटले आहे : *"अदोनाय एलोहीयेनु, अदोनाय **एकाद**,"* म्हणजे, *"आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे."* ही प्रार्थना तोरा मधून आहे : *"हे इस्राएला, श्रवण [शेमा] कर : आपला देव परमेश्वर [याव्हे] हा **अनन्य** [एकाद] परमेश्वर आहे!"* (अनुवाद ६:४)

देवाच्या एकतेचे वर्णन करण्यासाठी वापरलेला इब्री शब्द एकाद आहे. एक जटील एकतेचे वर्णन करण्यासाठी या शब्दाचा अनेकदा वापर केला आहे, जसे द्राक्षांचा पुंजका. पवित्र शास्त्रात इतरत्र, एकादचा एक कप्तान आणि त्याच्या सैनिकाला उद्देशून *"एक संच"* म्हणून अनुवाद केला आहे.[१०५] पुढील धडयात, हा शब्द पुन्हा दिसेल जेव्हा पहिला पुरुष आणि त्याची पत्नी एकाद होतील, म्हणजे, *"एक देह"* (उत्पत्ती २:२४). इतर वचनांकडे पाहत असताना ज्यामध्ये हाच शब्द वापरला आहे तेव्हा हे स्पष्ट होते की देवाने त्याच्या एकतेचे वर्णन करण्यासाठी जो शब्द वापरला

आहे त्यामध्ये एकापेक्षा अधिक अस्तित्व समाविष्ट आहे.

जुन्या करारामध्ये देवाच्या अनेकवचनी एकतेचा संकेत देणारी आणि पुष्टी करणारी अनेक वचने आहेत.[१०६] येथे एक उदाहरण आहे:

*"प्रारंभापासून.....तेथे मी आहेच....आणि आता प्रभू परमेश्वराने मला व आपल्या आत्म्याला पाठवले आहे."* (यशया ४८:१६)

*"प्रभू परमेश्वर"* कोण आहे?

"त्याचा आत्मा' कोण आहे?

*"मी"* हा कोण आहे जो तेथे प्रारंभापासून आहे आणि प्रभू परमेश्वर आणि त्याच्या आत्म्याने*" पाठवलेला* "मी" कोण आहे?

या प्रश्नांची उत्तरे स्पष्टपणे दिली जातील जेव्हा आपण पवित्र शास्त्राच्या माध्यमातून विचार करू.

## त्रि-एकता ज्यावर आपण सहमत आहोत

आपला इंग्रजी शब्द एकता हा लॅटीन उनुस पासून येतो, ज्याचा अर्थ एक. देवाच्या शाश्वत त्रि-एकतेच्या कल्पनेचा बहुतेक लोक नकार करत असताना, आपल्या दैनंदिन जीवनात एका मध्ये त्रि-एकता नाकारण्याचे धाडस काही जण करतात.

उदाहरणार्थ, भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळसह **वेळ** एक प्रकारची त्रि-एकता बनवते.

अंतराळात उंची, लांबी आणि रुंदी आहे.

**एक मानव** हा आत्मा, जीव आणि शरीराने बनलेला आहे.

**एक पुरुष** हा पिता, पुत्र आणि पती असू शकतो.

**सूर्य** देखील एक त्रि-एकता आहे. जरी पृथ्वीला एकच **सूर्य** आहे, तरीही खगोलीय पिंडाला **सूर्य,** त्याचा प्रकाश **सूर्य** आणि त्याची उष्णता **सूर्य** म्हणतो.

ते तीन सूर्य बनवतात का? नाही. सूर्य तीन नाहीत, परंतु एकच आहे. सूर्य एकच आणि एक त्रि-एकता यामध्ये येथे कोणताही विरोधाभास नाही. तसेच हे देवासोबत आहे. जसे प्रकाश आणि सूर्याची उष्णता हे सूर्यापासून निघतात, तसेच देवाचे वचन आणि देवाचा आत्मा देवापासून निघतात. तरीही ते एकच आहेत, जसे सूर्य एकच आहे.

अर्थातच, पृथ्वीवरील सर्व उदाहरणे एका सत्य देवाच्या जटीलतेचे पुरेसे स्पष्टीकरण देण्यात

अपुरे पडतात. सूर्याच्या विपरीत, तो एक प्रेमळ, वैयक्तिक, जाणणारा जीव आहे. असे असले तरी, अशा उदाहरणांनी आपल्याला समान भूमिकेकडे नेले पाहिजे कारण सृष्टीमध्ये त्रि-एकता अस्तित्वात आहे यावर सर्व सहमत आहेत.

*"कारण ज्या मानाने घर बांधणाऱ्याला सबंध घरापेक्षा अधिक सन्मान आहे त्या मानाने हा मोशेपेक्षा अधिक वैभवास योग्य गणलेला आहे. कारण प्रत्येक घर कोणीतरी बांधलेले असते; पण सर्वकाही बांधणारा देवच आहे."* (इब्री. ३:३-४)

जर देवाची निर्मिती ही जटील एकतेने भरलेली आहे, तर देव स्वतः एक जटील एकता आहे याचे आपल्याला आश्चर्य वाटले पाहिजे का? जर, आपल्या सर्व वैज्ञानिक ज्ञानासह, आपण ज्या जगात राहत आहोत त्याबद्दल आपण पूर्णपणे स्पष्टीकरण देऊ शकत नाही, तर ज्याने ते निर्माण केले त्याला आपण किती कमी समजावून सांगू शकतो?

देव देव आहे.

*"देवाच्या रहस्याचा तुला थांग लागेल काय? सर्वसमर्थाच्या पूर्णतेचे तुला आकलन होईल काय? ते गगनाइतके उंच आहे, तेथे तुझे काय चालणार? ते अधोलोकाहून खोल आहे, तुला ते काय कळणार? त्याचे परिमाण म्हटले तर ते भूगोलाहून लांब व समुद्राहून रुंद आहे."* (ईयोब ११:७-९)

जेव्हा आपण *"देवाच्या रहस्यांचा"* शोध घेतो तेव्हाच आपल्याला त्याच्या शाश्वत स्वरूपातील सर्वात आश्चर्यकारक गुणधर्मांपैकी एक शोधण्याचा आणि अनुभवण्याचा विशेषाधिकार मिळेल :

***"देव प्रीती आहे."*** (१ योहान ४:८)

## देवाने कोणावर प्रेम केले?

देवाचे प्रेम हे एक अनाकलनीय गाढ स्नेह आहे जे त्याच्या पित्याच्या हृदयातून वाहते आणि स्वतःला व्यवहारिक मार्गांनी व्यक्त करते.[१०७] कारण देव प्रेम आहे, त्याचे प्रेम प्राप्तकर्त्याच्या प्रेमळपणावर अवलंबून नाही.

*"आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतीदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच..."* (१ योहान ३:१)

येथे काहीतरी आहे ज्याबद्दल विचार करावा. प्रेमाला प्राप्तकर्त्याची आवश्यकता लागते. *"मी प्रेम करतो"* एवढेच केवळ मी बोलत नाही. परंतु "मी माझ्या पत्नीला प्रेम करतो, माझ्या मुलाबाळांना प्रेम करतो, माझ्या शेजाऱ्यांना प्रेम करतो, इत्यादी, मी बोलू शकतो.

प्रेम उद्दीष्टाची मागणी करते.

देवाने त्याच्या प्रीतीचे उद्दीष्ट म्हणून विशेष जिवंत जीवाची निर्मिती करण्याअगोदर **त्याने कोणावर प्रेम केले?** देवदूत आणि लोकांना निर्माण करण्याची त्यास आवश्यकता होती का? नाही, आपला निर्माणकर्ता स्वयंपूर्ण आहे. त्याने आध्यात्मिक जीव आणि मानव जीवांना निर्माण केले यासाठी नाही की त्यास त्यांची आवश्यकता होती, परंतु यासाठी की त्यांस ते हवे होते. फरक आह महत्वपूर्ण आहे.

जसे आपण अगोदरच शिकले आहे : **देव बोलतो.**

बोलणे हे नातेसंबंधाच्या संदर्भातच केवळ अर्थपूर्ण मार्गाने अस्तित्वात असू शकते. देवाने देवदूत आणि मानव निर्माण करण्याअगोदर **कोणासोबत तो बोलला?** त्याचे वचन कोणीतरी समजावे यासाठी त्याला इतर जीवांना निर्माण करण्याची आवश्यकता होती का? नाही, देवाच्या सर्व *"आवश्यकता"* ह्या त्याच्यामध्येच आहेत. त्याला कशाचीही आवश्यकता नाही. देव आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण आहे. तरीही त्याने बोलावे आणि त्याच्याशी बोलावे, त्याने प्रेम करावे आणि त्याजवर प्रेम करावे अशी इच्छा त्याच्या स्वभावाचा भाग आहे.

हे आपल्याला दुसऱ्या सत्याकडे नेते : **देव संबंधात्मक आहे.**

प्रेम आणि बोलणे हे एका अर्थपूर्ण मार्गाने फक्त नातेसंबंधाच्या संदर्भातच अस्तित्वात असू शकते. देवाने इतर जीवांना निर्माण करण्याअगोदर कोणासोबत नातेसंबंधाचा आनंद घेतला?

उत्तर हे देवाच्या जटील एकतेमध्ये रुजलेले आहे.

सार्वकालिकतेमध्ये, त्याने देवदूत किंवा मनुष्याला निर्माण करण्याअगोदर, आपल्या संबंधात्मक देवाने स्वतःसोबतच -त्याच्या वैयक्तिक वचनात आणि वैयक्तिक आत्म्यात- प्रेम आणि संभाषणाच्या समाधानी आणि घनिष्ठ नातेसंबंधाचा आनंद घेतला.

## थर सोलणे

देवाच्या अनेकवचनी आंतरवैयक्तिक स्वरूपाविषयी अशा गहन विचारांच्या प्रतिसादात, एका ई-मेल वार्ताहराने लिहिले :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

तो केवळ एकच आहे हे आपल्याला सांगण्यासाठी देवाने संदेष्टे पाठविले. तर मग तुम्ही त्याचे वचन का ऐकत नाही आणि त्याचे स्वीकारत नाही? तुम्हांला **प्रत्येक थर सोलून त्यांना एक-एक करून** ओळखण्याची गरज का आहे जेव्हा तुम्ही त्यांना फक्त एक म्हणून एकत्र करू शकता?

हे खरे असले तरी आपल्या अनंत निर्माणकर्त्याबद्दल जे काही आहे ते आपण कधीही समजू शकणार नाही, तर देवाने त्याच्या संदेष्ट्यांच्या लिखाणातून स्वतःबद्दल काय प्रकट केले आहे हे समजून घेण्याचा आपण प्रयत्न करू नये का? जर आपल्याला देवाबद्दलचा विचार करायचा असेल तर आपण त्याच्याबद्दल अचूकपणे विचार केला पाहिजे.

आपल्यापैकी बहुतेक जण सहमत होतात की देव एकच आहे. परंतु मग या एकच देवाने स्वतःबद्दल काय प्रकट केले आहे? पवित्र शास्त्रात आपण त्याच्याबद्दल काय शोधू शकतो, जेव्हा आपण *"प्रत्येक थर सोलतो?"*

आपण एक वैयक्तिक, समजणारा आणि विश्वासू देवाला भेटतो जो त्याचे वचन आणि आत्म्यासह एकच आहे.

त्याच्या असीम महानतेत, देवाने स्वतःला **पिता** म्हणून, त्याचे वचन **पुत्र** म्हणून, आणि त्याचा आत्म्याला **पवित्र आत्मा** म्हणून ओळख करून दिली आहे. एका सत्य देवामध्ये हे तीन वैयक्तिक भेद आहेत.

चला आपण काही वचने पाहू या जी या सत्याला *"परत उघड करतील"*.

## देवाचा पुत्र

पवित्र शास्त्र हे स्पष्ट करते की तोच शब्द जो प्रारंभी देवासह होता त्यालाच देवाचा एकुलता एक पुत्र देखील म्हणतात.

> *"प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता....देवाला कोणीही कधीच पाहिले नाही; जो एकुलता एक जन्मलेला पुत्र देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रकट केले आहे....जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्यायनिवाडयाचा प्रसंग येत नाही, जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही."* (योहान १:१, १८; ३:१८)

सेनेगलमध्ये, लोक कधीकधी *"देवाचा पुत्र"* या वाक्यावर *"अस्ताघफेरुल्लाह!"* बडबडत प्रतिक्रिया देतात, या अरबी सूत्रामध्ये ही कल्पना आहे : *"असे निंदात्मक शब्द उच्चारण्यासाठी देव तुम्हांला क्षमा करो!"* ("देवाची थट्टा" म्हणून निंदेची व्याख्या केली जाऊ शकते."). *काही प्रसंगी, त्यांच्या स्वतःच्या म्हणीचा संदर्भ देत मी त्यांना खडसावून उत्तर दिले आहे :* "तुम्ही मेंढपाळाच्या तोंडावर चापट मारण्यापूर्वी, तो कशासाठी शिट्टी वाजवत आहे हे शोधले पाहिजे." *ते हसले आणि मग मी त्यांना बोललो, तुम्ही* "देवाचा पुत्र" *हे विधान नाकारण्यापूर्वी, देवाने याबद्दल काय म्हटले आहे ते शोधून काढले पाहिजे."*

पवित्र शास्त्रात शेकडोपेक्षा अधिक वचने आहेत जी सरळपणे देवाच्या *"पुत्राचा"* संबोध करतात, तरीही यापैकी कोणतीही वचने *"एकापेक्षा जास्त देव"* सुचवत नाही किंवा ते हा देखील सल्ला देत नाही की देवाने *"पत्नी केली आणि एक पुत्र झाला,"* जसे काही या वाक्याला अनुवादित करण्याचे निवडतात. असे विचार हे केवळ निंदात्मकच नाही; तर ते पवित्र शास्त्राच्या वचनांचे उथळ आकलन देखील प्रकट करतात.[१०८]

देव त्याच्या विचारांवर चिंतन करण्यास आपल्याला आमंत्रित करतो.

> *"कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत."* (यशया ५५:९)

अनेक वर्षांपूर्वी एका सुप्रसिद्ध सेनेगली व्यवसायिकाचा ऑटोमोबाईल अपघातात मृत्यू झाला. सेनेगलच्या राष्ट्रीय वर्तमानपत्रात वार्ता दिली या माणसाचे दोन हजार कर्मचारी हे *"त्याच्या स्वतःच्या मुलांसारखे"* होते, आणि त्याला *"सेनेगलचा महान पुत्र म्हणून गौरविले."*[१०९] या शब्दाचा अर्थ असा होतो का की सेनेगल देशाचे एका स्त्रीशी संबंध होते आणि त्याला मुलगा झाला? अर्थातच नाही! सेनेगलच्या लोकांना ही पदवी देऊन चांगल्या प्रिय नागरिकाचा सन्मान करण्यात कोणतीही अडचण नाही. *"सेनेगलचा मुलगा"* या वक्तव्याचा अर्थ काय ते त्यांना समजले होते. याचा अर्थ काय नाही हे देखील त्यांना माहित होते.

पुत्र हा शब्द अनेक प्रकारे वापरला गेला आहे. जेव्हा कुराण आणि अरब लोक *"रस्त्याचा पुत्र"* (इब्न अल-साबील [सूरह २:१७७, २१५]), म्हणून प्रवास करणाऱ्या प्रवाशाला संबोधतात, तेव्हा आपल्याला ठाऊक आहे की त्यांचे म्हणणे काय आहे. जेव्हा सर्वशक्तिमान देव त्याच्या वचनास त्याचा पुत्र म्हणून संबोधतो, तेव्हा त्याचा अर्थ काय हे देखील आपल्याला कळले पाहिजे.

आपला निर्माणकर्ता वाढवत असलेल्या उपाधी आणि संज्ञांची आपण थट्टा करू नये.

*"देव प्राचीन काळी अंशांअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्टयांच्या द्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला. तो ह्या काळाच्या शेवटी पुत्राच्या द्वारे आपल्याशी बोलला आहे; त्याने त्याला सर्व गोष्टींचा वारस करून ठेवले आणि त्याच्या द्वारे त्याने विश्व निर्माण केले. हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, ...."* (इब्री. १:१-३)

*"आपल्याशी त्याच्या पुत्रा द्वारे बोलले आहे"* हे आपण ओळखावे अशी देवाची इच्छा आहे. आपण हे समजून घ्यावे अशी देखील त्याची इच्छा आहे की त्याचा पुत्र हा शब्द आहे ज्याद्वारे स्वर्ग आणि पृथ्वीवरील सर्व गोष्टी निर्माण केल्या आहेत आणि त्या टिकून आहेत. बायबलच्या अरबी अनुवादात, *"देवाचे वचन"* म्हणून पुत्राची उपाधी ही *"कलीमात अल्लाह"* अशी अनुवादित केली आहे, एक उपाधी जे बायबल आणि कुराण दोन्हीही मसीहाला देते. नंतर आपल्या प्रवासात, आपण याबद्दल जवळून पाहणार आहोत.

## देवाचा आत्मा

जसे देव त्याचा शब्द-पुत्रासह एक आहे, तसेच तो त्याच्या आत्म्यासह एक आहे.

देवाचा पवित्र आत्मा जग निर्माण करणे आणि देवाच्या लिखित वचनास प्रेरणा देणे या दोन्हीमध्ये सहभागी आहे. बायबलचे दुसरे वाक्य घोषित करते की जेव्हा देवाने जग निर्माण केले, तेव्हा *"**देवाचा आत्मा** पाण्याच्या पृष्ठभागावर तळपत होता."* आणि नंतर पावित्र शास्त्र स्पष्ट करते : *"कारण संदेश मनुष्यांच्या इच्छेने कधी आलेला नाही; तर **पवित्र आत्म्याने** प्रेरित झालेल्या पवित्र मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे."* (२ पेत्र १:२१)

काही लोक शिकवतात की पवित्र आत्मा हा गब्रीएल देवदूत आहे. इतरांनी स्वतःला हे पटवून दिले आहे की देवाचा आत्मा हा एक संदेष्टा आहे. असे निष्कर्ष संदेष्टयांच्या पवित्र शास्त्रातून येत नाहीत. देवदूत आणि मानव हे निर्मित जीव आहेत. पवित्र आत्मा हा असृष्ट, 'शाश्वत आत्मा" आहे. (इब्री. ९:१४)[११०]

पवित्र आत्मा हा *"सत्याचा आत्मा"* आहे (योहान १४:१७), ज्याद्वारे देवाने जगात त्याचे उद्देश पूर्ण केले आहेत. तो *"सहाय्यक"* आहे (योहान १४:१६) जो देवाला घनिष्ठ आणि अनुभवात्मक मार्गाने त्या सर्वांना प्रकट करतो जे देवाच्या संदेशावर विश्वास ठेवतात. आज पृथ्वीवरील अनेक लोकांना देवाला न ओळखता देवाबद्दल ठाऊक आहे. असे ज्ञान देव किंवा माणसाला संतुष्ट करत नाही. हा पवित्र आत्मा आहे जो लोकांसाठी हे शक्य करतो की देवासोबत वैयक्तिक संबंधाचा आनंद घ्यावा. नंतर, आपण देवाच्या अद्भुत पवित्र आत्म्याविषयी अधिक

शिकू या.[१११]

*प्रवास कसा होत आहे? थोडेसे ताण देणारा? हे विचार समजून घेणे सोपे नाही. काही लोक दावा करतात की त्यांचा धर्म आणि देवाची परिभाषा ही खरी असली पाहिजे "कारण ती इतकी साधी आहे." देवाची त्यांची परिभाषा साधी असू शकेल, परंतु देव हा साधा नाही.*

*"कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो."* (यशया ५५:८)

## सदैव एकच

पवित्र शास्त्र अगदी स्पष्ट आहे. संपूर्ण अनंतकाळात असा एकही काळ आला नाही जेव्हा पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा अस्तित्वात नव्हते.[११२] ते नेहमीच एकच आहेत. मानवी इतिहासाच्या संदर्भात, पवित्र शास्त्र पित्याला एकच जो स्वर्गातून बोलतो, पुत्र हा एकच जो पृथ्वीहून बोलतो, आणि पवित्र आत्मा हा एकच जो अंत:करणाशी बोलतो म्हणून प्रकट करते.[११३] प्रत्येक हा त्याच्या भूमिकेत वेगळा आहे, तरीही ते एकच आहेत.

जेव्हा लोक देवाच्या स्वतःच्या प्रकटीकरणाच्या ज्ञानात वाढतात तेव्हा ते प्रेम असलेल्या आणि व्यवहारिक मार्गांनी त्याचे असीम प्रेम दाखवणारा जो एकच आहे त्याच्या समृद्धतेमध्ये आनंदित होऊ लागतात.

प्रेम केवळ नात्याच्या संबंधात अर्थपूर्ण मार्गाने अस्तित्वात असू शकते. पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याने नेहमीच परिपूर्ण प्रेम आणि एकतेच्या परस्परसंवादी नातेसंबंधाचा आनंद घेतला आहे. पवित्र शास्त्रात इतरत्र, आपण पुत्राला हे म्हणताना ऐकतो, *"पिता पुत्रावर प्रीती करतो आणि* "पुत्र पित्यावर प्रीती करतो.' पवित्र शास्त्र हे देखील घोषित करते की *"आत्म्याचे फळ प्रीती आहे."* (योहान ५:२०, १४:३१; गलती.५:२२)

सर्वोत्तम मानवी नातेसंबंध जसे की पुरुष आणि त्याची पत्नी यांच्यातील एकता किंवा वडील, आई आणि मुले यांच्यातील बंधन, हे देव कोण आहे यातून प्रवाहित होते. असे पृथ्वीवरील नातेसंबंध, अगदी उत्तम प्रकारे, देवाच्या विस्मयकारक एकतेचे आणि प्रेमाचे अस्पष्ट प्रतिबिंब आहे. आपला निर्माणकर्ता जे सर्वकाही चांगले आहे त्याचे मूळ उगम, पद्धती, आणि उद्धेश आहे.

*"देव **प्रीती** आहे."* (१ योहान ४:८)

*"देव प्रीती आहे"* याचा उत्तम भाग हा आहे की तो त्याच्यासह सदैव एक घनिष्ठ नातेसंबंधाचा आनंद घेण्यासाठी तुम्हांला आणि मला आमंत्रित करतो! त्याला केवळ आपला विश्वास हवा आहे, जरी त्याला पूर्णपणे स्पष्ट केले जाऊ शकत नाही.

## देव विश्वसनीय आहे

सृष्टी निर्मितीच्या सहाव्या दिवसापासून देवाबद्दल आपण काय निरीक्षण केले आहे त्याबद्दल विचार करा. गणितीय समीकरण म्हणून ते असे दिसते:

पहिला दिवस : देव पवित्र आहे
+ दुसरा दिवस : देव सर्वशक्तिमान आहे
+ तिसरा दिवस : देव चांगला आहे
+ चौथा दिवस : देव विश्वासू आहे
+ पाचवा दिवस : देव जीवन आहे
+ सहावा दिवस : देव प्रीती आहे
= देव विश्वसनीय आहे

या गुणांमध्ये कमी पडणाऱ्या लोकांवर आपण पटकन विश्वास ठेवतो हे विचित्र नाही का, तरीही आपण या गुणांना परिपूर्णतेने प्रदर्शित करणाऱ्यावर विश्वास ठेवण्यास नाखूष आहोत?

जेव्हा मी पत्रपेटीत एक पत्र टाकतो, ते पत्र पोहचवण्यासाठी मी पोस्टाच्या सेवेवर विश्वास ठेवतो. सृष्टी निर्माणकर्ता-पालनहार-विश्वाचा मालक जो त्याचे वचन पाळतो त्यावर मी कितीतरी अधिक विश्वास ठेवला पाहिजे!

> *"आपण माणसांची साक्ष स्वीकारतो, पण तिच्यापेक्षा **देवाची साक्ष मोठी आहे**; ...... ज्याने देवाचा विश्वास धरला नाही त्याने त्याला लबाड ठरवले आहे; कारण जी साक्ष देवाने आपल्या पुत्राविषयी दिली आहे तिच्यावर त्याने विश्वास ठेवला नाही...."*
> (१ योहान ५:९-१०)

## देवाचे वैयक्तिक नाव

आपण त्यास ओळखावे, त्याच्यावर विश्वास ठेवावा आणि त्याच्या नावाने हाक मारावी

अशी देवाची इच्छा आहे.

> *"ज्यांना तुझ्या नावाची ओळख झालेली आहे ते तुझ्यावर भाव ठेवतील, कारण, हे परमेश्वरा, जे तुझा शोध करतात त्यांना तू टाकले नाहीस."* (स्तोत्र. ९:१०)

बहुतेक लोक विचार करतात की देवाचे नाव हे साधे देव-किंवा एलोहीम (इब्री) किंवा अल्लाह (अरबी[११४]) किंवा अलाहा (अरामी) किंवा डीयू (फ्रेंच) किंवा डीयॉस (स्पॅनिश) किंवा गॉट (जर्मन), किंवा ते बोलतात त्या भाषेत जे मूळ शब्द वापरले जातात ते आहे.

खरोखर, देव देव आहे (परम जीव), परंतु देव त्याचे नाव आहे का? माझे नाव मानव असे म्हणण्यासारखे होणार नाही का? मी एक मानव आहे, पण मला एक वैयक्तिक नाव देखील आहे. देव देव आहे, पण त्याला देखील नावे आहेत ज्याद्वारे त्याने स्वतःला प्रकट केले आहे आणि ज्याद्वारे आपण त्याला एक व्यक्ती म्हणून संबोध करण्यासाठी तो आपल्याला आमंत्रित करतो.

अनेक जण देवाला गुरुत्वाकर्षण आणि वारा या सारख्या उर्जेचा एक प्रकारचा अनोळखी स्त्रोत आहे किंवा विज्ञान काल्पनिक चित्रपटांच्या लोकप्रिय मालिकेत चित्रित केलेल्या *"द फोर्स"* सारख्या कल्पना करतात. देवाची पवित्र शास्त्राची ही संकल्पना नाही.

देव हे परम व्यक्तिमत्व आहे ज्याची इच्छा आहे की तुम्ही त्याला वैयक्तिक मार्गाने ओळखावे.

व्यक्तिमत्व म्हणून देवाची संकल्पना केवळ बायबलसंबंधी नाही तर ती तार्किक आहे. मानव हे केवळ वैश्विक उर्जेचे गोळे नाहीत, आणि ज्याने सर्व गोष्टी घडवल्या तोही नाही. तो एक वैयक्तिक नावासह एक वैयक्तिक जीव आहे.

देवाचे प्राथमिक नाव हे उत्पत्तीच्या दुसऱ्या अध्यायात प्रथम प्रकट केले गेले.

> *"आकाश व पृथ्वी ह्यांची **परमेश्वर** देवाने उत्पत्ती केली, तेव्हाचा उत्पत्तीक्रम हा होय."* (उत्पत्ती २:४)

देव ज्या नावाने स्वतःला सूचित करतो ते तुमच्या लक्षात आले का?

त्याचे नाव *"परमेश्वर"* आहे. कमीत कमी त्याचा अनुवाद मराठी भाषेत असा केला आहे. देव सर्व भाषांमध्ये प्रवीण आहे आणि त्याला कोणत्याही एका विशिष्ट भाषेत संबोधण्याची आवश्यकता नाही याबद्दल आपण आभारी आहोत. तो आपल्याला त्याच्याशी आपल्या मातृभाषेत, कधीही, कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही दिशेने तोंड करून, आपल्या हृदयाच्या

भाषेत बोलण्यासाठी आमंत्रित करतो.

## मी आहे

इब्री भाषेत, देवाचे प्राथमिक वैयक्तिक नाव, *"परमेश्वर"* आहे ते चार व्यंजनांनी लिहितात : **वायएच डब्लूएच**. जेव्हा स्वर जोडले जातात तेव्हा ते याव्हे किंवा यहोवा असे उच्चारले जाते. हे नाव इब्री शब्द *"असणे"* यापासून घेतले आहे आणि त्याचा अक्षरशः अर्थ **"मी आहे"** किंवा **"तो आहे."** हे आपल्याला शिकवते की देव स्वयं-अस्तित्वात असणारा शाश्वत एकच आहे. देवाचे हे वैयक्तिक नाव जुन्या करारात देवाच्या इतर कोणत्याही नावापेक्षा, ६,५०० पेक्षा अधिक वेळा वापरले गेले आहे.

देवाने जे घोषित केले ते ऐका, जेव्हा मोशे, ज्याचे एका बहुदेववादी मिसर देशात पालनपोषण झाले, त्याने देवाला विचारले की त्याने त्याचे नाव सांगावे.

> *"देव मोशेला म्हणाला, "मी आहे तो आहे; तू इस्राएलवंशजांस सांग, **'मी आहे'** ह्याने मला तुमच्याकडे पाठवले आहे."* (निर्गम ३:१४)

फक्त एक वैयक्तिक जीव म्हणू शकतो *"मी आहे."* देवाची इच्छा आहे की लोकांनी हे समजावे की तोच अंतिम व्यक्ती आहे. त्याचे नाव मी आहे.

तो तोच एक आहे जो आहे.

भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हे त्याच्यासाठी काहीही नाहीत. त्याचे अस्तित्व वेळ आणि अंतराळाच्याही पलीकडचे आहे.

तो आत्म-निर्भर आहे.

तुम्हांला आणि मला हवा, पाणी, अन्न, झोप, आश्रय, आणि इतर घटकांची जगण्यासाठी आवश्यकता लागते, पण त्याला कशाचीही आवश्यकता नाही. तो तोच एक आहे जो त्याच्या स्वतःच्या सामर्थ्याने तर्क करतो आणि अस्तित्वात आहे. तो ते महान मी आहे-परमेश्वर.

देवाने त्याची व्याख्या करणे माणसावर सोडलेले नाही.

तो स्वयं-व्याख्यीत एकच आहे.

## शेकडो नावे

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा या त्याच्या शाश्वत अस्तित्वात, परमेश्वराला शेकडो नावे

आणि उपाधी आहेत. देवाची नावे त्याच्या चरित्राला प्रतिबिंबित करतात. प्रत्येक उपाधीचा हेतू देव कोण आहे आणि तो कसा आहे हे अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करते. उदाहरणार्थ, त्यास म्हणतात :

स्वर्ग आणि पृथ्वीचा उत्पन्नकर्ता, जीवनाचा लेखक, सर्वोच्च, खरा प्रकाश, पवित्र एकच, नीतिमान न्यायाधीश, परमेश्वर जो पुरवठा करतो, परमेश्वर जो बरे करतो, परमेश्वर आमची धार्मिकता, परमेश्वर आमची शांती, परमेश्वर माझा मेंढपाळ, प्रीती आणि शांतीचा देव, सर्व कृपेचा देव, शाश्वत तारणाचा लेखक, देव जो तुमच्या हाताजवळ आहे....

आपल्या निर्माणकर्त्याबद्दल आपली सध्याची काहीही समज असो, आपल्यातील प्रत्येक व्यक्तीने नम्रपणे स्वीकारले पाहिजे की तो देव आहे आणि त्याच्यासारखा कोणीही नाही. जरी त्याच्याबद्दल पूर्णपणे समजून घेणे किंवा ओळखणे करू शकत नाही, तरी त्याची इच्छा आहे की आपण त्याचे नाव ओळखावे आणि त्याजवर विश्वास ठेवावा, त्याजवर प्रीती करावी आणि त्याच्यासह सदैव राहावे. हा उद्देश लक्षात ठेवून देवाने सृष्टी निर्मितीच्या सहाव्या दिवशी म्हटले :

*“आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण घडवू.” (उत्पत्ती १:२६)*

त्याला काय म्हणायचे होते? दृश्य मनुष्य अदृश्य देवाची प्रतिमा कशी धारण करू शकेल?



# धडा १०

# एक विशेष निर्मिती

**दोन** धडयांपूर्वी आपण आतापर्यंतच्या सर्वात महान घोषणांपैकी एकावर विचार केला : *"प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली."* (उत्पत्ती १:१) येथे आणखी एक आहे:

*"देवाने मनुष्याला त्याच्या प्रतिरूपात निर्माण केले आहे."* (उत्पत्ती १:२७)

देवाने मानवास त्याच्या निर्मितीचा मुकुट म्हणून घडले आहे.

### देवाच्या प्रतिरूपात

> *"मग देव बोलला, 'आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू; समुद्रातील मासे, आकशातील पक्षी, ग्रामपशू, अवघी पृथ्वी आणि पृथ्वीवर रांगणारे सर्व प्राणी ह्यांवर ते सत्ता चालवतील.' देवाने आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य निर्माण केला; देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला. नर व नारी अशी ती निर्माण केली."* (उत्पत्ती १:२६-२७)

देव मनुष्याला *"त्याच्या प्रतिरूपात"* निर्माण करण्याचा अर्थ हा नाही की पहिले मानव हे प्रत्येक प्रकारे देवासमान होते. देवासमान कोणीही नाही. *"देवाने मनुष्याला **त्याच्या प्रतिरूपात** निर्माण केले"* याचा अर्थ मानव देवाच्या स्वभावात सहभागी होतील. देवाचे चरित्र प्रतिबिंबित करण्यासाठी मानवाची रचना केली होती. देवाने पहिला पुरुष व पहिल्या स्त्रीला गुणधर्मे दिली जे त्यांना त्याच्यासह अर्थपूर्ण संबंधाचा आनंद घेऊ देईल.

देवाने मानवाला बुद्धिमत्तेने आशीर्वादित केले, आणि प्रश्न विचारावेत, तर्कशुद्द विचार

करावा, आणि त्यांच्या निर्माणकर्त्याबद्दल गहन सत्य समजून घेण्यासाठी त्यांना क्षमता दिली.

देवाने त्यांना भावनांसहित बनवले जेणेकरून आनंद आणि सहानुभूती सारख्या भावनांचा ते अनुभव घेऊ शकतील.

त्याने त्यांना शाश्वत परिणामांची निवड करण्यासाठी इच्छा देखील दिली, ज्यामध्ये स्वातंत्र्य आणि जबाबदारी दोन्हींचा समावेश आहे.

याशिवाय, त्याने त्यांना संभाषण करण्याची क्षमतेने समर्थ केले-बोलणे, हावभाव करणे आणि गाणे. त्याने त्यांना दीर्घकालीन योजना करणे आणि त्या योजनांना अद्भुत सक्रीयतेने पूर्ण करण्यासाठी देखील सक्षम केले. सर्वात महत्वाचे, त्याने त्यांना शाश्वत जीव आणि आत्मा सोपविला जेणेकरून ते त्यांचा निर्माणकर्ता-मालकाची सदैव उपासना आणि आनंद घेऊ शकतील. अशी क्षमता मानवजातीला प्राण्यांच्या साम्राज्यापासून वेगळे करते.

देवाने मानवाला त्याच्या स्वतःकरता निर्माण केले. देव जो *"प्रीती आहे"* (१ योहान ४:८) त्याने पुरुष व स्त्रीला निर्माण केले, यासाठी नाही की त्याला त्यांची आवश्यकता होती, परंतु यासाठी की त्यास ते हवे होते. लोक त्याच्या प्रीतीस प्राप्त करणारे आणि प्रतिबिंबित करणारे होतील.

## मानवी शरीर

उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायात देवाने जग कसे निर्माण केले याचा संक्षिप्त इतिहास सादर केलेला असताना, दुसरा अध्याय तपशिलाने भरतो, विशेषतः मानवाच्या निर्मितीच्या संदर्भात.

> *"मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडवला व त्याच्या नाकपुडयात जीवनाचा श्वास फुंकला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला."* (उत्पत्ती २:७)

जरी देवाने आकाश व पृथ्वीला शून्यातून निर्माण केले, तरी त्याने पहिल्या मनुष्याला मातीपासून निर्माण करण्याचे निवडले. सध्याचे जीवशास्त्रज्ञ या वस्तुस्थितीची पुष्टी करतात : *"एक प्रकारे, शरीर जवळजवळ अप्रभावी दिसते. वीस सामान्य घटक जे ते तयार करतात ते सर्व पृथ्वीच्या कोरडया धुळीत असतात."*[११५]

मानवी शरीर अशा निकृष्ट घटकांनी बनलेले असले तरी, ते सुमारे पंच्याहत्तर ट्रिलीयन (७५,०००,०००,०००,०००) सजीव पेशींसह एकत्रित केलेल्या कारागिरीचा एक चमत्कारिक तुकडा आहे, प्रत्येकाची एक विशिष्ट भूमिका आहे.

पेशी हे जीवनाचे मुलभूत एकक आहे. एक पेशी इतकी लहान आहे की ती केवळ शक्तिशाली सूक्ष्मदर्शकाखाली दिसू शकते, तरीही ती लाखो कार्यरत भागांनी भरलेली आहे.

प्रत्येक पेशीमध्ये डीएनएचा दोन मीटर लांब (सहा फुट) सूक्ष्म वळण असलेला धागा असतो, जो एखाद्या व्यक्तीच्या मुलभूत वैशिष्टयांसाठी अनुवांशिक कोड असतो.

सुप्रसिद्ध संगणक सॉफ्टवेअर गुरु बिल गेट्स यांनी म्हटले आहे की, *''मानवी डीएनए हा संगणक प्रोग्रामसारखा आहे परंतु आतापर्यंतच्या कोणत्याही सॉफ्टवेअरपेक्षा कितीतरी अधिक प्रगत आहे.''*[११६] मानवी शरीरात किमान २०० वेगवेगळया प्रकारच्या पेशी असतात. काही जण रक्तासारखे द्रव बनवतात, तर इतर मऊ उती आणि अवयव तयार करतात, तर इतर ठिकाणी हाडे तयार करण्यासाठी एकत्र येतात. काही पेशी शरीराचे अवयव एकत्र बांधतात, तर काही शरीराची कार्ये व्यवस्थित करतात, जसे की पाचक आणि पुनरुत्पादक प्रणाली.[११७]

तुमच्या शरीराची रचना आणि कार्यरत भागांचा विचार करा : २०६ हाडांनी बनलेला सांगाडा आणि अस्थिबंधन, स्नायुबंध, स्नायू, त्वचा आणि केसांनी सजलेला; किंवा रक्ताभिसरण प्रणाली शिरा, धमन्या आणि रक्त, जीवनाचे घटक स्वतः वाहून नेते. यानंतर आतडे, पोट, यकृत आणि मूत्रपिंड आहेत. तुमच्या मेंदूशी जोडलेली गुंतागुंतीची-वळणदार मज्जासंस्था देखील आहे. आणि हृदय नावाच्या विश्वासू पंपला विसरू नका, किंवा देवाने तुम्हांला डोळे, कान, नाक, तोंड आणि जीभ, कंठातील स्वरतंतू, रुचिकलिका आणि दात दिले आहेत हे विसरू नका! ते पाय आणि हात देखील उपयुक्त आहेत! आणि तुम्हांला अंगठा दिल्याबद्दल तुम्ही कधी देवाचे आभार मानले आहेत का? एक झाडू किंवा हातोडा त्याएकावाचून वापरण्याचा प्रयत्न करा! ती नखंही खूप उपयोगी आहेत....

दावीद संदेष्टयाने लिहिले यात आश्चर्य नाही,

> *''भयप्रद व अद्भुत रीतीने माझी घडण झाली आहे, म्हणून मी तुझे उपकारस्मरण करतो; तुझी कृत्ये अद्भुत आहेत हे माझा जीव पूर्णपणे जाणून आहे.''* (स्तोत्र. १३९:१४)

## जीव आणि आत्मा

मानवी शरीर जेवढे विलक्षण आहे, तेवढेच शरीर हे मानवाला विशेष बनवते असे नाही. प्राणी, पक्षी, आणि माशांना देखील अद्भुत शरीरे आहेत. मानवाचे अद्वितीयपण हे त्याचा मानवी जीव आणि शाश्वत आत्म्यामध्ये सापडते. हे ते जीव आणि आत्मा आहेत जे पहिल्या पुरुष आणि स्त्रीला *''देवाच्या प्रतिरूपात''* घडवलेले विशेष जीव म्हणून वेगळे करतात.

अशा प्रकारे, एकदा की देवाने मनुष्याचे शरीर मातीपासून बनवण्याचे संपविल्यावर, त्याने *''त्याच्या नाकपुडयात जीवनाचा श्वास फुंकला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला''* (उत्पत्ती २:७). आदामासाठी देवाने जे शरीर बनवले होते ते केवळ घर, किंवा तंबू होते, ज्यामध्ये देवाने

आदामाचा शाश्वत जीव आणि आत्मा ठेवला होता.

देवाने मनुष्याला एक शरीर दिले जेणेकरून त्याला त्याच्या सभोवतालच्या जगाची जाणीव होऊ शकेल, एक जीव जेणेकरून मनुष्याला त्याच्या अंतर्मनाची जाणीव होऊ शकेल, आणि एक आत्मा जेणेकरून मनुष्याला देवाची जाणीव होऊ शकेल.

शरीर जिवाद्वारे संचालित, जीव आत्म्याद्वारे संचालित, आणि आत्मा हा स्वयं देवाकडून संचालित व्हावा.[११८]

> *"देव आत्मा आहे; आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे."* (योहान ४:२४)

## एका उद्देशासाठी निर्माण केले

श्रेष्ठ रचनाकाराने मनुष्याला एक प्रकारची त्रि-एकता असावी म्हणून निर्माण केले, जे *"आत्मा, जीव आणि शरीराला"* जोडते (१ थेस्सल. ५:२३) आणि मानवाला त्यांच्या निर्माणकर्त्याबरोबर घनिष्ठ संगतीचा आनंद घेण्यास शक्य केले. देवाने मनुष्याला जीवन दिले होते आणि आता हा मनुष्याचा अत्युच्च विशेषाधिकार असणार होता की त्याचा निर्माणकर्ता-मालकाच्या आनंदासाठी आणि स्तुतीसाठी जगावे.

> *"ज्यांना माझे नाम ठेवले, ज्यांना माझ्या गौरवासाठी उत्पन्न केले, निर्माण केले आणि घडले त्या सर्वांना घेऊन या......मी आपल्यासाठी निर्माण केलेले लोक माझे स्तवन करतील."* (यशया ४३:७, २१)

मनुष्याला देवाच्या गौरवासाठी निर्माण केले आहे.

पृथ्वी ही मानवजातीसाठी बनवली गेली आहे, परंतु मानवजातीला देवासाठी बनवले गेले आहे. निर्माणकर्त्याचा हेतू हा होता की प्रथम मनुष्याने त्याला ओळखावे, त्याचा आनंद घ्यावा, आणि सदैव त्याजवर प्रेम करावे. तुमच्या आणि माझ्यासाठीही त्याचा हाच हेतू आहे.

> *"तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीती कर."* (मार्क १२:३०)

## एक परिपूर्ण वातावरण

देवाने आदामाला निर्माण केल्यानंतर, त्याने योजना केली आणि एदेन नावाची एक

आलिशान बाग तयार केली.

*"परमेश्वर देवाने पूर्वेला एदेनात बाग लावली आणि तिच्यात आपण घडवलेल्या मनुष्याला ठेवले. परमेश्वर देवाने दिसण्यात सुंदर व अन्नासाठी उपयोगी अशी सर्व जातींची झाडे, बागेच्या मध्यभागी जीवनाचे झाड, आणि बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणारे झाड ही जमिनीतून उगवली. बागेला पाणी देण्यासाठी एदेनात एक नदी उगम पावली; तेथून ती निघून तिचे फाटे फुटून चार नद्या झाल्या."* (उत्पत्ती २:८-१०)

एदेन, शक्यतो त्या प्रदेशात आहे ज्यास आज इराक[११९] म्हणून ओळखतात, ती विस्मयकारक दृश्ये, आवाज, आणि सुगंधांनी भरलेली, निरंतर आनंदाची एक विशाल बाग होती. एका चकाकणाऱ्या नदीने बागेला पाणी दिले. त्याच्या काठावर आल्हाददायक फळझाडांच्या रांगा होत्या. अनोळखी प्रकारची फळे चाखायला, गोड-सुगंधांची फुले, न्याहाळता येतील अशी उंच झाडे आणि हिरवीगार हिरवळ, पशू, पक्षी आणि बगळयांचा अभ्यास करावा, गूढ जंगलांचे संशोधन करावे, सोने आणि मौल्यवान दगड शोधावे. खरोखर, देवाने आदामाला *"आनंद घेण्यासाठी सर्व गोष्टी विपुल प्रमाणात"* दिल्या होत्या. (१ तीमथ्य. ६:१७)

देवाने बागेच्या मध्यभागी दोन विशेष झाडे देखील लावली होती : एक जीवनाचे झाड आणि दुसरे बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणारे झाड.

एदेन म्हणजे आनंद. देवाने मनुष्याच्या आनंदासाठी हे अद्भुत घर निर्माण केले होते, परंतु मनुष्यासाठी आतापर्यंतचा सर्वात मोठा आनंद हा त्याच्या निर्माणकर्त्यासह संगतीचा आनंद घ्यावा हे असणार होते.

देवाला वैयक्तिकरित्या जाणून घेणे आणि त्याच्याबरोबर असण्यापेक्षा दुसरे काहीही आश्चर्यकारक नाही. *"...,.तुझ्या सान्निध्यात पूर्णानंद आहे; तुझ्या उजव्या हातात सौख्ये सदोदित आहेत."* (स्तोत्र. १६:११)

## एक समाधानकारक कार्य

बाग तयार झाल्यावर, परमेश्वराने त्यात मनुष्याला ठेवले. देवाने आदामाला विचारले नाही की त्याला तेथे राहण्याची इच्छा आहे का? देव हा मनुष्याचा घडणारा होता आणि त्यामुळे मनुष्याचा मालक. देवाला मानवजातीसाठी काय उत्तम आहे हे माहित आहे आणि तो जे करतो त्याबद्दल त्याला कोणालाही उत्तर देण्याची गरज नाही.

*"परमेश्वर देवाने मनुष्याला एदेन बागेत नेऊन तिची मशागत व राखण करायला ठेवले."* (उत्पत्ती २:१५)

देवाने आदामाला त्याच्या नवीन घरात दोन जबाबदाऱ्या दिल्या.

पहिली, त्याने बागेची *"मशागत"* करावी, परंतु घाम, परिश्रम आणि थकल्यावाचून. सर्वकाही चांगले असल्याने हे पूर्णपणे आनंददायक कार्य होते. टोचण्यासाठी काटे नव्हते आणि उपटून टाकण्यासाठी रानगवत नव्हते.

दुसरी, आदामाला *"त्याची राखण"* करण्याची जबाबदारी दिली होती. हा शेवटचा वाक्प्रचार विश्वात दडून राहिलेल्या काही द्वेषपूर्ण, धोकादायक घटकांचा इशारा देऊ शकतो का?

या प्रश्नांचे उत्तर लवकरच मिळेल.

## एक साधा नियम

कारण मनुष्य हा बाहुला नव्हता तर एक व्यक्ती होता, देवाने आदामाला आज्ञापालनासाठी एक सरळ नियम देखील दिला.

*"तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला अशी आज्ञा दिली की, 'बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ येथेच्छ खा; पण बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील."* (उत्पत्ती २:१६-१७)

देवाने स्त्रीला निर्माण करण्यापूर्वी ही आज्ञा मनुष्याला दिली होती देवाने मानवजातीचे मस्तक म्हणून आदामाची नियुक्ती केली होती आणि त्याने हा एक नियम पाळण्यासाठी आदामाला जबाबदार धरले.

## पहिली स्त्री

पुढे देवाने स्त्रीला निर्माण केले. आणि ती एक विशेष निर्मिती होती!

> *"मग परमेश्वर दे बोलला, 'मनुष्य एकटा असावा हे बरे नाही; तर त्याच्यासाठी अनुरूप साहाय्यक मी करीन.' ....मग परमेश्वर देवाने आदामाला गाढ निद्रा आणली, आणि तो झोपला तेव्हा त्याने त्याची एक फासळी काढून घेतली, तिची जागा मांसाने भरून आली. परमेश्वर देवाने आदामाची फासळी काढून तिची स्त्री बनवली आणि तिला आदामाकडे नेले. तेव्हा आदाम म्हणाला, 'आता ही मात्र माझ्या हाडांतले हाड व मांसातले मांस आहे; हिला नारी म्हणावे, कारण ही नरापासून बनवली आहे. ह्यास्तव पुरुष आपल्या आईबापांना सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील; ती दोघे एकदेह होतील. आदाम व त्याची स्त्री ही दोघे नग्न होती; तरी त्यांना संकोच वाटत नसे."* (उत्पत्ती २:१८, २१-२५)

अशा प्रकारे देवाने पहिली शस्त्रक्रिया केली, आदामाच्या बाजूतून एक सुंदर आणि प्रेमळ पत्नी घडवली आणि मग स्वतः तिला आदामाला सादर केले.

देवाने त्याला दिलेली जवळची आणि प्रेमळ सोबती आणि *"साहाय्यक"* साठी आदामाला किती आनंद झाला! बायबलसंबंधी दिवंगत विद्वान मॅथ्यू हेन्री यांनी लिहिले, *"स्त्रीला बनवले गेले....आदामाच्या बाजूतून; त्याच्या डोक्यातून बनवले नाही की त्याच्यावर शासन करावे, त्याच्या पायातूनही बनवले नाही की त्याच्याकडून तिला तुडवले जावे, परंतु त्याच्या बाजूतून बनवले की त्याच्याबरोबर समान असावे, त्याच्या हाताखाली सुरक्षित, आणि त्याच्या हृदयाजवळ त्याला प्रिय अशी."*[१२०]

पुरुषासारखे, स्त्रीला देवाच्या प्रतिरूपात आणि सदृश बनवले होते, देवाचे चरित्र प्रतिबिंबित करण्यासाठी आणि त्याच्याबरोबर सदैव आध्यात्मिक एकतेचा आनंद घेण्यासाठी निर्माण केले होते. निर्माणकर्त्याने पुरुष व स्त्रीसाठी निश्चित व्यवस्था आणि विशिष्ट भूमिका स्थापित केल्या असताना, त्याने त्यांना मूल्य आणि महत्वामध्ये समान असे घोषित केले.

आज, देवाच्या हेतूच्या विरुद्ध अनेक समाज स्त्रियांना मालमत्तेचा भाग असल्यासारखे वागवतात. मी पाहिले आहे की लोक जेव्हा मुलगा जन्माला येतो तेव्हा आनंद साजरा करतात आणि जेव्हा मुलगी जन्माला येते तेव्हा निराशा व्यक्त करतात. काही मनुष्य त्यांच्या पत्नीपेक्षा त्यांच्या पशुधनाची जास्त काळजी आणि विचार करतात. काही समाज दुसऱ्या टोकाला गेले आहेत, त्यांनी प्रत्येकाला देवाने नेमून दिलेल्या स्त्री-पुरुष भूमिका आणि जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणे पसंत केले आहे. दोन्हीही टोकाकडील गोष्टींमुळे स्त्रियांचा अपमान होतो.

### पहिला विवाह

पहिला विवाह समारंभ कोणी केला ते पाहा.

तो परमेश्वर होता. पवित्र शास्त्र म्हणते, *"त्याने तिला मनुष्याकडे आणले."* सुरुवातीपासून निर्माणकर्ता त्याने स्वतःकरता निर्माण केलेल्या लोकांच्या जीवनात सरळपणे कार्य करत होता. हा तो एकच आहे ज्याने घोषित केले की *"ह्यास्तव पुरुष आपल्या आईबापांना सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील; ती दोघे एकदेह होतील." "एकच"* साठी एकाद हा इब्री शब्द वापरला आहे, जे एकता आणि ऐक्य दर्शवते. देवाने पहिल्या जोडप्याची रचना केली की सदैव त्याच्या परिपूर्ण शांतीत परस्पर आनंद करावा आणि एकमेकांची सेवा करावी, आणि त्याचा आनंद घ्यावा आणि त्याची सेवा करावी. त्याची इच्छा होती की पुरुष आणि स्त्रीने त्यांच्या निर्माणकर्त्याला त्यांच्या जीवनाचे-वैयक्तिक आणि सांघिक, म्हणून केंद्रस्थान करावे.

दु:खाची गोष्ट म्हणजे, आपल्या सध्याच्या जगात बहुतेक लोक देवाच्या मूळ विवाहाच्या आराखडयाकडे दुर्लक्ष करतात आणि एक पुरुष आणि एक स्त्री यांच्यातील नातेसंबंध वर्षानुवर्षे किती आश्चर्यकारक होऊ शकतात याबद्दल ते अनभिज्ञ आहेत. परिणामी, ते प्रेमळ, विश्वासू,

निस्वार्थी आणि प्रेमळ नाते प्रतिबिंबित करण्यास अयशस्वी ठरतात जे परमेश्वराने सुरुवातीपासून पुरुष आणि त्याच्या पत्नीसाठी हेतू ठेवला होता.

पुरुष आणि पत्नी यांच्यातील विवाह हे निर्माणकर्त्याचे लेखकत्व त्याच्या अथांग प्रेमाचे प्रतिबिंब आहे. विवाह बंधनाची देवाची इच्छा अधिक घनिष्ठ, अधिक विस्मयकारक, वाढणारी, आधात्मिक संबंध स्पष्ट करण्याची आहे. तो लोकांना आता आणि संपूर्ण अनंतकाळात त्याच्याबरोबर आनंद घेण्यासाठी आमंत्रित करतो.

लग्नाचा संस्थापक विवाहाची व्याख्या कशी करतो हे तुमच्या लक्षात आले का? *"ह्यास्तव पुरुष आपल्या आईबापांना सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील; ती दोघे एकदेह होतील."* आणि शास्त्रलेखात पुढे म्हटले आहे : *"आदाम व त्याची स्त्री ही दोघे नग्न होती; तरी त्यांना संकोच वाटत नसे."*

विवाहाची देवाची योजना ही जोडप्याने उद्देशाने आणि शरीराने एकत्र राहण्यासाठी, लज्जामुक्त राहण्यासाठी आहे. आणखी उच्च स्तरावर, देवाची योजना लोकांसाठी उघडपणे त्याच्याबरोबर अनंतकाळापर्यंत आध्यात्मिक एकतेचा आनंद घेण्यासाठी होती.

**मानवजातीला वर्चस्व दिले गेले**

देवाने पुरुषाला स्त्री सादर केल्यानंतर, त्याने त्यांच्याशी सरळपणे आणि वैयक्तिकपणे बोलले. असे दिसते की देव त्यांना एका दृश्य प्रकारच्या मार्गाने प्रकट झाला, कारण पवित्र शास्त्र *"परमेश्वर देव बागेत चालत होता"* याविषयी बोलते. (उत्पत्ती ३:८)

आता कल्पना करा पुरुष आणि त्याच्या पत्नीला परमेश्वर एक उंच डोंगरावर नेत आहे जेथून ते त्यांच्या निर्माणकर्त्याच्या गौरवी, वैभवशाली मूळ निर्मितीकडे पाहू शकत होते..

> *"देवाने त्यांना आशीर्वाद दिला; देव त्यांना म्हणाला, 'फलद्रूप व्हा, बहुगुणीत व्हा, पृथ्वी व्यापून टाका व ती सत्तेखाली आणा; समुद्रातील मासे, आकशातील पक्षी व पृथ्वीवर संचार करणारे सर्व प्राणी ह्यांवर सत्ता चालवा. देव म्हणाला, 'पाहा, अवघ्या भूतलावरील बीज देणारी प्रत्येक वनस्पती व सबीज फळे देणारे प्रत्येक झाड मी तुम्हांला देतो; ही तुमचे अन्न होतील."* (उत्पत्ती १:२८-२९)

देवाने आदाम व हव्वा[१२१] आणि त्यांच्या वंशजांना त्याच्या सृष्टीवर अधिकार दिला. त्याने त्यांना मानवजातीचे *"सुरुवातीचे जोडपे"* म्हणून विशेषाधिकार आणि जबाबदारी दिली. त्याने त्यांना सर्व सृष्टीवर प्रभुत्व दिले. प्रभुत्वाचा अर्थ अधिकार आणि नियंत्रण. आदाम व हव्वा आणि त्यांच्या संततीला आनंद करायचा, काळजी घ्यायची आणि पृथ्वीवर शहाणपणाने शासन करायचे होते. त्यांनी त्याचा उपयोग करायचा होता त्याचा गैरवापर करायचा नव्हता.

निर्माणकर्त्याने सृष्टीची रचना मानवजातीशी सुसंगत राहण्यासाठी केली आहे. प्रारंभी, मनुष्याला काय पाहिजे किंवा गरज होती त्यासाठी पृथ्वीने सहकार्य दिले. आदाम व हव्वेला त्यांचे पुढील भोजन कोठून येईल याबद्दल कधीच आश्चर्य वाटले नाही. त्यांना फक्त पोहचायचे होते आणि फळझाडांच्या अगणित जातींपैकी एक मधुर फळाचा तुकडा उचलायचा होता. कठीण माती, जंगली गवत आणि काटे, आजारपण आणि मृत्यू अस्तित्वात नव्हते. सृष्टीचा प्रत्येक कोपरा आदाम व हव्वेला सादर केला होता. मनुष्याला वर्चस्व होते.

जोपर्यंत मनुष्य त्याच्या निर्माणकर्त्याच्या अधीन आहे तोपर्यंत सृष्टी मनुष्याच्या अधीन असेल.

## देव आणि मनुष्य एकत्र

सुरुवातीपासून, मानवासाठी परमेश्वर देवाचा हेतू होता की त्यांनी त्याच्याबरोबर घनिष्ठ, मधुर संगतीत राहावे. त्यामुळेच त्याने आदाम व हव्वेला मन आणि हृदय दिले (बुद्धिमत्ता आणि भावना) ज्याद्वारे त्यास ओळखावे व त्याजवर प्रीती करावी, आणि निवडीचे स्वातंत्र्य (एक इच्छा) ज्याद्वारे त्याजवर विश्वास ठेवावा आणि त्याचे आज्ञापालन करावे की नाही याचा निर्णय घ्यावा. निवडीचा घटक पूर्णपणे आवश्यक होता, कारण खरी प्रीती आणि निष्ठा ठेवावी म्हणून जबरदस्ती करू शकत नाही. सार्वभौम परमेश्वर आदाम व हव्वेला त्यांच्या निवडीसाठी जबाबदार धरणार नाही.

याबद्दल कोणतीही चूक करू नका : जरी सृष्टीचा निर्माणकर्ता आणि मालकाला कशाचीही आणि कोणाचीही आवश्यकता नाही, तरी तो सखोल नातेसंबंधासाठी आहे.

ज्याप्रमाणे आपण ओळखले जावे आणि आपणावर प्रेम केले जावे अशी इच्छा असते, त्याचप्रमाणे देवाला त्याने स्वतः बनवलेल्या लोकांद्वारे ओळखले जावे आणि प्रेम केले जावे अशी इच्छा आहे.

लोक असे म्हणताना मी ऐकतो, *"मी देवाचा गुलाम आहे आणि त्यापेक्षा अधिक नाही!"* मान्य आहे की एक सेवक स्वेच्छेने त्याच्या मालकासाठी काम करतो म्हणून देवाची सेवा करणे हा सन्मान आहे, परंतु पवित्र शास्त्र स्पष्ट सांगते, देवाची रचना ही कधीही नव्हती की मनुष्याने *" एक गुलाम असले पाहिजे, परंतु एक पुत्र असावे"* (गलती. ४:७). *"दास घरात सदासर्वदा राहत नाही, पुत्र सदासर्वदा राहतो."* (योहान ८:३५). देव त्याच्या हृदयाची इच्छा मानववंशीयदृष्ट्या (मानवी वाक्यात) व्यक्त करत आहे, जे आपल्याला सांगते की त्याने त्या सर्वांसाठी योजना केली आहे जे त्याजवर विश्वास ठेवतात:

> *"आणि मी तुम्हांला 'पिता असा होईन', तुम्ही 'मला पुत्र' व कन्या असे व्हाल, असे सर्वसमर्थ प्रभू म्हणतो."* (२ करिंथ. ६:१८)

शिवाय, देव केवळ आपल्यावर असलेल्या त्याच्या प्रेमाची तुलना पालकांची मुलांवर असलेल्या प्रेमाशी करत नाही. आपला निर्माणकर्ता कल्पनेला दुसऱ्या स्तरावर घेऊन जातो, लोकांवरील त्याच्या प्रेमाचे नाते आणि गहनता यांची तुलना पुरुषाचे त्याच्या प्रिय वधूवर असलेल्या प्रेमाशी करतो.

*''परमेश्वर म्हणतो, त्या दिवशी असे होईल की तू मला 'इशी'* (माझा पती) *म्हणशील, ह्यापुढे कधी मला 'बआली'* (माझा धनी) *म्हणणार नाहीस. .....मी तुला सर्वकाळसाठी आपली वाग्दत्त असे करीन, नीतीने व न्यायाने, व ममतेने व दयेने मी तुला आपली वाग्दत्त असे करीन. मी तुला निष्ठापूर्वक वाग्दत्त करीन व तू परमेश्वराला ओळखशील.''* (होशेय २:१६, १९-२०)

पृथ्वीवरील दोन व्यक्तींमधील सर्वात समाधानकारक नातेसंबंधाची कल्पना करा आणि मग त्यावर विचार करा : देव आपल्याला ते नातेसंबध अनुभवण्यासाठी आमंत्रित करतो तो संबंध पृथ्वीवरील सर्वोत्कृष्ट मानवी संबंधांपेक्षा अमर्यादपणे अधिक अद्भुत आहे.

तुमच्या निर्माणकर्त्याबरोबर वैयक्तिक नातेसंबंधावाचून, तुमचे जीवन अपूर्ण आणि असमाधानी असेल. पृथ्वीवरील मालमत्ता, आनंद, प्रतिष्ठा, लोक किंवा प्रार्थना कितीही असल्या तरी तुमच्या जीवामधील पोकळीला भरू शकणार नाही. तुमच्या हृदयातील रिकामी जागा केवळ परमेश्वरच व्यापू शकतो जी त्याने स्वतःसाठी तयार केली आहे.

*''कारण त्याने तान्हेल्या जिवास तृप्त केले; भुकेल्या जिवास उत्तम पदार्थांनी संतुष्ट केले.''* (स्तोत्र. १०७:९)

येथे एक मुद्दा आहे तो चुकता कामा नये : एक सत्य देव धर्माच्या विधींमध्ये आनंदित होत नाही, परंतु त्यांच्याबरोबर एका प्रामाणिक संबंधात जे त्याजवर विश्वास ठेवतात.

वेगवेगळ्या स्तरांवर देवाने सहवासाचा आनंद घेतला आहे आणि त्याच्यासह कायमचा आनंद घेईल :

- **स्वतः**. अनंतकाळासाठी, शाश्वत पिता, शाश्वत पुत्र आणि शाश्वत पवित्र आत्मा यांच्यामध्ये प्रेमळ सहवास प्रवाहित होत आहे. उदाहरणार्थ, पवित्र शास्त्र पुत्र पित्याला म्हणताना नोंद करते, *''पित्या, ....जगाच्या स्थापनेपूर्वी तू माझ्यावर प्रीती केली आहे.''* (योहान १७:२४)
- **देवदूत**. त्याने देवदूतांना त्यास ओळखावे आणि त्याजवर प्रीती करावी, आणि त्याच्या अद्भुत गौरवाची सदैव प्रशंसा करावी म्हणून निर्माण केले. *''देवाचे सर्व दूत त्याला नमन करोत.''* (इब्री. १:६)
- **लोक.** देवाने मानवास एके दिवशी त्यांच्या निर्माणकर्त्यासोबत देवदूतांना मिळणाऱ्या आनंदापेक्षा घनिष्ठ नातेसंबध मिळावा म्हणून निर्माण केले. दावीद राजाने लिहिले :

*"आकाश जे तुझे अंगुलीकार्य व त्यात तू नेमलेले चंद्र व तारे ह्यांच्याकडे पाहावे ते-मर्त्य मनुष्य तो काय की तू त्याची आठवण करावीस? मानव तो काय की तू त्याला दर्शन द्यावेस? तू त्याला देवापेक्षा किंचित कमी असे केले आहेस; त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस"* (स्तोत्र. ८:३-५). देवाची त्याच्या लोकांसोबत राहण्याची इच्छा होती. तथापि, मनुष्याची प्रथम परीक्षा घेतली पाहिजे.

## सातवा दिवस : सृष्टी निर्मिती पूर्ण झाली

महत्वाच्या भागाच्या माहितीसह सृष्टी निर्मितीचे कथन पूर्ण होते

*"आपण केलेले सर्व फार चांगले आहे असे देवाने पाहिले, संध्याकाळ झाली व सकाळ झाली. हा सहावा दिवस. ह्याप्रमाणे आकाश व पृथ्वी आणि तेथील सर्वकाही सिद्ध झाले. देवाने केलेले आपले काम सातव्या दिवशी संपवले, केलेल्या सर्व कामापासून त्याने सातव्या दिवशी विसावा घेतला."* (उत्पत्ती १:३१; २:१-२)

देवाचे सक्रीय कार्य पूर्ण झाले. त्याने केलेल्या सर्व गोष्टींमध्ये आनंद करण्याची वेळ आली होती. परमेश्वराने सातव्या दिवशी विसावा घेतला नाही कारण तो थकला होता. स्वयं-अस्तित्वात असणारा एकच ज्याच्या नावाचा अर्थ *"मी आहे"* आहे तो कधीही थकत नाही. देवाने विसावा घेतला (काम करणे थांबवले) कारण त्याचे सक्रीय कार्य **पूर्ण** झाले होते.

परमेश्वर देव समाधानी झाला होता.

सर्वकाही परिपूर्ण होते.

दोन परिपूर्ण लोक राहत असलेल्या परिपूर्ण जगाची कल्पना करा ज्यांना त्यांच्या परिपूर्ण निर्माणकर्त्यासोबत वाढत्या मैत्रीचा आनंद घेण्याचा विशेषाधिकार मिळाला होता. प्रारंभाच्या काळात गोष्टी अशाच होत्या.

ओह, आज आपला थकलेला ग्रह परिपूर्णतेपासून दूर आहे. वाईट आणि अनैतिकता, शोक आणि वेदना, दारिद्र्य आणि भूक, द्वेष आणि हिंसा, आणि आजारपण आणि मृत्यू विपुल आहेत.

देवाच्या परिपूर्ण पृथ्वीला काय झाले?

तो कथेचा पुढील भाग आहे.



# धडा ११

# वाइटाचे प्रवेशद्वार

*" हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर, त्याचे सर्व उपकार विसरू नकोस; .......अहो परमेश्वराच्या **दूतांनो**, .....आणि **त्याचा शब्द** ऐकून त्याप्रमाणे चालता ते तुम्ही त्याचा धन्यवाद करा. अहो परमेश्वराच्या **सर्व सैन्यांनो**, जे तुम्ही ..... त्याचा मनोदय **सिद्धीस नेता**, ती तुम्ही त्याचा धन्यवाद करा. परमेश्वराच्या **सर्व कृत्यांनो, त्याच्या साम्राज्यातील** सर्व ठिकाणी......!"*

–*दावीद राजा* (स्तोत्र. १०३:२, २०-२२)

**दे**वाने मानवास बनवण्यापूर्वी, त्याने असंख्य आत्मिक जीवांना निर्माण केले त्यांना देवदूत म्हणतात. देवाने त्यांना त्याचा आनंद आणि स्तुतीसाठी निर्माण केले होते. ते *"**त्याचे** स्वर्गीय सैन्य"* होते, जाणणे, सेवा करणे, आनंद घेणे, आणि त्यांचा निर्माणकर्ता-मालकाची सदैव स्तुती करण्यासाठी त्यांची रचना केली होती. देवाने देवदूतांना प्राण्यांप्रमाणे निर्मिती केली नव्हती, जे प्रामुख्याने अंत:प्रेरणेनुसार कार्य करतात. जसे मनुष्याचे आहे, तसे देवाने देवदूतांना त्याच्या वचनाचे पालन करायचे, त्याची इच्छा पूर्ण करायची आणि त्याच्या नावाची स्तुती करायची की नाही हे निवडण्याची नैतिक जबाबदारी दिली होती.

## चमकणारा एक

सर्वात शक्तिशाली आणि विशेषाधिकार असलेला आध्यात्मिक-जीवाचे नाव लुसीफर होते, त्या नावाचा अर्थ, चमकणारा एक.[१२२] या तेजस्वी देवदूताचे वर्णन *"पूर्णतेची मुद्रा, ज्ञानपूर्ण व सर्वांगसुंदर"* असे केले आहे. (यहेज्केल २८:१२)

देवाने सर्व तपशील प्रकट केले नसले तरी, या भव्य देवदूता द्वारेच दुष्टता आणि अपूर्णता प्रथम विश्वात आली हे आपल्याला माहित आहे.

देव लुसीफर बद्दल बोलतो,

***"तुला निर्माण केले त्या दिवसापासून तुझ्या ठायी अधर्म दिसून येईपर्यंत तुझी चालचलणूक यथायोग्य होती***....*तुझ्या* ***सौंदर्याच्या अभिमानाने तुझे हृदय उन्मत झाले....तू*** *आपल्या मनात म्हणालास, '****मी*** *आकाशात चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च* ***करीन****, उत्तर भागातील पर्वतावर* ***मी*** *विराजमान होईन,* ***मी*** *मेघांवर आरोहण करीन,* ***मी*** *परात्परासमान होईन."* (यहेज्केल २८:१५, १७; यशया १४:१३-१४)

देवाची स्तुती आणि आज्ञापालन करण्याऐवजी, पाच वेळा लुसीफरने म्हटले, *"मी असे ...करीन!" "परात्परासमान होण्याची"* त्याची इच्छा होती.

त्याच्या स्वतःचे सौंदर्य आणि बुद्धीमत्तेने आंधळे होऊन, आणि त्याच्याकडे जे काही आहे ते त्याला कोणी दिले हे विसरून, या देवदूत जिवाने तो देवापेक्षा शहाणा आहे या विचाराने स्वतःची फसवणूक केली. स्वर्गाच्या सर्व सैन्यांनी निर्माणकर्त्याऐवजी त्याची स्तुती करावी अशी त्याची इच्छा होती, पण निर्माणकर्ता हाच फक्त उपासना आणि स्तुतीस पात्र आहे.

लुसीफरने या बंडखोरीमध्ये त्याच्याबरोबर सामील होण्यासाठी स्वर्गातील एक तृतीयांश देवदूतांना देखील वळविले होते.[१२३] अशा प्रकारे, चमकणारा एक याने देवाचे राज्य पाडून स्वर्गाच्या सिहासनावर बसण्याची योजना आखली.

देवाच्या विश्वामध्ये पापाने प्रवेश केला.

## पाप म्हणजे काय?

पवित्र शास्त्र आपल्यासाठी पापाची व्याख्या करते.

- *"पाप* ***स्वैराचार*** *आहे."* (१ योहान ३:४)
- *"सर्व प्रकारची* ***अनीती*** *पापच आहे."* (१ योहान ५:१७)
- *"चांगले करणे कळत असून* ***जो ते करत नाही*** *त्याचे ते पाप आहे."* (याकोब ४:१७)
- *"पापाने* ***सर्व प्रकारचा लोभ*** *निर्माण केला आहे."* (रोम. ७:८)
- *"पाप हे* "देवाच्या गौरवाला **उणे पडणे** आहे." (रोम. ३:२३)

*"देवाचे गौरव"* देवाची परिपूर्ण शुद्धता आणि निष्कलंक परिपूर्णतेला संबोधते. "उणे पडणे' याचा अर्थ परिपूर्ण धार्मिकतेच्या ध्येयावर लक्ष्य केंद्रित करण्यापासून नजर चुकवणे आहे.

पाप म्हणजे पवित्र स्वभाव आणि देवाच्या इच्छेनुसार पूर्णपणे जगण्यात अपयश.

त्याच्या मवाळ स्वरुपात, पाप ही शाश्वत अस्तित्वाची निवड आहे, मग ते देवदूत किंवा मानव असोत, देवाच्या मार्गाला उंचावणे आणि त्याचे अनुसरण करण्याऐवजी स्वतःला उंच

करणे आणि *"त्याच्या स्वतःच्या मार्गाकडे"* वळणे (यशया ५३:६).

देवापासून अलिप्त होऊन विचार करणे किंवा कृती करणे पाप आहे. तोच मार्ग लुसीफर आणि त्याच्याबद्दल सहानुभूती दाखवणाऱ्या देवदूतांनी निवडला होता. त्यांच्या निर्माणकार्त्यावर अवलंबून राहण्याऐवजी, ते त्यांच्या **हृदयात अभिमानी** झाले आणि त्यांच्या स्वतःच्या मार्गाकडे वळले.

> *"प्रत्येक **गर्विष्ठ मनाच्या** मनुष्याचा परमेश्वराला वीट येतो; त्याला शिक्षा झाल्यावाचून राहणार नाही हे मी टाळी देऊन सांगतो."* (नीतिसूत्रे १६:५)

घृणास्पद हा एक मजबूत शब्द आहे, म्हणजे घृणास्पद वस्तू, घृणास्पद कृत्य, प्रदूषण किंवा मूर्तीपूजा. देव स्वार्थीपणाचा द्वेष करतो. अभिमान हे पाप आहे.

तुमच्या घरातील कुजणाऱ्या डुकराचे शव तुमच्यासाठी जसे घृणास्पद असेल तसेच त्याच्या उपस्थितीत पापाला राहू देणे हे त्याहीपेक्षा जास्त घृणास्पद असेल. माझ्या चहातील विषाचा एक थेंब जसा मला मान्य नाही तसेच माझ्यामधील एकही पाप देवाला मान्य असणार नाही. आपल्या घरातील सडलेले शव किंवा चहातील विषाचा थेंब आपण का सहन करू शकत नाही? अशा गोष्टी आपल्या स्वभावाच्या विरोधात जातात.

पाप हे देवाच्या स्वभावाच्या विरोधात जाते.

> *"हे परमेश्वरा, माझ्या देवा, माझ्या पवित्र प्रभू तू अनादि काळापासून आहेस ना?....तुझे डोळे इतके पवित्र आहेत की दुष्टता तुझ्याने पाहवत नाही, अनाचाराकडे दृष्टी लाववत नाही, तो तू ह्या बेईमानी करणाऱ्यांकडे का पाहत राहतोस?* (हबक्कूक १:१२-१३)

## सैतान, भूते आणि नरक

देवाचे गौरव हिरावून घ्यावे आणि त्याच्या अधिकारावर कब्जा करावा ही लुसीफरची इच्छा होती त्यामुळे, देवाने सर्वोच्च स्वर्गातील त्याच्या ठिकाणाहून त्याला आणि त्याच्यासोबत ज्या देवदूतांनी त्याचा पक्ष घेतला त्यांना हाकलून दिले. लुसीफरचे बदललेले नाव **सैतान**, म्हणजे शत्रू. त्याला सैतान देखील म्हणतात, म्हणजे दोष देणारा. पतित देवदूत वाईट आत्मे किंवा **भूते** म्हणून ओळखली जातात, म्हणजे जाणणारे जन.

सैतान आणि त्याच्या भूतांना देव कोण आहे हे माहित आहे आणि ते त्याच्यासमोर थरथर कापतात; तरीसुद्धा ते त्याचा पराभव करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

परंतु ते जिंकणार नाहीत.

पवित्र शास्त्र भविष्यवाणी करते, पूर्वनियुक्त दिवशी, सैतान आणि त्याच्या भूतांना *"सार्वकालिक अग्नी जो सैतान आणि त्याच्या देवदूतांसाठी तयार केला आहे"* त्यामध्ये टाकण्यात येईल (मत्तय २५:४१). *"सार्वकालिक अग्नी"* हे एक खरे ठिकाण आहे जेथे देव त्याच्या पवित्र स्वभावाला अनुरूप नसलेल्या सर्व गोष्टींना कायमचे वेगळे ठेवेल.

जे सैतानाच्या साम्राज्यात जाऊन मिळतात त्यांच्यासाठी असणाऱ्या शिक्षेच्या ठिकाणाचे वर्णन करण्यासाठी ग्रीक नवीन करारात वापरलेला एक शब्द हा गेहेन्ना आहे, बऱ्याचदा त्याचा अनुवाद नरक[१२४] असे करतात. हा शब्द अक्षरशः जळणाऱ्या कचराकुंडीला सूचित करतो.

मी आणि माझ्या पत्नीने आमच्या मुलांचे संगोपन केले तेथे सेनेगलमध्ये कचरा टाकण्याचे एक ठिकाण होते जेथे लोक कचरा आणि निकामी वस्तू टाकत असत. शेजारी राहणारे लोक दुर्गंधीयुक्त कचरा जाळण्याचा प्रयत्न करत असल्याने कचराकुंडी अनेकदा धुमसत असे. निरुपयोगी समजली जाणारी कोणतीही वस्तू आगीत टाकली जात असे.

नरक ही *"कचराकुंडी"* आहे जेथे त्यांच्या पापात मरणाऱ्या मृतांना सध्या ठेवण्यात आले आहे. एके दिवशी, सैतान, त्याची भूते आणि नरकातील सर्व रहिवाशांना अग्नी आणि गंधकाचे सरोवर नावाच्या अंतिम न्यायाच्या ठिकाणी फेकले जाईल.[१२५]

पाप देवाच्या विश्वाला कायमचे दूषित करणार नाही.

## सैतानाचा उद्देश

सैतान आणि त्याच्या दुरात्म्यांचा विचार केला तर, त्यांना अजून अग्नीच्या सरोवरात टाकलेले नाही. त्याऐवजी, ते जगात कार्यरत आहेत. पवित्र शास्त्र सैतानाला *"अंतरिक्षातील राज्याचा अधिपती म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत* ***आता*** *कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपती"* म्हणून ओळखत आहे. (इफिस. २:२)

सैतान शक्तिशाली असला तरी तो सर्वशक्तिमान नाही हे समजून घेणे महत्वाचे आहे. तो एक सृजित जीव आहे आणि त्यातच एक पतित जीव आहे. सैतानाची परमेश्वराशी बरोबरी नाही. सैतानाला *"या युगाचा देव"* म्हटले आहे. त्याचे ध्येय हे लोकांना एक सत्य देवाला ओळखण्यापासून आणि ज्या उद्देशासाठी त्यांना निर्माण केले आहे ते स्वीकारण्यापासून रोखणे आहे.

> *"परंतु आमची सुवार्ता आच्छादलेली असल्यास ज्यांचा नाश होत आहे त्यांच्या ठायी ती आच्छादलेली आहे. त्यांची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या* ***लोकांची मने ह्या***

> ***युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत,*** *अशा हेतूने की, देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये."* (२ करिंथ. ४:३-४)

सैतानाचा उद्देश काय आहे? देवाचा संदेश ऐकणे आणि विश्वास ठेवण्यापासून लोकांची मने आंधळी करणे आणि त्यांना रोखण्याचा तो प्रयत्न करत आहे. हे एक युद्ध आहे जे सैतान जिंकू शकत नाही, परंतु तो शक्य तितक्या लोकांना त्याच्यासह होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आणि त्याला आशा आहे की त्यात तुमचा समावेश होईल.

आदाम व हव्वा यांना देवाच्या गौरवासाठी आणि आनंदासाठी निर्माण करण्यात आले आहे हे जाणून सैतानाने देव आणि मानव यांच्यातील मैत्री बिघडवण्याचा कट रचला. अर्थातच, परमेश्वर देव, जो *"मनातील गुप्त गोष्टी जाणतो"* (स्तोत्र. ४४:२१), सैतानाने जी योजना करण्याचे ठरवले आहे आणि ते सर्वकाही जे घडणार आहे ते सर्वकाही त्याला माहित आहे.

देवाची स्वतःची एक योजना होती.

## एक नियम

देवाने मानवाला त्यांच्या निर्माणकर्त्यावर प्रेम करावे, स्तुती करावी आणि आज्ञापालन करावे की नाही यामध्ये निवड करण्याची स्वतंत्रता दिली. खरे प्रेम जबरदस्तीने किंवा पूर्वप्रोग्राम केलेले असू शकत नाही. प्रेमामध्ये व्यक्तीचे मन, हृदय आणि इच्छेचा समावेश असतो. देव त्याच्या विश्वाचा सर्वाभौमिक राजा आहे हे खरे असले तरी, शाश्वत प्रभावाच्या निवडीसाठी तो मनुष्याला जबाबदार धरतो, हे देखील सत्य आहे.

देवाने स्त्रीला निर्माण करण्यापूर्वी, पुरुषाला एक आज्ञा दिली होती. आदाम हा मानवजातीचा मस्तक असल्याने, देवाने त्याच्यासमोर परीक्षा ठेवली.

> *"तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला अशी आज्ञा दिली की, बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ यथेच्छ खा; पण बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी* ***तू खास मरशील****."*
> (उत्पत्ती २:१६-१७)

देवाच्या साध्या सूचनांकडे लक्ष द्या. आदाम बागेतील पुष्कळ झाडांमधून एक सोडून सर्व स्वादिष्ट फळे मुक्तपणे घेऊ शकत होता. देवाने आदामाला सांगितले होते जर त्याने आज्ञा मोडली तर काय घडणार होते. *"कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील."*

रेषा ओलांडणे म्हणजे उल्लंघन करणे, पाप साठी आणखी एक संज्ञा. जसे लुसीफरच्या प्रकरणात, विश्वाच्या परमेश्वराच्या विरुद्ध बंडखोरी केल्याने भयंकर परिणाम होतील.

जरी पहिला मनुष्य हा परिपूर्ण होता, तरी तो परिपूर्णपणे परिपक्व नव्हता. या एका नियमासह, मनुष्याला त्याच्या निर्माणकर्त्यासोबत नातेसंबंधात वाढण्याची संधी दिली गेली. आदामाने कृतज्ञता आणि प्रीतीच्या अंत:करणापासून त्याचे आज्ञापालन करण्याची निवड करावी ही देवाची इच्छा होती. देवाने त्याच्यासाठी जे सर्व केले होते त्याचा विचार करून, ते पुरेसे सोपे झाले पाहिजे होते.

याविषयी विचार करा! देवाने आदामाला एक शरीर, जीव आणि आत्मा दिला होता. त्याने त्यास निर्माणकर्त्याचे पवित्र आणि प्रेमळ स्वभाव प्रतिबिंबित करण्याच्या विशेषाधिकाराने आशीर्वादित केले होते. त्याने त्याला एका भव्य बागेत ठेवले आणि त्याचे जीवन शुद्ध आनंद आणि समाधानाचे बनवण्यासाठी कल्पना करण्यायोग्य प्रत्येक लाभ प्रदान केला होता. देवाने त्याला जबाबदार निवडी करण्यासाठी स्वातंत्र्य आणि क्षमता देखील दिली होती. त्याने आदामाला एक प्रेमळ पत्नी दिली आणि त्यांना निर्माण केलेल्या जगाची देखरेख आणि काळजी सोपविली होती. सर्वात उत्तम, परमेश्वर स्वतः बागेत चालण्यासाठी आणि आदाम व हव्वेसोबत बोलण्यासाठी बागेत येत असे. देवाने त्यांना त्यांचा निर्माणकर्ता-मालकाला ओळखण्याची संधी दिली. ते एक परिपूर्ण जग होते.

मग एके दिवशी सर्प आला.

**"देवाने तुम्हांला सांगितले, हे खरे काय?"**

उत्पत्तीच्या तिसऱ्या अध्यायात मानवी इतिहासातील सर्वात दु:खद आणि दूरगामी घटनेची नोंद आहे.

एके दिवशी हव्वा आणि आदाम निषिद्ध झाडाजवळ होते, सैतान त्यांना एका कपटी सर्पाच्या प्रकारात प्रकट झाला. आपल्याला माहित आहे तो सैतान होता कारण पवित्र शास्त्र नंतर त्यास *"सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे, तो जुनाट साप"* म्हणून ओळखतात. (प्रकटीकरण १२:९)

जशी देवाची मानवजातीसाठी योजना होती, तशीच सैतानाचीही आहे.

*"परमेश्वर देवाने केलेल्या सर्व वनचरांत सर्प फार धूर्त होता. तो स्त्रीला म्हणाला, 'तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे* ***देवाने तुम्हांला सांगितले हे खरे काय?****"* (उत्पत्ती ३:१)

सैतानाने पुरुषाऐवजी स्त्रीशी बोलण्याची निवड केली. त्याने हव्वेला सांगितलेली पहिली गोष्ट तुम्ही ऐकली का?

*"देवाने तुम्हांला* ***सांगितले*** *हे खरे काय?"*

हव्वेने **देवाच्या वचनावर** विश्वास ठेवावा अशी सैतानाची इच्छा नव्हती. देवाची

बुद्धी आणि अधिकारावर तिने प्रश्न करावा अशी त्याची इच्छा होती. त्याने हव्वेला तिच्या निर्माणकर्त्याला आव्हान देण्याचे धाडस केले, जसे, लुसीफरने केले होते. आजच्या दिवसापर्यंत सैतान सत्याविरुद्ध लढा देतो, कारण ते त्याला बदनाम करते आणि नि:शस्त्र करते. प्रकाश जसा अंधाराला दूर करतो, तसेच देवाचे वचन सैतानाची फसवणूक दूर करते.

सैतानाने हव्वेला **देवाच्या चांगुलपणा**बद्दल शंका घेण्यास प्रोत्साहित करून देवाच्या चारित्र्यावरही हल्ला केला.

*"तुम्ही बागेतल्या **कोणत्याही** झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांला सांगितले हे खरे काय?"*

सैतानाने देवाच्या वचनाचा विपर्यास केला, जणू त्यांचा उदार निर्माणकर्ता, ज्याने त्यांना जीवन दिले आहे आणि एक सोडून सर्व झाडांपासून मुक्तपणे खाण्याचा अधिकार दिला आहे, त्यांना निश्चित चांगल्यापासून रोखून ठेवायची त्याची इच्छा होती.

### "तुम्ही खरोखर मरणार नाही!"

"स्त्रीने सर्पाला म्हटले, 'बागेतल्या झाडांची फळे खाण्याची आम्हांला मोकळीक आहे. पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडाच्या फळाविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शही करू नका, कराल तर मराल.'

सर्प स्त्रीला म्हणाला, **'तुम्ही खरोखर मरणार नाही**; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील, आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल." (उत्पत्ती ३:२-५)

हव्वेने केवळ देवाच्या वचनावर आणि चांगुलपणावर संशय घ्यावा एवढीच सैतानाची इच्छा नव्हती, तर तिने देवाच्या नीतिमत्वावर देखील संशय घ्यावा अशी त्याची इच्छा होती, जणू तिने निषिद्ध फळ चाखले तर देव खरोखर मृत्यूदंड लादणार नाही.

देवाने हे स्पष्ट केले होते :

*"ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास **मरशील**."* (उत्पत्ती २:१७)

*"तुम्ही खरोखर मरणार **नाही!**"* असे म्हणत सैतानाने ते नाकारले.

सैतानाची मूळ पद्धत बदललेली नाही. देवाचा संदेश तो विकृत करत नाकारत आहे. देवाच्या वचनावर, चांगुलपणावर आणि नीतिमत्वावर आपण शंका घ्यावी अशी त्याची इच्छा आहे.

सैतानाची इच्छा आहे की आपल्या निर्माणकर्त्यावर विश्वास ठेवला जाऊ शकत नाही, जे असल्याचा दावा करतो तो करतो ते तो खरोखर नाही असा आपण विचार करावा.

## अतिशय धार्मिक सैतान

सैतानाला धर्माची खूप आवड आहे. हेच कारण आहे की आज जगामध्ये १०, ००० पेक्षा अधिक धार्मिक व्यवस्था आहेत. हव्वेला सांगून सैतानाने देवासाठी बोलण्याचे नाटक कसे केले ते पाहा, *''कारण **देवाला हे ठाऊक आहे** की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील.''*

सैतानाला सर्वशक्तिमान देवाचे सोंग करणे आवडते. देवाचे सत्य घेणे आणि ते स्वतःच्या लबाडींमध्ये मिसळण्यात तो तज्ञ आहे. तो महान समन्वयवादी, अनुकरण करणारा साहित्यिक आणि नकली आहे. जगातील सर्वात विचित्र विश्वास प्रणालींमध्येही सत्याचे संकेत आहेत. तेच त्यांना विश्वसनीय बनवते. पुन्हा, अरबी म्हण चांगले म्हणते : *''सावधान : काही खोटे बोलणारे सत्य सांगत आहेत!''*

त्याच्या पहिल्याच प्रयत्नात बनावट धर्म सुरु करताना, सैतानाने हव्वेला सांगितले, *''तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल.''* जेव्हा सैतानाने हव्वेला सांगितले, *''तुम्ही देवासारखे व्हाल,''* तेव्हा त्याने खोटे बोलले, कारण एक जो पाप करतो तो देवासारखा नाही परंतु सैतानासारखा आहे, ज्याला देवाचा अधिकार बळकावयाचा आहे. तथापि, जेव्हा सैतानाने म्हटले, *''तुम्ही बरेवाईट जाणणारे व्हाल,''* तेव्हा त्याने सत्य म्हटले, परंतु अशा ज्ञानासोबत असणारी कटुता, दु:ख आणि मृत्यू याबद्दल त्याने सांगितले नाही.

लक्षात घ्या की सैतानाने परमेश्वराविषयी बोलताना, फक्त देव हा सामान्य शब्द वापरला. जर तुम्ही एका देवावर विश्वास ठेवत असाल तर सैतान खूप आनंदी आहे, जोपर्यंत तुम्हांला असे वाटते की देव दूरचा आणि अज्ञात आहे.

> *''एकच देव आहे, अस विश्वास तू धरतोस काय? ते बरे करतोस; भूतेही तसाच विश्वास धरतात व थरथर कापतात.!''* (याकोब २:१९)

सैतान आणि त्याची भूते ही सर्व एकेश्वरवादी आहेत जी सर्वशक्तिमान देवासमोर थरथर कापतात. हे आतापासून अनेक प्रकरणांमध्ये धक्कादायक स्पष्टीकरणासह उघड होईल. सैतान आणि त्याच्या पतित देवदूतांना येथे केवळ एकच सत्य देव आहे हे माहीत आहे, पण, ओह, तरीही ते त्याचा किती द्वेष करतात!

तुम्ही तुमच्या निर्माणकर्त्या-मालकाला आत्म्याने आणि खरेपणाने जाणून घ्यावे, प्रीती करावी, आज्ञापालन करावे आणि उपासना करावी अशी त्यांची इच्छा नाही.

## निवड

आदाम व हव्वेसाठी त्यांच्या प्रेमळ परमेश्वराचे शब्द आणि त्यांच्या मुख्य शत्रूचे शब्द यापैकी एक निवडण्याचा क्षण आला होता.

विजयाचे सूत्र स्पष्ट होते : निर्माणकर्त्याच्या ज्ञानावर विश्वास ठेवावा. किती सरळ! आदाम व हव्वेला केवळ एवढेच करायचे होते की देवाच्या प्रेरित, अचूक वचनातून संदर्भ द्यायचा, हे म्हणत, *''परमेश्वर देवाने आम्हांला आज्ञा दिली आहे : ''*बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको.*'' आम्ही त्यातून खाणार नाही! संपले.''*

आदाम व हव्वा जर देवाच्या अपरिवर्तनीय वचनावर ठाम राहिले असते, तर परीक्षक पळून गेला असता. पण त्यांनी तसे केले नाही.

> *''त्या झाडाचे फळ खायला चांगले, दिसायला मनोहर आणि शहाणे करायला इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले; तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले, आणि आपल्याबरोबर आपल्या पतीलाही ते दिले व त्याने ते खाल्ले.''* (उत्पत्ती ३:६)

तिने ते खाल्ले. त्याने ते खाल्ले.

त्यांच्या पवित्र आणि प्रेमळ निर्माणकर्त्याच्या वचनाच्या अधीन होण्याऐवजी, ते देवाच्या शत्रूच्या अधीन झाले. त्यांनी निषिद्ध क्षेत्रात घुसखोरी केली.

आदामाने बेकायदेशीर फळ चाखल्यानंतर त्याचे परिणाम हे ताबडतोब होते.

> *''**तेव्हा** त्या उभयतांचे डोळे उघडले आणि आपण नग्न आहोत असे त्यांना कळून आले; तेव्हा त्यांनी अंजिराची पाने शिवून आपणासाठी कटीवेष्टने केली. ह्यानंतर शिळोप्याचा वारा सुटला असता परमेश्वर देव बागेत फिरत होता, त्याचा आवाज त्यांना ऐकू आला, तेव्हा परमेश्वर देवाच्या दृष्टीपुढून आदाम व त्याची स्त्री बागेतील झाडांमध्ये लपली.''* (उत्पत्ती ३:७-८)

बदल लक्षात घ्या. परमेश्वर जेव्हा त्यांना भेटण्यासाठी आला तेव्हा आनंद करण्याऐवजी, ते आता भीती आणि लज्जेने भरलेले होते.

जिव्हाळ्याचे नातेसंबंध असलेल्या या जीवांना त्यांच्या प्रेमळ परमेश्वरापासून पळून जाण्याची इच्छा कशामुळे झाली? सर्वकाही पाहणाऱ्या त्यांच्या निर्माणकर्त्यापासून ते लपू शकतात ही कल्पना त्यांना कशामुळे आली? आपल्या पहिल्या पाल्यांना त्यांची शरीरे पानांनी झाकण्याची आवश्यकता आहे असे का वाटले?

त्यांनी पाप केले होते.



# धडा १२

# पाप आणि मृत्यूचा नियम

*"जो कोणी पाप करतो तो **पापाचा दास** आहे."*

*- नासरेथचा येशू* (योहान ८:३४)

**आ**दाम व हव्वेने त्यांच्या निर्माणकर्त्या-मालकाची आज्ञा मोडली होती. सैतानाप्रमाणे, त्यांचा देवाशी संबंध तुटला आणि ते पापाचे गुलाम झाले. लेकारांप्रमाणे ज्यांनी त्यांच्या पित्याच्या स्पष्ट आज्ञा मोडली होती, आदाम व हव्वेला त्या देवासोबत आता राहण्याची इच्छा नव्हती ज्याने त्यांच्यावर प्रेम केले आणि त्यांची काळजी घेतली होती. आनंद आणि आत्मविश्वासाच्या भावना भय, मलीनता, आणि लाज या भावनांनी विस्थापित झाल्या होत्या.

*" ह्यानंतर शिळोप्याचा वारा सुटला असता परमेश्वर देव बागेत फिरत होता, त्याचा आवाज त्यांना ऐकू आला, तेव्हा परमेश्वर देवाच्या दृष्टीपुढून आदाम व त्याची स्त्री बागेतील झाडांमध्ये लपली."* (उत्पत्ती ३:८)

आदाम आणि हव्वा आता पापाने दूषित झाले होते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या निर्माणकर्त्यापासून आणि मालकापासून लपायचे होते. त्यांच्या नव्याने आत्मसात केलेल्या विवेकाने त्यांना चांगल्या आणि वाइटाची जाणीव दिली, त्यांना अंत:प्रेरणेने शिकवले की केवळ पवित्र लोकच पवित्र देवाच्या उपस्थितीत जगू शकतात. आदाम आणि हव्वा यापुढे देवासमोर शुद्ध नव्हते आणि त्यांना हे माहित होते. देव आणि मानव यांच्यातील घनिष्ठ संबंध तुटला होता.

नातेसंबंध मृत झाले होते.

## एक तुटलेली फांदी



एके दिवशी, मी एका मशिदीजवळ एका काही माणसांबरोबर बोलत होतो, पाप आणि मृत्यूच्या विषयाकडे संभाषण वळले.

मी झाडाची एक फांदी तोडली आणि त्यांना विचारले, *"ही फांदी मृत की जिवंत आहे?"*

त्यातील एका माणसाने उत्तर दिले, *"ती मरत आहे."*

दुसरा म्हणाला, *"ती मृत आहे."*

मी त्याला चिडवले, *"ती मृत आहे असे तू कसे म्हणतोस? पाहा ती किती हिरवीगार दिसते!"*

*"ती जिवंत दिसते, परंतु ती मृत आहे कारण ती त्याच्या जीवनाच्या उगमापासून वेगळी केली गेली आहे,"* त्याने उत्तर दिले.

*"अगदी बरोबर,"* मी प्रत्युत्तर दिले. *"तू पवित्र शास्त्रानुसार मृत्यूची अचूक व्याख्या दिली आहे. मृत्यू हा सर्वनाश नाही, पण जीवनाच्या उगमापासून वेगळे होणे आहे. म्हणूनच, जेव्हा प्रियजन मरण पावतात, तेव्हा त्यांना दफन करण्याआधी आपण म्हणतो, 'तो गेला आहे.' आपण असे म्हणतो कारण आपल्याला माहित आहे की व्यक्तीच्या आत्म्याने त्याच्या शरीराला सोडले आहे. मृत्यू म्हणजे वेगळे होणे."*

पुढे, देवाने आदामाला दिलेल्या आज्ञेचे मी त्या माणसांसाठी पुनरावलोकन केले. मग मी त्यांना विचारले, *" आदामाने देवाच्या विरुद्ध पाप केल्यावर त्याला काय होईल असे देव बोलला? त्याने आदामाला असे म्हटले का? की जर त्याने निषिद्ध फळ खाल्ले, तर त्याने धार्मिक विधी, प्रार्थना, उपास, दानधर्म करावे, आणि मशिदीत किंवा चर्चला जाणे सुरु करावे?"*

*"नाही,"* त्यांनी प्रतिसाद दिला, *"देव म्हणाला आदाम मरण पावेल."*

*"बरोबर. देवाने ते स्पष्ट केले होते : पापासाठी शिक्षा ही मृत्यू होय. परंतु, मला सांगा, आदामाने व हव्वेने देवाची आज्ञा मोडल्यानंतर आणि निषिद्ध फळ खाल्ल्यानंतर, ते त्याच दिवशी मरण पावले का?"*

*"नाही!"* त्यांनी उत्तर दिले.

*"ठीक, मग, देवाने जेव्हा आदामाला असे सांगितले त्याचा अर्थ काय होता, 'ज्या दिवशी तू ते फळ खाशील, त्या दिवशी तू खास मरशील!'"?*

तेथून पुढे मी देवाने केलेल्या मृत्यूच्या व्याख्येचे आणखी वर्णन केले : त्यांच्या निर्माणकर्त्याची आज्ञा मोडण्याच्या मनुष्याच्या निवडीद्वारे आणलेले त्रि-आयामी विभाजन.

## पापामुळे होणारा तिहेरी वियोग

### १. आध्यात्मिक मृत्यू : एका व्यक्तीचा आत्मा आणि जीव देवापासून वेगळा होणे.

ज्या दिवशी आदाम व हव्वेने देवाविरुद्ध पाप केले त्या दिवशी ते आध्यात्मिकदृष्ट्या मरण पावले. झाडावरून फांदी तुटल्याप्रमाणे, आदाम आणि हव्वेचे परमेश्वरासोबतचे घनिष्ठ नातेसंबंध नष्ट झाले. आणि गोष्ट आता आणखी वाईट झाली. आदामाचे व हव्वेचे सर्व वंशज हे त्याच आध्यात्मिक मृत्यूच्या *"फांदीचे"* भाग आहेत.

*"आदामामध्ये सर्व मरतात...."* (१ करिंथ. १५:२२)

पवित्र शास्त्रातून स्पष्ट शिकवण असतानाही, मानवजाती ही आदामापासून उत्पन्न झाली आहे यावर पुष्कळ लोक जे विश्वास ठेवतात ते यावर जोर देतात की नवजात बाळे ही शुद्ध, निष्पाप स्वभावाने जन्मतात.

तुटलेल्या फांदीचा पुन्हा विचार करा.



झाडापासून वेगळे झाल्याच्या कारणामुळे तिचा कोणता भाग हा मृत झाला आहे? संपूर्ण फांदी ही मृत आहे, ज्यामध्ये टोकाला असणाऱ्या लहान डहाळयांचा समावेशही आहे. जर त्या लहान डहाळ्या आणि पाने बोलू शकली असती, तर कदाचित ते याप्रमाणे काहीतरी बोलले असते, *"आता एक मिनिट थांबा! ही आमची चूक नाही, फांदी झाडापासून तुटली! इतर कोणीतरी जे केले त्याद्वारे आम्ही प्रभावित नाही!"* परंतु ते प्रभावित झाले होते. त्याचप्रमाणे, देवाचे वचन घोषित करते

संपूर्ण मानवजाती ही *"आदामामध्ये"* असावी. आपण सर्व जण त्याच तुटलेल्या *"फांदीचे"* भाग आहोत, आणि आपल्यालाही त्याच परिणामांना भोगावे लागते. आपल्याला आवडो किंवा ना आवडो, जेव्हा आदामाने पाप केले तेव्हा तो स्वतः दूषित झाला आणि त्याच्याद्वारे अजूनही येणाऱ्या संपूर्ण मानवजातीला दूषित केले.

मी ज्या गावातून लिहितो त्या गावाला अनेक किलोमीटर अंतरावर असलेल्या सेनेगल नदीतून पाणी मिळते. आमच्या गावात विहीर आहे, परंतु कोणीही तिचे पाणी पीत नाहीत. का नाही? विहीर दूषित आहे. तिचे पाणी खारट आहे. विहिरीतून काढलेल्या प्रत्येक बादलीतील पाणी हे मिठाने दूषित झालेले आहे. एकही थेंब शुद्ध नाही, एकही नाही.

त्याचप्रमाणे, प्रत्येक व्यक्ती जो आदामापासून जन्मला आहे तो पापाने दूषित झाला आहे. म्हणूनच प्रत्येक लहान मुले स्वाभाविकपणे-पाप करतात. पाप हे त्यांच्या स्वभावाचा भाग आहे. चांगले आणि दयाळू होण्यासाठी विवेकपूर्ण प्रयत्न आणि संघर्ष करावा लागतो, तर स्वार्थी आणि त्रासदायक होण्यासाठी काहीही विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत. दावीद संदेष्टा स्पष्ट करतो की आपण सहज पाप का करतो :

> *"पाहा, मी जन्माचाच* ***पापी*** *आहे; माझ्या आईने गर्भधारण केले तेव्हाचाच मी* ***पातकी*** *आहे"* (स्तोत्र. ५१:५). *"**मातेच्या उदरी असतानाच** दुर्जन फितूर होतात; **ते जन्मापासूनच** असत्य बोलत बहकत जातात"* (स्तोत्र. ५८:३). *"ते **सर्व** मार्गभ्रष्ट झाले आहेत; एकूणएक बिघडला आहे, सत्कर्म करणारा **कोणी नाही, एकही नाही.**"* (स्तोत्र. १४:३)

सेनेगलच्या वोलोफ लोकांकडे अनेक महान म्हणी आहेत ज्यांनी या सत्याला समजण्यास मदत केली आहे. उदाहरणार्थ, ते म्हणतात, *"उंदीर त्या संततीला जन्म देत नाहीत जे खणत नाहीत."* त्याचप्रमाणे, पापाने-दूषित आदाम पाप न करणाऱ्या संततीला जन्म देऊ शकत नाही.

आणखी एक म्हण म्हणते, *"महामारी ज्यांनी निर्माण केली ती त्यांच्यापुरतीच मर्यादित राहत नाही."* दु:खद पण खरे आहे. जन्मजात दोष किंवा संसर्गजन्य रोगाप्रमाणे, आदामाचा पापाचा स्वभाव हा आपल्यामध्ये आणि आपल्या मुलाबाळांमध्ये पसरला.

> *"**एका माणसाच्या द्वारे** पाप जगात शिरले आणि पापाच्या द्वारे मरण शिरले; आणि **सर्वांनी पाप** केल्यामुळे **सर्व माणसांमध्ये** अशा प्रकारे **मरण पसरले.**"* (रोम. ५:१२)

पहिले वाक्य लक्षात घ्या : ***"एका माणसाच्या द्वारे*** *पाप शिरले,"* आणि शेवटचे वाक्य :

*"**सर्वांनी** पाप केले आहे."* आपल्यापैकी प्रत्येक जण जन्माने आणि कृतीने एक पापी आहे. आपण करणाऱ्या पापांसाठी आपण आदामाला दोष देऊ शकत नाही. एकदा एखादा व्यक्ती अयोग्यापासून योग्य जाणून घेण्याइतका वयस्कर झाला, की देव त्याला किंवा तिला जबाबदार धरतो.[१२६]

पवित्र शास्त्र म्हणते :

> *"**तुमचे** अपराध तुम्ही व **तुमचा** देव ह्यांच्यामध्ये आडभिंतीप्रमाणे झाले आहेत; **तुमच्या** पातकांमुळे तो **तुम्हांला** दर्शन देत नाही, **तुमचे** ऐकत नाही."* (यशया ५९:२)

> *संपूर्ण मानवी शाखा ही त्याच्या निर्माणकर्त्यापासून वेगळी झाली आहे. मनुष्य "अपराध आणि पापामध्ये आध्यात्मिकदृष्ट्या मृत" झाला आहे.* (इफिस. २:१)

### २. शारीरिक मृत्यू : एका व्यक्तीचा आत्मा आणि जीव त्याच्या किंवा तिच्या शरीरातून वेगळा होणे.

जेव्हा आदाम आणि हव्वेने पाप केले, तेव्हा ते केवळ आध्यात्मिकदृष्ट्या मेले नाहीत, तर ते शारीरिकदृष्ट्या देखील मरू लागले. ज्याप्रमाणे तुटलेल्या फांदीवरील पाने क्षणात सुकत नाहीत, तसेच आदाम आणि हव्वेची शरीरे ज्या दिवशी त्यांनी पाप केले त्या दिवशी मृत झाली नाही. तरीसुद्धा, त्यांच्या शरीरात मृत्यूने प्रवेश केला होता, एक शत्रू ज्यापासून ते सुटू शकले नाही.

आदाम आणि हव्वा आणि त्यांच्या वंशजांसाठी, त्यांना शारीरिक मृत्यू येईपर्यंतचा काही काळ होता. *"मृत्यू वेगवान उंटावर स्वारी करतो,"* असे अरबी म्हण म्हणते. मृत्यूपासून कोणीही सुटू शकत नाही. देवाचे वचन त्यास अशा प्रकारे म्हणते :

> *"ज्या अर्थी माणसांना एकदाच मरणे व त्यानंतर न्याय होणे नेमून ठेवले आहे."* (इब्री. ९:२७)

### ३. सार्वकालिक मृत्यू : एखाद्या व्यक्तीचा आत्मा, जीव आणि शरीर देवापासून कायमचे वेगळे होणे.

एक सजीव फांदीची रचना पाने, फुले आणि फळ देण्यासाठी केली आहे. वाळलेल्या फांद्यांना एकत्र करून जाळतात. जेव्हा आदामाने देवाविरुद्ध पाप केले, तेव्हा त्याला ज्यासाठी घडवले तो विशेषाधिकार त्याने गमावला : देवाचे गौरव करत सर्वकाळामध्ये त्याच्यासोबत जीवन जगण्याचा खास अधिकार त्याला होता. मनुष्याला, कायमचे अस्तित्वात राहण्यासाठी निर्माण केले होते, त्याने त्याच्या निर्माणकर्त्या-मालकाची आज्ञा मोडली. देवापासून सार्वकालिक

वियोग ही शिक्षा होती.

परमेश्वराने दयेने आदाम आणि हव्वेच्या पापावर उपाय योजला नसता, तर एकदा की त्यांची शरीरे मृत झाली, तेव्हा सैतान आणि त्याच्या भुतांसाठी तयार केलेल्या *"कचराकुंडीत"* कायमचे एकाकी फेकण्याच्या भयावह स्थितीचा त्यांना सामना करावा लागला असता. बायबल यास *"दुसरे मरण"* म्हणते कारण ते शारीरिक मृत्यूनंतर घडते. त्यास *"सार्वकालिक शिक्षा"*[१२७] देखील म्हणतात. ज्यातून लोक एके दिवशी सुटतील अशा तात्पुरत्या नरकाची कल्पना, हा मनुष्याचा शोध आहे.

जर *"सार्वकालिक शिक्षा"* अयोग्य किंवा अवाजवी वाटत असेल, तर कदाचित हे देवाचे स्वरूप, पापाची गंभीरता, आणि अनंतकाळाची संकल्पना समजून घेण्यात अयशस्वी झाल्यामुळे आहे.

पुढे आपण देवाची शुद्धता आणि पापाचा दूषितपणा यावर विचार करणार आहोत.

सार्वकालिकतेच्या संकल्पनेबद्दल, आपण हे देखील मान्य करू शकतो : प्रत्यक्ष शब्द सार्वकालिकता हा आपल्या मानसिक क्षमतेवर भार टाकतो, कारण आपल्या संदर्भाच्या चौकटीत हा समय आहे.

सार्वकालिकता शाश्वत आहे.

जर आपण अशी कल्पना केली की कोणी अब्जावधी वर्षे नरकात घालवत असेल तर आपली विचारसरणी चुकीची आहे. सार्वकालिकता ही वर्षांनी बनलेली नाही. ते आता सार्वकालिक आहे. एकदा का लोकांनी त्या न सुटणाऱ्या क्षेत्रात प्रवेश केला, तेव्हा ते त्याचे पवित्र तर्क समजून घेतील. नरकात शेवट झालेल्या श्रीमंत माणसाचा वृत्तांत तुम्हांला आठवतो का (धडा ३)? तो अजूनही तेथे आहे.

देव स्वर्गात प्रवेश करण्याच्या त्याच्या अटी स्पष्ट केल्याआहेत :

> *"तिच्यात कोणत्याही निषिद्ध गोष्टी आणि अमंगळपणा व असत्य आचरणारा इसम ह्यांचा प्रवेश होणारच नाही......"* (प्रकटीकरण २१:२७)

या मुद्यावर, येथे कोणतीही तडजोड केली जाणार नाही. ज्याप्रमाणे देवाच्या नैसर्गिक नियमाने एक तुटलेल्या फांदीला मरणे आणि सुकणे होते, त्याप्रमाणेच देवाच्या आध्यात्मिक नियमाला आध्यात्मिक, शारीरिक आणि सार्वकालिक **वेगळे होऊन** पापाला शिक्षा करण्याची आवश्यकता आहे.

## पाप आणि लाज

ह्यावेळेस आपण आदाम आणि हव्वेकडे परत जावे जेथे आपण त्यांना पूर्वी पाहिले होते; बागेच्या झाडांमध्ये देवापासून लपण्याचा प्रयत्न करत होते.

त्यांनी पाप करण्यापूर्वी, आदाम आणि हव्वा हे देवाचे गौरव आणि परिपूर्णतेने घेरलेले होते. ते त्यांच्या निर्माणकर्त्याच्या उपस्थितीत पूर्णपणे आरामात होते. तथापि, ज्याक्षणी त्यांनी देवाचा नियम मोडला, तेव्हा त्यांनी स्वतःला वेगळया प्रकारे पाहिले. आता ते केवळ त्यांच्या शारीरिक नग्नतेमुळेच नाही तर त्यांच्या आध्यात्मिक नग्नतेमुळेही आरामात नव्हते.

त्यांनी अपराध करण्यापूर्वी, आदाम आणि हव्वा देव-सचेत होते आणि *"त्यांना लाज वाटत नव्हती"* (उत्पत्ती २:२५). आता ते स्वाभाविकपणे स्वतःची जाणीव झालेले आणि त्यांना त्यांच्या पवित्र देवासमोर अशुद्ध असे वाटले. आदाम आणि हव्वा हे त्यांच्या निर्माणकर्त्याच्या अगदी विरुद्ध झाले होते. ते आता अपवित्र होते. त्यांना आता देवाच्या उपस्थितीच्या शुद्धतेत आणि तेजस्वीपणात राहण्याची इच्छा नव्हती. ज्याप्रमाणे उजेड पडल्यावर लपण्यासाठी झुरळ पळतात, त्याप्रमाणे त्यांनी आता *"प्रकाशापेक्षा अंधाराची आवडी धरली"* होती, कारण त्यांची कृत्ये वाईट होती. कारण जो कोणी वाईट कृत्ये करतो तो प्रकाशाचा द्वेष करतो आणि आपली कृत्ये **उघडकीस** येऊ नयेत म्हणून प्रकाशाकडे येत नाही." (योहान ३:१९-२०)

आदाम आणि हव्वा उघड आणि लज्जित झाले होते. त्यांना परिपूर्ण बागेत वेगळेच वाटत होते. देवाच्या वाणीने त्यांना आता भीतीने भरून टाकले. त्यांना यापुढे त्यांच्या पवित्र, प्रेमळ निर्माणकर्त्यासह राहण्याची इच्छा नव्हती. तरीसुद्धा, त्यांना शोधण्यासाठी तो बागेत आला.

हा देवाच्या स्वभावाचा भाग आहे *"की जे हरवलेले आहेत त्यांना शोधावे आणि तारावे."* (लूक १९:१०)

## देव मनुष्याला शोधत होता

*"तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला हाक मारून म्हटले, '**तू कोठे आहेस?**'*

*तो म्हणाला, 'मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणू भिऊन लपलो,' देवाने म्हटले, 'तू नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तू खाऊ नकोस अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस काय?"*(उत्पत्ती ३:९-११)

देवाने मनुष्याला विचारलेल्या पहिल्या प्रश्नाकडे लक्ष द्या.

*"तू कोठे आहेस?"*

या प्रेमळ, भेदक प्रश्नासह, देवाची इच्छा होती की आदामाने हे ओळखावे की पापाने त्याला आणि त्याच्या पत्नीला काय केले आहे. त्याची इच्छा होती की त्यांनी हे स्वीकारावे की त्यांनी उल्लंघन केले आहे. त्याची इच्छा होती की त्यांनी हे समजून घ्यावे की त्यांचे पाप हे त्यांच्या आणि त्यांच्या पवित्र परमेश्वरामध्ये आले होते.

त्यांचे पाप हे त्यांच्या दुर्दशेचे मूळ होते. त्यांच्या पापाने त्यांना लाज वाटली आणि झाडे आणि अंजिराच्या पानांमागे लपण्याचा प्रयत्न करायला लावले. परंतु आदाम आणि हव्वा देवापासून लपू शकले नाही, किंवा ते त्याच्या नीतिमान, सर्वज्ञात न्यायापासून वाचू शकले नाहीत.

## पाप मृत्यू कमावते

देव थट्टा करत नव्हता जेव्हा त्याने आदामाला सूचना दिली होती : *"ज्या दिवशी तू ते खाशील, त्या दिवशी तू खास मरशील"* (उत्पत्ती २:१७). आपल्या अंतकरणात खोलवर, आपल्याला माहित आहे की ते जे त्यांच्या निर्माणकर्त्याविरुद्ध बंडखोरी करतात ते त्याच्यापासून वेगळे होण्यास पात्र आहेत.

आपल्यापैकी अनेकांनी चित्रपट पाहिले असतील ज्यामध्ये *"वाईट व्यक्ती"* मारला जातो आणि *"चांगला व्यक्ती"* विजयी होतो. आपल्याला *"वाईट व्यक्ती"*बद्दल वाईट वाटते का? नाही, आपण विचार करतो ज्यास ते पात्र होते ते त्यांना मिळाले. पवित्र सत्यता ही आहे की देवाच्या दृष्टीसमोर, आदामाची सर्व संतती ही *"वाईट व्यक्ती"* आहेत.

> *"ते **सर्व** मार्गभ्रष्ट झाले आहेत; एकूणएक बिघडला आहे, सत्कर्म करणारा **कोणी नाही**, एकही नाही."* (स्तोत्र. १४:३)

निर्माणकर्त्याच्या न्यायाच्या आदर्शांनुसार, आपण सर्व जण मृत्यूच्या शिक्षेस पात्र आहोत. देवाचे पुस्तक यास असे संबोधते :

*"पाप आणि मृत्यूचा **नियम.**"* (रोम. ८:२)

पाप आणि मृत्यूचा **नियम** मागणी करतो की देवाविरुद्ध अवज्ञेच्या प्रत्येक कृत्यास देवापासून वेगळे करण्याने शिक्षा दिली पाहिजे.

देवाच्या पवित्र आणि विश्वासू स्वभावामुळे तो हा नियम पाळतो. केवळ पापाच्या एका कृत्यामुळे आपल्या मूळ वंशजांनी देवाच्या नीतिमान आणि जीवनाच्या राज्यापासून स्वतःला

वेगळे केले, आणि सैतानाच्या पाप आणि मृत्यूच्या राज्यात जाऊन मिळाले.

ताबडतोब, एका झाडापासून तोडलेल्या फांदीप्रमाणे, ते **आध्यात्मिकरित्या** मरण पावले. देवासोबतचे त्यांचे नातेसंबध मृत झाले.

तसेच, वाळणाऱ्या फांदीप्रमाणे. ते **शारीरिकरित्या** मरू लागले. त्यांची मृत शरीरे पुन्हा मातीत मिळण्यापुरताच काही वेळ राहिला होता.

सर्वांहून वाईट, जोपर्यंत परमेश्वर त्यांचे पाप आणि लाजेसाठी उपाय पुरवत नाही, तोपर्यंत **सार्वकालिकरित्या** मरण्याच्या भयंकर संभाव्यतेला ते तोंड देत राहतील, सैतान आणि त्याच्या भुतांसाठी तयार केलेल्या सार्वकालिक अग्नीमध्ये देवापासून कायमचे वेगळे राहतील.

पवित्र शास्त्र स्पष्ट आहे :

*"जो जीवात्मा पाप करील तोच मरेल."* (यहेज्केल १८:२०)

*"कारण पापाचे वेतन मरण आहे...."* (रोम. ६:२३)

*".....आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजवते."* (याकोब १:१५)

चांगल्या कारणास्तव देव या गंभीर वास्तविकतेला पाप आणि मृत्यूचा नियम म्हणतो. तो कायदा आहे.

पापाची शिक्षा झालीच पाहिजे.

ती पूर्ण केली जाईल.



# धडा १३

## दया आणि न्याय

**म**नुष्य काय करू शकतो जे देव करू शकत नाही?
देवाचे पुस्तक या कोडयाचे उत्तर देते.

*“....देव काही मनुष्य नाही की त्याने लबाडी करावी; तो काही मानवपुत्र नाही की त्याने अनुताप करावा; दिलेले वचन तो पाळणार नाही काय? दिलेला शब्द तो पुरा करणार नाही काय?* (गणना २३:१९)

प्रतिदिवशी माणसे खोटे बोलतात, त्यांचे विचार बदलतात आणि त्यांची वचने मोडतात. देव ह्या गोष्टी करू शकत नाही. अनंत परिपूर्ण परमेश्वर त्याच्या स्वतःच्या चरित्राच्या विरोधात कार्य करू शकत नाही.

*“..,कारण त्याला स्वतःविरुद्ध वागता येत नाही.”* (२ तीमथ्य. २:१३)

काही काळापूर्वी, मला हा ई-मेल आला :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

तुम्ही म्हणता अल्लाह स्वैरपणे क्षमा करू शकत नाही. तुम्ही म्हणता की अल्लाहचे हात त्याच्याच नियमाने बंधित आहेत. तुम्ही लिहिले : “देव स्वतःचा नाकार आणि त्याच्या नियमशास्त्राकडे दुर्लक्ष करण्यावाचून काहीही करू शकतो.” आपला परमदयाळू निर्माणकर्ता क्षमा मागणाऱ्या त्याच्या सेवकांना क्षमा करण्याची क्षमता असण्यापासून स्वतःला का रोखेल? तो त्याच्या दयेवर अशी बंधने का ठेवेल?...याला काही अर्थ नाही हे तुम्हांला दिसत नाही का? जरी त्याला असे नियम बनवावे लागले,

तरी तो त्यांना ताबडतोब मोडू शकतो कारण तो सर्व शक्तिशाली आहे! अल्लाह अंतिम सामर्थ्य असलेला कोणत्याही प्रकारे मर्यादित आहे असा युक्तिवाद करणे हे अतार्किक आहे. जर त्याची इच्छा असली, तर तो आपल्या सर्वांना नरकाच्या अग्नीत फेकून देऊ शकतो, परंतु तो सर्वात दयाळू आहे आणि नेहमी त्याच्या सेवकांना क्षमा करण्याचा प्रयत्न करतो जेणेकरून जेव्हा त्यांचा न्याय केला जाईल तेव्हा ते यशस्वी होऊ शकतील. अल्लाह त्या दिवशी आपल्या सर्वांना त्याची क्षमा प्रदान करो आणि आपल्यावर दया करो जेव्हा आपण सर्व जण एकत्र जमलेले असणार आणि केवळ न्याय होण्यासाठी उभे राहिले पाहिजे!

मागील धडयात ज्यावर आपण विचार केला त्याच्या प्रकाशात, या माणसाच्या तर्कमय विचारात तुम्हांला समस्या दिसते का? आपला निर्माणकर्ता त्याच्याच स्थापित नियमांकडे दुर्लक्ष करण्यास आणि त्याच्याच पवित्र व्यक्तिमत्वाच्या विरोधात जाण्यासाठी मुक्त आहे का?

## न्यायावाचून दया

न्यायालयाच्या या दृश्याची कल्पना करा :

न्यायाधीश न्यायपीठावर बसलेला आहे. त्याच्यासमोर बँक डकैती आणि खुनी व्यक्ती अपराधी ठरला आहे. न्यायालय हे साक्षीदारांनी भरलेले आहे. खुनी अपराध्याची पत्नी आणि कुटुंब लुटलेल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांसोबत उपस्थित आहेत. बातमी देणारे लोक त्या क्षणाची नोंद करण्यासाठी तेथेच आहेत.

या खुनी व्यक्तीला काय शिक्षा होणार? मृत्यूदंड? पॅरोलशिवाय तुरुंगात आयुष्य?

न्यायालयामधील सर्वांना उभे राहण्यास सांगण्यात आले.

अपराधी माणसाकडे सरळपणे पाहत, न्यायाधीश बोलले, *“मी हे निरीक्षण केले आहे की तू दानधर्म करण्यात विश्वासू आहेस आणि तुझ्या प्रार्थनेत नियमित आहेस. ज्याप्रकारे त्या प्रार्थनेची मणके तुझी बोटे फिरवतात ते प्रभावी आहे. आणि तू एक आदरातिथ्य करणारा माणूस आहे असे मला कळते, अनोळखी व्यक्तींना जेवण देण्यास नेहमी तयार असतोस. शिक्षा होणार होती, पण तुझी चांगली कामे तुझ्या वाईट कामांपेक्षा जास्त आहेत. मी तुजवर दया करतो. तुला क्षमा केली आहे आणि जाण्यासाठी तू स्वतंत्र आहेस.”*

न्यायाधीशाने हातातील लहान लाकडी हतोडा आपटला.

धक्का बसलेल्या आणि संतप्त कुरकुरीने खोली भरून गेली....

अशा न्यायालयामधील दृश्याबद्दल कधी ऐकलेले नाही. आरोपीशी संबंधित पुरावे वजन

काट्याचे प्रतिक म्हणून वापरले जाऊ शकतात, पण एकदा का तो किंवा ती अपराधाबद्दल दोषी ठरले, तर योग्य शिक्षा दिली पाहिजे. मग अपराध्याने *"चांगली कृत्ये"* केलेली असोत की नसोत, हे अप्रासंगिक आहे. आपल्या सर्वांना हे माहित आहे.

जर चांगल्या कामांची ही *"पद्धती"* वाईट कामांपेक्षा जास्त ठरते ही मनुष्यांच्या पृथ्वीवरील न्यायालयामध्ये कधीही वापरली गेली नाही, तर अशी अयोग्य प्रक्रिया देवाच्या स्वर्गीय न्यायालयामध्ये वापरली जाईल असे तुम्हांला वाटते का?

## नीतिमान न्यायाधीश

आपला देव आपल्या काल्पनिक कथेमधील न्यायाधीशासारखा नाही. त्याची एक उपाधी ही *"**नीतिमान** न्यायाधीश"* आहे (२ तीमथ्य. ४:८). चार हजार वर्षांपूर्वी अब्राहाम संदेष्टयाने विचारले, *"...सर्व जगाचा न्यायाधीश **योग्य** न्याय करणार नाही काय?"* (उत्पत्ती १८:२५)

देवाने दया दाखवण्यासाठी न्यायाला कधीही डावलले नाही. असे करणे हे त्याच्या नीतिमान सिंहासनाच्या आधाराला नष्ट करेल आणि त्याच्या पवित्र नावाच्या प्रतिष्ठेला मलीन करेल.

> *"**नीती व न्याय** ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत; **दया व सत्य** तुझे सेवक आहेत."* (स्तोत्र. ८९:१४)

आपल्या ई-मेल वार्ताहराने जसे केले, तसे करण्याची सूचना देणे, की त्याची *"अंतिम शक्ती"* वापरू शकतो की त्याच्याच नियमांकडे दुर्लक्ष करावे हे सूचित करते की *"सर्व पृथ्वीचा न्यायाधीश"* हा ज्या पाप्यांचा तो न्याय करणार आहे त्यांच्यापेक्षा कमी नीतिमान आहे.

आपल्या निर्माणकर्त्यामध्ये न्यायाची तीच भावना आहे या स्पष्ट सत्याचा विरोध करूनही आपण मानवांमध्ये प्रगल्भ, जन्मजात न्यायाची भावना असली पाहिजे हे किती विचित्र आहे! आपल्या अंत:करणात खोलवर आपण सर्व जाणतो की वाईटाला शिक्षा करण्यात अयशस्वी झालेल्या न्यायाधीशाविषयी काहीही *"महान"* नसते.

यिर्मया संदेष्टयाने लिहिले :

> *"तुझी **सत्यता थोर** आहे, परमेश्वर माझा वतनभाग आहे, असे माझा जीव म्हणतो; म्हणून त्याच्या ठायी मी आशा ठेवीन."* (विलापगीत ३:२३-२४)

संदेष्टयाने असे म्हटले नाही हे लक्षात घ्या, *"तुझी अप्रत्याक्षितता महान आहे!"* किंवा *"तुझी चंचलता महान आहे!"* अशा लहरी देवाकडून आपण कसली आशा बाळगू शकतो.

देव विश्वासात महान आहे. पुष्कळ लोक सवयीने देवाला *"दयाळू आणि करुणामय"* असे संबोधतात ते हे विसरतात की तो तोच परमेश्वरही आहे जो *"विश्वासू आणि न्यायी"* आहे. (१ योहान १:९)

एकतर्फी दृष्टीकोन देवाचा विपरीत दृष्टीकोन ठरतो.

## देवाचा संतुलित स्वभाव

एका पक्ष्याला उडण्यास सक्षम होण्यासाठी, कोणता पंख आवश्यक आहे, डावा की उजवा?

उघडच आहे, पक्ष्याला उडण्यासाठी दोन्ही पंखांची आवश्यकता आहे! जो कोणी असा विचार करतो की एक पक्षी एका पंखाने उडू शकतो तो पक्ष्याच्या स्वभाकडे आणि गुरुत्वाकर्षण आणि वायुगतीकीय यांच्या नियमांकडे दुर्लक्ष करत आहे.

त्याचप्रमाणे, जो कोणी असे सुचवितो की देव न्याय राखण्याव्यतिरिक्त दया दाखवू शकतो तो देवाच्या स्वरूपाकडे आणि पाप आणि मृत्यूच्या नियमाकडे दुर्लक्ष करतो.

देवाची दया आणि न्याय हे नेहमीच एका परिपूर्ण संतुलनात आहेत.दावीद राजाने लिहिले :

*"दया **व** न्याय ह्यांविषयी मी गाईन; हे परमेश्वरा, मी तुझी स्तोत्रे गाईन."* (स्तोत्र. १०१:१)

दावीद, ज्याने काही घोर पापे केली होती, तो देवाच्या दयेस पात्र नाही हे त्याला माहित होते. व्याख्येनुसार, दया अपात्र आहे.

***न्याय** म्हणजे आपण पात्र असलेली शिक्षा प्राप्त करणे आहे.*

***दया** म्हणजे आपण पात्र असलेली शिक्षा नाही प्राप्त करणे.*

दावीद देवाला स्तुती गाऊ शकत होता याचे कारण न्यायाला डावलल्यावाचून अपात्र पाप्यांवर दया दाखवण्याचा मार्ग परमेश्वराने आखला होता हे त्याला माहित होते. म्हणूनच दाविदाने *"दया आणि न्यायाचे"* गीत गाईले.

आपल्या पवित्र देवाला पापाची क्षमा करणे हा काही साधा विषय नव्हता. पाप्यांच्या अपराधांचा पुरेसा न्याय आणि शिक्षा झाल्याच्या समाधानावाचून त्याने पाप्यांना कधीही क्षमा केली नाही. मानवजात म्हणून, जर कोणी आपले वाईट करतो, तर आपण त्याला किंवा तिला हे म्हणू शकतो, *"हे ठीक आहे. याला केवळ विसरून जा. क्षुल्लक बाब आहे."* आपण कृपायुक्त होऊन त्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला क्षमा करण्याची निवड करू शकतो, पण अनंत पवित्र

न्यायाधीश तसे करू शकत नाही.

देवाची दया देवाच्या न्यायाला कधीही नाकारत नाही. तो असे कधीही म्हणत नाही, *"मी तुजवर प्रीती करतो, म्हणून मी तुझ्या पापाचा न्याय करणार नाही."* तो असे देखील म्हणत नाही, *"कारण तू पाप केले आहे, मी तुजवर प्रीती करत नाही."* देव पाप्यांना प्रेम करतो, परंतु त्यांच्या पापाला वेगळे करणे आणि शिक्षा करणे आवश्यक आहे.

जर देव असाच असेल, तर दोषी पाप्यांवर तो दया कशी करू शकतो?

**न्यायासह दया**

आदाम आणि हव्वेच्या परिस्थितीचा विचार करा.

कारण **देव प्रेमळ आणि दयाळू आहे**, म्हणून आदाम आणि हव्वेने त्याच्यापासून वेगळे व्हावे अशी त्याची इच्छा नव्हती. त्यांनी कायमचे त्याच्यासोबत राहावे आणि सार्वकालिक अग्नीत त्यांचा शेवट होऊ नये अशी त्याची इच्छा होती.

*"....कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही...."* (२ पेत्र ३:९)

तथापि, कारण **देव पवित्र आणि न्यायी आहे**, म्हणून आदाम आणि हव्वेच्या पापाकडे तो दुर्लक्ष करू शकला नाही. त्यास त्याला शिक्षा करावी लागली.

*"तुझे डोळे इतके पवित्र आहेत की दुष्टता तुझ्याने पाहवत नाही, अनाचाराकडे दृष्टी लाववत नाही..."* (हबक्कूक १:१३)

मग देव काय करणार? पाप्याला शिक्षा न करता पापाला दंड देण्याचा मार्ग होता का? पापाचा दूषितपणा कसा काढला जाऊ शकतो आणि परिपूर्ण शुद्धता पुन:स्थापित कशी करता येऊ शकते? ईयोब संदेष्टयाच्या प्रश्नाला समाधानी उत्तर आहे का?, *"...पण **मानव देवापुढे** कसा **नीतिमान** ठरेल?"* (ईयोब ९:२). देवाचा धन्यवाद हो, येथे मार्ग आहे.

पवित्र शास्त्र प्रकट करते की, आदाम आणि हव्वेसारख्या आणि तुमच्या आणि माझ्यासारख्या (रोम. ३:२६) दोषी पाप्यांना *"न्यायी आणि न्यायोचित"* दोन्हीही करण्यासाठी नीतिमान न्यायाधीशाने काय केले. न्याय टिकवून ठेवताना त्याने तुम्हांला दया दाखवण्यासाठी काय केले हे तुम्हांला माहित आहे का?

उत्तर पुढे आहे. प्रवास चालू आहे.

## माझी चूक नाही

आत्तासाठी, चला आपण आपले दूषित वंशज आणि त्यांचा निर्माणकर्ता जो त्यांचा न्यायाधीश झाला यांच्यामध्ये जो संवाद घडला ते ऐकू या.

*"तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला हाक मारून म्हटले, 'तू कोठे आहेस?'*

*तो म्हणाला, 'मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो. देवाने म्हटले, 'तू नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तू खाऊ नकोस अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस काय?' आदाम म्हणाला, 'जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले.' परमेश्वर देव त्या स्त्रीला म्हणाला, 'हे तू काय केलेस?' स्त्री म्हणाली, 'सर्पाने मला भुरळ घातली म्हणून मी ते खाल्ले.'"* (उत्पत्ती ३:९-१३)

देवाने आदाम आणि हव्वेला प्रश्न का केला?

मुलाने काय केले हे पालकाला माहित असतानाही, पालक अवज्ञाकारी मुलाला प्रश्न करतात, त्याच कारणासाठी त्याने त्यांना प्रश्न विचारला. आदाम आणि हव्वेने त्यांचे पाप आणि अपराध ओळखावे ही देवाची इच्छा होती. तथापि, त्यांचे पाप स्वीकारण्याऐवजी, प्रत्येकाने एकमेकांना दोष देण्याचा प्रयत्न केला.

आदामाने देव आणि हव्वेवर दोष लावला : ही माझी चूक नाही! जी स्त्री तू मला दिलीस- ही तिची चूक आहे!

हव्वेने सर्पाला जबाबदार धरले : सर्पाने मला भुरळ घातली!

कारण की ते मानव होते, आणि प्रोग्राम केलेले बाहुले नव्हते, देवाने त्यांनी केलेल्या निवडीसाठी प्रत्येकास जबाबदार ठरवले. त्यांना स्वतःशिवाय इतर कोणालाही दोष देता आला नाही.

*"कोणाची परीक्षा होत असता, देवाने मला मोहात घातले, असे त्याने म्हणू नये; कारण देवाला वाईट गोष्टींचा मोह होत नाही आणि तो स्वतः कोणाला मोहात पाडत नाही; तर प्रत्येक माणूस **आपल्या वासनेने ओढला जातो** व भुलवला जातो तेव्हा मोहात पडतो. मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते; आणि पाप परिपक्व झाल्यावर **मरणास** उपजवते."* (याकोब १:१३-१५)

त्यांच्या निर्माणकर्त्याच्या योजनेचे अनुसरण करण्याऐवजी, आदाम आणि हव्वेने त्यांच्या *"स्वतःच्या इच्छेचे"* अनुसरण केले ज्याने त्यांना पाप आणि मृत्यूच्या मार्गाकडे नेले.

हव्वेला सैतानाने मोहात पाडले आणि फसवले. आदाम, ज्यास परमेश्वराने बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको अशी आज्ञा दिली, त्याने जाणूनबुजून त्याच्या निर्माणकर्त्याची अवज्ञा करण्याचे निवडले.

*"आणि आदाम भुलवला गेला नाही, तर स्त्री भुलून अपराधात सापडली."* (१ तीमथ्य. २:१४)

मुद्दाम किंवा फसवले जाणे, दोन्हीही दोषी होते, परंतु आदामाने निषिद्ध फळ खाल्यानंतरच पवित्र शास्त्र घोषित करते, *"**मग त्यांचे** डोळे उघडले."* (उत्पत्ती ३:७)

देवाने मानवजातीला नीतिमत्ता आणि जीवनाच्या राज्यातून पाप आणि मृत्यूच्या वर्चस्वामध्ये नेण्यासाठी आदामाला जबाबदार धरले, हव्वेला नाही. देवाने आदामाला मानवजातीचे मस्तक म्हणून विशेषाधिकार दिला होता, परंतु मोठया विशेषाधिकारासह मोठया जबाबदाऱ्या येतात.

आदामाच्या पापाने आपल्या सर्वांना दूषित केले, परंतु आपण केलेल्या निवडीसाठी आपण त्याला दोषी ठरवू शकत नाही.

*"तर मग आपल्यातील **प्रत्येक जण** आपल्या स्वतःविषयीचा हिशेब देवाला देईल."* (रोम. १४:१२)



# धडा १४

## शाप

**ल**पवाछपवी आणि सबबी सांगण्याची वेळ संपली आहे.

आदामाने त्याच्या स्वतःचा मार्ग निवडला होता, परंतु त्याने त्या मार्गाचे परिणाम निवडले नव्हते. संपूर्ण सृष्टी शांत राहील जेव्हा नीतिमान न्यायाधीश मनुष्याच्या पापाने आणलेले शाप आणि परिणामांची मालिका घोषित करेल.

### सर्प

परमेश्वराने *"सर्पाच्या"* विनाशाला घोषित करण्याने सुरुवात केली.

*"तेव्हा परमेश्वर देव सर्पाला म्हणाला, 'तू हे केलेस म्हणून सर्व ग्रामपशू व वनचर ह्यांच्यापेक्षा **तू शापग्रस्त हो**; तू पोटाने चालशील आणि आयुष्यभर माती खाशील. आणि तू व स्त्री, तुझे संतान आणि तिचे संतान ह्यांच्यामध्ये मी परस्पर वैर स्थापन करीन; तो तुझे डोके फोडील व तू त्याची टाच फोडशील."* (उत्पत्ती ३:१४-१५)

हा सर्प कोण होता ज्याबरोबर देव बोलत होता? एका सरपटणाऱ्या प्राण्यावर निर्माणकर्ता रागावला होता काय?

देवाचे वचन पवित्र शास्त्रात कधी कधी दोन-स्तराच्या संदेशाचा समावेश करते, विशेषतः दाखल्यांमध्ये आणि भविष्यवाण्यांमध्ये. येथे उघडपणे वरवरचा अर्थ आहे आणि मग येथे कमी उघडपणे सखोल अर्थ आहे. या घोषणे बाबतही हेच आहे.

शाप जो सर्पांवर आला त्याचे दोन स्तर आहेत.

## स्तर १ : एक चिरस्थायी उदाहरण

पहिले, सर्पाला शाप देण्याने (त्याजवर न्याय घोषित करण्याने), परमेश्वर मानवजातीसमोर एक चिरस्थायी ध्येय शिकवण ठेवत होता. सरपटणारा प्राणी जो सैतानाने मनुष्याला पापाच्या मोहात पाडण्यासाठी वापरला होता तो येथून पुढे जमिनीवर रेंगणार होता. सर्व सर्पांमध्ये हाच गुणधर्म असेल. आदाम आणि हव्वेने पाप करण्यापूर्वी, उघडपणे सर्पांना इतर सरपटणाऱ्या प्राण्यांप्रमाणे पाय होते. आजच्या दिवसापर्यंत सर्पाच्या काही निश्चित प्रजातींमध्ये, जसे अजगर आणि बोआ कॉन्स्ट्रक्टर सारख्या प्रजातींमध्ये वरच्या पायाच्या हाडांचे अवशेष आहेत.[१२८]

पाप दोषी आणि निर्दोषसाठी सारखेच दूरगामी परिणाम घडवते. हे पापाच्या कारणामुळे आहे की *''संपूर्ण सृष्टी कण्हत आहे''* (रोम. ८:२२). निर्दोष प्राणी जगतही प्रभावित झाले आहेत.

मनुष्याच्या पापाच्या निवडीस **पतन** म्हटले जाते हे चांगल्या कारणास्तव आहे.

## स्तर २ : सैतानाचा लवकरच होणारा नाश

बायबल म्हणते, *''शास्त्रातील कोणत्याही संदेशाचा उलगडा कोणाला स्वतःच्या कल्पनेने होत नाही''* (२ पेत्र १:२०). वचनच वचनाचे स्पष्टीकरण करते. देवाने *''सर्पावर''* घोषित केलेल्या त्याच्या शापाचा दुसरा भाग आपल्याला पवित्र शास्त्रात खोलवर चिंतन करण्यास प्रेरित करतो.

*''आणि तू व स्त्री, तुझे संतान व तिचे संतान ह्यांच्यामध्ये मी परस्पर वैर स्थापन करीन;*
*तो तुझे डोके फोडील व तू त्याची टाच फोडशील.''* (उत्पत्ती ३:१५)

तो सर्प कोण होता ज्यास देव बोलला? पवित्र शास्त्र त्यास एक अभिमानी देवदूत म्हणून ओळखते ज्याला *''धुळीत टाकण्यात आले''* (यशया १४:१२). तो *''सर्व जगाला ठगणारा, जो **दियाबल व सैतान** म्हटलेला आहे, तो **जुनाट 'साप'** असे त्यास म्हणतात.''* (प्रकटीकरण १२:९)[१२९]

सर्प हा दुसरा कोणी नसून सैतान होता.

सर्पासाठी योग्य असणारी भाषा वापरून, परमेश्वर सैतान आणि त्याचे अनुसरण करणाऱ्यांसाठी विनाश घोषित करत होता. सैतानाचे ***''बीज''*** (संतती) आणि स्त्रीचे *''बीज''* (संतती) यांच्यामध्ये शत्रुता असेल. शेवटी, *''तिचे बीज''* सर्पाच्या *''बीजाला''* ठेचेल.

हे सर्व देवाच्या वेळापत्रकानुसार पूर्ण होईल.

## दोन "बीज"

या दोन बिजांबद्दल काय आहे? सर्पाचे बीज आणि स्त्रीचे बीज हे कोणाला संबोधले आहे?

**सर्पाचे बीज** त्यांना संबोधते जे देवाविरुद्ध बंडखोरी करतात जसे सैतानाने केली. ते जे सैतानाच्या लबाडीचे अनुसरण करतात, ते आध्यात्मिक अर्थाने, सैतानाची मुले आहेत.

> *"तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता, तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो, कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे."*
> (योहान ८:४४)

**स्त्रीचे बीज** मग कोण आहे?

ही एक अद्वितीय कल्पना आहे. पवित्र शास्त्राच्या संपूर्ण इतिहासात, एखाद्या व्यक्तीचे वंशजत्व स्त्री ऐवजी पुरुषाला दिले गेले. तरीही ज्या दिवशी पापाने जगात प्रवेश केला, देवाने स्त्रीच्या वंशाविषयी सांगितले. का?

देवाने केलेली ही घोषणा ख्रिस्ताकडे निर्देश करणारी पहिली भविष्यवाणी होती जो स्त्रीपासून जन्माला येईल, पण पुरुषापासून नाही. ख्रिस्त म्हणजे अक्षरशः अभिषिक्त एकच किंवा निवडलेला एकच. जुन्या कराराच्या काळात, जेव्हाजेव्हा देवाने एका माणसाची निवड केली की लोकांचा नेता, एक अधिकृत व्यक्ती, जसे एखादा संदेष्टा असावे, तेव्हा तो त्याचा अभिषेक करत असे (त्याच्या डोक्यावर तेल ओतत असे) हे दाखवण्यासाठी की त्याला एका विशेष कार्यासाठी देवाने निवडले आहे.[१३०]

तथापि, ख्रिस्त हा इतर सर्वांहून वेगळा असेल. तो एक अभिषिक्त एकमेव असेल. इतिहासात योग्य क्षणी, देवाचा निवडलेला एकमेव जगात प्रवेश करेल की *"मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने **शून्यवत करावे,** आणि जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना **मुक्त करावे.**"* (इब्री. २:१४-१५)

ज्या दिवशी पापाने जगात प्रवेश केला त्या दिवशी देवाने त्याची पूर्ण योजना प्रकट केली नव्हती, तेव्हा या भ्रूण भविष्यवाणीने आदाम आणि हव्वा आणि त्यांच्या वंशजांना आशेचे किरण दिले. या प्रारंभीच्या अभिवचनामध्ये असंख्य पायाभूत सत्ये आहेत, जे

देवाचे संदेष्टे नंतर तपशीलवार विकसित करतील.[१३१]

## शाप

**स्त्रीचे बीज** जे सर्पाचे डोके फोडील याबद्दल त्याच्या काळजीपूर्वक शब्दबद्ध भविष्यवाणीचे अनुसरण करत, परमेश्वराने आदाम आणि हव्वेला त्यांच्या पापाच्या काही व्यवहारिक परिणामांची ओळख करून दिली. ह्या परिणामांना **शाप** म्हणून ओळखतात.

*"तो स्त्रीला म्हणाला, 'मी तुझे दु:ख व तुझे गर्भधारण बहुगुणीत करीन; तू क्लेशाने लेकरे प्रसवशील; तरी तुझा ओढा नवऱ्याकडे राहील आणि तो तुझ्यावर स्वामित्व चालवील.' आदामाला तो म्हणाला, 'तू आपल्या स्त्रीचे ऐकलेस आणि ज्या झाडाचे फळ खाऊ नकोस म्हणून मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस, म्हणून तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे; तू आयुष्यभर कष्ट करून तिचा उपज खाशील; ती तुला कांटे व कुसळे देईल; तू शेतातले पीक खाशील; तू आपल्या निढळाच्या घामाने भाकर मिळवून खाशील व अंती पुनः मातीला जाऊन मिळशील, कारण तिच्यातून तुझी उत्पत्ती आहे; तू माती आहेस आणि **मातीला परत जाऊन मिळशील.**"* (उत्पत्ती ३:१६-१९)

आदाम आणि हव्वेची निवड की त्यांच्या निर्माणकर्त्याविरोधात बंडखोरी करावी हे भयंकर किमतीच्या लेबलसह आले.

कुटुंब असण्याच्या आनंदात आता त्रास आणि वेदना असतील. पृथ्वी धान्ये, फळे आणि भाजीपाला स्वाभाविकरित्या निर्माण करण्याऐवजी, पृथ्वीची शापित जमीन स्वाभाविकपणे निदण, कांटे आणि कुसळे उत्पन्न करील. विश्रांती आणि आनंद हे संघर्ष आणि कष्टाने विस्थापित होईल. सर्वात वाईट म्हणजे, मनुष्याच्या क्षणभंगुर जीवनावर मृत्यू नावाच्या जुलमी शासकाने छाया केली असेल.

मनुष्याने प्रभुत्व गमावले होते. पापाने शाप आणला होता.

## मृत्यू सामान्य आहे का?

ते जे पवित्र शास्त्राची अवहेलना करतात ते कठीण परिश्रम, त्रास, नुकसान, तुटलेले नातेसंबध, रोग, वृद्धावस्था आणि मृत्यूला सामान्य समजतात. पापाच्या शापाबद्दल सत्य समजणे हे आपल्या कण्हणाऱ्या ग्रहावर ह्या गोष्टी का आहेत हे समजून घेण्याची ही एक गुरुकिल्ली आहे. अनेक बुद्धिमान लोक देवाच्या अस्तित्वाचा पुरावा म्हणून मानवजातीच्या दयनीय स्थितीकडे निर्देश करतात. ते असा तर्क करतात कारण ते पापाचा प्रवेश आणि परिणामांना ओळखत

नाहीत.[१३२]

सेनेगलमध्ये, लोक कधीकधी म्हणतात (प्रामुख्याने अंत्यसंस्कारात), *"देवाने जीवन निर्माण करण्यापूर्वी मृत्यू निर्माण केला."* पुष्कळ लोक त्या तत्वज्ञानापासून समाधान मिळवतात. परंतु असे विचार तर्क आणि पवित्र शास्त्र या दोन्हींच्या विरोधात आहे, जे मृत्यूला असे दर्शवते *"जो शेवटला शत्रू नाहीसा केला जाईल तो मृत्यू होय."* (१ करिंथ. १५:२६)

जसे कर्करोगाच्या पेशी निरोगी व्यक्तीच्या शरीरासाठी नैसर्गिक आहेत किंबहुना त्यापेक्षाही अधिक सामान्य दिसणारे वाईट, शोक, परिश्रम, दुःख आणि मृत्यू असे आक्रमक घटक या जगासाठी नैसर्गिक नाहीत.



सुगंधी गुलाबाच्या झाडावरचे कांटे, पीक काढण्यासाठी लागणारी धडपड, लाडक्या लहान मुलांमध्ये दिसणारी जिद्द, नवरा आपल्या लाडक्या बायकोशी ज्याप्रकारे वागतो, बाळंतपणाच्या आश्चर्यासोबत होणारी वेदना, शरीराची रोगप्रतिकारक शक्ती, उध्वस्त करणारे रोग, वृद्धत्वाची क्रूरता, मृत्यूचे कठोर वास्तव आणि आपले शरीर पुन्हा मातीला मिळते-हे सर्व देवाच्या मूळ योजनेचा हिस्सा नाहीत. देवाने सृष्टीची रचना स्वतःशी लढण्यासाठी केलेली नाही.

पापाने प्रवेश करण्यापूर्वी, मनुष्याला सृष्टीवर प्रभुत्व होते. सर्व गोष्टी ह्या आदाम आणि त्याच्या पत्नीच्या पूर्ण अधीन होत्या. नीतिमत्व आणि शांतीने पृथ्वी भरलेली होती. मग आपला पहिला पूर्वज पाप आणि मृत्यूच्या मार्गावर गेला, आणि त्याच्याबरोबर गेली एक अशुद्ध आणि मरणारी मानवजात.

## संपूर्ण सृष्टी प्रभावित झाली

*"पण ते न्याय्य नाही!"* कोणीतरी म्हणतो, *"दुसऱ्या माणसाच्या पापामुळे कोणाला दुःख का भोगावे लागेल?"*

आपण सर्व जण आपल्या स्वतःचे निर्णय घेतो आणि त्या निर्णयांसाठी देव आपल्याला जबाबदार धरतो, परंतु हे देखील खरे आहे की आपण एका शापित जगात राहतो. वोलोफ म्हणी मागची सत्यता ही स्वयं-स्पष्ट आहे : *"महामारी ज्याने ती निर्माण केली त्याच्यापुरतीच मर्यादित*

*नसते."*

ते पापाचे स्वरूप आहे. जीवन यापुढे न्याय्य नाही. आदामाच्या एका पापाच्या परिणामामुळे *"सबंध सृष्टी आजपर्यंत कण्हत आहे व वेदना भोगत आहे."* (रोम. ८:२२)

पापाच्या शापाने सर्व जण प्रभावित झाले आहेत.

सुवार्ता ही आहे की प्रारंभापासून आपल्या निर्माणकर्त्याजवळ एक धाडसी योजना होती. घडयाळाचा निर्माता घडयाळात जशी एक यंत्रणा तयार करतो ज्याद्वारे शक्ती जी त्यास वेळेच्या बाहेर नेण्यास कारणीभूत असते तिला हाताळण्यासाठी व्यवस्थित केले जाऊ शकते, तसेच विश्वाच्या निर्माणकर्त्याने त्याच्या जगात एक "यंत्रणा' निर्माण केली आहे ज्याद्वारे तो सैतान, पाप आणि मृत्यूच्या विनाशकारक शक्तींचा पराभव करू शकेल. प्रारंभापासून, पापाला प्रवेश करू देण्याने देवाजवळ एक उद्देश होता, तसेच पापाच्या शापाला उलट करावे आणि ते जे त्याजवर विश्वास ठेवतात त्या सर्वांवर त्याची कृपा दाखवावी अशी एक योजना होती.

शोक, वेदना आणि मृत्यू हे देवाच्या कथेच्या प्रारंभापासून नव्हते, किंवा ते शेवटच्या समयी देखील असणार नाहीत. एके दिवशी पाप आणि त्याच्या शापाला नष्ट केले जाईल. *"तो त्यांच्या डोळ्यांचे **सर्व अश्रू पुसून टाकील, ह्यापुढे मरण नाही, शोक, रडणे व कष्ट हे नाहीत**; कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या.....**पुढे काहीही शापित असणार नाही**, तर तिच्यामध्ये देवाचे व कोकऱ्याचे राजासन असेल; आणि त्याचे दास त्याची सेवा करतील"* (प्रकटीकरण २१:४; २२:३). आपण आपल्या प्रवासाच्या शेवटी या तेजस्वी भविष्याबद्दल आणखी शिकू.

## देवाची कृपा

आदाम आणि हव्वेने बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाल्ल्यावर काय घडले हे तुम्हांला आठवते का?

त्यांनी स्वतःसाठी अंजिराच्या पानाचे आवरण बनविले. पाप आणि लाजेला झाकण्याचा हा मनुष्याचा पहिला प्रयत्न होता. देवाने आदाम आणि हव्वेच्या स्वयं-प्रयत्नाला स्वीकारले नाही. त्याऐवजी, देवाने त्यांच्यासाठी काहीतरी केले.

> *"परमेश्वराने आदाम व त्याची स्त्री ह्यांच्यासाठी चर्मवस्त्रे करून त्यांना घातली."*
> (उत्पत्ती ३:२१)

देवाने आदाम व हव्वेला प्राण्याच्या त्वचेतून बनविलेले वस्त्र पुरवले. हे करण्यासाठी, रक्त

सांडले गेले.

कल्पना करा परमेश्वर काही मेंढरांची किंवा इतर योग्य प्राण्यांची निवड करत होता, की त्यांना अर्पण करावे, आणि मग आदाम व हव्वेसाठी *"चर्मवस्त्रे"* बनवावी. देव त्यांना पापाची मोठी किंमत, त्याच्या पवित्र स्वभावाबद्दल, आणि पापी लोक जे निर्लज्जपणे अयोग्य आहेत, त्यांना त्याच्यासाठी स्वीकारयोग्य करण्याविषयी त्यांना महत्वाचा धडा शिकवत होता.

आदाम आणि हव्वेसाठी विशेष वस्त्रे पुरविण्याद्वारे, त्यांचा निर्माणकर्ता त्याची कृपा त्यांना दाखवत होता ज्यांनी नुकतेच त्याच्या विरुद्ध बंडखोरी केली होती. ते देवाच्या दयाळूपणासाठी पात्र नव्हते, परंतु हीच कृपा आहे-**अपात्र** दयाळूपणा.

***न्याय** हे आपण ज्यास पात्र आहोत ते प्राप्त करणे* (= सार्वकालिक शिक्षा).

***दया** ही आपण ज्यास पात्र आहोत ते प्राप्त करत नाही* (= शिक्षा नाही).

***कृपा** ही आपण ज्यास पात्र नाही ते प्राप्त करणे* (=सार्वकालिक जीवन).

## देवाची धार्मिकता

आदाम आणि हव्वेसाठी प्राण्यांना मारण्याद्वारे, देवाची इच्छा होती की त्यांनी हे समजावे की तो केवळ *"कृपाळू देव"*, नाही परंतु *"धार्मिक देव"* देखील आहे (स्तोत्र. ८६:१५; स्तोत्र. ७:९). पापाला मृत्यूने दंडित केले पाहिजे. आदाम आणि हव्वेच्या विचारांची कल्पना करा जेव्हा त्यांनी या सुंदर जीवांमधून रक्त वाहत आहे हे पाहिले. देवाने त्यांच्यासमोर एक स्पष्ट उदाहरण ठेवले होते : त्यांच्या पापाची शिक्षा ही मृत्यू होती. आदाम आणि हव्वेला त्याच दिवशी मृत्यू दिला पाहिजे होता, परंतु त्याऐवजी निष्पाप प्राण्यांना मरावे लागले. देवाने स्वतः पहिले रक्त अर्पण केले. आणखी लाखो पुढे येतील.

हे देखील लक्षात घ्या की हा परमेश्वरच होता ज्याने त्यांना चर्मवस्त्रांसह *"पांघरूण"* घातले जे त्याने पुरवले होते. आदाम आणि हव्वेने त्यांचे पाप आणि लाजेला झाकण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्यांच्या प्रयत्नांनी देवाला संतुष्ट केले नाही. केवळ त्याच्याकडेच त्यांच्या पाप आणि लाजेपासून वाचविण्याचा मार्ग होता.

## पाप्यांना बाहेर काढण्यात आले

उत्पत्तीचा अध्याय ३ याप्रमाणे समारोप करतो :

*“मग परमेश्वर देव म्हणाला, ‘पाहा, मनुष्याला बरेवाईट कळू लागून तो आमच्यातल्या एकासमान झाला आहे; तर आता कदाचित तो आपला हात जीवनाच्या झाडाला लावून त्याचेही फळ काढून खाईल व सर्वकाळ जिवंत राहील; ह्यास्तव ज्या जमिनीतून त्याला उत्पन्न केले होते, तिची मशागत करावी म्हणून परमेश्वर देवाने त्याला एदेन बागेतून बाहेर काढून लावले. देवाने मनुष्याला बाहेर घालवले आणि जीवनाच्या झाडाकडे जाणाऱ्या मार्गाची राखण करण्यासाठी एदेन बागेच्या मध्यभागी करूबीम व गरगर फिरणारी ज्वालारूप तलवार ठेवली.”* (उत्पत्ती ३:२२-२४)

लुसीफर आणि त्याच्या देवदूतांनी देवाच्या इच्छेविरुद्ध त्यांची इच्छा पूर्ण केल्यानंतर ज्याप्रमाणे स्वर्गीय सुखलोकातून त्यांना हाकलून दिले होते, त्याप्रमाणेच पुरुष आणि त्याच्या पत्नीला पृथ्वीच्या सुखलोकातून हाकलून देण्यात आले जेव्हा त्यांनी देवाच्या इच्छेच्या विरुद्ध कार्य केले होते.

अशा प्रकारे, मनुष्याला देवाच्या पवित्र उपस्थितीपासून आणि जीवनाच्या झाडापासून (बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडासोबत याचा गोंधळ करू नका) बंदी घालण्यात आली होती. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासाच्या शेवटी आपल्याला या स्वर्गीय सुखलोकाच्या विशेष झाडाची आणखी एक झलक पाहायला मिळेल. जीवनाचे झाड सार्वकालिक जीवनाच्या दानाचे प्रतिक आहे जे देव त्या सर्वांना देतो जे त्याजवर आणि त्याच्या योजनेवर विश्वास ठेवतात.

बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडातून खाल्ल्यावर, आदाम आणि हव्वेने सार्वकालिक जीवनाचा मार्ग नाकारला आणि सार्वकालिक मृत्यूचा मार्ग निवडला होता. स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांच्यामधील आनंददायक संबंध पापाने तुटला होता.

आदाम आणि हव्वेला गंभीर समस्या होती.

तसेच आपल्यालाही आहे.



# धडा १५

# दुहेरी समस्या

“**नि**रोग्यांना वैद्याची गरज नसते, तर रोग्यांना असते; मी नीतिमानांना [जे विचार करतात की ते पुरेसे चांगले आहेत] नव्हे तर पाप्यांना **पळून गेलेला दोषी ३८वर्षांनंतर पुन्हा पकडला गेला,** मे. २००६ची ठळक बातमी जाहीर झाली.

बातमी ही एका निश्चित श्री. स्मिथ बद्दल होती, ज्याने १९६८मध्ये कॅलिफोर्नियाच्या तुरुंगात चोरी केली म्हणून शिक्षा भोगत होता तेथून पळून गेला होता.

३८ वर्षांपासून, त्याच्या आईचे लग्नापूर्वीचे नाव वापरत, तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत होता, शेवटी मध्य-अमेरिकेच्या एक घनदाट वृक्षाच्छादित भागात एका वाहनात राहत होता. तेथेच अधिकाऱ्यांना तो सापडला.

*“त्याने थोडेसे जमिनीकडे पाहिले, मग त्याने वर पाहिले आणि म्हणाला, ‘हो, मीच आहे,’ क्रीक काउंटी शेरीफच्या गुप्तहेराने सांगितले.* “लोक त्याला इतके दिवस शोधत असतील असे त्याला स्वप्नातही वाटले नव्हते.”[१३३]

जसे श्री. स्मिथ कायद्याच्या पाठलाग करणाऱ्या हातापासून दूर जाऊ शकला नाही, तसेच देवाच्या नियमाचे उल्लंघन करणारा कोणीही नीतिमान कायदा देणारा आणि न्यायाधीश याच्या अमर्याद आवाक्याबाहेर जाणार नाही.

आणि हे कायदे तोडणारे कोण आहेत?

*“**जो कोणी पाप करतो तो स्वैराचार करतो**; कारण पाप स्वैराचार आहे.”*

(१ योहान ३:४)

जो कोणी देवाच्या चांगल्या आणि परिपूर्ण नियमाची अवज्ञा करतो तो कायदा मोडणारा आहे. लुसीफरने तेच केले. आदाम आणि हव्वेने तेच केले. आपण देखील तेच केले.

सर्व पाप हे देवाविरुद्ध आहे. पुष्कळ लोक त्यांच्या पापाला एक लहान गोष्ट म्हणून पाहतात, परंतु देवाच्या दृष्टीसमोर, सर्व अपश्चातापी, क्षमाहीन पापी, मग ते किती *"चांगले"* किंवा *"धार्मिक"* आहेत याची पर्वा नाही ते अपराधी बेकायदेशीर आहेत.

## आशावादी मृगजळाच्या मागे धावणारे

काही समयापूर्वी एका शेजाऱ्याने मला म्हटले, *"मी एक आशावादी आहे; मला वाटते की स्वर्गात जाईन."*

जेव्हा न्यायाचा समय येतो तेव्हा आशावादी असणे आणि स्वयं-प्रयत्न त्याला सार्वकालिक शिक्षेपासून वाचवू शकतात काय?

एकदा कॅलिफोर्नियाच्या मृत्यूच्या दरीतून प्रवास करत असताना (पृथ्वीवरील सर्वात उष्ण वाळवंटांपैकी एक), मला दूरवर एक चमकणारा तलाव दिसत होता, पण जसजसे मी जवळ गेलो, तसतसे तो *"तलाव"* गायब झाला. पुढे पाहिल्यावर मला आणखी एक असाच *"तलाव"* दिसला. तो देखील गायब झाला.

ते एक मृगजळ होते.

वेगवेगळया तापमानाच्या आणि घनतेच्या हवेच्या थरांमधून प्रकाश किरणांचे अपवर्तन झाल्यामुळे मृगजळ निर्माण होते. तलाव खरे दिसत होते, पण ते खरे नव्हते. त्याचप्रमाणे, एका पापी व्यक्तीला स्वर्गात जाण्याबद्दल त्याच्या किंवा तिच्या संधीविषयी आशावादी वाटू शकते, परंतु पवित्र शास्त्र सत्य उघड करते. आदामाचे वंशज त्यांच्या स्वतःला न्यायापासून वाचवण्यात *"शक्तीहीन"* होते. (रोम. ५:६)

कोरडया वाळवंटात हरवलेल्या माणसाप्रमाणे, ज्याने आपला एकमेव पाणीपुरवठा सांडला आहे, त्याचप्रमाणे मानवजात पापामुळे गमावलेले सार्वकालिक जीवन परत मिळवण्यास असहाय्य आहे.

> *"आपल्या सर्वांना मरणे प्राप्त आहे; आपण भूमीवर सांडलेल्या पाण्यासारखे आहोत, ते पुन्हा भरून घेता येत नाही...."* (२ शमुवेल १४:१४)

हरवलेला माणूस एक जीव वाचवणारा मरुवन म्हणून ज्यास प्रामाणिकपणे मानतो, ते *"मरुवन"* हे केवळ अधिक तीव्र उष्णतेच्या लाटा असल्याचे दिसून येते. हताश, तृषित माणूस

मृगजळातून मृगजळात धावत राहतो आणि शेवटी त्याचा मृत्यू होतो.

तसेच हे पापी व्यक्तींचा आशावाद, प्रामाणिकपणा, आणि स्वयं-प्रयासाच्या धर्मांसह आहे.

*"मनुष्याला एक **सरळ मार्ग दिसतो**, पण त्याच्या शेवटास **मृत्यूपथ** फुटतात."* (नीतिसूत्रे १४:१२)

त्यांच्या दूषित स्थितीला तोंड देण्याच्या प्रयत्नात, आज जगभरातील अब्जावधी लोक त्यांना योग्य वाटणाऱ्या मार्गांचा अवलंब करतात. ते धार्मिक विधी करतात, विधीपूर्वक अंघोळ करतात, यंत्रवत प्रार्थना पठण करतात, काही अन्न वर्ज्य करतात, दानधर्म करतात, मेणबत्त्या पेटवतात, मणक्यांची माळ बोटाने फिरवत असतात, काही मंत्रे वारंवार म्हणतात, आणि चांगली कृत्ये आहेत म्हणून ज्यावर ते विश्वास ठेवतात ती करत जातात. इतर त्यांच्या आध्यात्मिक गुरूंच्या अधीन होतात, तर आणखी इतर पवित्र आणि न्यायी कार्य म्हणून ज्यास समजतात त्यासाठी हुतात्मे म्हणून मरण्याद्वारे स्वर्गात जाण्याची आशा बाळगतात.

ते एका मृगजळाच्या मागे धावत आहेत हे शक्य आहे का?

## स्वतः बद्दलचा एक अचूक दृष्टीकोन

*"सत्य हे तिखट मिरचीसारखे आहे,"* असे वोलोफ म्हण म्हणते.

जरी ते आपल्याला अस्वस्थ करत असले, तरी देव आपल्या स्वतःबद्दल आपल्याला गंभीर सत्य सांगतो. आपल्या पापाबद्दल त्याच्याबरोबर प्रामाणिक राहण्यासाठी तो आपल्याला आमंत्रित करतो. अशा प्रामाणिकपणावाचून, आपण गंभीरपणे आजारी असलेल्या एका शेजारच्या स्त्रीसारखे आहोत जिला माझी पत्नी आणि मी ओळखत होतो. तिला एका योग्य डॉक्टरची गरज आहे याचा तिने नाकार केला, यावर जोर देत की ती बरी होईल. काही आठवडयानंतर ती मरण पावली.

पृथ्वीवर असताना, ख्रिस्ताने स्वयं-धर्मी धार्मिक नेत्यांच्या गटाला सांगितलेपश्चातापासाठी बोलावण्यास आलो आहे." (मार्क. २:१७)

पवित्र शास्त्राची स्पष्टता असूनही, पुष्कळ चर्च, मशिदी आणि सभागृहे फक्त लोकांना ते किती चांगले आहेत किंवा त्यांना आणखी थोडेसे कठीण प्रयत्न करण्याची केवळ गरज आहे हे सांगतात. ते लोकांना देवाच्या पवित्र धार्मिकतेबद्दल आणि पापाच्या गंभीर परिणामांबद्दल सांगत नाहीत.

कॅनडामधील एका मशिदीच्या प्रवेशद्वारावर एक संदेश चिकटवलेला आहे :

आम्ही कोणाचाही स्वीकार करतो आणि तो एक पापी आहे हे कोणालाही बोलत नाही देवाने स्वर्गाच्या प्रवेशद्वारावर एक वेगळा संदेश चिकटवलेला आहे :

*"तिच्यात कोणत्याही निषिद्ध गोष्टी .....प्रवेश होणारच नाही."* (प्रकटीकरण २१:२७)

पवित्र शास्त्र म्हणते : *"**सर्वांनी** पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत"* (रोम. ३:२३). देव कोणालाही त्याच्या किंवा तिच्या स्वतःच्या पात्रतेच्या आधारावर स्वीकारत नाही आणि सर्वांना सांगतो ते पापी आहेत.

फक्त तेच जे अशा प्रकारे धुतलेले आहेत जे देवाच्या परिपूर्ण न्याय आणि शुद्धतेच्या आदर्शाला संतुष्ट करतात तेच स्वर्गात प्रवेश करतील.

## देवाबद्दलचा एक अचूक दृष्टीकोन

एके दिवशी यशया संदेष्टयाला परमेश्वराच्या परिपूर्ण शुद्धता आणि अद्भुत गौरवाचा दृष्टांत देण्यात आला. यशयाने लिहिले :

> *"उज्जीया राजा मरण पावला त्या वर्षी प्रभूला उच्चस्थळी असलेल्या उच्च सिंहासनावर बसलेले मी पाहिले; त्याच्या झग्याच्या सोग्यांनी मंदिर व्यापून गेले होते. त्याच्या भोवताली सराफीम उभे होते; त्या प्रत्येकाला सहा-सहा पंख होते; दोहोंनी तो आपले तोंड झाकी, दोहोंनी आपले पाय झाकी व दोहोंनी तो उडे. ते आळीपाळीने उच्च स्वराने म्हणत, **'पवित्र! पवित्र! पवित्र सेनाधीश परमेश्वर**! अखिल पृथ्वीची समृद्धी त्याचे वैभव आहे.' घोषणा करणाऱ्यांच्या ह्या वाणीने उंबरठे हालले व मंदिर धुराने भरले. तेव्हा मी म्हणालो, '**हायहाय! माझे आता वाईट झाले, कारण मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे आणि अशुद्ध ओठांच्या लोकांत राहतो; आणि सेनाधीश परमेश्वर, राजाधिराज ह्याला मी आपल्या डोळ्यांनी पाहिले!**"*
> (यशया ६:१-५)

स्वर्गातील देवाच्या सिंहासनाभोवतीचे तेज इतके प्रखर आहे की अगदी शुद्ध देवदूतही त्यांचे मुख आणि पाय झाकतात. हे देवदूत देवाची पवित्रता आणि गौरवाने इतके भयभीत होतात की ते त्याच्या उपस्थितीत बसू शकत नाहीत. त्याऐवजी, *"पवित्र! पवित्र! पवित्र सेनाधीश परमेश्वर! अखिल पृथ्वीची समृद्धी त्याचे वैभव आहे!"* असे म्हणत ते सिंहासनाभोवती फिरतात.

बहुतेक लोक पाप काय आहे हे पाहण्यात का अपयशी ठरतात? कदाचित देव कोण आहे म्हणून त्यांनी त्याला कधीच पाहिलेले नाही. त्यांनी कधीही त्याच्या तेजस्वी पवित्रतेचा विचार

केला नाही. यशया हा एक धार्मिक संदेष्टा होता, तरीही त्याने पाहिलेल्या परमेश्वराच्या पवित्र वैभवाच्या दृष्टांताने त्याला त्याच्या दूषितपणाची आणि ओंगळपणाची जाणीव करून दिली. *"हायहाय! माझे आता वाईट झाले, कारण मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे!"* असे तो म्हणाला. परमेश्वराशी तुलना केली असता, यशयाला माहित होते की तो आणि संपूर्ण इस्राएल राष्ट्र हे हताश अवस्थेत होते!

नंतर, यशयाने लिहिले : *"आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपापला मार्ग धरला होता; अशा आम्हां सर्वांचे पाप परमेश्वराने त्याच्यावर लादले"* .....आम्ही सगळे अशुद्ध मनुष्यासारखे झालो आहोत; आमची सर्व नीतीची कृत्ये घाणेरडया वस्त्रांसारखी झाली आहेत" (यशया ५३:६; ६४:६). *यशयाला माहित होते की परमेश्वरासमोर*[१३४] *त्याला कोणत्याही प्रकारचे विधिवत धुणे किंवा स्वतःचे प्रयत्न शुद्ध करू शकत नाही. आपल्या पवित्र निर्माणकर्त्याच्या दृष्टीत,* "आपण **सर्व जण अशुद्ध गोष्टी** सारखे **आहोत**."

ईयोब संदेष्टयाने मनुष्याच्या दूषितपणाची समज दाखवली जेव्हा त्याने विचारले, "**मानव देवापुढे कसा नीतिमान ठरेल?**.... *माझे अंग बर्फाने धुतले, माझे हात खाराने स्वच्छ केले, तरी तू मला खड्ड्यात टाकशील, माझी वस्त्रेदेखील माझा धिक्कार करतील"* (ईयोब ९:२, ३०-३१). आणि यिर्मया संदेष्टयाने देवाची ही वचने लिहून ठेवली : *"तर तू आपणांस खाराने धुतले व आपणास पुष्काळसा साबण लावला तरी माझ्या दृष्टीने तुझ्या पापाचा डाग तसाच राहील, असे प्रभू परमेश्वर म्हणतो."* (यिर्मया २:२२)

देवाचा अचूक दृष्टीकोन आपल्या स्वतःच्या अचूक दृष्टीकोनाकडे नेतो. आपल्या निर्माणकर्त्याबद्दल अपुरे विचार आपल्या स्वतःबद्दलच्या फुगीर विचारांनी भरून ठेवतात.

घाणेरडे वस्त्र घातलेला, रोगग्रस्त चिंध्या घातलेला माणूस स्वतःला स्वच्छ आणि स्वीकारयोग्य असल्याची कल्पना करू शकतो, पण त्यामुळे तो तसा होत नाही. त्याप्रमाणेच, एक पापी स्वतःबद्दल धार्मिक असल्याची कल्पना करू शकतो, पण ते त्याला तसे बनवत नाही.

देवाचे गौरव आणि धार्मिकतेशी तुलना केली असता, आपले उत्तम प्रयत्न हे घाणेरडया चिंधीसारखे आहेत.

## सर्वांसाठी एक शिकवण

इस्राएल राष्ट्राची निर्मिती करण्याच्या देवाच्या उद्देशांपैकी एक म्हणजे सर्व राष्ट्रांना काही महत्वाची शिकवण देणे होता. जरी परमेश्वर इस्राएलाशी सतत विश्वासू होता, तरी इस्राएली लोक

परमेश्वराला सतत अपयशी ठरले. आपण त्यांच्यापासून शिकावे ही देवाची इच्छा आहे. *"ह्या गोष्टी आपल्याला* ***उदाहरणांदाखल*** *झाल्या, अशा हेतूने की, त्यांनी लोभ धरला तसा आपण वाईट गोष्टींचा लोभ धरू नये."* (१ करिंथ. १०:६)

निर्गम, तोराच्या दुसऱ्या पुस्तकात, मोशेने नोंद केली आहे की देव जसे पापाला पाहतो तसे पाहण्यास इस्राएल लोक कसे चुकले. शक्तिशाली हाताने, देवाने त्यांना मिसर देशातील शतकानुशतकांच्या गुलामगिरीतून सोडवले होते. तरीही त्यांनी परमेश्वर आणि त्याच्या चरित्राबद्दल जे बरेच काही होते ते समजले नाही. त्यांनी कल्पना केली की देवाच्या न्यायापासून सुटण्यास ते कसे तरी पुरेसे आज्ञाधारक असू शकतील.

इस्राएली लोक इतके आत्मविश्वासी होते की त्यांनी मोशेला म्हटले,

*"परमेश्वराने सांगितले आहे* ***ते सर्व आम्ही करू.*** *"* (निर्गम १९:८)

त्यांनी स्वतःला असहाय्य पापी म्हणून पाहिले नाही, किंवा निर्दोष धार्मिकतेची देवाची अपेक्षा त्यांना समजली नाही. ते हे विसरले होते की आदाम आणि हव्वेला त्यांच्या निर्माणकर्त्यापासून वेगळे होण्यासाठी केवळ एक पाप पुरेसे झाले होते. इस्राएली लोकांना त्यांचे पाप दाखववावे आणि त्यांना त्याची लाज वाटण्यास मदत करण्यासाठी, देवाने त्यांना दहा मुद्यांसह परीक्षा दिली.

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की परमेश्वर सीनाय पर्वतावर सामर्थ्य आणि गौरवात कसा उतरला. *"तिसरा दिवस उजाडताच* ***गडगडाट*** *झाला व* ***विजा चमकू*** *लागल्या, पर्वतावर* ***दाट ढग*** *जमले व* ***शिंगांचा*** *फार मोठयाने नाद होऊ लागला.."* (निर्गम १९:१६). मग देवाची वाणी दहा नियमाने मोठयाने गर्जत होती :




**दहा आज्ञा**

१. **"माझ्याशिवाय तुला वेगळे देव नसावेत."** परमेश्वराला

सोडून इतर कोणाचीही उपासना करणे हे पाप आहे. आपल्या संपूर्ण हृदयाने, मनाने आणि शक्तीने देवावर प्रतीदिवसाच्या प्रत्येक क्षणी प्रीती करण्यात अपयशी होणे हे पाप आहे. (निर्गम २०)[१३५]

२. **"आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नकोस;......त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस."** प्रतिमेसमोर झुकणे किंवा एखाद्या वस्तूला पूजनीय मानण्याएवढेच हे मर्यादित नाही. . देवाचे स्थान अन्य कोणत्याही गोष्टीला दिले की ते या नियमाचे उल्लंघन आहे.

३. **"तुझा देव परमेश्वर ह्याचे नाव व्यर्थ घेऊ नकोस."** जर तुम्ही दावा करता की तुम्ही एका सत्य देवाच्या अधीन आहात, पण तुम्ही त्याची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करत नाहीत आणि त्याचे वचन पाळत नाहीत, तर मग तुम्ही त्याचे पवित्र नाव व्यर्थ घेत आहात.

४. **"शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळ....,म्हणून त्या दिवशी कोणतेही कामकाज करू नकोस."** देवाने इस्राएली लोकांना त्याचा सन्मान करण्यासाठी प्रत्येक सातव्या दिवशी काम सोडावे असे सांगितले.

५. **"आपल्या बापाचा व आपल्या आईचा मान राख."** पूर्ण आज्ञाधारकपणापेक्षा काहीही कमी हे पाप आहे. मुलांनी आपल्या पालकांचा अनादर करणे किंवा त्याच्या प्रती वाईट आचरण ठेवणे देखील या आज्ञेचे उल्लंघन आहे.

६. **"खून करू नकोस."** देव हे देखील म्हणतो, *"जो कोणी आपल्या बंधूचा द्वेष करतो तो नरहिंसक आहे"* (१ योहान ३:१५). सहकारी मानवासाठी द्वेष बाळगणे हे खून करण्यासमान आहे. देव हृदयाकडे पाहतो आणि सर्व समयी निस्वार्थ प्रीतीची अपेक्षा करतो.

७. **"व्यभिचार करू नकोस."** हा नियम शरीराच्या केवळ अनैतिक वापरास संबोधत नाही, पण मनातील आणि अंत:करणातील अशुद्ध इच्छांना देखील संबोधते. *"जो कोणी एखाद्या स्त्रीकडे कामेच्छेने पाहतो त्याने आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केलाच आहे."* (मत्तय ५:२८)

८. **"चोरी करू नकोस."** जे योग्यरीत्या तुझे आहे त्यापेक्षा जास्त घेणे, कर देण्यात किंवा परीक्षेमध्ये फसवणूक, किंवा तुमच्या मालकासाठी विश्वासुपणे काम न करणे हे सर्व चोरीचे प्रकार आहेत.

९. **"आपल्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नकोस."** कोणाबद्दल किंवा

कशाबद्दल कथन करणे जे पूर्णपणे सत्यापेक्षा कमी आहे हे पाप आहे.

१०. **"आपल्या शेजाऱ्याच्या ...कोणत्याही वस्तूंचा लोभ धरू नकोस."** जे दुसऱ्याचे आहे त्याचा लोभ धरणे हे पाप आहे. आपल्याजवळ जे आहे त्याबाबत आपण संतुष्ट राहावे.

**अपराधी!**

परमेश्वराने दहा नियम घोषित केल्यानंतर, पवित्र शास्त्र कथन करते, *"मेघगर्जना होत आहे, विजा, चमकत आहेत, कर्ण्याचा नाद होत आहे आणि पर्वतातून धूर चढत आहे असे सर्व लोकांच्या दृष्टीस पडले तेव्हा **त्यांचा थरकाप झाला व ते दूर उभे राहिले.**"* (निर्गम २०:१८)

यापुढे ते फुशारकी मारू शकले नाही की *"परमेश्वराने सांगितले आहे, ते सर्व आम्ही करू"!"*

ते परीक्षेत अपयशी ठरले होते.

तुमच्याबद्दल काय? तुम्ही कसे केले?

सर्व दहा आज्ञांमध्ये जर तुम्ही १०० टक्क्यापेक्षा कमी स्कोअर केला (म्हणजे तुम्ही जन्मल्यापासून ते सध्याच्या मिनिटापर्यंत, आठवडयाचे ७ ही दिवस, दिवसाचे २४ तास अचूक आज्ञाधारकपणा), तर मग, इस्राएली लोकांसारखे, आणि माझ्यासारखे, परीक्षेत अपयशी ठरला आहात.

> *"कारण जो कोण संपूर्ण नियमशास्त्र पाळून **एका नियमाविषयी** चुकतो तो **सर्वांविषयी** दोषी होतो."* (याकोब २:१०)

या पुस्तकाच्या पहिल्या धडयात, आपण पाहिले आहे की बायबल हे जगातील केवळ सर्वाधिक विकले जाणारे पुस्तक आहे असे नाही तर हे जगातील सर्वाधिक टाळले जाणारे पुस्तक देखील आहे. हे इतके लोकप्रिय नसण्याचे एक कारण म्हणजे ते आपले पाप उघड करते आणि आपला अभिमान काढून टाकते. ते आपल्याला सांगते; *"मी श्रीमंत आहे, मी धन मिळवले आहे, व मला काही उणे नाही असे तू म्हणतोस, पण तू कष्टी, दीन, दरिद्री, आंधळा, व उघडावाघडा आहेस, हे तुला कळत नाही."* आणि: *"सदाचाराने वागणारा व पाप न करणारा असा नीतिमान पुरुष पृथ्वीवर आढळणार नाही."* (प्रकटीकरण ३:१७; उपदेशक ७:२०)

देवाचे नियमशास्त्र आपल्या स्वतःबद्दल आपल्याला चांगले वाटावे असे करत नाही. त्याचा तो हेतू नाही.

**दहा आज्ञा का?**

नियमशास्त्राचा उद्देश काय? जर देवाच्या दर्जाप्रमाणे कोणीही मोजमाप करू शकत नाही, तर त्याने ते जाहीर करण्याची तसदी का घेतली?!

देवाने ह्या आज्ञा दिल्याचे एक स्पष्ट कारण म्हणजे समाजात सुव्यवस्था राखण्यासाठी मानवजातीला स्पष्ट नैतिक मानक प्रदान करणे. योग्य आणि अयोग्य काय यावर एकमत नसलेली कोणतीही सभ्यता अराजकता किंवा अत्याचाराने नियंत्रित केली जाईल. देवाला माहित आहे समाजात नियमाची आवश्यकता आहे. तरीही देवाने दहा आज्ञा दिल्याची त्याहूनही अधिक महत्वाची कारणे आहेत.

परमेश्वराने त्याचे नियमशास्त्र दिले जेणेकरून *"प्रत्येक तोंड बंद व्हावे व अवघे जग देवासमोर शिक्षेस पात्र ठरावे, म्हणून नियमशास्त्र जे काही सांगते ते शास्त्राधीन असलेल्या लोकांना सांगते. म्हणून नियमशास्त्रातील कर्मांनी कोणीही मनुष्य देवासमोर नीतिमान ठरणार नाही;* ***कारण नियमशास्त्राच्या द्वारे पापाची जाणीव होते."*** (रोम. ३:१९-२०)

**दहा आज्ञांची तीन कार्ये :**

**१. देवाचे नियमशास्त्र स्वयं-धर्मी लोकांना गप्प करते.** *"की प्रत्येक मुख हे बंद व्हावे, आणि संपूर्ण जग देवासमोर दोषी ठरावे."* दहा आज्ञा आपल्याला सांगतात : तुम्ही स्वतःबद्दल किती चांगला विचार करता याची पर्वा नाही, तुम्ही देवाच्या परीपूर्ण धार्मिकतेचा दर्जा कधीही संतुष्ट करू शकणार नाही. तुम्ही कायदे-मोडणारे एक अपराधी आहात. अभिमान करण्याचे सोडा![१३६]

**२. देवाचे नियमशास्त्र आपले पाप उघड करते.** *"कारण नियमशास्त्राच्या द्वारे पापाची जाणीव होते."* नियमशास्त्र हे क्ष-किरणसारखे आहे. रेडीओग्राफीमुळे तुटलेले हाड किंवा तुटलेला दात दिसून येतो, परंतु ते दुरुस्त करू शकत नाही. त्याचप्रमाणे, *"म्हणून नियमशास्त्रातील कर्मांनी कोणीही मनुष्य देवासमोर नीतिमान ठरणार नाही."* एखाद्याच्या घाणेरडया चेहऱ्याला जसा आरसा आहे तसेच एका पापी व्यक्तीसाठी दहा आज्ञा आहेत. आरसा घाण दाखवू शकते, पण ते काढू शकत नाही. देवाचे नियमशास्त्र आपले पाप आणि दूषितपणा उघड करते पण ते त्यास काढू शकत नाही.

काही वर्षांपूर्वी सेनेगलमध्ये एका रोमन कॅथलिक माध्यमिक-शाळेच्या गणिताच्या शिक्षकाला मी देवाच्या नियमशास्त्राचा उद्देश समजावून सांगितला. हे त्याच्यासाठी एक

धक्कादायक स्पष्टीकरण होते. त्याच्या आवाजातील निराशेसह, त्याने टिप्पणी केली, *"ठीक आहे, म्हणजे दहा आज्ञा आपल्याला शिकवतात की आपण देवासमोर असहाय्य पापी आहोत जो पवित्र आहे आणि पापाचा न्याय केला पाहिजे, आणि हे की आपण आपली चांगली कृत्ये किंवा प्रार्थना आणि उपास करण्याद्वारे आपल्या स्वतःला वाचवू शकत नाही. तर मग देवाला मान्य कसे होऊ शकतो? उपाय काय आहे?"*

**३. देवाचे नियमशास्त्र आपल्याला देवाच्या उपायाकडे इशारा देते.** ज्याप्रमाणे रुग्णालयातील क्ष-किरण तंत्रज्ञ तुटलेल्या पायाच्या माणसाला तुटलेले हाड व्यवस्थित बसवू शकणाऱ्या पात्र डॉक्टरकडे जाण्याचा इशारा करते, त्याप्रमाणेच नियमशास्त्र आणि संदेष्टे आपल्याला एकमात्र *"वैद्याकडे"* इशारा करते जो *"आपल्याला नियमशास्त्राच्या शापापासून मुक्त करतो"* (गलती. ३:१३). आपण त्याच्याबद्दल लवकरच आणखी ऐकणार आहोत.[१३७]

### मदत!

जर तुम्ही बुडणार आहात आणि तेथे जवळच कोणीतरी आहे जो तुम्हांला बुडण्यापासून वाचवू शकतो, तर तुम्ही मदत मागण्यास ओरडण्यासाठी जास्त अभिमानी व्हाल का?

हे ओळखून की तुम्ही तुमच्या स्वतःला पापाच्या मरणप्राय शिक्षेपासून वाचवण्यात असमर्थ आहात हा एक पराभव नाही; विजयासाठी ती पहिली पायरी आहे. मनुष्याला मदतीची गरज आहे-मदत जी केवळ देव प्रदान करू शकतो.

कदाचित तुम्ही ही म्हण ऐकली असेल : *"देव त्यांना मदत करतो जे स्वतःला मदत करतात."* ही म्हण जीवनाच्या काही क्षेत्राला लागू होत असली तरी जेव्हा आपल्या पापी आणि **आध्यात्मिकरित्या** मृत स्थितीचा विचार केला जातो, तेव्हा अगदी उलट सत्य आहे : देव त्यांना मदत करतो ज्यांना माहित आहे की ते त्यांच्या स्वतःची मदत करू शकत नाहीत.

देव त्यांना मदत करतो जे एका तारणाऱ्याची त्यांना गरज आहे हे स्वीकारतात.

एक लोकप्रिय आफ्रिकी म्हण म्हणते, *"जरी लाकूड पाण्यात बराच काळ भिजत असेल, तरीही ती मगर बनणार नाही."*

तसेच मनुष्य आपला विकृत स्वभाव बदलू शकत नाही आणि स्वतःला नीतिमान बनवू शकत नाही.

### दूषित

आदामाबद्दल विचार करा. देवाने त्याला एक नियम दिला होता :

*बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नकोस.*

जर आदाम आणि हव्वेने त्यांच्या निर्माणकर्त्या-मालकाची आज्ञा पाळली असती, तर ते त्याच्याबरोबर एका अद्भुत नातेसंबंधात सदैव वाढत राहिले असते. पण तसे झाले नाही.

आपल्या पूर्वजांनी उल्लंघन केले आणि देवासोबतचा त्यांचा संबंध तुटला. पापी म्हणून, आता ते देवापासून लपण्याचा प्रयत्न करत होते. त्यांना लाज वाटली आणि त्यांच्या नग्नतेला अंजिराच्या पानांनी झाकण्याचा प्रयत्न केला. परंतु देवाने त्यांना शोधले, त्यांना त्याची दया आणि न्यायाची एक झलक दिली, आणि मग त्यांना त्याच्या उपस्थितीपासून दूर केले. जोपर्यंत तो परत येण्याचा मार्ग प्रदान करत नाही, तोपर्यंत ते कायमचे हद्दपार असतील. ते त्यांचा पवित्र निर्माणकर्ता आणि न्यायाधीशासमोर दूषित आणि दोषी ठरले होते.

येथे एक महत्वाचा प्रश्न आहे : देवाने परिपूर्ण एदेन बागेतून आदाम आणि हव्वेला हाकलून देण्यापूर्वी त्यांना किती पापे करावी लागली? एकच पाप करावं लागलं. त्यांच्या वतीने पूर्वीचे कितीही *"चांगले"* किंवा त्यानंतरचे स्वयंप्रयत्न एका पापाच्या परिणामास पुसून टाकू शकत नव्हते.

*"चांगला"* हा देवाचा सामान्य स्तर आहे. जेव्हा आदामाने पाप केले, देवाच्या अंदाजात तो आता *"चांगला"* नव्हता. तो शुद्ध पाण्याच्या प्याल्यासारखा झाला होता ज्यामध्ये कोणी सायनाईडचा एक थेंब टाकतो. जर तुमच्याकडे विषाने भरलेला पाण्याचा पेला असेल, तर अधिक शुद्ध पाणी टाकल्याने विष निघून जाईल का? नाही. किंवा आपल्या पापाच्या समस्येला पुसून टाकण्यासाठी कितीही चांगली कृत्ये काहीही करू शकत नाहीत. आणि जरी चांगल्या कामांनी पापाला काढून टाकले, तरी वास्तविकता अशी आहे की आपल्या पापी स्वभावात भर घालण्यासाठी आपल्याकडे कोणतेही *"शुद्ध पाणी,"* नाही, म्हणजेच खरोखर धार्मिक कार्ये नाहीत.

देवाच्या दृष्टीत, आपले उत्तम प्रयत्न प्रदूषित आहेत.

आदामाचा जीव पापाने दूषित झाला होता, तसेच हव्वेचाही. आणि तसेच आपलाही. आपण **सर्व** जण त्याच दूषित स्रोताकडून येतो. दावीद संदेष्टा आपल्याला देवाचा आदेश देतो :

*"कोणी समंजस आहे की काय, कोणी देवभक्त आहे की काय, हे पाहण्यासाठी परमेश्वराने स्वर्गातून मानवांकडे अवलोकन केले; ते सर्व मार्गभ्रष्ट झाले आहेत; एकूणएक बिघडला आहे, सत्कर्म करणारा कोणी नाही, एकही नाही."* (स्तोत्र. १४:२-३)

## आपला दुहेरी त्रास

एक खूप जुनी गोष्टी आहे. जन्मठेपेची शिक्षा झालेला एक माणूस ब्रिटीश तुरुंगात होता. एके दिवशी कोठडीचा दरवाजा उघडला आणि जेलर आत गेला.

*"ऊठ बघ!"* जेलर म्हणाला, *"तुला राणीने क्षमा केली आहे."*

जेलरला आश्चर्य वाटले, त्या माणसाने कोणतीही भावना दर्शवली नाही.

*"माणसा, मी तुला सांगत आहे, उत्साही हो!"* एक कागद हलवत जेलर पुन्हा म्हणाला. *"हे क्षमापत्र आहे. राणीने तुला क्षमा केली आहे!"*

त्यावर, त्या माणसाने त्याचा शर्ट वर केला आणि एका भयंकर दिसणाऱ्या एका फोडाकडे बोट दाखवत मला म्हणाला, *"मला कर्करोग आहे जो काही दिवसात किंवा काही आठवडयात मला मारून टाकेल. जोपर्यंत राणी हे काढून टाकू शकत नाही तोपर्यंत क्षमा माझ्यासाठी निरुपयागी आहे."*

त्या माणसाला माहित होते की त्याला त्याच्या गुन्ह्यांच्या क्षमेपेक्षा जास्त गरज आहे; त्याला नवीन जीवनाची गरज होती.

आदामाच्या वंशजांचे प्रत्येक सदस्य हे या दोषी माणसासारखे आहे. निवडीने पापी आणि जन्माने पापी आहोत म्हणून, आपल्याला दुहेरी कोंडी आहे : आपल्याला देवाविरुद्ध आपल्या अपराधांची क्षमा पाहिजे आणि आपल्याला देवापासून धार्मिक, सार्वकालिक जीवनाची गरज आहे जे आपल्याला त्याच्या पवित्र उपस्थितीत जगण्यास पात्र करेल.

सारांश, येथे आमची दुहेरी समस्या आहे :

- **पाप :** आपण अपराधी पापी आहोत. देवच केवळ आपल्याला पापापासून शुद्ध करू शकतो आणि आपल्याला सार्वकालिक शिक्षेपासून सोडवू शकतो. आपल्याला देवाच्या **क्षमेची** गरज आहे.
- **लाज :** आपण आध्यात्मिकरित्या नग्न आहोत. देवच केवळ आपल्याला त्याच्या धार्मिकतेसह वस्त्र घालू शकतो आणि आपल्याला सार्वकालिक जीवन देऊ शकतो. आपल्याला देवाच्या **परिपूर्णतेची** गरज आहे.

आपले पाप आणि लज्जेसाठी दुहेरी उपचार आवश्यक आहे जे आपण निर्माण करू शकत नाही. सुवार्ता ही आहे की देवाने ते आपल्यासाठी प्रदान केले आहे.



# धडा १६

# स्त्रीचे संतान

**ए**का थंड, धुक्याच्या रात्री दोन लहान मुले एका खोल, निसरड्या खड्ड्यात पडली. दोघेही, जखमी, घाबरलेले आणि असहाय्य होते. दोघेही एकाच संकटात असल्याने दोघांनाही एकमेकांना वाचवता आले नाही. खड्ड्याच्या बाहेरून बचाव आला नाही तर मृत्यू लवकरच त्यांच्यावर ताबा घेईल. तीन माणसांनी मदतीसाठी त्यांचे हताश ओरडणे ऐकले. दोरीच्या साहाय्याने एका माणसाला अंधाऱ्या खड्ड्यात खाली उतरवले. मुलांना बाहेर काढले.

त्यांची सुटका ही वरून आली.

आदाम आणि हव्वेने प्रथम पाप केले, ते त्या दोन मुलांसारखे झाले होते. ते ज्या पापाच्या खड्ड्यात पडले होते तेथून स्वतःला वाचवण्यात असहाय्य होते. जर त्यांना सार्वकालिक मृत्यूपासून वाचवायचे असेल, तर सुटका ही पतित मानववंशाच्या बाहेरून, वरून आली पाहिजे.

याबद्दल काही चूक करू नका. मानव अवस्था ही स्वतःची उपाययोजना नसल्याने गंभीर आहे.

शतकानुशतके, अपवादावाचून, आदामाचे सर्व वंशज-पुरुष आणि स्त्रीपासून जन्मलेले-ह्यांना पापी स्वभावाचा वारसा मिळाला आहे. सर्व जण पापाच्या शापात जन्मले आहेत.

पाप्यांना पापाचे शाप आणि परिणामांमधून सोडवण्यासाठी, देवाने एक निष्पाप माणूस जगात आणण्याची योजन केली जो सर्वांना सुटका प्रदान करेल ज्यांना पापाच्या खड्ड्यातून वाचण्याची इच्छा आहे.

देव हे कसे करेल? आदामाच्या पापाचा स्वभाव वारशाने घेतल्यावाचून कोणी कसा मानवी कुटुंबात जन्म घेऊ शकतो? ज्या दिवशी पापाने मानवजातीला प्रभावित केले त्या दिवशी देवाने

पहिला संकेत दिला.

परमेश्वराने *"सर्पाला"* (सैतानाला) आधीच सांगितले :

> *"आणि तू व स्त्री, तुझे **संतान** व तिचे संतान ह्यांच्यामध्ये मी परस्पर वैर स्थापन करीन; तो तुझे डोके फोडील व तू त्याची टाच फोडशील."* (उत्पत्ती ३:१५)

*"तिचे संतान"* बद्दल बोलताना, परमेश्वर भाकीत करत होता की ते एका स्त्रीकडून जन्मलेले, एक पुरुष बाळ द्वारे असेल, जो पाप्यांना सोडवेल आणि शेवटी सैतानाला ठेचेल आणि वाईट काढून टाकेल. पुढे येणाऱ्या शेकडो भविष्यावाणींपैकी ही पहिली होती, प्रत्येक मोठया स्पष्टतेसह इतिहासातील त्या क्षणाकडे बोट दाखवत होती जेव्हा तारणारा-ख्रिस्त या जगाला भेट देईल.

## तिचे संतान का?

ख्रिस्त *"**तिचे** संतान"* म्हणून मानवजातीत प्रवेश का करेल? तो *"एका **स्त्रीपासून** जन्मलेला"* का असावा, पण एका पुरुषापासून नाही? (गलती. ४:४)

येथे उत्तर आहे : पाप्यांचे तारण करणारा मानवजातीला आदामाच्या पापी वंशजांना भेट देत असताना, त्याने पापाच्या खड्ड्याच्या बाहेरून आले पाहिजे. त्याने वरून उतरले पाहिजे.

स्त्रीचे संतानबद्दल सुरुवातीच्या भविष्यवाणीच्या खूप आधी, यशया संदेष्टयाने लिहिले होते :

> *"ह्यास्तव प्रभू स्वतः तुम्हांला चिन्ह देत आहे; **पाहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल** व त्याचे नाव इम्मानूएल* (आमच्यासन्निध देव) *असे ठेवील."* (यशया ७:१४)

तारणारा मानवी कुटुंबात एका कुमारी स्त्रीच्या गर्भाने प्रवेश करेल जिचा कोणा माणसाबरोबर कधीही शारीरिक संबंध झालेला नाही. आदामाच्या पापी स्वभावाचा वारसा न घेता आदामाच्या पतित वंशाला भेट देण्याचा हा ख्रिस्ताचा मार्ग असेल.

*"पण एक मिनिट थांबा,"* कोणीतरी म्हटले आहे; "स्त्रिया देखील पापी आहेत. जरी ख्रिस्त एकमेवपणे एका स्त्रीकडून जन्माला, तरी तो त्याच्या आईच्या पापाच्या स्वभावाने दूषित होणार नाही का?

येथून पुढे काही पानानंतर, देवाच्या पवित्र आत्म्याने ही चमत्कारिक गर्भधारणा कशी आणली हे आपण ऐकणार आहोत. तथापि, आपल्या निष्पाप पुत्राला एक कुमारिकेच्या

गर्भाने या जगात आणण्याच्या देवाच्या रचनेतील काही कमी स्पष्ट घटकांवर चिंतन करू या. आदामाच्या सर्व संततींमध्ये पसरलेल्या पापामुळे ख्रिस्त पापाने दूषित न होता कसा जन्म घेऊ शकतो?

## पापाने अदूषित

१३ व्या धडयात आपण याआधीच शिकलो आहोत, देवाने मानवजातीला सैतानाच्या पाप आणि मृत्यूच्या राज्यात नेण्यासाठी आदामाला जबाबदार धरले. हव्वा फसविली गेली; आदाम फसविला गेला नाही. महिला ह्या पुरुषांप्रमाणे पापमय स्वभावाने जन्म घेत असल्या तरी, पवित्र शास्त्र हे स्पष्ट करते की आपला आदामाबरोबर असणारा हा संबंध जो आपल्याला पापी स्वभावाने जन्म घेण्यास कारणीभूत आहे.[१३८]

इब्री भाषेत, आदामाचा अक्षरशः अर्थ लाल माती आहे. देवाने आदामाच्या शरीराला पृथ्वीच्या मातीतून बनवले होते. आदामाने पाप केल्यानंतर, देवाने त्याला सांगितले, *"तू माती आहेस आणि* ***मातीला परत जाऊन मिळशील."*** (उत्पत्ती ३:१९)

याउलट, हव्वा म्हणजे जीवन. हे नाव पहिल्या स्त्रीला दिले गेले, *"कारण ती* ***अवघ्या जीवधारी जनांची*** *माता होय"* (उत्पत्ती ३:२०). ज्या दिवशी पापाने जगात प्रवेश केला, त्या दिवशी देवाने आपल्या पापाच्या समस्येवर उपाय करण्यासाठी त्याची योजना घोषित केली आणि *"तिच्या संतान"* (उत्पत्ती ३:१५) द्वारे जगासाठी सार्वकालिक जीवन प्रदान केले.

जरी ख्रिस्त हा मांस आणि रक्ताचे शरीर घेऊन असेल, तरी तो आदामाच्या पाप-संक्रमित वंशजातून उत्पन्न होणार नाही. तो पापाने अदूषित असेल.

विशेष म्हणजे, पूर्णपणे जैविक दृष्टीकोनातून, आज आपल्याला माहित आहे की मुलाचे लिंग त्याच्या वडिलांचे *"बीज"* (शुक्राणू) द्वारे निर्धारित केले जाते, आईच्या *"बीजाच्या"* (अंड्याच्या) द्वारे नाही. आपल्याला हे देखील माहित आहे की, गर्भधारणेपासून, गर्भाशयात असलेल्या बाळाची रक्ताभिसरण प्रणाली त्याच्या आईपेक्षा वेगळी असते. वैद्यकीय विज्ञान आपल्याला सांगते : *"प्लासेंटा एक अनोखा अडथळा बनवते ज्यामुळे आईचे रक्त वेगळे ठेवते आणि अन्न व ऑक्सिजन गर्भापर्यंत जाऊ देते."*[१३९] देवाने पहिला मानव निर्माण करण्यापूर्वीच, त्याने पृथ्वीवर ख्रिस्ताच्या येण्याच्या प्रत्येक तपशीलवार गोष्टींची योजना केली होती.



तुटलेल्या फांदीच्या उदाहरणाची आठवण करा. त्या वेगळ्या केलेल्या, मृत फांदीप्रमाणे, मानवी कुटुंब हे आध्यात्मिकरित्या मृत, जीवनाच्या स्त्रोतपासून वेगळे केलेले आहे. जरी पाप्यांच्या तारणारा आदामाच्या आध्यात्मिक मृत आणि पापाने-दूषित कुटुंबात जगणार होता, तरी तो त्यापासून उत्पन्न होणार नव्हता. तो स्वतःच *"खरा द्राक्षावेल"* (योहान १५:१) असणार होता, जीवनाचा प्रत्यक्ष स्तोत्र. तो परिपूर्ण असेल.

*"परिपूर्ण"* याचा अर्थ हा नाही की त्याला त्याच्या शरीरावर कधीही मुरूम, जखम किंवा ओरखडे नसतील. याचा अर्थ त्याचे चारित्र्य परिपूर्ण असेल. तो पापरहित स्वभावाचा असेल. तो देवाच्या नियमशास्त्राचे कधीही उल्लंघन करणार नाही. तो *"पवित्र, निर्दोष, निर्मळ असून, पापी जनांपासून वेगळा व आकाशाहून उंच करण्यात आलेला असेल."* (इब्री. ७:२६)

निष्पाप ख्रिस्ताला **दुसरा** मनुष्य आणि **शेवटचा आदाम** म्हणतात यात काही आश्चर्य आहे का?

## दुसरा मनुष्य

*"त्याप्रमाणे असा शास्त्रलेख आहे की, '**पहिला मनुष्य आदाम** जिवंत प्राणी असा झाला;' **शेवटचा आदाम** जिवंत करणारा आत्मा असा झाला. तथापि जे आध्यात्मिक ते प्रथम नाही; प्राणमय ते प्रथम, मग जे आध्यात्मिक ते. **पहिला मनुष्य** भूमीतून म्हणजे मातीचा आहे, **दुसरा मनुष्य** [प्रभू] स्वर्गातून आहे."* (१ करिंथ. १५:४५-४७)

जसे *"पहिल्या मनुष्याने"* संपूर्ण मानवजातीला सैतानाच्या दूषित आणि मृत्यूच्या अंधाऱ्या राज्यात नेले, तसेच *"दुसरा मनुष्य"* पुष्कळांना सैतानाच्या राज्यातून बाहेर नेईल आणि धार्मिकता आणि जीवनाच्या देवाच्या गौरवी राज्यात नेईल. म्हणूनच, ज्या दिवशी पापाने मानवजातीला दूषित केले, त्याच दिवशी परमेश्वराने सैतानाला आदेश दिला की स्त्रीचे संतान एके दिवशी पृथ्वीवर येईल की त्यास ठेचावे आणि शेवटी त्याचा नाश करावा.

मीखा संदेष्ट्याने अभिवचन दिलेल्या या तारणाऱ्याबद्दल लिहिले :

*"हे **बेथलेहेम**, एफ्राथा, यहूदाच्या हजारांमध्ये तुझी गणना अल्प आहे, तरी तुझ्यामधून एक जण निघेल, तो माझ्यासाठी इस्राएलाचा शास्ता होईल; **त्याचा***

> ***उद्भव प्राचीन काळापासून अनादि काळापासून आहे.****.....त्याची थोरवी पृथ्वीच्या दिगंतापर्यंत पसरेल. हा पुरुष आम्हांला शांती होईल."* (मीखा ५:२, ४-५)

मीखाने केवळ *"बेथलेहेम"*[१४०] च्या नगरात ख्रिस्ताच्या जन्माबद्दलच भविष्यवाणी केली नाही, तर तारणाऱ्याचे अस्तित्व *"प्राचीन काळापासून, अनादि काळापासून"* आहे हे देखील घोषित केले.

सार्वकालिक एकच अनंतकाळापासून काळाकडे पाऊल टाकेल.

## संदेष्टयांद्वारे भाकीत केलेले

संदेष्टे, ज्यांनी घोषित केले की ख्रिस्त कुमारीकेच्या पोटी जन्म घेईल आणि बेथलेहेममध्ये जन्मेल, तसेच ही देखील भविष्यवाणी केली की त्याच्या अगोदर अग्रदूत येईल जो त्याच्या आगमनाची घोषणा करेल. त्यांनी लिहिले की देवाचा निवडलेला एकमात्र ज्याला देवाचा पुत्र आणि मनुष्याचा पुत्र उपाधी देण्यात येतील. त्यांनी भाकीत केले की तो आंधळ्यांना दृष्टी देईल, बहिरे ऐकतील आणि पांगळे चालतील असे करील. तो यरुशलेमेत गाढवावर बसून येईल आणि त्याच्या स्वतःच्या लोकांकडून अस्वीकार केला जाईल. त्याची निंदा होईल, त्याच्यावर थुंकतील, त्यास फटके मारतील आणि वधस्तंभावर खिळतील. त्याने स्वतः पाप केले नसेल, तरी इतरांच्या पापांसाठी मरेन. त्याला एका श्रीमंत माणसाच्या कबरेत पुरतील, पण त्याचे शरीर कुजणार नाही. त्याऐवजी, तो मृत्यूवर विजय मिळवेल, स्वतःला जिवंत दाखवेल, आणि जेथून तो आला होता तेथे स्वर्गात परत जाईल.[१४१]

संदेष्टयांद्वारे लिहिलेली ही व्यक्तिरेखा कोणत्या व्यक्तीने भरून काढली?

हा तोच व्यक्ती आहे ज्याने जगाच्या इतिहासाला दोन भागांमध्ये विभागले आहे.

त्याचे नाव **येशू** आहे.

## देव त्याचे वचन पाळतो

शतकानुशतके, देवाने अब्राहाम, इसहाक, याकोब, यहूदा, दावीद आणि शलमोनाच्या कुटुंबातून जगाला तारणारा पाठवण्याचे अभिवचन दिले. अशा प्रकारे, मत्तय कृत शुभवर्तमान (अरबी : इंजील), नवीन करारातील पहिले पुस्तक, या शब्दांनी सुरु होते :

> *"अब्राहामाचा पुत्र दावीद ह्याचा पुत्र जो येशू ख्रिस्त, त्याची वंशावळी. अब्राहामाला इसहाक झाला; इसहाकाला याकोब; याकोबाला यहूदा व त्याचे भाऊ झाले...."*

वंशावळीची एक लांबलचक यादी आहे ज्यामध्ये *"दाविदाला शलमोन झाला,"* आणि त्याचा शेवट *"मरीयेचा पती योसेफ, ज्याच्या वंशातून येशूचा जन्म झाला ज्यास ख्रिस्त म्हणतात"* या सर्वांचा समावेश आहे. (मत्तय १:१-२, १६). इब्री शब्द मसीहा यासाठी ख्रिस्त हा ग्रीक शब्द आहे ज्याचा अर्थ 'अभिषिक्त [निवडलेला] एकच.[१४२] अशी वंशावळ दावीद राजाच्या राजासनावर येशूच्या कायदेशीर अधिकाराची नोंद करते आणि हे दाखवते की येशू हा अब्राहाम, इसहाक आणि याकोबाचा सरळपणे वंशज आहे ज्याच्या द्वारे देवाने पृथ्वीवरील सर्व लोकांना त्याचे आशीर्वाद देण्याचे अभिवचन दिले आहे.

देवाची वेळ आली होती की त्याची सोडवण्याची योजना कृतीत आणावी, योजना *"जी त्याने त्याच्या पुत्रा संबंधी, पवित्र शास्त्रात त्याच्या संदेष्टयांद्वारे फार पूर्वी अभिवचन दिले होते...."* (रोम. १:२-३)

## परात्पराचा पुत्र

लूकचा पहिला अध्याय देवदूत गब्रीएल देवदूताने जखऱ्याला दिलेल्या भेटीच्या वेधक कथेची नोंद करतो, ज्याचे काम यरुशलेमेतील मंदिरात अर्पण आणि प्रार्थना सादर करणे होते. जरी जखऱ्या आणि त्याची पत्नी अलीशिबा अति वृद्ध होते की त्यांना मुलेबाळे व्हावीत, गब्रीएलाने त्यांना सांगितले की त्याच्या पत्नीला एक मुलगा होईल, ज्याचे नाव त्यांनी योहान ठेवावे. हा योहान मसीहाचा अग्रदूत असेल.

मरीया नाव असलेल्या एका धार्मिक तरुण स्त्रीला गब्रीएलाच्या भेटीसह नाटय सुरु राहते.

> *"नंतर सहाव्या महिन्यात देवाने गालीलातील नासरेथ नावाच्या गावी एका कुमारीकडे गब्रीएल देवदूताला पाठवले. ती दाविदाच्या घराण्यातील योसेफ नावाच्या पुरुषाला वाग्दत्त होती; आणि त्या कुमारीचे नाव मरीया होते. देवदूत तिच्याकडे आत येऊन म्हणाला, 'हे कृपा पावलेल्या स्त्रीये, कल्याण असो; प्रभू तुझ्याबरोबर असो.' ह्या बोलण्याने तिच्या मनात खळबळ उडाली आणि हे अभिवादन काय असेल ह्याचा ती विचार करू लागली. देवदूताने तिला म्हटले, 'मरीये भिऊ नकोस, कारण देवाची कृपा तुझ्यावर झाली आहे. पाहा,* ***तू गरोदर राहशील व तुला पुत्र होईल. तू त्याचे नाव येशू ठेव.*** *तो थोर होईल व त्याला* ***परात्पराचा पुत्र*** *म्हणतील; आणि प्रभू देव त्याला त्याचा पूर्वज दावीद ह्याचे राजासन देईल; आणि ....त्याच्या राज्याचा अंत होणार नाही.' मरीयेने देवदूताला म्हटले,* ***'हे कसे होईल? कारण मला पुरुष ठाऊक नाही.'*** *देवदूताने उत्तर दिले,* ***'पवित्र आत्मा तुझ्यावर येईल आणि***

***परात्पराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील; म्हणून ज्याचा जन्म होईल त्याला पवित्र, देवाचा पुत्र, असे म्हणतील.......कारण देवाला काहीच अशक्य होणार नाही."*** (लूक १:२६-३७)

## पाप्यांचा तारणहार

सात महिन्यांनंतर, योसेफाला कळले की मरीया, त्याची वाग्दत्त पत्नी गरोदर आहे. त्याने चुकून स्पष्ट गृहीत धरले की, मरीया अविश्वासू आहे. त्याने त्यांच्या होणाऱ्या विवाहाला रद्द करण्याचा निर्णय घेतला.

*"तिचा पती योसेफ नीतिमान होता व तिची बेअब्रू करण्याची त्याची इच्छा नसल्यामुळे तिला गुप्तपणे सोडण्याचा त्याने विचार केला. असे विचार त्याच्या मनात घोळत असता पाहा, प्रभूच्या दूताने त्याला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले, 'योसेफा, दाविदाच्या पुत्रा, तू मरीयेचा आपली पत्नी म्हणून स्वीकार करण्यास अनमान करू नकोस, कारण तिच्या पोटी जो गर्भ आहे* ***तो पवित्र आत्म्यापासून आहे****. तिला पुत्र होईल, आणि त्याचे नाव तू* ***येशू असे ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील****."* (मत्तय १:१९-२१)

जसे उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायात स्पष्ट केले आहे, पवित्र आत्मा हा स्वयं देव आहे.[१४३] देव हा तोच आहे ज्याने मरीयेच्या गर्भात त्याचे सार्वकालिक वचन अलौकिकरित्या ठेवले होते.

**येशू** हे नाव ग्रीक शब्द येसुस पासून इंग्रजी लिप्यंतरण आहे, जे इब्री शब्द यहोशवा किंवा त्याचा संक्षिप्त प्रकार येशूआपासून येते.

या नावाचा अर्थ : "**प्रभू तारतो**."

*"हे सर्व अशासाठी झाले की, प्रभूने संदेष्ट्यांच्या द्वारे जे सांगितले* ***ते पूर्ण व्हावे****; ते असे : 'पाहा, कुमारी गर्भवती होईल व तिला पुत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील.' ह्या नावाचा अर्थ,* ***'आमच्याबरोबर देव.'*** *तेव्हा झोपेतून उठल्यावर त्याने प्रभूच्या दूताने आज्ञापिल्याप्रमाणे केले; त्याने आपल्या पत्नीचा स्वीकार केला, तरी तिला प्रथमपुत्र होईपर्यंत त्याने तिला जाणले नाही; मग त्याने त्याचे नाव* ***येशू*** *ठेवले."* (मत्तय १:२२-२५)

## देवाचे वचन पूर्ण झाले

ज्या दिवशी पापाने जगात प्रवेश केला त्या दिवशी त्याने प्रकट करण्यास सुरुवात केलेली योजना देवाने अमलात आणली होती. *"तिचे संतान"* हे आता जन्मणार होते!

काहीं पानांपूर्वी मसीहाचा जन्म कोठे होईल याबद्दल आपण मीखाच्या भविष्यवाणीमध्ये वाचले होते. परमेश्वराने भाकीत केले की तो बेथलेहेम, राजा दाविदाच्या मूळ नगरात जन्मेल.

पण येथे एक समस्या होती.

मरीया आणि योसेफ नासरेथ मध्ये राहत होते,[१४४] बेथलेहेमपासून अनेक दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर.

मीखाची भविष्यवाणी कशी पूर्ण होईल?

काही समस्या नाही.

देव रोमन साम्राज्याला चालना देईल की या भविष्यवाणीला पूर्ण करण्यास मदत करावी.

> *"त्या दिवसांत असे झाले की, सर्व जगाची नावनिशी लिहिली जावी अशी कैसर औगुस्त याची आज्ञा झाली. क्विरीनिय हा सुरियाचा सुभेदार असताना ही पहिली नावनिशी झाली. तेव्हा सर्व लोक आपापल्या गावी नावनिशी लिहून देण्यास गेले. योसेफ हा दाविदाच्या घराण्यातला व कुळातला असल्यामुळे तोही गालीलातील नासरेथ गावाहून वर यहूदीयातील दाविदाच्या बेथलेहेम गावी गेला, व नावनिशी लिहून देण्यासाठी, त्याला वाग्दत्त झालेली मरीया गरोदर असताना तिलाही त्याने बरोबर नेले. ते तेथे असताना असे झाले की, तिचे दिवस पूर्ण भरले; आणि **तिला तिचा प्रथमपुत्र झाला**; त्याला तिने बाळंत्याने गुंडाळून गव्हाणीत ठेवले, कारण त्यांना उतारशाळेत जागा नव्हती."* (लूक २:१-७)

अभिवचन असलेल्या ख्रिस्ताने आपला प्रवेश आरामदायक आणि भव्य राजवाडयात केला नाही. त्याऐवजी, त्याचा जन्म एका साध्या झोपडीत झाला आणि त्याला एका गव्हाणीत ठेवले, जेथे गुरांना खाण्यासाठी चारा ठेवत असत. तो जगात अशा प्रकारे आला की गरीबातील गरीब देखील आणि सर्वात सामान्य लोक सुद्धा त्याच्याकडे येऊ शकतील आणि भिणार नाहीत.

## देवदूताची घोषणा

> *"त्याच परिसरात मेंढपाळ रानात राहून रात्रीच्या वेळी आपले कळप राखत होते. तेव्हा प्रभूचा दूत त्यांच्याजवळ उभा राहिला, प्रभूचे तेज त्यांच्याभोवती प्रकाशले*

*आणि त्यांना मोठी भीती वाटली. तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला, '**भिऊ नका; कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांना होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांला सांगतो; ती ही की, तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे, तो ख्रिस्त प्रभू आहे.** आणि तुम्हांला खूण ही की, बाळंत्याने गुंडाळलेले व गव्हाणीत ठेवलेले एक बालक तुम्हांला आढळेल.' इतक्यात स्वर्गातील सैन्याचा समुदाय त्या देवदूताजवळ अकस्मात प्रकट झाला आणि देवदूत देवाची स्तुती करत म्हणाले, 'उर्ध्वलोकी देवाला गौरव आणि पृथ्वीवर ज्यांच्यावर त्याचा प्रसाद झाला आहे त्या मनुष्यांत शांती.'''* (लूक २:८-१४)

जगाच्या इतिहासातील ती एक महत्वाची रात्र होती. प्रदीर्घ प्रतीक्षा संपली होती.

*''आणि तिला तिचा प्रथमपुत्र झाला;....''* (लूक २:७)

स्त्रीचे संतान आले होते. संदेष्टयांनी जसे भाकीत केले होते त्याप्रमाणे सर्व काही घडत होते-देवाच्या मार्गाने आणि देवाच्या वेळेत.[१४५]

येशूच्या जन्माची घोषणा आणि साजरीकरणासाठी देवाने केवळ देवदूत पाठवले नाहीत, तर त्याने रात्रीच्या वेळी आकाशात एक विशेष तारा स्थित करून या आनंदायक घटनेचा सन्मान केला होता. खगोलशास्त्रज्ञांचा एक गट आणि पूर्वेकडील काही संपन्न ज्ञानी लोकांनी या ताऱ्याचे निरीक्षण केले आणि त्याच्या मागे गेले. तो तारा अभिवचन दिलेल्या मसीहाच्या आगमनास चिन्हित करत आहे हे त्यांना माहित होते. दूर पर्शियाहून एक खडतर प्रवास पूर्ण केल्यानंतर, हे प्रतिष्ठित लोक यरुशलेमेत राजा हेरोदाकडे गेले. त्यांना एक प्रश्न होता :

*''यहूद्यांचा राजा जन्मास आला **तो कोठे आहे?** कारण आम्ही पूर्व दिशेस त्याचा तारा पाहून त्याला नमन करण्यास आलो आहोत.''* (मत्तय २:२)[१४६]

**बालकाच्या रूपात व्यक्ती**

तर हा बाळ मुलगा कोण होता जो एका झोपडीमध्ये जन्मला होता, ज्याला गुरांच्या चारा खाण्याच्या कुंडीत ठेवले होते, ज्याच्याबद्दल संदेष्टयांद्वारे भाकीत केले गेले होते, देवदूतांद्वारे सांगितले, मेंढपाळांद्वारे भेट दिली गेली, ताऱ्याद्वारे सन्मानित केले आणि ज्ञानी मनुष्यांकडून उपासना केली गेली होती?

चला आपण देवदूतांनी मेंढपाळांना काय सांगितले ते पुन्हा ऐकू या :

*"तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला, 'भिऊ नका; कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांना होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांला सांगतो; ती ही की, तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे, तो **ख्रिस्त प्रभू** आहे."*



(लूक २:१०-११)

त्या लहान शरीरातील व्यक्ती ***प्रभू*** होता.



# धडा १७

# हा कोण आहे?

*"उडया मारणारे हरण बिळे करणारी संतती निर्माण करत नाहीत." - वोलोफ म्हण*

**ज्या**प्रमाणे हरणे केवळ हरणांसारखी वैशिष्टे असलेली संतती निर्माण करतात, त्याप्रमाणेच पापी व्यक्ती पापी वैशिष्टे असलेलीच संतती निर्माण करतात. मनुष्याला तसेच सोडले, तर पाप चक्रातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नाही. आणि ते दाखवते.

**पापी व्यक्ती**

अमेरिकेतील चलचित्रपट उद्योगाचा विचार करा. प्रत्येक वर्षी, हॉलीवूड स्वार्थ, अनैतिकता, विकृती, घाणेरडी भाषा, हिंसा, बदला आणि कपट दाखवणारे नायक आणि नायिका असलेले ब्लॉकबस्टर चित्रपट तयार आणि निर्यात करतात. पटकथा लेखक त्यांच्या चित्रपटांमध्ये चित्रित केलेल्या *"चांगल्या लोकां"* मध्ये जाणूनबुजून पापी वैशिष्टे का समाविष्ट करतात? नीतिमान, दयाळू, निस्वार्थी, क्षमाशील, आणि प्रामाणिक *"नायक"* दर्शवले जातील असे चित्रपट का बनवू नयेत? हे या कारणासाठी की मानवजाती ही पापाने प्रभावित झाली आहे. मनुष्याचे उत्तम काल्पनिक गुणधर्म देखील दूषित झाले आहेत. आणि असा दूषितपणा हॉलीवूड पर्यंतच मर्यादित नाही.

मनुष्याचा पापाकडे कल असलेला स्वभाव स्वयं असंख्य सूक्ष्म मार्गांनी प्रकट होतो. उदाहरणार्थ, जर तुम्ही अरब जगातून आहात, तर तुम्ही कदाचित जुहा नावाच्या शतकानुशतके जुन्या व्यक्तिरेखाशी परिचित असाल. जुहा आणि त्याच्या गाढवाचे किस्से आपल्याला हसवतात. या हुशार पात्राबद्दल शेकडो किस्से लिहिले गेले आहेत ज्यांचे बोलणे आणि वागणे, ही चातुर्य आणि विनोदाने आणि बहुतेकवेळा आत्मकेंद्रितपणा, अपमानास्पद भावना, अशुद्ध विचार,

सूड, फसवणूक, आणि तोडलेली वचने, यांनी वैशिष्ट्यीकृत आहेत. त्याबद्दल विचार करा! आपले आवडते अविष्कृत चरित्र देखील दूषित झालेले आहे. जुहाच्या कथांमधून येथे एक साधे उदाहरण आहे

एक मित्र त्याच्याकडे आला.

मला काही पैसे उसने देशील म्हणून *"तू मला वचन दिले,"* मित्र बोलला. मी ते पैसे घेण्यास आलो आहे."

जुहा त्याला म्हणाला, *"माझ्या मित्रा, मी माझे पैसे कोणालाही उसने देत नाही, पण तुझ्या मनाच्या समाधानासाठी मी तुला माझी वचने देईन!"*[१४७]

आपण काल्पनिक जुहाशी संबंध ठेवू शकतो कारण आपण देखील अशी वचने दिली आहेत जी आपण कधीही पाळण्याचा विचार केला नव्हता. आपल्या पतित मानवी स्वभावात, आपण जुहासारखे आहोत.

तरीही, येथे, इतिहासात एक व्यक्ती[१४८] आहे ज्याने सर्व वचने पाळली आहेत. त्याने नेहमीच सत्य बोलले आहे. त्याने कधीही फसवलेले नाही, अपमान केला नाही, धमकावले नाही किंवा बदला घेण्याचा विचार केला नाही.

त्यांचे नाव **येशू** आहे.

*"त्याने **पाप केले नाही**, आणि त्याच्या मुखात **कपट आढळले नाही**. त्याची निंदा होता असता **त्याने उलट निंदा केली नाही**; दु:ख भोगत असता **त्याने धमकावले नाही;** तर यथार्थ न्याय करणाऱ्याकडे स्वतःला सोपवून दिले."* (१ पेत्र २:२२-२३)

## निष्पाप एकच

येशूचे जीवन जगाच्या पाप-प्रभूत्वातील संस्कृतीच्या सामर्थ्यशाली विरोधात उभे राहते. जन्मलेल्या लोकांपैकी तो एकच होता जो **निष्पाप** होता. तो *"सर्व प्रकारे आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला"* (इब्री. ४:१५). कोणतेही अशुद्ध विचार त्याच्या मनात आले नाहीत. त्याच्या मुखावर कोणतेही निर्दयी शब्द निर्माण झाले नाहीत. नासरेथ[१४९] येथील हलक्या दर्जाच्या घरात त्याच्या सावत्र भाऊ आणि बहिणींसोबत मोठा होत असलेला यहूदी म्हणून, त्याने स्वाभाविकपणे दहा आज्ञा आणि देवाच्या नियमशास्त्राच्या इतर आज्ञा पाळल्या होत्या-बाह्यपणे आणि आंतरिकपणे. जरी येशूला आपल्यासारखेच शारीरिक शरीर होते, तरी त्याचा आपल्यासारखा पापाकडे कल असलेला स्वभाव नव्हता.

*"तुम्हांला माहित आहे की, आपली पापे हरण करण्यासाठी तो प्रकट झाला; **त्याच्या ठायी पाप नाही**."* (१ योहान ३:५)

वयाच्या तिसाव्या वर्षी, येशूने पृथ्वीवर त्याचे अधिकृत कार्य सुरु केले.[१५०] देव आणि सैतान यांच्यामधील युद्ध हे वाढणार होते. सैतानाला माहित होते की देवाचा पुत्र त्याला ठेचण्यासाठी आला आहे, पण त्याला हे माहित नव्हते की येशूने ते कसे करण्याची योजना केली होती.

ज्याप्रमाणे सैतानाने पहिल्या मनुष्याला देवाच्या नियमशास्त्राचे पालन न करण्यासाठी परीक्षेत टाकले होते, त्याप्रमाणेच तो आता दुसरा मनुष्य, परिपूर्ण मनुष्याला, देवाच्या नियमशास्त्राच्या उलट वागण्याच्या परीक्षेत टाकण्याचा प्रयत्न करणार आहे.

*"येशू पवित्र आत्म्याने परिपूर्ण असा यार्देनेपासून परतला, आणि त्याला आत्म्याने चाळीस दिवस रानात नेले; तेथे सैतानाने त्याची परीक्षा केली. त्या दिवसांत त्याने काही खाल्ले नाही. ते संपल्यावर त्याला भूक लागली. तेव्हा सैतान त्याला म्हणाला, '**तू देवाचा पुत्र आहेस तर** ह्या धोंडयास 'भाकर हो' असे सांग. येशूने त्याला उत्तर दिले: 'मनुष्य केवळ भाकरीने नाही, तर देवाच्या प्रत्येक वचनाने जगेल असे लिहिले आहे."* (लूक ४:१-४)

लक्षात घ्या सैतान येशूला काहीही *"वाईट' करावे यासाठी प्रयत्न करत नव्हता. या निष्पाप माणसाने* (ज्याने "त्याच्या" क्षेत्रात शिरकाव केला होता) स्वर्गातील देव जो पिता याच्यापासून स्वतंत्र होऊन कृती करावी इतकीच सैतानाची इच्छा होती, कारण जसे धडा ११ मध्ये मागे आपण पाहतो, की देवापासून स्वतंत्र होऊन विचार किंवा कृती करणे हे पाप आहे.

मुद्दा हा आहे : जर मसीहाने एकही पाप केले असते, तर आदामाच्या शापित वंशजांना पाप आणि मृत्यूच्या नियमापासून सोडवण्याचा त्याचा उद्देश तो पूर्ण करू शकला नसता.

ज्याप्रमाणे एखादा माणूस जो कर्जात खूप बुडालेला आहे तो दुसऱ्याचे कर्ज फेडण्यास पात्र होऊ शकत नाही, तसेच एक पापी व्यक्ती दुसऱ्या पाप्याचे पाप फेडण्यास सक्षम नाही. तथापि, देवाचा पुत्र, जो मनुष्याचा पुत्र[१५१] झाला, त्याचे स्वतःचे पापाचे कर्ज नव्हते. तो निष्पाप असल्यामुळे मृत्यूला ओलांडून जाऊ शकला असता, पण,

आपण लवकरच हे शोधणार आहोत, ती देवाची योजना नव्हती.

त्या दरम्यान, सैतानाने वारंवार येशूला देवाच्या परिपूर्ण योजनेपासून स्वतंत्रपणे कार्य करण्यास प्रवृत्त करून पाप करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक वेळी येशूने पवित्र शास्त्राचा संदर्भ देत सैतानाला उत्तर दिले.[१५२]

> *"मग सैतानाने त्याला उंचावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये एका क्षणात दाखवली; आणि त्याला म्हटले, 'ह्यांच्यावरचा सर्व अधिकार व ह्यांचे वैभव मी तुला देईन, कारण हे मला सोपवून दिले आहे व माझ्या मनास येईल त्याला मी हे देतो. म्हणून तू मला नमन करशील तर हे सर्व तुझे होईल.' येशूने त्याला उत्तर दिले, 'अरे सैताना, माझ्या मागे हो, कारण, परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर व त्याचीच सेवा कर, असे शास्त्रात लिहिले आहे."* (लूक ४:५-८)

ज्याप्रमाणे देवाने आदामाला सृष्टीवर प्रभुत्व दिले होते, त्याप्रमाणेच सैतान आता येशूला प्रभुत्व देत होता जे त्याने, सैतानाने, चोरले होते जेव्हा आदामाने त्याचे अनुसरण करण्याची निवड केली होती.[१५३]

आदामाच्या उलट, येशूने सैतानाची आज्ञा पाळली नाही.

देवाचे वचन देहधारी झाले.

## येशूचे अनुयायी

येशूने त्याचे अधिकृत मिशन सुरु केल्यानंतर लवकरच, त्याने बारा माणसांची निवड केली की जेथे कोठे तो जाईल तेथे त्याच्यासोबत असावे. पुष्कळ स्त्रिया देखील येशूच्या अनुयायी होत्या. येशूने जे बोलले आणि केले त्या सर्व गोष्टी डोळयांनी पाहणारे हे पुरुष आणि स्त्रिया होत्या.

> *"पुढे लवकरच असे झाले की, तो उपदेश करत व देवाच्या राज्याची सुवार्ता सांगत नगरोनगरी व गावोगावी फिरत होता; तेव्हा त्याच्याबरोबर ते बारा प्रेषित होते; आणि दुष्ट आत्मे आणि विकार ह्यांपासून मुक्त केलेल्या अशा कित्येक स्त्रिया, ......त्या आपल्या पैशाअडक्याने त्यांची सेवाचाकरी करत असत."* (लूक ८:१-३)

येशूने पुरुष, स्त्रिया आणि मुलेबाळे यांना समान आदर दाखवला. सुवार्तेची वचने त्या कथांनी भरलेली आहेत ज्यामध्ये येशू स्त्रियांना प्रतिष्ठा आणि दयाळूपणाने वागणूक देत असल्याचे वाचतो जे त्या काळातील यहूदी आणि रोमन संस्कृतीच्याही पलीकडे जाते.

येशूने पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीला अमर्यादपणे मौल्यवान असे मानले, पण त्याने त्याचे ऐकण्यासाठी, त्याच्यावर विश्वास ठेवण्यासाठी किंवा त्याचे अनुसरण करण्यासाठी कोणावरही कधीही बळजबरी केली नाही. त्याला त्या लोकांसोबत वेळ घालवण्यास आवडत होते ज्यांची मने आणि हृदये सत्य ऐकण्यास आणि स्वीकारण्यासाठी प्रवृत्त असतात, मग त्यासाठी त्यांना किती किंमत मोजावी लागते याची पर्वा नाही.

## एक महत्त्वाचा प्रश्न

पुष्कळ सामान्य लोक येशूच्या मागे जात असले तरी, यहूदी धार्मिक नेत्यांनी तसे केले नाही.

एके दिवशी येशूने त्यांना एक महत्त्वाचा प्रश्न विचारला :

*"**ख्रिस्ताविषयी तुम्हांला काय वाटते? तो कोणाचा पुत्र आहे?**"* (मत्तय २२:४२)

त्यांनी हे म्हणत उत्तर दिले की मसीहा हा दावीद राजाचा वंशज असेल. येशूने त्यांना आठवण करून दिली की दाविदाने ही भविष्यवाणी केली होती की अभिवचन असलेला तारणारा दाविदाचा पृथ्वीवरील पुत्र आणि देवाचा स्वर्गीय पुत्र असे दोन्हीही असेल.[१५४]

यापूर्वी, येशूने त्याच्या शिष्यांना तोच प्रश्न विचारला होता :

*"**...मनुष्याच्या पुत्राला लोक कोण म्हणून म्हणतात?**" ते म्हणाले, ......., किंवा संदेष्ट्यांतील कोणीएक, असे म्हणतात.' तो त्यांना म्हणाला, '**पण तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?**' शिमोन पेत्राने उत्तर दिले, 'आपण ख्रिस्त, जिवंत देवाचे पुत्र आहात.' येशूने त्याला म्हटले, 'शिमोन योनाच्या पुत्रा, धन्य तुझी; कारण मांस व रक्त ह्यांनी नव्हे तर माझ्या स्वर्गातील पित्याने हे तुला प्रकट केले आहे."* (मत्तय १६:१३-१७)

लवकर किंवा नंतर, आपण सर्वांनी याच प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे: येशूविषयी तुम्हांला काय वाटते? तो कोणाचा पुत्र आहे?

## काही काय म्हणतात

पुष्कळ पाश्चिमात्य लोकांसाठी, येशू हा एका शापित शब्दापेक्षा अधिक नाही.

इतर म्हणतात तो एक महान नैतिक शिक्षक आहे, पण त्यापेक्षा अधिक नाही.

परंपरानिष्ठ यहूदी येशूच्या नावाचा उच्चार करणे देखील टाळतात, त्यास केवळ *"तो माणूस"* म्हणून संबोधतात.

हिंदू लोक येशूला त्यांच्या अनेक देवी-देवतांमधील अनेक दैवी स्वयंभू अवतारांपैकी एक मानतात.

माझा मुस्लीम शेजारी मला म्हणतो : *"आम्ही येशूला एक महान संदेष्टा म्हणून आदर देतो, पण तो देवाचा पुत्र नाही."*

एक संवाददाता याप्रमाणे लिहितो :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

मी सौदी अरबमध्ये राहतो..... आम्ही विश्वास ठेवतो की येशू हा केवळ एक संदेष्टा होता आणि देवाचा पुत्र नव्हता. येशूला मारले गेले नाही. तो परत येईल आणि प्रत्येक जण पाहतील की तो कोणाच्या पक्षाचा होईल. मी आशा करतो हे तुमच्या आयुष्यात घडावे म्हणजे तुम्ही आमच्या सुंदर धर्मात सामील व्हावे आणि खरा प्रकाश पाहावा.

मलेशियातील आणखी एक संवाददात्याने लिहिले :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

मी विश्वास ठेवतो की देव एकच आहे आणि तो कधीही एका मानवासारखा नव्हता..... जर येथे कोणी एखादा व्यक्ती असेन जो देवाबद्दल मानवी आकारात अस्तित्वात आहे म्हणून विचार करत असेन, तर तो/ती मोठे निंदक आहेत.

हा दृष्टीकोन कुराण येशू ख्रिस्ताबद्दल काय म्हणते तेथून येतो.

## कुराण काय म्हणते

कुराण वारंवार स्पष्ट करते की येशू हा *"एका संदेष्ट्यापेक्षा अधिक नाही"* (सूरह ४:१७१-१७३; ५:७५; २:१३६). असे असले तरी, मुस्लीमांद्वारे आदरणीय पुस्तक देखील येशूबद्दल तो संदेष्ट्यांमध्ये एकमेव असल्याचे घोषित करते की त्याला जैविक पिता नव्हता, त्यास इसा इब्न मरीयम, *"मरीयेचा पुत्र येशू"* म्हणतात (सूरह १९:३४). कुराण संदेष्ट्यांच्या पापांचा संदर्भ देतात, पण येशूला कधीही पापाचे गुणधर्म लावत नाही. त्यास *"पवित्र पुत्र"*[१५५] म्हणतात. कुराण येशूला जीवन निर्माण करणारा आणि मृत्यूतून उठवण्याचे सामर्थ्य असलेला एकमेव संदेष्टा म्हणून सादर करतात.[१५६] आणि हे केवळ येशूलाच अल मसीह (मसीहा), रूह अल्लाह (प्राण/देवाचा आत्मा) आणि कलीमात अल्लाह (देवाचे वचन)[१५७] या उच्च उपाधींसह गुणधर्मित करतात.

येशूच्या एकमेवपणाबद्दल कुराणच्या ह्या पुष्टी करण्यास लक्षात घेऊन, हे निदर्शनास

आणणे महत्वाचे आहे की *"मसीहा, मरीयेचा पुत्र येशू"* हे कुराणाचे चित्रित करणे हे बायबलपेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. उदाहरणार्थ, कुराणचे तेच वचन जे येशूला वर-उल्लेख केलेल्या उपाधींसह गुणधर्मित करते, तेच स्पष्ट करते : *"...मरीयम पुत्र येशू-मसीह* (दुसरा-तिसरा कोणी नव्हता), *तर **तो केवळ अल्लाहचा पैगंबर होता.** आणि मरीयमला त्याने जी सुवार्ता पाठवली होती, त्याची पूर्तता होती. आणि* (येशू मसीह) *अल्लाहने निर्माण केलेला एक आत्मा होता. तेव्हा तुम्ही अल्लाह आणि त्याच्या पैगंबरावर विश्वास ठेवणारे बना, आणि **असे म्हणू नका की ईश्वर तीन आहेत, असे म्हणण्यापासून परावृत्त व्हा,** यातच तुमचे* (स्वतःचे) *भले आहे. यात मुळीच संशय नाही की, उपासनेस **योग्य** केवळ अल्लाहच आहे,* (अल्लाहशिवाय दुसरा कोणी उपासनेस योग्य नाही), ***'त्याचा (कोणी) मुलगा असावा, या गोष्टीपासून तो पवित्र आहे."*** (सूरह ४:१७१)

सेनेगलमध्ये, लेकरे आणि प्रौढ सारखेच हे म्हणण्यास तत्पर आहेत, *"येशू हा देवाचा पुत्र नाही! देवाला पुत्र नाही!"* पण त्याच विश्वासाने घोषित करतात, *"येशूला वधस्तंभावर खिळले नाही!"*

येशूला वधस्तंभावर खिळले नाही ही कल्पना त्यांना कोठून मिळाली?

ही कल्पना कुराणमधून येते, जे घोषित करते : *"आणि त्यांनी* (बढाईखोरपणे) *जाहीर केले की, आम्ही मरियमपुत्र येशू मसीह* (जो) *अल्लाहचा पैगंबर* (असल्याचा दावा करायचा), *त्याचा वध केला आहे.* (पण वास्तविकता ही आहे की), ***ना त्यांनी त्याचा वध केला, ना क्रुसावर चढवून त्याला ठार केले,** तर त्यांनी तसे केल्याचे फक्त त्यांना वाटले. आणि जे या बाबतीत भिन्न मत व्यक्त करीत आहेत, ते निश्चितच सांशक अवस्थेत आहेत. त्यांना याविषयी निश्चित ज्ञान तर नाही, पण ते केवळ अनुमानाचे अनुसरण करीत आहेत,* (सत्य हे आहे की) ***त्यांनी त्याची हत्या केलीच नाही."*** (तर) अल्लाहने (सन्मानपूर्वक) त्याला स्वतःकडे उचलून घेतले. खरोखर, अल्लाह सर्वशक्तिमान व बुद्धिमान आहे." (सूरह ४:१५६-१५८)

## बायबल काय म्हणते

कुराण लिहिले गेल्याच्या शतको वर्षांपूर्वी, चाळीस संदेष्टे आणि प्रेषित ज्यांनी जुना आणि नवीन कराराची वचने लिहिली त्यांनी मसीहा आणि त्याच्या मिशनबद्दल भिन्न चित्र रंगवले आहे.

*"देवाचा पुत्र"* या येशूच्या उपाधी संबंधी, योहान, जो येशूसोबत तीन वर्षांपेक्षा अधिक वेळ चालला आणि बोलला तो त्याच्याविषयी साक्ष देतो:

*"ह्या पुस्तकात लिहिली नाहीत अशी दुसरीही पुष्कळ चिन्हे येशूने आपल्या शिष्यांदेखत केली. **येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे** असे तुम्ही विश्वास ठेवावा, आणि विश्वास ठेवून तुम्हांला **त्याच्या नावाने जीवन** प्राप्त व्हावे म्हणून ही लिहिली आहेत."* (योहान २०:३०-३१)

प्रेषित योहानाने हे देखील लिहिले :

*"प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. सर्वकाही त्याच्या द्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही. ...शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले, तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता."* (योहान १:१-३, १४)

वर्षांपूर्वी, एका मुस्लीम मित्राने मला सांगितले, *"कुराण येशूला कलीमात अल्लाह आणि रूह अल्लाह या उपाधी देतात. जर येशू हा देवाचे वचन आणि आत्मा आहे, तर मग तो देव आहे!"*

नंतर, काही जणांनी माझ्या मित्राला निंदा आणि शिर्क (अरबी : देवासोबत सहकारी जोडणे[१५८]) करतो म्हणून दोष दिला. कमीत कमी तो चांगल्या सोबतीत होता! येशूला त्याच प्रकारे यहूदी धार्मिक नेत्यांद्वारे दोष लावला गेला.

येशूने म्हटले :

*"मी आणि पिता एक आहोत.**तेव्हा यहूद्यांनी त्याला दगडमार करायला पुन्हा दगड उचलले**. येशू त्यांना म्हणाला, 'मी पित्यापासून पुष्कळशी चांगली कृत्ये तुम्हांला दाखवली आहेत. त्यांतून कोणत्या कृत्यांमुळे तुम्ही मला दगडमार करता?' यहूद्यांनी त्याला उत्तर दिले, 'चांगल्या कृत्यांसाठी आम्ही तुम्हांला दगडमार करत नाही, **तर दुर्भाषणासाठी; कारण तुम्ही मानव असून स्वतःला देव म्हणवता**."* (योहान १०:३०-३३)

यहूद्यांनी येशूला तेच करण्याचा दोष लावला ज्या गोष्टी लुसीफरने करण्याचा प्रयत्न केला होता : एकमेव, सर्वोच्च ठिकाणी चढण्याचा जे केवळ देवाचे आहे. त्यांनी येशूला स्वतःला देव म्हणण्याचा दोष लावला.

पण नंतर त्यांना परिणाम भोगावे लागले.

## देहधारणा, दैवतासदृश मानणे नाही

येशू किंवा कोणत्याही संदेष्टयांनी शिकवले नाही की एक माणूस देव होऊ शकतो, त्याऐवजी, पवित्र शास्त्राने स्पष्ट केले की देव माणूस होऊ शकतो.

उदाहरणार्थ, मसीहाचा जन्म होण्याच्या ७०० वर्षांपूर्वी, यशया संदेष्टयाने लिहिले :

*"अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे; मृत्युच्छायेच्या प्रदेशात बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे..... कारण आमच्यासाठी **बाळ जन्मला** आहे, आम्हांला **पुत्र दिला आहे**; त्याच्या खांद्यावर सत्ता राहील; त्याला 'अद्भुत, मंत्री, **समर्थ देव**, सनातन पिता, शांतीचा अधिपती' म्हणतील."* (यशया ९:२, ६)[१५९]

यशयाने येणाऱ्या मसीहाबद्दल ही वचने देखील लिहिली :

*"सीयोनेस सुवार्ता सांगणारे, उंच डोंगरावर चढ; यरुशलेमेस सुवार्ता सांगणारे, आपला स्वर जोराने उंच कर; कर उंच, भिऊ नकोस; यहूदाच्या नगरांना म्हण, '**तुमचा देव पाहा.**'"* (यशया ४०:९)

प्रारंभापासून, देवाच्या योजनेत देहधारणा (देव मानवी शरीर धारण करणे) समाविष्ट होती, दैवतासदृश मानणे नाही (एक मानव स्वतःला देव म्हणवणे). हे सुचविणे की एक माणूस देव होतो ही निंदा आहे, पण हे ओळखणे की सार्वकालिक शब्द माणूस होतो हे देवाची युगानुयुगाची योजना स्वीकारणे आहे.

## कागदावर आणि वैयक्तिकरित्या

जर तुम्हांला कोणाला चांगले ओळखायचे असेल, तर कोणती पद्धत उत्तम आहे?

- तुमचा संवाद लिखित पत्रांपुरतेच मर्यादित करा.
- किंवा, काही कालावधीच्या काही वेळासाठी पत्रे अदलाबदल करा, व्यक्तीला समारोसमोर भेटा आणि एकत्र मिळून वेळ घालवा.

पवित्र शास्त्र जसे अद्भुत आहे, तसेच देव, जो एकदा आदाम व हव्वेबरोबर चालला आणि बोलला आणि त्याला वैयक्तिकरित्या ओळखण्यासाठी त्यांच्या वंशजांसाठी योजना केली, कागदापुरतेच संवाद साधण्याचा त्याचा कधीही हेतू नव्हता. प्रारंभापासून, त्याने आपल्याबरोबर वैयक्तिकरित्या संवाद साधण्याची योजना केली होती. परमेश्वर, ज्याने शतकानुशतके त्याच्या संदेष्टयांद्वारे पॅपिरस गुंडाळी आणि प्राण्यांच्या कातडीवर त्याच्या वचनाची नोंद केली होती, त्याने

मानवी त्वचेमध्ये मानवजातीस स्वतःला प्रकट करण्याचे अभिवचन दिले होते. देवाने त्याचे वचन एका पुस्तकात देण्याची केवळ योजना आखली नव्हती, तर एका शरीरामध्ये देखील तो त्याचे वचन प्रदान करणार होता.

*"म्हणून तो जगात येतेवेळेस म्हणाला, 'यज्ञ व अन्नार्पणे ह्यांची तुला इच्छा नव्हती, तू माझ्यासाठी **शरीर** तयार केलेस."* (इब्री. १०:५)[१६०]

*"सुभक्तीचे रहस्य निर्विवाद मोठे आहे. तो देहाने प्रकट झाला......."* (१ तीमथ्य. ३:१६)

## त्याच्या वैभवापेक्षा निकृष्ट?

लोकांसोबत निवास करण्याच्या त्याच्या योजनेबद्दल देवाने वारंवार घोषणा केलेली असतानाही, मी कोणाला असे म्हणताना ऐकतो : *"त्याने मनुष्य व्हावे हे देवाच्या श्रेष्ठ वैभवापासून दूरच असावे!"*

देहधारणेची कल्पना समजून घेण्यास कठीण असली तरी, हे देवाच्या श्रेष्ठतेपेक्षा निकृष्ठ आहे का? किंवा तो देवाच्या स्वभावाचा आंतरिक भाग आणि योजना आहे का की लोक जे त्याने स्वतःसाठी निर्माण केले त्यांच्याबरोबरचे घनिष्ठ नातेसंबंध पुन्हा स्थापित करावे?

जीवनात आपल्याला अनेकदा आपण जे अनुभवले आहे तेच ज्यांनी अनुभवले आहे त्यांच्या जवळ आहोत असे वाटते. समाधान आणि मदत देण्यास ते सर्वाधिक पात्र आहेत जे त्याच संघर्षातून आणि दुःखातून गेले आहेत. आपला निर्माणकर्ता हा अंतिम समाधान देणारा आहे.

***"ज्या अर्थी मुले एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला** .....कारण ज्या अर्थी त्याने स्वतः परीक्षा होत असता दुःख भोगले त्या अर्थी ज्यांची परीक्षा होत आहे त्यांना साहाय्य करण्यास तो समर्थ आहे.....कारण आपल्या सर्वांच्या दुर्बलतेविषयी ज्याला सहानुभूती वाटत नाही, असा आपला प्रमुख याजक नाही, **तर तो सर्व प्रकारे आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला**."* (इब्री. २:१४, १८; ४:१५)

मांसमय शरीराचा मर्यादितपणा आणि अस्वस्थता घ्यावी; त्याच्या नखात घाण घ्यावी, भूक, अपमान आणि आपण जे अनुभवत आहोत ते अनुभवावे अशी प्रारंभापासून ही देवाची योजना होती. ते जे याउलट शिकवतात ते देवाच्या संदेष्टयांना आणि योजनेचाच केवळ नाकार

करत नाहीत, तर ते देवाचे स्वरूप आणि गुणधर्मांचा देखील नाकार करत आहेत. विश्वासू आणि प्रेमळ निर्माणकर्ता म्हणून देवाचे स्वतःचे प्रकटीकरण स्वीकारण्याऐवजी, ते त्याला अप्रत्याशित आणि अज्ञात असल्याचे घोषित करत आहेत.

अनिच्छुक होण्याबद्दल येथे काहीही *"वैभवी"* असे नाही की इतरांच्या स्तरापर्यंत खाली यावे की त्यांची सेवा करावी आणि त्यांना आशीर्वादित करावे. इतिहासात कधीही आपल्या निर्माणकर्त्याने आपल्या स्तरावर येण्याच्या विचारला तुच्छ लेखले नाही. ही त्याची रचना आणि त्याचा आनंद होता की तसे करावे.[१६१]

*"आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहित आहे; **तो धनवान असता** तुमच्याकरता **दरिद्री झाला,** अशा हेतूने की त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे."* (२ करिंथ. ८:९)

हे तुमच्या आणि माझ्याकरता त्या सार्वकालिक शब्दाने आपल्या ग्रहाला भेट दिली. विश्वाचा निर्माणकर्ता जो महिमा आणि गौरवात *"धनवान होता"*, तो *"दरिद्री झाला"*, सेवकाचे स्थान ग्रहण केले, जेणेकरून आपण कदाचित धनवान होऊ शकावे, पैशाने आणि साधनसामग्रीच्या गोष्टींनी नाही, तर आध्यात्मिक आशीर्वादांनी जसे क्षमा, धार्मिकता, सार्वकालिक जीवन, प्रीती, आनंद, शांती आणि पवित्र इच्छा.

## महानता परिभाषित केली

पृथ्वीवर शरीर आणि रक्ताच्या शरीरासह यावे इतका देव हा अत्यंत महान आहे असा पुष्कळ लोक विचार करतात. हे असे असू शकते की ते असा विचार करत आहे कारण महानतेची त्यांची परिभाषा महानतेच्या देवाच्या परिभाषेपासून भिन्न आहे?

येशूने खऱ्या महानतेची व्याख्या केली जेव्हा त्याने त्याच्या शिष्यांना सांगितले :

*"परराष्ट्रीयांत सत्ताधारी म्हणून जे मानलेले आहेत ते त्यांच्यावर जुलूम करतात व त्यांचे वरिष्ठ लोक त्यांच्यावर अधिकार चालवतात, हे तुम्हांला ठाऊक आहे. परंतु तुमची गोष्टी तशी नाही; तर जो तुमच्यामध्ये **मोठा** होऊ पाहतो त्याने तुमचा सेवक झाला पाहिजे; आणि जो कोणी तुमच्यामध्ये पहिला होऊ पाहतो त्याने सर्वांचा सेवक झाले पाहिजे. **कारण मनुष्याचा पुत्र हा सेवा करून घेण्यास नाही, तर सेवा करण्यास व पुष्कळांच्या मुक्तीसाठी आपला जीव खंडणी म्हणून अर्पण करण्यास आला आहे**."* (मार्क १०:४२-४५)

सर्वात महान व्यक्ती तो आहे जो स्वतःला सर्वात नम्र करतो आणि इतरांची उत्तम सेवा करतो.[१६२]

हेच ते आपल्या निर्माणकर्त्याने आपल्यासाठी केले.

## वारा आणि लाटांचा स्वामी

एके दिवशी येशू गालील समुद्रात त्याच्या शिष्यांसोबत त्यांच्या मासे धरण्याच्या नावेत होता.

> *"तेव्हा पाहा, समुद्रात* ***मोठे वादळ*** *उठले, इतके की तारू लाटांनी झाकू लागले; परंतु तो झोपेत होता. तेव्हा ते त्याच्याजवळ येऊन त्याला जागे करून म्हणाले, 'प्रभूजी, वाचवा, आम्ही बुडत आहोत.' तो त्यांना म्हणाला, 'अहो अल्पविश्वासी, तुम्ही का घाबरलात?' मग उठून त्याने वारे व समुद्र ह्यांना धमकावले आणि* ***अगदी निवांत झाले****. तेव्हा त्या माणसांना आश्चर्य वाटले व ते म्हणाले,* ***'हा कोणत्या प्रकाराचा माणूस आहे की वारे व समुद्रही ह्याचे ऐकतात?"*** (मत्तय ८:२४-२७)

शिष्यांच्या प्रश्नाचे उत्तर तुम्ही कसे देऊ शकाल?

## "हा कोण आहे?"

स्पष्टपणे येशू एक मनुष्य होता. तो तारवात गाढ झोपला होता; थकणे, भुकेले आणि तहानेले होणे म्हणजे काय हे त्यास माहित होते. पण मग तो उठला आणि वादळाला धमकावले. क्षणात हिंसक वारा थांबला आणि उसळणाऱ्या लाटा शांत झाल्या.

यात आश्चर्य नाही की शिष्यांनी विचारले :

> *"हा कोण असू शकतो?'*

हजार वर्षांपूर्वी, देवाच्या एका संदेष्टयाने लिहिले होते :

> *"हे परमेशा, तुझ्यासारखा समर्थ कोण आहे?....समुद्राच्या खळबळाटावर तू अधिकार चालवतोस; तो उचंबळतो तेव्हा त्याच्या लाटा तू शांत करतोस."* (स्तोत्र. ८९:८-९)

हा कोण आहे? शुभवर्तमान देखील येशूच्या समुद्रावर चालण्याविषयी आपल्याला सांगतात.[१६३] पुन्हा एकदा येशूचे शिष्य *"मनातल्या मनात फारच आश्चर्यचकित झाले"* (मार्क ६:५१). पण मनुष्यांनी आश्चर्य करावे म्हणून येशू समुद्राच्या लाटांवरून चालला

नाही, तर तो कोण आहे हे ओळखण्यास त्यांना मदत करण्यासाठी त्याने तसे केले.

दोन हजार वर्षांपूर्वी, ईयोब संदेष्ट्याने देवाबद्दल असे म्हटले होते :

*"तोच आकाशमंडळ विस्तारतो, तो **समुद्राच्या पर्वतप्राय लहरींवरून चालतो**."* (ईयोब ९:८)

हा कोण आहे? देव आपल्याला बिंदू जोडण्यास आणि येशू कोण होता आणि आहे हे समजण्यासाठी आमंत्रित करतो.

दु:खदपणे, पुष्कळ लोक हे कधीही करत नाहीत.

*"तो जगात होता व जग त्याच्या द्वारे झाले, तरी **जगाने त्याला ओळखले नाही**."* (योहान १:१०)

हा कोण आहे? येशूने स्वतः या प्रश्नाचे उत्तर दिले. एके दिवशी जेव्हा तो विरोधी धार्मिक जमावाशी बोलत होता.

## "मी आहे"

*"पुढे येशू पुन्हा त्यांना म्हणाला, 'मीच जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणारच नाही, तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील.......मी तुम्हांला खचित खचित सांगतो, जर कोणी माझे वचन पाळील तर त्याला मरणाचा अनुभव कधीही येणार नाही. यहूदी त्याला म्हणाले, 'तुम्हांला भूत लागले आहे हे आता आम्हांला कळले, अब्राहाम मेला व संदेष्टेही मेले, आणि तुम्ही म्हणता, 'जर कोणी माझे वचन पाळील तर त्याला मरणाचा अनुभव कधीही येणार नाही. आमचा बाप अब्राहाम मेला; त्याच्यापेक्षाही तुम्ही मोठे आहात काय? संदेष्टेही मेले; तुम्ही स्वतःला काय समजता?....तुमचा बाप अब्राहाम माझा दिवस पाहण्यासाठी उल्हासित झाला; तो त्याने पाहिला व त्याला हर्ष झाला. तेव्हा यहूदी त्याला म्हणाले, 'तुम्हांला अजून पन्नास वर्षेही झाली नाहीत आणि तुम्ही अब्राहामाला पाहिले आहे काय?' येशू त्यांना म्हणाला, '**मी तुम्हांला खचित खचित सांगतो, अब्राहामाचा जन्म झाला त्यापूर्वी मी आहे.**' ह्यावरून त्यांनी त्याला मारण्याकरता दगड उचलले, परंतु येशू मंदिरातून गुप्तपणे निघून गेला."* (योहान ८:१२, ५१-५३, ५६-५९)

यहूदी येशूला दगडमार करण्याचा प्रयत्न का करत होते? कारण त्याने म्हटले : *"'जर कोणी*

***माझे वचन*** *पाळील तर त्याला* ***मरणाचा अनुभव कधीही*** *येणार नाही."* आणि : ***"मी तुम्हांला खचित खचित सांगतो, अब्राहामाचा जन्म झाला त्यापूर्वी मी आहे."*** येशूने त्याचा अधिकार केवळ मृत्यूवर आणि त्याची वरिष्ठता अब्राहामावरच ठामपणे सांगितली नाही तर, त्याने स्वतःला देवाचे वैयक्तिक नाव, *"**मी आहे**"*[१६४] द्वारे संबोधले.

येशूचे म्हणणे ऐकणाऱ्यांना समजले. म्हणूनच त्यांनी त्याला दुर्भाषण करण्याचा दोष लावला आणि त्यास मारण्यासाठी दगड उचलले.

## केवळ देवाची उपासना कर

केवळ देवच उपासनेस पात्र आहे तो आपल्या उपासनेचा लक्ष्य आहे हे येशूने सातत्याने शिकवले. म्हणूनच येशूने म्हटले, *"परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर व केवळ त्याचीच उपासना कर"* (मत्तय.४:१०). तरीही शुभवर्तमान दहापेक्षा कमी नसलेल्या प्रसंगाची नोंद करते जेव्हा लोकांनी येशूसमोर नमन केले आणि **त्याची उपासना केली**.

एके दिवशी, *"एक कुष्ठरोगी आला आणि त्याची उपासना केली,*[१६५] *हे म्हणत, 'प्रभू, जर तुझी इच्छा असेल, तर तू मला शुद्ध करू शकतो.' मग येशूने त्याचे हात पुढे करून त्याला स्पर्श केला, हे म्हणत, 'माझी इच्छा आहे; तू शुद्ध हो.' क्षणात तो कुष्ठरोगापासून शुद्ध झाला"* (मत्तय ८:२-३). कुष्ठरोग्याने त्याची उपासना केली म्हणून येशूने त्यास फटकारले का?

नाही, त्याने सरळपणे त्यास स्पर्श केला आणि त्यास बरे केले.

येशू मृतातून उठल्यानंतर, थोमा नावाचा एक शिष्य त्याच्यासमोर नतमस्तक झाला आणि म्हणाला, *"माझा प्रभू, **माझा देव!**"* येशूने त्याला निंदा केल्याबद्दल फटकारले का?

नाही, येशूने सरळपणे म्हटले, *"थोमा, तू मला पाहिले आहेस म्हणून विश्वास ठेवला आहेस; पाहिल्यावाचून विश्वास ठेवणारे ते धन्य."* (योहान २०:२८-२९)

येशू कोण आहे याबद्दल हे आपल्याला काय शिकवते?

## तुम्ही निर्णय करा

येशूविषयी प्रत्येक जण काय विश्वास ठेवतो ती आपली वैयक्तिक निवड आहे, पण त्याच्याबद्दल कोणीही स्वयं-विरोधाभासाचा दृष्टीकोन स्वीकारू नये. जर येशू हा *"एक महान संदेष्टा,"* होता जसे माझा शेजारी मला सांगतो, तर मग तो जो दावा करतो ते सुद्धा तो होता : सार्वकालिक शब्द आणि देवाचा पुत्र. येशूला *"एका संदेष्ट्यापेक्षा अधिक नाही"* असे घोषित

करणे, हे येशूची साक्ष आणि संदेष्टयांचा संदेश या दोन्हींना नाकारणे आहे.[१६६]

सी. एस. लेविस, एक पूर्वीचा संशयवादी आणि विसाव्या शतकातील एक महान विचारवंत, त्याने येशूबद्दल असे लिहिले :

> *"मी येथे प्रयत्न करत आहे की कोणीही खरोखरच मूर्खपणाची गोष्ट बोलू नये जे सहसा लोक त्याच्याबद्दल बोलतात : 'मी येशूला एक महान नैतिक शिक्षक म्हणून स्वीकारण्यास तयार आहे, पण तो देव आहे असा त्याचा दावा मी स्वीकारत नाही.' ही एक गोष्ट आहे जी आपण नाही बोलली पाहिजे. एक माणूस जो केवळ एक माणूस होता आणि ज्या गोष्टी येशूने बोलल्या त्या गोष्टी बोलल्याने तो एक महान नैतिक शिक्षक होऊ शकत नाही. तो एकतर वेडा असेल अन्यथा तो नरकाचा सैतान असेल. तुम्ही तुमची निवड केली पाहिजे. एकतर हा माणूस देवाचा पुत्र होता आणि आहे : किंवा नाहीतर तो एक वेडा माणूस किंवा काहीतरी वाईट आहे. तुम्ही एका मुर्खासाठी त्याला गप्प करू शकत नाही, तुम्ही त्याच्यावर थुंकू शकता आणि त्याला एक भूत म्हणून मारू शकता; किंवा तुम्ही त्याच्या पायावर नतमस्तक होऊ शकता आणि त्याला प्रभू आणि देव बोलू शकता. पण तो एक महान मानवी शिक्षक असल्याबद्दल कोणताही आश्रय देणारा मूर्खपणा आणू नये. ते त्याने आपल्यासाठी उघडे ठेवलेले नाही. तसे करण्याचा त्याचा हेतू नव्हता."*[१६७]

## "आम्हांला स्पष्टपणे सांग"

प्रत्येकवेळी सतत, कोणीतरी मला म्हणतो : *"येशूने* "मी देव आहे!" असे म्हटले आहे ते मला बायबलमधून दाखव. येशूच्या काळातील धार्मिक नेत्यांनी अशीच विधाने करण्यास त्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला होता.

> *येशूने म्हटले, "मी* **दार** आहे, ***माझ्या द्वारे*** *कोणी आत जाईल तर त्याला तारणप्राप्ती होईल'......तेव्हा यहूद्यांनी त्याला गराडा घालून म्हटले, 'तुम्ही कोठवर आमची मने संशयात ठेवणार? तुम्ही ख्रिस्त असलात तर* ***आम्हांला उघड सांगा****.' येशूने त्यांना उत्तर दिले, 'मी तुम्हांला सांगितले तरी तुम्ही विश्वास ठेवत नाही; जी कृत्ये मी माझ्या पित्याच्या नावाने करतो ती माझ्याविषयी साक्ष देतात.......मी आणि पिता एक आहोत.'* ***तेव्हा यहूद्यांनी त्याला दगडमार करायला पुन्हा दगड उचलले****. येशू त्यांना म्हणाला, 'मी पित्यापासून पुष्कळशी चांगली कृत्ये तुम्हांला दाखवली आहेत. त्यांतून कोणत्या कृत्यांमुळे तुम्ही मला दगडमार करता?' यहूद्यांनी त्याला उत्तर दिले,*

***'चांगल्या कृत्यांसाठी आम्ही तुम्हांला दगडमार करत नाही, तर दुर्भाषणासाठी; कारण तुम्ही मानव असून स्वतःला देव म्हणवता.''*** (योहान १०:९, २४-२५, ३०-३३)

धार्मिक जमाव त्याला दगडमार का करू पाहत होता?

याचे कारण येशूने म्हटले होते, *''मी आणि पिता एक आहोत.''* त्यांच्या विचारात, येशूचा देवासोबत एक असण्याचा दावा हे दुर्भाषण होते. असे असले तरी, हे तेच यहूदी लोक नियमितपणे देवावरील त्यांचा विश्वास असे म्हणून घोषित करत असत, *''अदोनाय एलोहीयेनु अदोनाय एकाद,''* म्हणजे : *''आपला देव परमेश्वर हा अनन्य [अनेकवचनी एकता] परमेश्वर आहे.''* येशू स्वतःला देवाचा पुत्र म्हणून घोषित करत होता जो नेहमीच देवासोबत एक होता.[१६८] म्हणूनच यहूद्यांनी दुर्भाषणासाठी त्याजवर दोष लावला.

येशूने कधीही शब्द आणि देवाचा पुत्र म्हणून त्याचे सार्वकालिक अस्तित्व दाखवले नाही. तो सर्वत्र *''मी देव आहे! मी देव आहे!''* असे म्हणत गेला नाही. त्याऐवजी, जसे सर्व मानवजातीने या पृथ्वीवर राहावे असा त्याचा हेतू होता तसेच तो जगला; पूर्ण नम्रतेत आणि देवासाठी स्वेच्छेने अधीन होऊन.

येशू हा एकच व्यक्ती आहे जो हे बोलू शकतो : *''कारण मी स्वतःच्या इच्छेप्रमाणे नव्हे, तर ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करावे म्हणून स्वर्गातून उतरलो आहे''* (योहान ६:३८). येशूच्या जीवनाचे गौरव असे होते की तो, देवाचा परम पुत्र, त्याने मनुष्याचा पुत्र व्हावे म्हणून स्वतःला नम्र केले.

प्रभू येशूने तो कोण होता ते नम्र तरीही सामर्थ्यशाली मार्गांनी सांगण्याचे निवडले.

एकदा एक संपन्न तरुण माणूस येशूजवळ आला आणि त्याला *''उत्तम गुरुजी''* या उपाधीने संबोधले. म्हणून येशूने त्या माणसाला विचारले, *''मला उत्तम का म्हणतोस? एकावाचून म्हणजे देवावाचून कोणी उत्तम नाही''* (लूक. १८:१९)[१६९] या श्रीमंत माणसाने येशू देव होता म्हणून विश्वास ठेवला नाही, पण येशू-दैवी चांगुलपणाचा अवतार- त्यास कोडयाचे भाग एकत्र करावे आणि तो कोण आहे हे समजून घेण्यासाठी आमंत्रित करत होता.

आपण देखील समजावे ही त्याची इच्छा आहे.[१७०]

## बोलण्याचा कार्याने पाठपुरावा करावा

अगणित मोठे चमत्कार जे येशूने केले त्यांनी पतित, पापाने-शापित सृष्टीच्या प्रत्येक

घटकांवर त्याचा अधिकार आणि सामर्थ्य प्रदर्शित केले. त्याला मनुष्यांच्या मनातील गोष्टी माहित होत्या, पापाला क्षमा केली, हजारो लोकांसाठी भाकर आणि मासे बहुगुणीत केले, वादळ शांत केले, आणि  दुष्टत्म्यांना निघून जाण्यास आज्ञा दिली. शब्द किंवा स्पर्शाने, त्याने आजारी लोकांना बरे केले, पांगळयांना चालावयास लावले, आंधळयांना दृष्टी दिली, बहिरे ऐकू लागले, आणि मृत पुन्हा जिवंत झाले. ज्याप्रमाणे संदेष्टयांनी भविष्यवाणी केली होती, मसीहा पृथ्वीवर *"देवाचा हात"* होता.[१७१]

ते ज्यांना पाहण्यासाठी डोळे आहेत त्यांच्यासाठी, येशूचे परावर्तीत वैभव त्याच्या अस्तित्वाच्या प्रत्येक तंतू द्वारे दाखवले गेले. त्याच्या कार्यांनी त्याच्या शब्दास वैध ठरवले. उदाहरणार्थ, जसे आपण आत्ताच वाचले आहे, येशूने *"जीवन"* असण्याचा दावा केला. आणि या दाव्यास त्याने कसे प्रमाणित ठरवले? मृतांना पुन्हा जिवंत होण्याची आज्ञा देत त्याने हे सिद्ध केले.

एका प्रसंगी, प्रभू येशू लाजरसच्या कबरेजवळ होता, जो चार दिवसांपूर्वी मरण पावला होता. लाजरसचे शव एका गुहेसारख्या-कबरेत ठेवले होते. येशूने मृत झालेल्या व्यक्तीच्या रडणाऱ्या बहिणीला रडू नको म्हणून म्हटले : तिचा भाऊ पुन्हा जिवंत होईल.

बहिण येशूला म्हणाली, *"तो शेवटल्या दिवशी पुनरुत्थानसमयी पुन्हा उठेल हे मला ठाऊक आहे."*

येशूने उत्तर दिले, *"**पुनरुत्थान व जीवन मीच आहे**; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल."* (योहान ११:२४-२५)

मग त्याचा दावा प्रमाणित करण्यासाठी, येशूने "मोठयाने हाक मारून म्हटले, ***'लाजरा, बाहेर ये.' तेव्हा जो मेलेला होता तो बाहेर आला;*** त्याचे हातपाय प्रेतवस्त्रांनी बांधलेले व तोंड रुमालाने वेष्टिलेले होते.

येशूने त्यांना म्हटले, 'ह्याला मोकळे करून जाऊ द्या.'

तेव्हा पुष्कळ यहूद्यांनी येशूने जे केले ते पाहिले, आणि त्याच्यावर विश्वास ठेवला. पण कित्येकांनी परुश्यांकडे जाऊन येशूने काय केले ते त्यांना सांगितले ... मग, ह्यावरून **त्या दिवसापासून त्यांनी त्याला जिवे मारण्याचा आपसांत निश्चय केला**.....मुख्य याजकांनी लाजरालाही जिवे मारण्याचा निश्चय केला, कारण त्याच्यामुळे पुष्कळ यहूदी त्यांना सोडून येशूवर विश्वास ठेवत होते." (योहान ११:४३-४६, ५३; १२:१०-११)[१७२]

मानवी हृदय किती कठोर आहे!

## कठोर हृदये

येशूच्या दाव्याच्या आणि वाढत्या लोकप्रियतेच्या प्रकाशात, यहूदी लोकांतील मत्सरी धार्मिक आणि राजकीय नेते मोठया आवेशाने एकत्र झाले : येशूला शांत केले पाहिजे! ते एखादे कारण, कोणतेही कारण शोधण्यासाठी हताश होते, की त्यावर दोष लावावा म्हणजे ते त्याला कदाचित मृत्यूदंड देवू शकतील. पण जन्माला आलेल्या एकच परिपूर्ण माणसावर तुम्ही आरोप कसा लावणार?

एका शब्बाथ दिवशी, जेव्हा येशू सभास्थानात शिकवण देत होता...

*''मग तो पुन्हा एका सभास्थानात गेला; तेथे वाळलेल्या हाताचा एक माणूस होता. आणि त्याच्यावर दोष ठेवावा म्हणून शब्बाथ दिवशी तो त्याला बरे करतो की काय हे पाहण्यास ते टपून बसले होते. तेव्हा त्याने हात वाळलेल्या माणसाला म्हटले, 'ऊठ, मध्ये उभा राहा.' मग तो त्यांना म्हणाला, 'शब्बाथ दिवशी बरे करणे किंवा वाईट करणे, जीव वाचवणे किंवा जीव घेणे, ह्यांतून कोणते सशास्त्र आहे?' पण ते उगेच राहिले.*

*मग त्याने त्यांच्या मनाच्या कठीणपणामुळे खिन्न होऊन त्या सर्वांकडे रागाने पाहिले व त्या माणसाला म्हटले, 'हात लांब कर.' त्याने हात लांब केला आणि तो बरा झाला. मग परुशी [धार्मिक पार्टी] बाहेर जाऊन त्याचा* (येशूचा) *घात कसा करावा ह्याविषयी लगेचच हेरोदीयांबरोबर [राजकीय पार्टी] त्याच्याविरुद्ध मसलत करीत बसले.*

*मग येशू आपल्या शिष्यांना घेऊन समुद्राकडे निघून गेला; आणि गालीलातून मोठा समुदाय मागोमाग निघाला; ....ते त्याच्याकडे आले....त्याने अनेकांना बरे केले होते म्हणून जे रोगाने पिडलेले होते ते सर्व त्याला स्पर्श करण्यास त्याच्या अंगावर पडत होते.*

*जेव्हा जेव्हा अशुद्ध आत्मे त्याला पाहत तेव्हा तेव्हा ते त्याच्या पाया पडून म्हणत की,* ***'तू देवाचा पुत्र आहेस."*** (मार्क ३:१-११)

## राक्षसी अंतर्ज्ञान

भूतांना ठाऊक होते की हा बरे करणारा कोण होता, त्यामुळेच ते त्याला *''तू देवाचा पुत्र*

*आहेस!"* या त्याच्या योग्य उपाधीने मोठयाने बोलत होते. हे पतित देवदूत येशूच्या पूर्वीच्या इतिहासाशी चांगलेच परिचित होते. हजार वर्षांपूर्वी, जेव्हा त्याने स्वर्ग आणि पृथ्वी अस्तित्वात येण्यासाठी त्याचे अद्भुत सामर्थ्य आणि अनाकलनीय ज्ञान बोलले होते त्याचे ते साक्षीदार होते. ते थरथर कापत होते जेव्हा त्यांनी त्या दिवसाची आठवण केली जेव्हा त्याने, त्याच्या नीतिमान क्रोधात, त्यांना स्वर्गातून बाहेर घालविले होते जेव्हा त्यांनी सैतान आणि त्याच्या बंडखोरीची निवड केली होती.[१७३] आणि आता तो येथे पृथ्वीवर त्यांच्या मध्ये राहत होता!

परिस्थिती खूप कठीण किंवा अप्रिय होण्याची स्पष्ट चिन्हे होती.

त्यांच्या स्वामीचा अधिकार नष्ट होत होता.

पापाच्या शापाला उलटण्यास सुरुवात झाली होती.

सार्वकालिक पुत्र स्वतः, एका स्त्रीचे संतान म्हणून, त्यांच्या क्षेत्रात शिरकाव केला होता. अशा प्रकारे, *"अशुद्ध आत्मे त्याला पाहत तेव्हा तेव्हा ते त्याच्या पाया पडून म्हणत की,* ***'तू देवाचा पुत्र आहेस!"*** त्यादरम्यान, धार्मिक नेत्यांनी ***त्याचा (येशूचा) घात कसा करावा*** *ह्याविषयी लगेचच ..... त्याच्याविरुद्ध मसलत करीत बसले.*

एकदा मी ही कथा काही पाहुण्यांना सांगितल्यानंतर, त्यातील एका माणसाने म्हटले, *"अविश्वसनीय! धार्मिक नेत्यांपेक्षा भूतांना येशूबद्दल अधिक आदर होता!"*

अविश्वसनीय, पण खरे आहे.



# धडा १८

# देवाची सार्वकालिक योजना

*"हे जे त्याला युगादिपासून माहित आहे ते करणारा प्रभू असे म्हणतो."* (प्रेषित. १५:१८)

**का**ळाची सुरुवात होण्यापूर्वी, देवाच्या मनात लोकांसाठी एक स्पष्ट योजना होती. ज्या दिवशी पापाने मानवी कुटुंबाला दूषित केले, त्याच दिवशी परमेश्वराने त्या योजनेची घोषणा करण्यास सुरुवात केली, पण सांकेतिक स्वरुपात. पवित्र शास्त्र या योजनेला *"देवाचे **रहस्य**"* म्हणून संबोधते. (प्रकटीकरण १०:७)

आजपर्यंत, देवाची मानवजातीसाठी योजना आणि उद्देश अधिकतर लोकांसाठी रहस्यच राहिलेले आहे, पण अनावश्यकरित्या, *"जे रहस्य युगानुयुग पिढयानपिढया गुप्त ठेवलेले होते, परंतु आता त्याच्या पवित्र जनांना **प्रकट झाले आहे.**"* (कलस्सै. १:२६)

### संदेष्टयांपेक्षा अधिक सौभाग्यशाली

येथे एक अद्भुत विचार आहे. जेव्हा देवाची कथा आणि संदेश समजण्याचा विषय येतो, तेव्हा तुम्ही आणि मी त्या संदेष्टयांपेक्षा अधिक सौभाग्यशाली आहोत ज्यांनी पवित्र शास्त्र लिहिले.

आपल्याजवळ देवाचे पूर्ण प्रकटीकरण आहे; त्यांना नव्हते.
आपण देवाचे संपूर्ण पुस्तक वाचू शकतो; ते वाचू शकले नाहीत.

*"ज्या संदेष्टयांनी तुमच्यावर होणाऱ्या कृपेविषयी पूर्वी सांगितले, त्यांनी त्या तारणाविषयी बारकाईने शोध केला; त्यांच्यामध्ये जो ख्रिस्ताचा आत्मा होता त्याने ख्रिस्ताची दु:खे व त्यानंतरच्या गौरवयुक्त गोष्टी पूर्वीच सांगितल्या; त्यांत त्याने*

> *कोणता अथवा कसा काळ सुचवला ह्याविषयी ते शोध करत होते. **त्यांना असे प्रकट करण्यात आले होते** की, स्वर्गातून पाठवलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे तुम्हांला सुवार्ता सांगणाऱ्यांनी त्या गोष्टी तुम्हांला आता सांगितल्या आहेत. **त्या गोष्टी कळवण्याची सेवा ते स्वत:साठी नव्हे, तर तुमच्यासाठी करत होते; त्या गोष्टी न्याहाळून पाहण्याची उत्कंठा देवदूतांना आहे**."* (१ पेत्र १:१०-१२)

## देवाने त्याची योजना सांकेतिक का केली

काहींनी विचारले, *"पतित मानवजातीला देवाने प्रत्यक्षात काय करण्याची योजना आखली आहे हे लगेचच का सांगितले नाही? त्याने त्याचा संदेश रहस्यामध्ये दडवून का ठेवला?"*

जरी विश्वाच्या सार्वभौमिक देवाने याचे आपल्याला कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही, तरी त्याच्या दयेमध्ये त्याने मनुष्यासाठी त्याची योजना सांकेतिक का केली याचे आपल्याला अंतर्ज्ञान दिले आहे. देवाने त्याचा कार्यक्रम उत्तरोत्तर आणि विवेकीपणे उलगडण्यासाठी निवडलेली तीन कारणे येथे आहेत.

पहिले, जसे पाच आणि सहा धड्यांमध्ये स्पष्टीकरण केले आहे, त्याची योजना सावकाशपणे प्रकट करून, देवाने मानवजातीला असंख्य **पुष्टी करणाऱ्या** भविष्यवाण्या आणि प्रतीके दिली आहेत, तसेच बहुसंख्य पुष्टी करणाऱ्या साक्षी दिल्या आहेत, जेणेकरून नंतरच्या पिढी एकच सत्य देवाचा संदेश निश्चितपणे जाणू शकतील.

दुसरे, देवाने त्याचे सत्य अशा प्रकारे प्रकट केले की केवळ जे परिश्रमपूर्वक शोध घेण्यासाठी पुरेशी काळजी घेतात तेच त्यास शोधतील. *"एखादी गोष्ट गुप्त ठेवणे ह्यात देवाचे गौरव आहे; पण एखाद्याचा **शोध लावणे** ह्यात राजांचा गौरव आहे"* (नीतिसूत्रे २५:२). पुष्कळ लोक त्याच कारणासाठी सत्य शोधू शकत नाही जसे एक चोर एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला शोधू शकत नाही; त्यांना तसे करण्याची इच्छा नसते.[१७४]

तिसरे, देवाने त्याची योजना सांकेतिक केली जेणेकरून तिला सैतान आणि त्याच्या अनुयायांपासून **गुप्त ठेवावे**.

> *"तर देवाचे गूढ ज्ञान आम्ही सांगतो; ते गुप्त ठेवलेले होते, ते देवाने युगांच्या पूर्वी तुमच्याआमच्या गौरवाकरता नेमले होते. ते ह्या युगातल्या अधिकाऱ्यांतील कोणालाही कळले नव्हते; कारण त्यांना ते कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळले नसते."* (१ करिंथ. २:७-८)

जर सैतान आणि ते जे त्याच्या पक्षाचे झाले ते त्यांना पराभूत करण्याची देवाची अंतर्गत योजना समजली असती, तर त्यांनी जे केले ते केले नसते. देवाने त्याची योजना अशा प्रकारे रचली आहे की अगदी ते ज्यांनी ती अयशस्वी करण्याचा कट केला तेच तिला पूर्ण करण्यास साहाय्य करतील.

आणि ती योजना काय होती?

**विमोचन!**

देवाने जगात एक निष्पाप तारणारा पाठवण्याचे अभिवचन दिले-एका स्त्रीचे संतान म्हणून-की आदामाच्या भरकटलेल्या, नियमशास्त्राचे उल्लंघन करणाऱ्या वंशजांना सार्वकालिक विनाशापासून वाचवावे. मानवी इतिहासात योग्य क्षणी, देवाने त्याचे अभिवचन पूर्ण केले.

*''परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. ह्यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून* ***सोडवावे,*** *आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा.''* (गलती. ४:४-५)

मुक्त करणे म्हणजे आवश्यक किंमत भरून पुन्हा विकत घेणे.

एक मुलगा म्हणून जेव्हा मी कॅलिफोर्निया मध्ये मोठा होत होतो, तेव्हा माझ्याजवळ एक लहान कुत्री होती. मी तिला जेवण देत असे, तिची काळजी घेत असे आणि तिच्याबरोबर खेळत असे. ती माझ्याबरोबर सर्वत्र येत असे आणि उत्साहित होत असे जेव्हा मी शाळेवरून घरी येत असे. पण तिची एक चूक होती. कधीकधी ती आसपासच्या ठिकाणी भटकत असे, जरी ती परत येते असे. शेवटी एके दिवशी.

मी शाळेवरून घरी आलो, पण माझी कुत्री मला भेटण्यासाठी तेथे नव्हती. झोपायच्या वेळी, ती अजून कोठेही सापडत नव्हती. दुसऱ्या दिवशी, माझ्या वडिलांनी सुचविले की प्राण्यांच्या स्थानीय आश्रयस्थानाला मी फोन करावा, एक ठिकाण जेथे रस्त्यावरील मांजरी आणि कुत्री काही मर्यादित वेळेसाठी ठेवत असत. ज्यांवर कोणी हक्क दाखवणार नाही त्यांना मारून टाकण्यात येत असे.

मी त्या आश्रयस्थानाला फोन केला. होय, त्यांच्याजवळ एक लहान कुत्री होती जी मी वर्णन केल्यासारखी होती. नगराच्या *''कुत्रे धरणाऱ्याने''* तिला धरून नेले होते. माझी कुत्री तिच्या स्वतःला वाचवण्यासाठी असहाय्य होती. जर तिला सोडवण्यासाठी कोणी आले नसते, तर तिला मारून टाकले असते.

मी त्या आश्रयस्थानाकडे गेलो. मी आता माझ्या कुत्रीला घेणारच होतो! पण समोरच्या बाकावरील अधिकाऱ्याने मला सांगितले की जर मला ती परत पाहिजे तर मी दंड भरला पाहिजे. कुत्र्यांनी रस्त्यावर मोकळे फिरणे हे कायद्याच्या विरुद्ध आहे. मी आवश्यक किंमत भरली आणि माझ्या कुत्रीला सोडण्यात आले. त्या भयानक पिंजऱ्यातून बाहेर आल्याने ती किती आनंदी होती आणि पुन्हा त्याच्याबरोबर होती जो तिची काळजी घेत होता! तिला मुक्त केले होते.

माझ्या भरकटलेल्या कुत्रीला परत विकत घेण्याच्या माझ्या बालपणाच्या अनुभवाने आपल्या स्वतःच्या परिस्थितीची अंधुक कल्पना आपल्याला दिली. बंडखोर, अपराधी पापी म्हणून, आपल्याकडे स्वतःला वाचवण्याचा कोणताही मार्ग नाही. देवाने जगात त्याच्या पुत्राला पाठवले की आवश्यक मुक्तीची किंमत भरण्याद्वारे आपल्याला मुक्ती मिळेल. आपण भरू शकलो असतो त्यापेक्षा ती बरीच जास्त होती.

> *"कोणाही मनुष्यास आपल्या भावाला मुक्त करता येत नाही; किंवा त्याच्याबद्दल देवाला खंडणी देता येत नाही;...**कारण त्याच्या जीवाची खंडणी इतकी मोठी आहे** की.... परंतु देव माझा जीव अधोलोकाच्या कबजातून सोडवील...."* (स्तोत्र. ४९: ७, ९, १५)

आपल्या विमोचनाची किंमत ही काय होती?

## संदेष्टयांनी त्याबद्दल घोषणा केली

उत्पत्ती अध्याय ३ मध्ये, पापी लोकांना सैतानाच्या तावडीतून सोडवण्याच्या देवाच्या योजनेबद्दल त्याने सांकेतिक केलेल्या, गर्भित भविष्यवाणीचा आपण सामना केला.

> *"आणि तू व स्त्री, तुझे संतान व तिचे संतान ह्यांच्यामध्ये मी परस्पर वैर स्थापन करीन; तो तुझे **डोके** फोडील, व तू त्याची **टाच** फोडशील."* (उत्पत्ती ३:१५)

ह्या शब्दांसह, देवाने त्याच्या नीतिमान स्वभावासह सातत्यपूर्ण मार्गाने सैतान आणि पापावर उपाय करण्याच्या त्याच्या योजनेची रहस्यमय आणि पद्धतशीर रूपरेषा मांडली. परमेश्वर घोषित करत होता की तो मानवजातीला विमोचनकर्ता-मसीहा प्रदान करेल जो सैतानाचे *"डोके"* फोडून त्यास पराभूत करेल. या भविष्यवाणीने हे देखील भाकीत केले की सैतान मसीहाची "टाच' फोडेल.

*''तो [मसीहा] तुझे [सैतान] डोके फोडील, व तू [सैतान] त्याची [मसीहा] टाच फोडशील.''*

स्त्रीचे संतान सैतानाचे डोके कसे *''फोडेल''*? इब्री शब्द ज्याचा अनुवाद *''फोडणे''* असा केला आहे त्याचा अर्थ *''फोडणे, मोडणे, जखम करणे किंवा ठेचणे आहे.''* या सुरुवातीच्या भविष्यवाणीनुसार, सैतान आणि मसीहा दोघांनाही *''ठेचले''* जाईल, पण केवळ एकच जखम अपरिवर्तनीयपणे घातक असेल. ठेचलेले डोके घातक आहे; ठेचलेली टाच घातक नाही.

देव हे सांगत होता की, जरी अभिवचन असलेला मुक्तिदाता सैतान आणि त्याच्या अनुयायांद्वारे *''जखमी''* केला जाईल, तरी शेवटी तो सैतानावर विजयी होईल.

नंतर मसीहाबद्दल हे शब्द लिहिण्यासाठी देवाने दावीद संदेष्ट्याला प्रेरणा दिली :

***"...त्यांनी माझे हातपाय विंधले आहेत."*** (स्तोत्र. २२:१६)

दाविदाने हे देखील भाकीत केले होते की जरी मसीहाला मारण्यात येईल, तरी त्याचे शव कबरेत सडणार नाही. अभिवचन असलेला सोडवणारा मृत्यूवर प्रभुत्व मिळवील.

***"कारण ......तू आपल्या भक्तास कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाहीस."*** (स्तोत्र. १६:१०)

संदेष्टा यशयाने मसीहाचे दु:खसहन, मृत्यू आणि पुनरुत्थानाच्या उद्देशाची भविष्यवाणी केली होती:

*''**खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला**; .......त्याला ठेचावे असे परमेश्वराच्या मर्जीस आले. त्याने त्याला पिडले; **त्याच्या जीवाचे दोषार्पण झाल्यावर** तो संतती पाहील, तो दीर्घायू होईल, त्याच्या हातून परमेश्वराचा मनोरथ सफल होईल.''* (यशया ५३:५, १०)[१७५]

देवाकडून पाठवलेल्या मसीहाचा छळ करा आणि त्याचा वध करा असे जरी सैतानाने लोकांना पटवून सांगितले, तरी हे सर्वकाही संदेष्ट्यांद्वारे घोषित केलेल्या योजनेनुसार घडेल. शेवटचा परिणाम हा परमेश्वर आणि त्याच्या एकमेव अभिषिक्ताचा संपूर्ण विजय असेल.

## शहाणपण आणि चेतावणीचे शब्द

ख्रिस्ताचा जन्म होण्याच्या हजार वर्षांपूर्वी, दाविदाने लिहिले :

***"राष्ट्रांनी दंगल का मांडली आहे? लोक व्यर्थ योजना का करीत आहेत? परमेश्वराविरुद्ध व त्याच्या अभिषिक्ताविरुद्ध*** *पृथ्वीवरील राजे उठले आहे, सत्ताधीश एकत्र जमून मसलत करीत आहेत की,......स्वर्गात जो राजासनारूढ आहे तो हसत आहे; प्रभू त्यांचा उपहास करीत आहे. तो पुढे त्यांच्याशी क्रोधयुक्त होऊन बोलेल, तो संतप्त होऊन त्यांना घाबरे करील. तो म्हणेल, 'मी आपल्या पवित्र सीयोन डोंगरावर* ***आपला राजा*** *अधिष्ठित केला आहे.'.....राजांनो, आता शहाणे व्हा, पृथ्वीवरील न्यायाधीशांनो, बोध घ्या. भीड धरून परमेश्वराची सेवा करा, कंपित होऊन हर्ष करा. पुत्राने रागावू नये आणि तुम्ही वाटेने नाश पावू नये, म्हणून त्याचे* ***चुंबन*** *[आदर] घ्या; कारण त्याचा क्रोध त्वरित पेटेल;* ***त्याला शरण जाणारे सगळे धन्य होत****."* (स्तोत्र. २:१-२, ४-६, १०-१२)

सेनेगलमध्ये, जेथे कुस्ती ही राष्ट्रीय परंपरागत खेळ आहे, तेथील लोकांची ही म्हण आहे :

*"अंडयाने खडकाबरोबर कुस्ती करू नये"*

अंडयाने खडकाबरोबर कुस्ती का करू नये? कारण स्पर्धा जिंकण्याची कोणतीही संधी अंडयाला नाही! त्याचप्रमाणे, ते जे *"परमेश्वराविरुद्ध व त्याच्या अभिषिक्ताविरुद्ध योजना करतात"* ते यशस्वी होणार नाहीत. देवाच्या योजनेचा प्रतिकार करणे म्हणजे *"एक व्यर्थ गोष्टीची योजना"* आखणे आहे.[१७६]

सेनेगलच्या लोकांकडे ही म्हण देखील आहे :

*"एक लाकूडतोडया जाणूनबुजून भेटण्याच्या ठिकाणाचे झाड तोडणार नाही."*

जगाच्या या रखरखीत प्रदेशात, बहुतेक गावांमध्ये, एक मोठे, मध्यभागी असलेले एक सावलीचे झाड असते. हे *"भेट-करण्याचे झाड"* दिवसाच्या तीव्र उष्णतेपासून आसरा देते : एक ठिकाण जेथे लोक आरामात बसून चहाचा आस्वाद घेतात आणि गप्पागोष्टी करतात. लाकूडतोडयासारखे *"भेट-करण्याच्या झाडाला"* तोडण्यास सुरुवात करील तेव्हा गावातील लोक कशी प्रतिक्रिया देतील? मोठया संतापाच्या प्रदर्शनासह ते ताबडतोब कापणे थांबवतील!

जे लोक देवाच्या मुक्ती योजनेच्या विरोधात आहेत ते गावकऱ्यांच्या आवडत्या झाडाला तोडणाऱ्या लाकूडतोडयासारखे आहेत.

ते यशस्वी होणार नाहीत.

*"राजांनो, आता शहाणे व्हा, पृथ्वीवरील न्यायाधीशांनो, बोध घ्या. भीड धरून परमेश्वराची सेवा करा, कंपित होऊन हर्ष करा. पुत्राने रागावू नये आणि तुम्ही वाटेने नाश पावू नये, म्हणून त्याचे चुंबन घ्या; कारण त्याचा क्रोध त्वरित पेटेल; त्याला शरण जाणारे सगळे धन्य होत."* (स्तोत्र. २:१०-१२)

**देवाच्या योजनेसाठी आंधळे आहेत**

पृथ्वीवरील त्याच्या सेवाकार्याच्या अंतिम आठवड्यात, येशू त्याच्या शिष्यांना ही माहिती देऊ लागला की, त्याला त्यांचा राजा म्हणून स्वीकारण्याऐवजी, राजकीय आणि आध्यात्मिक नेते त्याचा वध करण्याची मागणी करतील. ज्यांनी येशूच्या मृत्यूचा कट केला त्यांना कल्पना नव्हती की संदेष्टयांनी जे भविष्य केले होते ते पूर्ण करण्यात ते प्रत्यक्षात भाग घेत आहेत : की सैतानाच्या तावडीतून आदामाच्या भरकटलेल्या, असहाय्य वंशजांना सोडवण्यासाठी मसीहाचे हातपाय विंधले जातील.

*"तेव्हापासून येशू आपल्या शिष्यांना सांगू लागला की, 'मी यरुशलेमेस जाऊन वडील, मुख्य याजक व शास्त्री ह्यांच्याकडून पुष्कळ दु:खे सोसावी, जिवे मारले जावे व तिसऱ्या दिवशी उठवले जावे ह्याचे **अगत्य** आहे.'*

*तेव्हा पेत्र त्याला जवळ घेऊन त्याचा निषेध करून म्हणाला, 'प्रभूजी, आपणावर दया असो, तसे आपल्याला **होणारच नाही**.'*

*परंतु तो वळून पेत्राला म्हणाला, '**अरे सैताना, माझ्यापुढून निघून जा! तू मला अडखळण आहेस; कारण देवाच्या गोष्टींकडे तुझे लक्ष नाही, माणसांच्या गोष्टींकडे आहे."*** (मत्तय १६:२१-२३)

पेत्राचा विचार हा त्या प्रसिद्ध वादविवादकर्त्याप्रमाणे होता, ज्यास मी असे घोषित करताना ऐकले होते, *"वधस्तंभावर खिळलेला मसीहा हा एखाद्या विवाहित अविवाहितासारखा आहे!"*

वादविवादकर्त्याप्रमाणे, पेत्र देवाची योजना समजला नव्हता. त्याने विचार केला होता की मसीहाने त्याचे अभिवचन दिलेले जगभरावरील सरकार ताबडतोब स्थापन करावे, वधस्तंभावर खिळले जाण्याची भयानकता आणि अपमानाला बळी पडू नये!

देवाने येशूला संपूर्ण पृथ्वीवर सार्वभौमिक शासक म्हणून स्थापित करण्याची योजना केली आहे, असा पेत्राचा विचार योग्य होता, पण मसीहा वधस्तंभावरील दु:ख व लज्जेला टाळू शकतो या विचारात तो चुकला होता. नंतर पेत्र देवाची योजना समजणार होता आणि धाडसाने घोषित करणार होता: *"ज्या संदेष्टयांनी ...ख्रिस्ताची दु:खे व त्यानंतरच्या गौरवयुक्त गोष्टी पूर्वीच*

*सांगितल्या; ....''* (१ पेत्र. १:१०-११)[१७७]

मसीहाचे वधस्तंभावर खिळणे हा योगायोग नसणार.
देवाने *''सावर्कालिकतेपासून''* पूर्वकल्पना आणि योजना केली होती.
संदेष्ट्यांनी त्याची भविष्यवाणी केली होती.
स्त्रीचे संतान हे पूर्ण झाले होते.

काही काळापूर्वी हा ई-मेल मला मिळाला :

> पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद
>
> तुम्ही **इतके आंधळे** आहात की तुम्ही विश्वास ठेवता की **देव त्याच्या एकुलत्या एका पुत्राचा वधस्तंभावर जाण्यापासून बचाव करू शकत नाही का.** हे असे म्हणणे आहे की देवाला मर्यादा आहेत आणि तो इतका कमकुवत आहे की त्याने त्याच्या पुत्राला मानवाकडून अपमानित आणि मारले जाऊ दिले. काहीही ज्याला मर्यादा आहेत ते कमकुवत आहे आणि त्याला देव नाही म्हटले पाहिजे. **देवाजवळ अंतिम सामर्थ्य आहे**. तोच एकमेव आहे आणि त्याच्यासमान कोणीही नाही.
>
> *अल्लाहू अकबर.*

जसा पेत्र पूर्वी होता त्याप्रमाणे, हा ई-मेल संवाददाता अजून समजला नव्हता की मसीहाला *''मारले गेले पाहिजे आणि तिसऱ्या दिवशी उठवले जाणे आहे.''*

अशी भयानक योजना आवश्यक होती का? कारण, जसे आपल्या ई-मेल संवाददात्याने बरोबर स्पष्ट केले होते, *''देवाजवळ अंतिम सामर्थ्य आहे,''* मग देव सैतानाला सरळपणे नरकात का टाकत नाही आणि आदामाच्या पापी वंशजांना क्षमा केली आहे हे का घोषित करत नाही? परमेश्वराने जगाला केवळ बोलण्याने निर्माण केले आहे, मग त्याने फक्त बोलून जगाचा उद्धार का केला नाही?

निर्माणकर्ता-शब्द मनुष्य व्हावा ते का आवश्यक होते? देवाच्या योजनेत दु:ख, रक्त वाहणे, मरणारा मसीहा यांचा समावेश का होता?

आपल्या प्रवासाची पुढील पायरी उत्तर पुरवते.



# धडा १९

# अर्पण करण्याचा नियम

*"...कारण रक्तात जीवन असल्याकारणाने रक्तानेच* ***प्रायश्चित्त*** *होते."*

**- परमेश्वर** (लेवीय १७:११)

**प**हिल्या कुटुंबाचा इतिहास हा उत्पत्तीच्या अध्याय चारमध्ये नोंदलेला आहे. येथेच आपण प्रथम शिकतो की जेव्हा आदाम आणि हव्वेला आरामदायक एदेन बागेतून घालवून देण्यात आले, तेव्हा संपूर्ण मानवजातीला बाहेर घालवून देण्यात आले. सर्व वंशज शत्रूच्या नियंत्रणात असलेल्या शापित जगात जन्म घेतील आणि वाढतील.

## प्रथम जन्मलेला पापी

> *"आदामाने आपली स्त्री हव्वा हिला जाणले; ती गर्भवती होऊन तिने काइनाला जन्म दिला; ती म्हणाली, 'परमेश्वराच्या साहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे."*
> (उत्पत्ती ४:१)

काइनचा अर्थ मिळवणे. पहिल्या बाळाच्या जन्माच्या वेदना आणि आश्चर्यात, हव्वेने उद्गार काढले, *"परमेश्वराच्या साहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे!"* कदाचित तिने विचार केला होता की काइन हाच पापाच्या प्राणघातक परिणामांपासून त्यांना सोडवण्यासाठी देवाने पाठवलेला अभिवचन असलेला सोडवणारा आहे.

हव्वा हा विश्वास ठेवण्यात बरोबर होती की अभिवचन असलेला तारणारा *"परमेश्वराकडून"* येईल. मसीहा हा एका स्त्रीकडून जन्माला येईल असा विश्वास ठेवण्यात देखील ती बरोबर होती, पण तिच्या पतीचे वंशज हा अभिवचन असलेला सोडवणारा असेल असा विचार जर तिने केला

असेल, तर ती चूक होती.

अशा कोणत्याही गैरसमजुती ह्या लवकरच स्पष्ट केल्या गेल्या.

आदाम व हव्वेला त्यांच्या प्रिय लहान प्रथम जन्मलेल्या पुत्रातही जन्मजात पापी स्वभाव आहे हे लवकरच कळले. काइनाने स्वाभाविकपणे पाप केले. त्याने गर्व आणि स्वार्थी इच्छा प्रदर्शित केली-त्याच्या पालकांप्रमाणे आणि सैतानाप्रमाणे. काइन हा अभिवचन असलेला विमोचनकर्ता नव्हता. विमोचनाची आवश्यकता असणारा तो केवळ आणखी एक असहाय्य पापी होता.

आदाम आणि हव्वेला काही समयानंतर दुसरा पुत्र झाला, त्यांना मनुष्याच्या अवस्थेविषयी अधिक सत्य दृष्टीकोन मिळाला होता.

*"नंतर तिने त्याचा भाऊ **हाबेल** ह्याला जन्म दिला."* (उत्पत्ती ४:२)

आदाम व हव्वेने त्यांच्या दुसऱ्या पुत्राचे नाव हाबेल ठेवले, त्याचा अर्थ व्यर्थता किंवा शून्यता. ते एक नीतिमान पुत्र उत्पन्न करू शकतील असा कोणताही मार्ग नव्हता. पाप्यांचा अभिवचन असलेला तारणारा हा आदामाच्या पापी वंशजातून येऊ शकत नव्हता. आदाम व हव्वा एकत्र मिळून केवळ त्यांच्यासारखा आणखी एक पापी उत्पन्न करू शकत होते. त्यांना पापाच्या दंडापासून वाचवण्यासाठी जर येथे कोणी एक नीतिमान मनुष्य असेल, तर त्याने परमेश्वराकडूनच आले पाहिजे.

जसे आपण उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायात शिकलो आहोत, पहिला पुरुष आणि स्त्रीला देवाच्या प्रतिमेत आणि सदृश निर्माण केले होते. या अद्भुत विशेषाधिकारात योग्य निवड करण्याची पवित्र जबाबदारी समाविष्ट होती. आदाम व हव्वा आणि त्यांच्या वंशजांनी त्यांच्या निर्माणकर्त्याचा पवित्र आणि प्रेमळ स्वरूप प्रतिबिंबित करावे अशी देवाची इच्छा होती. तथापि, जेव्हा आदाम व हव्वेने त्यांच्या निर्माणकर्त्या-स्वामीची अवज्ञा करण्याचे निवडले, तेव्हा ते त्याची प्रतिमा प्रतिबिंबित करण्याचे थांबले. क्षणात, ते देव-केंद्रितपासून स्वयं-केंद्रितपर्यंत पतन पावले. आणि त्यांनी त्यांच्यासारख्याच मुलांना जन्म दिला.

*"आदामाला...... **त्याच्याशी सदृश, त्याच्या प्रतिरुपाची**........आणखी मुले व मुली झाल्या."* (उत्पत्ती ५:३-४)

जसे वोलोफ म्हण म्हणते : *"उडया मारणारे हरण बिळे करणारी संतती निर्माण करत नाहीत."* तसेच पापी पालक नीतिमान संतती निर्माण करू शकत नाहीत. पवित्र शास्त्र म्हणते,

*"**एका माणसाच्या द्वारे** पाप जगात शिरले आणि पापाच्या द्वारे मरण शिरले; आणि सर्वांनी पाप केल्यामुळे **सर्व माणसांमध्ये** अशा प्रकारे मरण **पसरले**."* (रोम. ५:१२)

## पाप्यांची उपासना

*"नंतर तिने त्याचा भाऊ **हाबेल** ह्याला जन्म दिला. हाबेल मेंढपाळ झाला पण **काइन** शेतकरी झाला. काही काळ लोटल्यावर असे झाले की काइनाने परमेश्वराला **शेताच्या उत्पन्नापैकी काही अर्पण आणले.** हाबेलानेही आपल्या कळपातील प्रथम जन्मलेल्यांतून म्हणजे **त्यांच्यातल्या पुष्ट मेंढरांतून काही अर्पण** आणले. **परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला; पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला नाही**."* (उत्पत्ती ४:२-४)

काइन शेतकरी झाला आणि हाबेल एक मेंढपाळ झाला. जरी पापाचा प्रभाव त्यांच्याभोवती आणि त्यांच्यामध्ये होता, तरीही ते देवाच्या सृष्टीच्या गौरवाने आणि त्याच्या प्रेमळ काळजीने घेरलेले होते. काइन आणि हाबेल दोघेही जरी पापी होते, तरी देवाने त्यांच्यावर प्रीती केली आणि त्यांनी त्याला ओळखावे आणि उपासनेमध्ये त्याच्याजवळ यावे अशी त्याची इच्छा होती. तथापि, असे घडण्यासाठी, त्यांना त्यांच्या पापाच्या समस्येसाठी उपायाची आवश्यकता होती. देव पवित्र आहे आणि *"ते जे त्याची उपासना करतात त्यांनी आत्मा व खरेपणाने त्याची उपासना केली पाहिजे."* (योहान ४:२४)

स्पष्टपणे, ह्या मुलांना त्यांच्या पालकांद्वारे चांगले शिकवले गेले होते, ज्यांनी त्यांच्या निर्माणकर्त्याबरोबर घनिष्ठ नातेसंबंधाचा आनंद घेतला होता. काइन व हाबेल दोघेही समजले की पाप हे देवाचा अपराध आहे. त्यांच्या पालकांप्रमाणे, त्यांना देवाच्या सानिध्यापासून दूर करण्यात आले. जर त्यांना त्याच्याबरोबर नातेसंबंध हवे असेल तर, ते त्याच्या अटीवरच झाले पाहिजे.

सुवार्ता ही होती की देवाने मार्ग उघडला होता ज्याद्वारे काइन आणि हाबेल यांची पापे झाकली गेली असती जर त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला असता आणि त्याच्याजवळ त्या मार्गाने गेले असते जे त्याने स्थापित केले होते.

चला आपण कथेला पुन्हा एकदा ऐकू या :

*"काही काळ लोटल्यावर असे झाले की काइनाने परमेश्वराला शेताच्या उत्पन्नापैकी काही अर्पण आणले. हाबेलानेही आपल्या कळपातील प्रथम जन्मलेल्यांतून म्हणजे त्यांच्यातल्या पुष्ट मेंढरांतून काही अर्पण आणले. परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण*

*ह्यांचा आदर केला; पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला नाही. पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा त्याने आदर केला नाही; म्हणून काइन संतापला व त्याचे तोंड उतरले.''* (उत्पत्ती ४:३-५)

जसे इतर कोणत्याही चांगल्या-जुन्या कथेमध्ये असते, सर्व तपशील हा ताबडतोब दिला गेलेला नाही. काइन व हाबेलाने काय केले एवढेच केवळ कथा सांगते. त्यांनी तसे का केले आणि त्यांनी काय केले याबद्दल पवित्र शास्त्रात इतरत्र स्पष्ट केलेले आहे. दोन्ही तरुण मुलांना वाटत होते की एकच सत्य देवाची उपासना करावी. प्रत्येकाने *''परमेश्वराजवळ----काही अर्पण आणले.''*

काइन फळे आणि भाज्यांची प्रभावी निवड घेऊन आला ज्याची त्याने परिश्रमपूर्वक लागवड केली होती.

हाबेलाने निष्पाप, निष्कलंक कोकरा आणला, त्यास मारले आणि त्याचे शरीर दगड किंवा मातीपासून बनवलेल्या साध्या वेदीवर त्यास अर्पण केले.[१७८]

बाह्यरूपाने, हाबेलाचे रक्तमय अर्पण हे क्रूर आणि भयंकर होते, तर काइनाचे शेतीचे अर्पण सुंदर आणि आकर्षक होते. तरीही पवित्र शास्त्र सांगते :

*''परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला; पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला नाही. म्हणून काइन संतापला व त्याचे तोंड उतरले.''* (उत्पत्ती ४:४-५)

देवाने हाबेलाचे अर्पण का स्वीकारले आणि काइनाचे नाकारले?
हाबेलाने देवाच्या योजनेवर विश्वास ठेवला.
काइनाने ठेवला नाही.

## हाबेलाचा विश्वास आणि कोकरा

हाबेल देवाजवळ विश्वासाने आला हे पवित्र शास्त्र आपल्याला सांगते, हे दर्शवते की देवाने त्यास काय आवश्यक आहे हे काइन आणि हाबेल यांना प्रकट केले होते.

***"विश्वासाने हाबेलाने*** *[ज्याने देवाच्या योजनेवर विश्वास ठेवला]* ***काइनापेक्षा अधिक चांगला यज्ञ देवाला केला,*** *तेणेकरून तो* ***नीतिमान*** *आहे अशी त्याच्याविषयी साक्ष देण्यात आली.....विश्वासावाचून त्याला 'संतोषवणे' अशक्य आहे....''* (इब्री. ११:४, ६)

विश्वास जो देवाला प्रसन्न करतो तो त्याच्या योजनेवर विश्वास ठेवतो आणि त्याच्या अधीन होतो.

*जेव्हा आदाम आणि हव्वेने प्रथम पाप केले, तेव्हा देवाने त्यांच्या पापाच्या समस्येवर त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नांना नाकारले. त्याऐवजी, देवाने प्रथम प्राणी अर्पण केले आणि आदाम आणि हव्वेला त्यांच्या पाप आणि लज्जेसाठी पांघरूण पुरवले. काही निष्पाप प्राणी मारण्याद्वारे, देव त्यांना शिकवत होता की "पापाचे वेतन* ***मरण*** *आहे, पण देवाचे कृपादान-------सार्वकालिक जीवन आहे."* (रोम. ६:२३)

नंतर, काइन व हाबेलास तोच धडा शिकवला गेला, पण केवळ एकानेच विश्वास ठेवला.

हाबेल देवाजवळ विश्वासाने आला, नम्रपणे आणि आज्ञाधारकपणे परमेश्वराला एक सुदृढ प्रथम जन्मलेला कोकरा सादर केला.



हाबेल कोकरूच्या डोक्यावर हात ठेवत आहे याची कल्पना करा आणि शांतपणे देवाचे आभार मनात आहे की तो, हाबेल, मृत्यूदंडास पात्र आहे, तरीही देव पापासाठी तात्पुरते भुगतान म्हणून कोकऱ्याचे रक्त स्वीकारेल. पुढे, हाबेल सुरा घेतो आणि सौम्य प्राण्याचा गळा कापतो आणि त्याचे जीवन देणारे-रक्त बाहेर पडताना पाहत असतो.

कोकऱ्याला मारण्याद्वारे, हाबेलाने देवाचा पवित्र स्वभाव आणि पाप व मृत्यूच्या नियमासाठी आदर दाखवला. हे याकारणासाठी होते की त्याने देवाच्या योजनेवर विश्वास ठेवला की देव हाबेलाला त्याच्या पापांपासून क्षमा करेल आणि त्यास नीतिमान असे घोषित करेल. हाबेलास पापाच्या शिक्षेपासून मुक्त केले होते कारण ती शिक्षा ही कोकऱ्याविरुद्ध पूर्ण केली गेली होती. हाबेलाचे अर्पण प्रतिक आणि परिपूर्ण बलिदानाकडे इशारा करते ज्याचे अभिवचन देवाने दिले होते की एके दिवशी जगाचे पाप काढून टाकेल.

***म्हणूनच*** *"परमेश्वराने हाबेल व त्याच्या अर्पणाचा आदर केला."*

## काइनाची कामे आणि धर्म

मग तेथे काइन होता. किती धार्मिक तरुण माणूस तो होता! त्याने देवासमोर फळे आणि

भाज्यांची प्रशंसनीय श्रेणी ठेवली होती ज्यास उत्पन्न करण्यास त्याने खूप मेहनत केली होती. पण देवाने काइन व त्याच्या अर्पणाचा नाकार केला.

काइनाची चूक खोटया दैवताची उपासना नव्हती, परंतु एका सत्य देवाची चुकीची उपासना होती.

त्याच्या निर्माणकर्त्याजवळ विश्वासाने जाण्याऐवजी, काइन त्याच्या स्वतःच्या कल्पना आणि प्रयत्नांनी आला. देवाने त्याच्या पालकांचे अंजिराच्या पानांचे स्वतःच्या विचारांचे आवरण स्वीकारले नव्हते आणि ना ही तो काइनाचे स्वतःच्या विचारांचे भाज्यांचे अर्पण स्वीकारेल.

काही वादविवाद करतात, *"पण काइनाजवळ जे होते ते त्याने आणले होते!"*

काइनाजवळ जे होते ते देवाला हवे नव्हते. देवाची इच्छा होती की काइनाने त्याजवर विश्वास ठेवावा आणि मृत्यूचे भुगतान- कोकऱ्याच्या रक्ताच्या आधारावर त्याची उपासना करावी. जर काइनाजवळ कोकरू नव्हते, तर त्याने हाबेलापासून कोकरू विकत घेण्यासाठी त्या भाज्यांची विक्री केली असती किंवा तो हाबेलाच्या वेदीवर परमेश्वराजवळ नम्रपणे जाऊ शकला असता, जेथे कोकऱ्याचे रक्त सांडले होते. पण तसे करण्यासाठी काइन अत्यंत अभिमानी होता. त्याने देवाची *"उपासना"* त्याच्या स्वतःच्या हाताच्या कामांनी करण्यासह केली.

**म्हणूनच** देवाने *"काइन व त्याच्या अर्पणाचा नाकार केला."*

## पापाचे ऋण

परमेश्वर इतका स्पष्ट का होता? त्याने काइनाच्या ताज्या भाज्या स्वीकारल्या नाहीत पण हाबेलाचा वध केलेला कोकरा स्वीकारला का?

देवाने काइनाच्या अर्पणाचा नाकार केला या साध्या कारणासाठी की पापासाठी शिक्षा ही **मृत्यू** आहे, स्वयं-प्रयत्न नाही. पाप आणि मृत्यूचा नियम, जो देवाने प्रथम आदामाला कळवला होता, तो बदलला नव्हता. ते सर्व जे देवाचे नियमशास्त्र मोडतात ते कर्ज भरण्यास जबाबदार आहेत जे केवळ मृत्यू द्वारेच भरले जाऊ शकते. विश्वाचा नीतिमान न्यायाधीश त्याच्या नियमशास्त्राच्या उल्लंघनास कमी शिक्षा होऊ देणार नाही.

कितीही प्रमाणात प्रामाणीकपणा, स्वयं-प्रयत्न किंवा चांगली कामे पापाच्या कर्जास रद्द करू शकत नाहीत.

उदाहरणासह स्पष्ट करण्यासाठी, कल्पना करा एक मुख्य बँक मला काही लाखो डॉलर्स

कर्ज देते, पैशाच्या त्या विशाल रक्कमेचा निवेश करण्याऐवजी, मी ती वाया घालवतो आणि कर्ज चुकवतो. पोलीस माझ्या घरी येतात आणि मला अटक करतात. न्यायालयामध्ये, मी न्यायाधीशास बोलतो, *"मी घेतलेले लाखो डॉलर्सचे कर्ज माझ्या संपूर्ण आयुष्यात कधीही भरू शकणार नाही, पण माझ्या आर्थिक कर्जाला पुसून टाकण्याची माझ्याजवळ एक योजना आहे. पाहा मी काय करेल : पैशाने कर्ज परत भरण्याऐवजी, मी ते चांगल्या कामांनी परत भरून देईन! दररोज मी बँकेच्या अध्यक्षाला शिजवलेल्या तांदळाची एक वाटी आणून देईन. आठवडयातून एक दिवस मी भोजन सेवन करणार नाही आणि ते अन्न गरिबांना देईन. दिवसातून सात वेळा विधीपूर्वक मी अंघोळ करीन की माझ्या कर्जाची लाज धुऊन टाकावी. माझे सर्व कर्ज परत फेडीपर्यंत मी असे करीत राहीन."*

आर्थिक कर्जाची फेड म्हणून न्यायाधीश अशा अतार्किक योजनेला स्वीकारेल का? कधीही नाही! तसेच सर्व पृथ्वीवरील न्यायाधीश प्रार्थना, उपास आणि चांगल्या कामांना पापाच्या कर्जाची परतफेड म्हणून स्वीकारणार नाही. पापासाठी परतफेड म्हणून येथे केवळ एकच मार्ग आहे. त्याची परतफेड केवळ मृत्यू द्वारेच केली पाहिजे-देवापासून सार्वकालिक वेगळे होणे.

असहाय्य पाप्यांसाठी पाप आणि मृत्यूच्या या न वाकणाऱ्या नियमातून सुटका होण्याचा मार्ग आहे का?

देवाचे आभार असो, तो आहे.

## अर्पण करण्याचा नियम

मी पत्ते खेळत नाही, पण मला माहित आहे की काही पत्ते हे इतरांवर मात करतात. पत्त्यांच्या नियुक्त केलेल्या मूल्यांमुळे, ते इतर कमी मूल्यांच्या पत्त्यांवर विजयी होतात.

दानीएल आणि एस्तेर ही जुन्या करारातील पुस्तके प्राचीन राजांविषयी सांगतात जे नियम बनवत असत जे *"मेदी व पारसी ह्यांच्या कधी न पालटणाऱ्या कायद्यांच्या व्यवस्थेप्रमाणे हा ठराव पलटायचा नाही"* (दानीएल ६:८) जर राजाची इच्छा असेल की एखाद्या नियमाचे उल्लंघन करावे, तर त्याला रद्द करण्याऐवजी, तो एक मजबूत कायदा स्थापित करेल जो त्या पूर्वीच्या नियमावर *"मात"* करेल.[१७९]

त्याचप्रमाणे, प्रारंभापासून, देवाचा नीतिमान मार्ग *"पाप आणि मृत्यूच्या नियमावर"* प्रभुत्व मिळवण्याचा हा एखादा मजबूत कायदा आणावा असा होता, नावाने, "**पापार्पणाचा नियम**" (लेवीय ६:२५), किंवा त्यास असे देखील म्हणतात : "**अर्पण करण्याचा नियम**." (लेवीय ७:११)

देव, जो त्याच्या नियमाचे पालन करणारा आहे, म्हणून अजूनही कायदेशीर बाध्य असणाऱ्या पाप आणि मृत्यूच्या नियमावर मात करण्यासाठी तो बलिदानाचा नियम स्थापित करतो.

अर्पण करण्याचा नियम दोषी पाप्यांना दया प्रदान करतो त्याचवेळेस पापाविरुद्ध न्याय देखील करतो. (देवाने दया आणि न्याय एका सिद्ध संतुलनात का जपले पाहिजे याचे पुनरावलोकन करण्यासाठी, धडा १३ पाहा.) पापी व्यक्तीला शिक्षा केल्यावाचून पापाला दंडित करण्यासाठी रक्त अर्पण करण्याच्या नियमाने देवासाठी एक मार्ग प्रदान केला. हे कसे घडू शकते यासाठी येथे देवाचे स्पष्टीकरण आहे :

> *"शरीराचे जीवन तर **रक्तात** असते, आणि तुमच्या जिवांबद्दल वेदीवर **प्रायश्चित्त** करण्यासाठी ते मी तुम्हांला दिले आहे; कारण रक्तात जीवन असल्याकारणाने रक्तानेच प्रायश्चित्त होते."* (लेवीय १७:११)

या नियमात दोन मूळ तत्वे आहेत :

**१. रक्त जीवन देते**-देव बोलला : *"**शरीराचे जीवन तर रक्तात असते**."* पवित्र शास्त्राने जे हजारो वर्षांपूर्वी घोषित केले आहे त्याची आधुनिक विज्ञान पुष्टी करते : एका सृष्ट जीवाचे जीवन रक्तात आहे. निरोगी रक्त जीवन टिकवून ठेवण्यासाठी आणि अशुद्धता दूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांना वाहून नेतात. रक्त मौल्यवान आहे; त्याच्यावाचून, मानव आणि प्राणी समानपणे मरतात.

२. **पापाला मरण आवश्यक आहे**-देव हे देखील बोलला : "**कारण रक्तात जीवन असल्याकारणाने रक्तानेच प्रायश्चित्त होते.**" शब्द प्रायश्चित्त इब्री शब्द कफार पासून येतो, त्याचा अर्थ *"झाकणे, रद्द करणे, स्वच्छ करणे, क्षमा करणे आणि समेट करणे आहे."*[१८०] ओतलेल्या रक्तानेच केवळ एखादया पापी व्यक्तीला शुद्ध केले जाऊ शकते आणि त्याच्या नीतिमान निर्माणकर्त्यासह समेट केले जाऊ शकते. कारण पापाची शिक्षा मरण आहे, देव हे बोलत होता की तो मनुष्याच्या पापांची भरपाई आणि पापांना झाकण्यासाठी स्वीकृत अर्पणाचे रक्त (जीवन गमावून) स्वीकारेल.

## एक पर्याय

अर्पण करण्याच्या नियमात अधोरेखित असलेल्या तत्वाचा सारांश एका शब्दात केला जाऊ शकतो : **पर्याय**. दोषी पाप्याचा पर्याय म्हणून एक निष्पाप प्राणी मरेल.

मसीहाच्या आगमनापूर्वीच्या पिढयांमध्ये, परमेश्वराने हे आदामाच्या वंशजांना परिचित

केले होते की तो एका योग्य प्राण्याचे, जसे एक कोकरा, मेंढरू, बकरा किंवा बैल यांचे सांडलेले रक्त तात्पुरते स्वीकारेल. कबुतरे आणि पारवे देखील अर्पण करू शकतात.[१८१] मग व्यक्ती किती श्रीमंत किंवा गरीब, चांगला किंवा वाईट आहे याची पर्वा नाही, सर्वांना देवाकडे यायचे आहे, त्यांची पापी अवस्था ओळखून आणि विश्वास ठेवून की देव त्यांना सांडलेल्या रक्ताच्या आधारावर **क्षमा** प्रदान करेल.

दोषी ठरवलेला प्राणी *"निष्कलंक"*[१८२] असला पाहिजे. त्याला कोणताही आजार, तुटलेली हाडे, कापलेले किंवा खरचटलेले नसले पाहिजे. ते परिपूर्णतेचे प्रतिक असले पाहिजे. पापी व्यक्ती जो बलिदान अर्पण करत आहे त्याने "त्याचे हात त्याच्या [प्राण्याच्या] डोक्यावर ठेवावे, आणि त्यास मारावे...ते पापार्पण आहे. प्राण्याची चर्बी वेदीवर जाळून टाकावी.

असे अर्पण काय पूर्ण करेल म्हणून देव बोलला?

*"त्याची पापे.....त्याला क्षमा केली जातील."* (लेवीय ४:२३-२६)

निष्कलंक प्राण्याच्या डोक्यावर जेव्हा पापी लोक त्यांचे हात ठेवत असत, तेव्हा त्यांची पापे प्रतिकात्मकरित्या प्राण्याला हस्तांतरित केली जात असत. पाप-वाहून नेणारा प्राणी मग त्या ठिकाणी नाश पावत असे.

त्यांना क्षमा केली गेली आहे!

पर्यायाच्या तत्वाच्या या आधारावर, पापाला शिक्षा करण्यात आली आणि पापी व्यक्तीला क्षमा करण्यात आली. पापासाठी मृत्यूची शिक्षा दोषी पापी व्यक्तीऐवजी निष्पाप प्राण्यावर पडली.

देव पवित्र आहे आणि *"**रक्त** [मृत्यूचा भरणा] ओतल्यावाचून **क्षमा** [पापाची शिक्षा काढून टाकणे] होऊ शकत नाही हे पापार्पणाच्या नियमाने पाप्यांना शिकवले."* (इब्री. ९:२२)

प्राणी अर्पणाच्या माध्यमातून, देव पापाविरुद्ध न्याय करत होता आणि असहाय्य पापी व्यक्तींना दया दाखवत होता ज्यांनी त्याजवर आणि त्याच्या योजनेवर विश्वास ठेवला होता. म्हणूनच ज्या दिवशी परमेश्वराने त्याच्या प्राचीन लोकांना दहा आज्ञा दिल्या, त्याच दिवशी त्याने त्यांना आठवण दिली की त्याच्या नियमाला मोडण्याबद्दल त्यांना क्षमा करण्याचा एकच मार्ग हा स्वर्ग आणि पृथ्वीच्यामध्ये, देव आणि मनुष्याच्यामध्ये- वेदीवर निलंबित रक्त अर्पण करण्याच्या आधारावर त्याच्याजवळ यावे.

*"**माझ्यासाठी** एक मातीची वेदी कर आणि तिच्यावर आपली शेरडेमेंढरे व गुरेढोरे ह्यांची होमार्पणे व शांत्यर्पणे कर, **जेथे जेथे माझे नामस्मरण व्हावे असे मी करीन, तेथे तेथे मी तुझ्याकडे येऊन तुला आशीर्वाद देईन.**"* (निर्गम २०:२४)

पापासाठी-रक्त पुरवठयाचा मुख्य हेतू हा पापाविरुद्ध देवाचा नीतिमान क्रोध दर्शवण्याचा होता जोपर्यंत अभिवचन दिलेल्या तारणाऱ्याचे आगमन होत नाही. मसीहाचा उद्देश हा बलिदानाच्या नियमाचा खरा अर्थ पूर्ण करणे होता.

देवाच्या दृष्टीत, एका मानवाचे जीवन हे संपूर्ण जगातील सर्व प्राण्यांच्या जीवनापेक्षा अत्यंत योग्य होते. प्राण्यांना देवाच्या प्रतिमेत बनवलेले नव्हते. प्राण्यांना सार्वकालिक प्राण नाही. परिणामस्वरूप, प्राण्यांचे रक्त मनुष्याच्या पापाच्या कर्जाला रद्द करण्यास आवश्यक असलेल्या गोष्टींचे गोष्टीचे केवळ प्रतिक होते.

हाबेलाने वध केलेला कोकरा हा जुन्या करारातील कथन केलेल्या शेकडो कथांमधून प्रथम नोंद केलेला होता ज्यामध्ये विश्वासणारे निष्पाप, निष्कलंक प्राण्याच्या सांडलेल्या रक्तासह उपासनेत देवाजवळ येताना आपण पाहतो. ह्या असंख्य प्राणी-बलिदानाच्या कथांमध्ये, एकच सर्वांपेक्षा श्रेष्ठ दिसून येतो.

हा तोच आहे ज्याला जगभरात मुस्लीमांद्वारे प्रत्येक वर्षी स्मरण केले जाते.



# धडा २०

# एक महत्त्वपूर्ण अर्पण

**कु**टुंब एकत्र जमा झाले आहेत. अधीन असलेल्या प्राण्याला जमिनीवर धरून ठेवले आहे. वृद्ध आणि तरुण दोघेही, प्रत्येक जण मेंढरावर हात ठेवतात किंवा पिता सुरा धरून आहे.

कापणे हे त्वरित आहे आणि मातीवर प्राण्याचे जीवन धडधडत असते.

अर्पण संपले आहे-पुढील वर्षापर्यंत.

ईद अल-अधाच्या दिवशी, *"अर्पण करण्याचा उत्सव,"* मुस्लीम लोक पवित्र शास्त्रातील चार हजार वर्षांपूर्वीच्या घटनेकडे इशारा करतात जेव्हा देवाने अब्राहामाच्या पुत्रा ऐवजी मरण्यासाठी एडका पुरवला होता.[१८३] कुराण या शब्दांसह या उत्कृष्ट कथेचा थोडक्यात असा निष्कर्ष काढतात : *"आणि आम्ही एका **मोठया अर्पणाच्या** बदल्यात त्याची* (म्हणजे इब्राहीमच्या मुलाची) ***सुटका केली.*** *"* (सूरह ३७:१०७)

या नाट्यमय कथेचे पूर्ण महत्व समजण्यासाठी, आपल्याला उत्पत्तीच्या पुस्तकाकडे परत जाणे आवश्यक आहे.

## अब्राहाम

अब्राहाम[१८४] हा ऊर, आजचे आधुनिक इराकच्या देशात ख्रिस्तपूर्व २००० च्या आसपास जन्मला. आदामाच्या इतर सर्व वंशजांप्रमाणे, तो पापी स्वभावाने जन्मला होता. जरी अब्राहाम मूर्तीची उपासना करणाऱ्यांच्या मध्ये वाढला होता, तरी तो एका सत्य देवावर विश्वास ठेवणारा झाला. अब्राहामाचे आजच्या पुष्कळ लोकांप्रमाणे मत नव्हते ज्यांना वाटत होते की त्यांनी कशाचीही पर्वा न करता त्यांच्या वाडवडिलांच्या धर्माशी एकनिष्ठ राहायला पाहिजे होते.

हाबेलाप्रमाणे, अब्राहाम देखील अर्पण केलेल्या प्राण्याच्या वाहिलेल्या रक्ताने परमेश्वर देवाजवळ उपासनेत गेला.

जेव्हा अब्राहामाचे वय पंच्याहत्तर वर्षे होते आणि त्याच्या पत्नीचे वय पासष्ट वर्षे होते, तेव्हा परमेश्वर त्यास प्रकट झाला आणि म्हटले :

> *"तू आपला देश, आपले नातेवाईक व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवीन त्या देशात जा.* ***मी तुझ्यापासून मोठे राष्ट्र निर्माण करीन; मी तुला आशीर्वाद देईन****, तुझे नाव मोठे करीन; तू आशीर्वादित होशील. तुझे जे अभीष्ट चिंतितील त्यांचे मी अभीष्ट करीन; तुझे जे अनिष्ट चिंतितील त्यांचे मी अनिष्ट करीन;* ***तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील****."* (उत्पत्ती १२:१-३)

देवाने अब्राहामापासून *"मोठे राष्ट्र"* निर्माण करण्याचे अभिवचन दिले ज्याद्वारे तो पृथ्वीवरील सर्व गटांच्या लोकांना तारण देणार होता. हे राष्ट्र आकारात *"मोठे"* असणार नाही, तर महत्वामध्ये मोठे असेल. या नवीन राष्ट्राला खरोखर करण्यासाठी, अब्राहाम आणि त्याची पुत्रहीन पत्नी सारा यांना देवाने आज्ञा दिली की त्या देशाला जावे जे त्याने त्याच्या वंशजांना देण्याचे अभिवचन दिले आहे, जरी त्यांना अजून एकही पुत्र नव्हता.

अब्राहामाने देवाच्या अशक्य वाटणाऱ्या अभिवचनाबद्दल कशी प्रतिक्रिया व्यक्ती केली? त्याने देवावर विश्वास ठेवला आणि आज्ञा पाळली, त्याच्या पित्याचे घर सोडले आणि कनान देशाच्या दिशेने गेला, ज्यास आज इस्राएल आणि पॅलेस्टाईन म्हणून ओळखतात.

## अब्राहामाचा विश्वास

अब्राहाम कनान देशात आल्यानंतर, देव त्याला बोलला, *"हा देश मी* ***तुझ्या संतानाला देणार.****"* परमेश्वराने त्याला दर्शन दिले म्हणून त्याने तेथे परमेश्वराची एक वेदी बांधली." (उत्पत्ती १२:७)

देवाचे अभिवचन चमत्कारापेक्षा कमी नाही. कनान देशात पुष्कळ विविध गटांचे लोक राहत होते. अब्राहाम आणि त्याचे वंशज त्यास कसे हस्तगत करू शकतील? तो आणि त्याच्या पत्नीला कोणतेही संतान नव्हते.

कल्पना करा एक वृद्ध जोडपे एका दूरच्या देशावरून एका देशाला भेट देण्यासाठी आले आहेत. जेव्हा ते येतात, तेव्हा तुम्ही त्यांना सांगता, *"एके दिवशी तुम्ही आणि तुमचे वंशज ह्या संपूर्ण देशावर ताबा मिळवाल!"* वृद्ध माणूस हसतो आणि म्हणतो, *"फारच विनोदी आहे! मला अजून एखादे संतान देखील नाही! मी एक वृद्ध माणूस आहे; मला मुलेबाळे नाहीत आणि माझी पत्नी गरोदर राहण्यास सक्षम नाही आणि तुम्ही मला सांगता की माझे वंशज हे बहुगुणीत होणार आहेत आणि या देशावर ताबा मिळवणार आहेत? तुम्ही आजारी आहात का?"*

अशा प्रकारचे धक्कादायक अभिवचन देवाने अब्राहामाला दिले. आणि अब्राहामाने कशी प्रतिक्रिया व्यक्त केली? पवित्र शास्त्र म्हणते की त्याने ***"विश्वास ठेवला** आणि अब्राहामाचा हा विश्वास परमेश्वराने त्याचे **नीतिमत्व** गणला"* (उत्पत्ती १५:६). देवाच्या अभिवचनावर अब्राहामाचा बालकाप्रमाणे विश्वासामुळे, देवाने त्याला नीतिमान असे घोषित केले. तो मरण पावल्यानंतर, अब्राहाम परमेश्वरासोबत त्याच्या स्वर्गीय राज्यात त्याच्याबरोबर कायमचे राहणार होता.

*"विश्वास ठेवला"* यासाठी मूळ इब्री भाषेत अमन हा शब्द आहे, ज्यातून वक्तव्य *"आमेन,"* येथे, ज्याचा अर्थ: *"हे असेच होवो!"* किंवा *"हे विश्वासयोग्य आणि खरे आहे!"*

हे चुकवू नका. देवावर विश्वास ठेवणे म्हणजे त्याने जे घोषित केले आहे ते ऐकणे आणि मनापासून *"आमेन"* सह उत्तर देणे आहे! हा असा बालकांसारखा विश्वास देवाशी जोडतो. देवाचे वचन सत्य म्हणून आपण स्वीकारलेले आहे किंवा नाही हे आपल्या कृतींद्वारे दर्शवले जाईल. अब्राहामाचा विश्वास या वस्तुस्थितीवरून सिद्ध झाला की त्याने कठीण मार्ग निवडला, त्याच्या पूर्वजांच्या धर्माकडे पाठ दाखवली जेणेकरून परमेश्वराचे अनुसरण करावे.

> *"**अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला,** आणि ते त्याला नीतिमत्व असे गणण्यात आले; आणि त्याला '**देवाचा मित्र**' म्हणण्यात आले."* (याकोब २:२३)

अब्राहाम हा देवाचा मित्र होता कारण त्याने देवाच्या वचनावर विश्वास ठेवला. याचा अर्थ हा नाही की अब्राहामाने त्याच्या आयुष्याच्या प्रत्येक भागात देवावर नेहमीच विश्वास ठेवला. न्यायिकदृष्टया, देवाने त्याला पूर्णपणे नीतिमान घोषित केले होते, परंतु त्याच्या दैनंदिन जीवनात अब्राहाम त्याच्या परिपूर्णतेपेक्षा कमी होता.

पवित्र शास्त्र संदेष्टयांची पापे आणि कमकुवतपणाला लपवत नाही.

## इश्माएल

अब्राहाम आणि सारा कनान देशात भटके म्हणून जगले, तंबूत राहत, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करत असत. कालांतराने, अब्राहाम पशूधनात खूप श्रीमंत झाला होता.

अब्राहामापासून एक मोठे राष्ट्र निर्माण करीन हे देवाने दिलेल्या अभिवचनाला आता दहापेक्षा जास्त वर्षे होऊन गेली होती. त्याचे वय आता छयाऐंशी वर्षे होते आणि त्याच्या पत्नीचे वय शहात्तर वर्षे होते आणि त्यांना अजूनही मुलबाळ नव्हते. अब्राहाम एक मोठे राष्ट्र कसे होऊ शकतो जर त्याला कोणतीही संतती नाही? अब्राहाम आणि त्याच्या पत्नीने देवाला त्याचे अभिवचन पूर्ण करण्यासाठी *"मदत"* करण्याचा निर्णय घेतला.

परमेश्वराने त्याची योजना त्याच्या वेळेमध्ये पूर्ण करण्याची वाट पाहण्याऐवजी, त्यांनी त्यांची सामान्य समज आणि स्थानिक संस्कृतीचे अनुसरण केले. साराने तिची मिसरी दासी हागार अब्राहामाला दिली म्हणजे तो तिच्यासह सहवास करेल आणि तिच्या द्वारे पुत्र होईल. हागारने अब्राहामाच्या पुत्राला जन्म दिला ज्याचे त्यांनी इश्माएल नाव ठेवले.

तेरा वर्षांनंतर, जेव्हा अब्राहाम नव्व्यानव वर्षांचा होता, सर्वशक्तिमान देव त्यास प्रकट झाला आणि त्याला सांगितले की त्याची पत्नी साराला एक पुत्र होईल.

*"अब्राहामाने उपडे पडून व हसून मनातल्या मनात म्हटले, 'शंभर वर्षाच्या माणसाला मुल होईल काय? नव्वद वर्षाच्या सारेला मुल होईल काय?' अब्राहाम देवाला म्हणाला, 'इश्माएल तुझ्यासमोर जगला म्हणजे झाले.' मग देव बोलला, 'नाही, नाही, तुझी बायको सारा हिच्याच पोटी तुला मुलगा होईल; तू त्याचे नाव इसहाक ठेव; त्याच्या पश्चात त्याच्या संतानाशी निरंतर टिकेल असा करार मी त्याच्याशी करीन. **इश्माएल**विषयी म्हणशील तर मी तुझी विनवणी ऐकली आहे, पाहा, मी त्याचे कल्याण करीन; त्याला सफळ व बहुगुणीत करीन; त्याच्या पोटी बारा सरदार निपजतील; मी त्याचे मोठे राष्ट्र करीन. पण पुढल्या वर्षी ह्याच वेळी तुला सारेच्या पोटी इसहाक होईल; त्याच्याशीच मी आपला करार करीन."* (उत्पत्ती १७:१७-२१)

**इसहाक**

देवाने त्याचे अभिवचन पाळले. साराने तिच्या वृद्धापकाळात, अब्राहामाला इसहाक नावाच्या एका पुत्राला जन्म दिला.

*"तो बाळ मोठा झाला तेव्हा त्याचे दुध तोडले; इसहाकाचे दुध तोडले त्या दिवशी अब्राहामाने मोठी मेजवानी दिली. हागार मिसरिणीस अब्राहामापासून झालेल्या मुलाला खिदळताना सारेने पाहिले.* (उत्पत्ती २१:८-९)

परमेश्वर इसहाकाद्वारे एक राष्ट्र उभारून त्याचे सत्य प्रकट करेल आणि जगाला तारण देईल ही देवाची योजना इश्माएलास मान्य झाली नाही. त्याऐवजी, इश्माएलाने त्याच्या सावत्र भावाची खिल्ली उडवली. तणाव या मुद्यापर्यंत वाढला जेथे अब्राहामाला इश्माएल व हागारेला पाठवून द्यावे लागले. आपला मुलगा इश्माएलवर प्रेम करणाऱ्या अब्राहामासाठी हा एक वेदनादायक अनुभव होता.

*"तेव्हा देव अब्राहामाला म्हणाला, 'हा मुलगा व तुझी दासी ह्यांच्यासंबंधी तू वाईट वाटून घेऊ नकोस; सारा तुला जे काही सांगते ते सगळे ऐक; कारण तुझ्या वंशाचे नाव*

*__इसहाकच__ चालवणार. .....देव त्या मुलाचा पाठीराखा झाला व तो रानात लहानाचा मोठा होऊन तिरंदाज झाला. तो पारानाच्या रानात वस्ती करून राहिला, आणि त्याच्या आईने त्याला मिसर देशातली बायको करून दिली."* (उत्पत्ती २१:१२, २०-२१)

परमेश्वराने जसे अभिवचन दिले होते, इश्माएल महान लोकांचा पिता झाला ज्यांना देवाने अनेक मार्गांनी आशीर्वादित केले होते. तरीही परमेश्वराने अब्राहामाला स्पष्ट केले होते की जगाला तारणारा प्रदान करण्याचा त्याचा करार *"इसहाकच"* पूर्ण करेल.

## इस्राएल

नंतर, इसहाकाचा विवाह झाला आणि त्याला दोन जुळे पुत्र झाले, एसाव आणि याकोब. देवाने शेवटी याकोबाला एक नवीन नाव दिले, त्यास हे म्हणत, *"__इस्राएल__ हे तुझे नाव होईल"* (उत्पत्ती ३५:१०). याकोबाला बारा पुत्र होते, इस्राएलाच्या बारा वंशांचे पूर्वज वडील, जे मोशेच्या काळात, देवाने त्यांना एका राष्ट्रात संघटीत केले. परमेश्वराने अब्राहाम, इसहाक आणि याकोबाच्या या वंशजांना त्याचे निवडलेले लोक म्हटले.[१८५]

त्याने त्यांची निवड का केली? ते इतर राष्ट्रांपेक्षा उत्तम होते का? नाही, वास्तवात देवाने इस्राएल लोकांना सांगितले होते की ते *"सर्व लोकांपेक्षा __कनिष्ठ__"* होते (अनुवाद ७:७). देवाने अशक्त, तिरस्कृत इब्री लोकांना निवडले जेणेकरून त्याने पूर्ण करण्यासाठी जी योजना आखली होती त्यासाठी कोणीही मनुष्याने श्रेय किंवा स्तुती घेऊ नये.

हे अशा प्रकारेच परमेश्वर देव कार्य करण्यात हर्ष करतो.

*"तरी ज्ञान्यांस लाजवावे म्हणून देवाने जगातील जर मूर्खपणाचे ते निवडले, आणि जे बलवान ते लाजवावे म्हणून देवाने जगातील जे __दुर्बळ__ ते निवडले; आणि जगातील जे __हीनदिन__, जे धिक्कारलेले व __जे शून्यवत__ अशांना देवाने ह्याकरता निवडले की, जे आहे ते त्याने रद्द करावे. म्हणजे __देवासमोर कोणाही मनुष्याने अभिमान बाळगू नये__."* (१ करिंथ. १:२७-२९)

## संवाद साधण्याचे माध्यम

देवाने या नवीन राष्ट्राला एक माध्यम म्हणून वाढविले ज्या द्वारे तो जगाच्या शेवटपर्यंत त्याचा संदेश सांगू शकेल. रेडीओ, टेलीव्हिजन आणि इंटरनेट यांच्या काळाच्या खूप आधी देवाने *"संवादाच्या या माध्यमाला"* निर्माण केले- परंतु ते कमी प्रभावी होऊ शकले नाही. या राष्ट्राच्या मध्य एका सत्य देवाचे सामर्थ्यशाली कार्य हे जगभर ऐकले जाणार होते. उदाहरणार्थ,

पवित्र शास्त्र एका कनानी स्त्रीच्या साक्षीची नोंद करते : *"कारण तुम्ही मिसर देशाहून निघालात तेव्हा तुमच्यासमोर **परमेश्वराने** तांबडया समुद्राचे पाणी कसे आटवले आणि यार्देनेपलीकडे राहणारे अमोऱ्यांचे दोन राजे सीहोन व ओग ह्यांचा तुम्ही कसा समूळ नाश केला हे **आमच्या कानी आले आहे.** हे ऐकताच आमच्या काळजाचे पाणीपाणी झाले आणि तुमच्या भीतीमुळे कोणाच्या जिवात जीव राहिला नाही; **कारण तुमचा देव परमेश्वर हाच** वर स्वर्गात व खाली पृथ्वीवर **देव आहे**."* (यहोशवा २:१०-११)

याशिवाय, देव संदेष्टयांना निवडेल जे त्याचे पवित्र शास्त्र लिहितील हे याच राष्ट्राकडून होईल.

सर्वात महत्वाचे, देव एक वंशज प्रदान करेल जो जगाला स्वतःच आशीर्वादाचे माध्यम असेल हे याच राष्ट्राद्वारे होईल. जसे आपण आधीच निरीक्षण केले आहे (धडा १६ मध्ये), हा वंशज इतर कोणी नसून स्त्रीचे अभिवचन असलेला संतान होता, अभिवचन दिलेला तारणारा जो स्वर्गाहून खाली आला की एका गरीब यहूदी कन्येपासून जन्माला आला जी कुमारी होती.

आपण यास मान्य करू की नाही, त्याचे सत्य आणि सार्वकालिक आशीर्वाद पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना हस्तांतरित करण्यासाठी हे प्राचीन राष्ट्र देवाने स्थापित केलेले संवादाचे माध्यम होते. आणि याची सुरुवात परमेश्वराने अब्राहामाला त्याच्या पित्याचे घर सोडावे आणि कनान देशात जाण्यास सांगितल्यामुळे झाली.

देवाचा अब्राहामाबरोबरच्या महान कराराला दोन मुख्य भाग आहेत :

१) *"मी तुझ्यापासून **मोठे राष्ट्र** निर्माण करीन; मी तुला आशीर्वाद देईन.*

२) *"तुझ्या द्वारे **पृथ्वीवरील सर्व कुळे** आशीर्वादित होतील."*

(उत्पत्ती १२:२, ३)

देवाचे प्रेम एका विशेष गटासाठी मर्यादित नाही. त्याची अब्राहामाला किंवा इस्राएलासच केवळ आशीर्वाद देण्याची इच्छा नाही. त्याचे करुणामय हृदय *"पृथ्वीवरील सर्व लोकांसाठी"* तळमळत आहे. जुना करार देवाच्या कथांनी भरलेला आहे की पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना आणि भाषेच्या गटांना त्याची कृपा प्रदान करण्यासाठी देव या लहान आणि उद्धट इस्राएल राष्ट्राचा वापर करत आहे.[१८६] या तिरस्कृत राष्ट्राद्वारे सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करण्याचा देवाचा उद्देश हा मनात ठेवला पाहिजे जेव्हा ज्या लोकांनी इस्राएलचा नाश करण्याचा प्रयत्न केला त्यांच्यापासून परमेश्वर त्यांना संरक्षण देत होता याबद्दल बोलते. देव त्यांचे समर्थन करत होता, याकारणासाठी नाही की इतर राष्ट्रांपेक्षा ते उत्तम होते, परंतु ते एक **माध्यम** होते ज्याद्वारे त्याने जगाला त्याचे सामर्थ्य

आणि गौरव प्रदर्शित करण्याचा आणि तारण प्रदान करण्याचा निश्चय केला होता. अब्राहाम, इसहाक आणि याकोबाच्या वंशजांना संरक्षण देऊन, देव *"पृथ्वीवरील सर्व लोकांसाठी"* त्याच्या आशीर्वादाचे रक्षण करीत होता.

इतकेच काय, परमेश्वर देवाची प्रतिष्ठा पणाला लागली होती सर्व राष्ट्रांना या अशक्त आणि तिरस्कृत राष्ट्राद्वारे आशीर्वादित करण्याची त्याने त्याच्या स्वतःच्या महान नावाने शपथ वाहिली होती.[१८७] देव त्याच्या नावाच्या सन्मानासाठी, जे त्याने अभिवचन दिले आहे तेच नेमके करेल.

आपली प्रतिष्ठा किंवा आपल्या कुटुंबाचा सन्मान धोक्यात आला तर आपणही असेच करणार नाही का?

## देव अब्राहामाची परीक्षा घेतो

चला आपण आता अब्राहामाच्या महत्वाच्या बलिदानाच्या उत्कृष्ट कथेकडे परत जाऊ या.

येथे मांडणी आहे : अब्राहाम हा अति वृद्ध झाला होता. इश्माएलास बऱ्याच वर्षांपूर्वी पाठवून दिले होते. फक्त इसहाक, अब्राहाम आणि सारेचा पुत्र, तेवढा घरी राहिला होता.

देव आता अब्राहामाच्या विश्वासाची अत्युच्च परीक्षा घेणार होता. आदामाच्या मुलाबाळांना पापाच्या मृत्यूमयी शिक्षेपासून सोडवण्यासाठी देवाने स्वतः काय योजना आखली होती त्याबद्दल जगासमोर काही चित्रे आणि भविष्यवाण्यांची देखील आता परमेश्वर देव मांडणी करणार होता.

> *"ह्या गोष्टी घडल्यावर असे झाले की देवाने अब्राहामाला कसोटीस लावले; त्याने 'अब्राहामा', अशी हाक मारली, तेव्हा अब्राहाम म्हणाला, 'काय आज्ञा?' देव म्हणाला, 'तुझा पुत्र, तुझ्या एकुलता एक प्रिय इसहाक ह्याला घेऊन मोरिया देशात जा आणि मी तुला सांगेन त्या डोंगरावर त्याचे होमार्पण कर."* (उत्पत्ती २२:१-२)

देवाने अब्राहामाला निर्देश दिला की एका विशेष डोंगराच्या कडयावर जा आणि तेथे वेदीवर त्याच्या प्रिय पुत्राला मार आणि जाळून टाक. काय ही भयानक विनंती! ही अशी गोष्ट आहे जी देवाने यापूर्वी कधीही माणसाला करण्यास सांगितले नव्हते आणि पुन्हा कधीही माणसाला तसे करण्यास सांगितले नसते. तरीही, आदामाच्या सर्व वंशजांप्रमाणे इसहाकातही पापाचे ऋण असल्यामुळे, त्याच्यावरील शिक्षा हा योग्य आदेश होता : मृत्यू.

*"तेव्हा अब्राहामाने मोठया पहाटेस उठून आपल्या गाढवावर खोगीर घातले, आपल्याबरोबर दोघे सेवक व आपला मुलगा इसहाक ह्यांना घेतले, आणि होमार्पणासाठी लाकडे फोडून घेतली, मग देवाने सांगितलेल्या ठिकाणाकडे तो निघाला."* (उत्पत्ती २२:३)

अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला, परंतु ते सोपे नव्हते. तीन वेदनादायक दिवस अब्राहाम, त्याचा मुलगा आणि दोन सेवकांनी प्रवास केला, प्रत्येक पाऊल त्यांना वध करण्याच्या ठिकाणाजवळ आणत होते.

*"तिसऱ्या दिवशी अब्राहामाने दृष्टी वर करून ती जागा दुरून पाहिली. अब्राहाम आपल्या सेवकांना म्हणाला, 'येथे गाढवाजवळ थांबा, मुलगा व मी पलीकडे जातो आणि देवाची उपासना करून तुमच्याकडे परत येतो."* (उत्पत्ती २२:४-५)

अब्राहामाने सेवकांना सांगितले, *"आम्ही तुमच्याकडे परत येतो."*

अब्राहाम आणि त्याचा पुत्र *"परत माघारी"* कसे येऊ शकतात जर इसहाकाला वेदीवर मारले आणि जाळले जाईल? इतर ठिकाणी पवित्र शास्त्र उत्तर प्रदान करते. कारण की देवाने इसहाकापासून एक मोठे राष्ट्र निर्माण करण्याचे अभिवचन दिले आहे, म्हणून अब्राहामाने विश्वास ठेवला की एकदा की त्याने त्याच्या पुत्राला अर्पण केले, तर मग देव त्याला पुन्हा जिवंत करील.[१८८] अब्राहाम शिकला होता की परमेश्वर नेहमीच त्याची अभिवचने पाळतो!

## देव एक पर्याय प्रदान करतो

*"तेव्हा अब्राहामाने होमार्पणासाठी लाकडे घेऊन आपला पुत्र इसहाक ह्याच्या पाठीवर ठेवली आणि आपल्या हाती विस्तव व सुरा घेतला, आणि ते दोघे बरोबर चालले."* (उत्पत्ती २२:६)

जेव्हा पिता आणि पुत्र डोंगरावर चालत जात होते, तेव्हा इसहाक बोलला,

*"बाबा!' तो म्हणाला, 'काय म्हणतोस बाळा?' त्याने म्हटले, 'पाहा, विस्तव व लाकडे आहेत, पण होमार्पणासाठी* ***कोकरू कोठे आहे****?' अब्राहाम म्हणाला, 'बाळा,* ***देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल.*** *' आणि ते दोघे बरोबर चालले. देवाने त्याला सांगितलेल्या ठिकाणी ते आले तेव्हा अब्राहामाने तेथे वेदी उभारली, तिच्यावर लाकडे रचली आणि आपला पुत्र इसहाक ह्याला बांधून वेदीवरच्या*

*लाकडांवर ठेवले. मग अब्राहामाने आपला मुलगा वधण्यासाठी हात पुढे करून सुरा घेतला. तेव्हा परमेश्वराच्या दूताने त्याला आकाशातून हाक मारून म्हटले, 'अब्राहामा! अब्राहामा!' तो म्हणाला, 'काय आज्ञा?' मग तो बोलला, 'तू मुलावर आपला हात चालवू नकोस, त्याला काही करू नकोस; कारण तू आपल्या मुलाला, आपल्या एकुलत्या एका मुलालाही माझ्यापासून राखून ठेवले नाहीस, ह्यावरून तू देवाला भिऊन चालणारा आहेस हे मला कळले. मग अब्राहामाने दृष्टी वर करून पाहिले, तर पाहा, आपल्यामागे झुडुपात शिंगे गुंतलेला एक एडका त्याला दिसला....''* (उत्पत्ती २२:७-१३अ)

परमेश्वराने मध्यस्थी केली होती. अब्राहामाचा पुत्र मृत्यूच्या शिक्षेपासून वाचला होता.

अब्राहाम मागे वळला, आणि दूरवर, त्याच डोंगराच्या कडयावर, झुडपात त्यास काही हालचाल दिसली. ते काय होते...? ते ....असू शकेल काय? होय! देवाची स्तुती असो! एक निष्कलंक *''एडका झुडुपात शिंगे अडकलेला होता!''*

त्याच्या ''अर्पणाच्या नियमाचे' पालन करीत, देवाने एक पर्याय प्रदान केला होता.

*''मग अब्राहामाने दृष्टी वर करून पाहिले, तर पाहा, आपल्यामागे झुडपात शिंगे गुंतलेला एक एडका त्याला दिसला. मग अब्राहामाने तो एडका घेऊन **आपल्या पुत्राच्या ऐवजी** अर्पण केला.''* (उत्पत्ती २२:१३ब)



अब्राहामाचा पुत्र मृत्यूच्या शिक्षेपासून कसा सुटला जी त्याजवर येणार होती?
एडका त्याच्या ठिकाणी मरण पावला होता.
देवाने एक पर्याय दिला होता.

## परमेश्वर प्रदान करेल

*"म्हणून अब्राहामाने त्या ठिकाणाचे नाव याव्हे-यिरे* (परमेश्वर पाहून देईल) *असे ठेवले; ह्यावरून **परमेश्वराच्या गिरीवर पाहून देण्यात येईल** असे आजवर बोलतात."* (उत्पत्ती २२:१४)

अब्राहामाने त्याच्या पुत्राच्या ठिकाणी एक एडका मारल्यानंतर, त्याने त्या ठिकाणाचे नाव, *"परमेश्वर पाहून **देईल**"* असे का ठेवले?

अब्राहामाने त्याचे नाव *"परमेश्वराने **प्रदान केले आहे**"* असे का दिले नाही?

*"परमेश्वर पाहून **देईल**"* असे म्हणण्यात संदेष्टा अब्राहाम हा भविष्यातील एका घटनेची घोषणा करीत होता जी जवळपास दोन हजार वर्षांनंतर घडणार होती. कारण याच डोंगराच्या कडयावर (जेथे यरुशलेम हे नंतर बांधले गेले) जेथे परमेश्वर आणखी एक अर्पण प्रदान करणार होता, केवळ एका माणसाला मृत्यूपासून सोडवण्यासाठी नाही, तर संपूर्ण जगासाठी पूर्ण आणि अंतिम प्रायश्चित्त प्रदान करणार होता.

तुम्हांला आठवते का अब्राहामाने त्याच्या पुत्राला काय म्हटले होते जेव्हा ते दोघेही डोंगरावर चढून जात होते जेथे अर्पण केले जाणार होते? त्याने त्याला म्हटले,

***"बाळा, देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल."***

अब्राहाम कशाबद्दल बोलत होता? देवाने अब्राहामाच्या पुत्राच्या ठिकाणी मरण्यासाठी **कोकरा** प्रदान केला होता का? नाही, त्याने एक कोकरा प्रदान केला नाही. देवाने एक एडका प्रदान केला होता. तर अब्राहाम संदेष्टयाच्या म्हणण्याचा काय अर्थ होता जेव्हा त्याने *"देव स्वतः कोकरा"* प्रदान करेल याबद्दल बोलला.

अद्भुत उत्तर हे लवकरच उद्भवेल, पण प्रथम काही आणखी कथा ह्या सांगितल्या गेल्या पाहिजेत.



# धडा २१

# जास्त रक्त वाहिले

**च**ला आपण प्रामाणिक होऊ या.

जेव्हा आध्यात्मिक सत्याचा विषय येतो, तेव्हा आपण ऐकण्यास धीमे आहोत.

देवाला हे ठाऊक आहे.

*''वास्तविक इतक्या काळात तुम्ही शिक्षक व्हायला पाहिजे होता, पण तुम्हांला देवाच्या वचनांची **मुळाक्षरे** पुन्हा कोणीतरी शिकवण्याची गरज आहे आणि तुम्हांला दुधाची गरज आहे, जड अन्न चालत नाही, असे तुम्ही झाला आहात.''* (इब्री. ५:१२)

आहा!

दयापूर्ण, देव हा सर्व शिक्षकांपेक्षा जास्त संयमी आहे, प्राथमिक सत्य वारंवार बोलतो आणि पुन्हा स्पष्ट करत असतो जे आपण फार पूर्वी शिकले पाहिजे होते. आपल्याला साहाय्य करण्यासाठी, त्याने त्याच्या पुस्तकात शेकडो कथा समाविष्ट केल्या आहेत जे सर्वात महत्वाचे सत्य हुबेहूब स्पष्ट करते :

*''रक्त ओतल्यावाचून पापक्षमा होत नाही.''* (इब्री. ९:२२)

आपल्या परिपूर्ण पवित्र निर्माणकर्त्याला पापाची क्षमा करणे हा कधीही एक साधा विषय नव्हता. ज्या दिवसापासून पापाने जगात प्रवेश केला, तेव्हापासून पापाचे प्रायश्चीत्त (झाकणे) केवळ एका योग्य अर्पणाचे रक्तच करू शकते हे देव पापी लोकांना शिकवू लागला. हे अशा प्रकारेच, देव, नीतिमान न्यायाधीश, पापी व्यक्तीला शिक्षा केल्यावाचून पापाला दंडित करेल.

परमेश्वराने आदाम व हव्वेचे त्यांच्या पापाला झाकण्याचे स्वयं-प्रयत्न नाकारले. मृत्यूची भरपाई केल्यावाचून, देव पापाला क्षमा करू शकत नाही. काइन आणि हाबेलाची कथा

आपल्याला तोच धडा शिकवते. तसेच अब्राहाम आणि इसहाकाची कथा.

जुन्या करारातील पुस्तके जी उत्पत्तीनंतर येतात, जशी निर्गम आणि लेवीय, जे पुरुष आणि स्त्रियांच्या कथांनी भरलेली आहेत जे अर्पण करण्याच्या नियमाच्या अधीन झाले होते.[१८९]

## "मी ओलांडून जाईन"

देवाने जसे अभिवचन दिले होते तसेच अब्राहामाच्या वंशजांना एका राष्ट्रामध्ये कसे आयोजित केले याबद्दल निर्गमाचे पुस्तक लक्ष वेधून घेणाऱ्या कथेशी संबंध दाखवते.

देवाने अब्राहामाला[१९०] भाकीत केलेल्या दैवीरित्या आयोजित केलेल्या घटनांच्या मालिकेद्वारे, इस्राएलाचे वंशज मिसरी फारोच्या अधिकाराखाली गुलाम झाले. देवाने त्यांना त्यांच्या गुलामगिरीतून सुटका करण्याचे अभिवचन दिले आणि त्या प्रक्रीयेमध्ये, आदामाच्या वंशजांना पापाच्या त्यांच्या दास्यातून सोडवण्याच्या त्याच्या योजनेचे *"दृश्य"* जगाला हस्तांतरित करावे.

हीच वल्हांडणाची कथा आहे.

ख्रि.पू. १४९०च्या आसपास, परमेश्वराने मिसर देशात मोशेच्या शब्दाने दहा विनाशक पीडा आणल्या. या चमत्कारिक चिन्हांच्या पहिल्या नऊ, ज्यामध्ये परमेश्वराने अनेक दैवतांच्या मिसर देशाच्या खोट्या दैवतांना आव्हान दिले आणि त्यांना पराभूत केले, त्याने फारोला एकाच सत्य देवाच्या अधीन व्हावे आणि इस्राएली लोकांना मुक्त करावे यासाठी कारणीभूत झाले नाही.[१९१] परंतु दहावी पीडा फारोला त्यांची सुटका करण्यास राजी करेल. देवाने मोशेला सांगितले की प्रत्येक कुटुंबातील प्रथम जन्मलेले, मिसरी आणि इस्राएली, दोन्हीमधील मरण्यास दोषी ठरवले गेले आहे अशी सूचना लोकांना दे. नियुक्त तारखेला मध्यरात्री, मृत्यूचा देवदूत हा देशातून जाईल आणि प्रत्येक घरातील प्रथम जन्मलेल्याचा वध करेल.

ती वाईट बातमी होती.

सुवार्ता ही होती की देव या मृत्यूच्या पीडेतून सुटण्याचा मार्ग प्रदान करेल. देवाने मोशेला सांगितले की प्रत्येक कुटुंबाला सांग की एक *"निर्दोष, एक वर्षाचा नर घ्यावा; हा नर मेंढरातला किंवा शेरडांतला तुम्हांला वाटेल तो घ्यावा"* (निर्गम १२:५). मग, नियुक्त समयी, कोकऱ्याला मारावे, आणि त्याचे रक्त प्रत्येक घराच्या बाह्यपट्टीच्या वर आणि बाजूंवर लावावे. ते सर्व जे दाराच्या बाह्यपट्टीवर रक्त लावतील, आणि जेव्हा मृत्यूची पीडा त्या देशातून जाईल तेव्हा त्या घरात राहतील, ते वाचवले जातील.

देवाने अभिवचन दिले होते :

> *"आणि **जेव्हा मी रक्त पाहीन तेव्हा मी तुम्हांला ओलांडून जाईन**. मिसर देशाच्या लोकांना मी मारीन तेव्हा तुमच्यावर अनर्थ येणार नाही, तुमचा नाश होणार नाही."* (निर्गम १२:१३)

जसे देवाने म्हटले होते त्यानुसार सर्वकाही घडले. मिसर देशात त्या पवित्र रात्री, देवाने ते सर्व प्रथम जन्मलेले जे रक्ताखाली होते त्यांना सांभाळले; इतर सर्व, फारोच्या प्रथम जन्मलेल्या पुत्रासह मरण पावले.

चला आपण हे पाहण्यात चुकू नये की प्रत्येक घराण्यात मृत्यू पाहिला गेला. होय, प्रत्येक घराण्यात.

एकतर कोकरा मारला गेला किंवा प्रथम जन्मलेला मारला गेला.

त्या रात्री ज्यांनी त्यांच्या घराच्या बाह्यपट्टीवर रक्त लावले होते ते अत्याचाराचे आणि गुलामगिरीच्या जीवनातून सुटले होते. ते स्वतंत्र, मुक्त केलेले लोक म्हणून बाहेर निघून गेले.

आणि त्यांच्या सुटकेच्या खंडणीची किमत काय होती?

एका कोकऱ्याचे रक्त.

पुन्हा एकदा, अर्पण करण्याच्या नियमाने पाप आणि मृत्यूच्या नियमावर विजय मिळवला होता. त्यानंतरच्या वर्षांमध्ये, यहूदी लोक वल्हांडण साजरा करत होते, एक वार्षिक पर्व ज्यामध्ये देवाने एका कोकऱ्याच्या रक्ताद्वारे पुरवलेल्या महान सुटकेची त्यांनी आठवण करायची होती.

## देव त्याच्या लोकांचे नेतृत्व करत होता

मूळ वल्हांडणाच्या रात्री, देवाने इस्राएली लोकांना मिसर देशामधील चारशे वर्षांच्या बंदिवासातून बाहेर काढले आणि त्यांना रानात नेले. देवाने अब्राहाम, इसहाक, याकोब आणि त्यांच्या वंशजांना अभिवचन दिलेल्या देशात परत आणण्याची त्याची योजना केली होती. जेव्हा ते प्रवास करत होते, तेव्हा देव स्वतः त्यांना दृश्य, आणि सांत्वन करणाऱ्या प्रकारामध्ये त्यांच्यासोबत होता.

> *"त्यांनी रात्रंदिवस चालावे म्हणून परमेश्वर दिवसा त्यांना मार्ग दाखवण्यासाठी मेघस्तंभातून आणि रात्री त्यांना उजेड देण्यासाठी अग्निस्तंभातून त्यांच्यापुढे चालत असे."* (निर्गम १३:२१)

देवाने त्याच्या लोकांचे केवळ रानातून नेतृत्व केले नाही आणि त्यांना उजेड दिला नाही, परंतु त्याच्या समर्थ हाताने, त्याने तांबडया समुद्रातून मार्ग उघडला, आणि फारोच्या पाठलाग

करणाऱ्या सेनेपासून त्यांची सुटका केली. आणि मग, त्याने मोशेला अभिवचन दिल्याप्रमाणे, त्यांना सीनाय पर्वताकडे आणले.[१९२]

तेथे पर्वताच्या पायथ्याशी दोन दशलक्षाहून अधिक लोक असलेल्या या नवीन राष्ट्राने एका संपूर्ण वर्षासाठी तेथे डेरा दिला होता. त्या रखरखीत वाळवंटात ते कसे जगू शकतील? देवाने, त्याच्या चांगुलपणात आणि कृपेत, स्वर्गातून भाकर, आणि खडकातून पाणी पुरवले.[१९३]

एकमेव ज्याने त्यांना गुलामगिरीतून मुक्त केले होते त्याला धन्यवाद देणे, विश्वास ठेवणे आणि आज्ञाधारक राहण्यात इस्राएली लोक जरी सातत्याने चुकले होते, तरी परमेश्वर हा त्यांच्याशी नेहमीच विश्वासू राहिला. जेव्हा त्यांनी त्याच्याविरुद्ध पाप केले तेव्हा त्याने त्यांचा न्याय केला आणि जेव्हा त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला तेव्हा त्याने त्यांना आशीर्वाद दिला. देवाने त्याच्या निवडलेल्या राष्ट्राशी अशा प्रकारे व्यवहार केला जेणेकरून सभोवतालची राष्ट्रे त्याच्या मुक्त करण्याच्या मार्गाला पाहू शकतील, विचार करू शकतील आणि शिकू शकतील. त्याला वैयक्तिक मार्गाने ओळखता येऊ शकते हे लोकांनी समजून घ्यावे अशी देवाची इच्छा होती.

इस्राएली लोकांना दहा आज्ञा आणि इतर नियम दिल्यानंतर, देवाने त्याच्या लोकांना एक एकमेव निवासस्थान बनवण्यास सांगितले ज्यास निवासमंडप किंवा भेटण्याचा तंबू म्हणतात.

## निवासमंडप

> *"**मी त्यांच्यामध्ये निवास करावा** म्हणून त्यांनी **माझ्यासाठी** एक पवित्रस्थान तयार करावे. निवासमंडपाचा नमुना व त्यातील सगळ्या साहित्याचा नमुना **तुला दाखवतो त्या सगळ्यांप्रमाणे तुम्ही ते तयार करावे.**"* (निर्गम २५:८-९)

देवाच्या प्राचीन लोकांनी या विशेष तंबूची रचना कोणत्या उद्देशासाठी करायची होती? आणि ती इतकी महत्वाची का होती की तिला देवाने दिलेला *"नमुना ....दाखवला त्या सगळ्यांप्रमाणे"* तंतोतंतपणे करायचे का होते?

देवाने या निवासमंडपाचा उपयोग करून तो कसा आहे आणि त्याच्याशी संपर्क कसा साधला पाहिजे हे त्यांना दृश्य पद्धतीने शिकवण्याची योजना आखली.

निवासमंडप आणि त्यात काय आहे याबद्दल बायबलमध्ये पन्नास अध्याय आहेत, म्हणून ते सर्व येथे स्पष्ट करता येऊ शकत नाहीत. आपण केवळ काही मुलभूत घटकांकडे इशारा करू शकतो.

## एकच मार्ग

देवाने जगाला शिकवण्यासाठी निवासमंडपाची रचना केली की जरी तो पूर्णपणे पवित्र आहे, तरीही त्याला त्याच्या लोकांसोबत राहण्याची इच्छा आहे. तथापि, देव आणि मनुष्यामध्ये एक प्रमुख अडथळा आहे.

अडथळा हा पाप आहे.

विशेष तंबू जो मानवांच्या मध्ये देवाच्या उपस्थितीचे प्रतिक आहे ते एका विशाल आयताकृती अंगणात बंदिस्त आहे. या अंगणाचे कुंपण हे तांब्याचे खांब आणि कातलेल्या तलम सणाच्या कापडाचे बनवलेले होते. त्याची उंची अडीच मीटर एवढी होती, इतकी उंच की कोणीही माणूस त्यावरून पाहू शकत नव्हता. लोकांना त्याच्या उपस्थितीपासून दूर ठेवले आहे हे त्यांनी समजून घ्यावे अशी देवाची इच्छा होती. ती वाईट बातमी होती.

सुवार्ता ही होती की देवाने पापी लोकांना त्याच्याजवळ येण्यासाठी मार्ग पुरवला होता. भिंतीला निळ्या, जांभळ्या आणि किरमिजी रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचे विणलेले एक द्वार होते. पापी लोक देवाकडे येण्याचा एकमेव मार्ग हा त्या एकाच दरवाजातून[१९४] एक कोकरा किंवा दुसरे योग्य रक्ताच्या अर्पणासह प्रवेश करण्याचा होता.

देवाने इस्राएली लोकांना बाभळीच्या लाकडाची एक मोठी वेदी बनवण्यास सांगितले आणि त्यावर पितळेचा लेप द्यावा. ही वेदी दरवाजा आणि देवाचा विशेष तंबू यांच्यामध्ये ठेवावी. ते जे पापार्पण आणतील त्यांनी निष्पाप प्राण्याच्या डोक्यावर त्यांचे हात ठेवावे आणि असहाय्य पापी म्हणून त्यांच्या स्थितीची कबुली द्यावी. मग प्राण्याला मारण्यात यावे आणि त्याचे शरीर वेदीवर जाळण्यात यावे. पाप आणि मृत्यूच्या नियमावर प्रभुत्व हे केवळ अर्पण करण्याच्या नियमाद्वारे[१९५] करता येऊ शकते हे पुन्हा एकदा देव लोकांना दाखवत होता.

देवाचा नियम स्पष्ट होता : रक्त ओतल्यावाचून, येथे पापासाठी आवरण नाही. पापाला झाकल्यावाचून, येथे देवासोबत समेट (योग्य संबंध) होऊ शकत नाही.

देवाने मोशेला सोन्याने मढवलेला एक अद्वितीय लाकडी कोश देखील बनवण्यास सांगितले. लाकडाच्या या कलाकुसरीला साक्षीचा कोश म्हणतात. ते स्वर्गातील देवाच्या सिंहासनाचे प्रतिक आहे. दगडाच्या पाटया ज्यावर देवाने दहा आज्ञा कोरल्या होत्या त्या या सोन्याच्या कोशात ठेवाव्या. कोशाच्या भक्कम सोन्याच्या झाकणावर, ज्यास दयासन म्हणतात, दोन करुब गुडघ्यावर असलेले असे ठेवावे, ते देखील सोन्याने बनवलेले असावेत. करूब हे वैभवशाली देवदूत आहेत जे स्वर्गात देवाच्या सिंहासनाभोवती असतात. देवाने मोशेला सांगितले की कोशाला निवासमंडपाच्या सर्वात आतल्या खोलीमध्ये ठेवावे.

## पवित्र स्थान

निवासमंडप दोन खोल्यांमध्ये विभागलेला होता. समोरच्या खोलीला पवित्र स्थान म्हटले जात आणि आतल्या खोलीला पवित्र स्थान किंवा परमपवित्र स्थान म्हटले गेले. हे आतील पवित्र स्थान *"* ***स्वयं स्वर्ग*** *.....एका खऱ्या खोलीचे ते केवळ प्रतिरूप होते."* (इब्री. ९:२४)

हे परमपवित्र स्थान स्वर्गाचे प्रतिक आहे, देवाचे निवासस्थान. ही विशेष खोली घनाकार सारख्या आकाराची होती; तिची लांबी, रुंदी आणि उंची ही समान होती. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासाच्या शेवटास आपण स्वर्गीय नगराला पाहू, जी एके दिवशी सर्व विश्वासणाऱ्यांसाठी घर असेल, ती देखील घनाकार सारख्या आकाराची आहे.

लोक कॅथड्रल, चर्च इमारत, मशीद, सभास्थान किंवा कबर जी पवित्र आहे, याबद्दल बोलतात, जरी ही ठिकाणे त्या लोकांनी नेहमी भरलेली असतात जे देवाच्या मुक्तीच्या मार्गाचा नकार करतात. खरी पवित्रता ही एखाद्या विशेष इमारतीमध्ये प्रवेश करण्याने येत नाही, परंतु क्षमा आणि धार्मिकतेची देवाची तरतूद प्राप्त केल्याने येते.

## अंतरपट

निवासमंडपाचा बाह्यभाग साधारण होता; प्राण्याच्या कातडीने बनविलेला तो एक विशाल तंबू होता. तो बाहेरून अप्रभावी होता, पण आतून आश्चर्यकारकपणे सुंदर होता.[१९६]

निवासमंडपाच्या दोन खोल्या एका जाड पडद्याने विभागल्या जात होत्या त्यास अंतरपट म्हणतात.

> *"तसेच* ***निळ्या, जांभळ्या*** *आणि* ***किरमिजी*** *रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचा* ***एक अंतरपट*** *बनवावा व त्यावर कुशल कारागिराकडून करूब काढवावेत."* (निर्गम २६:३१)

अंतरपट मनुष्याला परमपवित्र स्थानापासून वेगळे करते, ज्यामध्ये महिमा आणि देवाच्या उपस्थितीचा प्रकाश असतो. एकाला आणि सर्वांना अंतरपट घोषित करतो : **दूर राहा किंवा मरा!**

विशेष पडदा देवाच्या धार्मिकतेच्या मानकाचे प्रतिक होता. परमेश्वराने मोशेला दहा आज्ञा देण्याद्वारे त्याच्या मानकेची मानवजातीला सूचना दिली होती. पण त्या दहा नियमांनी देवाला खरोखर काय हवे आहे याविषयी केवळ मर्यादित दृष्टीकोन प्रदान केला. देवाची अंतिम योजना ही पृथ्वीवर त्याच्या पुत्राला पाठवण्याची होती, जो त्याच्या सोबत कायमचे व्यवस्थित राहण्यासाठी कशाची आवश्यकता आहे हे दर्शवेल : परिपूर्ण पवित्रता.

मसीहा हा देवाचे मानक असेल. देवाने आपल्याला **त्याचा** विचार करायला लावण्यासाठी अंतरपटाची रचना केली.

हा सुंदर पडदा शुद्ध तलम कापडापासून बनवलेला होता, जे मसीहाची शुद्धता चित्रित करते. तो पवित्र, निष्पाप असेल.

शुद्ध वस्त्रात तीन तेजस्वी रंगाचे सुत विणलेले होते : निळे, जांभळे आणि किरमिजी (लाल).

**निळा**= स्वर्गाचा रंग. मसीहा हा स्वर्गाकडून परमेश्वर असेल.

**लाल**= पृथ्वी, मनुष्य आणि रक्ताचा रंग.[१९७] मसीहा मांस व रक्ताचे शरीर धारण करेल जेणेकरून त्रास भोगावे आणि पाप्यांच्या ऐवजी मरण पावावे.

**जांभळा**= निळा आणि लाल रंगाचे मिश्रण. मसीहा हा देव-माणूस असेल. जांभळा हा राजेशाही रंग आहे. मसीहा जे त्याजवर विश्वास ठेवतात त्यांच्या अंत:करणात त्याचे आध्यात्मिक राज्य स्थापन करेल. नंतर, तो पृथ्वीवर त्याचे भौतिक राज्य स्थापन करेल.

ज्याप्रमाणे जांभळा हा निळा आणि लाल रंगाच्या मधील मध्यस्थ रंग आहे, त्याप्रमाणेच मसीहा देव आणि मनुष्याच्या मध्ये मध्यस्थी करण्यास येईल.

> *"कारण एकच देव आणि **देव व मानव ह्यांच्यामध्ये** ख्रिस्त येशू हा मनुष्य **एकच मध्यस्थ** आहे. त्याने सर्वांसाठी मुक्तीचे मोल म्हणून स्वतःला दिले ह्याची साक्ष यथाकाळी द्यायची आहे."* (१ तीमथ्य. २:५-६)

### तेजस्वी ढग

निवासमंडप बनून तयार झाल्यावर आणि सर्वकाही देवाच्या योजनेनुसार त्यामध्ये ठेवले गेल्यावर, त्याने स्वर्गाच्या सिंहासनावरून एका वैभवशाली ढगात असलेल्या त्याच्या गौरवी उपस्थितीला खाली पाठवले.



> *"मग दर्शनमंडपावर मेघाने छाया केली व **निवासमंडप परमेश्वराच्या तेजाने भरून गेला**. दर्शनमंडपावर मेघ राहिला आणि परमेश्वराच्या तेजाने निवासमंडप भरून गेला म्हणून मोशेला आत प्रवेश करता येईना."* (निर्गम ४०:३४-३५)

परमेश्वराने कोशाच्या कराराच्या दयासनावर दोन करुबाच्या मध्ये

परमपवित्र स्थानावर त्याच्या उपस्थितीचा तेजस्वी प्रकाश ठेवला.

देव त्याच्या लोकांजवळ राहण्यासाठी दृश्य मार्गाने आला होता.

*"परमेश्वर राज्य करतो; लोक कंपित होवोत; तो करुबांवर **अधिष्ठित** आहे; पृथ्वी थरथर कापो."* (स्तोत्र. ९९:१)

त्याची महिमा परमपवित्र स्थानात ठेवण्याने आणि त्याच्या ढगाला निवासमंडपावर ठेवण्याने, निर्माणकर्ता जगाच्या राष्ट्रांना आणि अजून जन्म घेणाऱ्या पीढीला एक सर्वात महत्वाचा धडा शिकवत होता : एकच सत्य परमेश्वर पाप्यांना आमंत्रित करतो की त्याच्यासोबत नातेसंबंधात असावे, परंतु केवळ काही विशिष्ट परिस्थितीत.

## दृश्य उदाहरणे

ते ज्यांना देवाबद्दल आणि त्याच्या लोकांसाठी त्याच्या योजनेबद्दल जाणावयाचे होते त्यांच्यासाठी निवासमंडपाने असंख्य दृश्य मदत प्रदान केली.

या दृश्याचे चित्रण करा.

देवाच्या नेमक्या सुचनेनुसार, हे मुक्ती पावलेले गुलामांचे राष्ट्र-इस्राएलाचे बारा वंश- यांनी वधस्तंभाच्या आकारात क्रमवार रचनेमध्ये सीनाय पर्वताच्या पायथ्याशी त्यांचे तंबू लावले होते. निवासमंडप मध्यभागी होता, तीन वंशांनी त्यांचे तंबू दक्षिणेला, तीन वंशांनी उत्तरेला, तीन वंशांनी पश्चिमेला, आणि तीन वंशांनी पूर्वेला त्यांचे तंबू लावले होते.[१९८] प्रज्वलित तेजस्वी ढग डोक्यावर फिरत असे, एकच सत्य देव त्यांच्या मध्ये होता हे कोणी नाकारू शकत नव्हता.

इतर दृश्य धडे या वास्तविकतेपासून शिकले जाऊ शकतात की निवासमंडप-तंबू फक्त एकच दरवाजासह उंच पांढऱ्या तलम कापडाच्या भिंतीने घेरलेला असे. दाराच्या आत एक वेदी होती. पाप्यांना देवाच्या गौरवापासून दूर ठेवले होते जोपर्यंत ते प्रतिकात्मकदृष्टया परिपूर्ण अर्पणाच्या वाहिलेल्या रक्ताच्या आधारावर त्याच्याजवळ येत नाहीत.

*"शरीराचे जीवन तर रक्तात असते आणि तुमच्या जीवांबद्दल वेदीवर प्रायश्चित्त करण्यासाठी ते मी तुम्हांला दिले आहे; **कारण रक्तात जीवन असल्याकारणाने रक्तानेच प्रायश्चित्त होते**."* (लेवीय १७:११)

मृत्यूच्या भरपाईवाचून येथे पापाची क्षमा होऊ शकत नाही. आणि कारण प्रत्येक वेळी जेव्हा लोक पाप करत तेव्हा त्यांच्यासाठी निवासमंडपाजवळ एक अर्पण आणणे अशक्य होते,

म्हणून देवाने सकाळी आणि संध्याकाळी वर्षाच्या प्रत्येक दिवशी वेदीवर एक कोकरा मारण्याची आणि जाळण्याची आज्ञा दिली. ते सर्व जे परमेश्वर आणि त्याच्या योजनेवर विश्वास ठेवतात ते या दररोजच्या अर्पणांचा, त्यांच्या निर्माणकर्त्याबरोबर पुन:स्थापित नातेसंबंधाच्या लाभाचा आनंद घेऊ शकतात.

> *''वेदीवर होम करायचा तो असा :* ***प्रतिदिनी*** *एकेक वर्षाच्या दोन कोकरांचा नित्य होम करावा. एक* ***कोकरू*** *सकाळी अर्पावे आणि दुसरे* ***कोकरू*** *संध्याकाळी अर्पावे..... दर्शनमंडपाच्या दाराशी परमेश्वरासमोर तुम्ही पिढयानपिढया असेच* ***होमार्पण नित्य अर्पावे, ह्या स्थळी मी इस्राएल लोकांना भेट देईन*** *आणि माझ्या तेजाने मंडप पवित्र होईल.''* (निर्गम २९:३८-३९, ४२)

## प्रायश्चित्ताचा दिवस

या सत्याला आणखी उदाहरणासह स्पष्ट करण्यासाठी, देवाने त्याच्या लोकांना सांगितले की येथे केवळ एकच प्रकार आहे ज्याद्वारे पापी परमपवित्र स्थानात (विशेष खोली जी खुद्द स्वर्गाचे प्रतिक आहे) प्रवेश करू शकतात. वर्षातून एके दिवशी, एक विशेष निवडलेला माणूस, ज्यास मुख्य याजक म्हणतात, त्याला त्या आतील पवित्र स्थानात प्रवेश करू दिला जाईल. प्रायश्चीत्ताच्या दिवशी[१९९] मुख्य याजक अंतरपटाच्या आत जाईल. तो त्याच्याबरोबर अर्पण केलेल्या बकऱ्याचे रक्त घेईल आणि ते दयासनावर (कोशाच्या कराराचे झाकण) आणि त्याच्या समोर सात वेळा शिंपडेल. जर मुख्य याजकाने देवाच्या उपस्थितीत इतर कोणात्याही प्रकारे प्रवेश केला, तर तो मरण पावेल. शिंपडलेल्या रक्ताच्या आधारे, देवाने आणखी एका वर्षासाठी इस्राएली लोकांची पापे क्षमा करण्याचे अभिवचन दिले आहे, जर ते केवळ त्याजवर आणि त्याच्या तरतुदीवर विश्वास ठेवतील.

निवासमंडपाचा सर्व तपशील, त्याच्या वस्तू आणि कार्ये, दोषी पापी लोकांना त्यांच्या पापावर पांघरून घालावे आणि त्याच्या परिपूर्ण पवित्र निर्माणकर्त्यासह त्यांचे तुटलेले नातेसंबंध पुन:स्थापित केले जाऊ शकते याबद्दल जगाला ज्वलंत चित्र प्रसारित करण्यासाठी रचलेले आहे. हे सर्व येणाऱ्या मसीहा आणि त्याच्या मिशनकडे इशारा करते.

अशा प्रकारे, शतकानुशतके, त्याच्या निवडलेल्या राष्ट्राचे माध्यम म्हणून वापर करून, देवाने शेकडो चित्रे प्रसारित केली आणि पापात भटकलेल्या जगाला पुष्कळ अद्भुत अभिवचने कळवली.

## मंदिर आणि त्याची अर्पणे

पाचशे वर्षानंतर मोशे आणि इस्राएली लोकांनी परमेश्वराच्या उपस्थितीचे घर म्हणून हा विशेष तंबू बनवला, ठिकाणे बदलणाऱ्या निवासमंडपाला एक अधिकतर स्थायी मंदिर म्हणून बदलण्यासाठी देवाने शलमोन राजाला निर्देश दिला. यरुशलेममधील या नवीन रचनेचा आराखडा हा त्या निवासमंडपासारखाच आहे, जरी तो जास्त मोठा होता आणि त्याहूनही अधिक सुंदर होता. शलमोनाचे मंदिर हे प्राचीन जगातील स्थापत्यशास्त्रातील आश्चर्यांपैकी एक होते.

निवासमंडपाच्या उदघाटन समारोहाच्या दिवशी ज्याप्रमाणे परमपवित्र स्थानात भरून जाण्यासाठी स्वर्गातून देवाचे तेज खाली उतरले होते, त्याप्रमाणेच देवाच्या उपस्थितीचा गौरवी, अनिर्मित प्रकाश खाली आला आणि मंदिराला भरून टाकले.

> *"शलमोनाने प्रार्थना करणे संपवल्यावर स्वर्गातून अग्नीने येऊन होमबली व यज्ञबली भस्म केले; आणि* ***परमेश्वराच्या तेजाने ते मंदिर भरून गेले****. याजकांना परमेश्वराच्या मंदिरात जाता येईना, कारण परमेश्वराच्या तेजाने ते भरून गेले होते."*
> (२ इतिहास ७:१-२)

मंदिर त्याच पर्वतरांगांवर बांधले गेले जेथे, एक हजार वर्षांपूर्वी, अब्राहामाने त्याच्या पुत्राच्या ऐवजी एक एडका अर्पण केला होता.[२००] या विशेष मंदिराला देवाला समर्पित करण्यासाठी, शलमोन राजाने १,२०, ००० मेंढरे आणि २२, ००० बैलांना अर्पण करण्याची आज्ञा दिली.[२०१] जवळच्या टेकडीवर सहस्राब्दी नंतर वाहिलेल्या मौल्यवान रक्ताच्या अगणित मुल्याच्या अवास्तव खर्चाचे हे प्रतिक आहे.

अशा प्रकारे, आदाम, हाबेल, अब्राहाम, मोशे, दावीद, शलमोन आणि पुढे बरेच, लाखो रक्त अर्पणांचे प्रतिक वेदीवर अर्पण केली गेली की पापाला पांघरून घालावे, वर्षानुवर्षे, कंटाळवाण्या वर्षांमध्ये....

मग ख्रिस्त आला.



# धडा २२

## कोकरा

*"देव प्रीती आहे."* (१योहान ४:८)

*"देव महान आहे."* (ईयोब ३६:२६)

**दे**व जो **प्रीती** आहे तो त्याच्या लोकांसोबत घनिष्ठ संबंधाची अपेक्षा करतो. देवाच्या सामाजिक-संबंधात्मक स्वरूपाचा विषय त्याच्या पुस्तकाच्या पहिल्या धडयात प्रकट केलेला आहे.

देवाने आदाम व हव्वेला *"त्याच्या प्रतिमेत"* निर्माण केले जेणेकरून तो त्यांच्यासोबत संगतीचा आनंद घेऊ शकेल (उत्पत्ती १:२७). हा तोच *"परमेश्वर आपल्याबरोबर"* विषय[२०२] बायबलच्या शेवटच्या अध्यायापर्यंत घेऊन गेला आहे, जेव्हा त्याचे मुक्त केलेले लोक *"त्याचे मुख पाहतील"* आणि त्याच्याबरोबर सदैव राहतील (प्रकटीकरण २२:४). जो कोणी हे पाहण्यात चुकतो त्याने देवाच्या पुस्तकाच्या मुख्य विषयाला गमावले आहे.

परमेश्वर **महान** आहे आणि त्याला जे काही करायचे आहे ते तो करू शकतो.

> *"पाहा, मी परमेश्वर सर्व मानवजातीचा देव आहे; मला अवघड असे काही आहे काय?"* (यिर्मया ३२:२७)

कोणताही प्रामाणिक एकेश्वरवादी हा दावा करू शकतो की देवाची इच्छा असली तरी तो माणूस होऊ शकत नाही. येथे काहीतरी आहे काय जे सर्वशक्तिमान करू शकत नाही (स्वतःच्या विरोधात जाण्यास सोडून), मग तो देवापेक्षा कमी असेल.

प्रश्न हा नाही : देव मनुष्य होऊ शकतो का?

प्रश्न हा आहे : देवाने मनुष्य होण्याचे निवडले का?

## देवाचा खरा निवासमंडप

देवाने इस्राएली लोकांना एक अद्वितीय निवासमंडप-तंबू बनवावा" *म्हणजे तो* "त्यांच्या मध्य निवास" करू शकेल ही आज्ञा दिल्याच्या पंधराशे वर्षांनंतर, पवित्र शास्त्र घोषित करते :

> *"प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता....शब्द देही झाला व त्याने **आमच्यामध्ये वस्ती केली**, आणि आम्ही **त्याचे गौरव** पाहिले, तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता."* (योहान १:१, १४)

*"आमच्यामध्ये वस्ती केली"* हे वाक्य जे अनुवादित केले आहे ते एका ग्रीक शब्दापासून येते ज्याचा अर्थ एक तंबू किंवा निवासमंडप तयार करावा. त्याचे शब्दशः भाषांतर असे केले जाऊ शकते : त्याने त्याचा तंबू आमच्या मध्ये मांडला. पवित्र शास्त्र एका व्यक्तीचे शरीर एक तंबू किंवा मंदिर म्हणून वर्णन करते ज्यामध्ये त्याचा किंवा तिचा प्राण आणि आत्मा निवास करतो.[२०३] जसे आपण धडा १६ मध्ये शिकलो आहोत, देवाचा सार्वकालिक पुत्र एक लहान बाळ म्हणून जन्मला. त्याचे मानवी शरीर हे तंबू होते ज्यामध्ये त्याने निवास करण्याचे निवडले.

मोशेच्या काळात, निवासमंडपाची रचना ज्यामध्ये देवाने त्याच्या उपस्थितीचा गौरवी, अनिर्मित प्रकाश ठेवला होता त्यास प्राण्याच्या त्वचेने झाकलेले होते. परंतु येशूच्या व्यक्तित्वात, देवाचा गौरवी, अनिर्मित प्रकाश आणि उपस्थिती मानवी त्वचेत निवास करण्यासाठी आले होते. अशा प्रकारे, त्याचे शिष्य हे म्हणून शकले, *"आम्ही त्याचे गौरव पाहिले, फक्त एकाचे गौरव जो पित्यापासून आला!"*

पवित्र शास्त्र घोषित करते की येशू *"तो पवित्रस्थानाचा म्हणजे माणसाने नव्हे तर प्रभूने घातलेल्या **खऱ्या मंडपाचा** सेवक आहे."* (इब्री. ८:२)

जुन्या कराराच्या काळात, निवासमंडप, आणि नंतर मंदिर, हे एक ठिकाण होते जेथे पापी व्यक्ती त्यांच्या पापावर पांघरून घालण्यासाठी पशू अर्पण सादर करू शकत होते. जेव्हा येशू एक मुलगा होता आणि जेव्हा तो प्रौढ झाला, तेव्हा त्याने अनेक प्रसंगी यरुशलेमेतील मंदिराला भेट दिली होती, परंतु पापासाठी त्याने बलिदान अर्पण केले असे आपण कधीही वाचले नाही. का नाही? त्याच्यात पाप नव्हते. येशू *"एकदाच युगाच्या समाप्तीस **आत्मयज्ञ** करून पापे नाहीशी करण्यासाठी प्रकट झाला"* (इब्री. ९:२६). तो ते अर्पण झाला आणि रोमी वधस्तंभ ही वेदी झाली.

येशू प्रतीकामागील सत्यता होता.

*"**देव देहाने** प्रकट झाला."* (१तीमथ्य. ३:१६)

एका प्रसंगी, येशू यरुशलेमेत महान मंदिराजवळ उभा होता आणि मनुष्यांच्या गटाला तो म्हणाला :

*"तुम्ही हे मंदिर मोडून टाका आणि मी तीन दिवसांत ते उभारीन.' ह्यावरून यहूदी म्हणाले, 'हे मंदिर बांधण्यास शेहेचाळीस वर्षे लागली आणि तुम्ही हे तीन दिवसांत उभारणार काय? **तो तर आपल्या शरीररुपी मंदिराविषयी बोलला होता**. म्हणून तो असे म्हणत असे हे तो मेलेल्यांतून उठल्यावर त्याच्या शिष्यांना आठवले, आणि त्यांनी शास्त्रावर व येशूने जे वचन सांगितले होते त्यावर विश्वास ठेवला."* (योहान २:१९-२२)

यहूदी हे समजू शकले नाही की *"मंदिर"* ज्याविषयी येशू बोलला हे त्याचे शरीर होते. त्यांनी विचार केला की तो यरुशलेमेतील भव्य मंदिराविषयी बोलत आहे. परंतु मनुष्य-निर्मित त्या मंदिराच्या परमपवित्र स्थानात आता देवाच्या उपस्थितीचा प्रकाश आणि गौरव नव्हते.

आता ते येशूच्या शरीराच्या *"मंदिरात"* होते.

पृथ्वीवरील त्याच्या सेवाकार्याच्या शेवटास, येशूने त्याच्या तीन शिष्यांना देवाचा दिव्य प्रकाश आणि गौरवाचे साक्षीदार होऊ दिले.

*"मग सहा दिवसांनंतर येशूने पेत्र, याकोब व त्याचा भाऊ योहान ह्यांना आपल्याबरोबर एका उंच डोंगरावर एकांती नेले. तेव्हा त्याचे रूप त्यांच्यादेखत पालटले; **त्याचे मुख सूर्यासारखे तेजस्वी झाले आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र झाली**. तेव्हा पाहा, मोशे व एलीया हे त्याच्याबरोबर संभाषण करत असलेले त्यांच्या दृष्टीस पडले. मग पेत्र येशूला म्हणाला, 'प्रभूजी, आपण येथे असावे हे आपल्याला बरे आहे. आपली इच्छा असली तर मी येथे तीन मंडप करतो; आपणासाठी एक, मोशेसाठी एक आणि एलीयासाठी एक.' तो बोलत आहे इतक्यात, पाहा, तेजस्वी मेघाने त्यांच्यावर छाया केली; आणि पाहा, मेघातून अशी वाणी झाली की, '**हा माझा 'पुत्र, मला परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे', ह्याचे तुम्ही ऐका**."* (मत्तय १७:१-५)

देवाच्या प्रज्वलित, तेजस्वी शुद्ध प्रकाशामुळे स्वर्गातील देवदूतांना त्यांची मुखे झाकावी लागत असे ते येशूमध्ये होते.

परमेश्वराची तीच तेजस्वी उपस्थिती जी निवासमंडप आणि मंदिराच्या परम पवित्र स्थानात

राहत असे ती प्रभू येशूमध्ये निवास करत होती.

चमकदार मेघ जो मागे निवासमंडपावर दिसला होता तो आता जेथे येशू उभा होता त्या



ठिकाणी दिसत होता.

येशू पृथ्वीवर देवाची दृश्य उपस्थिती होता.

देवाच्या पुत्राच्या गौरवी प्रज्वलित प्रकाशासोबत स्वर्गातून पिता बोलत होता :

*'हा **माझा 'पुत्र, मला परमप्रिय आहे**, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे', **ह्याचे तुम्ही ऐका."***

देव याबद्दल गंभीर आहे.

देवाचा पुत्र मनुष्याचा पुत्र होण्याच्या एक हजार वर्षांपूर्वी, दावीद संदेष्ट्याने लिहिले, *"पुत्राने रागावू नये आणि तुम्ही वाटेने नाश पावू नये, म्हणून* **त्याचे चुंबन घ्या;** *कारण त्याचा क्रोध त्वरित पेटेल; त्याला शरण जाणारे सगळे धन्य होत."* (स्तोत्र. २:१२)

*"पुत्राचे चुंबन घ्या,"* म्हणजे **पुत्राचा सन्मान करा**.

वेळोवेळी, मी लोकांना धार्मिक नेते, जे त्यांच्यासारखेच असहाय्य पापी व्यक्ती आहेत, त्यांच्या डोक्याचे आणि हाताचे चुंबन घेताना पाहतो, मी पाहतो ते भक्तगण त्या व्यक्तींना, ज्यांचे शरीर मातीत परत मिळाले आहे, त्यांचा सन्मान करण्यासाठी धार्मिक यात्रा करतात.

त्यादरम्यान, देवाने जगाला घोषित केले की ***"जसा पित्याचा सन्मान करतात तसा पुत्राचाही सन्मान सर्वांनी करावा.*** *जो पुत्राचा सन्मान करत नाही तो, ज्याने मला पाठवले, त्या पित्याचा सन्मान करत नाही....कारण पिता पुत्रावर प्रीती करतो..."* (योहान ५:२३, २०)

## अग्रदूत

यशया हा संदेष्टयांपैकी दुसरा संदेष्टा होता ज्याने विशेषकरून निवडलेल्या वारसा बद्दल लिहिले होते जो *"परमेश्वराचा मार्ग तयार करतो"* (यशया ४०:३). तो अग्रदूत हा संदेष्टा योहान, जखऱ्याचा पुत्र होता.[२०४] तर पूर्वीच्या संदेष्टयांनी भविष्य केले होते, *"देव ख्रिस्ताला जगात पाठवेल,"* योहान संदेष्टयाला *"अभिवचन असलेला ख्रिस्त, प्रभू, हा येथे आहे!"* ही घोषणा करण्याचा निराळाच सन्मान होता.

> *"त्या दिवसांत बाप्तिस्मा करणारा योहान यहूदीयाच्या रानात येऊन अशी घोषणा करू लागला की, **'पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.'** त्याच्याचविषयी यशया संदेष्टयाच्या द्वारे सांगितले होते की, 'अरण्यात घोषणा करणाऱ्याची वाणी झाली की : **'परमेश्वराचा मार्ग सिद्ध करा;** त्याच्या वाटा नीट करा."* (मत्तय ३:१-३)

## पश्चात्ताप

प्रभूच्या आगमनासाठी लोकांना तयार करण्यासाठी, लोकांसाठी योहानाचा संदेश साधा होता.

**पश्चात्ताप!"**

पश्चात्ताप शब्द मेटानोईया या ग्रीक शब्दापासून येतो. त्यास दोन भाग आहेत : मेटा आणि नोईया. पहिल्या भागाचा अर्थ हालचाल किंवा बदल. दुसरा भाग मनाच्या विचारांना संबोधतो. म्हणूनच पश्चातापाचा मूळ अर्थ हा मनाचा बदल असणे आहे; तुमच्या चुकीच्या विचारांना योग्य विचारांनी बदला.

शब्द पश्चातापाला दररोजच्या संदर्भात ठेवण्यासाठी, समजा मला बसने एका शहरापासून दुसऱ्या शहरापर्यंत प्रवास करायचा आहे, कदाचित बैरुत पासून अम्मान पर्यंत. मी एका बसमध्ये

चढतो जी मला वाटते की योग्य बस आहे आणि झोप घेण्यासाठी माझ्या जागेवर जाऊन बसतो. काही वेळानंतर, जेव्हा बस महामार्गावर वेगाने धावत आहे, मला कळते की ती दक्षिणेला अम्मानकडे जात नाही, पण उत्तरेला इस्तानबुलला चालली आहे! मी काय केले पाहिजे?

माझ्याजवळ दोन निवडी आहेत :

माझी चूक कबूल करण्यात फारच अभिमानी राहून, मी त्याच बसमध्ये बसून राहीन आणि चुकीच्या गंतव्य ठिकाणी जाईन.

किंवा मी माझ्या स्वतःला नम्र करेन आणि पश्चात्ताप करेन, म्हणजे, माझे मन बदलेल, मी चुकीची बस निवडली हे कबूल करेन. माझ्या पश्चातापाची प्रामाणिकता उघड असेल जेव्हा मी पुढील थांब्यावर उतरेन आणि योग्य बस मध्ये चढेन.

खरा पश्चात्ताप व्यक्तीला चुकीपासून बदलण्याकडे आणि सत्यामध्ये विश्वास ठेवण्याकडे नेतो.

पश्चात्ताप हा नाण्याच्या एका बाजूशी तुलना केला जाऊ शकतो.

एक बाजू म्हणते : **पश्चात्ताप कर!**

दुसरी बाजू म्हणते : **विश्वास ठेव!**

देवाला कशाची आवश्यकता आहे हे ह्या दोन बाजू दाखवतात:

> *"**पश्चात्ताप** करून देवाकडे वळणे व आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावर **विश्वास** ठेवणे....."* (प्रेषित. २०:२१)

पश्चात्तापाचा अर्थ तारणासाठी तुम्ही कशावर विश्वास ठेवत आहात त्याबद्दल मनाचा बदल होणे. विश्वास म्हणजे तारणासाठी देवाच्या तरतुदीवर भरवसा ठेवणे.

पश्चात्तापावाचून खरा विश्वास नाही.

त्यानुसार, योहान संदेष्टयाचा संदेश काही अशा प्रकारे होता : *"तुमच्या चुकीच्या विचारांपासून पश्चात्ताप करा! तुम्ही स्वतःचे तारण करू शकत नाही हे कबूल करा, आणि स्वर्गाहून अभिवचन दिलेल्या ख्रिस्त-राजाचे स्वागत करा! तो तुम्हांला सैतान, पाप आणि मृत्यूपासून सोडवण्यासाठी आला आहे- जर तुम्ही तुमच्या स्वतःमध्येच विश्वास ठेवणे थांबवाल आणि त्याजवर विश्वास ठेवण्यास सुरुवात कराल!"*

ज्यांनी देवासमोर त्यांच्या पापी अवस्थेला स्वीकारले त्यांना योहानाने पाण्याने बाप्तिस्मा दिला. म्हणूनच योहान हा बाप्तिस्मा करणारा योहान झाला. पाण्याने बाप्तिस्मा होण्याने पापे धुतली जाऊ शकत नाही आणि शकणार नाहीत. पाण्यात बुडणे हा लोकांसाठी एक मार्ग होता की बाह्यरित्या व्यक्त करण्याचा मार्ग होता की त्यांनी ख्रिस्ताविषयी देवाचा संदेश आंतरिकरित्या

स्वीकारला आहे, जो पश्चात्तापी, विश्वास ठेवणाऱ्या पापी लोकांना त्यांच्या दूषित अवस्थेपासून शुद्ध करण्यासाठी येत आहे.

## निवडलेला एकच

पृथ्वीवरील त्याच्या सेवाकार्याच्या सुरुवातीला, यार्देन नदीत बाप्तिस्मा करून घेण्यासाठी **येशू** योहानाकडे आला. निष्पाप ख्रिस्ताला कशापासूनही पश्चात्ताप करण्याची आवश्यकता नव्हती, परंतु बाप्तिस्मा करून घेतल्याने त्याने स्वतःला पतित मानवजाती ज्यांना सोडवण्यासाठी आला होता त्यांच्यासह समान केले होते.

येशूचा बाप्तिस्मा झाल्यावर काय घडले ते दृश्य कधीही विसरले जाणार नाही. एकच सत्य देव त्याच्या जटील एकता आणि वैभवाची आणखी एक झलक ते आपल्याला देते.

> *"मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लगेच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले, तेव्हा त्याने **परमेश्वराचा आत्मा** कबुतरासारखा उतरताना व आपणावर येताना पाहिला, आणि पाहा, **आकाशातून अशी वाणी झाली** की, 'हा माझा पुत्र, मला 'परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.'"* (मत्तय ३:१६-१७)

जसे सृष्टी निर्मितीच्या पहिल्या दिवसाची कथा पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याची उपस्थिती प्रकट करते. तथापि, इतिहासातील या मुख्य क्षणी, देव मोठया स्पष्टतेसह त्याची अनेकवचनी एकता प्रकट करत होता. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासात, हे विशेष ठिकाणातील एक आहे, जेथे प्रत्येक प्रवाशाला थांबणे, काही फोटो घेणे आणि त्यावर मनन करण्याची आवश्यकता आहे.

येथे एक दृश्य आहे. नाट्यमय आणि तेजस्वी आकाशाच्या खाली, **देवाचा पुत्र** (शब्द ज्या द्वारे स्वर्ग आणि पृथ्वी ही निर्माण करण्यात आली) पाण्यातून वर चालत आला. त्याच क्षणी, **देवाचा आत्मा** (सृष्टी निर्माण करण्याच्या पहिल्या दिवशी पाण्याच्या पृष्ठभागावर तळपणारा आत्मा) स्वर्गातून खाली उतरतो, घिरटया मारतो आणि येशूवर कबुतरासारखा स्थिर होतो. आणि शेवटी, **देव पित्याची** वाणी आकाशातून प्रतीध्विनीत होते : 'हा माझा पुत्र, मला 'परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे."

मागील तीस वर्षांपासून, येशू नासरेथच्या साधारण शहरात एका गरीब कुटुंबात अज्ञात असे राहत होता. जरी तो लोकांच्या दृष्टीच्या आड होता, तरी त्या सर्व वर्षांमध्ये स्वर्गातील पित्याची दृष्टी त्याजवर होती. आणि आता येशूच्या जीवनावर देवाचा आदेश ऐकतो : **"ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे."**

जन्म घेतलेल्या इतर कोणाबद्दल देव कधीही असे म्हणू शकला नाही. फक्त येशूने प्रत्येक बाबतीत त्यास प्रसन्न केले होते-आंतरिकरित्या आणि बाह्यरित्या. स्वर्गातील पुत्र म्हणून, तो पवित्र, निर्मळ आणि तो जे करण्यासाठी आला होता ते करण्यासाठी पात्र होता. तो ख्रिस्त होता, एकमेव अभिषिक्त, देवाचा निवडलेला एकच. देवाने त्यास अभिषेक केला, तेलाने नव्हे (जसे याजक आणि राजाला करण्यात येत असे[२०५]), परंतु स्वयं पवित्र आत्म्याने.

*" नासोरी **येशूला देवाने पवित्र आत्म्याचा** व सामर्थ्याचा अभिषेक केला...."* (प्रेषित. १०:३८)

येशू हा तो एकच होता ज्याविषयी सर्व संदेष्टयांनी लिहिले होते.

## देवाचा कोकरा

*"दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून तो म्हणाला, **'हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा**!"* (योहान १:२९)

योहान संदेष्टयाची घोषणा अर्थपूर्ण होती.

• *"हा पाहा, ....***देवाचा कोकरा***!"*

येशूचे प्रेक्षक काही अंशापर्यंत कोकऱ्याचा अर्थ समजले. जेव्हापासून पापाचा प्रवेश झाला होता, तेव्हापासून लोक पापार्पण म्हणून कोकरा आणत होते. पंधराशे शतकाच्या मोठया कालावधीत, पितळेच्या वेदीवर सकाळ आणि संध्याकाळी कोकरे अर्पण केले जात होते. आणि आता देवाचा स्वतःचा कोकरा दृश्यात होता! दोन सहस्त्राब्दीपूर्वी, अब्राहामाने त्याच्या मुलाला म्हटले होते, *"देव स्वतः होमार्पणासाठी* **कोकरू** *पाहून देईल"* (उत्पत्ती २२:८). देवाने वास्तवात अब्राहामाच्या पुत्राच्या ऐवजी मरण्यासाठी पर्यायाची तरतूद केली होती, परंतु तो *"कोकरा"* नव्हता. तो एक *"एडका"* होता (उत्पत्ती २२:१३). अब्राहामाच्या भविष्यवाणीतील कोकरा हा स्वयं मसीहाविषयी होता. अब्राहाम येशू ख्रिस्ताकडे इशारा करत होता. म्हणूनच येशू म्हणाला, *"अब्राहाम माझा दिवस पाहण्यासाठी उल्लसित झाला; तो त्याने पाहिला व त्याला हर्ष झाला."* (योहान ८:५६)

• **"........***जगाचे पाप* ***हरण करणारा...."***

आदामाच्या काळापासून, निष्पाप प्राण्याच्या रक्ताने त्यांची पापे प्रतीकात्मकरित्या झाकली होती ज्यांनी देवावर आणि त्याच्या योजनेवर विश्वास ठेवला होता, परंतु

येशू जे करण्यासाठी आला होता ते भिन्न होते. तो पापाची शिक्षा, कायमची काढून टाकणार होता.

- *''...... **जगाची**......''*

भूतकाळात, पापासाठी रक्त अर्पण हे एक व्यक्ती, एक कुटुंब किंवा एका राष्ट्राच्या वतीने अर्पण केले जात होते. परंतु येशूचे रक्त भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यातील पापाच्या ऋणासाठी पूर्ण आणि अंतिम भरपाईची तरतूद करेल.

देवाचा कोकरा जगाचे पाप हरण करतो याचा अर्थ हा आहे का की जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला देवाने आपोआप क्षमा केली आहे? नाही. ज्या दिवसापासून पापाने मानवजातीमध्ये प्रवेश केला तेव्हापासून देवावर आणि त्याच्या तरतुदीवर वैयक्तिक विश्वासाची नेहमीच आवश्यकता आहे.[२०६]

*''जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही. परंतु **जितक्यांनी त्याचा स्वीकार केला** तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर **विश्वास ठेवणाऱ्यांना** त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.''* (योहान १:११-१२)

## छाया आणि चिन्हे



गेलेल्या वर्षांमध्ये, पापासाठी प्रत्येक निष्पाप, निष्कलंक कोकरा *''येणाऱ्या चांगल्या गोष्टींची छाया''* होती. (इब्री. १०:१)

छायेला छाया देणाऱ्या वस्तूशी संभ्रमित होऊ नये. जेव्हा एक मित्र तुमच्या दिशेने येत आहे तेव्हा जर तुम्ही खाली जमिनीवर पाहत असाल, तर त्याला पाहण्याआधी तुम्ही त्याची छाया पाहता, परंतु एकदा की तो तुमच्यासमोर उभा आहे, मग त्याच्या छाये ऐवजी तुम्ही तुमच्या मित्राकडे पाहणार नाही का आणि त्याच्याशी बोलणार नाही का?

जुन्या करारातील अर्पणे ही देवाने-रचलेल्या छाया होत्या ज्यांनी येणाऱ्या मसीहाची रूपरेषा आणि घोषणा केली. आपण त्याच्याकडे पाहावे आणि त्याचे ऐकावे अशी देवाची इच्छा आहे.

*"कारण बैलांचे व बकऱ्यांचे रक्त पापे दूर करण्यास* ***असमर्थ*** *आहे. म्हणून* ***तो*** *जगात येतेवेळेस म्हणाला, 'यज्ञ व अन्नार्पण ह्यांची तुला इच्छा नव्हती,* ***तू माझ्यासाठी शरीर तयार केलेस****; होमांनी व पापाबद्दलच्या अर्पणांनी तुला संतोष नव्हता. ह्यावरून* ***मी*** *म्हणालो, हे देवा, ग्रंथपटात माझ्याविषयी लिहून ठेवले आहे, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी मी* ***आलो आहे****.....मग तो म्हणाला, 'हे देवा, पाहा, मी तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यास आलो आहे,' ह्यात दुसरे स्थापण्यासाठी तो पहिले नाहीसे करतो. त्या इच्छेने आपण येशू ख्रिस्ताच्या* ***एकदाच*** *झालेल्या देहार्पणाद्वारे पवित्र केलेले आहोत."*
(इब्री. १०; ४-७; ९-१०)

प्राण्याची-रक्त अर्पणे ही देवाला अंतिमतः कशाची आवश्यकता आहे त्याची ती केवळ चिन्हे होती. प्राण्यांना देवाच्या प्रतीरूपात निर्माण केलेले नाही. एका कोकऱ्याचे मूल्य हे एका माणसाच्या मूल्यासमान नाही. ज्याप्रमाणे तुम्ही एखाद्या कारचे खेळणे वितरकाकडे नेत नाही आणि त्यास एका खऱ्या कार साठी किंमत म्हणून देत नाही, त्याप्रमाणेच एका कोकऱ्याचे रक्त माणसाच्या पापाचे ऋण भरू शकले नाही. एक समान किंवा महान मूल्याच्या अर्पणाची अवश्यकता होती.

येशू जो देवाचा कोकरा त्या अर्पणाची तरतूद करण्यास आला.

## एक खराब योजनाकार?

काही वर्षांपूर्वी, मी एका तत्वज्ञानी डॉक्टरशी संवाद साधला. येशू *"जगाचे पाप हरण करण्यास आला"* या घोषणेच्या उत्तरात, त्याने लिहिले :

> पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद
>
> देवाने फक्त २००० वर्षांपूर्वी हा उखाणा रचायचे ठरविण्यापूर्वी जे लोक जन्मले आणि मरण पावले त्यांचे काय झाले? असे दिसते की ख्रिस्ती देव हा एक खराब योजनाकार आहे आणि उशिरा विचार करणारा आहे कारण मानवजातीच्या 'पापांना" क्षमा करण्याचा मार्ग शोधण्यासाठी त्यास लाखो नाही तर हजारो वर्षे लागली.

असे दिसते की हा माणूस, जो निधन पावला होता, जो कोकऱ्यांची लाखो अर्पणे आणि शेकडो भविष्यवाण्यांमागील अर्थ समजण्यास चुकला होता जे त्या दिवसाकडे इशारा करत होते जेव्हा मसीहा मानवजातीच्या-भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यातील पापांसाठी शिक्षा भोगणार होता. सुरुवातीपासून, देवाच्या सुटका करण्याच्या योजनेत *"**पूर्वी** झालेल्या पापांची*

*देवाच्या सहनशीलतेने उपेक्षा झाल्यामुळे त्याने आपले नीतिमत्व व्यक्त करावे"* हे समाविष्ट होते. (रोम. ३:२५-२६)

देवाने ख्रिस्ताच्या काळापूर्वी पाप्यांना त्याच आधारावर क्षमा केली ज्यावर आधारित तो आज पाप्यांना क्षमा करतो- देवाचे अभिवचन आणि तरतुदीवरील विश्वासाद्वारे.

अर्थातच, येथे फरक होता.

विश्वासणारे जे येशू ख्रिस्ताच्या काळापूर्वी जगले होते त्यांची पापे झाकली गेली. येशूने त्याचे रक्त वाहिल्यानंतर आणि मृत्यूवर ताबा घेतल्यानंतरच पाप्यांचे ऋण नोंदवहीतून कायमचे रद्द केले जाऊ शकते.

देवाचा कोकरा येशू पृथ्वीवर येण्यापूर्वी, एक माणूस वेदीवर पशू बलिदान अर्पण करत असे हे जसे काही एखादा संघर्ष करत असलेला व्यवसायिक जो बँकेतून ऋण घेतो त्यासारखे होते.

एक संपन्न मित्र ऋणासाठी कागदपत्रांवर जोडीला स्वाक्षरी करण्यास सहमत होतो, जर व्यवसायिकाने उधार घेतलेल्या पैशाला परत केले नाही तर ऋण भरण्याचे वचन देतो. प्रत्येक निघून जाणाऱ्या वर्षानंतर, व्यवसायिक ऋण फेडण्यास चुकतो, ऋणात जास्त बुडत जातो. आणि प्रत्येक वर्षी त्याचा श्रीमंत मित्र संघर्ष करणाऱ्या माणसाचे ऋण भरून काढण्यासाठी बँकेत आणखी एक स्वाक्षरी देत राहतो. अपयशी व्यवसायिकास दिवाळखोर होण्यापासून आणि तुरुंगात टाकले जाण्यापासून कशाने जपले? त्याचे ऋण त्याच्या संपन्न, भरवशाच्या मित्राकडून हमीपत्राच्या चिठ्ठी देण्याने झाकले गेले.

जुन्या करारातील प्राण्याची अर्पणे ही पाप्यांच्या 'हमीपत्राच्या चिठ्ठया' होत्या, देवाकडून तात्पुरते स्वीकारले गेल्या होत्या. विश्वाची नोंद ठेवणारा, त्याचा कराराचा सन्मान करणे आणि त्याच्या पुस्तकास संतुलित करण्याचा ज्याचा अचूक इतिहास आहे, त्याने पापाला झाकण्यासाठी निष्कलंक-मुक्त प्राण्याचे रक्त स्वीकारण्याचे वचन दिले होते. परंतु प्राण्याचे रक्त माणसाच्या जमा झालेल्या पापाच्या ऋणाला रद्द करू शकले नाही. ते प्रत्येक वर्षी "**पापाचे स्मरण**" म्हणून केवळ ठरले. कारण बैलांचे व बकऱ्यांचे रक्त पापे दूर करण्यास असमर्थ आहे." (इब्री. १०:३-४)

पाप ही गंभीर समस्या आहे तिला केवळ देवाच्या सार्वकालिक पुत्राचे रक्त वाहण्याद्वारेच सोडवू शकतात. येशू, देवाचा कोकरा, मानवजातीच्या पापाचे ऋण फेडण्यासाठी आला.

लोक आणि संदेष्टयांच्या कालक्रमानुसार यादी या पुस्तकात संदर्भ दिले आहेत. बायबलमध्येच प्रत्यक्ष नांवे आणि इतरांच्या शेकडो कथांची नोंद केलेली आहे.

| | |
|---|---|
| आदाम व हव्वा | काळ सुरु होतो |
| काइन व हाबेल | |
| शेथ | |
| नोहा (जलप्रलय) | ख्रि.पू. २५०० |
| बाबेलचे लोक | |
| ईयोब | |
| अब्राहाम | ख्रि.पू. २५०० |
| इश्माएल | |
| इसहाक | |
| याकोब | |
| यहूदा | |
| योसेफ | |
| मोशे (निवासमंडप) | ख्रि.पू. १५०० |
| दावीद | ख्रि.पू. १००० |
| शलमोन (मंदिर) | |
| एलीया | |
| अलीशा | |
| योना | |
| अमोस | |
| होशेय | |
| यशया | ख्रि.पू. ७०० |
| मीखा | |
| यिर्मया | |
| हबक्कूक | |
| दानीएल | |
| यहेज्केल | |
| जखऱ्या | ख्रि.पू. ५०० |
| मलाखी | |
| जखऱ्या आणि अलीशिबा | |
| मरीया आणि योसेफ | |
| बाप्तिस्मा करणारा योहान | |
| येशू ख्रिस्त | इसवीसन सुरु होते |

**तुम्हांला काय वाटते?**

देव *"एक खराब योजनाकार आणि एक उशिरा विचार करणारा आहे का? किंवा योहान संदेष्टा आणि नासोरी येशूला ओळखण्यासाठी "**मसीहा** म्हणून....ज्याच्याविषयी नियमशास्त्रात मोशे, आणि तसेच संदेष्टयांनी लिहिले," आणि "**देवाचा कोकरा** जो जगाचे पाप हरण करतो त्याच्याविषयी त्याच्या अनुयायांकडे चांगले कारण आहे का?"* (योहान १)

आपला निर्माणकर्ता, उत्तम योजनाकार, याजकडे आपल्या पापाचे ऋण फेडण्यासाठी कधीही इतर कोणतीही योजना नव्हती. त्याच्या शाश्वत दृष्टीकोनावरून, त्याचा प्रिय पुत्र हा नेहमी होता, आहे आणि कायम राहील:

*"...जगाच्या स्थापनेपासून 'वधलेला **कोकरा**......."* (प्रकटीकरण १३:८)



# धडा २३

# शास्त्रलेख पूर्ण करणे

*"एक **वचन** हे एक मेघ आहे; **पूर्णता** हा पाऊस आहे."-अरबी म्हण*

**चार** हजार वर्षे संदेष्टयांनी देवाचे अभिवचन की पृथ्वीवर एक तारणारा पाठवणार याबद्दल सांगितले, *"परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, ....."* (गलती. ४:४)

देवाच्या संदेष्टयांनी अभिवचनाचे मेघ प्रदान केले.

नासरेथचा येशू हा देवाच्या पूर्णतेचा पाऊस होता.

निर्माणकर्त्याची योजना ही नंतर विचार केलेली नव्हती. ही *"देवाची सुवार्ता आहे, ह्याविषयी देवाने पवित्र शास्त्रात आपल्या **संदेष्टयांच्या द्वारे पूर्वीच वचन दिले होते.** ही सुवार्ता त्याचा पुत्र येशू ख्रिस्त आपला प्रभू ह्याच्याविषयी आहे...."* (रोम. १:२-३)

पवित्र शास्त्र हे मेघ आहेत; मसीहा हा पाऊस आहे.

### गाढवावर स्वार होऊन यरुशलेमेत प्रवेश

प्रभू येशूला त्याचे ध्येय माहित होते. पाचशे वर्षांपूर्वी, जखऱ्या संदेष्टयाने एका घटनेबद्दल लिहिले होते जी मसीहाच्या बलिदानपूर्वक मृत्यूपूर्वी घडेल.

> *"सीयोनकन्ये, जोराने आनंदाचा गजर कर; यरुशलेमकन्ये, गजर कर; **पाहा, तुझा राजा तुझ्याकडे येत आहे; तो न्यायी व त्याच्या ठायी तारण आहे; तो लीन आहे; गाढवावर, गाढवीच्या पिल्लावर म्हणजे शिंगरावर बसून येत आहे.**"* (जखऱ्या ९:९)

येशूने ही भविष्यवाणी पूर्ण केली. सर्व चारही शुभवर्तमानाची पुस्तके या घटनेची नोंद

करतात. मत्तय, स्वयं साक्षीदार आणि येशूचा शिष्य, त्याने लिहिले :

*"ते यरुशलेमेजवळ आले असता जैतुनाच्या डोंगरापाशी बेथफगे येथवर पोहचले तेव्हा येशूने दोघा शिष्यांना असे सांगून पाठवले की, 'तुम्ही समोरच्या गावात जा म्हणजे लगेच तेथे **बांधून ठेवलेली एक गाढवी व तिच्याजवळ शिंगरू** अशी तुम्हांला आढळतील; ती सोडून माझ्याकडे आणा. आणि कोणी तुम्हांला काही म्हटले, तर 'प्रभूला ह्यांची गरज आहे,' असे सांगा म्हणजे तो ती ताबडतोब पाठवील.' संदेष्टयांच्या द्वारे जे सांगितले **होते ते पूर्ण व्हावे म्हणून** हे झाले; ते असे की, 'सीयोनेच्या कन्येला सांगा, **पाहा, तुझा राजा तुझ्याकडे येत आहे; तो सौम्य आहे म्हणून तो गाढवावर, म्हणजे गाढवीच्या शिंगरावर बसलेला आहे**."*
(मत्तय २१:१-५)

अशा प्रकारे, येशूने राष्ट्राला त्यांचा राजा म्हणून स्वतःला अर्पण केले, पण अस्वीकार केला गेला-ज्याप्रमाणे संदेष्टयांनी भविष्य केले होते.[२०७]

येशूने गाढवावर बसून यरुशलेमेंत प्रवेश केल्यानंतर काय घडले याबद्दल शुभवर्तमान तपशीलवार नोंद करतात. तो मंदिरात गेला आणि पैसा कमावण्यासाठी शोषण करणाऱ्या सर्वांना हाकलून दिले. मग येशू त्या गांगरलेल्या विक्रेत्यांना म्हणाला, *"माझ्या घरास प्रार्थनामंदिर म्हणतील, असे लिहिले आहे; परंतु तुम्ही ते 'लुटारूंची गुहा' करत आहात. मग आंधळे व लंगडे त्याच्याकडे मंदिरात आले आणि त्यांना त्याने बरे केले."* (मत्तय २१:१३-१४)

पुढील काही दिवसांमध्ये, येशू मंदिरात बसला आणि लोकांना देवाच्या खऱ्या गोष्टी शिकवल्या. धार्मिक नेत्यांनी त्यास काहीतरी बोलण्यात पकडण्यासाठी योजना आखण्याचा प्रयत्न केला जेणेकरून ते त्याजवर दोष लावू शकतील आणि त्यास मृत्यूदंड देता येईल, पण ते अपयशी ठरले. येशूने त्यांच्या प्रश्नांना स्वर्गीय ज्ञानाने हाताळले, म्हणून सर्वांना आश्चर्य वाटले.[२०८]

मग समय झाला होता.

### ती घटका आली होती

येशू हा एकच व्यक्ती आहे ज्यास हे नेमकेपणे ठाऊक होते :

तो कधी मरणार,
तो कोठे मरणार,
तो कसा मरणार,
आणि तो कशासाठी मरणार.

*“मग असे झाले की, येशूने सर्व बोलणे समाप्त केल्यावर आपल्या शिष्यांना म्हटले, ‘**तुम्हांला ठाऊक आहे की, दोन दिवसांनी वल्हांडण सण आहे, आणि मनुष्याचा पुत्र वधस्तंभावर खिळण्याकरता धरून दिला जाईल**.’ तेव्हा कयफा नावाच्या प्रमुख याजकाच्या वाडयात मुख्य याजक, शास्त्री आणि लोकांचा वडीलवर्ग जमला; आणि येशूला कपटाने धरून जिवे मारावे अशी त्यांनी मसलत केली. परंतु ते म्हणाले, ‘लोकांमध्ये गडबड होऊ नये म्हणून हे सणात **नको**.”* (मत्तय २६:१-५)

स्वतःची सेवा करणारे धार्मिक नेते हताश होते. अनेक प्रसंगी त्यांनी *“त्याला धरण्यास पाहिले, तरी कोणी त्याच्यावर हात टाकला नाही, कारण **त्याची वेळ तोवर आली नव्हती.**”* (योहान ७:३०)

मग त्यांना जे हवे होते ते त्यांना मिळाले.

यहूदा, बाह्यरित्या येशूचा एक शिष्य पण आतून नव्हता, तो मंदिराच्या याजकांकडे गेला आणि विश्वासघाताने येशूला त्यांच्या हातात धरून देण्याविषयी बोलला. याजक यहूदाला चांदीचे तीस नाणे देण्याविषयी सहमत झाले. विश्वासघाताच्या या कृत्याने जुन्या कराराच्या आणखी पुष्कळ भविष्यवाण्या पूर्ण केल्या.[२०९]

म्हणून येशूने त्याच्या शिष्यांना म्हटले, *“**घटका आली आहे**.”* (योहान १२:२३)
देवाच्या कोकऱ्याच्या मरणाची वेळ झाली होती.

### वल्हांडण आठवडा

यरुशलेमेच्या अरुंद रस्त्यावर वार्षिक अर्पण करण्याच्या सणासाठी आलेल्या स्थानिक आणि परदेशी लोकांची गर्दी होती. मेंढयांचा आणि बैलांचा आवाज वातावरणात घुमत होता. कोकऱ्याच्या योग्य किमतीसाठी खरेदीदार व्यापाऱ्यांशी भांडत होते.

हा वल्हांडण आठवडा होता.

वल्हांडण हा देवाकडून पंधराशे शतकांपूर्वी आठवडा-भराचा भाग म्हणून साजरा करण्यासाठी स्थापित केला होता. लोकांसाठी तो प्रसंग होता की मागे पाहावे आणि याचे स्मरण करावे की परमेश्वराने त्याच्या *“संवाद साधण्याच्या राष्ट्राला”* गुलामगिरी आणि मृत्यूपासून त्या भयानक रात्री सोडविले होते जेव्हा त्यांच्या पूर्वजांनी त्यांच्या घरांच्या दारबाह्यपट्टीवर कोकऱ्याचे रक्त लावले होते. देवाच्या दृष्टीकोनावरून, जेव्हा मसीहा वल्हांडणाचा गहन अर्थ पूर्ण करेल त्या दिवसाकडे पुढे पाहण्याचा देखील तो प्रसंग होता.

तथापि, थोडे, जर कोणी असेल, त्यांनी समजले होते की नासरेथचा येशू आता वल्हांडणाचा अंतिम कोकरा म्हणून त्याचे रक्त वाहणार होता आणि कोकऱ्याच्या चिन्हाला पूर्ण करणार होता जे मोशेच्या काळापासून वर्षानुवर्षे अर्पण केले जात होते. लोकांना मानवी मुकादमांच्या शारीरिक अत्याचारापासून सोडवण्याच्या मोशेच्या उद्देशाच्या उलट, मसीहाचा उद्देश हा लोकांना सैतान, पाप आणि मृत्यूच्या आध्यात्मिक अत्याचारापासून सोडवणे होते.

धार्मिक नेते येशूला मारण्याचा कट करत होते, पण *"सणात **नको** कारण लोकांमध्ये गडबड होऊ नये"* (मत्तय २६:५). तरीही या त्याच सणात येशूने मरण्याची योजना केली होती! देवाचा कोकरा वल्हांडण उत्सवा दरम्यान वधला जाईल.[२१०] देवाने जशी योजना आखली होती हे सर्वकाही तसेच घडेल.

उपरोधिकपणे, अगदी ते ज्यांनी देवाची योजना नाकारली होती तेच त्यास पूर्ण करण्यात मुख्य भूमिका पार पाडणार होते. सैतानालाही थोडीशीही जाणीव नव्हती की येशूला मारण्यासाठी धार्मिक नेत्यांना चिथावण्याद्वारे, तो त्याच्या स्वतःच्या विनाशाचे आयोजन करत होता! पवित्र शास्त्र यास घटनांची अदलाबदल म्हणते : *"तर **देवाचे गूढ ज्ञान ....देवाने युगांच्या पूर्वी .... नेमले होते.** ते ह्या युगातल्या अधिकाऱ्यांतील कोणालाही कळले नव्हते; कारण त्यांना ते कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळले नसते."* (१ करिंथ. २:७-८)

## भाकर आणि प्याला

नियुक्त संध्याकाळी, येशू आणि शिष्य वल्हांडणासाठी माडीवरच्या खाजगी खोलीत एकत्र झाले होते. कोकरा आणि कडू भाजीचे जेवण घेतल्यानंतर, प्रभूने घेतली, आभार मानले, ती मोडली, शिष्यांना दिली, आणि त्यांना ती खाण्यास सांगितले, हे बोलत, *"माझ्या स्मरणार्थ हे करा."* (लूक २२:१९)



***मोडलेली भाकर*** त्याच्या शरीराला चिन्हित करते जे आता लवकरच त्यांच्यासाठी जखमी आणि दंडित होईल.

नंतर, त्याने ठेचलेल्या द्राक्षाच्या रसाचा ***प्याला*** त्यांना दिला. *"हा प्याला,' त्याने त्याच्या शिष्यांना म्हटले, हे माझे [नव्या] कराराचे रक्त आहे. हे पापांची क्षमा होण्यासाठी पुष्कळांकरता ओतले जात आहे."* (मत्तय. २६:२८)

अभिवचन दिलेल्या नवीन कराराचा शुभारंभ करण्यासाठी येशू जे रक्त आता वाहणार होता ते प्याला प्रतिनिधित करत होता.

ही दोन साधारण चिन्हे देवाच्या संदेष्टयांच्या मुख्य संदेशाकडे इशारा करतात : की आपला निर्माणकर्ता मानवी देह धारण करेल जेणेकरून आदामाच्या पापी वंशजांसाठी त्रास भोगावा आणि त्याचे रक्त ओतावे.

अनेक अतुलनीय अद्भुत अभिवचने आणि सत्यांनी[२११] त्याच्या शिष्यांचे सांत्वन केल्यानंतर, येशू त्यांना जवळच्या बागेत घेऊन गेला ज्यास गेथसेमाने म्हणतात. स्वतः जमिनीवर उपडे पडून, पुष्कळ घाम आणि आत्म्याच्या तीव्र वेदनांमध्ये, त्याने प्रार्थना केली, *"हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो."* (मत्तय २६:३९)

हा *"प्याला"* काय होता ज्याची येशूला भीती वाटत होती? तो त्रासाचा प्याला होता, पित्यापासून अभूतपूर्व वेगळे होणे ज्याचा तो आता अनुभव करणार होता, आणि नरकाची एकवटलेली भयानकता जी तो तुमच्या आणि माझ्यासाठी सहन करणार होता.

ही प्रार्थना तीन वेळा केल्यानंतर, पुत्र स्वेच्छेने त्याच्या पित्याच्या इच्छेच्या अधीन झाला. जसे दावीद संदेष्टयाने भविष्य केले होते, मसीहा ते पुन:स्थापित करेल जे त्याने घेतले नव्हते. *"मी हरण केले नव्हते, तेही मला द्यावे लागले."* (स्तोत्र. ६९:४)

येशू पापासाठी पूर्ण आणि अंतिम अर्पण झाला.

## अटक

ज्यावेळेस येशूने त्याच्या पित्याबरोबर बोलणे संपविले, तेथे लगेचच मुख्य याजक, शास्त्री आणि वडीलवर्गांनी पाठवलेल्या सेनेची तुकडी बागेत आली. मशाली, सोटे आणि तलवारी घेऊन ते त्या एकमेव व्यक्तीला अटक करण्यासाठी आले होते ज्याने वादळ शांत केले, भुते काढली आणि मृतांना जिवंत केले होते.

> *"तेव्हा सैनिकांची तुकडी व मुख्य याजक आणि परुशी ह्यांच्याकडचे कामदार मिळाल्यावर यहूदा दिवे, मशाली व शस्त्रे घेऊन तेथे आला.* ***येशू आपणावर जे काही येणार ते सर्व जाणून बाहेर आला*** *आणि त्यांना म्हणाला, 'तुम्ही कोणाला शोधता?' त्यांनी त्याला उत्तर दिले, 'नासरेथकर येशूला.' येशू त्यांना म्हणाला,* ***'मीच तो आहे.' ....... मीच तो आहे,*** *असे म्हणताच ते मागे हटून जमिनीवर पडले. तेव्हा त्याने त्यांना*

*पुन्हा विचारले, 'कोणाला शोधता?' ते म्हणाले, 'नासरेथकर येशूला.' येशूने उत्तर दिले, '**मीच तो आहे** असे मी तुम्हांला सांगितले."* (योहान १८:४-८)

जे त्याला अटक करण्यासाठी आले होते, त्यांना येशूने स्वतःला देवाच्या स्वतःचे *"मी आहे"*[२१२] या नावाने ओळख दिली. स्पष्टपणे, जर येशूला त्यांच्याबरोबर जावे लागले, कारण तसे करण्याची त्याने स्वतः निवड केली होती.

जेव्हा सैनिक जवळ आले, तेव्हा शिष्य पेत्राने त्याची तलवार काढली, पण केवळ मुख्य याजकाच्या सेवकाचा कान कापण्यात यशस्वी झाला. येशूने कृपापूर्वक त्या माणसाचा कान बरा केला आणि मग पेत्राला म्हटले,

*"तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील. तुला असे वाटते काय की, मला माझ्या पित्याजवळ मागता येत नाही, आणि आत्ताच्या आता तो मला देवदूतांच्या बारा सैन्यांपेक्षा अधिक पाठवून देणार नाही? **पण असे झाले तर ह्याप्रमाणे घडले पाहिजे, हे म्हणणारे शास्त्रलेख कसे पूर्ण व्हावेत?"*** (मत्तय २६:५२-५४)

काय हा उत्साहवर्धक विरोधाभास येशू त्या सर्वांना प्रदान करत होता जे धर्माच्या नावाखाली हिंसेचा वापर करतात! येशूला त्यांचा हेतू त्याची निंदा करावी, छळ करावा आणि त्यास मारण्याचा आहे हे माहित असतानाही, त्याने द्वेष आणि सुडाऐवजी संयम आणि दयाळूपणा दाखवला.

## संदेष्टयांच्याद्वारे भविष्यवाणी केली होती

मग, जे त्याला अटक करण्यासाठी आले होते, येशू त्यांना म्हणाला, "एखाद्या लुटारूला धरावे तसे मला धरण्यास तुम्ही तलवारी व सोटे घेऊन बाहेर आला आहात काय?

मग पवित्र शास्त्र अधिक भाष्य जोडते:

*"**पण संदेष्टयांचे लेख पूर्ण व्हावेत म्हणून हे सर्व झाले आहे**.'*

*तेव्हा सर्व शिष्य त्याला सोडून पळून गेले.*

*मग येशूला अटक करणाऱ्यांनी त्याला प्रमुख याजक कयफा ह्याच्याकडे शास्त्री व वडील जमले होते तेथे **नेले**."* (मत्तय २६:५५-५७)

एकच ज्याला वारा आणि लाटांवर सामर्थ्य होते त्याने स्वतःला अटक, बांधणे आणि

घेऊन जाऊ दिले?

त्याच्या पित्यावरील प्रेम आणि आज्ञाधारकपणासाठी हे त्याने केले.

तुम्हांला आणि मला सार्वकालिक न्यायापासून वाचवण्यासाठी हे त्याने केले.

*"संदेष्ट्यांचे लेख पूर्ण व्हावेत"* म्हणून हे त्याने केले.

शेकडो वर्षांपूर्वी, यशय संदेष्ट्याने लिहिले होते, *"**वधण्यास नेत असलेल्या** मेंढराप्रमाणे तो गप्प राहिला."* (यशया ५३:७)

अब्राहाम संदेष्ट्याने घोषित केले, *"देव स्वतः होमार्पणासाठी **कोकरू** पाहून देईल."* (उत्पत्ती २२:८)

आणि मोशे संदेष्ट्याने लिहिले होते, *"मग याजकाने दोषार्पणासाठी **एक कोकरू** ...अर्पण करावे....आणि पवित्रस्थानात जेथे पापबली व होमबली ह्यांचा वध करतात तेथे ते **कोकरू मारावे**."* (लेवीय १४:१२-१३)

विडंबना चुकवू नका.

याजक, जे मंदिरातील पितळेच्या वेदीवर कोकरू मारण्यास आणि जाळण्यास जबाबदार होते, त्यांनीच आता येशूला अटक केली होती जेणेकरून त्यास मारावे. तरीही त्यांना किंचितही कल्पना नव्हती की ते आता त्या **कोकरा**चे अर्पण करणार आहेत ज्याच्याविषयी सर्व संदेष्ट्यांनी लिहिले होते.

## धार्मिक नेत्यांनी दोषी ठरवले

*"नंतर त्यांनी येशूला प्रमुख याजकाकडे नेले; आणि सर्व मुख्य याजक, वडील व शास्त्री एकत्र जमले."* (मार्क १४:५३)

यहूद्यांच्या धार्मिक नेत्यांनी रात्रीच्या वेळेची बेकायदेशीर चौकशी आयोजित केली.

*"मुख्य याजक व सर्व न्यायसभा ह्यांनी येशूला जिवे मारण्याकरता त्याच्याविरुद्ध साक्षीचा शोध केला पण ती त्यांना मिळेना. बऱ्याच जणांनी त्याच्याविरुद्ध खोटी साक्ष दिली, परंतु त्यांच्या साक्षीत मेळ बसेना....तेव्हा प्रमुख याजकाने मध्ये उभे राहून येशूला विचारले, 'तू काहीच उत्तर देत नाहीस काय? हे तुझ्याविरुद्ध साक्ष देतात हे काय?' तथापि तो उगाच राहिला; त्याने काही उत्तर दिले नाही. पुन्हा प्रमुख याजकाने त्याला विचारले, '**धन्यवादिताचा पुत्र जो ख्रिस्त तो तू आहेस काय**?'*

*येशू म्हणाला, '**मी आहे**; आणि तुम्ही 'मनुष्याचा पुत्र सर्वसामर्थ्याच्या उजवीकडे बसलेला' व 'आकाशातील मेघांसह येत असलेला असा पाहाल.' तेव्हा प्रमुख याजक आपले कपडे फाडून म्हणाला, 'आपणाला साक्षीदारांची आणखी काय गरज? हे दुर्भाषण तुम्ही ऐकले आहे; तुम्हांला कसे वाटते?"* (मार्क १४:५५-५६, ६०-६४)

प्रमुख याजक का संतापला, त्याने त्याचे कपडे का फाडले, आणि दुर्भाषण केले म्हणून येशूला दोष का लावला? त्याने असे केले कारण येशूने स्वतःला देवाचा पुत्र आणि मनुष्याचा पुत्र आणि मसीहा ज्याच्याविषयी सर्व संदेष्टयांनी लिहिले होते ते घोषित केले. येशूने स्वतःला देवाचे स्वतःचे वैयक्तिक नाव *"मी आहे"* ने देखील संबोधले होते. आणि "**मनुष्याचा पुत्र सर्वसामर्थ्याच्या उजवीकडे बसलेला' व 'आकाशातील मेघांसह येत असलेला असा पाहाल**" असे म्हणण्याने येशू संदेष्टयांच्या लेखातून संदर्भ देत होता आणि स्वतःला संपूर्ण पृथ्वीचा न्यायाधीश म्हणून घोषित करत होता.[२१३]

म्हणूनच "प्रमुख याजकाने आपले कपडे फाडले आणि म्हणाला,

*"आपणाला साक्षीदारांची आणखी काय गरज? हे दुर्भाषण तुम्ही ऐकले आहे; तुम्हांला कसे वाटते?' तेव्हा **तो मरणदंडास पात्र आहे असे सर्वांनी मिळून ठरवले**. मग कित्येक जण त्याच्यावर थुंकू लागले, त्याचे तोंड झाकून व त्याला बुक्क्या मारून म्हणू लागले, 'आता दाखव आपले अंतर्ज्ञान!" आणि पहारेकऱ्यांनी त्याला चपराका मारून आपल्या ताब्यात घेतले."* (मार्क १४:६३-६५)

सातशे वर्षांपूर्वी, यशया संदेष्टयाने मसीहाच्या स्वेच्छेने त्रास भोगण्याबद्दल भविष्य केले होते : *"मी मारणाऱ्यांपुढे आपली पाठ केली, केस उपटणाऱ्यांपुढे मी आपले गाल केले; उपमर्द व छिथू ह्यांपासून मी आपले तोंड चुकवले नाही."* (यशया ५०:६)

## राजकीय नेत्यांनी दोषी ठरवले

पहाट होताच, याजक आणि धार्मिक नेत्यांनी येशूला पंत पिलाताजवळ नेले, जो यहूदाचा रोमन राज्यपाल होता. पिलाताने येशूला वधस्तंभावर खिळून मारावे म्हणून धार्मिक नेत्यांनी मागणी केली. इतिहासातील त्या काळात, यहूदी लोक रोमन साम्राज्याच्या शासनात होते आणि एखाद्या अपराध्याला मृत्यूदंड देण्याचा त्यांना अधिकार नव्हता.

चौकशी दरम्यान दिवसातून तीन वेळा पिलाताने घोषित केले, *"मला त्याच्यात काही दोष दिसत नाही,"* पण जमाव, ज्यांस याजकांनी चिथावले होते ज्यास सैतानाने चिथावले होते, केवळ

मोठयाने ओरडून म्हणाले, **"त्याची वाट लावा, त्याची वाट लावा! त्याला वधस्तंभावर खिळा, त्याला वधस्तंभावर खिळा!"**[२१४]

पिलात धार्मिक नेत्यांच्या दबावात आला आणि रोमी कायद्यानुसार तीव्र शिक्षा येशूला दिली : एक क्रूर, फटक्यांनी हाडे-दिसून येतात अशी शिक्षा, त्यानंतर वधस्तंभावर खिळणे :

*"येशूला फटके मारून वधस्तंभावर खिळण्याकरता शिपायांच्या स्वाधीन केले. नंतर सुभेदारांच्या शिपायांनी येशूला वाडयात नेले आणि सगळी तुकडी त्याच्याविरुद्ध जमवली. त्यांनी त्याची वस्त्रे काढून त्याच्या अंगात किरमिजी झगा घातला; काटयांचा मुकुट गुंफून त्याच्या मस्तकावर ठेवला, त्याच्या उजव्या हातात वेत दिला आणि त्याच्यापुढे गुडघे टेकून, 'हे यहुद्यांच्या राजा, नमस्कार!' असे म्हणून त्यांनी त्याची थट्टा मांडली. ते त्याच्यावर थुंकले व तोच वेत घेऊन ते त्याच्या मस्तकावर मारू लागले. मग त्याची थट्टा केल्यावर त्यांनी त्याच्या अंगातून तो झगा काढून त्याची वस्त्रे त्याच्या अंगात घातली आणि आणि ते त्याला वधस्तंभावर खिळण्याकरता घेऊन गेले."* (मत्तय २७:२६-३१)

## परमेश्वराचा डोंगर

अशा प्रकारे, गौरवाचा प्रभू-त्याचे पवित्र शरीर आता विच्छिन्न मांसाचा रक्तमय गोळा झाले होते, त्याचे डोके काटयांचा मुकुट होता आणि त्याच्या पाठीवर लाकडाचा जड वधस्तंभ होता-त्याला शहराच्या बाहेर नेण्यात आले आणि त्याच पर्वत रांगावर नेले जेथे, जवळजवळ दोन हजार वर्षांपूवी, अब्राहामाने भविष्यवाणी केली होती :

*"**देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल......त्यावरून परमेश्वराच्या गिरीवर पाहून देण्यात येईल** असे आजवर बोलतात."* (उत्पत्ती २२:८, १४)

सर्व घटकांचा मेळ झाला होता: लोक, प्रक्रिया, व्यक्ती, ठिकाण. संदेष्टयांनी जशी भविष्यवाणी केली होती त्याप्रमाणे सर्वकाही घडत होते.

आता युगाच्या बदलण्याची वेळ झाली होती.



# धडा २४

# पूर्ण भरपाई केली

**व**धस्तंभावर खिळणे ही वधण्याची आतापर्यंतची सर्वात क्रूर राज्य प्रायोजित पद्धत आहे. रोमन साम्राज्याने सर्वात विश्वासघातकी गुन्हेगारासाठी ही राखून ठेवली होती.

वधस्तंभावर वध करणे हेच जे आपण मानवजातीने, आपल्या निर्माणकर्त्यासाठी निवडले होते जेव्हा तो आपल्याला भेटण्यासाठी आला होता.[२१५]

> *"त्याच्याबरोबर दुसऱ्या दोघा जणांस ते अपराधी असल्यामुळे वधस्तंभावर खिळण्यासाठी नेले. नंतर ते कवटी[२१६] म्हटलेल्या जागी आले तेव्हा तेथे त्यांनी त्याला व त्या अपराध्यांना, एकाला उजवीकडे व एकाला डावीकडे असे वधस्तंभावर खिळले."* (लूक २३:३२-३३)

### वधस्तंभावर खिळलेला!

वधस्तंभावर खिळणे हे बळी ठरलेल्या व्यक्तीला सर्वात वेदनादायक यातना आणि शक्य तितक्या मोठया अपमानासाठी तयार केले होते.

मी हे कधीही पाहिले नाही, किंवा मला ते पाहण्याची इच्छा देखील नाही, जेव्हा येशूला वधस्तंभावर लटकवण्यात आले होते तेव्हा त्याने सहन केलेली लज्जा आणि यातना एखादया कलाकाराची चित्रकृती किंवा एखादा चित्रपट त्यास पुरेशी चित्रित करू शकेल. उदाहरणार्थ, कलाकार आणि पटकथा लेखक वस्त्राचा एखादा तुकडा त्याच्यावर लावतो, पण ऐतिहासिक वास्तविकता ही आहे की रोमन सैनिक दोषी अपराध्यास खेदजनकपणे झाड किंवा वधस्तंभावर आदळत आणि त्यांच्या मनगटांमधून आणि टाचांमध्ये मोठे खिळे ठोकण्यापूर्वी त्यांना पूर्णपणे निर्वस्त्र करत असत.

वधस्तंभावर खिळण्याद्वारे मरण हे लज्जाजनक, यातनामय आणि सावकाश येत असे.

येशूने स्वेच्छेने ही शिक्षा सहन केली-यातना आणि लज्जा-तुमच्या आणि माझ्यासाठी आणि आदामाच्या संपूर्ण वंशजांसाठी. तीव्र छळ जो येशूचा केला गेला ते आपले पाप गंभीर शिक्षेस पात्र आहे याची जाणीव करून देण्यास मदत करण्यासाठी होता.

रोमी लोकांनी वधस्तंभावर देण्याच्या पद्धतीचा शोध लावण्याच्या अनेक वर्षांपूर्वी, दावीद संदेष्टयाने वधस्तंभावर मसीहाच्या दु:खसहनाचे वर्णन केले होते :

*"...दुर्जनांच्या टोळीने मला घेरले आहे;* ***त्यांनी माझे हातपाय विंधले आहेत****. मला आपली सर्व हाडे मोजता येतात; ते माझ्याकडे टक लावून पाहतात. ते माझी वस्त्रे आपसांत वाटून घेतात आणि माझ्या झग्यावर चिठ्ठ्या टाकतात....ते म्हणतात, त्याने परमेश्वरावर आपला हवाला टाकला आहे; तो त्याला मुक्त करो; तो त्याला सोडवो, कारण तो त्याचा आवडता आहे."* (स्तोत्र. २२:१६-१८, ८). *आणि यशया संदेष्टयाने भविष्यवाणी केली : "कारण आपला प्राण वाहू देऊन तो मृत्यू पावला, त्याने आपणास अपराध्यांत गणू दिले; त्याने बहुतांचे पाप आपल्यावर घेतले व अपराध्यांसाठी मध्यस्थी केली."* (यशया ५३:१२)

शुभवर्तमान नोंदीमधील पुढील सारांशामध्ये, आपण आत्ताच वाचलेल्या भविष्यवाणींवर आधारित पूर्ण झालेल्या किती गोष्टी तुम्ही ओळखू शकता.



*"त्याच्याबरोबर दुसऱ्या दोघा जणांस ते अपराधी असल्यामुळे वधस्तंभावर खिळण्यासाठी नेले. नंतर ते कवटी म्हटलेल्या जागी आले तेव्हा तेथे त्यांनी त्याला व त्या अपराध्यांना, एकाला उजवीकडे व एकाला डावीकडे असे वधस्तंभावर खिळले. तेव्हा येशू म्हणाला, '****हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही****.' नंतर त्याची वस्त्रे आपसांत वाटून घेण्यासाठी त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या.*

*लोक पाहत उभे होते; अधिकारीही नाक मुरडत म्हणाले, 'त्याने दुसऱ्यांना वाचवले, जर तो देवाचा ख्रिस्त, त्याचा निवडलेला असला तर त्याने स्वतःस वाचवावे.' शिपायांनीही जवळ येऊन 'आंब' त्याच्यापुढे धरून, त्याची अशी थट्टा केली,... वधस्तंभावर खिळलेल्या त्या अपराध्यांपैकी एकाने त्याची निंदा करून म्हटले, 'तू ख्रिस्त आहेस ना? तर स्वतःला व आम्हांलाही वाचव.' परंतु दुसऱ्याने त्याचा निषेध करून म्हटले, 'तुलाही तीच शिक्षा झाली असता तू देवालासुद्धा भीत नाहीस काय? आपली शिक्षा तर यथान्याय आहे; कारण आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगत आहोत; परंतु ह्याने काही अयोग्य केले नाही.' मग तो म्हणाला, 'अहो, येशू, आपण आपल्या राजाधिकाराने याल तेव्हा माझी आठवण करा.' येशू त्याला म्हणाला,* ***'मी तुला खचित सांगतो, तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील.'*** *आता सुमारे दोन प्रहर झाले, आणि सूर्यप्रकाश नाहीसा होऊन* ***तिसऱ्या प्रहरापर्यंत सर्व देशभर अंधार पडला****;......"* (लूक २३:३३-३६, ३९-४५)

## व्यवहार

शतकानुशतके असंख्य बळींनी वधस्तंभावरील यातना सहन केल्या होत्या. इसवीसन ७० मध्ये यरुशलेमेचा विध्वंस होण्यापूर्वी, रोमन सैनिक दिवसाला पाचशे यहूद्यांना वधस्तंभावर खिळत असत.[२१७] काही बळी मरण्यापूर्वी वधस्तंभावर काही दिवस यातना भोगत असत. येशूने त्याच्या तुलनेत मरण पावण्यापूर्वी वधस्तंभावर सहा तासाच्या थोडया कालावधीसाठी दु:खसहन केले होते . म्हणून त्याच्या दु:खसहनाला अद्वितीय असे कशाने केले ?

संदेष्टयांनी येशूचे दु:खसहन आणि मरणाबद्दल भविष्यवाणी केली होती हा एक महत्वपूर्ण फरक आहे. आणखी एक फरक हा आहे की, जरी वधस्तंभावर टांगून मारण्याद्वारे पुष्कळ जणांनी त्यांचे रक्त वाहिले होते, तरी फक्त प्रभू येशूने परिपूर्ण रक्त वाहिले. आणि कथानक जे आपण आताच वाचले ते येशूच्या मृत्यूचे पूर्णपणे अद्वितीय असे दुसरे प्रकटीकरण करते.

*"आता सुमारे दोन प्रहर झाले, आणि सूर्यप्रकाश नाहीसा होऊन तिसऱ्या प्रहरापर्यंत सर्व देशभर अंधार पडला."* (लूक २३:४४)[२१८]

येशूला वधस्तंभावर सकाळी नऊ वाजता खिळले होते. दुपारपासून ते तीन वाजेपर्यंत, संपूर्ण पृथ्वी अंधाराने झाकून गेली होती. का? त्या तीन तासादरम्यान, जगाच्या दृष्टीपासून लपलेला, आतापर्यंतचा सर्वात दूरगामी व्यवहार होत होता. देव वेळेमध्ये आपल्या पापावर उपाय करत

होता जेणेकरून आपल्याला सार्वकालिकतेमध्ये त्यावर उपाय करण्याची गरज लागणार नाही.

अलौकिक अंधाराच्या त्या समया दरम्यान, स्वर्गातील देवाने त्याच्या प्रिय, नीतिमान पुत्रावर आपल्या पापासाठी आवश्यक सार्वकालिक शिक्षा केंद्रित केली होती. हे त्याच उद्देशासाठी देवाच्या पुत्राने मांस आणि रक्ताचे शरीर धारण केले होते.

> *"आणि तोच आपल्या पापांबद्दल प्रायश्चित्त [पुरेसे पापार्पण ज्याने देवाच्या क्रोधास शोषून घेतले] आहे; केवळ आपल्याच पापांबद्दल नव्हे तर सर्व जगाच्याही पापांबद्दल आहे."* (१ योहान २:२)

सातशे वर्षांपूर्वी, यशया संदेष्टयाने युगाच्या या व्यवहाराचे आधीच वर्णन केले होते :

> *"खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले;...... **अशा आम्हा सर्वांचे पाप परमेश्वराने त्याच्यावर लादले**. ...वधण्यास नेत असलेल्या कोकराप्रमाणे ......त्याला ठेचावे असे परमेश्वराच्या मर्जीस आले. त्याने त्याला पिडले; त्याच्या जिवाचे दोषार्पण झाल्यावर तो संतती पाहील, तो दीर्घायू होईल, त्याच्या हातून परमेश्वराचा मनोरथ सफल होईल. त्याच्या जिवाच्या वेदना सरल्यावर तो त्यांचे फल पाहून समाधान पावेल; तो माझा नीतिमान सेवक आपल्या ज्ञानाने बहुतांना निर्दोष ठरवील."* (यशया ५३:५-७; १०-११)

वधस्तंभावरील त्या तासांच्या दरम्यान, जेव्हा ग्रह हा अंधारात गुरफटून गेला होता, तेव्हा परमेश्वराने त्याच्या स्वेच्छुक, निष्पाप पुत्रावर आपल्या पापाची अशुद्धता आणि दोष लादला होता. पिता आणि पुत्रामध्ये प्रत्यक्षात काय घडले हे आपण कधीही समजू शकणार नाही, परंतु एक गोष्टी निश्चित आहे : तो आतापर्यंतचा सर्वात मोठा व्यवहार होता.

## एकटा!

जेव्हा पृथ्वीला गडद अंधाराने झाकले होते, *"येशू मोठयाने आरोळी मारून बोलला, 'एली, एली, लमा सबख्तनी, म्हणजे **माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास**?"* (मत्तय २७:४६)

वधस्तंभावरून येशूने हा मोठा आक्रोश का केला? त्याने अशा प्रकारे आक्रोश केला कारण देवाने त्याला पापाची शिक्षा भोगण्यासाठी सोडले होते...

एकटे.

आपल्या सर्वांच्या वतीने, येशू पापाने निर्माण केलेल्या वेगळे करण्याच्या तीन स्तरांचे दु:खसहन केले होते :

- त्याने आध्यात्मिक मृत्यूचा अनुभव घेतला. स्वर्गातील देवाने त्याचा पुत्र, ज्यावर त्याने मानवजातीचे पाप लादले होते त्याच्यापासून आपले मुख दुसरीकडे केले होते.
- तो शारीरिक मृत्यूतून गेला. ज्याक्षणी येशू मरण पावला, त्याक्षणी त्याचा आत्मा आणि प्राण त्याचे शरीर सोडून गेले.
- त्याने दुसऱ्या मृत्यूचा अनुभव देखील घेतला. तुमच्या आणि माझ्यासाठी त्याने नरकाची यातना अनुभवली.

नरक हे देवाने-त्यागलेले अंधाराचे आणि वेगळे करण्याचे ठिकाण आहे; एक ठिकाण जेथे कोणत्याही चांगल्या गोष्टी नाहीत; स्वर्गीय पित्याची उपस्थिती आणि प्रीतीपासून वेगळे असलेले ठिकाण. वधस्तंभावर असताना, सार्वकालिकतेमध्ये पहिल्या आणि शेवटच्या वेळेसाठी, सार्वकालिक पुत्र त्याच्या सार्वकालिक पित्यापासून वेगळा झाला होता. येशूने त्या भयावह विभक्त होण्याला सहन केले, म्हणजे आपल्याला तसे करावे लागू नये.

देवाचा पवित्र कोकरा आपले पाप-वाहक बनला, आपला पर्याय. त्याने, यातना, लज्जा, कांटे आणि खिळे स्वीकारून पापाच्या शापाचा पूर्ण भार वाहिला. वधस्तंभाच्या वेदीवर, स्वर्ग आणि पृथ्वीच्या मध्ये लटकलेला, येशू पापासाठी पूर्ण आणि अंतिम *"होमार्पण"* झाला.[२१९]

## थोडया तासात नरक?

येशूने आपला नरक वाहिला. परंतु एक माणूस संपूर्ण मानवजातीच्या शिक्षेसाठी भरपाई कशी भरू शकतो? समयाच्या थोडयाशा तासात सार्वकालिकतेची शिक्षा येशू कशी भोगू शकतो?

तो कोण आहे यामुळे तो तसे करू शकला.

तो कोण आहे या कारणामुळे संपूर्ण सार्वकालिकतेमध्ये त्याला आपल्या पापांसाठी सतत भरपाई करण्याची गरज नाही जशी ती आपल्याला करावी लागली असती. सार्वकालिक पुत्र आणि देवाचा शब्द म्हणून त्याच्या स्वतःची भरपाई करण्यासाठी त्याचे पापाचे ऋण नव्हते, किंवा जसे आपण काळाने बांधलेले आहोत तसे तो नव्हता.

तो कोण आहे या कारणामुळे काळाच्या मर्यादित वेळेत तो *"प्रत्येकांसाठी मृत्यूचा अनुभव"* (इब्री. २:९) घेण्यास सक्षम होता.

ज्याप्रमाणे परमेश्वर देवाला आपले जटील जग ( जरी त्याने ते सहा दिवसांत करण्याचे निवडले होते) निर्माण करण्यासाठी काही विशेष वेळेची आवश्यकता नव्हती, त्याप्रमाणे त्याला वधस्तंभावर

काही विशेष वेळेची आवश्यकता नव्हती की मानवजातीला (जरी त्याने ते सहा तासात करण्याचे निवडले होते) मुक्त करावे.

देवाबरोबर, वेळ काहीच नाही.

*"अनादिकालापासून अनंतकालापर्यंत तू देव आहेस. ...कारण तुझ्या दृष्टीने सहस्त्र वर्षे कालच्या गेलेल्या दिवसासारखी, रात्रीच्या प्रहरासारखी [सुरक्षारक्षकाच्या कर्तव्याचे काही तास] आहेत."* (स्तोत्र. ९०:२, ४)

## "पूर्ण झाले आहे!"

*"ह्यानंतर, आता सर्व पूर्ण झाले आहे हे जाणून येशूने शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून, '**मला तहान लागली आहे**,' असे म्हटले. तेथे आंब भरून ठेवलेले एक भांडे होते; म्हणून त्यांनी आंब भरलेला स्पंज एजोब झाडाच्या काठीवर बसवून त्याच्या तोंडाला लावला. येशूने आंब घेतल्यानंतर, '**पूर्ण झाले आहे**,' असे म्हटले; आणि मस्तक लववून आपला आत्मा समर्पण केला."* (योहान १९:२८-३०)

येशू मरण पावण्यापूर्वी, त्याने एक घोषणा केली :

***"पूर्ण झाले आहे!"***

एकच ग्रीक शब्द टेटेलेस्टाय यापासून हे वाक्य भाषांतरित केले आहे. रोमन व्यवसायिक जगात हा एक सामान्य शब्द होता. ऋण हे पूर्णपणे भरले गेले आहे हे दर्शवण्यासाठी त्याचा उपयोग केला जात असे. *"टेटेलेस्टाय"* असे लिहिलेल्या प्राचीन पावत्या सापडल्या आहेत, त्याचा अर्थ :

*"पूर्ण भरपाई केली गेली."*

टेटेलेस्टाय शब्दाचा वापर कार्य पूर्ण झाल्याची घोषणा करण्यासाठी देखील केला जातो. एकच ज्याने त्यास एका उद्देशासाठी पाठवले होते त्याला परत अहवाल देण्यासाठी, एक सेवक *"टेटेलेस्टाय,"* असे म्हणू शकत होता, ज्याचा अर्थ :

*"उद्देश पूर्ण केला गेला."*

इतर शुभवर्तमान लेखक सर्व हा अहवाल देतात की, *"येशूने **मोठयाने आरोळी मारून** प्राण सोडला."* (मार्क १५:३७)

ती विजयाची आरोळी होती!

भविष्यवाण्या आणि चिन्हे जी देवाच्या अर्पणात्मक कोकऱ्याकडे इशारा करत होती ती पूर्ण झाली होती.

येशू मनुष्याचा पुत्र आणि देवाचा पुत्र म्हणून शापाचे कारण : **पाप** यावर निर्णायकपणे उपाय केला होता. आदामाच्या दूषित, नाश पावणाऱ्या वंशजांना मुक्त करण्यासाठी त्याने देवाला आवश्यक खंडणीची भरपाई केली होती. देवाचे नीतिमान स्वरूप आणि पापाच्या विरोधातील क्रोध यांचे पूर्णपणे समाधान झाले होते. त्याचे नियमशास्त्र लागू केले गेले होते.

पूर्ण झाले आहे. भरपाई पूर्ण केली गेली. उद्देश पूर्ण झाला आहे!

> *"कारण ... सोने व रूपे अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे, तर निष्कलंक व निर्दोष कोकरा असा जो **ख्रिस्त त्याच्या मूल्यवान रक्ताने** तुम्ही **मुक्त झाला** आहात. ज्याचे पूर्वज्ञान जगाच्या स्थापनेच्या आधी झाले होते, तोच काळाच्या शेवटी **तुमच्यासाठी** प्रकट झाला."* (१ पेत्र १:१८-२०)

शतकानुशतके, लाखो निष्पाप-मुक्त प्राण्यांच्या अर्पणाचे रक्त वाहिले गेले होते. आता येशूचे स्वतःचे रक्त त्याच्या निष्पाप-मुक्त शरीरातून वाहिले गेले होते. *"ख्रिस्ताचे अनमोल रक्त"* हे पापासाठी केवळ तात्पुरते आवरण नव्हते; ते नोंदीपासून कायमचे काढणारे होते. हेच जे देवाच्या पहिल्या कराराने भविष्य केले होते.

> *परमेश्वर म्हणतो, पाहा, असे दिवस येत आहेत की ....मी **नवा करार** करीन;.....मी त्यांच्या अधर्माची क्षमा करीन, त्यांचे पाप मी ह्यापुढे स्मरणार नाही."* (यिर्मया ३१:३१, ३४)

नवीन कराराचे वचन मग स्पष्ट करते : *"त्याने 'नवा' असे म्हटल्यावर पहिल्या कराराला **जुना असे ठरवले आहे**"* (इब्री. ८:१३). येथून पुढे पापार्पणाची आवश्यकता लागणार नाही. वधस्तंभावरील मसीहाच्या मृत्यूने वेदीवर पशू अर्पणांना रद्द केले होते.

ज्याप्रमाणे परमेश्वर देवाने पहिले रक्त अर्पण (ज्या दिवशी आदाम व हव्वेने पाप केले होते) केले होते, त्याप्रमाणेच त्याने अंतिम स्वीकारयोग्य रक्त अर्पण प्रदान केले होते.

अब्राहामाने भविष्यवाणी केल्याप्रमाणे, देवाने *"अर्पणासाठी स्वयं कोकरा"* प्रदान केला होता (उत्पत्ती २२:८). देवाने अब्राहामाच्या पुत्राला वाचवले असताना, त्याने *"स्वतःच्या पुत्राला राखून ठेवले नाही, पण आपल्या सर्वांकरता प्रदान केले होते."* (रोम. ८:३२)

येशूच्या वाहिलेल्या रक्ताने पाप आणि मृत्यूच्या नियमाचे समाधान केले आणि अर्पणाच्या नियमास पूर्ण केले.

यात काही आश्चर्य नाही मग त्याने आरोळी मारली, *"**पूर्ण झाले आहे!**"*

## फाटलेला पडदा

येशूने *"पूर्ण झाले आहे"* असे घोषित केल्यानंतर काय घडले?

*"मग येशूने मोठयाने आरोळी मारून प्राण सोडला, **तेव्हा पवित्रस्थानातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला.**"* (मार्क. १५:३७-३८)

एका प्राचीन इतिहासकाराने मंदिरातील पडद्याचे हाताच्या तळव्याइतके जाड असल्याचे वर्णन केले आहे आणि तो इतका जड होता की त्यास हाताळण्यासाठी ३०० पुरुषांची आवश्यकता लागत होती.[२२०]

या विशाल पडद्याचे मधून फाटण्याचे काय कारण होते?

२१व्या धडयामध्ये, आपण शिकलो की देवाने त्याच्या लोकांना सूचना दिली होती की या विशेष पडद्याला निवासमंडपात आणि नंतर मंदिरात लटकवायचे होते. हा पडदा मनुष्यांना परमपवित्र स्थानापासून दूर करत होता, ते आतील पवित्रस्थान जेथे पूर्वी देवाने त्याच्या उपस्थितीचा प्रज्वलित प्रकाश ठेवला होता. हा पडदा, निळया, जांभळया आणि किरमिजी रंगाच्या सुताने विणलेला होता, जे देवाच्या स्वतःच्या पुत्राचे रूपक होते जो स्वर्गातून पृथ्वीवर येणार होता. हे पाप्यांना त्यांच्या पवित्र निर्माणकर्त्यापासून त्यांच्या वेगळे होण्याची आठवण म्हणून देखील कार्य करते. केवळ तेच जे परिपूर्ण धार्मिकतेच्या देवाच्या मानकास पूर्ण करतील त्यांनाच देवाच्या सार्वकालिक निवासस्थानात प्रवेश दिला जाईल.

वर्षातून एकदा, प्रायश्चीत्ताच्या दिवशी, विशेषेकरून अभिषिक्त मुख्य याजकाला पडद्याच्या मागे आणि परम पवित्रस्थानात प्रवेश करू दिला जात होता. मारले जाण्याशिवाय देवाच्या उपस्थितीत प्रवेश करण्याचा एकच मार्ग हा मुख्य याजकाला अर्पण केलेल्या बकऱ्याच्या रक्ताचा प्याला (जे ख्रिस्ताच्या वाहिलेल्या रक्ताचे प्रतिक होते) हाती घेऊन जायचे होते. याजकाला शुद्ध तलम वस्त्र (ख्रिस्ताच्या धार्मिकतेचे प्रतिक म्हणून) देखील घालायचे होते. तो परम पवित्रस्थानात असताना, मुख्य याजक कोशाच्या दयासनावर आणि समोर सात वेळा (पूर्णतेचे प्रतिक) रक्त शिंपडत असे. कोशामध्ये देवाचे नियमशास्त्र होते, जे सर्व पाप्यांना मृत्यूचा दोषी ठरवत होते. परंतु देवाने त्यांच्या ऐवजी निष्पाप प्राण्यास मरू दिल्याने पाप्यांना त्याची दया दाखवली.

पंधराशे शतके पडदा देवाच्या परिपूर्ण पवित्रतेची साक्ष देत होता आणि हे की, ख्रिस्ताच्या वाहिलेल्या रक्तावाचून, पापासाठी येथे कोणतेही कायमचे प्रायश्चित्त नव्हते. फक्त देवाचा निष्पाप निवडलेला एकच, ज्यास पडदा प्रतिनिधित करत होता, तोच पापासाठी भरपाई करू शकत होता. म्हणूनच, जेव्हा योग्य वेळ आली, देवाने त्याच्या एकुलत्या एका पुत्राला पाठवले की देवाच्या

नियमशास्त्राच्या आज्ञाधारकतेमध्ये एक परिपूर्ण जीवन जगावे, आणि मग स्वतःच्या रक्ताने, आदामाच्या नियम मोडणाऱ्या वंशजांसाठी संपूर्ण शिक्षेची स्वेच्छेने भरपाई करावी.

तर मग पडद्याला वरपासून खालपर्यंत कोणी दुभागले? देवाने केले. हे कृत्य पुत्राच्या *"पूर्ण झाले आहे!"* यास पित्याचे *"आमेन!"* होते.[२२१]

देवाचे समाधान झाले होते.

## येथून पुढे पापासाठी अर्पणे नाहीत

वधस्तंभावर येशूच्या अर्पणाने, पूर्ण प्रायश्चित्त (पापाची क्षमा आणि देवाशी समेट) केले होते. सिद्ध पर्यायाने जगाच्या पापासाठी त्याचे रक्त वाहिले होते.

यापुढे देवाच्या लोकांवर पापासाठी वार्षिक अर्पणांचा भार पडणार नव्हता.

यापुढे देवाला मंदिरातील विधी किंवा मुख्य याजकाची आवश्यकता लागणार नव्हती.

सर्वांसाठी एकदाच अर्पण हे केले गेले होते. छाया आणि चिन्हांमागील वास्तविकता बोलली गेली होती. *"पूर्ण झाले आहे!"*

ते सर्व जे विश्वास ठेवतात, त्यांना देव स्वतः म्हणतो :

> *"आणि 'त्यांची पापे व त्यांचे स्वैराचार मी ह्यापुढे आठवणारच नाही.' तर मग जेथे त्यांची क्षमा झाली तेथे पापांबद्दल अर्पण व्हायचे राहिले नाही. म्हणून बंधूजनहो, त्याने पडद्यातून म्हणजे स्वदेहातून जो नवीन व जीवनयुक्त मार्ग आपल्यासाठी स्थापित केला त्या मार्गाने **परमपवित्रस्थानात येशूच्या रक्ताद्वारे प्रवेश करण्याचे आपल्याला धैर्य आले आहे**; आणि आपल्याकरता देवाच्या घरावर एक थोर याजक आहे; म्हणून आपली हृदये सिंचित झाल्याने दुष्ट भावनेपासून मुक्त झालेले व निर्मळ पाण्याने शरीर धुतलेले असे आपण खऱ्या अंत:करणाने व विश्वासाच्या पूर्ण खातरीने जवळ येऊ."*
> (इब्री. १०:१७-२२)

## मृत

ज्याक्षणी येशू मरण पावला, केवळ मंदिरातील पडदा दोन भागांमध्ये फाटला नाही, तर भूमिकंप झाला आणि भयभीत जमाव विखरला.

*''शताधीपती व त्याच्याबरोबर येशूवर पहारा करणारे, हा भूमिकंप व घडलेल्या गोष्टी पाहून, अत्यंत भयभीत झाले, व 'खरोखर हा देवाचा पुत्र होता,' असे म्हणाले.''* (मत्तय २७:५४)

नंतर, याची खात्री करावी की तो खरेच मरण पावला आहे, एका रोमी सैनिकाने येशूच्या कुशीत भाला मारला. रक्त आणि पाणी बाहेर वाहिले, एक वैद्यकीय पुरावा दिला की तो मृत झाला होता. सैनिकांच्या कृत्याने आणखी भविष्यवाण्या पूर्ण केल्या.[२२२]

## पुरले

*''मग संध्याकाळ झाल्यावर अरिमथाईतील योसेफ नावाचा एक धनवान मनुष्य आला, हाही येशूचा शिष्य होता. त्याने पिलाताकडे जाऊन येशूचे शरीर मागितले. तेव्हा पिलाताने ते देण्याची आज्ञा केली. योसेफाने ते शरीर घेऊन तागाच्या स्वच्छ वस्त्रात गुंडाळले; ते त्याने खडकात खोदलेल्या आपल्या नव्या कबरेत ठेवले, एक मोठी धोंड लोटून ती कबरेच्या दाराला लावली आणि तो निघून गेला.''* (मत्तय २७:५७-६०)

यशया संदेष्ट्याने भविष्यवाणी केली होती की मसीहाची कबर *''त्याच्या मृत्यूच्या वेळी श्रीमंतात''* गणली जाईल (यशया ५३:९). देवाची योजना प्रत्येक तपशिलासह पूर्ण झाली. इतकी की, येशूचे शिष्य अजूनही त्या योजनेला समजले नाही. त्यांनी खरेच विश्वास ठेवला होता की येशू हा तोच मसीहा आहे जो पृथ्वीवर त्याचे राज्य स्थापन करेल, पण जेव्हा त्यांनी त्याला मरताना पाहिले, त्यांची आशा त्याच्याबरोबर संपली होती. त्यांचा चमत्कार करणारा गुरु आणि प्रिय मित्राचा वध केला होता आणि त्यास पुरले होते.

आता संपले होते किंवा असाच काही त्यांनी विचार केला.

विचित्र गोष्ट म्हणजे, जरी येशूचे शिष्य तिसऱ्या दिवशी परत जिवंत होण्याचे त्याचे अभिवचन विसरले होते, तरी दुष्ट धार्मिक नेते विसरले नव्हते.

*''दुसऱ्या दिवशी म्हणजे तयारीनंतरच्या दिवशी मुख्य याजक व परुशी पिलाताकडे जमून म्हणाले, '**महाराज, तो ठक जिवंत असता 'तीन दिवसांनंतर मी उठेन' असे म्हणाला होता, ह्याची आम्हांला आठवण आहे**. म्हणून तिसऱ्या दिवसापर्यंत कबरेचा बंदोबस्त करण्यास सांगावे, नाहीतर कदाचित त्याचे शिष्य [रात्री] येऊन त्याला चोरून नेतील व 'तो मेलेल्यांतून उठला आहे' असे लोकांना सांगतील; मग*

*शेवटली फसगत पहिल्यापेक्षा वाईट होईल.' पिलात त्यांना म्हणाला, 'तुमच्याजवळ पहारा आहे; जा, तुमच्याने होईल तसा बंदोबस्त करा.' मग पहारा बरोबर घेऊन ते गेले आणि त्यांनी धोंडेवर शिक्कामोर्तब करून कबरेचा बंदोबस्त केला."*
(मत्तय २७:६२-६६)



शिक्कामोर्तब केले होते. कबरेच्या ठिकाणी चांगले-शस्त्रधारी रोमी सैनिक पहारा देत होते. असे दिसते की नासोरी येशूची कथा आता संपणार होती.

मग रविवारची सकाळ उजाडली.



# धडा २५

# मृत्यूचा पराभव झाला

**प**वित्र शास्त्र आदामाविषयी म्हणते, *“आणि तो मरण पावला”* (उत्पत्ती ५:५). येथेच त्याची पृथ्वीवरील कथा संपली.

आदामाच्या वंशजांसाठी हे काही वेगळे नव्हते.

उत्पत्तीचा पाचवा अध्याय त्यांच्या थडग्यावर कोरलेल्या शब्दांची नोंद देते.

“ आणि तो मरण पावला.

आणि तो मरण पावला.

आणि तो मरण पावला.

आणि तो मरण पावला.

पापाने-प्रभावित पुरुष आणि स्त्रियांचा इतिहास असाच आहे. ते जगले, मरण पावले आणि पुरले गेले; पिढयानपिढया, शतकानुशतके.

परंतु मसीहाची कथा कबरेत संपत नाही.

## रिकामी कबर

*“शब्बाथानंतर आठवडयाचा पहिला दिवस उजाडताच मरीया मग्दालीया व दुसरी मरीया, ह्या कबर पाहण्यास आल्या. तेव्हा पाहा, मोठा भूमिकंप झाला; कारण प्रभूचा दूत स्वर्गातून उतरला, त्याने येऊन धोंड एकीकडे लोटली आणि तिच्यावर तो बसला. त्याचे रूप विजेसारखे होते व त्याचे वस्त्र बर्फासारखे शुभ्र होते. त्याच्या भयाने पहारेकरी थरथर कापले व मृतप्राय झाले.*

*देवदूताने त्या स्त्रियांना म्हटले, 'तुम्ही भिऊ नका, वधस्तंभावर खिळलेल्या येशूचा शोध तुम्ही करत आहात, हे मला ठाऊक आहे.* ***तो येथे नाही; कारण त्याने सांगितल्याप्रमाणे तो उठला आहे****. या, प्रभू निजला होता ते स्थळ पाहा. आणि लवकर जाऊन त्याच्या शिष्यांना सांगा की, तो मेलेल्यांतून उठला आहे; पाहा, तो तुमच्याआधी गालीलात जात आहे, तेथे तो तुमच्या दृष्टीस पडेल; पाहा, मी तुम्हांला हे सांगितले आहे.' तेव्हा त्या स्त्रिया भीतीने व हर्षातिशयाने कबरेपासून लवकर निघून त्याच्या शिष्यांना हे वर्तमान सांगण्यास धावत गेल्या. मग पाहा, येशू त्यांना भेटून म्हणाला, "****कल्याण असो****.' त्यांनी जवळ जाऊन त्याचे चरण धरून नमन केले. तेव्हा येशूने त्यांना म्हटले, '****भिऊ नका****; जा माझ्या भावांना सांगा की, त्यांनी गालीलात जावे; तेथे मी त्यांच्या दृष्टीस पडेन."* (मत्तय २८:१-१०)



मृत्यू मसीहाला धरून ठेवू शकला नाही. कारण त्याच्या स्वतःचे कोणतेही पाप नसल्यामुळे, देवाने त्याला मृत्यूतून उठवले. येशूने जगाच्या पापांसाठी केवळ शिक्षाच भोगली नव्हती, पण त्याने त्या शिक्षेवर विजय मिळवला होता. त्याने प्रत्यक्ष मृत्यूवरच विजय मिळवला होता!

सैतान आणि त्याची भूते थरथर कापली असतील.

धार्मिक नेते चक्रावून गेले होते.

*"त्या जात असता [स्त्रिया ज्यांनी त्यांच्या पुनरुत्थित प्रभूला आत्ताच पाहिले होते], पाहा, पहारेकऱ्यांतील कित्येकांनी नगरात जाऊन झालेले सर्व वर्तमान मुख्य याजकांना सांगितले.*

> *तेव्हा त्यांनी व वडिलांनी मिळून मसलत केली आणि शिपायांना पुष्कळ पैसे देऊन सांगितले की, 'आम्ही झोपेत असताना त्याच्या शिष्यांनी रात्री येऊन त्याला चोरून नेले,'असे म्हणा' आणि ही गोष्ट सुभेदाराच्या कानावर गेली तर आम्ही त्याची समजूत घालून तुम्हांला निर्धास्त करू.' मग त्यांनी पैसे घेऊन शिकवल्याप्रमाणे केले; आणि ही जी गोष्ट यहूदी लोकांमध्ये पसरवण्यात आली, ती आजपर्यंत चालू आहे."* (मत्तय २८:११-१५)

येशूच्या शत्रूंना माहित होते की कबर रिकामी होती. सत्य झाकण्यासाठी ते हतबल होते. मनुष्य ज्याला त्यांनी मारले होते तो पुन्हा जिवंत झाला आहे हे लोकांना कळावे अशी त्यांची इच्छा नव्हती.

## मृत्यूचा पराभव झाला

एदेन बागेत, देवाने आदामाला चेतावणी दिली होती की जर त्याने निर्माणकर्त्याचा एकही नियम मोडला, तर तो *"**खात्रीने मरेल**."* सैतानाने त्याच्या उलट म्हटले, *"तुम्ही खरोखर **मरणार नाही**"* आणि मग आदामाला आणि संपूर्ण मानवजातीला मृत्यू आणि विनाशाच्या मार्गावर नेले. चार हजार वर्षे मृत्यूने पुरुष, स्त्रिया आणि मुलांना त्याच्या निर्दयी पकडमध्ये जखडून ठेवले होते. मग देवाच्या पुत्राने मृत्यूला आव्हान दिले, त्यास पराभूत केले आणि सार्वकालिक जीवनाचे दार उघडे केले.

> *"कारण जसे **आदामामध्ये सर्व मरतात** तसे **ख्रिस्तामध्ये सर्व जिवंत केले जातील**."* (१ करिंथ. १५:२२)

कालच शेजारच्या एका वृद्ध स्त्रीने मला म्हटले, *"जीवनात एका गोष्टीला मी भिते तो मृत्यू आहे."* मी किती आनंदी होतो की तिला त्या एकमेव बद्दल बोलावे जो मृत्यूतून पार गेला होता आणि जिवंत झाला होता, त्या भयावह शत्रूवर विजय मिळवला होता.

> *"ज्या अर्थी 'मुले' एकच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे. आणि जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना मुक्त करावे."* (इब्री. २:१४-१५)

समजा येशू केवळ आपल्या पापांसाठी **मरण पावला** परंतु मृत्यूतून पुन्हा उठला नाही.

मृत्यूची मग अजूनही भीती होती.

मृत्यूवर विजय मिळवण्याद्वारे, सैतानाचे सर्वात शक्तिशाली शस्त्र आणि माणसाच्या सर्वात भयावह शत्रूपेक्षा तो मोठा आहे हे प्रभू येशूने सिद्ध केले. येशूने मृत्यूवर विजय मिळवल्यामुळे, ते जे त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांना या जीवनात आणि पुढील जीवनात कशालाही भिण्याची गरज नाही.

देवाचा संदेश सरळ आहे : जर तुम्ही त्याच्या पुत्रावर विश्वास ठेवता ज्याने तुमच्यासाठी वधस्तंभावर दु:खसहन केले, तुमच्यासाठी मृत्यू पावला, आणि तुमच्यासाठी तिसऱ्या दिवशी पुनरुत्थित झाला, तर तो तुम्हांला मृत्यूच्या विळख्यातून सोडवेल आणि तुम्हांला त्याचे सार्वकालिक जीवन देईल.

पापाने ओलीस ठेवलेल्या जगासाठी ही देवाची सुवार्ता आहे.

*"...शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांबद्दल मरण पावला; तो* ***पुरला गेला; शास्त्राप्रमाणे*** *तिसऱ्या दिवशी त्याला* ***पुन्हा उठवण्यात आले."*** (१ करिंथ. १५:३-४)

विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी, ख्रिस्त येशू म्हणतो :

*"..मी जिवंत आहे म्हणून तुम्हीही जिवंत राहाल.... भिऊ नकोस; जो पहिला व शेवटला, आणि जो जिवंत तो मी आहे; मी मेलो होतो तरी पाहा, मी युगानुयुग जिवंत आहे, आणि मरणाच्या व अधोलोकाच्या किल्ल्या माझ्याजवळ आहेत."* (योहान १४:१९; प्रकटीकरण १:१७-१८)

## सैतानाचा पराभव झाला

जेव्हा येशूने मृत्यूच्या क्षेत्रात प्रवेश केला आणि तीन दिवसांनंतर तेथून बाहेर आला, युद्धाच्या भाषेत त्याने मोठया जमिनीवर ताबा मिळवला-एक लाभ तो कधीही सोडणार नाही.

सैतान हा पराभूत शत्रू आहे. जरी तो आणि त्याची भुते हताशपणे लढतात, तरी ते विजयी होऊ शकत नाही.

ज्या दिवशी आदाम व हव्वेने पाप केले तेव्हा देवाने एदेन बागेत दिलेले अभिवचन कसे पूर्ण केले हे तुम्ही पाहता का? जसे त्याने भविष्य केले होते, स्त्रीचे संतान (येशू) सर्पा द्वारे (सैतान) जखमी केले गेले आणि त्याच जखमांनी सैतानाच्या नाशाला निश्चित केले.

*"...सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रकट झाला."* (१योहान ३:८)

त्याचा मृत्यू, पुरणे आणि पुनरुत्थानाद्वारे, येशूने पापाच्या शापावर विजय मिळवला, जे त्याने स्पष्ट केले होते:

*"…..परत **माती**ला जाऊन मिळणार."* (उत्पत्ती ३:१९)

चार हजार वर्षे, मृत्यूच्या सडण्याच्या प्रक्रियेने आदामाच्या मृत वंशजांना पुन्हा मातीत रुपांतर केल्यामुळे सैतानाने थट्टा केली होती. पण आता येथे एकमात्र होता ज्याचे शरीर पुन्हा मातीला जाऊन मिळाले नाही!

त्याचे शरीर कबरेत का कुजले नाही?

मृत्यूला त्याच्यावर सामर्थ्य नाही कारण तोच एकमात्र निष्पाप होता. हजार वर्षांपूर्वी दावीद संदेष्ट्याने घोषणा केली होती :

*"...राहू देणार **नाहीस**,.....तू आपल्या भक्तास **कुजण्याचा** अनुभव येऊ देणार नाहीस."* (स्तोत्र. १६:१०)

पवित्र एकमात्रने आपल्यासाठी सैतान, पाप आणि मृत्यूवर विजय मिळवला होता.

## पुरावा

येशूचे मृत्यूमधून पुनरुत्थित होण्याचे पुरावे असंख्य आणि पटवून देणारे आहेत.[२२३]

कबर रिकामी होती.

शव कोठेही सापडले नाही.

रिकामी कबर, देवदूताची घोषणा ऐकणाऱ्याचे, येशूला जिवंत पाहण्याचे, त्यास स्पर्श करण्याचे, आणि त्याच्याबरोबर बोलणाऱ्याचे साक्षीदार हे प्रथम स्त्रिया होत्या. जर शुभवर्तमान नोंदी ह्या निर्माण केलेल्या असतील, तर चार पुरुष ज्यांनी ते लिहिले त्यांनी सर्व गोष्टींमध्ये प्रथम स्थान म्हणून स्त्रियांना श्रेय दिले असते असे तुम्हांला वाटते का?!

येशूचे पुनरुत्थानानंतरचे अनेक वेळा प्रकट होण्याच्या नोंदी पुष्कळ आहेत. त्यानंतर अनेक दशके, शेकडो विश्वसनीय साक्षीदार पुनरुत्थित मसीहाबरोबर चालले आणि बोलले याची साक्ष देतील.

शिष्यांनी येशूला दु:खसहन आणि मरताना पाहिले होते. ते दु:खी झाले होते. त्यांची आशा संपली होती कारण मसीहा कधीही मरू शकत नाही ही त्यांची कल्पना चुकीची होती. ते निराश

आणि भयभीत होऊन त्यांच्या घरी परत गेले होते. मग काहीतरी घडले. त्यांनी येशूला जिवंत पाहिले. त्याला वधस्तंभी दिले जाईल आणि तिसऱ्या दिवशी तो पुन्हा उठेल हे येशूने त्यांना सांगितले होते याविषयी त्यांना अचानक आठवले.[२२४] शेवटी ते संदेष्टयांच्या लेखास समजले.

पूर्वीचे भित्रे आता ख्रिस्ताचे धाडसी साक्षीदार झाले.

येशू मृत्यूतून उठल्यानंतर फार वेळ झाला नव्हता, पेत्र, जो संभ्रमित आणि घाबरलेला होता, तो आता यरुशलेमेच्या विरोध होणाऱ्या रस्त्यावर येशूला वधस्तंभावर खिळण्याचा कट रचणाऱ्यांना निर्भयपणे घोषणा करत होता :

> *"जो पवित्र व नीतिमान त्याला तुम्ही नाकारले,....**आणि तुम्ही जीवनाच्या अधिपतीला जिवे मारले; पण देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले** ह्याचे आम्ही साक्षी आहोत.....बंधुजनहो, तुम्ही, तसेच तुमच्या अधिकाऱ्यांनीही जे केले ते अज्ञानामुळे केले हे मी जाणून आहे. परंतु देवाने, आपल्या ख्रिस्ताने दु:ख सहन करावे असे **जे सर्व संदेष्टयांच्या मुखाने पूर्वी सांगितले होते ते त्याने त्याप्रमाणे पूर्ण केले.** तेव्हा तुमची पापे पुसून टाकली जावीत म्हणून पश्चात्ताप करा व वळा."*
> (प्रेषित. ३:१४-१९)

पेत्र आणि इतर शिष्यांसाठी, एकमात्र ज्याने त्यांना सार्वकालिक जीवन दिले होते त्याच्यासाठी कितीही मोठी संकटे सोसणे हे मोठे ठरणार नव्हते.

ख्रिस्ताच्या शिष्यांची (त्यांना ख्रिस्ती[२२५] लोक देखील म्हणतात) थट्टा करण्यात आली, त्यांना तुरुंगात टाकण्यात आले, आणि फटके मारण्यात आले आणि प्रभू येशूसाठी त्यांच्या धाडसी साक्षीसाठी त्यांचा वध करण्यात आला. पेत्राचा स्वयं छळ करण्यात आला-धर्मनिरपेक्ष इतिहासानुसार, शेवटी त्याला वधस्तंभी खिळण्यात आले-उलटे. तरीही पेत्र आणि इतर शिष्यांनी आनंदाने अशा छळाचा स्वीकार केला कारण त्यांना ठाऊक होते की त्यांचा तारणारा आणि प्रभूने मृत्यू आणि नरकावर विजय मिळवला आहे.[२२६] त्यांना ठाऊक होते की देवाने त्यांना क्षमा, धार्मिकता आणि सार्वकालिक जीवन दिले आहे. मृत्यू आता त्यांना भयभीत करू शकत नव्हता कारण त्यांना ठाऊक होते की ज्याक्षणी त्यांचे भौतिक शरीर मरते, त्याचक्षणी त्यांचे सार्वकालिक प्राण आणि आत्मे हे स्वर्गात *"प्रभूच्या उपस्थितीत"* असतील. (२ करिंथ. ५:८)

आता त्यांना काहीही भीती दाखवू शकत नव्हते. त्यांच्याजवळ जगासाठी संदेश होता, एक संदेश जो त्यांना त्यांच्या जीवनापेक्षा अधिक अर्थपूर्ण होता.

अथेनै या प्राचीन शहरात शंका, थट्टा करणाऱ्या जमावाला ख्रिस्ताच्या एका अनुयायाच्या संदेशाचा सारांश येथे आहे :

> *"अज्ञानाच्या काळांकडे देवाने डोळेझाक केली, परंतु आता* ***सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा*** *अशी तो माणसांना आज्ञा करतो. त्याने असा एक दिवस नेमला आहे की,* ***ज्या दिवशी तो त्याने नेमलेल्या मनुष्याच्या द्वारे जगाचा न्यायनिवाडा नीतिमत्वाने करणार आहे; त्याने त्याला मेलेल्यांतून उठवून ह्याविषयीचे प्रमाण सर्वांस पटवले आहे****."* (प्रेषित. १७:३०-३१)

त्याचा निष्कर्ष हा साधा आणि सरळ होता : पश्चात्ताप करा! तुम्ही स्वतःला देवाच्या निश्चित न्यायापासून वाचवू शकाल असा विचार करणे सोडा. त्याऐवजी, तुमच्या पापांसाठी त्याचे रक्त वाहणाऱ्या आणि मृत्यूमधून उठणाऱ्या तारणाऱ्यावर पूर्णपणे विसंबून राहा.

## सकारात्मक पुरावा

येशू हा तारणारा आणि जगाचा न्यायाधीश आहे याविषयी तुम्ही आणि मी कसे खात्रीशीर होऊ शकतो? आपण आत्ताच उत्तर वाचले आहे. देवाने *"**त्याला मेलेल्यांतून उठवून** ह्याविषयीचे **प्रमाण** सर्वांस पटवले आहे."*

येशू हा तो एकच आणि एकमात्र तारणारा आहे याविषयी आणखी किती पुराव्यांची आवश्यकता आहे? आपण आपल्या सार्वकालिक नशिबाला इतर कोणावर का सोपवावे? दु:खदपणे, जगभरातील लोक मृत माणसांची पूजा करतात ज्यांनी ते जिवंत असताना देवाची कथा आणि संदेशाचा विरोध केला. का कोणी त्यांचा भरवसा कोणा माणसावर ठेवावा जो मृत्यूवर विजय मिळवण्यास असमर्थ होता आणि ज्याने देवाच्या वचनाचा विरोध केला, जेव्हा देवाचा निवडलेला एकच ज्याने मृत्यूवर विजय मिळवला आणि संदेष्टयांचे लेख पूर्ण केले?

ज्याप्रमाणे बायबल हे देवाचे वचन आहे याचा निर्विवाद पुरावा प्रदान करण्याचा देवाचा मार्ग म्हणजे पूर्ण केलेल्या भविष्यवाण्या आहेत, त्याप्रमाणेच येशूचे तिसऱ्या दिवशी पुनरुत्थित होणे हा देवाचा निर्विवाद पुरावा आहे की तोच फक्त आपल्याला सार्वकालिक मृत्यूपासून वाचवू शकतो आणि आपल्याला सार्वकालिक जीवन देऊ शकतो.

## सर्व लोकांसाठी तारणारा

शास्त्रलेख स्पष्ट आहे. येशूचा मृत्यू आणि पुनरुत्थानाविषयी संदेश हा *"सर्वत्र सर्वांसाठी"*

आहे. यावर जोर दिला गेला पाहिजे, कारण काही लोक तुम्हांला हे सांगण्याचा प्रयत्न करतील की येशू फक्त यहूद्यांसाठीच आला होता.

सत्यापासून दूर काहीही असू शकत नाही.[२२७]

ख्रिस्ताचे पृथ्वीवरील सेवाकार्य हे यहूद्यांवर केंद्रित होते हे जरी खरे असले तरी, त्या राष्ट्राकडे त्याच्या येण्याचा उद्देश हा सर्व जगाला तारण प्रदान करण्याचा होता. सातशे वर्षांपूर्वी यशया संदेष्टयाने देवाचे त्याच्या पुत्राबद्दलचे अभिवचन लिहिले होते: *"....माझ्याकडून होणारे तारण तू दिगंतापर्यंत न्यावे म्हणून मी तुला राष्ट्रांचा प्रकाश असा नेमतो."* (यशया ४९:६)

यहूदी नेते त्यांचा राजा म्हणून त्याचा स्वीकार करणार नाही हे जाणून ख्रिस्त या जगात आला. त्यास हे देखील ठाऊक होते की अगदी त्याच नाकारामुळे तो पापाच्या शिक्षेची भरपाई करेल आणि जगाला तारण प्रदान करेल.

> *"तो जगात होता व जग त्याच्या द्वारे झाले, तरी जगाने त्याला ओळखले नाही. जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही. परंतु **जितक्यांनी** त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे **त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना** त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला."* (योहान १:१०-११)

येशू ख्रिस्त सर्व लोकांचा तारणारा आहे, परंतु *"फक्त जे त्याच्या नावावर विश्वास ठेवतात* (म्हणजे, पाप्यांना तारण्यासाठी तो कोण आहे आणि त्याने काय केले आहे)*"* त्यांनाच *"देवाची मुले होण्याचा अधिकार"* दिला जाईल.

माझ्या मित्रा, देव तुम्हांवर प्रीती करतो आणि तुम्हांला त्याच्या पुत्राच्या जीवनाएवढेच महत्व देतो. असे असले तरी, विश्वास ठेवण्यासाठी तो तुमच्यावर बळजबरी करणार नाही.

तो निवड तुमच्यावर सोडतो.

> *"देवाने जगावर एवढी प्रीती केले की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, **जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो** त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."* (योहान ३:१६)

## आणखी संभ्रम नाही

येशू मृत्यूतून उठला त्याच दिवशी, तो भ्रमात पडलेल्या काही शिष्यांसोबत चालला आणि बोलला जे अजूनपर्यंत समजले नव्हते की मसीहासाठी रक्त वाहणे आणि पुन्हा जिवंत होणे का

आवश्यक होते. येशू त्यांना म्हणाला :

> *"**अहो निर्बुद्ध व संदेष्ट्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींविषयी विश्वास धरण्यास मतिमंद अशा माणसांनो**! ख्रिस्ताने ही दु:खे सोसावी आणि आपल्या गौरवात जावे, ह्याचे अगत्य नव्हते काय?' मग त्याने मोशे व सर्व संदेष्टे ह्यांच्यापासून आरंभ करून संपूर्ण शास्त्रलेखांतील **आपणाविषयीच्या** गोष्टींचा अर्थ त्यांना सांगितला."*
> (लूक २४:२५-२७)

शेवटी, त्यांचा संभ्रम दूर झाला. ते इतके आंधळे कसे होऊ शकतात? मसीहा राजकीय शत्रूंना तात्पुरते संपविण्यासाठी आला नव्हता; तो त्याहूनही निर्दयी शत्रू : सैतान, पाप, मृत्यू आणि नरकावर विजय मिळवण्यासाठी आला होता.

त्या दिवशी नंतर, येशू शिष्यांना माडीवरल्या खोलीत प्रकट झाला जेथे ते यरुशलेमेत राहिले होते. त्याने त्यांना त्याच्या हातापायावर खिळ्यांचे वण दाखविले आणि त्यांच्याबरोबर जेवला आणि त्यांना सांगितले :

> *"मी तुमच्याबरोबर असताना तुम्हांला सांगितलेली माझी वचने हीच आहेत की, **मोशेचे नियमशास्त्र, संदेष्टे व स्तोत्रे ह्यांत माझ्याविषयी जे लिहिले आहे ते सर्व पूर्ण होणे अवश्य आहे**.' तेव्हा त्यांना शास्त्र समजावे म्हणून त्याने त्यांचे मन उघडले; आणि त्याने त्यांना म्हटले, 'असे लिहिले आहे की, ख्रिस्ताने दु:ख सोसावे, तिसऱ्या दिवशी मेलेल्यांतून उठावे, आणि यरुशलेमेपासून आरंभ करून सर्व राष्ट्रांना त्याच्या नावाने पश्चात्ताप व पापक्षमा घोषित करण्यात यावी. तुम्ही ह्या गोष्टींचे साक्षी आहात."*
> (लूक २४:४४-४८)

येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले की राष्ट्रांसाठी *"त्यांनी ह्या गोष्टींचे साक्षीदार व्हावे."* त्यांचा संदेश स्पष्ट होता : स्वर्गाच्या प्रभूने प्रत्येक व्यक्तीसाठी पापाच्या शिक्षेची भरपाई केली आहे आणि मृत्यूवर विजय मिळवला आहे. जेथे देवासमोर पश्चात्ताप (मनाचा पालट) आणि प्रभू येशू ख्रिस्तावर आणि त्याच्या मुक्तीच्या कार्यावर विश्वास (मनापासून भरवसा) आहे, तेथे देव तुम्हांला क्षमा आणि सार्वकालिक जीवन प्रदान करेल.

## विसाव्यासाठी आमंत्रण

सृष्टी निर्मितीच्या सातव्या दिवसाची आठवण करा.

देवाने त्या दिवशी काय केले? त्याने विसावा घेतला.

*"त्याने विसावा का घेतला? त्याने विसावा घेतला कारण त्याने त्याचे कार्य* ***पूर्ण केले होते****..... देवाने जे केले होते त्या कामाला पूर्ण केले, आणि* ***केलेल्या सर्व कामापासून*** *त्याने सातव्या दिवशी विसावा घेतला."* (उत्पत्ती २:१-२)

सृष्टी निर्मितीच्या देवाच्या कामामध्ये आणखी काहीही जोडण्याची आवश्यकता नाही. ते पूर्ण झाले होते. त्याप्रमाणेच, मुक्तीच्या देवाच्या कामामध्ये इतर काहीही जोडण्याची आवश्यकता नाही. "ते पूर्ण झाले आहे!'

याप्रमाणे देवाने विसावा घेतला आणि सृष्टी निर्मितीच्या त्याच्या कामाचा आनंद घेतला, त्याप्रमाणेच तो तुम्हांला व मला त्याच्या तारणाच्या पूर्ण केलेल्या कामाचा आनंद आणि विसावा घेण्यास आमंत्रित करतो. *"कारण जो कोण* ***त्याच्या विसाव्यात आला आहे'****, त्यानेही,* ***जसा देवाने आपल्या कृत्यांपासून विसावा घेतला,' तसा आपल्या कृत्यांपासून विसावा घेतला आहे."*** (इब्री. ४:१०)

जगभरातील दहा हजार धर्मे ओरडत राहतात, 'काहीही पूर्ण झालेले नाही. हे करा! ते करा! कठीण प्रयत्न करा!" *येशू म्हणतो, "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे* ***मी तुम्हांला विसावा देईन."*** (मत्तय ११:२८)

देवाने तुमच्यासाठी काय केले आहे त्यामध्ये तुम्ही विसावा आणि आनंद घेत आहात का?

## प्रभूसोबत चाळीस दिवस

प्रभू येशूने मृत्यूतून उठल्यावर चाळीस दिवसापर्यंत त्याच्या शिष्यांसोबत वेळ घालवला. देवाच्या राज्याविषयी त्याने त्यांना पुष्कळ गोष्टी शिकवल्या. त्यांनी त्यास निरखून पाहिले आणि त्याच्या पुनरुत्थित शरीराला स्पर्श केला-एक शाश्वत, वेळ आणि अवकाशाचे निर्बंध नसलेले गौरवी शरीर –एके दिवशी सर्व खरे विश्वासणारे त्याच प्रकारचे शरीर प्राप्त करतील.

शिष्य प्रभू येशूसोबत चालले, बोलले आणि जेवले. तो त्यांना लवकरच सोडून जाईल याची त्याने त्यांना आठवण करून दिली, परंतु त्यांच्यात राहण्यासाठी पिता पवित्र आत्म्याला पाठवेल. त्याचा आत्मा त्यांना जगाच्या राष्ट्रांना त्यांची साक्ष देण्यासाठी मार्गदर्शन आणि शक्ती प्रदान करेल, मग एके दिवशी तो-येशू- पृथ्वीवर परत येईल की जगाचा परिपूर्ण धार्मिकतेने न्याय करावा.

येशूच्या पुनरुत्थानानंतरच्या चाळीसाव्या दिवशी, तो यरुशलेमेच्या पूर्व दिशेला जैतून

डोंगरावर त्याच्या शिष्यांना भेटला.

त्याच्या *"पित्याची घरी"* जाण्याची ही वेळ होती. (योहान १४:२)

## स्वर्गारोहण

*"तो व ते एकत्र जमले असताना त्याने त्यांना आज्ञा केली की, 'यरुशलेम सोडून जाऊ नका, तर पित्याने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून ऐकले आहे तिची वाट पाहा; कारण योहानाने पाण्याने बाप्तिस्मा केला खरा; पण तुमचा बाप्तिस्मा थोडयाच दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल.' ....**परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.'***

*असे सांगितल्यावर त्यांच्या डोळ्यांदेखत **तो वर घेतला गेला**; आणि मेघाने त्याला त्यांच्या दृष्टीआड केले.*

*तो जात असता ते आकाशाकडे निरखून पाहत होते, तेव्हा पाहा, शुभ्र वस्त्र परिधान केलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे राहिले. ते म्हणाले, 'अहो गालीलकरांनो, तुम्ही आकाशाकडे का पाहत उभे राहिलात? **हा जो येशू तुमच्यापासून वर आकाशात घेतला गेला आहे तोच, तुम्ही त्याला जसे आकाशात जाताना पाहिले, तसाच येईल."*** (प्रेषित. १:४-११)

## स्वर्गाचा विजय उत्सव

अशा प्रकारे, ज्याप्रमाणे संदेष्टयांनी भविष्यवाणी केली होती, देवाच्या पुत्राचे *"स्वर्गारोहण"*[२२८] झाले. एकच जो, काही तेहतीस वर्षांपूर्वी, ज्याने स्वर्गातील देवदूतांच्या प्रशंसेच्या ऐवजी मनुष्यांकडून थट्टा होण्याचे जे स्वेच्छेने स्वीकारले होते तो आता घरी येत होता! पण येथे त्याच्याविषयी काहीतरी वेगळे होते. तो ज्याने मनुष्याला त्याच्या प्रतीरूपात निर्मिले होते तो आता ते मनुष्याचे प्रतिरूप धारण करून होता.

देवाच्या पुत्राचे स्वर्गाला परतण्याविषयी पवित्र शास्त्र पुष्कळ तपशील देत नाही. पण हे आपल्याला ठाऊक आहे : ती एक गौरवी घटना होती!

जेव्हा प्रभू स्वर्गाच्या दारातून प्रवेश करत होता त्या वेळी आपण देवदूतांच्या असंख्य सेनेची आणि आदामाच्या वंशजांची कल्पना करू शकतो जे आपला श्वास रोखून होते. ते त्याला

देवाचा पुत्र आणि गौरवाचा प्रभू म्हणून चांगले ओळखत होते, पण आता ते मनुष्याचा पुत्र आणि देवाचा कोकरा म्हणून त्यास भेटणार होते.

संपूर्ण स्वर्ग शांत होता.

गीतांच्या वैभवी गाण्याने आणि देवदूतांच्या मोठया घोषणेने अचानकपणे शांतता भंग झाली : *"अहो वेशींनो, आपल्या कमानी उंच करा; पुरातन द्वारांनो, उंच व्हा; म्हणजे प्रतापशाली राजा आत येईल."* (स्तोत्र. २४:७)

द्वार पूर्णपणे उघडे झाले होते आणि स्वर्गातील गर्जनेच्या गजरात, विजेता चालत होता, देवाचा स्वतःचा पुत्र, शब्द, कोकरा, युद्धात-जखमी झालेला मनुष्याचा पुत्र-**येशू!**

प्रशंसेच्या गजरात तो चालत होता, पित्याच्या सिंहासनाकडे जात होता. मागे वळत, तो आदामाच्या मुक्त केलेल्या वंशजांच्या अगणित लोकांकडे पाहत होता. आणि मग तो बसला.[२२९]

उद्देश पूर्ण झाला होता.

मुक्त केलेले लोक त्याच्यासमोर नमन करत होते आणि घोषित केले, जसे काही एकाच आवाजात :

***"वधलेला कोकरा....योग्य आहे !"*** (प्रकटीकरण ५:१२)

किती अद्भुत उत्सव झाला असेन! किती अद्भुत उत्सव हा आहे. कधीही न संपणारा हा उत्सव आहे.



# धडा २६

# धार्मिक आणि देवापासून फार दूर

**क**दाचित तुम्ही ही म्हण ऐकली असेल : दृष्टी ही नेहमी २०/२० असली पाहिजे. चिन्ह २०/२० हे स्पष्ट दृष्टीसाठी उत्तर अमेरिकन नेत्रचिकित्सकाचे मानक आहे. जर तुमची दृष्टी २०/२० असेल तर तुम्हांला चष्म्याची गरज नाही.

दूरदृष्टी हे आधीच घडलेल्या गोष्टींकडे मागे वळून पाहण्याशी संबंधित आहे. दूरदृष्टी तुम्हांला आम्ही किंवा इतर कोणीतरी कार्य करण्याची आवश्यकता होती ते पाहू देते, पण त्यात आधीच उशीर झाल्यानंतर. अशी दूरदृष्टी ही फार साहाय्यक नाही.

तथापि, शतकानुशतके देवाकडून प्रकट केलेली कथा आणि संदेश समजण्याचा विषय येतो तेव्हा, दूरदृष्टी ही विलक्षणपणे साहाय्यक आहे. ती तुम्हांला मुख्य अडथळयांवर मात करू देते आणि चुकांपासून सत्यात फरक करू देते. म्हणूनच येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले :

> *"**पण धन्य तुमचे डोळे, कारण ते पाहत आहेत;** आणि तुमचे कान, कारण ते ऐकत आहेत. मी तुम्हांला खचित सांगतो की, तुम्ही जे पाहत आहात **ते पाहण्यास पुष्कळ संदेष्टे व नीतिमान जन उत्कंठीत होते**, तरी त्यांना पाहण्यास मिळाले नाही; आणि तुम्ही जे ऐकता ते ऐकण्यास ते उत्कंठीत होते, तरी त्यांना ऐकण्यास मिळाले नाही."*
>
> (मत्तय १३:१६-१७)

मसीहाचे पृथ्वीवर पहिल्या आगमनानंतर राहणारे, आपण इतिहासात पाहण्यास, पूर्ण पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यास, आणि देवाची परिपूर्ण योजना स्पष्टपणे पाहण्यास सक्षम आहोत म्हणून धन्य आहोत.

मनातील या विचारासह, आणि पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासात आपण

साक्षीदार झालेल्या सर्व गोष्टींचा विचार करून, चला आपण पुन्हा एकदा प्रारंभाच्या पुस्तकाकडे वळू या.

## काइन आणि हाबेलास दूरदृष्टीवाचून पाहणे

उत्पत्तीचा चौथा अध्याय स्पष्ट आहे : काइन व हाबेल दोघेही पापाच्या समस्येने जन्मलेले होते. जेव्हा ते प्रौढ झाले, प्रत्येकाने देवाची उपासना करण्याचा प्रयत्न केला पण केवळ एकाचीच उपासना देवाकडून स्वीकारण्यात आली.

> *"परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा **आदर केला**. पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा त्याने **आदर केला नाही.**"* (उत्पत्ती ४:४-५)

पवित्र शास्त्राच्या दूरदृष्टीने, पाप्यांचा तारणारा येशूची कथा ऐकल्यानंतर, हे सोपे होते की हजारो वर्षांपूर्वी, *"परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला. पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा त्याने आदर केला नाही."* का?

हाबेलाने वध केलेला कोकरा येशू , देवाच्या कोकऱ्याकडे इशारा करत होता, जो पाप्यांसाठी त्याचे रक्त वाहणार होता. काइनाच्या भाज्या येशूकडे इशारा करत नव्हत्या.

हाबेल जे घडणार होते त्याबददल पुढे पाहत असताना, आज आपण मागे पाहतो की येशूने त्याचा मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे आपल्यासाठी काय पूर्ण केले होते.

> *"येशू ख्रिस्ताचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून **शुद्ध करते.**"* (१ योहान १:७)

## तारणारा विश्वास

देवाने हाबेलास क्षमा केली तसेच तो आज पाप्यांना क्षमा करतो. जेव्हाजेव्हा एक पापी त्याची किंवा तिची अधार्मिकता स्वीकारतात आणि परमेश्वर आणि त्याच्या तारणावर **विश्वास** ठेवतात, त्या व्यक्तीला क्षमा केली जाते आणि देवाच्या धार्मिकतेच्या वरदानाने श्रेय दिले जाते. तसेच हे सर्व युगांतील सर्व संदेष्टे आणि विश्वासणाऱ्यांसाठीही आहे.

उदाहरणार्थ, आपण आधीच हे शोधले आहे, अब्राहामाने *"देवावर विश्वास ठेवला, आणि अब्राहामाचा हा विश्वास परमेश्वराने त्याचे **नीतिमत्व गणला**"* (उत्पत्ती १५:६). अब्राहामाने *"देवावर विश्वास ठेवला,"* असे म्हणणे म्हणजे अब्राहामाला आत्मविश्वास होता की जे देव बोलला आहे ते खरे आहे. अब्राहामाने देवाच्या वचनावर विश्वास ठेवला. त्याचा विश्वास हा फक्त देवावर होता.

अब्राहाम संदेष्टयाप्रमाणे, दावीद राजाने देखील देवाच्या अभिवचनांवर विश्वास ठेवला. आनंदी हृदयाने, दाविदाने लिहिले, *''ज्याच्या अपराधाची क्षमा झाली आहे ज्याच्या पापावर पांघरून घातले आहे, तो धन्य! ज्याच्या हिशेबी परमेश्वर अनीतीचा दोष लावत नाही व ज्याच्या मनात कपट नाही, तो मनुष्य धन्य!''* (स्तोत्र. ३२:१-२). दाविदाने हे देखील मोठयाने उच्चारले, *''खरोखर माझ्या आयुष्याचे सर्व दिवस मला कल्याण व दया ही लाभतील; आणि परमेश्वराच्या घरात मी चिरकाल राहीन.''* (स्तोत्र. २३:६)

येशू येण्यापूर्वी जे जगले होते, त्यांच्यासाठी पापाचे ऋण, हाबेल, अब्राहाम आणि दावीद अशा लोकांसारखे झाकलेले होते कारण त्यांनी परमेश्वर आणि त्याच्या योजनेवर विश्वास ठेवला होता. पण जेव्हा ख्रिस्त मरण पावला, त्यांच्या पापाचे ऋण नोंदवहीतून कायमचे रद्द करण्यात आले होते.

आज, आपण ख्रिस्ताच्या काळानंतर जगत आहोत. देवाची सुवार्ता ही आहे की जर प्रभू येशूने त्याच्या पर्यायी मृत्यू आणि विजयी पुनरुत्थानाने तुमच्यासाठी काय केले यावर तुम्ही विश्वास ठेवत असाल, तर देव त्याच्या नोंदवहीतून तुमची पापे पुसून टाकेल, आणि ख्रिस्ताच्या धार्मिकतेनुसार तुमच्या हिशेबी श्रेय देईल आणि तुम्हांला *''परमेश्वराच्या घरात कायमचे''* राहण्याची शास्वती देईल!''

जर तुम्ही विश्वास ठेवाल तर हे सर्व आणि आणखी अधिकाधिक हे तुमचे असेल.

प्रभू येशूवर विश्वास ठेवणे म्हणजे तुमचा संपूर्ण विश्वास त्याजवर आणि त्याने तुमच्यासाठी काय केले आहे यावर ठेवणे आहे. विश्वासाचा उत्तम अर्थ समजण्यासाठी, अनेक खुर्च्या असलेल्या एका खोलीत चालत असल्याची कल्पना करा. काही ह्या अर्थातच तुटलेल्या आहेत. इतर कमकुवत आणि लवकरच तुटणार आहेत. काही या बऱ्याच चांगल्या आहेत, पण निरखून पाहिल्यावर तुम्हांला आढळते की त्या देखील काही ठिकाणी कमकुवत आहेत आणि त्यावर विश्वास ठेवला जाऊ शकत नाही. ज्यावेळेस तुम्ही विचार करत असता की तेथे खोलीमध्ये एकही मजबूत खुर्ची नाही, त्याचवेळेस तुमची नजर एका खुर्चीवर पडते जी भक्कम आणि चांगली बनवलेली आहे. तुम्ही तिच्याकडे जाता आणि त्यावर बसता. तुम्ही तुमचा विश्वास तिजवर ठेवता. तुम्ही तिजवर आराम करता. तुम्हांला माहित आहे की ती तुमचा भार वाहील आणि तुम्हांला निराश करणार नाही.

येशू ख्रिस्त त्या कोणाला कधीही निराश करणार नाही जे त्याजवर आणि त्याच्या पूर्ण केलेल्या कामावर विसंबून राहतात.

## प्राणघातक विश्वास

आपला विश्वास हा लक्ष्याएवढाच चांगला आहे ज्यावर ते ठेवलेले आहे. प्रत्येकाला विश्वास आहे, पण सर्वांना विश्वासाचे ते लक्ष्य नाही.

हाबेलाने देवावर आणि क्षमा आणि धार्मिकतेच्या त्याच्या मार्गावर विश्वास ठेवला.

काइनाने त्याच्या स्वतःच्या कल्पना आणि स्वयं-प्रयत्नांवर विश्वास ठेवला.

काइन आणि ते सर्व ज्यांनी त्यांच्या पापाच्या समस्येसाठी देवाचे निदान आणि उपायाचा नकार केला यांची तुलना मी टेलीव्हिजनवर पाहिलेल्या सर्पाच्या खोलीशी करता येऊ शकते. एका माणसाला एका विशाल नागाने चावले होते, पण त्याने विष-विरोधी इंजेक्शनचा नकार केला ज्याने त्याचा जीव वाचवला असता. त्याने विचार केला की तो सर्पाच्या विषाचा प्रतिकार करण्यात चांगलाच सबळ आहे.

या माणसाला विश्वास होता, सबळ विश्वास, अयोग्य विश्वास. त्याने डॉक्टरच्या उपायाऐवजी त्याच्या स्वतःवर विश्वास ठेवला.

त्याच्या निवडीने त्याला जीव गमवावा लागला.

पवित्र शास्त्र स्पष्ट आहे. देवाच्या तारणाऐवजी आपल्या स्वतःच्या प्रयत्नांवर विश्वास ठेवणे, हे *"काइनाच्या मार्गाने जाणे"* आणि *"कायमचे अंधाराच्या गडदपणाचा"* सामना करणे आहे (यहूदा १:११, १३). काइनाची कल्पना, की एक व्यक्ती स्वतःच्या प्रयत्नाने त्याच्या किंवा तिच्या मार्गाने देवाची कृपा प्राप्त करू शकतात, ते नेहमीच देवाच्या मुक्तीच्या योजनेच्या विरोधात आहे.

तरीही आजपर्यंत पुष्कळ लोक *"काइनाच्या मार्गाचे"* अनुसरण करत आहेत.

## मनुष्याचे प्रमाण

एके दिवशी काही धार्मिक यहूद्यांनी येशूला विचारले, *"देवाची कामे आमच्या हातून व्हावीत म्हणून आम्ही काय करावे? येशूने त्यांना उत्तर दिले, 'देवाचे काम हेच आहे की, ज्याला त्याने पाठवले **त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा**"* (योहान ६:२८-२९). या चौकशी करणाऱ्यांना *"काम"* करायची इच्छा होती. येशूने त्यांना सांगितले की, *"त्याच्यावर विश्वास ठेवावा."*

या यहूद्यांद्वारे व्यक्त केलेला संभ्रम सर्वत्र ठाऊक आहे.

माझी बहिण आणि तिचा पती पापुआ न्यू गिनिया येथील हायलैंड येथे राहतात. ते एकाकी राहणाऱ्या आदिवासी लोकांना व्यवहारिक मार्गाने मदत करतात आणि त्यांना एक सत्य देवाबद्दल आणि सार्वकालिक जीवनाच्या त्याच्या संदेशाबद्दल शिकवतात. त्यांच्या एका

सहकाऱ्याकडून आलेली एक चिठ्ठी ही आहे, ज्याने एका माणसाबरोबर केलेल्या संवादाबद्दल तो बोलत आहे जो *"देवाच्या बोलण्यास"* ( जसे पापुआ येथील बायबलला म्हणतात) ऐकत होता.

*"येशूबद्दल "जीवनाची भाकर" याविषयी शिकवण ऐकल्यानंतर, तो [माणूस] म्हणाला, 'हे किती सोपे आहे, मी माझ्या संपूर्ण आयुष्यभर स्वर्गाला जाण्याच्या मार्गाचा आणि देवाच्या दृष्टीने शुद्ध राहण्याचा प्रयत्न केला आणि ते प्राप्त करण्याचा प्रयत्न करत राहिलो, आणि येथे तुम्ही आम्हांला सांगत आहात की आपल्याला केवळ येशूवर विश्वास ठेवायचा आहे?"*

मी त्याला सांगितले पुन्हा ऐक येशूने काय म्हटले होते, *"मीच जीवनाची भाकर आहे"* (योहान ६:३५). मग मी त्याला योहान ६:२९ पुन्हा वाचण्यास सांगितले, *"देवाचे काम हेच आहे की, ज्याला त्याने पाठवले **त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा."*** त्याने योहान ३:१६ देखील वाचले : ***'जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो*** त्याचा नाश होणार ***नाही*** तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल.' मी त्याला विचारले देवाला आपल्या मदतीची गरज आहे का, जसे काही देव पुरेसा शक्तिशाली नाही की आपले तारण करावे.

तो हसला, 'अर्थातच नाही! देवाला आपल्या मदतीची गरज नाही.'

'तर मग, देवाच्या वचनानुसार, तुला स्वर्गात नेण्यासाठी देवाला तुमच्या कामाची गरज आहे का?'

माणसाने त्याचे डोके हलवले आणि खोल विचारात निघून गेला."

देवाचा संदेश स्पष्ट असतानाही, जगभरातील लोक, एकाकी राहणारे आदिवासी लोकांपासून ते सभास्थान, चर्च, आणि मशिदींचे सुसंस्कृत सदस्य, या कल्पनेस धरून राहतात की न्यायाच्या दिवशी, देव त्यांच्या चांगल्या आणि वाईट कृत्यांना एका विशाल तराजूवर ठेवणार आहे. ते कल्पना करतात की जर ते चांगल्या कृत्यांच्या बाजूच्या तराजूत कमीत कमी ५१% भरले तर, त्यांचे स्वर्गात स्वागत केले जाईल, पण वाईट-तराजूच्या बाजूला जर ५१% किंवा जास्त दिसले तर, त्यांना नरकात पाठवण्यात येईल.

चांगली कामे वाईट कामांवर विजयी होतात अशी पद्धती मनुष्याच्या पृथ्वीवरील न्यायालयात कधीही वापरली गेली नाहीत. आणि देवाच्या स्वर्गीय न्यायालयातही तिचा कधीही वापर केला जाणार नाही.

यावर विचार करा.

तुमच्या चांगल्या कामावर आणि समर्पणावर तुमचे सार्वकालिक नशीब आधारित असावे असे खरोखर तुम्हांला वाटते का?



तुम्ही आभारी होऊ शकता की अशी मोजमाप पद्धती बायबलमध्ये आढळत नाही.

**देवाचे प्रमाण**

देवाला परिपूर्णतेची आवश्यकता आहे.

फक्त तेच जे देवाच्या धार्मिकतेचे दान प्राप्त करतील तेच त्याच्याबरोबर निवास करू शकतील. न्यायाच्या दिवशी तुमच्या नोंदवहीत जर पापाचा एक देखील अंश सापडला, तर तुम्ही स्वर्गात प्रवेश करणार नाही.

देव परिपूर्ण धार्मिकतेची मागणी करतो.

जसे आपण मागे विचार केला आहे, पाप देवाला तितकेच घृणास्पद आहे जितके आपल्या घरात कुजलेले डुकराचे शव आपल्यासाठी आहे. कुजणाऱ्या शवावर अत्तराची फवारणी केल्याने दूषितता आणि दुर्गंधी दूर होईल का? नाही! कितीही धार्मिक विधी त्या दूषितपणास काढू शकणार नाही जे आपल्याला देवासाठी अस्वीकारयोग्य करते.

आपल्या चहातील विषाचा एक थेंब जसा आपल्याला असह्य आहे, तसेच एकही पाप देवाला असह्य आहे. विषारी चहामध्ये आणखी पाणी घातल्याने त्याची प्राणघातक गुणवत्ता दूर होईल का? नाही! तसेच कितीही प्रमाणात चांगली कृत्ये आपल्याला सार्वकालिक न्यायापासून शुद्ध करू शकत नाही आणि वाचवू शकत नाही.

जेव्हा आपल्या पापाचे ऋण काढून टाकण्याचा किंवा आपल्या स्वतःला देवासमोर धार्मिक ठरवण्याचा विषय येतो, तेव्हा आपण असहाय्य आहोत. परंतु देवाचे आभार असो आपण हताश नाहीत. त्याच्या शुद्ध आणि परिपूर्ण उपस्थितीत कायम राहण्यासाठी ज्या सर्वांची

आवश्यकता आहे ते त्याने आपल्याला पुरविले आहे.

## विश्वास आणि कामे

प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या त्या सर्वांसाठी, ज्याने पापाचा दंड पूर्णपणे भरला आहे, त्यांना देव म्हणतो : *"कारण* ***कृपेनेच विश्वासाच्या द्वारे*** *तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून* ***कर्मे केल्याने हे झाले नाही."*** (इफिस. २:८-९)

स्वर्गात फुशारकी मारली जाणार नाही.

तारण *"कृपेने"* आहे. तारण *"देवाचे दान"* आहे. आपण ज्यासाठी पात्र नाही ते दान कृतज्ञतेने स्वीकारावे, एखाद्या पुरस्कारास प्राप्त करणे नाही, *"नाहीतर कोणी अभिमान बाळगावा."* तरीही, दु:खदपणे, अधिकतर धार्मिक लोक याच विषयावर गोंधळात राहतात, जसे मध्य पूर्वेकडील या संवाददात्यासारखे :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

एका सत्य देवावर विश्वास ठेवणे, चांगली कामे करणे, वाईट कृत्यांना टाळणे आहे हीच विश्वासात सर्वात महत्वाची गोष्ट आहे. हेच आपले तारण आहे.

जर सार्वकालिक न्यायापासून तारण आणि देवासोबत निवास करण्याचा अधिकार हा आपल्या स्वतःच्या प्रयत्नांवर आधारित असेल, तर आपण पुरेसे चांगले केले आहे किंवा स्वर्गात स्थान मिळण्यास पात्र होण्यासाठी आपण पुरेसे वाईट टाळले आहे हे आपण कधी कसे जाणू शकतो? आपण तारणाची खात्री कधीही देऊ शकत नाही.

जवळजवळ तीन सहस्राब्दीपूर्वी, संदेष्टा योनाने घोषित केले : *"तारण परमेश्वराकडून येते."* (योना २:९)

त्यासाठी देवाची स्तुती असो!

> *"कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढयता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही."* (इफिस. २:८-९)

देवाचे वचन स्पष्ट आहे : पापाच्या दंडापासून आपल्याला वाचवण्यासाठी आपल्या स्वतःच्या कामावर विश्वास ठेवणे हे तारणाचे देवाचे दान नाकारणे आहे.

तर मग पापाला टाळणे आणि चांगली कामे करणे हे कोठे व्यवस्थित बसते? पुढील वचन

आपल्याला सांगते :

> ***"आपण सत्कृत्ये करावीत म्हणून*** *ख्रिस्त येशूच्या ठायी निर्माण केलेले असे आपण त्याची हस्तकृती आहोत; ती सत्कृत्ये आचरत आपण आपला आयुष्यक्रम चालवावा म्हणून देवाने ती पूर्वी योजून ठेवली."* (इफिस. २:१०)

फरक हा स्पष्ट आहे. आपले तारण चांगल्या ***कृत्यांनी*** झालेले नाही. आपल्याला चांगल्या ***कृत्यांसाठी*** तारले गेले आहे.

> *"आपला थोर देव व तारणारा असा जो येशू ख्रिस्त....त्याने स्वतःला आपल्याकरता दिले, ह्यासाठी की, 'त्याने खंडणी भरून'* ***आपल्याला सर्व स्वैराचारापासून*** *मुक्त करावे,' आणि* ***चांगल्या कामात तत्पर*** *असे आपले स्वतःचे लोक आपणासाठी शुद्ध करून ठेवावे."* (तीत. २:१३-१४)

या पुस्तकाची प्रस्तावना माझ्या मित्राला गावातील एका वृद्ध व्यक्तीच्या टिप्पणीने सुरु झाली: *"चांगली कामे जी तू केली आहेत, त्यासाठी तू स्वर्गात जाण्यास पात्र आहे..."*

या माणसाच्या विचाराच्या गंभीर चुकीला देवाचे वचन उघड करते.

त्याच्या किंवा तिच्या स्वतःच्या *"चांगल्या कामाच्या"* आधारावर कोणीही *"स्वर्गात जाण्यास पात्र"* नाही. परंतु ते ज्यांनी देवाचे सार्वकालिक जीवनाचे अद्भुत बक्षीस प्राप्त केले आहे त्यांना वाईट टाळण्याची आणि देवाच्या गौरवाकरता आणि इतरांच्या आशीर्वादासाठी चांगली कामे करण्याची इच्छा असते.

## फळ हे मूळ नाही

चांगली कामे ही तारणासाठी कधीही आवश्यकता नव्हती, परंतु ते तारणाचे परिणाम नेहमी असले पाहिजेत. उदाहरणार्थ, येशूने त्याच्या शिष्यांना शिकवले :

> *"मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी; जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी. तुमची एकमेकांवर प्रीती असली* ***म्हणजे*** *त्यावरू* ***सर्व ओळखतील*** *की, तुम्ही माझे शिष्य आहात."*
> (योहान १३:३४-३५)

ज्याप्रमाणे येशूने लोकांवर प्रीती आणि काळजी केली त्याप्रमाणे लोकांवर प्रीती आणि काळजी करणे ही  तारणासाठी पूर्वअट आहे का? नाही. जर ती असती तर, तर आपल्यापैकी

कोणीही स्वर्गात प्रवेश करू शकला नसता कारण येशू हा एकच आहे ज्याने इतरांवर पूर्णपणे आणि सातत्याने प्रीती केली आहे.

खऱ्या विश्वासणाऱ्यांच्या जीवनात लोकांसाठी प्रीती आणि काळजी करणे हे गुणधर्म असले पाहिजे का? अगदी बरोबर. *"तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात."*

देवाचे खरे लोक जे जसे जीवन जगतात त्याद्वारे आपला विश्वास दाखवतात.[२३०]

तारणाच्या फळापासून तारणाच्या मुळामध्ये आपण फरक करावा हे महत्वाचे आहे. ख्रिस्तामधील विश्वासणाऱ्यांनी पवित्र, निस्वार्थी आणि शिस्तबद्ध जीवन जगण्याने (फळ) तारणाच्या (मूळ) त्याच्या दानाबद्दल परमेश्वराकडे आभार व्यक्त केले पाहिजे.

देवाचे लोक चांगली कामे त्याची कृपा प्राप्त करण्यासाठी करत नाहीत; ते चांगली कामे करतात कारण त्याने त्यांना पात्र नसतानाही त्याची कृपा प्रदान केली आहे.

## खोटा धर्म

काइन हा प्रथम *"तुमच्या स्वतःसाठी करा"* धर्माचा संस्थापक आहे. अर्पणाच्या कोकऱ्याच्या रक्ताच्या आधारे देवाजवळ जाण्याऐवजी, तो त्याच्या स्वतःची कल्पना आणि प्रयत्नाने आला. अशा प्रकारे, काइनाच्या प्रार्थना ह्या देवाला अपमानजनक आणि घृणास्पद होत्या.

> *"नियमशास्त्र कानी पडू नये म्हणून जो आपला कान बंद करतो, **त्याची प्रार्थनादेखील वीट आणणारी आहे**."* (नीतिसूत्रे २८:९)

देवाच्या नियमशास्त्राला पापाला झाकण्यासाठी कोकरा किंवा इतर योग्य अर्पणाच्या वाहिलेल्या रक्ताची आवश्यकता लागते. कारण काइन देवाजवळ आवश्यक गोष्टीने आला नाही, *"त्याची प्रार्थना देखील वीट आणणारी आहे."* काइनाला धर्म होता, परंतु तो खोटा धर्म होता. त्याचे अर्पण अभिवचन दिलेल्या तारणारा आणि वधस्तंभावरील त्याच्या मृत्यूकडे इशारा करत नव्हते. परिणामस्वरूप :

> *"हाबेलानेही आपल्या कळपातील प्रथम जन्मलेल्यांतून म्हणजे त्यांच्यातल्या पुष्ट मेंढरांतून काही अर्पण आणले; परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला; पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा त्याने आदर केला नाही; म्हणून काइन संतापला व त्याचे तोंड उतरले. तेव्हा परमेश्वर काइनाला म्हणाला, 'तू का संतापलास?*

*आणि तुझे तोंड का उतरले? तू बरे केलेस तर तुझी मुद्रा प्रसन्न होणार नाही काय?*
(उत्पत्ती ४:४-७)

देव दयाळूपणे काइनाशी बोलला, पश्चात्ताप करण्यासाठी, त्याच्या अधार्मिक कृत्यांपासून वळण्यास आणि देवाच्या धार्मिक योजनेच्या अधीन होण्यासाठी त्याला वेळ दिला.

काइन फक्त क्रोधात आला. तो कोकऱ्याच्या भयंकर रक्तासाठी स्वयं-प्रयत्नाच्या त्याच्या सुंदर धर्माचा व्यापार करणार नव्हता. देवाच्या नावाखाली, तो त्याच्या स्वतःच्या मार्गाने गोष्टींना करत होता!

आणि फक्त त्या मार्गाने त्याला कोठे नेले?

## विरोधी धर्म

*"मग काइनाचे त्याचा भाऊ हाबेल ह्याच्याशी बोलणे झाले; आणि असे झाले की, ते शेतात असता **काइनाने आपला भाऊ हाबेल ह्याच्यावर चालून जाऊन त्याला ठार केले**."* (उत्पत्ती ४:८)

काइन, पापार्पणासाठी एक कोकरू मारण्यासाठी तो अति अभिमानी होता, त्याच्या स्वतःच्या भावाला मारण्यासाठी अति अभिमानी नव्हता.

काइनाने भविष्यातील धर्म आणि राजकीय पद्धतींसाठी व्यासपीठ तयार केले होते जे मग त्यांची थट्टा, छळ आणि वध देखील करतील जे त्यांचा कायदा आणि परंपरेच्या हुकुमाच्या अधीन होण्यास नकार देतील.

काइनासारखे, आज जगभरातील पुष्कळ धार्मिक लोक त्यांच्या धर्माचे समर्थन करण्यासाठी आक्रमकता आणि हत्येचा वापर करतात. त्यांच्या कृत्यांनी, ते जगाला घोषणा करीत आहेत की ते त्यांच्या विश्वासात किती असुरक्षित आहेत आणि गोष्टी पूर्ण करण्यासाठी त्यांच्या निर्माणकर्त्या-स्वामीवर त्यांना किती कमी आत्मविश्वास आहे.

एक माणूस अमरिकेत राहत होता, ज्याबरोबर मी पुष्कळ ई-मेल संवाद साधला, त्याने लिहिले :

पाठव **विषय** : ई-मेल प्रतिसाद

शेवटचा माणूस ज्याने माझ्यासमोर पवित्र संदेष्ट्याची निंदा केली त्याने तीनच सेकंदानंतर त्याचे समोरचे दात गमावले. मी त्या वास्तविकतेमध्ये मोठा आनंद घेतला की पुढच्या वेळी जर त्याने निंदा केली तर तो बोबडयासारखे करेल.

मूर्तिपूजक धर्मांतरित होण्यास किंवा मरण्यासाठी आहेत. शेवट.

या माणसाचे बोल आणि कृत्य प्रभू येशूच्या पूर्णपणे विरोधात असेल, जो बोलला, *"परंतु तुम्ही ऐकणाऱ्यांस मी सांगतो, तुम्ही* ***आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा;*** *जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा; जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद दया; जे तुमची निर्भत्सना करता त्यांच्यासाठी प्रार्थना करा."* (लूक ६:२७-२८)

त्याचप्रमाणे, वधस्तंभावर, येशूने ज्यांनी त्यास वधस्तंभावर खिळले होते त्यांच्यासाठी प्रार्थना केली, ***"हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात ते त्यांना समजत नाही!"*** (लूक २३:३४)[२३१]

**पश्चात्ताप न करणारा काइन**

काइनाच्या कथेकडे परत वळू या, त्याने त्याच्या भावाची हत्या केल्यानंतर, देवाने त्याचे चुकीचे विचार आणि वाईट मार्गांचा पश्चात्ताप करण्याची काइनाला संधी दिली.

> *"मग परमेश्वराने काइनाला विचारले, 'तुझा भाऊ हाबेल कोठे आहे?' तो म्हणाला, 'मला ठाऊक नाही, मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे?' तो म्हणाला, 'तू हे काय केलेस?' ऐक! तुझ्या भावाचे रक्त भूमीतून माझ्याकडे ओरड करत आहे. तर आता तुझ्या हातून तुझ्या भावाचे पडलेले रक्त प्राशन करण्यास ज्या भूमीने तोंड उघडले आहे, तिचा तुला शाप आहे."* (उत्पत्ती ४:९-११)[२३२]

काइनाने त्याचे पाप कबूल करण्यास आणि एका कोकऱ्याच्या रक्ताने देवाजवळ नम्रपणे येण्याचा नकार दिला. त्याऐवजी, *"काइन देवाच्या उपस्थितीपुढून निघून गेला."* (उत्पत्ती ४:१६)

काइनाने कधीही पश्चात्ताप केला नाही. देवाच्या मार्गाच्या अधीन होण्याऐवजी, त्याने त्याच्या स्वतःच्या कल्पनेचे अनुसरण करणे चालू ठेवले. काइन वाढणाऱ्या संस्कृतीचा संस्थापक झाला, परंतु तो समाज निर्माणकर्ता देवाच्या खऱ्या अधीनता नसलेला होता.[२३३] काइनासारखे, त्याचे वंशज स्वयं-केंद्रित जीवन जगण्याच्या स्वयं-विनाशाच्या मार्गावर त्वरित गेले.

उत्पत्तीचा चौथा अध्याय लामेखाच्या कथेची देखील नोंद करतो, जो काइनाच्या सहाव्या पिढीतील वंशज होता. त्याच्या पूर्वजांप्रमाणे, लामेख हा गर्विष्ठ, वासना, सूड आणि खून करणारा माणूस होता. त्याच्या पुत्रांनी अनेक वैज्ञानिक आणि कलाकुसरीचा विकास केला. त्यांना पुष्कळ गोष्टींबद्दल मोठे ज्ञान होते, परंतु त्यांना देवाची ओळख नव्हती.

तारणाच्या देवाच्या मार्गापासूनच लोक दूर गेले नव्हते, परंतु देवाच्या मार्गाने जगण्यापासून देखील ते दूर गेले होते.

## पश्चात्ताप न करणारी मानवजाती

काइनानंतर केवळ नऊ पिढयांनंतर, परमेश्वर मानवजातीचे विश्लेषण असे करत होता :

> *"पृथ्वीवर मानवांची दुष्टाई फार आहे, त्यांच्या मनात येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना **केवळ एकसारख्या वाईट असतात** असे परमेश्वराने पाहिले."* (उत्पत्ती ६:५)

नोहा संदेष्टयाच्या काळापर्यंत, पृथ्वीवर राहणारा तो आणि फक्त त्याचे कुटुंब हेच लोक, जे अजूनही त्यांचा निर्माणकर्ता स्वामीवर विश्वास ठेवून होते. देवाची इच्छा पूर्ण करण्यास मनुष्याच्या जिद्दीने नकार दिल्याने सार्वत्रिक जलप्रलय आला. त्याच्या कृपेत, देवाने त्यातून सुटण्याचा मार्ग प्रदान केला, पण केवळ आठच लोकांनी त्याचा लाभ घेतला. नोहा आणि त्याची पत्नी, आणि त्यांचे पुत्र शेम, हाम आणि याफेथ आणि त्यांच्या पत्न्या. हेच फक्त होते ज्यांनी देवाच्या संदेशावर विश्वास ठेवला (उत्पत्ती ६-८).

> *"तोपर्यंत जे पाहण्यात आले नव्हते त्याविषयी नोहाला सूचना मिळाली आणि आदरयुक्त भयाने त्याने आपल्या कुटुंबाच्या तारणासाठी **विश्वासाने** तारू तयार केले; त्या विश्वासाच्या द्वारे त्याने जगाला दोषी ठरवले, आणि **विश्वासाने** प्राप्त होणारे जे नीतिमत्व त्याचा तो वतनदार झाला."* (इब्री. ११:७)

पुष्कळ वैज्ञानिक आज बायबलमध्ये नोंदलेल्या सार्वत्रिक जलप्रलयाची[२३४] थट्टा करत असले तरी, आजची अधिकतर कोरडी भूमी ही पूर्वी पाण्याने व्यापलेली होती आणि जगाच्या मोठया वाळवंटात आणि पर्वत रांगांच्या उत्खननात लाखो सागरी जीवाश्म सापडले आहेत हे कोणीही नाकारू शकत नाही. पावसी वादळानंतर मेघधनुष्य दिसणे याचा देखील कोणी नकार करू शकत नाही, जरी ते संपूर्ण जगाचा जलप्रलयाने पुन्हा नाश करणार नाही या देवाच्या अभिवचनाचे चिन्ह म्हणून त्याच्या महत्वाची ते थट्टा करू शकतात.

## बंडखोर आणि गोंधळलेले

जलप्रलयाच्या न्यायानंतर एका नवीन सुरुवातीने आशीर्वादित केलेले असतानाही, थोडयाच पिढयांनंतर, लोकांनी त्यांचा निर्माणकर्ता-स्वामीच्या विरोधात बंडखोरी केली आणि त्यांच्या स्वतःच्या कल्पनांचे अनुसरण केले. उदाहरणार्थ, देवाने मानवाला सांगितले होते की

*"पृथ्वीला भरून टाका"* आणि पसरून जा (उत्पत्ती १:२८; ९:१). तर मग लोकांनी काय करण्याच्या निर्णय घेतला? त्यांनी प्रत्यक्षात त्याच्या उलट करण्याची निवड केली.

> *"मग ते म्हणाले, 'चला, **आपल्यासाठी** एक नगर **आणि गगनचुंबी शिखराचा एक बुरुज बांधू;** आणि **आपले नाव करू** म्हणजे सर्व पृथ्वीच्या पाठीवर **आपली पांगापांग होणार नाही."*** (उत्पत्ती ११:४)

त्यांच्या योजनेचा स्वार्थीपणा आणि बंडखोरीकडे लक्ष दया. त्यांच्यासाठी देवाच्या चांगल्या आणि परिपूर्ण इच्छेचे अनुसरण करण्याऐवजी, त्यांनी त्यांच्या स्वतःच्या शहाणपणानुसार चालणे आणि त्यांच्या स्वतःच्या नावाला उंच करण्याची योजना आखली. कदाचित त्यांनी विचार केला की अशी इमारत बांधू जिचे *"शिखर स्वर्गात असेल"* आणि यदा कदाचित जर दुसरा जलप्रलय आला तर ते सुरक्षित राहतील. ते त्यांच्या स्वतःच्या कठीण कामाद्वारे देवाच्या न्यायापासून सुटण्याची आशा ठेवणाऱ्या सध्याच्या पुष्कळ धार्मिक लोकांसारखे होते.

देवाने मनुष्यांनी एकत्र एकाच ठिकाणी राहण्याच्या त्यांच्या योजनेला पूर्णविराम दिला. अशा योजनेने भ्रष्टाचार आणि मानवजातीला विनाशाकडे वेगाने नेले असते हे परमेश्वराला ठाऊक होते. हे लक्षात ठेवून की इतिहासातील या कालावधीपर्यंत *"सर्व पृथ्वीची एकच भाषा, एकच बोली होती"* (उत्पत्ती ११:१), देवाने काय केले ते चला आपण पाहू या.

> *"परमेश्वर म्हणाला, 'पाहा, हे लोक एक आहेत, ह्या सर्वांची भाषाही एकच आहे, ही ह्यांच्या कृत्यांची सुरुवात आहे; आणि हे जे काही करण्याचे योजतील ते करण्यास ह्यांना कशानेही अटकाव होणार नाही. तर चला, आपण खाली जाऊन ह्यांच्या भाषेचा घोटाळा करू म्हणजे ह्यांना एकमेकांची भाषा समजणार नाही. नंतर **परमेश्वराने तेथून त्यांना सर्व पृथ्वीच्या पाठीवर पांगवले;** ह्याप्रमाणे त्यांचे नगर बांधायचे राहिले. म्हणून त्या नगराचे नाव '**बाबेल**' असे पडले, कारण त्या ठिकाणी परमेश्वराने सगळ्या पृथ्वीच्या भाषेचा घोटाळा करून तेथून त्यांना सर्व पृथ्वीच्या पाठीवर पांगवले."*
> (उत्पत्ती ११:६-९)

एकमेकांबरोबर संवाद साधण्यात सक्षम न झाल्याने, लोक, त्यांचे नगर बांधण्याचे अपूर्ण सोडून निघून जात होते, जगभर पसरले, जसे देवाने प्रथम स्थानी त्यांच्यासाठी ठरवले होते तसे ते पसरले. *"म्हणून त्या नगराचे नाव '**बाबेल**' असे पडले."*

बाबेल म्हणजे *"गोंधळ."*

देवाच्या रुपरेषेचा नकार नेहमीच गोंधळाकडे नेतो.

## चुकीचे बहुमत

नोहाच्या काळातील लोकांकडून आणि ज्यांनी बाबेलचा बुरुज बांधण्याचा प्रयत्न केला त्यांच्याकडून एक धडा शिकण्याचा हा आहे :

*बहुसंख्य चूक होते.*

जरी पापी लोकांनी या वास्तविकतेमध्ये समाधान मिळवले की इतर लाखो लोकांचाही तोच दृष्टीकोन आहे, तरीसुद्धा देवाचा न्याय त्यांच्यावर आला. आजपर्यंत, पुष्कळ लोक विचार करतात देवाची त्यांची कल्पना आणि त्याचा संदेश हा खरा असला पाहिजे कारण इतर पुष्कळ लोक त्याच गोष्टीवर विश्वास ठेवतात.

ब्रिटनमध्ये राहणाऱ्या एका माणसाने ही चिठ्ठी पाठवली :

> पाठव **विषय** : ई-मेल प्रतिसाद
>
> जर तुमच्या स्वतःला नरकापासून वाचवायचे असेल तर जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या धर्माचे अनुसरण करा....

जर जलद वाढ किंवा केवळ संख्या सत्य सिद्ध करू शकली, तर मग काइनाचे वंशज, नोहाच्या काळातील लोक, आणि बाबेलचे रहिवासी हे खूपच जास्त होते. परंतु ते चुकीचे होते, अत्यंत चुकीचे.

> *"अरुंद दरवाजाने आत जा; कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा* ***रुंद*** *व मार्ग* ***पसरट*** *आहे आणि त्यातून आत जाणारे* ***पुष्कळ*** *आहेत; परंतु जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद व मार्ग* ***संकुचित*** *आहे आणि ज्यांना तो सापडतो ते* ***थोडके*** *आहेत."*
> (मत्तय ७:१३-१४)

## देवाची न थांबवता येणारी योजना

पहिल्या कुटुंबाच्या कथेकडे परत जात, काइनाने हाबेलास ठार केल्यावर काय घडले ते आपण पाहू या.

> *"आदामाने आपल्या बायकोस पुनः जाणले, आणि तिला मुलगा झाला; त्याचे नाव तिने* ***शेथ*** *ठेवले; ती म्हणाली, 'काइनाने हाबेलाचा घात केला म्हणून* ***देवाने त्याच्या जागी मला दुसरे अपत्य दिले आहे.'*** *शेथ ह्याला मुलगा झाला, त्याचे नाव*

*त्याने अनोश असे ठेवले; त्या काळापासून लोक **परमेश्वराच्या नावाने प्रार्थना करू लागले**."* (उत्पत्ती ४:२५-२६)

त्याच्यावर विश्वास ठेवणारे लोक असण्याची देवाची इच्छा आणि रचनेला आळा बसणार नाही.

शेथ नावाचा अर्थ *"एखाद्याच्या ठिकाणी नियुक्त केलेला."* हव्वा समजली की देवाने हाबेल, ज्यास काइनाने ठार केले होते, त्याच्या जागी तिच्यासाठी *"आणखी संतान"* नियुक्त केले आहे. शेथच्या वंशजांतून अभिवचन असलेला स्त्रीचे संतान जन्म घेईल. मरीया, कुमारी युवती जी येशूची आई झाली, ती शेथची वंशज होती. ती अब्राहाम आणि दाविदाची देखील वंशज होती, जसे देवाने अभिवचन दिले होते.

सैतानाने देवाच्या योजनेला खराब करण्यासाठी कितीही कठीण प्रयत्न केले असले तरी, परमेश्वर देवाने *"जगाच्या स्थापनेपूर्वी"* निश्चित केलेली योजना सतत पुढे जात राहिली.

काहीही आणि कोणीही तिला थांबवू शकत नाही.

## परमेश्वराचे नाव

हाबेल सारखे, शेथने देव आणि क्षमेच्या त्याच्या मार्गावर विश्वास ठेवला, *"परमेश्वराच्या नावाने"* प्रार्थना केली (उत्पत्ती ४:२६). शतकानुशतके, त्या लोकांनी भरलेले जग, जे बाबेल येथील लोकांसारखे, त्यांच्या स्वतःचे नाव करण्याचा प्रयत्न करत असत, तेथे नेहमीच तसे लोक होते, हाबेल आणि शेथ सारखे, ज्यांनी **परमेश्वरावर** विश्वास ठेवणे आणि त्याच्या **नावाने प्रार्थना** करण्याची निवड केली.

माझे काही मित्र मला सांगतात की देवाला शंभर नांवे आहेत, परंतु त्यांना केवळ नव्व्यानव नावेच माहित आहेत. त्यांच्या नावातील राहिलेल्या नावाचा अर्थ *"परमेश्वर वाचवतो"* असे होऊ शकते का?

ते नाव कोणते आहे?

होय, ते नाव **येशू** आहे.

त्या नावात विश्वास न ठेवणे-म्हणजे तो कोण आहे आणि त्याने काय केले आहे- हे देवाच्या अधीन झालेले नाही.

चला आपण प्रेषित पौलाची त्याच्या धार्मिक आणि बंडखोर यहूदी देशवासीयांसाठी प्रार्थना ऐकू :

*बंधूजनहो, त्यांच्याविषयी माझी मनीषा व देवाजवळ विनंती अशी आहे की, त्यांचे तारण व्हावे. मी त्यांच्याविषयी साक्ष देतो की, त्यांना **देवाविषयी आस्था आहे**, परंतु **ती यथार्थ ज्ञानाला अनुसरून नाही**. कारण त्यांना **देवाच्या नीतिमत्वाची जाणीव नसल्यामुळे व ते आपलेच नीतिमत्व स्थापण्यास पाहत असल्यामुळे देवाच्या नीतिमत्वाला ते वश झाले नाहीत.** कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला नीतिमत्व प्राप्त होण्यासाठी ख्रिस्त नियमशास्त्राची समाप्ती असा आहे...येशू प्रभू आहे, असे जर 'तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा 'आपल्या अंत:करणात' विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल....कारण शास्त्र म्हणते, 'त्याच्यावर विश्वास ठेवणारा कोणीही फजीत होणार नाही, यहूदी व हेल्लेणी ह्यांच्यामध्ये भेद नाही; कारण सर्वांचा प्रभू तोच आणि जे त्याचा धावा करतात त्या सर्वांना पुरवण्याइतका तो संपन्न आहे**."..."जो कोणी परमेश्वराचा धावा करील तो तरेल"*** (रोम. १०:१०४, ९, ११-१३; [योएल २:३२])

## अयोग्य की योग्य?

समजा मला तुमच्यासाठी एक दशलक्ष डॉलरचा एक बँक चेक लिहायचा आहे. चेक अधिकृत दिसेल, पण तो अयोग्य असेल. का?

माझ्या बँकेच्या खात्यात तितकी रक्कम नाही!

आता, मग पृथ्वीवरील सर्वात श्रीमंत माणसाने तुमच्यासाठी एक दशलक्ष डॉलर्सचा चेक लिहिला तर काय?

काही समस्या नाही. तो पूर्ण रकमेसाठी योग्य असेल.

तीच बँक जिने माझ्या नावात सादर केलेल्या चेकचा नाकार केला होता ते आता श्रीमंत माणसाचे नाव असलेल्या चेकचा आदर करतील.

आपले जग हे त्या लोकांनी भरलेले आहे जे देवाजवळ अनेक नावांच्या द्वारे जाण्याचा प्रत्यत्न करत आहेत परंतु, ज्याने मानवांच्या पापाचे ऋण फेडण्यासाठी त्याच्या पुत्राला पाठवले त्या पवित्र देवाच्या दृष्टीसमोर, ती अयोग्य, पापाने-दूषित नावे आहेत.

ज्याप्रमाणे बँक माझ्या नावात $1,000,000 च्या चेकचा आदर करणार नाही, त्याप्रमाणेच देव **येशू**च्या नावाशिवाय इतर कोणत्याही नावाने क्षमा आणि जीवन प्रदान करणार नाही.

*"आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे **दुसरे कोणतेही नाव** आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले **नाही.**"* (प्रेषित. ४:१२)

देवाच्या नोंदवहीतून तुमच्या पापाचे ऋण पुसून टाकले जावे आणि त्याच्या धार्मिकतेच्या संपन्नतेचे श्रेय तुम्हांला देण्यात यावे अशी तुमची इच्छा आहे का? काळ आणि सार्वकालिकतेसाठी पापाच्या शापावर विजय मिळवावा आणि तुमच्या निर्माणकर्त्यासोबत घनिष्ठ नातेसंबंधाचा आनंद घ्यावा अशी तुमची इच्छा आहे का?

केवळ एकच नाव पुरेसे आहे.

***"जो कोणी परमेश्वराचा धावा करील तो तरेल."*** (योएल २:३२)

*"**प्रभू येशू ख्रिस्तावर** विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल."* (प्रेषित. १६:३१)

प्रभू येशू ख्रिस्ताने तुमच्या पापाची शिक्षा रद्द करण्यासाठी दु:खसहन केले, मरण पावला आणि पुन्हा उठला यावर तुम्ही विश्वास ठेवता का? मग *"तुमचे तारण होईल."*

### फक्त दोन धर्म

आपण या प्रवासाला या निरीक्षणासह सुरुवात केली की आपल्या जगात आज दहा हजारांपेक्षा अधिक धार्मिक पद्धती आहेत.

वास्तवात, येथे फक्त दोनच आहेत.



- मानवी प्राप्तीची पद्धत जी तुम्हांला सांगते की **तुम्ही स्वतःचे तारण करावे.**
- दैवी पूर्णतेची पद्धती म्हणते **तुम्हांला एका तारणाऱ्याची आवश्यकता आहे.**

जोपर्यंत तुम्ही स्वतःचे तारण करण्याचे प्रयत्न करत राहाल, कोणताही धर्म किंवा नाव चालेल. परंतु एकदा तुम्ही पाहिले की तुम्हांला एका तारणाऱ्याची आवश्यकता आहे, तर फक्त एकच नाव पुरेसे असेल.

ते नाव **येशू** आहे.

*"**त्याच्यावर** विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला **त्याच्या नावाने** पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे **त्याच्याविषयी** देतात."* (प्रेषित. १०:४३)

# तिसरा भाग
# प्रवासाचा शेवट

## शापाला उलटणे



२७- टप्पा १ : देवाचा भूतकाळातील कार्यक्रम
२८- टप्पा २ : देवाचा वर्तमान काळातील कार्यक्रम
२९-टप्पा ३ : देवाचा भावी काळातील कार्यक्रम
३०- स्वर्गाचे पूर्वावलोकन

समारोप
अंतिम टिप्पण्या
प्रवासावर चिंतन करणे



# धडा २७

# टप्पा १: देवाचा भूतकाळातील कार्यक्रम

*"तू **आज** मजबरोबर सुखलोकात असशील!"*

*-प्रभू येशू* (लूक २३:४३)

**का**हीं मिनिटांपूर्वी, माझ्या लॅपटॉप संगणकाची बॅटरी जवळजवळ संपली होती, पण आता ती नवीन शक्तीने भरली गेली आहे. तिची मर्त्य अवस्था उलट कशी केली गेली?

मी ते एका इलेक्ट्रिकल आउटलेटमध्ये प्लग केले.

मग ते लॅपटॉप, सेलफोन, किंवा फ्लैशलाईट,  बॅटरी असोत ते सतत नष्ट होत असतात; त्यांचा चार्ज गमावत असतात-जोपर्यंत ते अत्युच्च शक्तीच्या स्त्रोतद्वारे चार्ज केले जात नाहीत.

आदामाचे वंशज हे संपणाऱ्या बॅटरीसारखे आहेत. आपला ज्यावेळी जन्म झाला त्या दिवसापासून आपल्या मरणास सुरुवात झाली आहे, पापाने आणलेल्या शापाला उलट करण्याचा कोणताही मार्ग नाही.

जसे आपण आपल्या प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात प्रवेश करतो, मला तुम्हांला एका भटकणाऱ्या फ्रेंच माणसाची कथा सांगायची आहे ज्याचे भविष्य संपणाऱ्या बॅटरीसारखे आशाहीन दिसत होते.

## अत्यंत दयनीय

मार्च १९८७ मध्ये मी २६ वर्षे वयाच्या ब्रुनोला भेटलो.

पुष्कळ वर्षांपूर्वी, हा तरुण माणूस जीवनाच्या अर्थावर विचार करू लागला होता. त्याला आतून रिकामी वाटत होते, एक रिकामीपण जे त्याच्या कॅथलीक पालनपोषणाने किंवा जगिक ऐशोआरामाने भरू शकले नव्हते.

लहान मुलगा असताना, ब्रुनोने पाहिले होते की ते ज्यांनी त्याला देवाबद्दल शिकवले होते ते त्यांनी प्रचार केल्याप्रमाणे आचरण ठेवण्यात अपयशी ठरले होते. एक बंडखोर तरुण म्हणून, त्याने जगाला अन्यायाने भरलेले पाहिले. वयाच्या १८व्या वर्षी, ब्रुनोचा जीवनातील मुख्य उद्देश हा आठवडयाच्या शेवटी मित्रांसोबत वेळ व्यतीत करावा, मद्य प्यावे आणि त्याचे दु:ख विसरावे हा होता. त्याची निराशा तीव्र होत गेली जेव्हा त्याची मैत्रीण वाहनाच्या अपघातात मरण पावली. तो देवाविरुद्ध क्रोधात होता.

ब्रुनोने भारतात जाण्याचा निर्णय घेतला. कदाचित तो त्याच्या पुष्कळ धर्मांमध्ये जीवनाचा अर्थ शोधू शकेल. जमिनीवरून खडतर प्रवास केल्यानंतर, ब्रुनो भारतातील एका गर्दीच्या शहरात पोहचला जेथे तीव्र धार्मिक उत्साह आणि अवर्णनीय मानवी दु:खाला त्याला सामोरे जावे लागले. ब्रुनोच्या स्वतःच्या शब्दात, *"मी त्या लोकांना पाहिले, जे त्यांचा धर्म आणि विश्वास असतानाही, माझ्यापेक्षा जास्त दयनीय होते."*

भारत देशात जवळजवळ एक वर्ष घालवल्यावर, ब्रुनोने निष्कर्ष काढला की जर त्याला कधी अंतिम सत्य शोधायचे असेल तर, देवानेच केवळ ते त्याला प्रकट केले पाहिजे. म्हणून त्याने त्याच्या निर्माणकर्त्याजवळ ही साधी प्रार्थना केली, *"जर तू अस्तित्वात आहे, तर स्वतःला मला प्रकट कर!"*

एके दिवशी, कलकत्ताच्या रस्त्यावर चालत असताना, ब्रुनोने एका चिन्हासह एक दुकान पाहिले : बायबल हाउस. आवेगाने तो आत शिरला आणि कारकुनाला विचारले, *"तुमच्याजवळ फ्रेंच भाषेत बायबल आहे का?"* त्यांच्याजवळ एक प्रत होती.

ती त्याने आणली आणि तो वाचू लागला.

पुष्कळ गोष्टींनी त्याला आश्चर्यचकित केले. उदाहरणार्थ, दहा आज्ञांमधून पहिल्या आणि दुसऱ्या आज्ञेने त्यास धक्का दिला ज्यामध्ये देवाने म्हटले, ***"माझ्याशिवाय तुला वेगळे देव नसावेत**. आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नकोस; ....**त्यांच्या पाया पडू नकोस** किंवा त्यांची सेवा करू नकोस"* (निर्गम २०:३-५). तरीही ब्रुनोने त्याच्या सभोवती पाहिले की लोक मंदिरांमध्ये मुर्तीपुढे नमन करत आहेत. आणि ज्या धर्मात त्याचे पालनपोषण झाले होते त्याच्याविषयी जेव्हा त्याने विचार केला, तर त्यास असे दिसून आले की त्याला माहित असलेले धार्मिक लोक देखील देवाच्या आज्ञा मोडण्यासाठी दोषी होते, जेव्हा ते मरीया आणि संतांच्या मूर्तीसमोर नमन आणि प्रार्थना करत असत.

ब्रुनो दुसऱ्या वचनाने तितकाच प्रभावित झाला : *"नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यश प्राप्ती घडेल."* (यहोशवा १:८)

त्याचा विश्वास बसला की सत्य जे तो शोधत होता हे फक्त बायबलमध्येच सापडू शकते, ब्रुनोने भारत सोडला आणि फ्रान्सला परत गेला. तथापि, त्याचे बायबल वाचण सतत चालू ठेवण्याऐवजी, ते त्याने एका शेल्फवर ठेवले आणि कामावर आणि पार्टी करण्यासाठी गेला- जीवनाचा मार्ग जो त्याने कडवट स्वाद आणि रिकामी हृदयाने सोडला होता.

चार वर्षे निघून गेली.

एके दिवशी, जेव्हा ब्रुनो त्याच्या अर्थहीन अस्तित्वाविषयी विचार करत होता, तेव्हा त्यास बायबलचे एक वचन आठवले ज्यामध्ये देवाने वचन दिले होते; *"तुम्ही मला शरण याल आणि* ***पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल****, तेव्हा* ***मी तुम्हांला पावेन****"* (यिर्मया २९:१३). ब्रुनोने प्रार्थना केली, *"ठीक आहे देवा, मी माझ्या संपूर्ण मनापासून तुझा शोध करीन आणि तुझे अभिवचन सत्य आहे किंवा नाही हे पाहीन."*

घराच्या प्रभावापासून स्वतःला वेगळे करण्यासाठी, ब्रुनोने आणखी एक प्रवास करण्याचा निर्णय घेतला, यावेळी आफ्रिकेला. जेव्हा तो जमिनीवरून प्रवास करत होता, त्याने त्याचे बायबल वाचले आणि प्रार्थना केली, "देवा, मला तुझ्या सत्याकडे मार्गदर्शन कर आणि मला खोटेपणापासून राख.' सहारा पार केल्यावर तो उत्तरीय सेनेगलमध्ये आला. त्याने त्याची पहिली रात्र त्याच शहरात घालवली जेथे माझे कुटंब आणि मी राहत होतो.

पुढील सकाळी, ब्रुनो शहरात फेरफटका मारण्यासाठी गेला. जसे कलकत्तामध्ये, तसेच दरवाजावरील एका चिन्हाने त्याचे लक्ष वेधून घेतले. ते म्हणत होते:

एकुतेझ! कार लेटेर्नेल दियू ए पार्ले!

(ऐक! कारण परमेश्वर देव बोलला आहे!)

ब्रुनोने प्रवेश केला.

ते माझे कार्यालय होते. माझ्या कामातून वर पाहत, मी एका दाढी वाढलेल्या माणसाला एक लहान, निळ्या रंगाचे चांगलेच-फाटलेले पुस्तक हातात धरलेले पाहिले- जे बायबल त्याने भारतात विकत घेतले होते. मी अजूनही त्याचा पहिला प्रश्न ऐकू शकतो:

*"तुम्ही कोण आहात, कॅथलीक की प्रॉटेस्टंट?"*

*"मी फक्त एक ख्रिस्ती आहे; ख्रिस्ताचा एक अनुयायी,"* मी उत्तर दिले. ब्रुनोला आश्चर्य वाटले आणि माझ्या उत्तराने प्रसन्न वाटले, कारण, बायबल वाचल्यानंतर, त्याने हे शोधले होते की त्यात कॅथलीक की प्रॉटेस्टंट नावाचा उल्लेख कधीही केलेला नव्हता, परंतु ते ख्रिस्ती व्यक्तीबद्दल अवश्य बोलते-ख्रिस्ताचे अनुयायी. नंतर, ब्रुनोने मला सांगितले की जर मी एकतर *"मी कॅथलीक"* किवा *"मी प्रॉटेस्टंट"* आहे असे उत्तर दिले असते तर, मी मागे वळलो असतो आणि निघून गेलो असतो. तो धर्मावरून कंटाळला होता. त्यास वास्तविकता हवी होती.

पुढील अनेक दिवस, ब्रुनोने मला पुष्कळ प्रश्न विचारले. मी त्याला बायबलमधील देवाच्या उत्तरांकडे इशारा केला. त्याच्या परत जाण्याच्या संध्याकाळी (तो दक्षिण आफ्रिकेला प्रवास करेल अशी अपेक्षा होती), मी त्याला आव्हान दिले, *"तुझे बायबल पुन्हा वाच आणि देवाने तुझ्यासाठी काय केले आहे त्याकडे लक्ष दे."*

सहा आठवडयानंतर, माझी पत्नी आणि मला ब्रुनोकडून पत्र आले ज्यामध्ये तो स्पष्ट करत होता की तो जवळच्याच मासेमारी गावात एक खोली भाडयाने घेऊन राहिला होता. जुना आणि नवीन कराराची तुलना करत, त्याने नुकतेच संपूर्ण बायबलचे वाचन पूर्ण केले होते.

त्याने ख्रिस्ताला संपूर्ण पवित्र शास्त्रात पाहिले होते.

ब्रुनोच्या स्वतःच्या शब्दात, *"एके रात्री, मी बाहेर एकटाच होतो, येशूचे अभिवचन माझ्या अंत:करणात सामर्थ्याने आले, 'अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे* ***मी तुम्हांला विसावा देईन****"* (मत्तय. ११:२८). माझ्या जीवनाचे त्याच्या सर्व अपयश, कटुता, आणि खेदासह आढावा घेताना-माझ्या हृदयात मोठा संघर्ष झाला. मला माहित होते की जर मी ख्रिस्ताचा अनुयायी झालो, तर येथून पुढे मी माझी वासना आणि इच्छांना पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र राहणार नाही. शेवटी मी हार मानली. देवाने माझे डोळे उघडले. ख्रिस्ताने वधस्तंभावर माझ्यासाठी रक्त वाहिले आणि पुन्हा उठला यावर मी विश्वास ठेवला. शांती माझ्या जीवात भरून गेली. मी रडू लागलो आणि थांबू शकलो नाही. माझ्या पापाचे भारी ओझे निघून गेले होते!" *ब्रुनो म्हणत गेला, 'एन सोम्मे, जे सुस ने दे नुवेअऊ!"* (त्याचा सारांश, "माझा नवीन जन्म झाला आहे!")

ब्रुनो जे शोधत होता ते त्याला सापडले होते : एक शुद्ध हृदय आणि विवेक, त्याच्या निर्माणकर्त्यासोबत नातेसंबंध, आणि सार्वकालिक जीवन. तो आता समजला होता की तो पृथ्वीवर का होता आणि तो कोठे जात होता.



त्याचा शोध संपला होता.

*बायबल म्हणते : "म्हणून जर कोणी* **ख्रिस्ताच्या ठायी** *असेल तर तो नवी उत्पत्ती आहे;* **जुने ते होऊन गेले***; पाहा,* **ते नवे झाले आहे***."* (२ करिंथ. ५:१७)

त्याचक्षणी, ब्रुनोचे जीवन लहान आणि मोठया मार्गाने बदलण्यास सुरुवात झाली.

उदाहरणार्थ, जरी त्याने अकरा वर्षाचा असल्यापासून सिगारेट ओढली होती, प्रभूने या सवयीपासून त्यास सोडवले होते. त्याचे स्वतःमध्ये राहणे, मद्यधुंद आणि अनैतिक जीवनशैली ही आता भूतकाळातील लज्जास्पद स्मृती राहून गेली होती. पवित्र शास्त्राचा त्याला आता अर्थ लागत होता आणि प्रार्थना ही श्वास घेण्यासारखी नैसर्गिक झाली होती.

प्रवास करत राहण्याऐवजी, ब्रुनोने सेनेगलमध्ये पवित्र शास्त्राचा अभ्यास करत, ख्रिस्तामधील विश्वासणाऱ्यांसोबत वेळ व्यतीत करत, आणि देवाने त्याच्यासाठी काय केले आहे ते इतरांना सांगत पुढील सहा महिने व्यतीत केली.

ब्रुनो आता एक नवीन सृष्टी बनला होता.

मी ब्रुनोला भेटून जरी दोन दशके निघून गेली आहेत, तरी आम्ही अजूनही संपर्कात आहोत. आज *"नवीन ब्रुनो"* फ्रांसमध्ये राहतो जेथे तो आणि त्याची पत्नी देवासोबत चालत आहेत आणि त्यांच्या चार मुलांना प्रभूच्या ज्ञानात आणि आशीर्वादात पालनपोषण करत आहेत.

याचा अर्थ हा आहे का की ब्रुनोचे जीवन हे डोकेदुखी, संघर्ष आणि यातनेपासून मुक्त झालेले आहे? नाही, तो आणि त्याचे कुटुंब दोन्हीही विविध संकटे आणि परीक्षांना सामोरे जात आहेत, परंतु ते एकटे नाहीत.

प्रभू स्वतः त्यांच्यासोबत आहे.

## देवाचा तीन-टप्प्यांचा कार्यक्रम

कदाचित कोणीतरी विचार करत असेल : "एक मिनिट थांबा. जर येशूने सैतान, पाप आणि मृत्यूवर आपल्यासाठी विजय मिळवला आहे, तर मग ख्रिस्तामधील विश्वासणाऱ्यांसोबत, इतर लोक देखील सतत इतक्या प्रकारे संघर्ष का करत आहेत? आपले जग वाईट आणि मत्सराने का भरलेले आहे? अभिवचन असलेली सुटका आणि परिपूर्णता कोठे आहे?

उत्तर हे या वास्तविकतेमध्ये सापडते की देवाची युगानुयुगाची योजना मानवी इतिहासात हस्तक्षेप करण्यामध्ये तीन टप्प्यांचा समावेश आहे :

टप्पा १ : देव त्याच्या लोकांची पापाच्या **शिक्षे**पासून सुटका करेल.

टप्पा २ : देव त्याच्या लोकांची पापाच्या **शक्ती**पासून सुटका करेल.

टप्पा ३ : देव त्याच्या लोकांची पापाच्या **उपस्थिती**पासून सुटका करेल.[२३५]

नवीन करारातून पुढील संदर्भ देवाच्या तीन टप्प्याचा कार्यक्रम-भूतकाळ, वर्तमान, आणि भविष्य यांचा सारांश देते :

> *"त्याने आम्हांला एवढया मोठया प्राणसंकटातून [टप्पा १], तो आता **सोडवत आहे** [टप्पा २] आणि तो आम्हांला **ह्यापुढेही सोडवील** [टप्पा ३], अशी त्याच्याविषयी आमची आशा आहे."* (२ करिंथ १:१०)

पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या उरलेल्या प्रवासात आपण या तीन टप्प्याच्या कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करू ज्याद्वारे **देव** सैतान, पाप आणि मृत्यूचा प्रभाव कायमचा काढून टाकेल. आपल्या प्रवासाचा शेवटचा टप्पा हा अति विलक्षण असेल कारण तो आपल्याला प्रत्यक्ष स्वर्गाची झलक देतो.

## शापाला उलटणे : पहिला टप्पा

जेव्हा आदाम व हव्वेने सैतानाचे ऐकले तेव्हा त्यांनी त्यांचा निर्माणकर्ता-स्वामीबरोबरच्या नातेसंबंधाचा त्याग केला होता आणि त्यांच्या स्वतःवर आणि त्यांच्या सर्व वंशजांवर पापाचा शाप आणला होता. मूळ, परिपूर्ण जग अचानकपणे अशा ठिकाणामध्ये बदलले होते जेथे लोकांना देवापासून लपायला पाहिजे होते आणि त्यांच्या स्वतःच्या मार्गाने जायला पाहिजे होते. जीवन हे शोक आणि यातना, रोग आणि विकृती, दारिद्र्य आणि भूक, दु:ख आणि कलह, वृद्धावस्था आणि मृत्यू या सर्वांनी वैशिष्ट्यीकृत झाले होते.

पापाने शाप आणला होता. परंतु नियुक्त समयी, जसे देवाने अभिवचन दिले होते, आदामाच्या वंशजांना सैतान, पाप आणि मृत्यूपासून सोडवण्यासाठी देवाचा सार्वकालिक पुत्र स्त्रीचे संतान म्हणून स्वर्गातून पृथ्वीवर आला.

> *"देव प्राचीन काळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्टयांच्या द्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला. **तो ह्या काळाच्या शेवटी पुत्राच्या द्वारे आपल्याशी बोलला आहे;** त्याने त्याला सर्व गोष्टींचा वारस करून ठेवले आणि त्याच्या द्वारे त्याने विश्व निर्माण केले. हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, **आणि [स्वतः आमच्या] पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.'**"* (इब्री. १:१-३)

प्रभू येशू पापाने दूषित झाला नव्हता.

त्याने पापाने-शापित सृष्टीच्या प्रत्येक घटकावर पूर्ण अधिकार प्रदर्शित केला. त्याच्या मुखातील एका शब्दाने किंवा त्याच्या हाताच्या स्पर्शाने, त्याने दुष्टात्म्यांना पळवून लावले, आंधळयांना डोळे दिले, कुष्ठरोग्यांना शुद्ध केले आणि मेलेल्यांना मृतांतून उठवले. तो पाण्यावर

चालला, वादळ शांत केले, आणि भुकेल्यांसाठी भाकर बहुगुणीत केली. त्याने पापाची क्षमा देखील केली आणि दु:खित हृदयांस शांती आणली.

आणि मग त्याने ते केले जे करण्यासाठी तो आला होता.

त्याने दु:खसहन केले, मरण पावला आणि पुन्हा उठला की त्याच्या पित्याचे गौरव करावे, पवित्र शास्त्र पूर्ण करावे आणि जे सर्व त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांना मुक्त करावे.

> ***“आपल्यासाठी ख्रिस्त शाप झाला आणि त्याने आपल्याला नियमशास्त्राच्या शापापासून खंडणी भरून सोडवले;*** *‘जो कोणी झाडावर टांगलेला आहे तो शापित आहे’ असा शास्त्रलेख आहे. ह्यात उद्देश हा की, अब्राहामाला दिलेला आशीर्वाद ख्रिस्त येशूमध्ये परराष्ट्रीयांना मिळावा; म्हणजे आपल्याला विश्वासाच्या द्वारे आत्म्याविषयीचे अभिवचन मिळावे.”* (गलती. ३:१३-१४ [अनुवाद २१:२३])

## अद्भुत कृपा

येशू, ज्याने पूर्णपणे नियमशास्त्राचे पालन केले, तो आपल्यासाठी पाप होऊन, *“नियमशास्त्राच्या शापापासून”* [ज्यासाठी परिपूर्ण आज्ञाधारकपणाची आवश्यकता असते] नियम मोडणाऱ्यांना मुक्त करण्यासाठी आला. येशूने स्वेच्छेने ती शिक्षा ज्यास आपण पात्र होतो ती स्वतःवर घेतली जेणेकरून आपल्याला सार्वकालिक शिक्षेपासून सोडवावे.

प्रभू वधस्तंभावर दु:खसहन करत असतानाही, त्याने पापाच्या शापाला उलट करण्याचा त्याचा उद्देश दर्शवला.

राजद्रोह, चोरी आणि हत्त्येसाठी मृत्यूदंडाची शिक्षा दिलेल्या दोन गुन्हेगारांमध्ये येशूला वधस्तंभावर खिळण्यात आले होते. प्रभू आणि या दोन पाप्यांच्या मध्ये झालेल्या संवादाला चला आपण पुन्हा एकदा ऐकू या. प्रथमतः दोघाही पुरुषांनी येशूची थट्टा केली, पण जसे काही तास निघून गेले, त्यातील एकाने पश्चात्ताप केला.

> *“वधस्तंभावर खिळलेल्या त्या अपराध्यांपैकी एकाने त्याची निंदा करून म्हटले, ‘तू ख्रिस्त आहेस ना? तर स्वतःला व आम्हांलाही वाचव.’ परंतु दुसऱ्याने त्याचा निषेध करून म्हटले, ‘तुलाही तीच शिक्षा झाली असता, तू देवालासुद्धा भीत नाहीस काय? आपली शिक्षा तर यथान्याय आहे; कारण आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगत आहोत; परंतु ह्याने काही अयोग्य केले नाही.’ मग तो म्हणाला, ‘अहो येशू, आपण आपल्या राजाधीकाराने याल तेव्हा माझी आठवण करा.’ येशू त्याला*

*म्हणाला, 'मी तुला खचित सांगतो, तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील.''*
(लूक २३:३९-४३)

नियमशास्त्राचे उल्लंघन करणारे हे दोघे आता मरणार होते आणि नरकात जाणार होते. मग, त्या शेवटच्या काही तासात, त्यातील एकाने देवासमोर त्याचे पाप ओळखले आणि निष्पाप तारणाऱ्यावर त्याचा विश्वास ठेवला ज्याला मधल्या वधस्तंभावर खिळले होते.

येशूने त्याला एक अभिवचन दिले :

*''तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील!''*

सैतान आणि त्याच्या पतित देवदूतांसाठी तयार केलेल्या ठिकाणी सार्वकालिकता घालवण्याऐवजी, नियमशास्त्राचे उल्लंघन करणारा हा क्षमा केलेला व्यक्ती आता त्याच्या निर्माणकर्त्या-मुक्तीदात्याच्या उपस्थितीत घालवणार होता.

अद्भुत उलटणे!

देवाचा कोकरा, जो त्याक्षणी, पापासाठी भरपाई म्हणून त्याचे रक्त वाहत होता, त्याच्यावरील विश्वासाच्या आधारावर, देवाने नोंदवहीतून त्या माणसाच्या पापांना पुसून टाकले, त्याला येशूच्या धार्मिकतेचे श्रेय दिले, आणि कोकऱ्याच्या पुस्तकात त्याचे नाव कायमचे कोरले, ते पुस्तक जे त्या सर्वांची नांवे कायम राखून असेल ज्यांनी तारणाचे देवाचे दान प्राप्त केले आहे.

या असहाय्य पाप्यासाठी, पापाचा शाप कायमचा उलटला होता.

## खुनी व्यक्तींना क्षमा केली जाऊ शकते का?

चौकशी करणाऱ्याकडून हा ई-मेल आला :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

''**येशू (त्याच्यावर शांती असो) आपल्या पापांसाठी आपल्या ठिकाणी मरण पावला**'' या वाक्याच्या प्रकाशात ''न्याय'' या शब्दाचे तुम्ही कसे स्पष्टीकरण द्याल हे मला जाणून घ्यायचे आहे. माझ्या संपूर्ण आयुष्यभर ज्या सर्व चुका मी केल्या आहेत त्यासाठी मला जबाबदार धरले जाणार नाही हा याचा अर्थ आहे का? **खुनी**, जो या जगात न्याय केल्यावाचून सुटतो त्याला त्यानंतर मोकळे सोडले जाईल केवळ याकारणासाठी की येशूने त्याच्या पापांची भरपाई केली आहे.... या दृष्टीकोनात सहभागी होणे मला कठीण वाटते....असे होवो की आपल्या सर्वांना योग्य मार्गावर नेतृत्व करण्यात येवो!

पापी लोकांच्या ऐवजी वधस्तंभावर येशूचा मृत्यू हा न्यायाशी सुसंगत आहे का? देवाकडून एका *"खुनी व्यक्तीला"* देखील क्षमा केली जाऊ शकते का? चला आपण *"खून करणारे"* ज्यांना क्षमा केली गेली आणि जे परिवर्तीत झाले त्यांच्या थोडया साक्षींवरून प्रथम शेवटच्या प्रश्नाचे उत्तर पाहू या.

## नरभक्षक

पृथ्वीची दैवते या त्याच्या पुस्तकात, बायबल भाषांतरकार आणि मानववंशशास्त्रज्ञ डॉन रिचर्डसन याली लोकांबद्दल बोलतात- इंडोनेशियाच्या इरीयन जया, येथील भयानक, पर्वत-निवासी नरभक्षक. शेजारच्या गावातील शत्रू असणाऱ्या लोकांचा छळ करणे, त्यांना ठार मारणे आणि होय, खाणे ही शतकानुशतके त्यांची सवय होती. बदला आणि भीती ही एक *"सामान्य"* जीवनशैली होती.

मग सुवार्ता त्यांच्याकडे आणली गेली.

याली आणि शेजारील वंशाने ख्रिस्तामध्ये पापाची क्षमा आणि नवीन जीवनाविषयी देवाची सुवार्ता ऐकली. पुष्कळांनी विश्वास ठेवला. त्यांचा विचार करण्याचा आणि जगण्याचा मार्ग परिवर्तीत झाला. देवाचे पुन्हा जन्म घेतलेल्या मुलांप्रमाणे, त्यांना आता नवीन दर्जा होता ज्यास सामान्य म्हणतात. ते जे पूर्वी एकमेकांचा द्वेष करत आणि भय राखत होते ते आता बंधू झाले होते. त्यांच्या पूर्वीच्या शत्रूबरोबर मैत्री सुलभ करण्यासाठी, त्यांनी *"याली गावाला जोडण्यासाठी उत्तम प्रकारचा पायी चालण्यासाठी मार्ग"* तयार केला.[२३६]

आज हे पूर्वीचे मारेकरी त्यांना करुणा दाखवतात जे त्यांची हानी करण्याचा प्रयत्न करतात, कारण देवाच्या आत्म्याने त्यांची हृदये बदलली आणि त्यांना शिकवले आहे : *"तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा."* (इफिस. ४:३२)

## एक हताश मुलगी

सिंगापूर येथे एका कठोर मुस्लीम घरात एम्माचे पालनपोषण झाले होते. तिच्या पाल्यांच्या घटस्फोटामुळे आणि कौटुंबिक जीवनातील अकार्यक्षमतेमुळे, वयाच्या १६व्या वर्षी तिने आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला.

दहा मजले असलेल्या त्यांच्या इमारतीच्या बाल्कनीडून उडी मारण्याचा एम्माने निश्चय केला होता. तिची योजना पूर्ण करण्यासाठी जेव्हा ती तयार झाली होती, तेव्हा तिला माहित नसलेल्या देवाजवळ तिने क्रोधाने आणि हताश होऊन आक्रोश केला, *"जर तू खरेच अस्तित्वात*

*आहे, तर कसेतरी मला सांग!"* त्यानंतर दहाव्या मजल्यावरील बाल्कनीकडे जाणाऱ्या थोडयाशा पायऱ्या उतरल्यावर ती दहाव्या मजल्याच्या बाल्कनीकडे आली...

पायऱ्यांवर एक बायबल ठेवलेले होते!

ते तिने उचलले आणि घाईने तिच्या खोलीत गेली. बायबल या वचनांवर उघडले गेले :

*"**परमेश्वर माझा मेंढपाळ आहे; मला काही उणे पडणार नाही**. तो मला हिरव्यागार कुरणात बसवतो; तो मला संथ पाण्यावर नेतो. **तो माझा जीव ताजातवाना करतो;** तो आपल्या नावासाठी मला नीतिमार्गांनी चालवतो. मृत्यूच्छायेच्या दरीतूनही मी जात असलो तरी कसल्याही अरिष्टाला भिणार नाही, कारण तू माझ्याबरोबर आहेस; तुझी आकडी व तुझी काठी मला धीर देतात. तू माझ्या शत्रूंच्या देखत माझ्यापुढे ताट वाढतोस; तू माझ्या डोक्याला तेलाचा अभ्यंग करतोस; माझे पात्र काठोकाठ भरून वाहत आहे. **खरोखर माझ्या आयुष्याचे सर्व दिवस मला कल्याण व दया ही लाभतील; आणि परमेश्वराच्या घरात मी चिरकाल राहीन.**"* (स्तोत्र. २३)



जसे एम्माने हे स्तोत्र वाचले, तसे ती देवाची सत्यता आणि प्रीतीने भरून गेली. त्यानंतर खूप लवकरच, तिने प्रभू येशूवर विश्वास ठेवला, जो म्हणतो, *"**मीच उत्तम मेंढपाळ आहे; उत्तम मेंढपाळ मेंढरांकरता आपला प्राण देतो.**"* (योहान १०:११)

एम्मा त्याची एक मेंढरू बनली. तिला आता आत्महत्त्या करायची नव्हती. त्याऐवजी, ती आता एक आनंदी पत्नी आणि पाच लेकरांची आई आहे. जीवनात तिचा आवेश हा ख्रिस्तामध्ये जे तिला सापडले-देवाची विपुल प्रीती, ती प्राप्त करण्यासाठी इतरांना मदत करण्याचा आहे.

जेव्हा मी ही कथा त्याच्या अचूकतेसाठी एम्माकडे पाठवली, तेव्हा तिने मला ई-मेल लिहिला, हे सांगत की देवाच्या प्रीती विषयी शब्दांना मोठया अक्षरात लिहा. जगभरातील स्त्रीयांद्वारे संभाव्यपणे भारावून टाकणारा तणाव आणि आव्हानांच्या मध्ये, एम्मा तिला लागणारी दैनंदिन शक्ती आणि आनंद प्रभूचे अद्भुत प्रेम आणि काळजीमध्ये प्राप्त करते.

## एक हिंसक माणूस

शेवटी, तार्सच्या शौलाचा विचार करू, जो एक धार्मिक आवेशी होता ज्याने देवाच्या नावाखाली लोकाना जिवंत मारले होते.

शौल तार्स, अशिया मायनर (आधुनिक दिवसातील तुर्कस्थान) येथे ख्रिस्ताच्या काळादरम्यान जन्मला होता. येशू हा मसीहा आणि देवाचा पुत्र आहे म्हणून शौलाने विश्वास ठेवला नाही. येशूचे स्वर्गारोहण झाल्यानंतर थोडयाच वेळेत, येशूच्या अनुयायांना अटक करावी, त्यांची चौकशी करावी आणि त्यांना मृत्यूदंड देण्यासाठी यहूदी उच्च न्यायालयाकडून शौलाला आदेश देण्यात आला होता. येशूवर विश्वास ठेवणाऱ्या यहूदी लोकांना तुरुंगात टाकावे, फटके मारावे आणि त्यांचा वध करण्याद्वारे तो देवाची सेवा करत आहे असा त्याचा विश्वास होता.[२३७] यहूदी ख्रिस्ती असणाऱ्या एका गटाला अटक करण्याच्या आणखी एका उद्देशाला पूर्ण करण्यात शौल आणि त्याच्या लोकांना एके दिवशी काय घडले हे येथे आहे.

> *"मग जाता जाता असे झाले की, तो दिमिष्काजवळ येऊन पोहचला त्या वेळी अकस्मात त्याच्यासभोवती आकाशातून प्रकाश चमकला. तेव्हा तो जमिनीवर पडला आणि त्याने अशी वाणी आपणाबरोबर बोलताना ऐकली की, "शौला, शौला, **माझा** छळ का करतोस?" तेव्हा तो म्हणाला, '**प्रभो**, तू कोण आहेस?' त्याने म्हटले, 'ज्या **येशूचा** तू छळ करतोस तोच मी आहे; [काटयावर लाथ मारणे हे तुला कठीण. तेव्हा तो थरथर कापला व आश्चर्यचकित होऊन म्हणाला, 'प्रभो, मी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?'] प्रभो, म्हणाला, 'तर उठ व नगरात जा, म्हणजे तू काय करायचे हे तुला सांगण्यात येईल."* (प्रेषित. ९:३-६)

शौलाचे येशूला पाहण्याने वेगळेच वळण मिळाले. जुन्या कराराच्या लेखाचा विद्यार्थी म्हणून, येशू हा तो मसीहा होता ज्याविषयी सर्व संदेष्टयांनी लिहिले होते याविषयी तो अचानकपणे समजला.

महान विरोधी महान नायक बनला.[२३८]

शौल, ज्याने नंतर त्याचे नाव पौल (अर्थ "लहान") असे बदलले, आणि साक्ष दिली :

> *"कारण मी जे पूर्वी **निंदक, छळ करणारा व जुलमी होतो** त्या मला त्याने विश्वासू मानून आपल्या सेवेकरता ठेवले; मी असा होतो तरी मी जे केले ते न समजून अविश्वासामुळे केले, म्हणून माझ्यावर दया झाली; आणि ख्रिस्त येशूमधील*

*विश्वास व प्रीती ह्यांसह आपल्या प्रभूची कृपा विपुल झाली.* ***ख्रिस्त येशू पापी लोकांना तारण्यास जगात आला,..... त्या पापी लोकांपैकी मी मुख्य आहे.*** *"*

(१ तीमथ्य. १:१३-१५)

## ख्रिस्ताचे वैशिष्टय

देवाकडून *"खुनी व्यक्तींना"* क्षमा आणि परिवर्तीत केले जाऊ शकते का?

हेच ते इरीयन येथील नरभक्षकाला, सिंगापूरच्या एम्माला आणि तार्सच्या शौलाला घडले. हेच ते वधस्तंभावरील येशूच्या एका बाजूला असणाऱ्या पश्चातापी खुनी व्यक्तीला घडले. हेच ते दररोज जगभरातील पापी लोकांना घडत आहे, तुरुंगात आत आणि बाहेर असणाऱ्यांना, जेव्हा ते देवाच्या संदेशावर विश्वास ठेवतात.

पापी लोकांना मुक्ती मिळत आहे आणि त्यांची हृदये आणि जीवने परिवर्तीत करणे हे ख्रिस्ताचे वैशिष्टय आहे. देवाची दया आणि कृपा हीच आहे.

अर्थातच, पापाचा त्याचा परिणाम आहे.

वधस्तंभावरील गुन्हेगार तरीही त्याच्या गुन्ह्यासाठी दु:ख भोगला. त्याने प्रभूला जाणून, त्याच्यासाठी जगून आणि इतरांना देखील त्याला ओळखण्यास मदत करण्याने जी शांती आणि आनंद मिळतो त्याचा या जगात कधीही अनुभव केला नाही.

असे असले तरी, ज्या प्रकारे एका पापी व्यक्तीला क्षमा केली जाते आणि देवासमोर धार्मिक ठरवले जाते ते नेहमी सारखेच आहे : त्याच्या किंवा तिच्या पापी अवस्थेला ओळखून आणि तारणासाठी देवाच्या तरतुदीवर विश्वास ठेवण्याने.

प्रभू येशूवर विश्वास न ठेवणे हे वधस्तंभावर येशूच्या दुसऱ्या बाजूवर खिळलेल्या अपश्चातापी अपराध्याबरोबर नाश होणे आहे.

## दया आणि न्याय एकत्र

थोडया पानांअगोदर ज्या लेखकाविषयी आपण ऐकले होते त्याने विचारले : *"आपल्या पापांसाठी आपल्या ठिकाणी येशू मरण पावला"* या वाक्याच्या प्रकाशात *"**न्याय**"* या शब्दाला तुम्ही कसे स्पष्ट कराल?" अहमदने हाच प्रश्न पूर्वी विचारला होता :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

देवाची इच्छा काय आहे हे लोकांना सांगण्यासाठी आणि मग त्याच्या प्रिय पुत्राचे अर्पण देणे आणि त्याचा छळ केल्यावाचून त्यांची पापे पुसून टाकण्याइतका देव पुरेसा सक्षम नाही का???!

जसे आपण वारंवार पाहिले आहे, देव महान असल्यामुळे-अन्याय आणि विश्वासूपणा- ज्यामुळे तो लोकांची पापे *"पुसून"* टाकू शकत नाही जोपर्यंत त्या पापांचा पुरेसा न्याय आणि शिक्षा केली जात नाहीत.

१३व्या धडयातील न्यायाधीशाचे उदाहरण तुम्हांला आठवते का ज्याने न्याय केल्यावाचून दया प्रदान केली होती? त्याच्या कृतीने संपूर्ण न्यायालयात क्रोध आणि अवमान उत्पन्न झाला होता.

देव हा लहरी न्यायाधीशासारखा नाही. त्याचे चरित्र किंवा प्रतिष्ठेवर धुळीचा एक कण देखील सापडू शकत नाही. न्यायाला डावलून तो कधीही दया प्रदान करत नाही. म्हणूनच, त्याच्या प्रीतीमुळे, त्याने स्वर्गातून त्याच्या पुत्राला पृथ्वीवर पाठवले की वधस्तंभावर खिळले जावे आणि तेथे देवाची दया आणि सत्याला परिपूर्ण एकत्रेत प्रदर्शित करावे.

> *"**दया व सत्य ही एकत्र झाली आहेत**; नीति व शांती ह्यांनी एकमेकांचे चुंबन घेतले आहे; पृथ्वीतून सत्य बाहेर पडत आहे; स्वर्गातून नीतिमत्व अवलोकन करत आहे."*
> (स्तोत्र. ८५:१०-११)

आपल्यासाठी देवाच्या क्रोधाला येशूने सहन केल्यामुळे, देव *"स्वर्गातून खाली पाहतो"* आणि क्षमा, परिपूर्णता आणि सार्वकालिक जीवनाचे त्याचे दान आपल्याला देतो. आपले स्थान घेण्याने, प्रभू येशूने देवाचा न्याय, दया आणि कृपा दर्शवली. जसे आपण अगोदरच पाहिले आहे :

**न्याय** हा आपण कशाला पात्र आहोत ते प्राप्त करणे आहे.

**दया** ही आपण कशाला पात्र आहोत ते नाही प्राप्त करणे आहे.

**कृपा** ही ज्यास आपण पात्र नाहीत ते प्राप्त करणे आहे.

ख्रिस्तावर विश्वास ठेवणारे सर्व जण ते प्राप्त करतात ज्यासाठी इतर कोणीही पात्र नाहीत : पापापासून शुद्धता, ख्रिस्ताची स्वतःची धार्मिकता, देवाच्या कुटुंबात स्थान, आणि सार्वकालिक जीवन. ख्रिस्ताचा नकार किंवा दुर्लक्ष करणारे सर्व जण ते प्राप्त करतील ज्यासाठी सर्व पात्र आहेत : सार्वकालिक शिक्षा.

ख्रिस्ताच्या आगमनाच्या सातशे शतकापूर्वी, मीखा संदेष्टयाने लिहिले : *"ते नियंत्याच्या गालावर सोटे **मारीत** आहेत"* (मीखा ५:१). याविषयी विचार करा! संपूर्ण पृथ्वीच्या न्यायाधीशाने मानवी देह धारण केला जेणेकरून ज्या अकृतज्ञ पाप्यांना सोडवण्यासाठी तो आला होता त्यांच्याच द्वारे मारला जावे!

न्याय, दया आणि कृपा यापेक्षा उत्तम असे एकत्र येत नाहीत.

"**आपण दुर्बळ असतानाचा ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला**. *नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळा; चांगल्या मनुष्यासाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करील; परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला."* (रोम. ५:६-८)

**न्याय्य आणि दोषमुक्त करणारा**

त्याच्या योजनेच्या पहिल्या टप्प्यावर, त्याच्या स्वतःच्या परिपूर्ण दर्जाला कमी केल्याशिवाय पाप्यांसाठी देवाने क्षमा करण्याचा मार्ग उघडला होता. तो त्यांचा ***"न्याय्य आणि दोषमुक्त करणारा** असे दोन्हीही आहे ज्यांना येशूवर विश्वास आहे."* (रोम. ३:२६)

देव न्यायी आहे कारण त्याने पापाला पुरेशी शिक्षा दिली आहे.

देव त्या सर्वांना न्याय देणारा आहे ज्यांनी त्याने पाठवलेल्या तारणाऱ्यावर विश्वास ठेवला आहे.

ज्याक्षणी मी माझ्या स्वतःच्या प्रयत्नांवर विसंबून राहण्याचे थांबतो आणि माझ्यासाठी येशूवर आणि त्याचा मृत्यू आणि पुनरुत्थानावर माझा विश्वास हस्तांतरित करतो, धार्मिक न्यायाधीश नोंदवहीतून माझे सर्व अपराध पुसून टाकेल.

**दोषमुक्त केला गेला!**

दोषमुक्त केले जाणे हे देवाच्या न्यायिक कृत्याने धार्मिक घोषित करणे आहे. तो माझी नोंद पुसून टाकतो आणि मला योग्य घोषित करतो.

तो हे कसे करू शकतो?

तो हे करू शकतो कारण, वधस्तंभावर, त्याने माझ्या पापाची भरपाई केली आहे.

जेव्हा आदामाने पाप केले, तेव्हा देवाने संपूर्ण मानवजातीला अधार्मिक असे घोषित केले होते. पण येशू मरण पावला आणि पुन्हा उठल्यामुळे, देव विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना धार्मिक म्हणून घोषित करतो.

*"कारण जसे त्या एकाच मनुष्याच्या आज्ञाभंगाने पुष्कळ जण* ***पापी ठरले*** *होते, तसे ह्या एकाच मनुष्याच्या आज्ञापालनाने पुष्कळ जण* ***नीतिमान ठरतील****."* (रोम. ५:१९)

जसे आदामाच्या पापाने दूषितपणा आणि मृत्यू उत्पन्न केला, तसेच ख्रिस्ताचा मृत्यू आणि पुनरुत्थानाने शुद्धता आणि जीवन प्रदान केले.

*"कारण जसे **आदामामध्ये सर्व मरतात** तसे **ख्रिस्तामध्ये सर्व जिवंत केले जातील.**"* (१ करिंथ. १५:२२)

जेव्हा एक धार्मिक न्यायाधीश स्वर्गातून खाली पाहतो, तेव्हा तो तुम्हांला आदाम आणि त्याच्या घाणेरडया अधार्मिकतेमध्ये पाहतो किंवा देव तुम्हांला ख्रिस्त आणि त्याच्या शुद्ध धार्मिकतेमध्ये पाहतो का?

स्वर्गाच्या न्यायकक्षाला तिसरा पर्याय नाही.

## माणसाची दुहेरी समस्या

जसे आपण उत्पत्तीच्या तिसऱ्या अध्यायात वाचले आहे, जेव्हा आदाम आणि हव्वेने त्यांच्या निर्माणकर्त्याची अवज्ञा केली, तेव्हा त्यांनी स्वतःवर पाप आणि लज्जेच्या दुहेरी पेचप्रसंगाला आणले होते.

त्यांचे **पाप** त्यांना लपायला लावले.

त्यांच्या **लज्जे**ने त्यांना त्यांच्या नग्नतेला झाकण्यास प्रवृत्त केले.

देवाने त्याच्या न्यायात त्यांच्या स्वयं-केलेल्या अंजिराच्या पत्त्यांच्या आवरणाचा अस्वीकार केला, परंतु देवाने त्याच्या दयेने अर्पण केलेल्या प्राण्याच्या कातडीने त्यांना नेसवले. प्राण्याचे रक्त त्यांचे पाप काढून टाकण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टीचे प्रतिक होते, आणि प्राण्याची त्वचा त्यांची लज्जा झाकण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टीचे प्रतिक होती.

आपल्या पूर्वजांचे पाप आणि लज्जेमध्ये आपण सहभागी आहोत. देवासमोर, आपण दूषित पापी आणि आध्यात्मिकदृष्टया नग्न आहोत. आपण त्याच्या उपस्थितीत निवास करण्यासाठी लज्जास्पदरित्या अयोग्य आहोत. आपल्याला **त्याची क्षमा** आणि **त्याच्या परिपूर्णतेची** आवश्यकता आहे.

आपल्या दुहेरी समस्येला दोन प्रश्नांमध्ये सारांशीत केले जाऊ शकते :

१. आपल्याला आपल्या निर्माणकर्त्यापासून विभक्त करणाऱ्या पापापासून आपण **शुद्ध** कसे होऊ शकतो?

२. त्याच्यासोबत कायमचे राहण्यासाठी आपण परिपूर्ण वस्त्रांनी कसे **परिधान** केले जाऊ शकतो?

## देवाचा दुहेरी उपाय

मनुष्याची पापी अवस्था आणि धार्मिकतेच्या अभावासाठी फक्त देवाकडेच उपाय आहे.

जेव्हा येशू, देवाचा निष्पाप पुत्र, ज्याने वधस्तंभावर त्याचे रक्त वाहिले, तेव्हा त्याने **आपली शिक्षा** भोगली, आणि, एकच ज्याने मृत्यूवर विजय मिळवणारा म्हणून, त्याने **त्याची धार्मिकता** आपल्याला प्रदान केली.

*"तर आपल्या प्रभू येशूला ज्याने मेलेल्यांतून उठवले त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या आपणांसाठीही ते लिहिलेले आहे, त्या आपणांलाही ते गणले जाणार आहे. तो प्रभू*



*येशू **तुमच्याआमच्या अपराधांमुळे मरण्यास धरून** देण्यात आला व **आपण नीतिमान ठरावे म्हणून** तो उठवला गेला आहे."* (रोम. ४:२४-२५)



*"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे. ही सगळी देवाची करणी आहे; त्याने स्वतःबरोबर आपला समेट येशू ख्रिस्ताच्या द्वारे केला आणि समेटाची सेवा आम्हांला दिली..... ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, **आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व** असे व्हावे."*
(२ करिंथ. ५:१७-१८, २१)

ज्याक्षणी तुम्ही तुमच्या स्वतःवरील आणि तुमच्या धर्मावरील तुमच्या विश्वासाला सोडून देता, आणि ख्रिस्त आणि तुमच्यासाठी त्याने वाहिलेल्या परिपूर्ण रक्तामध्ये तुमची आशा ठेवता :

१) तो तुम्हांला पापाच्या दूषितपणापासून शुद्ध करेल आणि

२) तो तुम्हांला त्याच्या परिपूर्ण धार्मिकतेसह पांघरून घालेल.

देव इतर कोणताही उपाय प्रदान करत नाही.

## देवाचा विनिमय कार्यक्रम

त्याच्या मृत्यू आणि पुनरुत्थानाने, प्रभू येशू ख्रिस्ताने आपली पापे घेतली आणि त्याची धार्मिकता आपल्याला दिली. हा देवाचा सर्वात मोठा विनिमय कार्यक्रम आहे : **त्याच्या**

**धार्मिकतेसाठी माझे पाप**

अशी उदार देणगी कोणी का नाकारेल?

पुष्कळ जण देवाच्या तरतुदीचा नकार करण्याची निवड करतात ही दु:खद सत्यता ही आहे. असे असले तरी, त्याची देणगी कायम राहते : तारणाची देवाची देणगी प्राप्त करणाऱ्या सर्वांना धार्मिक घोषित केले आहे. नकार करणारे सर्व जण त्यांच्या स्वतःच्या पापाची भरपाई करतील, काही अकाल्पनिक, तात्पुरत्या अधोलोकात नाही, तर सैतान आणि त्याच्या भुतांसाठी तयार केलेल्या सार्वकालिक नरकात.

पुष्कळ धार्मिक लोक यावर जोर देतात, *"प्रत्येक व्यक्तीने त्याच्या किंवा तिच्या स्वतःच्या पापासाठी भरपाई केली पाहिजे."* यात अर्थ हा आहे की ज्यांनी देवाच्या क्षमेची आणि धार्मिकतेची देणगी नाकारली ते सर्व तेच करतील. तथापि, त्यांच्या पापाचे ऋण हे कधीही भरले जाणार नाही, कारण ते शाश्वत ऋण आहे. याशिवाय, भटकलेले पापी अग्नीच्या सरोवरात त्यांच्या पापांसाठी **सार्वकालिकरित्या** भरपाई करण्यासाठी गेलेले असतानाही, स्वर्गात राहण्यासाठी आवश्यक धार्मिकता प्राप्त करण्यासाठी ते कधीही सक्षम होणार नाहीत. फक्त देवच असहाय्य पाप्यांना त्याच्या सोबत राहण्यासाठी आवश्यक क्षमा आणि धार्मिकता देऊ शकतो.

तारणारा येण्याच्या सातशे वर्षांपूर्वी, संदेष्टा यशयाने देवाच्या महान विनिमय कार्यक्रमाविषयी लिहिले :

> *"आम्ही सगळे **अशुद्ध मनुष्यासारखे** झालो आहोत; आमची सर्व **नीतीची कृत्ये घाणेरडया वस्त्रांसारखी झाली** आहेत; आम्ही सर्व पाल्याप्रमाणे वाळून गेलो आहोत; आमच्या अधर्माने आम्हांला वादळाप्रमाणे उडवून दिले आहे. आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपापला मार्ग धरला होता; **अशा आम्हा सर्वांचे पाप परमेश्वराने त्याच्यावर लादले. ..त्याने मला नीतिमत्तेच्या झग्याने आच्छादले आहे.**"* (यशया ६४:६; ५३:६; ६१:१०)

देवासमोर तुम्ही अजूनही अ**शुद्ध** आहात का? किंवा ख्रिस्ताच्या रक्ताने तुम्ही शुद्ध झाला आहात?

तुम्ही स्वयं-नीतिमत्तेच्या घाणेरडया चिंधीचे वस्त्र नेसलेले आहात का? किंवा तुम्ही ख्रिस्ताच्या नीतिमत्वाचा शुद्ध **झगा** परिधान करून आहात?

हे सर्व एकाच प्रश्नाकडे घेऊन येते.

> *"आमच्या वार्तेवर कोणी **विश्वास** ठेवला आहे?"* (यशया ५३:१)

तुम्ही देवाच्या वार्तेवर विश्वास ठेवला का? त्याच्या सत्यासाठी तुम्ही इतर सर्व पर्याय सोडले आहेत का?

### "हे तुम्हांला कळावे"

देवाचे वचन म्हणते : *"देवाच्या पुत्राच्या नावावर **विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांला** सार्वकालिक जीवन लाभले आहे **हे तुम्हांला कळावे म्हणून** मी हे तुम्हांला लिहिले आहे."* (१ योहान ५:१३)

वर्षांपूवी, मी एका खूप धार्मिक स्त्रीबरोबर सार्वकालिक जीवनाच्या देवाच्या देणगीबद्दल बोललो. जरी तिने स्वतःला एक ख्रिस्ती म्हटले होते, तरी ख्रिस्तामधील तारणाच्या देवाच्या तरतुदीवर तिने कधीही विश्वास ठेवला नव्हता.

जेव्हा मी तिला बोललो, *"मी मेल्यावर स्वर्गात जाईन हे मला ठाऊक आहे,"* तेव्हा काही रागाने तिने उत्तर दिले, *"ओह, तुम्हांला वाटते तुम्ही इतके चांगले आहात की तुम्ही सरळ स्वर्गात जाल, हो का?"*

*"नाही,"* मी उत्तर दिले, *"हे या कारणासाठी नाही की मी चांगला आहे.' देव चांगला आहे याकारणासाठी. तो एकच आहे ज्याने आम्हांला सांगितले आहे की* "आम्हांला सार्वकालिक जीवन मिळेल हे आम्हांला **कळू** शकते, जर आम्ही त्याजवर आणि त्याने आमच्यासाठी जे केले आहे त्यावर विश्वास ठेवला."

> *"कारण पापाचे वेतन **मरण** आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे."* (रोम. ६:२३)

### अलीला कसे कळले

या पुस्तकाच्या पहिल्या धडयात, मी अलीचा उल्लेख केला आहे, ज्याला त्याच्या कुटुंबाने नाकारले कारण त्याने देवाच्या संदेशावर विश्वास ठेवला.

ब्रुनोसारखे, अलीचे वय २६ असेल जेव्हा मी त्याला भेटलो होतो. तथापि, ब्रुनो सारखे सुखविलास-शोधणारा तो नव्हता, अली प्रामाणिकपणे त्याच्या धर्माचे पालन करत होता, एका विशेष प्रकारे दररोजच्या प्रार्थनांचे पठण करत होता, महिना भराचा उपास पाळत होता, आणि इतर लोकांशी चांगला व्यवहार ठेवण्याचा प्रयत्न करत असे. तरीही त्याच्या हृदयात त्याला शांततेचा अभाव जाणवला.

अली रात्रीच्या वेळी त्याच्या बिछान्यावर जागा राहत विचार करायचा, *"मी माझी धार्मिक*

*कर्तव्ये केली आहेत- तर सार्वकालिकतेबद्दल मी इतका घाबरलेला का आहे? हे देवा, मेल्यानंतर मी कोठे जाईन हे जाणण्याचा माझ्यासाठी काही मार्ग नाही का?"*

अलीने हा प्रश्न त्याचे वडील आणि स्थानिक धार्मिक नेत्यांना केला, *"देव मला स्वर्गात घेईल याबद्दल मी कसे खात्रीशीर होऊ शकतो? सर्वांनी एकच उत्तर दिले :* "तुम्हांला हे कळू शकत नाही. कोणालाही त्याचे नशीब ठाऊक होऊ शकत नाही. फक्त देवालाच माहित आहे."

त्यांच्या उत्तरांनी अलीचे समाधान झाले नाही.

घरी आणि शाळेत, अलीला कुराण मधून शिकवले गेले होते की येशू, मरीयेचा पुत्र, फक्त एक धार्मिक संदेष्टा होता जो एका कुमारिकेकडून जन्मला होता. त्याने हे देखील शिकले की येशू हा मोठा चमत्कार-करणारा होता ज्याला मसीहा, देवाचा शब्द आणि देवाचा आत्मा या उपाधी दिल्या होत्या. *"कदाचित संदेष्टा येशू मला ते उत्तर प्रदान करू शकेल ज्याचा मी शोध घेत आहे,"* असा त्याने विचार केला.

अलीने येशूविषयी पुस्तक मिळवण्याचा निर्णय घेतला. काही आठवडयांनंतर, आम्ही भेटलो. मी त्याला एक बायबल दिले, ज्याचा तो तीव्र रुचीने अभ्यास करू लागला. येथे, त्याच्या स्वतःच्या शब्दात, जवळजवळ एक वर्ष वचनात संशोधन केल्यानंतर हे अलीने शोधले होते :

> सर्व संदेष्टे येशूकडे इशारा करतात हे मी शिकलो आहे. येशूने स्वतःबद्दल जेथे पुढील गोष्टी बोलल्या आहेत ते मी वाचले आहे : *"**मार्ग, सत्य व जीवन मीच आहे.** माझ्याद्वारे आल्यावाचून कोणीही पित्याजवळ जाऊ शकत नाही....मी तुम्हांला खचित खचित सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठवले त्याच्यावर विश्वास ठेवतो **त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे;** आणि **त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही,** तो मरणातून जीवनात पार गेला आहे."* (योहान १४:६; ५:२४)
>
> ह्या आणि इतर वचनांनी येशू कोण आहे हे मला समजण्यास आणि स्वीकारण्यास सहाय्य केले : एकुलता एक तारणारा ज्याने आपले रक्त वाहिले आणि खात्रीशीर तारण प्रदान करण्यासाठी मृतातून उठला. मी त्याच्यावर विश्वास ठेवला आणि या वास्तविकतेवर की त्याने माझ्या पापांसाठी माझ्या ऐवजी, दु:खसहन केले आणि मरण पावला. ज्याक्षणी मी विश्वास ठेवला, मला आंतरिक शांती प्राप्त झाली जी मला पूर्वी कधीही माहित नव्हती. काय हा बदल!
>
> मी आतापासून माझ्या सार्वकालिक नशिबाबद्दल काळजी करत नाही कारण मला माहित आहे प्रभूने माझ्या सर्व पापांसाठी पूर्ण भरपाई केली आहे जे मला दोषी ठरवत होते. मला आता माहित आहे की मी स्वर्गात जाईन, याकारणासाठी नाही की

मी चांगला आहे पण येशू ख्रिस्तामध्ये देवाची कृपा प्रदान केल्यामुळे. आता मला सर्व गोष्टींमध्ये देवाला प्रसन्न करण्याची इच्छा आहे, माझे तारण कमावणे नाही, परंतु या कारणासाठी की देवाने मला तारले आहे आणि माझे हृदय बदलले आहे.

अली साठी, पापाचा शाप उलटला होता. आज तो, त्याची पत्नी आणि त्यांच्या पुत्रांना ते मेल्यानंतर कोठे जातील हेच केवळ माहित नाही, तर ते पृथ्वीवर का आहेत हे देखील माहित आहे : त्यांचा निर्माणकर्ता-मुक्तिदात्याला ओळखावे, प्रेम करावे आणि त्याची सेवा करावी आणि इतरांनी देखील त्याला ओळखण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करावे.

## मृत्यू : विश्वासणाऱ्यांचा सेवक

पृथ्वीवर त्याच्या पहिल्या आगमनाच्या वेळी, मसीहाने पापाच्या शापाला उलटण्याच्या देवाच्या तीन टप्प्याच्या योजनेचा पहिला भाग पूर्ण केला. त्याचे जीवन, मृत्यू, पुरणे आणि पुनरुत्थानाद्वारे, येशूने पाप आणि मृत्यूच्या अभेद्य वाटणाऱ्या भिंतीला तोडले आहे. वधस्तंभावरील चोर, नरभक्षक, एम्मा, शौल, अली, ब्रुनो, आणि इतर सर्व जे प्रामाणिकपणे देवाच्या संदेशावर विश्वास ठेवतात, ते लाभार्थी आहेत.

ख्रिस्तावरील विश्वासणाऱ्यांसाठी, क्रूर अत्याचारी, मृत्यूला एका नम्र सेवकाच्या पदावर पुन्हा नियुक्त करण्यात आले आहे ज्याचे काम देवाच्या आज्ञेनुसार स्वर्गाचे दार उघडणे आहे. जसे पवित्र शास्त्र म्हणते : *"परमेश्वराच्या दृष्टीने त्याच्या भक्तांचे **मरण अमोल** आहे."*[२३९] (स्तोत्र. ११६:१५)

*"मौल्यवान"* हा शब्द *"मृत्यूचे"* वर्णन करू शकेल असे स्वप्न कोणी पाहिले असेल? देवाचे आभार मानतो-विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी.

> *"अरे मरणा, तुझा विजय कोठे? **अरे मरणा, तुझी नांगी कोठे?**...परंतु जो देव आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपल्याला जय देतो त्याची स्तुती असो."*
> (१ करिंथ. १५:५५, ५७)

भूतकाळाचे पापाचे शाप उलटले आहे.



# धडा २८

## टप्पा २ : देवाचा वर्तमान काळातील कार्यक्रम

*"मी आपले नियमशास्त्र त्यांच्या* ***अंतर्यामी ठेवीन****; मी ते* ***त्यांच्या हृत्पटलावर*** लिहीन."

–*प्रभू* (यिर्मया ३१:३३)

**पा**पाच्या प्राणघातक शापावर पुष्कळ लोक विचार करत नसले तरी, पुष्कळ लोक ज्यास जीवनातील रोजचे शाप म्हणू शकतात त्यांच्या बंधनात जगत आहेत.

जगाच्या लोकसंख्येचे बहुसंख्य लोक दुर्दैव, आजार आणि मृत्यूच्या भयात जगत आहेत. पुष्कळ लोक अन्न विकत घेण्यासाठी किंवा त्यांचे कर्ज फेडण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत म्हणून चिंता करत आहेत. इतर वाईट नशीब, जादूटोणा किंवा वाईट दृष्टी, त्यांच्या आनंदाबद्दल मोठ्याने बोलू नये यासाठी काळजी घ्यावी नाहीतर काही दुष्ट आत्मा ऐकेल आणि त्यांच्या आनंदाच्या वस्तुस्थितीवर दुर्दैव आणेल या सर्वांना भीत आहेत. दुष्टात्मे आणि आपत्ती टाळण्यासाठी काही स्वतः आणि त्यांच्या मुलांवर, तसेच त्यांच्या घरांवर ताबीज किंवा मोहिनी बांधतात. बरेच लोक औषधी पितात किंवा संरक्षणासाठी मंत्रे पाठ करतात.[२४०]

कृतज्ञापूर्वक, ते जे त्यांचा निर्माणकर्ता-मुक्तीदात्याला ओळखतात आणि विश्वास ठेवतात त्यांना अशा खबरदारीची काही आवश्यकता नसते कारण तो वाईटाच्या सर्व शक्ती, मग त्या काल्पनिक किंवा खऱ्या असोत त्या सर्वांपेक्षा अमर्यादपणे मोठा आहे. विश्वासणाऱ्यासाठी कशालाही भिण्याची गरज नाही कारण प्रभू येशूकडे सर्व शक्ती, ज्यामध्ये मृत्यू देखील आहे त्या सर्वावर अधिकार आहे.

आपल्या सार्वकालिक नशिबावरील पापाच्या शापाचा प्रभाव उलटण्यासाठीच केवळ येशू आला नाही तर, आपल्या रोजच्या जीवनावरील पापाच्या शापाचा प्रभाव उलटण्यास देखील

आला.

## शाप उलटणे : टप्पा दुसरा

पवित्र शास्त्र म्हणते, *"मुलांनो, तुम्ही देवाचे आहात आणि त्याच्यावर तुम्ही जय मिळवला आहे; कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा **तुमच्यात जो आहे तो मोठा आहे.**"* (१योहान ४:४)

विश्वासणाऱ्या *"**मध्ये** असणारा हा"* कोण आहे?

वधस्तंभावर खिळण्याच्या आदल्या रात्री, येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले :

> *"मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला **दुसरा कैवारी** म्हणजे **सत्याचा आत्मा** देईल; अशासाठी की, त्याने तुमच्याबरोबर सदासर्वदा राहावे. जग त्याला ग्रहण करू शकत नाही, कारण ते त्याला पाहत नाही अथवा त्याला ओळखत नाही; तुम्ही त्याला ओळखता, कारण **तो तुमच्याबरोबर राहतो व तो तुमच्यामध्ये वस्ती करील.** मी तुम्हांला अनाथ असे सोडणार नाही, मी तुमच्याकडे येईन. मी तुमच्याजवळ राहत असताना तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. तरी ज्याला पिता **माझ्या नावाने** पाठवील तो **कैवारी म्हणजे पवित्र आत्मा** तुम्हांला सर्वकाही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांला आठवण करून देईल. मी तुम्हांला शांती देऊन ठेवतो; मी आपली शांती तुम्हांला देतो; जसे जग देते तसे मी तुम्हांला देत नाही. **तुमचे अंतःकरण अस्वस्थ अथवा भयभीत होऊ नये.**"*
> (योहान १४:१६-१८, २५-२७)

## दुसरा कैवारी

येशूने त्याच्या शिष्यांना अभिवचन दिले की, तो स्वर्गात गेल्यानंतर, पिता त्यांना **"दुसरा कैवारी**... पवित्र आत्मा पाठवील.

ग्रीक शब्द ज्याचे इंग्रजीमध्ये कैवारी असे भाषांतर केले आहे तो पॅराक्लेटोस आहे, ज्याचा अर्थ सहाय्यक, सांत्वनदाता, परामर्श देणारा किंवा समर्थक. पवित्र शास्त्रात, पॅराक्लेटोस या शब्दाचा उपयोग **देवाचा** पुत्र आणि देवाचा पवित्र आत्मा या दोन्हीसाठी केला आहे.[२४१]

ज्याप्रमाणे पुत्र पाप्यांना पापाच्या शिक्षेपासून सोडवण्यासाठी आला, त्याप्रमाणेच आत्मा विश्वासणाऱ्यांना पापाच्या सामर्थ्यापासून सोडवण्यासाठी आला.

पवित्र आत्मा नेहमी देवासोबत असतो, जसे पुत्र नेहमी देवासोबत असतो. म्हणूनच देवाच्या पुस्तकाच्या सुरुवातीच्या घोषणेमध्ये त्याला *"देवाचा आत्मा"* म्हणून ओळखले आहे.

(उत्पत्ती १:२)

जसे पुष्कळ लोक करतात तसे सुचवले,[२४२] तर पवित्र आत्मा हा भविष्यातील संदेष्टा (किंवा गब्रीएल देवदूत) होता, हे केवळ संदेष्टयांच्या पवित्र लेखाच्या विरोधात जात नाही, तर प्रभू येशूने जे म्हटले आणि केले त्याच्याही सरळ विरोधात जाते.

येशू वधस्तंभावर मरण पावला आणि पुन्हा उठल्यावर त्याच्या शिष्यांना म्हणाला, तो स्वर्गात जाईल म्हणजे पवित्र आत्मा उतरावा आणि जे सर्व देवाच्या संदेशावर विश्वास ठेवतात त्यांच्या हृदयात निवास करावा. पुत्र वर जाईल आणि आत्मा खाली येईल. येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले : *"तरी मी तुम्हांला खरे ते सांगतो; मी जावे हे तुमच्या हिताचे आहे, कारण मी न गेलो तर **कैवारी** तुमच्याकडे येणारच नाही. **मी गेलो तर त्याला तुमच्याकडे पाठवीन**."* (योहान १६:७)

इतिहासातील या क्षणापर्यंत, पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यांसोबत काही समयी त्यांना सामर्थ्य, मार्गदर्शन आणि आशीर्वाद देण्यासाठी होता. तथापि, येशूने जगाच्या पापाच्या समस्येवर उपाय केल्यानंतरच पवित्र आत्मा हा विश्वासणाऱ्यांमध्ये कायमचा राहण्यास येऊ शकतो.

प्रभू येशू एक खूपच विशेष घटना घोषित करत होता. *"सत्याचा आत्मा...कारण तो तुमच्याबरोबर राहतो व तो **तुमच्यामध्ये वस्ती करील.**"* (योहान १४:१७)

## पवित्र आत्म्याचे आगमन

येशू मृतातून उठल्यावर, पवित्र शास्त्र नोंद करते :

> *"तो व ते एकत्र जमले असताना त्याने त्यांना आज्ञा केली की, 'यरुशलेम सोडून जाऊ नका, तर पित्याने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून ऐकले आहे तिची **वाट पाहा;** कारण योहानाने पाण्याने बाप्तिस्मा केला खरा; पण तुमचा बाप्तिस्मा थोडयाच दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल.'....**परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात, व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.**"* (प्रेषित. १:४-५, ८)

पेंटेकॉस्टच्या[२४३] दिवशी तेच प्रत्यक्षात घडले, येशू मृतातून उठल्यानंतर पन्नास दिवसांनी आणि स्वर्गात गेल्यानंतर दहा दिवसांनी.

> *"नंतर पेंटेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवस आल्यावर ते सर्व एकत्र जमले होते. तेव्हा अकस्मात मोठया वाऱ्याचा सुसाटयासारखा आकाशातून नाद झाला व ज्या घरात*

*ते बसले होते ते सर्व त्याने भरले. आणि वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या व प्रत्येकावर त्या एकेक अशा बसल्या.* ***तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले****.......''* (प्रेषित. २:१-४)

नवीन करार प्रेषितांच्या पुस्तकाच्या दुसऱ्या अध्यायात या नाट्यमय घटनेची नोंद करतो. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने, येशूचे शिष्य यरुशलेम येथे आशिया, अरब आणि जगाच्या इतर भागांतून एकत्र जमलेल्या पुष्कळ परदेशियांच्या वेगवेगळया भाषांमध्ये देवाची सुवार्ता घोषित करू लागले.

पवित्र आत्मा उतरला त्याच दिवशी, तीन हजार लोकांनी देवाच्या संदेशावर विश्वास ठेवला आणि सार्वकालिक जीवनाचे दान प्राप्त केले. विश्वासणाऱ्यांची संख्या वेगाने वाढू लागली.

प्रेषितांचे पुस्तक ख्रिस्तावरील पहिल्या विश्वासणाऱ्यांच्या इतिहासाची नोंद करते आणि संपूर्ण रोमन साम्राज्यात पुनरुत्थित मसीहाची सुवार्ता कशी पसरली हे सांगते, तलवारीच्या शक्तीने नाही, तर देवाची प्रीती आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने.

## बोलावलेले व्यक्ती

या वर्तमान समयी पृथ्वीवर देवाचा मुख्य कार्यक्रम हा *''त्याच्या नावाकरता राष्ट्रांमधून लोकांना घेणे''* आहे. (प्रेषित. १५:१४)

पेंटेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्म्याच्या येण्याने विश्वासणाऱ्यांच्या एका खास कुटुंबाला जन्म दिला त्यास चर्च म्हणतात. चर्चसाठी मूळ ग्रीक शब्द हा एक्लेशिया आहे, याचा अर्थ सरळपणे : सभा किंवा बोलावलेले व्यक्ती. आज शब्द चर्च चुकीच्या संकल्पनांनी आणि असंख्य संप्रदायांनी भरलेले आहे. पुष्कळ जण जे स्वतःला ख्रिस्ती म्हणवतात, ते जसे जीवन जगतात त्याद्वारे ख्रिस्ताच्या नावाचा उघडपणे अपमान करतात. पुष्कळांना धर्म आहे, पण त्यांचे देवासोबत प्रामाणिक नातेसंबंध नाहीत. येशूच्या रक्तावरील विश्वासाद्वारे त्यांच्या पापापासून ते कधी शुद्ध झालेले नाहीत.

सुवार्ता ही आहे की देव त्याच्या पुत्रावर विश्वास ठेवण्यास, त्याची खास नवीन सृष्टी होण्यास, आणि विश्वासणाऱ्यांच्या कुटुंबात दत्तक घेण्यास जे त्याच्यासोबत सार्वकालिकता घालविण्यासाठी सर्व लोकांना सर्वत्र आमंत्रित करत आहे.

येशू येण्यापूर्वी (जुन्या कराराच्या काळातील) ज्या सर्वांनी विश्वास ठेवला होता ते देवाच्या कुटुंबाचा हिस्सा आहेत, पण येशू आल्यावर ज्यांनी विश्वास ठेवला तेच केवळ जिवंत संस्थेचा हिस्सा आहेत ज्यास *''चर्च''* म्हणतात. चर्चला *''ख्रिस्ताचे शरीर''* आणि *''वधू''* देखील

म्हणतात.[२४४] प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना, पवित्र शास्त्र म्हणते :

*"पण तुम्ही ....**देवाचे 'स्वतःचे लोक'** असे आहात; ह्यासाठी की, ज्याने तुम्हांला अंधकारातून काढून आपल्या अद्भुत प्रकाशात पाचारण केले ...ते तुम्ही पूर्वी लोक नव्हता, आता तर '**देवाचे लोक** आहात.......'"* (१ पेत्र २:९-१०)

प्रारंभामध्ये, देवाने मानवाला त्याच्या स्वतःची विशेष सृष्टी कसे केले याबद्दल बायबलचा पहिला आणि दुसरा अध्याय प्रकट करतो. आदामाने पाप कसे केले आणि स्वतःला आणि संपूर्ण मानवजातीला देवापासून विभक्त कसे केले याबद्दल तिसरा अध्याय नोंद करतो. तथापि, पवित्र शास्त्र पुढे स्पष्ट करते की देवाने काय केले जेणेकरून अशुद्ध पापी पुन्हा एकदा *"त्याचे विशेष लोक व्हावेत."*

तुम्ही देवाच्या विशेष लोकांचा हिस्सा आहात का? जर आहात, तर मग तुम्ही देवाच्या पापाला उलटण्याच्या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये अगोदरच प्रवेश केला आहे.

## तारलेले आणि शिक्कामोर्तब केलेले

तारणाची देवाची देणगी प्राप्त करणाऱ्या पाप्यांच्या जीवनात पहिली गोष्ट जी पवित्र आत्मा करतो ती त्याला किंवा तिला नवीन जीवन देणे आहे. स्वतःवरून आणि आपल्या स्वतःच्या प्रयत्नांवरून जे सर्व त्यांचा विश्वास येशू ख्रिस्तावर आणि त्याने वधस्तंभावर त्यांच्यासाठी जे काही पूर्ण केले आहे यावर हस्तांतरित करतात ते पवित्र आत्म्याने आध्यात्मिकदृष्टया नव्याने जन्म घेतील.

येशूने म्हटले,

*"देहापासून जन्मलेले देह आहेत आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहेत. **तुम्हांला नव्याने जन्मले पाहिजे** असे मी तुम्हांला सांगितले म्हणून आश्चर्य मानू नका. ...देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो **कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."*** (योहान ३:६-७, १६)

*"नव्याने पुन्हा जन्म घेणे"* ही काय अद्भुत गोष्ट आहे! पापी व्यक्तीला आध्यात्मिकदृष्टया पुन्हा जन्म घेणे हे जिवंत देवाचे त्याच्या जटील एकतेमधील कार्य आहे. नवीन जन्म शक्य आहे कारण पित्याने त्याच्या पुत्राला पाठवले आहे, पुत्राने पापासाठी त्याचे रक्त वाहिले आहे, आणि पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यास नवीन जीवनाने भरून काढतो.

पवित्र आत्मा आपल्याला केवळ सार्वकालिक जीवन देत नाही; तर तो आपल्याला कायमचा शिक्कामोर्तब करतो, देवाची स्वतःची संपत्ती म्हणून चिन्हित करतो, आणि आपल्यामध्ये कायमचे वास्तव्य करतो. पित्याच्या घरात आपले सुरक्षित पोहचण्याची शास्वती देखील देतो जेव्हा हे जग सोडण्याची आपली वेळ येते.

> *"तुम्हीही सत्याचे वचन म्हणजे तुमच्या तारणाविषयीची सुवार्ता ऐकून घेतल्यानंतर* ***त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याचा तुमच्यावर त्याच्या ठायी शिक्का मारण्यात आला आहे.....जो आपल्या वतनाचा विसार आहे.*** *"* (इफिस. १:१३-१४)

एका खऱ्या विश्वासणाऱ्यास त्याचे किंवा तिचे सार्वकालिक तारण गमावण्याचे काहीही कारण होऊ शकत नाही. 'पवित्र आत्मा...हा आपला **विसार** आहे."

## पुन्हा पाप करण्यासाठी मुक्त?

वेळोवेळी, मी लोकांना निंदकपणे म्हणताना ऐकतो, *"ठीक आहे, म्हणजे स्वर्गात एका स्थानाची शास्वती म्हणून मला केवळ एवढेच करायचे आहे की येशू माझ्या पापांसाठी मरण पावला यावर विश्वास ठेवावा आणि मग मला जसे आवडते तसे मी पाप करत राहावे, हे योग्य नाही का?"*

त्याच तर्काचा वापर करून, तुम्ही जेव्हा एखाद्या मरुभूमीमध्ये आशाहीनपणे हरवलेले होता तेव्हा जर कोणी तुम्हांला त्यातून वाचवले, तर तुम्ही त्या वाचवणाऱ्याला हे म्हणाल का, *"तुमचे आभार! आता मी पुन्हा हरवण्यासाठी मुक्त आहे!"*?

किंवा एखादया उधार देणाऱ्याने तुमचे मोठे कर्ज माफ केले, तेव्हा तुम्ही जाणूनबुजून अशा गोष्टी करण्याची मनसा ठेवाल का ज्याने त्याला दु:ख होईल?

किंवा जर तुम्ही स्वच्छ आणि नीटनेटके इस्त्रीकरून वस्त्र नेसले आहेत, तर तुम्ही असा विचार कराल का, *"चांगले आहे! आता मी जाऊन घाणीत लोळेन!"*?

अशी विचारसरणी अकल्पनीय आहे.

तर मग आदामाची मुले त्याप्रकारे का विचार करतात जेव्हा पाप आणि त्याच्या परिणामाचा विषय येतो?

उत्तर हे दु:खदपणे स्पष्ट आहे. पापाला आपले मन आणि हृदयावर शक्तिशाली पकड आहे, आपल्याला पटवून देण्याच्या मुद्यापर्यंत की पाप हे चांगले आणि **इष्ट** आहे. अर्थातच, असा दृष्टीकोन हा नवीन नाही. आदाम व हव्वेने देखील पापाला असेच पाहिले-निषिद्ध फळ घेण्याची

शक्यता-दिसायला मनोहर आणि शहाणे करायला इष्ट आहे." (उत्पत्ती ३:६)

**काय** समजण्याची आवश्यकता आहे की ज्याक्षणी एक पापी देवाच्या संदेशावर विश्वास ठेवतो, तेव्हा तो किंवा ती तेथून पुढे पापाच्या रानात भटकलेले राहत नाहीत. ते भारदस्त ऋण हे पूर्णपणे भरले गेले आहे. विश्वासणारा आता ख्रिस्ताच्या शुद्ध धार्मिकतेची वस्त्रे परिधान करून आहे.

पवित्र आत्मा देवाच्या नवीन जन्मलेल्या मुलामध्ये पवित्र विश्वास स्थापित करतो की पाप ही एक वाईट गोष्ट आहे, चांगली गोष्ट नाही. तो देवाच्या लोकांना आपले पवित्र चरित्र आणि आचरणास प्रतिबिंबित करणारे जीवन जगण्यास देखील समर्थ करतो. स्वर्गाच्या कुटुंबाचा हिस्सा म्हणून, देवाच्या नव्याने जन्मलेल्या मुलांना कुटुंबाचा सन्मान जपणारे जीवन जगण्याची इच्छा असेल.

विश्वासणारे पवित्र आत्म्याकडे दुर्लक्ष आणि प्रभूचा अनादर करून त्यांना वाटेल तसे जीवन जगत असले तरी, ख्रिस्तावरील सर्व खऱ्या विश्वासणाऱ्यांमध्ये हा स्वर्गीय पाहुणा त्यांच्यात राहत असतो. म्हणूनच पवित्र शास्त्र त्या सर्वांना प्रोत्साहन देते ज्यांनी ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे :

> *"देवाच्या पवित्र आत्म्याला **खिन्न करू नका**; खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे **मुद्रित झाला आहात**."* (इफिस. ४:३०)

प्रभू येशूवर विश्वास ठेवणारे विश्वासाने प्राप्त केलेल्या तारणाला कधीही गमावू शकत नाहीत, परंतु अविश्वासणाऱ्यांसारखे जीवन जगण्याने ते *"देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न"* करू शकतात. प्रभूचे लोक या जगा***मध्ये*** अजूनही असले तरी, ते येथूनपुढे ते *"जगा**चे** नाहीत, ज्याप्रमाणे [तो] या जगाचा नाही."* (योहान १७:१६)

ज्याप्रमाणे प्रभू येशू या जगाच्या अधार्मिक आचरणाचा तिरस्कार करतो, त्याप्रमाणेच त्याच्या शिष्यांनीही केले पाहिजे.

> *"तर आता आपण काय म्हणावे? कृपा वाढावी म्हणून आपण पापात राहावे काय? **कधीच नाही!** जे आपण पापाला मेलो ते आपण ह्यापुढे त्यात कसे राहणार?"* (रोम. ६:१-२)

> *"तर पृथ्वीवरील तुमचे अवयव म्हणजे जारकर्म, अमंगळपण, कामवासना, कुवासना व लोभ-ह्याला मूर्तीपूजा म्हणावे-हे जिवे मारा; त्यामुळे आज्ञा मोडणाऱ्या मुलांवर*

*देवाचा कोप होतो. तुम्हीही पूर्वी त्या वासनांमध्ये जगत होता तेव्हा त्यांमध्ये तुम्ही चालत होता. परंतु आता क्रोध, संताप, दुष्टपणा, निंदा व मुखाने शिवीगाळ करणे, ही सर्व आपणांपासून दूर करा. एकमेकांशी लबाडी करू नका; कारण तुम्ही **जुन्या मनुष्याला** त्याच्या कृतीसह **काढून टाकले आहे;** आणि जो **नवा मनुष्य, आपल्या निर्माणकर्त्याच्या प्रतीरूपाप्रमाणे** पूर्ण ज्ञानाने नवा केला जात आहे, त्याला तुम्ही धारण केले आहे."* (कलस्सै. ३:५-१०)

## विश्वासणाऱ्यात देवाचे जीवन

ज्याप्रमाणे देवाचा पुत्र विश्वासणाऱ्या पापी लोकांना पापाच्या शिक्षेपासून सोडवण्यासाठी आला, त्याप्रमाणे देवाचा आत्मा विश्वासणाऱ्यांना पापाच्या रोजच्या शक्तीपासून सोडवण्यासाठी आला.

ते कसे कार्य करते ते येथे आहे.

ज्याक्षणी एक व्यक्ती त्याचा किंवा तिचा विश्वास ख्रिस्तावर ठेवतात, देवाचा आत्मा त्यांच्या आत्म्यात, त्यांच्या आंतरिक नियंत्रण केंद्रात राहण्यास येण्याद्वारे त्या व्यक्तीच्या आत त्याचे राज्य स्थापित करतो. तो विश्वासणाऱ्याला एक नवीन स्वभाव देतो ज्यास देवाला प्रसन्न करण्याची इच्छा असते. याचा अर्थ हा नाही की व्यक्तीचा स्वार्थी, पापी स्वभाव हा काढला आहे. विश्वासणारा हा प्रभूसोबत स्वर्गात गेल्यावरच जुना स्वभाव हा काढून टाकला जाईल. या जगात, विश्वासणारे निष्पाप परिपूर्णतेच्या अवस्थेपर्यंत पोहचत नाहीत. तथापि, ते जेव्हाजेव्हा देवाला अप्रसन्न करतात तेव्हा त्यांना गंभीर दु:ख झाले पाहिजे.[२४५]

प्रत्येक खऱ्या विश्वासणाऱ्याच्या जीवनात जुना स्वभाव (आदामापासून वारसाने मिळवलेला) आणि नवीन स्वभाव (पवित्र आत्म्याने घातलेला) यांच्यामध्ये सतत युद्ध चालू राहते. ख्रिस्ताच्या आत्म्याचा निवास विश्वासणाऱ्याला देवाला प्रसन्न करण्याची मनापासून इच्छा देतो. तो त्याच्या लोकांना शिकवतो की जरी पाप *"**संपुष्टात येणारे** सुख"* देऊ शकते, तरी *"त्या गोष्टींच्या शेवटी मृत्यू आहे. परंतु आता **पापापासून मुक्त केलेले** असताना ....तुम्हांला आता **पवित्रतेचे फळ** आहे"* (रोम. ६:२१-२२). पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यामध्ये एक मुख्य आव्हान निर्माण करते.

*"आत्म्याच्या द्वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हे आहे, अशांविरुद्ध नियमशास्त्र नाही."* (गलती. ५:२२-२३)

स्वयं-प्रयत्नाचे धर्म आध्यात्मिक फळ निर्माण करत नाहीत. धार्मिक नियमशास्त्र व्यक्तीच्या बाह्य आचरणाला काही अंशापर्यंत जरी नवीन करत असले तरी, फक्त पवित्र आत्मा व्यक्तीच्या आतील स्वभावाला बदलू शकतो.

देवाला तुमच्या जीवनात त्याचे शासन चालवायचे आहे. तुम्हांला पालन करण्यासाठी नियमांची यादी देण्याऐवजी, तो तुमच्यामध्ये आणि तुमच्याद्वारे इतरांच्या आशीर्वादासाठी आणि त्याच्या नावाच्या गौरवाकरता त्याचे जीवन जगतो.

## यादी की प्रीती?

पत्नी मरून गेलेल्या एका माणसाची कथा सांगितली आहे. विधुर व्यक्तीने एका स्त्रीला त्याचे घर स्वच्छ करण्यासाठी आणि आठवडयातून तीन वेळा कपडे धुण्यासाठी कामावर ठेवले. त्या माणसाने रेफ्रिजरेटरवर कामाची यादी लावली आणि त्याची इच्छा होती की घर स्वच्छ करणाऱ्या त्या व्यक्तीने ते सर्व पूर्ण करावे ज्या प्रत्येक वेळी ती येत असे. आणि, होय, तो तिला प्रत्येक आठवडयाला पैसे देत होता.

काही समयानंतर, तो माणूस त्या स्त्रीच्या प्रेमात पडला आणि त्याची पत्नी होईल का म्हणून विचारले. तिने स्वीकार केला. त्यांचा विवाह झाल्यावर, माणसाने रेफ्रिजरेटरवर लावलेल्या कामाची यादी काढून टाकली. त्याने अधिकृतपणे तिला वेतन देणे देखील थांबवले. का? कारण *"घरकाम करणारी स्त्री"* आता त्याची प्रिय पत्नी झाली होती! आता ती आनंदाने घर स्वच्छ करत असे, कपडे धूत असे आणि इतर बरीच कामे पूर्ण करत होती जी त्या यादीमध्ये नव्हती. का? ती तिच्या पतीवर प्रेम करत होती आणि त्याला प्रसन्न करावे आणि त्याची सेवा करण्याची तिची इच्छा होती. रेफ्रिजरेटरवरील नियम आता तिच्या हृदयावर लिहिले गेले होते.

देवाचे जे आहेत त्यांच्यासाठी हेच तो करतो.

> *"परमेश्वर म्हणतो, ...मी आपले नियमशास्त्र **त्यांच्या अंतर्यामी ठेवीन; मी ते त्यांच्या हृत्पटलावर लिहीन**; मी त्यांचा देव होईन व ते माझे लोक होतील."* (यिर्मया ३१:३३)

रेफ्रिजरेटरवरील यादीप्रमाणे, मनुष्याचा धर्म तुम्हांला पूर्ण करणाऱ्या कर्तव्यांची यादी सादर करतो, हे वचन देत की तुम्हांला न्यायाच्या दिवशी कदाचित वेतन दिले जाऊ शकते, *"जर देवाची इच्छा असेल तर."*

गौरवी उलटमध्ये, प्रभू त्याच्या स्वतःबरोबर नातेसंबंध प्रदान करतो. त्याने केवळ

तुमची शिक्षा भोगलेली नाही आणि तुम्हांला सार्वकालिक जीवन दिलेले नाही, परंतु जर तुम्ही त्याचा प्रस्ताव स्वीकाराल तर त्याच्या पवित्र आत्म्या द्वारे तुमच्याकडे यावे आणि तुमच्यात राहण्याची देखील त्याची इच्छा आहे.

तुम्ही कधीही पूर्ण करू शकणार नाहीत अशा कर्तव्यांची लांबलचक यादी तुमच्यावर लादण्याऐवजी, देव तुम्हांला इच्छा देण्याचे अभिवचन देतो की त्यास प्रसन्न करावे आणि प्रीतीपूर्ण अंत:करणाने त्याची सेवा करावी. प्रीतीचे नातेसंबंध धार्मिक याद्या आणि नियमशास्त्रांपेक्षा चांगल्या कामासाठी उत्तम प्रोत्साहन प्रदान करते. हे याकारणासाठी :

*"....**प्रीती** नियमशास्त्राचे पूर्ण पालन आहे."* (रोम. १३:१०)

धर्म तुम्हांला कदाचित नवीन जीवन आणि स्वर्गात स्थानाचे वचन देऊ शकते, परंतु फक्त पवित्र आत्मा ते प्रदान करू शकतो. तो तोच एकमात्र आहे जो तुम्हांला देवाची प्रीती, आनंद, शांती आणि सार्वकालिक सुरक्षेने भरू शकतो.

*"आणि आशा लाजवीत नाही; कारण **आपल्याला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंत:करणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे.**"* (रोम. ५:५)

## आनंदी आज्ञापालन

अर्थातच, वास्तविकता ही आहे की विश्वासणारे देवाची आणि लोकांची देवाच्या प्रीतीने भरून वाहणाऱ्या अंत:करणापासून सेवा करतात याचा अर्थ हा नाही की त्यांना पालन करण्यासाठी काही आज्ञा नाहीत. उदाहरणार्थ, येशू स्वर्गात जाण्याच्यापूर्वी, त्याने त्याच्या शिष्यांना सांगितले :

*"स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे. तेव्हा तुम्ही जाऊन **सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा**; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावात **बाप्तिस्मा द्या**; जे काही मी तुम्हांला आज्ञापिले **ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा**; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे."* (मत्तय २८:१८-२०)

येशूने त्याच्या अनुयायांना *"सर्व राष्ट्रांना"* तारणाची सुवार्ता घोषित करण्याची आज्ञा दिली. एखादा व्यक्ती तारणाची देवाची देगणी प्राप्त केल्यावर, त्याला किंवा तिला येशूने आज्ञापिलेल्या *"सर्व गोष्टींचे पालन"* करायला शिकवले पाहिजे. उदाहरणार्थ, येशूने त्याच्या

शिष्यांना त्यांच्या शत्रूंवर प्रेम करायला आणि सर्वांसाठी आनंदी सेवक होण्यासाठी शिकवले. ख्रिस्ताच्या अनुयायांचा आवेश असा असला पाहिजे की एकच सत्य देव कदाचित संपूर्ण जगभरात ओळखला जावा, विश्वास ठेवला जावा आणि त्याची प्रशंसा केली जावी.

येशूने त्याच्या शिष्यांना नवीन विश्वासणाऱ्यांचा *"पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने"* बाप्तिस्मा करण्यास सांगितले. *"च्या **नावात**"* (एकवचनी), *"च्या नांवांनी"* (अनेकवचनी) नाही हे लक्षात घ्या. केवळ जे स्वतःला असहाय्य पापी म्हणून पाहतात आणि येशूचे जीवन, मृत्यू आणि पुनरुत्थानाबद्दल सुवार्तेवर विश्वास ठेवतात तेच केवळ एकच सत्य देव जो पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा आहे त्यासोबत सार्वकालिक नातेसंबंधात प्रवेश करतील.

देवाच्या संदेशावर विश्वास ठेवणाऱ्यांनी पाण्यात किंवा पाण्याच्या इतर कोणत्याही प्रकारात बाप्तिस्मा घेण्याने त्यांचा विश्वास दाखववावा.

## बाप्तिस्मा का?

विश्वासणाऱ्याला पापापासून शुद्ध होण्यासाठी पाण्यात विधीपूर्वक जाण्याची आवश्यकता आहे का? नाही, कारण ख्रिस्ताने त्याचा मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे जे केले आहे त्या द्वारे विश्वासणारा हा आधीच शुद्ध झाला आहे आणि देवाकडून धार्मिक घोषित केला गेला आहे. पाण्याने बाप्तिस्मा हे आंतरिक सत्यतेचे बाह्य प्रतिक आहे. एकदा की आपण देवाच्या संदेशावर विश्वास ठेवला, तर आपण आपला तारणारा आणि नवीन स्वामीच्या आज्ञापालनात बाप्तिस्मा घेतला पाहिजे, परंतु हा बाप्तिस्मा असा नाही जो आपल्याला स्वर्गासाठी योग्य करतो.[२४६]

तर मग पाण्याने बाप्तिस्मा कोठे योग्य बसतो? प्रभू येशू त्याचा मृत्यू, दफन करणे आणि पुनरुत्थानासोबत दृश्य पद्धतीने ते विश्वासणाऱ्याच्या ओळखीचे प्रतिक आहे. देवाच्या सोडवण्याच्या योजनेमध्ये विश्वासणाऱ्यांचा विश्वास घोषित करण्यासाठी बाप्तिस्मा हा एक मार्ग आहे. पाणी मृत्यूचे प्रतिनिधित्व करते. जेव्हा एका व्यक्तीला पाण्याखाली नेले जाते, तेव्हा तो दाखवत आहे : *"येशू माझ्या पापांसाठी मरण पावला आणि त्याला पुरण्यात आले."* आणि जेव्हा व्यक्ती पाण्यातून वर येतो, तेव्हा तो दाखवत आहे : 'येशूने माझ्यासाठी मृत्यूवर विजय मिळवला. माझ्या वतीने त्याचा मृत्यू, पुरणे आणि पुनरुत्थानामुळे मी आता पापापासून शुद्ध, धार्मिक घोषित केला गेलो आहे आणि सार्वकालिक जीवन दिले आहे.

याबद्दल काही चूक करू नका. देवासमोर पाप्याचा स्वीकार हा केवळ येशू ख्रिस्ताची परिपूर्ण धार्मिकता आणि त्याच्या पूर्ण केलेल्या कामातच आढळते. क्षमा केलेला एक पापी म्हणून, मला माहित आहे की मी प्रभूसोबत कायम राहणार आहे, मी चांगला आहे यामुळे नाही, तर कारण की मी *"**त्याच्या ठायी आढळावे** आणि माझे नीतिमत्व-माझे स्वतःचे नव्हे, म्हणजे*

*नियमशास्त्राच्या योगे प्राप्त होणारे नीतिमत्व नव्हे-तर ते ख्रिस्तावरील विश्वासाने प्राप्त होणारे, **म्हणजे देवापासून प्राप्त होणारे नीतिमत्व असे असावे.**"* (फिलिप्पै. ३:९)

माणसांचे धर्म तुम्हांला तुमच्या स्वतःकडे आणि तुमच्या स्वतःच्या प्रयत्नांकडे पाहण्यास शिकवतात. देवाची सुवार्ता तुम्हांला ख्रिस्त आणि त्याच्या निष्कलंक धार्मिकतेकडे पाहण्यास शिकवते.

## विश्वासणाऱ्यांसाठी न्याय नाही?

वास्तविकता ही की ख्रिस्ताने पाप्यांना सार्वकालिक दोषी ठरविले जाण्यापासून वाचवण्यासाठी आवश्यक ते सर्वकाही केले आहे हे माझ्या मनात आणखी एक प्रश्न उत्पन्न करते. एका ई-मेल वार्ताहराने मला विचारले :

पाठव **विषय :** ई-मेल प्रतिसाद

जर येशूने वधस्तंभावर लोकांना त्यांच्या पापांपासून वाचवण्यासाठी त्याचे रक्त वाहिले आहे, तर हे न्यायाच्या दिवसाच्या उद्देशाला रद्द करते का?

नाही. येशूचा आपल्या पापासाठी वधस्तंभावरील मृत्यू या वास्तविकतेला रद्द करत नाही की विश्वासणाऱ्यांनी देवाला त्यांचा हिशेब दिला पाहिजे. पवित्र शास्त्र म्हणते : *"कारण **देवाच्या घरापासून न्यायनिवाडयास आरंभ होण्याची वेळ आली आहे;** आणि तो आरंभ प्रथम आपल्यापासून झाला, तर देवाच्या सुवार्तेचा अवमान करणाऱ्यांचा शेवट काय होईल?"* (१ पेत्र ४:१७)

## दोन न्यायाचे दिवस

पवित्र शास्त्र भविष्यातील न्यायाच्या स्पष्टपणे दोन भिन्न दिवसांचे वर्णन करते. पहिला, धार्मिकांचे पुनरुत्थान आणि न्याय होईल, आणि त्यानंतर, अधार्मिकांचे पुनरुत्थान आणि न्याय होईल.[२४७]

• **धार्मिकांचा न्याय** : तुम्हांला न्यायाच्या या दिवसाचा हिस्सा व्हायचा आहे. ख्रिस्ताच्या न्यायासनाच्या वेळी उपस्थित असलेल्यांना स्वर्ग किंवा नरकात पाठवले जाईल की नाही असा प्रश्नच उद्भवणार नाही. पृथ्वीवर जगत असताना त्यांनी धार्मिकतेची देवाची देणगी प्राप्त केलेली आहे या वास्तविकतेवर आधारित ते आधीच स्वर्गात असतील. तथापि, विश्वासणारे म्हणून त्यांच्या कामाचा हेतू आणि मूल्याचा देवाच्या अंदाजावर आधारित, त्यांना पुरस्कृत करण्यात येईल किंवा नुकसान सोसावे लागेल. एक विश्वासणारा जो देवाच्या इच्छेनुसार जगला आहे,

आणि इतरांची नम्रपणे सेवा केली, संकटात देवावर विश्वास ठेवला, त्याच्या वचनावर प्रेम केले आणि ते पसरविले, आणि प्रभूच्या परत येण्याची आतुरतेने वाट पाहत होता त्यांनाच पुरस्कृत करण्यात येईल. त्याचवेळेस स्वार्थी विश्वासणाऱ्यास *"नुकसान सहन करावे लागेल; तो स्वतः तारला जाईल; परंतु जणू काय अग्नीतून बाहेर पडलेल्यासारखा तारला जाईल"* (१ करिंथ. ३:११-१५). विश्वासणारे पाच वेगवेगळे *"मुकुट"* प्राप्त करू शकतात याबद्दल बायबल उल्लेख करते, ज्यास ते कृतज्ञतापूर्वक उपासनेमध्ये प्रभूच्या चरणाजवळ ठेवतील.[२४८] *"....कारण आपण सर्व ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभे राहणार आहोत.....तर मग **आपल्यातील प्रत्येक जण** आपल्या स्वतःविषयीचा हिशेब देवाला देईल."* (रोम. १४:१०, १२)

• **अधार्मिकांचा न्याय** : तुम्हांला या भयावह मोठया पांढऱ्या सिंहासनाच्या न्यायाचा हिस्सा व्हायचे नाही, जसे त्यास म्हणतात. ही भयानक घटना त्या सर्वांसाठी असेल जे या पृथ्वीवर जगत असताना देवाच्या तरतुदीवर विश्वास ठेवल्यावाचून त्यांच्या पापात मरण पावले आहेत. ते स्वर्गात जातील की नरकात असा प्रश्नच उद्भवणार नाही. सर्वांना अग्नीच्या सरोवरासाठी दोषी ठरवण्यात येईल, तरी प्रत्येकाला त्यांच्याजवळ असलेल्या सत्याबरोबर त्यांनी काय केले त्यानुसार वेगवेगळ्या प्रमाणात शिक्षा मिळेल. *"....त्या पुस्तकामध्ये जे लिहिले होते त्यावरून मृतांचा न्याय **'ज्यांच्या-त्यांच्या कृत्यांप्रमाणे ठरवण्यात आला.**...मृत्यू व अधोलोक ह्यांनी आपल्यातील मृतांना बाहेर सोडले...अग्नीचे सरोवर हे दुसरे मरण होय. ज्या कोणाचे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही तो अग्नीच्या सरोवरात टाकला गेला."* (प्रकटीकरण २०:११-१५ पाहा)

सुवार्ता ही आहे की ही वचने वाचणाऱ्या कोणालाही नाश होण्याची आवश्यकता नाही, कारण प्रभू येशू पापाच्या शिक्षेपासून सर्वांना मुक्ती प्रदान करतो.

## देवाची मुले

जसे अगोदरच उल्लेख केले आहे, ज्याक्षणी तुम्ही प्रभू येशू ख्रिस्तावर आणि त्याने तुमच्यासाठी काय केले आहे यावर तुमचा विश्वास ठेवता, तेव्हा तुम्ही देवाच्या कुटुंबाचे सदस्य बनता.

देव आतापासून दूर दिसणार नाही.
तो तुमचा पिता होईल.

*"परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने **देवाची मुले** होण्याचा अधिकार दिला; त्यांचा **जन्म ....***

***देवापासून झाला*** *''* (योहान १:१२-१३). ***"तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने 'अब्बा! बापा!'*** *अशी हाक मारणाऱ्या* ***आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंत:करणात पाठवले आहे.*** *''* (गलती. ४:६)

जग हे धर्मांनी भरलेले आहे जे फार दूर-असणाऱ्या, विधींची मागणी करणाऱ्या देवाला दर्शवतात जो लोकांना त्याच्या स्वतःसोबत वैयक्तिक नातेसंबंध प्रदान करत नाही. या उलट, देव ज्याने त्याच्या पुत्राला पृथ्वीवर पाठवले त्याने स्वतःला स्वर्गीय पिता जो पाप्यांवर प्रेम करतो म्हणून प्रकट केले आहे. त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताला स्वीकारणाऱ्या सर्वांना, तो शुद्ध करण्याचे, ख्रिस्ताच्या परिपूर्णतेमध्ये परिधान करण्याचे, आणि त्यांच्या अंत:करणात त्याचा पवित्र आत्मा पाठवण्याचे वचन देतो.

मी त्याला पिता म्हणण्यास धजले, या तिच्या पुस्तकात, पाकिस्तानच्या बिल्किस शेख एका सत्य देवाच्या संदेशाच्या तिच्या शोधाबद्दल सांगते. तिचे संगोपन झालेल्या धर्माच्या पुस्तकाची तुलना बायबलबरोबर अनेक महिने केल्यावर, तिला सत्य दाखवावे यासाठी देवाजवळ रडत असताना ती तिला झालेला तिचा अनुभव सांगते :

> "मी दोन्ही पुस्तके उचलली आणि त्यांना वर केले, एका हातात एक. 'कोणते, पिता?' मी विचारले. 'तुझे पुस्तक कोणते आहे?' मग एक विलक्षण गोष्ट घडली. माझ्या जीवनात अशा प्रकारे कधीही असे घडले नव्हते. माझ्या अंतर्यामात, मी एक वाणी ऐकली, एक वाणी इतकी स्पष्ट जसे काही मी माझ्या अंतर्यामात त्या शब्दांना वारंवार म्हणत आहे. ते नवीन होते, दयेने भरलेले, तरीही त्याचक्षणी पूर्ण अधिकाराचे होते.
>
> **'कोणत्या पुस्तकात तू मला पिता म्हणून भेटते?'**
>
> मला माझे उत्तर सापडले : 'बायबलमध्ये.' यासाठी एवढाच वेळ लागला."[२४१]

जसे या पाकिस्तानच्या स्त्रीबरोबर, तसेच देव माझा देखील पिता आहे. ज्या दिवशी मी देवाच्या संदेशावर विश्वास ठेवला, मी आध्यात्मिकदृष्टया पुन्हा नव्याने जन्मलो. देवाच्या कुटुंबाचा एक सदस्य म्हणून माझे स्थान मी कोणत्याही कारणाने गमावू शकत नाही. येशू म्हणाला, *''माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात; मी त्यांना ओळखतो व ती माझ्यामागे येतात; मी त्यांना* ***सार्वकालिक जीवन*** *देतो;* ***त्यांचा कधीही नाश होणार नाही*** *आणि त्यांना माझ्या हातातून कोणी हिसकून घेणार नाही.''* (योहान १०:२७-२८)

## नातेसंबंध आणि सहभागीता

तर मग काय घडते जेव्हा मी पाप करतो? ते मला देवापासून पुन्हा एकदा विभक्त करण्यास कारणीभूत होते का?

जर एक मुलगा त्याच्या पृथ्वीवरील पित्याची अवज्ञा करतो, तर तो कुटुंबाचा हिस्सा राहत नाही का?

नाही.

एका मुलाची अवज्ञा त्याला पुन्हा जन्म घेण्यास कारणीभूत करत नाही. त्याच्या पालकांशी त्याचे शारीरिक नाते रद्द केले जाऊ शकत नाही. तसेच हे देवासोबत तुमच्या आध्यात्मिक नातेसंबंधात आहे. देवाचा नव्याने जन्मलेला मुलगा म्हणून तुमचे स्थान कोणत्याही कारणाने तुम्ही गमावू शकत नाही. ते सर्व जे विश्वास ठेवतात की, *''तुमचा नाशवंत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे 'देवाच्या जिवंत व **सर्वकाळ** टिकणाऱ्या' शब्दाच्या द्वारे **पुन्हा जन्म पावलेले** आहात''* (१ पेत्र १:२३). देव तुमचा स्वर्गीय पिता आहे. ख्रिस्ताची धार्मिकता ज्यामध्ये तुम्ही परिधान केलेले आहात ती कधीही काढून घेतली जाणार नाही. पवित्र आता तुम्हांला कधीही सोडणार नाही.

तुम्ही सार्वकालिकपणे सुरक्षित आहात.

> *''कारण माझी खातरी आहे की, मरण, जीवन,.....ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करायला समर्थ होणार नाही.''* (रोम. ८:३८-३९)

देवाने माझ्यामध्ये जे सार्वकालिक **नातेसंबध** स्थापित केले आहे त्याला माझे कोणतेही कृत्य उलट करू शकत नाही. तथापि, पाप हे देवासोबतच्या माझ्या रोजच्या **संगतीवर** प्रभाव करेल.

## स्थान आणि अवस्था

समजा एक पिता त्याच्या मुलाला म्हणतो की बागेत जाऊन काम कर, पण त्याऐवजी मुलगा त्याच्या मित्रांसोबत फुटबॉल खेळण्यासाठी पळून जातो. मुलाचे त्याच्या पित्याबरोबरच्या स्थानास प्रभाव पडणार नाही, परंतु त्याच्या पित्याबरोबरच्या पुत्राच्या संगतीवर खात्रीने त्याचा प्रभाव पडेल! जेव्हा मुलगा परत घरी येतो तेव्हा त्याला प्रश्न विचारण्यात येईल; काही कठोर

शब्द बोलण्यात येतील आणि काही योग्य शिस्तीची कारवाई केली जाईल. मुलाने त्याच्या अवज्ञेला कबूल केले पाहिजे म्हणजे तो त्याच्या पित्याबरोबर घनिष्ठ नातेसंबंधाचा पुन्हा एकदा आनंद घेऊ शकेल.

हे अशाच प्रकारे त्यांच्याबरोबर आहे जे देवाचे आहेत. तो त्याच्या मुलांना शिस्त लावतो जेव्हा ते पाप करतात.

> *"माझ्या मुला, परमेश्वराचे शिक्षण तुच्छ मानू नकोस आणि त्याच्या शासनाला कंटाळू नकोस; कारण **जसा बाप** आपल्या आवडत्या मुलाला, तसा परमेश्वर ज्याच्यावर प्रीती करतो त्याला शासन करतो."* (नीतिसूत्रे ३:११-१२)

देवासोबतच्या आपल्या रोजच्या संगती संबंधात, बायबल म्हणते :

> *"त्याच्याबरोबर आपली **सहभागीता** आहे असे जर आपण म्हणत असलो, पण अंधारात चालत असलो, तर आपण खोटे बोलतो, सत्याने वागत नाही...आपल्या ठायी पाप नाहीं असे जर आपण म्हणत असलो, तर आपण स्वतःला फसवतो व आपल्या ठायी सत्य नाही. **जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील,** व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील."* (१ योहान १:६, ८-९)

आपल्यात वास करणारा पवित्र आत्मा देवाच्या सर्व मुलांना सर्व प्रकारच्या पापाचा, मग ते कितीही लहान दिसत असो, त्यांचा तिरस्कार करण्यास शिकवू इच्छितो. तो आपल्याला आपल्या जीवनातील पापांबद्दल संवेदनशील बनवू इच्छितो जेणेकरून इतरांनी पाप म्हणून लेबल देखील लावू नये.

उदाहरणार्थ, मी जर माझ्या पत्नीबरोबर निर्दयी रीतीने बोललो, किंवा ज्या कोणी माझे वाईट केले आहे त्यांच्या प्रती माझा प्रीतीहीन व्यवहार आहे, किंवा मी काहीतरी बोलतो जे सत्यापेक्षा पूर्णपणे कमी आहे, तर पवित्र आत्मा मला माझ्या पापांबद्दल दोषी ठरवतो.

उपाय हा *"माझ्या पापांची कबुली"* देवाजवळ करणे आहे आणि ज्या कोणाला मी दुखावले असेल त्यांच्याकडून क्षमा मागावी. एकदा जर मी हे केले, तर मी माझ्या प्रभूसोबत पुन्हा एकदा घनिष्ठ, मधुर सहभागीतेचा आनंद घेऊ शकतो.

तुम्ही फरक पाहता का?

ख्रिस्तामध्ये, देवासमोर माझे **स्थान** हे परिपूर्णपणाचे आहे, परंतु माझ्या दैनंदिन जीवनात, माझी **अवस्था** ही परिपूर्णतेपेक्षा कमी आहे.

माझ्या**साठी** तारणाचे त्याचे काम हे कायमचे पूर्ण झाले आहे, परंतु माझ्या**मधील** त्याचे काम त्याला मी स्वर्गात भेटण्यापर्यंत चालू राहील.

## उद्देशासाठी विमोचन केलेले

देवाचे लोक ज्याप्रकारे विचार करतात, बोलतात, आणि कृती करतात त्याप्रकारे परिवर्तीत करण्याची ख्रिस्ताच्या पवित्र आत्म्याची इच्छा आहे. तो म्हणतो :

> *"पवित्र बना, कारण मी पवित्र आहे."* (१ पेत्र १:१६)

तो त्याच्या लोकांना हे देखील सांगतो : *"म्हणून तुम्ही मूर्खासारखे होऊ नका, तर प्रभूची इच्छा काय आहे हे समजून घ्या. द्राक्षारसाने मस्त होऊ नका; द्राक्षारसात बेतालपणा आहे; पण* ***आत्म्याने परिपूर्ण*** *[त्यास शरण जा, त्याद्वारे नियंत्रित रहा] व्हा."* (इफिस. ५:१७-१८)

पवित्र आत्मा आपल्या व्यक्तिमत्वाला दडपत नाही; त्याऐवजी, आपण कसे जगावे अशी देवाची इच्छा आहे त्यानुसार रोज धार्मिक आणि विजयी जीवन जगण्यासाठी तो आपल्याला मुक्त करतो. देवाने आपल्याला एका उद्देशासाठी वाचवले आहे. आपण विचार करतो, बोलतो आणि करतो त्या सर्व बाबतीत त्याला उन्नत करण्यासाठी आपल्याला बोलावण्यात आले आहे.

> ***"तुमचे शरीर*** *तुमच्यामध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हांला मिळाला आहे* ***त्याचे मंदिर आहे*** *हे तुम्हांला ठाऊक नाही काय? आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही. कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहात; म्हणून तुम्ही आपले शरीर व आत्मा जी देवाची आहेत त्याद्वारे देवाचे गौरव करा."* (१ करिंथ. ६:१९-२०)

सुवार्तेवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी जीवन-बदलणारे हे अद्भुत सत्य असावे! देवाची वैयक्तिक उपस्थिती आपल्यामध्ये जिवंत आहे! हे जसे आपण त्याच्या अधीन होतो आपली जीवने त्याच्या नावाचा सन्मान करतील आणि इतरांना आशीर्वाद आणतील.

त्याच्या लोकांच्या जीवनातील पवित्र आत्म्याच्या कामाबद्दल बरेच काही बोलले जाऊ शकते.

तो सांत्वन देतो, सामर्थ्य देतो, मार्गदर्शन करतो, ज्ञान देतो आणि परामर्श देतो.

तो विश्वासणाऱ्यांना पवित्र शास्त्र समजण्यास मदत करतो.[२५०]

तो त्यांना देवासोबत जुळण्याच्या मार्गाने प्रार्थना करण्यासाठी सक्षम करतो.[२५१]

तो त्याच्या लोकांना विशेष दाने आणि योग्यता देतो जेणेकरून त्यांनी इतरांना मदत करावी

आणि सहभागीता वाढवावी.[२५२]

विरोध हा कितीही मोठा असला तरी तो ख्रिस्ताच्या अनुयायांना त्याच्यासाठी काम करण्यास आणि साक्षी देण्यासाठी समर्थ करतो. येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले :

> *"पाहा, लांडग्यांमध्ये मेढरांना पाठवावे तसे मी तुम्हांला पाठवतो; म्हणून तुम्ही सापांसारखे चतुर व कबुतरांसारखे निरुपद्रवी व्हा. माणसांच्या बाबतीत जपून राहा; कारण ते तुम्हांला न्यायसभांच्या स्वाधीन करतील, आपल्या सभास्थानात तुम्हांला फटके मारतील,...... जेव्हा तुम्हांला त्यांच्या स्वाधीन करतील तेव्हा कसे अथवा काय बोलावे ह्याची काळजी करू नका, कारण तुम्ही काय बोलावे हे त्याच घटकेस तुम्हांला सुचवले जाईल.* ***कारण बोलणारे तुम्ही नाही, तर तुमच्या पित्याचा आत्मा हाच तुमच्या ठायी बोलणारा आहे.*** *"* (मत्तय १०:१६-२०)

## त्याच्या प्रतिमेशी अनुरूप

थोडक्यात, मानवजातीसाठी देवाचा मूळ उद्देश पूर्ण करण्यासाठी पवित्र आत्मा देवाच्या लोकांसाठी हे शक्य करतो, म्हणजे एका सत्य देवाची प्रतिमा प्रतिबिंबित करावी आणि त्याच्यासोबत कायमच्या घनिष्ठ सहभागीतेचा आनंद घ्यावा.

> *"तसेच आत्माही आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावतो;... परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांना म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांना देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात. कारण ज्यांच्याविषयीचे त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या* ***पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे*** *म्हणून त्याने त्यांना आगाऊच नेमून ठेवले; ह्यात हेतू हा की, तो पुष्कळ बंधूजनांमधला ज्येष्ठ असा व्हावा."* (रोम. ८:२६, २८-२९)

त्याच्या लोकांच्या जीवनातील प्रत्येक घटना आणि संकटांचा वापर त्यांना पुन्हा एकदा *"त्याच्या पुत्राच्या प्रतिमे"* अनुरूप करण्याची देवाची इच्छा आहे.

देवाच्या पुस्तकाचा पहिला अध्याय घोषित करतो की पहिला पुरुष आणि स्त्री यांना *"देवाच्या प्रतीरूपात आणि सदृश"* बनवले गेले होते. त्यांच्या निर्माणकर्त्याच्या विरोधात पाप करण्याच्या मनुष्याच्या निवडीने मुलभूतपणे त्या प्रतिमेला खराब केले. तथापि, जेव्हा योग्य वेळ झाली, देवाने त्याच्या परिपूर्ण, गौरवी पुत्राला जगात पाठवले.

पापामुळे झालेले नुकसान पूर्ववत करण्यासाठी येशूचे नीतिमान जीवन, मृत्यू आणि

पुनरुत्थान हे देवाच्या कार्यक्रमाचा पहिला टप्पा होता. परंतु जसे आपण ह्या अध्यायात पाहिले आहे, त्याच्या योजनेमध्ये येथे आणखी, अधिकाधिक आहे.

ज्या क्षणी तुमच्या आणि माझ्यासारखे असहाय्य पापी हे देवाच्या तारणाच्या सुवार्तेवर विश्वास ठेवतात, तेव्हा तो आपला पवित्र आत्मा आपल्याला देतो, तो आपले विचार, हेतू, शब्द आणि कृत्यांमध्ये त्याच्या प्रतीरूपात आणि सदृश पुन्हा एकदा अनुरूप करण्याची प्रक्रिया सुरु करतो.

देवाच्या लेकरांनी ख्रिस्ताचे चरित्र आणि आचरणास प्रतिबिंबित करावे अशी त्याची इच्छा आहे. ख्रिस्ती या शब्दाला लागू करण्याचा हाच हेतू आहे. असे असले तरी, आपल्याला ख्रिस्ताच्या प्रतिमे अनुरूप करण्याचे पवित्र आत्म्याचे काम ही सतत चालणारी प्रक्रिया आहे जी आपण जेव्हा त्यास समोरासमोर भेटू केवळ त्या दिवसापर्यंत पूर्ण होईल.[२५३]

> ***"आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतीदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच!*** *जग आपल्याला ओळखत नाही याचे कारण हे आहे की त्यांनी त्याला देखील ओळखलेले नाही.*
>
> *प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण* ***त्याच्यासारखे होऊ*** *हे आपल्याला माहित आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल."*
>
> (१ योहान ३:१-२)

त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी देवाच्या पुत्राच्या मुक्तीच्या कार्यामुळे, आणि जे सर्व त्याला शरण जातात त्यांच्यामध्ये देवाच्या परिवर्तनीय कार्याच्या आत्म्यामुळे, सैतानाच्या शक्तीला अप्रभावी केले आहे आणि देवाच्या नीतिमान राज्याचे प्रेम, आनंद, आणि शांती पुन:स्थापित करण्यात आली आहे.

देवाच्या कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्याची आपण उद्देशाने-भरलेल्या जीवनासह आणि उत्साही अपेक्षेने वाट पाहत आहोत जेव्हा तो सैतान, पाप आणि मृत्यूला कायमचे काढून टाकेल.

येशू परत येत आहे.

# धडा २९

# टप्पा ३ : देवाचा भावी काळातील कार्यक्रम

*"शांतीचा देव सैतानाला तुमच्या पायाखाली **लवकरच** तुडवील."*

-(रोम. १६:२०)

**वि**श्वासणाऱ्यांसाठी हे अभिवचन त्या गूढ, प्राथमिक भविष्यवाणीकडून येते जेव्हा पापाने मानवजातीवर वर्चस्व केले त्याच दिवशी देवाने याची घोषणा केली : स्त्रीचे संतान सर्पाचे डोके ठेचील.

विश्वाचा निर्माणकर्ता-मालक जे त्याने अभिवचन दिले आहे ते सर्व तो करेल. पण तो ते त्याच्या स्वतःची योजना आणि कालक्रमानुसार करेल.

## शापाला उलटणे : तिसरा टप्पा

त्याच्या पहिल्या आगमनाच्या वेळी, अभिवचनाच्या मसीहाने पापाच्या शिक्षेची पूर्ण भरपाई करण्याने सैतानाला पराभूत केले होते. विश्वासणाऱ्यांसाठी, नरकाची संभावना नाही, आणि स्वर्गाची खात्री आहे. त्याचा परिणाम म्हणून, सैतानाचे आवडते शस्त्र, मृत्यूने, त्याचा डंक गमावला आहे. **पापाची शिक्षा** उलटली आहे.

प्रभू येशूच्या स्वर्गारोहणानंतर, त्याने त्याचा पवित्र आत्मा, *"कैवारी"* पाठवून दिला, की त्याच्या लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सैतान आणि पापाच्या प्रभावावर वर्चस्व करण्यासाठी, आणि त्यांना देवाच्या प्रतिमेत परत घडण्यासाठी समर्थ करावे. **पापाची शक्ती** उलट केली जात आहे.

तथापि, जेव्हा येशू पृथ्वीवर परत येईल तेव्हाच तो सैतानाला पूर्णपणे कुचलेल आणि

त्याच्या लोकांना **पापाच्या उपस्थिती** पासून सोडवेल.

## येणाऱ्या गोष्टी

ज्याप्रमाणे देवाच्या संदेष्टयांनी मसीहाच्या पहिल्या आगमनाविषयी भविष्यवाणी केली होती, त्याप्रमाणेच ते त्याच्या दुसऱ्या आगमनाची देखील भविष्यवाणी करतात.[२५४] आणि ज्याप्रमाणे त्याची पहिली भेट जशी भविष्यवाणी केली होती तशीच अचूकपणे घडली, त्याप्रमाणेच त्याचे परत आगमन होईल. तो दिवस येत आहे जेव्हा ही घोषणा स्वर्गातून प्रतिध्वनित होईल:

> ***"जगाचे राज्य आमच्या प्रभूचे व त्याच्या ख्रिस्ताचे झाले आहे; आणि 'तो युगानुयुग राज्य करील!"*** (प्रकटीकरण ११:१५)

जेव्हा येशू पृथ्वीवर परत येईल, तेव्हा आदामचे पुत्र त्याला काटयांचा मुकुट घालणार नाहीत आणि त्याला वधस्तंभावर खिळणार नाहीत. ते त्याचे नाव व्यर्थही घेणार नाहीत किंवा हे देखील बोलणार नाहीत की तो एका संदेष्टयापेक्षा अधिक नाही. राजाबद्दल अशा बेताल वागणुकीला येथून पुढे पर्याय राहणार नाही.

पवित्र शास्त्र स्पष्ट आहे. जेव्हा येशू परत येईल, *"प्रत्येक गुडघा टेकेल"* (यशया ४५:२३; फिलिप्पै. २:९-११). पण हे घडण्यापूर्वी, भविष्यवाण्यांची शृंखला पूर्ण झाली पाहिजे.

## स्वर्गात आनंद

जगातील राष्ट्रांनी त्यांचा निर्माणकर्ता-मालक याच्या समोर नमन करणे आणि गुडघे टेकण्यापूर्वी एक घटना घडेल ती अशी की त्याच्या मुक्त केलेल्या लोकांना स्वर्गात घेऊन जाण्यासाठी येशू पृथ्वीच्या वातावरणात उतरेल.

> *"कारण आज्ञाध्वनी, आद्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होत असता प्रभू स्वतः स्वर्गातून उतरेल; आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत ते पहिल्याने उठतील. नंतर जिवंत उरलेले आपण त्यांच्याबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघारूढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सदासर्वदा प्रभूजवळ राहू."* (१ थेस्सल. ४:१६-१७)

गुप्त, विस्मयकारी घटना ही कोणत्याही क्षणी घडू शकते. जेव्हा ती घडेल, तेव्हा ज्यांचे आत्मे स्वर्गात आहेत त्या विश्वासणाऱ्यांची मृत शरीरे, त्यासोबत जे विश्वासणारे पृथ्वीवर अजून

जिवंत आहेत, ते *"एकत्र वर घेतले जातील...की प्रभूला हवेत भेटावे."*[२५५] ख्रिस्तामधील विश्वासणारे ख्रिस्ताच्या समानतेमध्ये क्षणात परिवर्तीत होतील. सार्वकालिकतेसाठी, जी वेळ आणि अवकाशाने बांधील नाहीत अशी योग्य नवीन शरीरे ते प्राप्त करतील.

*"एकत्र वर घेतल्यावर"* काही वेळाने, वैयक्तिक विश्वासणाऱ्यांनी देवाच्या गौरवासाठी आणि इतरांच्या आशीर्वादासाठी पृथ्वीवर निस्वार्थीपणे केलेल्या गोष्टींसाठी पुरस्कार प्राप्त करतील.[२५६] नंतर, देवाचे लोक, *"कायमचे* "पवित्र आणि निष्कलंक"*, अधिकृतपणे त्यांचा सार्वकालिक* "वर"[२५७] जो विजेता ज्याने त्यांना सार्वकालिक न्यायापासून सोडवण्यासाठी त्याचे जीवन अर्पण केले होते त्यास सादर करण्यात येतील.

> *"आपण आनंद व उल्लास करू व त्याचे गौरव करू; कारण कोकऱ्याचे लग्न निघाले आहे, आणि त्याच्या नवरीने स्वतःला सजवले आहे, तिला तेजस्वी व शुद्ध असे तागाचे तलम वस्त्र नेसायला दिले आहे; ते तागाचे तलम वस्त्र म्हणजे पवित्र जनांची नीतिकृत्ये आहेत. तेव्हा तो मला म्हणाला, 'हे लिही, कोकऱ्याच्या लग्नाच्या मेजवानीस बोलावलेले ते धन्य.' तो मला असेही म्हणाला, 'ही देवाची सत्यवचने आहेत.'"* (प्रकटीकरण १९:७-९)

सार्वकालिकतेमध्ये आनंदात व्यतीत केलेले नातेसंबंध आपल्याला पृथ्वीवर ठाऊक असलेल्या कोणत्याही गोष्टींपेक्षा अमर्यादपणे श्रेष्ठ असेल.

## पृथ्वीवर संकट

त्यादरम्यान येथे पृथ्वी ग्रहावर खाली, पवित्र शास्त्र वर्णन करते *"महासंकटाचा"*[२५८] काळ असेल, कारण देव या जिद्दी जगावर त्याचा क्रोध ओतेल आणि त्याच्या पुत्राच्या दुसऱ्या आगमनासाठी मार्ग तयार करेल. ह्या काळाला *"याकोबाच्या संकटाचा काळ"* देखील म्हणतात (यिर्मया ३०:७), कारण ते इस्राएल राष्ट्राला पश्चात्ताप करण्याकडे नेण्यासाठी रचले आहे.

या काळा दरम्यान, एक भारदस्त, शक्तिशाली जगाचा शासक ज्यास पवित्र शास्त्रात *"ख्रिस्त-विरोधक"* आणि *"श्वापद"* म्हणून संबोधले आहे (१ योहान २:१८; प्रकटीकरण १३) तो सत्तेवर असेल. असंख्य लोक आंधळेपणे त्याचे आणि त्याच्या अद्भुत-कामे करणाऱ्या खोटया संदेष्ट्याचे अनुसरण करतील. पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीला हे करावे लागेल *"लहानथोर, धनवान, दरिद्री, स्वतंत्र व दास, ह्या सर्वांनी आपल्या उजव्या हातावर किंवा आपल्या कपाळावर खूण करून घ्यावी; आणि ज्यांच्यावर ती खूण म्हणजे त्या श्वापदाचे नाव किंवा नावाने दर्शवलेली*

*संख्या आहे, त्यांच्याशिवाय कोणाला काहीही विकत घेता येऊ नये किंवा विकत देता येऊ नये, असे ते श्वापद करते."* (प्रकटीकरण १३:१६-१७)

जे अधीन होण्यास नकार देतील त्यांचा वध करण्यात येईल. हा खोटा मसीहा शांती आणि संपन्नतेचे वचन देईल, पण त्याऐवजी तो लोकांना फसवणूक, नाश आणि मृत्यूच्या मार्गावर घेऊन जाईल.

**हर्मगिदोन**

बायबलमध्ये, देवाच्या अनेक संदेष्टयांनी शेवटच्या जागतिक युद्धाबद्दल लिहिले आहे जे चालू असेल जेव्हा प्रभू येशू स्वर्गातून पृथ्वीवर उतरेल. हा नाट्यमय संघर्ष एस्द्राएलोनच्या सपाटीवर लढला जाईल, एक विशाल क्षेत्र जे यार्देन नदीपासून मध्य सागरापर्यंत आहे. पवित्र शास्त्र या प्राचीन आणि भविष्यातील युद्धभूमीला हर्मगिदोन देखील संबोधते, त्याचा अर्थ वध करण्याचा पर्वत.

> *"ते चिन्हे दाखवणारे भूतांचे आत्मे आहेत; ते सर्वसमर्थ देवाच्या त्या महान दिवसाच्या लढाईसाठी संपूर्ण जगातील राजांना एकत्र करण्यास त्यांच्याकडे बाहेर येतात. 'पाहा, जसा चोर येतो, तसाच मी येईन. आपण नग्न असे चालू नये व आपली लाज लोकांना दिसू नये म्हणून जो जागृत राहतो व आपली वस्त्रे राखतो तो धन्य!' त्यांनी त्यांना इब्री भाषेत **हर्मगिदोन** म्हटलेल्या ठिकाणी एकत्र केले."* (प्रकटीकरण १६:१४-१६)

जखऱ्या संदेष्टयाने देखील मसीहाच्या परत येण्याने होणाऱ्या घटनांचे नाटकीय वर्णन लिहिले आहे.

> *"पाहा, परमेश्वराचा दिवस येत आहे; त्या दिवशी तुझी लुट तुझ्या वस्तीत वाटून घेतील. यरुशलेमेबरोबर लढण्यास चढाई करून यावे म्हणून मी सर्व राष्ट्रांना जमा करीन. ते नगर हस्तगत करतील, घरे लुटतील, स्त्रियांना भ्रष्ट करतील; अर्धे नगर बंदिवासात जाईल, तरी अवशिष्ट लोक नगरातून नाहीसे होणार नाहीत."* (जखऱ्या १४:१-२)

*"सर्व राष्ट्रे"* यरुशलेमेस घेरतील. हा मोठया प्रमाणाचा अग्नीने नाश असेल.

## मसीहाचे पुन्हा आगमन

जेव्हा सर्व आशा नष्ट झाली असेल आणि नगरातील वाचलेल्या रहिवाशांना सहाय्यासाठी वर बघण्याशिवाय कोठेही स्थान नसेल, तेव्हा ते सुटकेसाठी प्रभूला हाक मारतील. मग एकच ज्याच्या नावाचा अर्थ *"प्रभू तारतो"* तो स्वर्गातून उतरेल. आणि त्यांच्यासाठी विस्मय आणि आश्चर्य असेल, त्यांचा सोडवणारा हा इतर कोणी नसून येशू असेल, ज्याला त्यांनी वधस्तंभी खिळले होते! परंतु यावेळी, गहन पश्चात्तापाच्या आत्म्यात आणि प्राणाच्या आक्रोशाने, ते त्यांच्या राजाचा स्वीकार करतील.

> *"आणि मी ....व यरुशलेमेच्या रहिवाशांवर कृपा व विनवणी ह्यांच्या आत्म्याचा वर्षाव करीन आणि* ***ज्या मला त्यांनी विंधले त्या माझ्याकडे ते पाहतील****; एकुलत्या एका पुत्रासाठी शोक करावा तसे ते त्याच्यासाठी शोक करतील; ज्येष्ठ पुत्राबद्दल जसा कोणी अत्यंत खेद करतो तसा ते त्याबद्दल खेद करतील."* (जखऱ्या १२:१०)

शेवटी आध्यात्मिकदृष्टया आंधळी असलेली यहूदी राष्ट्रांची नेत्रे उघडतील आणि ते ओळखतील आणि विश्वास ठेवतील की येशू हाच फक्त एकमात्र मसीहा आहे आणि होता.[२५९]

पुढे जे काही घडते ते जगाच्या इतिहासातील युद्धाचे सर्वात प्रभावी प्रदर्शन असेल जेव्हा येशू, जो शब्द, सरळपणे बोलतो आणि शत्रू विरघळतो.

> ***"तेव्हा परमेश्वर पुढे सरसावेल;*** *पूर्वी युद्धाच्या दिवशी ज्या प्रकारे त्याने युद्ध केले त्या प्रकारे त्या राष्ट्रांबरोबर* ***तो युद्ध करील.*** *आणि त्या दिवशी यरुशलेमेसमोर पूर्वेस असलेल्या जैतुनाच्या झाडांच्या डोंगराला त्याचे पाय लागतील तेव्हा जैतुनाच्या झाडांचा डोंगर पूर्वपश्चिम दुभागून मध्ये एक मोठे खोरे उत्पन्न होईल. अर्धा डोंगर उत्तरेकडे व अर्धा डोंगर दक्षिणेकडे सरेल. ...तेव्हा ज्या राष्ट्रांनी यरुशलेमेबरोबर लढाई चालवली त्या सर्वांचा संहार परमेश्वर ज्या मरीने करील ती ही: ते पायांवर उभे असता त्यांचे मांस* ***कुजेल****, त्यांचे डोळे जागच्या जागी* ***सडतील,*** *त्याच्या मुखात त्यांची जिव्हा* ***सडेल****.....तो एक विशेष दिवस होईल, तो परमेश्वरालाच ठाऊक; तो न धड दिवस ना धड रात्र असा होईल; तरी असे होईल की संध्याकाळी प्रकाश राहील...* ***तेव्हा परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल****; त्या दिवशी* ***परमेश्वर तेवढा व त्याचे नाम तेवढे राहील.*** *"* (जखऱ्या १४:३-४, १२, ७, ९)

शेवटी एकच सत्य देवाचा योग्यपणे सन्मान आणि स्तुती केली जाईल.

## प्रभुत्वावर पुन्हा हक्क मिळवला

जखऱ्याने भविष्यवाणी लिहिण्याच्या अनेक दशकांपूर्वी जी आपण आत्ताच वाचली, देवाने दानीएल संदेष्ट्याला समांतर दृष्टांत दिला होता :

> *"तेव्हा मी रात्रीच्या दृष्टांतात पाहिले तर **आकाशातील मेघांवर आरूढ होऊन, मानवपुत्रासारखा कोणी आला**; तो त्या पुराणपुरुषाकडे आला व त्याला त्यांनी त्याच्याजवळ नेले. सर्व लोक, सर्व राष्ट्रे व सर्व भाषा बोलणारे लोक, ह्यांनी त्याची सेवा करावी म्हणून त्याला **प्रभुत्व**, वैभव व राज्य ही दिली; त्याचे **प्रभुत्व** अक्षय व अढळ आहे; त्याचे राज्य अविनाशी आहे."* (दानीएल ७:१३-१४)

प्रभुत्व शब्द दोन वेळा वारंवार बोलले गेले आहे.

जेव्हा देवाने पहिल्या पुरुष व स्त्रीला निर्माण केले होते, तेव्हा त्याने त्यांना *"**सत्ता** चालवावी म्हणून.....पृथ्वीवर संचार करणारे सर्व प्राणी ह्यांवर सत्ता चालवा"* (उत्पत्ती १:२६, २८). जेव्हा आदामाने त्याच्या निर्माणकर्त्याविरुद्ध बंडखोरी केली, त्याने ते प्रभुत्व सैतानाच्या अधीन केले. परंतु या ग्रहावरील सत्ता, अधिकार आणि नियंत्रण जे आदाम *"पहिला मनुष्य"* याने गमावले, ते येशू, *"दुसरा मनुष्य"*[२६०] याने पुन्हा हक्क मिळवेल.

देवाने येशूचा शिष्य, योहानाला, जखऱ्या आणि दानीएलाच्या भविष्यवाणीसह परिपूर्ण ऐक्यातील एक पूरक दृष्टांत दिला :

> *"नंतर मी स्वर्ग उघडलेला पाहिला', तो पाहा, एक पांढरा घोडा आणि विश्वसनीय व सत्य असा म्हटलेला एक स्वार त्याच्यावर बसलेला मला दिसला, 'तो नीतीने न्यायनिवाडा करतो' व लढतो. त्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे व त्याच्या डोक्यावर पुष्कळ मुकुट होते; त्याच्यावर एक नाव लिहिलेले आहे; ते त्याच्यावाचून कुणालाही कळत नाही. रक्तात बुचकळलेले वस्त्र त्याने अंगावर घेतले होते; आणि **देवाचा शब्द हे नाव त्याला देण्यात आले होते**; स्वर्गातील सैन्ये पांढऱ्या घोडयांवर बसून पांढरी व शुद्ध अशी तागाची तलम वस्त्रे अंगावर घालून त्याच्यामागे चालत होती. त्याने 'राष्ट्रांना मारावे' म्हणून त्याच्या 'तोंडातून तीक्ष्ण धारेची' तलवार निघते; तो 'त्यांच्यावर लोखंडी दंडाने अधिकार गाजवील; आणि सर्वसमर्थ देव ह्याच्या तीव्र क्रोधरुपी द्राक्षारसाचे कुंड तो तुडवतो.' त्याच्या वस्त्रावर व त्याच्या मांडीवर **'राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू'** हे नाव लिहिलेले आहे."* (प्रकटीकरण १९:११-१६)

जेव्हा राजांचा राजा परत येईल, त्याच्याबरोबर 'स्वर्गातील सैन्ये, तागाची तलम वस्त्रे परिधान करून असतील,' ज्यांत स्वर्गातील असंख्य देवदूतांचे सैन्य आणि मुक्ती प्राप्त केलेली आदामाची संताने असतील.[२६१] येशूने त्याच्या पहिल्या आगमनाच्या वेळी शक्ती आणि गौरवाचे कृपायुक्त प्रदर्शन जे दर्शवले होते ते त्याच्या दुसऱ्या आगमनाच्या वेळी नि:संदिग्ध सामर्थ्य आणि विस्मयकारक वैभव जे तो प्रदर्शित करेल त्याच्या तुलनेत फिके असेल.

## हृदयात स्वर्गाचे राज्य

मला सांगा, जर तुम्ही एकटेच एक जंगलातून चालत आहात, तेव्हा कोणाचा सामना करण्यास तुम्हांला आवडेल -एक कोकरा की एक सिंह?

जेव्हा मसीहा पहिल्या वेळी पृथ्वीवर आला, तो पाप्यांना तारण्यासाठी *"कोकरा"* म्हणून आला होता, पण जेव्हा तो परत येईल, तेव्हा तो पाप्यांचा न्याय करण्यासाठी *"सिंह"* म्हणून येईल.[२६२]

पृथ्वीवर येशूच्या पहिल्या भेटीच्या वेळी, *"पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे"* हा प्रचार त्याने केला (मत्तय ४:१७). परंतु त्यांच्या चुकीच्या कल्पनांचा पश्चात्ताप करणे आणि त्यांच्या राजाला स्वीकारण्या ऐवजी, त्यांच्या राजाला वधस्तंभी खिळण्यासाठी यहूदी आणि परराष्ट्रीयांनी त्यांच्या सेना एकत्र केल्या. अशा प्रकारे, मसीहाने जगाच्या पापाच्या ऋणासाठी खंडणी म्हणून त्याचे रक्त वाहीले पाहिजे यासाठी त्यांनी देवाची युगानुयुगाची योजना नकळत पूर्ण केली.

सुवार्ता ही आहे की जेव्हा जेव्हा पापी लोक प्रभू येशूवर आणि त्याने त्यांच्यासाठी काय केले आहे यावर त्यांचा विश्वास ठेवतात, तेव्हा तेव्हा देव त्यांच्या हृदयात त्याचे राज्य स्थापित करेल आणि त्यांना कायमचे त्याची प्रजा बनवील.

ख्रिस्तामधील प्रत्येक विश्वासणारा हा अगोदरच स्वर्गाचा नोंदणीकृत नागरिक आहे हे तुम्हांला माहित आहे का?

> *"आपले नागरिकत्व तर स्वर्गात **आहे;** तेथून प्रभू येशू ख्रिस्त हा तारणारा येणार आहे, त्याची आपण वाट पाहत आहोत. ज्या सामर्थ्याने तो सर्वकाही आपल्या स्वाधीन करण्यास समर्थ आहे त्या सामर्थ्याने तो तुमचेआमचे निचावस्थेतील शरीर स्वतःच्या गौरवावस्थेतील शरीरासारखे व्हावे म्हणून त्याचे रुपांतर करील."* (फिलिप्पै. ३:२०-२१)

## पृथ्वीवर स्वर्गाचे राज्य

जेव्हा येशू पृथ्वीवर परत येईल तेव्हा तो त्याचे राज्य यरुशलेम येथे स्थापित करेल, जेथून तो हजार वर्षांसाठी पृथ्वीवर राज्य करेल. शेवटी, त्याचे राज्य येईल आणि त्याची इच्छा *''जसे स्वर्गात तशी पृथ्वीवर पूर्ण होईल''* (मत्तय ६:१०). वाईट हे कोणत्याही राष्ट्रात येथून पुढे सहन केले जाणार नाही, कारण 'तो स्वतः लोखंडी दंडाने अधिकार गाजवील.'' (प्रकटीकरण १९:१५)

देवाचा पुत्र पृथ्वीवर शरीराने परत येईल यावर पुष्कळ लोक विश्वास ठेवत नाहीत. असे असले तरी पवित्र शास्त्र या मुद्यावर स्पष्टपणे बोलते. ज्याप्रमाणे देवाच्या पुत्राने त्याच्या पहिल्या आगमनाच्या वेळी शारीरिक शरीर धारण केले होते आणि मग स्वर्गात त्याच्या पुनरुत्थित, शारीरिक, आणि मर्यादित शरीरासह परत गेला होता, त्याप्रमाणेच तो शारीरिकदृष्टया परत येईल. हेच देवदूतांनी येशू स्वर्गात परत जाण्याच्या वेळी येशूच्या शिष्यांना सांगितले होते:

> *''...**हा जो येशू** तुमच्यापासून वर आकाशात घेतला गेला आहे **तोच**, तुम्ही त्याला जसे आकाशात जाताना पाहिले, **तसाच येईल.**''* (प्रेषित. १:११)

## सैतानाला बांधण्यात आले

येशू ख्रिस्ताच्या हजार वर्षांच्या राज्याबद्दल देवाच्या पुस्तकाला बरेच काही सांगायचे आहे. आपण केवळ मुख्य घटनांचा सारांश करू शकतो.

येशू पृथ्वीवर परत आल्यावर, त्याच्या पहिल्या उपक्रमांपैकी एक सैतानाशी संबंधित आहे, जो जुना *''सर्प''* ज्याने मानवजातीला प्रथम स्वयं-विनाशाच्या मार्गावर नेले होते.

> *''नंतर मी एका देवदूताला स्वर्गातून उतरताना पाहिले. त्याच्याजवळ अथांग डोहाची किल्ली होती व त्याच्या हातात एक मोठा साखळदंड होता. त्याने 'दियाबल' व 'सैतान' म्हटलेला जुनाट 'साप' म्हणजे तो अजगर ह्याला धरले, आणि त्याने एक हजार वर्षेपर्यंत बांधलेल्या अवस्थेत पडून राहावे म्हणून त्याला त्या अथांग डोहात टाकून दिले; आणि ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याने राष्ट्रांना आणखी ठकवू नये म्हणून वरून बंद करून त्यावर शिक्का मारला. त्यानंतर त्याला थोडा वेळ सोडले पाहिजे.''* (प्रकटीकरण २०:१-३)

सैतानाला संपूर्ण हजार वर्षांच्या कालावधीसाठी बांधण्यात आणि एकाकी ठेवण्यात येईल. वाइटाला बंद करून आणि धर्मी एकच राज्य करण्यासह, शेवटी *''पृथ्वीवर शांती, आणि*

*मनुष्यांमध्ये सदभावना"* होईल. (लूक २:१४)

देवाचे धर्मी राज्य, ज्यासाठी जग आतुरतेने वाट पाहत आहे, ती एक सत्यता होईल.

*"...स्वर्गीय देव एका राज्याची स्थापना करील,.... **ते सर्वकाळ टिकेल.**"* (दानीएल २:४४)

## खरे शरण जाणे

जवळजवळ तीन हजार वर्षांपूर्वी, शलमोन राजाने[२६३] मसीहाच्या भविष्यातील राज्याविषयी लिहिले होते जेव्हा पृथ्वीवरील प्रत्येक राष्ट्र आणि व्यक्ती हे खरे शरण जाण्याने त्याच्यासमोर नमन करतील. आज पुष्कळ जण एका सत्य देवाला शरण गेले आहेत असा दावा करतात, परंतु त्या दिवशी, सर्व लोक खरेच त्याला ओळखतील आणि त्यास शरण जातील.

*"**त्याच्या कारकिर्दीत** नीतिमान उत्कर्ष पावो; आणि चंद्र नाहीसा होईपर्यंत विपुल शांती असो. समुद्रापासून समुद्रापर्यंत आणि त्या नदीपासून पृथ्वीच्या शेवटापर्यंत **त्याची सत्ता राहो**. अरण्यातले रहिवासी त्याला नमन करोत; त्याचे वैरी धूळ चाटोत. तार्शीश व द्वीपे ह्यांचे राजे खंडणी देवोत, शबा व सबा ह्यांचे राजे नजराणे आणोत. **सर्व राजे त्याला दंडवत घालोत; सर्व राष्ट्रे त्याची सेवा करोत. कारण धावा करणारा दरिद्री, दीन व अनाथ, ह्यांना तो सोडवील;** दुबळा व दरिद्री ह्यांच्यावर तो दया करील, दरिद्र्याचे जीव तो तारील. जुलूम व जबरदस्ती ह्यांपासून त्यांचे जीव तो मुक्त करील; आणि **त्याच्या दृष्टीने त्यांचे रक्त अमोल ठरेल; तो चिरायू होवो** व त्याला शबाचे सोने मिळो; त्याच्यासाठी सतत प्रार्थना केली जावो; त्याचा धन्यवाद दिवसभर होवो. **भूमीत भरपूर पीक येवो**, पर्वतांच्या शिखरांवर ते डोलो; त्याची कणसे लबानोनासारखी होवोत. नगरोनगरीचे लोक पृथ्वीवरील गवताप्रमाणे विपुल होवोत. **त्याचे नाव सर्वकाळ राहो**; सूर्य आहे तोवर त्याचे नाव वृद्धिंगत होवो; **त्याच्या नावाने लोक आपणांस धन्य म्हणोत; सर्व राष्ट्रे त्याचा धन्यवाद करोत.** परमेश्वर देव, इस्राएलाचा देव, तोच काय तो अद्भुत कृत्ये करतो; त्याचा धन्यवाद होवो. त्याचे गौरवयुक्त नाव सदा सुवंदित असो; त्याच्या महिम्याने सर्व पृथ्वी भरो, आमेन! आमेन!"* (स्तोत्र. ७२:७-१९)

हे स्तोत्र ख्रिस्ताच्या भविष्यातील राज्याविषयी स्पष्ट समज प्रदान करते ज्यामध्ये, *"पृथ्वीच्या शेवटापर्यंत........त्याचे **प्रभुत्व** असेल."*

## परिपूर्ण राज्य

*"दुबळा व दरिद्री ह्यांच्यावर तो दया करील.' मसीहाचे राज्य हे आजच्या भ्रष्ट, अशांत जगाच्या पूर्णपणे उलट असेल. पतनापासून पहिल्या वेळी, येथे सर्वांना स्वातंत्र्य आणि न्याय मिळेल. प्रत्येक बाळ, मुले, स्त्रिया आणि पुरुषांच्या जीवनाला अमर्यादपणे मौल्यवान असा सन्मान दिला जाईल.* "जुलूम व जबरदस्ती ह्यांपासून त्यांचे जीव तो मुक्त करील; आणि त्याच्या दृष्टीने त्यांचे रक्त **अमोल** ठरेल."

वृत्त माध्यमे वारंवार राजकीय आणि धार्मिक नेत्यांच्या बातम्या देतात जे शांततेचे आव्हान करत आहेत आणि शस्त्रे कमी करण्यासाठी वाटाघाटी करत आहेत. तथापि, त्यांचा अधिकार आणि शक्तीच्या मर्यादितपणामुळे, हे नेते ज्या शांतीचा हक्क ते दाखवतात ते निर्माण करण्यास असमर्थ आहेत. परंतु जेव्हा तो परत येईल, एकच ज्याला वारा आणि लाटा शरण येतात, तेव्हा पृथ्वी शेवटी खऱ्या न्यायाचा आणि "विपुल शांतीचा आनंद घेईल.

शतकानुशतके, या जगाचे राजे आणि शासक जगले आणि मरण पावले. परंतु येशू, जो राजांचा राजा आहे, त्याबद्दल पवित्र शास्त्र घोषित करते: *"त्याचे नाव **सर्वकाळ** राहील."* देवाचा पुत्र ज्याने पाप आणि मृत्यूवर विजय मिळवला त्याच्या शासनाअंतर्गत पृथ्वी हजार वर्षांच्या अतुलनीय शांती आणि संपन्नतेमध्ये वाढत जाईल.

> *"सर्व राजे **त्याला** दंडवत घालोत; सर्व राष्ट्रे **त्याची** सेवा करोत....आणि त्याच्या नावाने लोक आपणांस धन्य म्हणोत; सर्व राष्ट्रे **त्याचा** धन्यवाद करोत."*
> (स्तोत्र. ७२:११, १७)

प्रभू स्वतः या थकलेल्या जगाला त्यांना कधीही माहित नसेल असे एकमेव धर्मी राज्य प्रदान करेल. मुक्त केलेली आदामाची मुले, गौरवी शरीरे आणि पवित्र स्वभावाच्या सार्वकालिक प्राप्तीसह, त्याच्यासोबत राज्य करतील.

त्याचे राज्य भ्रष्टाचारापासून मुक्त असेल.

> *"पहिल्या पुनरुत्थानात ज्याला भाग आहे तो धन्य व पवित्र आहे; अशा लोकांवर दुसऱ्या मरणाची सत्ता नाही, तर ते देवाचे व ख्रिस्ताचे याजक होतील; आणि **त्याच्याबरोबर एक हजार वर्षे राज्य करतील.**"* (प्रकटीकरण २०:६)

सर्व प्रकारची- राजेशाही, निरंकुश, लोकशाही, धार्मिक राज्ये अपयशी ठरलेली असताना – त्याचे राज्य अपयशी ठरणार नाही.

तो जसा परिपूर्ण आहे तसेच ते असेल.

## शांतीचा अधिपती

पूर्वी आपण ख्रिस्ताच्या पहिल्या आगमनाबद्दल अनेक भविष्यवाण्यांचा विचार केला. उदाहरणार्थ, मीखा संदेष्टयाने भविष्य केले होते की मसीहा बेथलेहेम येथे जन्मेल. परंतु तुम्ही हे लक्षात घेतले का की मीखाच्या भविष्यवाणीने हे देखील भविष्य केले होते की मसीहा एके दिवशी संपूर्ण पृथ्वीवर राज्य करेल?

> *"हे बेथलेहेम, एफ्राथा, यहूदाच्या हजारांमध्ये तुझी गणना अल्प आहे, तरी* ***तुझ्यामधून एक जण निघेल,*** *तो माझ्यासाठी इस्राएलाचा शास्ता होईल; त्याचा उद्भव प्राचीन काळापासून अनादि काळापासून आहे...****कारण त्याची थोरवी पृथ्वीच्या दिगंतापर्यंत पसरेल. हा पुरुष आम्हांला शांती देईल.****"* (मीखा ५:२, ४-५)

मीखा संदेष्टयाचा समकालीन, यशयाने देखील एका पुरुष बाळाविषयी भविष्यवाणी केली होती जो जन्म घेणार होता आणि सार्वकालिक पुत्र जो देण्यात येणार होता. यशयाच्या भविष्यवाणीने देखील पुत्राच्या जगभरातील भविष्यातील राज्याविषयी इशारा दिला होता.

> *"कारण आमच्यासाठी बाळ जन्मला आहे, आम्हांला पुत्र दिला आहे;* ***त्याच्या खांद्यावर सत्ता राहील****; त्याला अद्भुत, मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती म्हणतील.* ***त्याच्या सत्तावृद्धीला व शांतीला अंत नसणार;*** *तो दाविदाच्या सिंहासनावर बसून त्याचे साम्राज्य चालवील आणि तेथून पुढे ते सर्वकाळ न्यायाने व नीतिमत्तेने दृढ व स्थिर करील. सेनाधीश परमेश्वराचा आवेश हे सिद्धीस नेईल."*
> (यशया ९:६-७)

शेवटी, संपूर्ण जग देवाच्या पुत्राला त्याच्या योग्य उपाधीसह संबोधेल. "त्याचे नाव असे म्हटले जाईल :

अद्भुत,
मंत्री,
समर्थ देव,
सनातन पिता
शांतीचा अधिपती."

राष्ट्रे *"त्यावेळेपासून पुढे, **कायमचे**"* न्याय आणि शांतीचा आनंद अनुभवतील. मनुष्यासोबत असण्याची देवाची इच्छा ही सत्यता होईल. कायमची.

*"त्या दिवसांत बहुत राष्ट्रे परमेश्वराला **येऊन मिळतील** व **माझी प्रजा** बनतील; **मी तुझ्या ठायी वस्ती करीन**."* (जखऱ्या २:११)

आजसाठी सुवार्ता ही आहे की त्या सर्वांना ज्यांच्या अंत:करणात ख्रिस्ताचा आत्मा निवास करत आहे ते आताच देवाची उपस्थिती आणि शांतीचा आनंद अनुभवतील.

## आणखी अज्ञान नाही

जेव्हा प्रभू मानवांमध्ये पृथ्वीवर प्रथम राहिला होता, तेव्हा पुष्कळ लोक तो कोण होता हे ओळखण्यास अपयशी ठरले होते. आजपर्यंत, पुष्कळ लोक येशूला त्यांचा राजा म्हणून ओळखण्यास नकार देतात. असे असले तरी, सुवर्णयुग येत आहे जेव्हा पृथ्वीवरील प्रत्येक प्राण त्याला जो तो दावा करत होता तो एकच म्हणून स्वीकारतील.

*"असे होईल की, एका चंद्रदर्शनापासून दुसऱ्या चंद्रदर्शनापर्यंत, एका शब्बाथापासून ते दुसऱ्या शब्बाथापर्यंत सर्व मनुष्यजाती **माझ्यापुढे** भजनपूजन करण्यास येईल, असे **परमेश्वर** म्हणतो."* (यशया ६६:२३)

येथून पुढे पृथ्वीला हजारो धर्म, संप्रदाय आणि पंथ भरणार नाहीत. येशूची ऐतिहासिक सत्यता, देवाचा पुत्र, वधस्तंभावर मरण पावला आणि मृतातून उठला याला नाकारण्याचे कोणीही धैर्य करणार नाहीत. जरी सर्व जण त्याच्यावर विश्वास ठेवणार नसले तरी, सर्व जण त्याच्याबद्दल आणि याच्या संदेशाबद्दल सत्य जाणतील.

*"कारण जल समुद्राला व्यापून टाकते तशी पृथ्वी परमेश्वराच्या प्रतापाच्या ज्ञानाने भरेल."* (हबक्कूक २:१४)

## आणखी युद्ध नाही

प्रभू पृथ्वीवर राज्य करत असताना, उत्तर आणि दक्षिण, पूर्व आणि पश्चिम यांच्यामधील मत्सर ही भूतकाळाची गोष्ट होऊन जाईल. इस्राएल आणि त्याच्या सभोवतालच्या राष्ट्रांमधील संघर्ष संपेल. आफ्रिकन खंडाचा भयानक त्रास कायमचा संपुष्टात येईल. असेच इतर खंडांमध्ये देखील होईल. गृहयुद्ध आणि दडपशाहीचा अंत होईल. खरी शांती, समृद्धी, आणि उद्देश पृथ्वीवर

पसरेल.

*"**देशादेशांतील लोकांच्या झुंडी जातील व म्हणतील, 'चला, आपण परमेश्वराच्या पर्वतावर** याकोबाच्या देवाच्या मंदिराकडे **चढून जाऊ**; तो आम्हांला आपले मार्ग शिकवो, म्हणजे आम्ही त्याच्या पथांनी चालू,' कारण सीयोनेतून नियमशास्त्र व यरुशलेमेतून परमेश्वराचे वचन निघेल. तो राष्ट्रांचा न्यायनिवाडा करील, देशोदेशींच्या बहुत लोकांचा न्याय करील; तेव्हा ते आपल्या तलवारी मोडून त्यांचे फाळ करतील, आपल्या भाल्यांच्या कोयत्या करतील; ह्यापुढे एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर तलवार उचलणार नाही; **ते इत:पर युद्धकला शिकणार नाहीत.**"* (यशया २:३-४)

शांती आणि ऐक्यता सार्वत्रिक होईल जेव्हा लोक एका सत्य देवाला ओळखतील आणि त्याच्या उपासना करतील.

बाबेलचा गोंधळ उलटला जाईल. पुन्हा एकदा, संपूर्ण जग एकच भाषा बोलतील.

*"तेव्हा मी राष्ट्रांना शुद्ध वाणी देईन, व परमेश्वराची सेवा घडावी म्हणून सर्व त्याच्या नामाचा धावा एकचित्ताने करतील."* (सफन्या ३:९)

## शाप काढून घेतला

या हजार वर्षांच्या कालावधीच्या समृद्धीमध्ये आणखी भर घालण्यासाठी, प्रभू शापाला काढून टाकेल जो पापामुळे पृथ्वीवर आला होता.

जेव्हा येशू पृथ्वीवर प्रथम राहिला होता, तेव्हा त्याने शापाला उलटण्याचे त्याच्या शक्तीचे प्रदर्शन केले होते. त्याने भूतांना काढले, विकृती उलटली, रोगांना बरे केले, मृतातून उठवले, असंख्य लोकांना भोजन पुरवले आणि निसर्गावर परिपूर्ण नियंत्रण प्रदर्शित केले. अशा कृत्यांनी तोच अभिवचन असलेला मसीहा आणि राजा आहे याचा त्याने अखंडनीय पुरावा सादर केला.

येशूने त्याच्या पहिल्या आगमनाच्या वेळी जे काही एका नमुन्यादाखल प्रदान केले, ते तो त्याच्या दुसऱ्या आगमनाच्या वेळी सर्वत्र प्रदान करेल.

तो सैतानाला आणि त्याच्या भूतांना बांधेल. तो स्वाभाविक कारणांपासून विकृती, रोग आणि मृत्यू नाहीसे करील. जमीन येथून पुढे झाडेझुडपे आणि कांटे निर्माण करणार नाही. शेतकऱ्यांनी पूर्वी काढले नसेल इतक्या विपुल पिकाची ते कापणी करतील. दारिद्र्य आणि भूक

हे पुरातन शब्द बनतील.

जगाच्या इतिहासातील या सुवर्णयुगाचा प्रत्येक राष्ट्र अनुभव करतील.

येशूच्या पहिल्या आगमनाच्या वेळी पृथ्वीवरील नागरिकांनी नाकारलेल्या स्वर्गाच्या राज्याला त्याच्या दुसऱ्या आगमनाच्या वेळी जागतिक स्तरावर स्थापित करण्यात येईल.

> *"तेव्हा अंधांचे नेत्र उघडतील, बहिऱ्यांचे कान खुले होतील. तेव्हा लंगडा हरिणाप्रमाणे उडया मारील, मुक्याची जीभ गजर करील; कारण रानात जलप्रवाह, वाळवंटात झरे फुटतील....तेव्हा लांडगा व कोकरू एकत्र चरतील, सिंह बैलाप्रमाणे कडबा खाईल;* ***सर्पाचे खाणे धूळ होईल****. माझ्या सगळ्या पवित्र डोंगरावर ती उपद्रव देणार नाहीत, नासधूस करणार नाहीत,' असे परमेश्वर म्हणतो."* (यशया ३५:५-६; ६५:२५)

प्राणी जगत देखील शांतीत एकत्र राहतील, शाकभाजी रचनेकडे आणि पापाने प्रवेश करण्यापूर्वीच्या एदेन बागेतील परिस्थितीकडे परत वळतील.

असे असले तरी, ख्रिस्ताच्या हजार वर्षांच्या राज्यादरम्यान जे जन्मतील त्यांच्या हृदयात अजूनही पापाचे मूळ असेल. जसे सर्व युगात असते, तसे आदामाच्या वंशजांना तारणाच्या त्याच्या तरतुदीवर सरळपणे विश्वास ठेवण्याने देवाच्या क्षमेची देणगी प्राप्त करण्याची आवश्यकता लागेल.

शेवटचे वचन जे आपण वाचले ते सर्पाबद्दल भविष्यवाणी करते हे तुम्ही हे लक्षात घेतले का? *"सर्पाचे खाणे धूळ होईल."* हजार वर्षांदरम्यान, सर्प त्यांच्या पोटावर रांगत राहतील. जमिनीवर त्यांचे सरपटणे हे आठवण म्हणून कार्य करेल की येथे देवाच्या योजनेच्या तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील आणखी एक नाट्यमय घटना राहिलेली आहे की शापाला कायमचे उलटावे.

## दुष्टाचा अंतिम डंक

पूर्वी आपण शिकलो की *"जुनाट सर्प, जो भूत आणि सैतान"* आहे त्याला बांधण्यात येईल आणि ख्रिस्ताच्या हजार वर्षांच्या राज्यादरम्यान अथांग डोहात टाकले जाईल, *"ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याने राष्ट्रांना आणखी ठकवू नये म्हणून वरून बंद करून त्यावर शिक्का मारला जाईल.* ***त्यानंतर त्याला थोडा वेळ सोडले पाहिजे.****"* (प्रकटीकरण २०:२-३)

देव सैतानाला परत का मोकळे करील? त्याला तसेच बंदिस्त का ठेवत नाही?

प्रभू, त्याच्या अमर्याद ज्ञानात, दुष्टाला कायमचे काढून टाकण्याआधी मनुष्याच्या पापी, भ्रष्ट हृदयाला अंतिम वेळेसाठी उघडे होऊ देईल. जसे मानवता काळापासून ते सार्वकालिकतेमध्ये हस्तांतरित होते, तसे हे सत्य स्पष्टपणे उघड होईल : आदामाचे वंशज त्याच्या पतित स्वभावापेक्षा वर उठण्यास असहाय्य आहेत. फक्त परमेश्वर देवच पाप्यांना धार्मिक आणि त्यांच्या स्वच्छंदी हृदयांना परिवर्तीत करू शकतो.

*"**हृदय सर्वांत कपटी आहे; ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे**, त्याचा भेद कोणास समजतो? प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या वर्तनाप्रमाणे, ज्याच्या त्याच्या करणीप्रमाणे प्रतिफळ देण्यास मी परमेश्वर हृदय चाळून पाहतो; अंतर्याम पारखतो."* (यिर्मया १७:९-१०)

माणसाचे हृदय जरा पाहा कसे *"असाध्य रोगाने ग्रस्त आहे?"* हजार वर्षे एका परिपूर्ण वातावरणात, एका सिद्ध राजासह सिद्ध राज्यात राहिल्यावरही, ज्याक्षणी सैतानाला सोडले जाते, एक हजार वर्षांच्या काळात पृथ्वीवर जन्मलेल्यांचा मोठा जमाव सैतानाच्या असत्य गोष्टींवर विश्वास ठेवेल आणि त्याच्या पाठीशी असेल! ते देवाच्या शत्रूच्या शक्तींबरोबर सामील होतील आणि त्यांच्या निर्माणकर्त्याच्या विरोधात बंडखोरी करतील, ज्याप्रमाणे त्यांच्या पूर्वजांनी एदेन बागेत केले होते.

दुष्टाचा तो अंतिम डंक असेल.

## सैतानाची शेवटची ठाम भूमिका

*"ती हजार वर्षे संपल्यावर सैतानाला कैदेतून बंधमुक्त करण्यात येईल; आणि तो 'पृथ्वीच्या चार कोपऱ्यांतील 'गोग' व 'मागोग' ह्या राष्ट्रांना ठकवण्यास व त्यांना लढण्यासाठी एकत्र करण्यास बाहेर येईल; त्यांची संख्या समुद्राच्या वाळूइतकी आहे. त्यांनी 'पृथ्वीच्या विस्तारावर' फिरून पवित्र जनांची छावणी व 'प्रिय' नगर वेढले; तेव्हा [देवापासून] **स्वर्गातून अग्नी उतरला आणि त्याने त्यांना खाऊन टाकले.**"* (प्रकटीकरण २०:७-९)

प्रभू सैतानाच्या बंडखोर मानवी सेनेला यरुशलेमेस वेढा घेऊ देईल, पण जेव्हा ते एकत्र जमतील, त्याचवेळेस स्वर्गातून अग्नी उतरेल आणि त्यांना भस्म करेल. सैतान आणि ते सर्व जे त्याच्या पक्षाचे आहेत ते शेवटच्या क्षणाला पोहचले असतील.

## सर्पाला ठेचले

पुढे काय घडते ती इतिहासातील सर्वात गंभीर घटना आहे :

*"**त्यांना ठगवणाऱ्या सैतानाला 'अग्नीच्या' व 'गंधकाच्या' सरोवरात टाकण्यात आले**; त्यात ते श्वापद व खोटा संदेष्टा आहे; तेथे त्यांना रात्रंदिवस युगानुयुग पीडा भोगावी लागेल. **नंतर मोठे पांढरे 'राजासान' व त्यावर 'बसलेला' एक जण 'माझ्या दृष्टीस पडला;' त्याच्या 'तोंडापुढून पृथ्वी' व आकाश हे पळाले**; त्यांकरता ठिकाण उरले नाही.' मग मृत झालेल्या लहानथोरांना मी देवाच्या राजासनापुढे उभे राहिलेले पाहिले. त्या वेळी 'पुस्तके उघडली गेली;' तेव्हा दुसरे एक 'पुस्तक' उघडले गेले ते 'जीवनाचे' होते; आणि त्या पुस्तकामध्ये जे लिहिले होते त्यावरून मृतांचा न्याय 'ज्यांच्या-त्यांच्या कृत्यांप्रमाणे ठरवण्यात आला. तेव्हा समुद्राने आपल्यामधील मृत माणसांना बाहेर सोडले; मृत्यू व अधोलोक ह्यांनी आपल्यातील मृतांना बाहेर सोडले; आणि 'ज्यांच्या-त्यांच्या कृत्यांप्रमाणे' प्रत्येकाचा न्याय ठरवण्यात आला. तेव्हा मरण व अधोलोक हे अग्नीच्या सरोवरात टाकले गेले. **अग्नीचे सरोवर हे दुसरे मरण होय. ज्या कोणाचे नाव 'जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही' तो अग्नीच्या सरोवरात टाकला गेला.**"* (प्रकटीकरण २०:१०-१५)

युगांचा संघर्ष हा कायमचा संपुष्टात येईल.

मोठया पांढऱ्या सिंहासनाच्या न्यायानंतर, पापाचा शाप इतिहास असेल. परंतु देवाने केलेल्या दुष्टाच्या न्यायापासून मिळालेले धडे कधीही विसरले जाणार नाहीत. संपूर्ण सृष्टी पापाची तिरस्करणीयता आणि देवाच्या धार्मिकतेचे साक्षी असेल.

शेवटी, सर्पाचे डोके ठेचले जाईल.

सैतान आणि त्याचे अनुसरण करणाऱ्या सर्वांना कायमचे *"सैतान आणि त्याच्या दूतांसाठी तयार केलेल्या सार्वकालिक अग्नीत"* बंदिस्त करण्यात येईल (मत्तय २५:४१). त्या अनंत तुरुंगातून दोषी कधीही सुटू शकणार नाहीत. त्यांच्या शिक्षेसाठी ते देवाला दोष देण्यास समर्थ देखील होणार नाहीत, कारण एका परिपूर्ण राजाबरोबर एका परिपूर्ण पृथ्वीवर हजार वर्षांसाठी आशीर्वादित केल्यानंतरही, त्यांनी अजूनही त्यांच्या निर्माणकर्त्या-मालकाच्या विरोधात बंडखोरी करण्याचा निर्णय घेतला होता.

मनुष्याला निमित्त नसेल.

एका सत्य देवाची प्रतिष्ठा आणि संदेश कायमचे सिद्ध केले जाईल.

ते सर्व ज्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली आहेत ते प्रभूसोबत सार्वकालिकरित्या राहतील, *"परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, 'खून करणारे,' जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक, व सर्व लबाड माणसे ह्यांच्या वाट्यास 'अग्नीचे व गंधकाचे' सरोवर येईल; हेच ते दुसरे मरण आहे."* (प्रकटीकरण २१:८)[२६४]

दुष्ट येथून पुढे कधीही त्याचे कुरूप डोके वर काढणार नाही. संपूर्ण सृष्टी एका सत्य देवाच्या अधीन कायमची राहील.

**त्याच्याबरोबर!**

पुढे काय घडते हे जवळजवळ कल्पना करण्याइतके अद्भुत आहे.

> *"आणि मी राजासनातून आलेली मोठी वाणी ऐकली, ती अशी :* ***'पाहा,' देवाचा मंडप मनुष्यांजवळ आहे, त्यांच्याबरोबर 'देव आपली वस्ती करील****; ते त्याचे लोक होतील, आणि त्यांचा देव असेल'* **देव स्वतः *'त्यांच्याबरोबर राहील.'*** *'तो' त्यांच्या डोळ्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील;* ***ह्यापुढे मरण नाही; शोक, रडणे व कष्ट हे नाहीत;*** *कारण 'पहिल्या गोष्टी' होऊन गेल्या.' तेव्हा 'राजासनावर बसलेला' म्हणाला,* ***'पाहा, मी सर्व गोष्टी 'नवीन करतो.'"*** (प्रकटीकरण २१:३-५)

ज्याप्रमाणे जुन्या करारातील पहिले दोन अध्याय देवाच्या मूळ सृष्टीचे वर्णन करतात, त्याचप्रमाणे नवीन करारातील शेवटचे दोन अध्याय त्याच्या नवीन सृष्टीचे वर्णन करतात. सैतान, पाप आणि मृत्यूसह सर्व हद्दपार केल्यावर, सर्वकाही पुन्हा एकदा निर्माणकर्त्याच्या पवित्र स्वभावासह परिपूर्ण ऐक्यात असेल. पुन्हा कधीही मग मानव किंवा देवदूत पापाला बळी पडणार नाहीत. आवश्यक धडे हे शिकले गेले आहेत आणि *"देव स्वतः त्यांच्याबरोबर राहील आणि त्यांचा देव असेल."*

देवाचा कार्यक्रम आदामाच्या पापाचा प्रभाव केवळ काढून टाकण्यापेक्षा बरेच काही अधिक आत्मसात करतो. त्यात 'सर्वकाही नवीन' करण्याचा समावेश आहे. प्रभूचे लोक त्याच्या तेजस्वी उपस्थितीला योग्य गौरवी स्वर्गीय शरीरांचा आनंद घेतील. संपूर्ण सार्वकालिकतेमध्ये, प्रत्येक राष्ट्र, आणि युगांमधून मुक्त केलेले जीव त्याच्या अद्भुत आणि शाश्वत योजनेत भाग घेतील. विश्वासणारे म्हणून, त्याच्याबरोबर सदा सर्वदा असण्याचा हा आपला आनंद असेल आणि आपण तेथे आहोत हा त्याचा आनंद असेल.

*"देव आपल्यासोबत"* हे शीर्षक एक पूर्ण-वेळेची वास्तविकता असेल.

**त्याच्यासारखे!**

मुक्तिदाता आणि त्याचे लोकांच्या मध्ये कधीही न संपणारी मधुर सहभागीता असेल. आदामाने पृथ्वीवरील सुखलोकात जे काही गमावले त्याहूनही अधिक स्वर्गीय सुखलोकात पुन:स्थापित असेल. जेव्हा देव पहिला पुरुष आणि स्त्रीला निर्माण करणार होता, तेव्हा त्याने म्हटले,

> *"आपल्या प्रतीरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू."* (उत्पत्ती १:२६)

जसे त्याने योजना केली होती त्याप्रमाणेच सर्वकाही घडले.

स्वर्ग हा पुरुष व स्त्रियांनी भरलेला असेल जे त्यांच्या चरित्रात आणि आचरणात त्याची प्रतिमा आणि सदृश्यता धारण करून असतील. पाप हे येथून पुढे आता शक्य देखील असणार नाही. देवाचे लोक धार्मिकतेमध्ये मुद्रित करण्यात येतील. दावीद संदेष्ट्याने हे भविष्य पाहिले जेव्हा त्याने लिहिले : *"मी तर **नीतिमान** ठरून मला तुझ्या मुखाचे दर्शन घडो. मी जागा होईन तेव्हा **तुझ्या दर्शनाने** माझी तृप्ती होवो."* (स्तोत्र. १७:१५)

खंडणी देऊन घेतलेले पुरुष, स्त्रिया आणि मुले देवाची नवीन सृष्टी म्हणून कायमचे सुरक्षित असतील, ***"त्याच्या पुत्राच्या प्रतिमेत** समरूप."* (रोम. ८:२९)

> *"प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा **आपण त्याच्यासारखे होऊ** हे आपल्याला माहित आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल."* (१ योहान ३:२)

**त्याच्यासाठी!**

प्रारंभापासून, निर्माणकर्त्याचा उद्देश मानवजातीमध्ये त्याचे राज्य अशा प्रकारे स्थापित करण्याचा होता की आपण कदाचित त्यास ओळखावे आणि त्याचे गौरव, शुद्धता, प्रीती, न्याय, दया आणि कृपेची प्रशंसा करावी.

सैतानाबरोबरच्या दीर्घकालीन युद्धात, ही नेहमीच देवाची योजना होती की *''परराष्ट्रीयांतून आपल्या नावाकरता काही लोक काढून घ्यावेत म्हणून देवाने त्यांची भेट कशी घेतली...''* (प्रेषित. १५:१४). परमेश्वर पृथ्वीवर जे जिंकण्यासाठी आला होता ते त्याच्याजवळ असेल: त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत असलेले मुक्त केलेले लोक, जे, धन्यवादी आणि प्रशंसात्मक हृदयाने, कायमचे त्याला प्रेम करतील, त्याच्याबरोबर आनंदी असतील आणि त्याची स्तुती करतील.

देवाच्या योजनेचा तिसरा आणि शेवटचा टप्पा शापाला उलटणे हा कोणत्याही क्षणी सुरु होऊ शकतो. तुम्ही तयार आहात का? येशूच्या परत येण्याचा विचार तुम्हांला आनंदाने की दहशतीने भरतो?

शेवटच्या समयाबद्दल बायबल आपल्याला आणखी खूप समज देते जे आपल्याला पवित्र शास्त्राच्या माध्यमातील या प्रवासात पाहायचे नाहीत. आतासाठी, हे ओळखणे पुरेसे आहे की आपला विश्वासू निर्माणकर्ता त्याच्या पुस्तकाच्या शेवटच्या धडयात दडलेल्या लहान भविष्यवाणीबद्दल चांगलेच करील :

*''पुढे **काहीही शापित असणार नाही**!''* (प्रकटीकरण २२:३)

# धडा 30

## स्वर्गाचे पूर्वावलोकन

**ज**गाच्या लोकसंख्येतील बरेच लोक वाईटाचा यीन-यांग दृष्टीकोन ठेवतात. यीन म्हणजे सावली आणि यांग म्हणजे प्रकाश. कदाचित तुम्ही यीन-यांग प्रतिक पाहिले असेल-काळया आणि पांढऱ्या रंगाचे अनोखे वर्तुळ. या प्राचीन चीनी तत्वज्ञानात सत्य असले तरी, ते चांगले आणि वाईट, बरोबर आणि चूक, जीवन आणि मृत्यू यांच्यामधील फरकास पुसट करते. ते चांगले आणि वाईटाला मनुष्याच्या अस्तित्वाच्या स्वाभाविक आणि कधीही न संपणारे वैशिष्ट्य मानते.

जसे आपण पाहिले आहे, बायबल चांगले आणि वाईटाचे वेगळे विश्लेषण देते. दु:ख आणि खिन्नता हे नेहमीच आपल्या विश्वाचा अविभाज्य भाग आहेत आणि राहतील या कल्पनेला ते समर्थन देत नाही. पवित्र शास्त्र हे स्पष्ट आहे. एक दिवस येत आहे जेव्हा वाईट, यातना आणि मृत्यू त्यांची अंतिम शरणागती पत्करतील आणि इतिहासाच्या टप्प्यावरून नाहीसे होतील.

हा आलेख देवाचा अपरिवर्तनीय कार्यक्रम दर्शवतो :

| ← सार्वकालिकता | [ समय ] | सार्वकालिकता → |
|---|---|---|
| **परिपूर्णपणे चांगले** | **[चांगले/वाईट]** | **परिपूर्णपणे चांगले** |

चांगले आणि वाईटाचे वर्तमान मिश्रण कंसात आहे. ते आसपास कायमचे राहणार नाही.[२६५]

देवाच्या पुस्तकातील पहिले दोन आणि शेवटचे दोन अध्याय पाप-मुक्त जगाला चित्रित करते, एक जग ज्यामध्ये देवावर योग्यपणे प्रेम केले आणि त्याला गौरविले जाते. देव पाप आणि त्याच्या शापावर उपाय करत आहे, आणि त्याला ओळखणाऱ्या, त्याजवर प्रीती करणाऱ्या आणि त्याच्याबरोबर सार्वकालिकतेमध्ये राहण्याची इच्छा असणाऱ्या लोकांना स्वत:साठी मुक्त करावे हे आपण त्या पहिल्या आणि शेवटच्या अध्यायांच्यामध्ये पाहतो.

कोणत्याही एका चांगल्या कथेसारखे, देवाच्या मुक्तीच्या इतिहासाला सुरुवात, मध्यांतर आणि शेवट आहे.

**सुरुवात** : उत्पत्ती १ आणि २ :
एक परिपूर्ण जग-वाईटाने प्रवेश करण्यापूर्वी.
**मध्यांतर** : उत्पती ३ ते प्रकटीकरण २० :
एक भ्रष्ट जग- देवाची मध्यस्थी.
**शेवट** : प्रकटीकरण २१ आणि २२ :
एक परिपूर्ण जग-वाइटाला काढून टाकल्यानंतर.

## शेवटाचे पुस्तक

ज्याप्रमाणे बायबलचे पहिले पुस्तक हे सुरुवातीचे पुस्तक आहे, त्याप्रमाणेच बायबलचे शेवटचे पुस्तक हे शेवटाचे पुस्तक आहे.

| **उत्पत्ति** | **प्रकटीकरण** |
|---|---|
| ◊ सर्व गोष्टींची सुरुवात | √ सर्व गोष्टींचे पूर्णत्व |
| ◊ आकाश आणि पृथ्वीची निर्मिती | √ नवीन स्वर्ग आणि पृथ्वीची निर्मिती |
| ◊ देव पृथ्वीसाठी सूर्याला निर्माण करतो | √ देव स्वर्गाचा प्रकाश आहे |
| ◊ सैतानाकडून मनुष्याची पहिली परीक्षा | √ सैतानाकडून मनुष्याची अंतिम परीक्षा |
| ◊ देवाचा पहिला न्याय | √ देवाचा अंतिम न्याय |
| ◊ पाप आणि मृत्यूचा प्रवेश | √ पाप और मृत्यु का उन्मूलन |
| ◊ 'पहिल्या आदामाने" प्रभुत्व गमावले | √ *"अंतिम आदामाने"* प्रभुत्व पुन:स्थापित केले |
| ◊ देव सैतानाला कुचलण्याचे अभिवचन देतो | √ सैतानाला अग्नीच्या सरोवरात टाकण्यात आले |
| ◊ पहिला कोकरा अर्पण केला | √ देवाच्या कोकऱ्याचे गौरव केले |
| ◊ पृथ्वीवरील सुखलोकातून मनुष्याला हद्दपार केले | √ मनुष्य स्वर्गीय सुखलोकात |
| ◊ मनुष्याला जीवनाच्या झाडापासून दूर केले | √ मनुष्य जीवनाच्या झाडातून खात आहे |
| ◊ मानवजाती देवापासून विभक्त केली गेली | √ सोडवलेली मानवजाती देवासोबत कायमची |

यादी ही पुढे पुढे जात राहील, पण तुम्हांला कल्पना आली असेल.

**प्रकटीकरण**

जसे आपण एकत्र मिळून आपला प्रवास पूर्ण करत आहोत, देवाच्या कथेच्या *"शेवटा"* वर चिंतन आपण करावा अशी माझी इच्छा आहे, जे खरेच संपूर्ण नवीन सुरुवातीचे उद्घाटन आहे.

बायबलचे शेवटचे पुस्तक या शब्दांनी सुरु होते :

> *"येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण : हे त्याला देवाकडून झाले. 'ज्या गोष्टी लवकर घडून आल्या पाहिजेत त्या' आपल्या दासांना दर्शवण्याकरता हे झाले; आणि त्याने आपल्या दूताला पाठवून त्याच्याकडून आपला दास योहान ह्याला कळवले. त्याने देवाच्या वचनाविषयी व येशू ख्रिस्ताविषयी म्हणजे त्याने जे जे पाहिले त्यांविषयी साक्ष दिली. ह्या संदेशाचे शब्द वाचून दाखवणारा, ते ऐकणारे व त्यात लिहिलेल्या गोष्टी पाळणारे हे धन्य; कारण समय जवळ आला आहे....... येशू ख्रिस्त ह्याच्यापासून, तुम्हांला कृपा व शांती असो.* ***जो आपल्यावर प्रीती करतो, ज्याने आपल्या रक्ताने तुम्हांआम्हांला 'पातकांतून मुक्त केले', आणि आपल्याला 'राज्य' आणि आपला देव व पिता ह्याच्यासाठी 'याजक' असे केले, त्याला गौरव व पराक्रम हे युगानुयुग आहेत. आमेन. 'पाहा, तो मेघांसहित येतो;' प्रत्येक डोळा त्याला 'पाहील', ज्यांनी त्याला 'भोसकले तेही पाहतील***; *आणि पृथ्वीवरील सर्व वंश त्याच्यामुळे ऊर बडवून घेतील.' असेच होणार. आमेन. 'प्रभू देव जो आहे, जो होता व जो येणार, 'जो सर्वसमर्थ,' तो म्हणतो, 'मी अल्फा व ओमेगा आहे.'"*
>
> (प्रकटीकरण १:१-३, ५-८)[२६६]

देवाने ही वचने *"त्याचा सेवक योहानाला"* दिली. योहान हा बारा शिष्यांतील एक होता जो येशूसोबत त्याच्या पृथ्वीवरील सेवाकार्यादरम्यान होता.[२६७] येशू स्वर्गात गेल्यानंतर सहा दशकांनंतर, त्याच्या पवित्र आत्म्याने देवाच्या ग्रंथाच्या या शेवटच्या पुस्तकाला लिहिण्यासाठी योहानाला प्रेरणा दिली.

प्रकटीकरण म्हणजे अनावरण. हे आकर्षक पुस्तक अशा घटनांचे अनावरण करते ज्याची कल्पना कोणीही करू शकत नाही. परमेश्वर त्याच्या पवित्र नावाचे समर्थन कसे करेल आणि मनुष्याच्या पापामुळे गमावलेले प्रभुत्व पुन:स्थापित कसे करेल याची ते रूपरेषा देते. हे पुस्तक आपल्याला स्वर्गाचे पूर्वावलोकन देखील देते.

## राजासन

देवाच्या निवासस्थानाची झलक देवाच्या काही निवडक संदेष्टयांना आणि प्रेषितांना दिली होती, परंतु प्रेषित योहानापेक्षा अधिक स्पष्ट इतर कोणाला दिली नाही. योहानाने लिहिले :

> *ह्यानंतर मी पाहिले तो पाहा,* ***स्वर्गात एक दार उघडलेले*** *मला दिसले आणि जी वाणी मी प्रथम ऐकली होती ती माझ्याबरोबर बोलणाऱ्या 'कर्ण्याच्या' ध्वनीसारखी होती; ती म्हणाली, 'इकडे 'वर ये' म्हणजे 'ज्या गोष्टी' ह्यानंतर 'घडून आल्या पाहिजेत' त्या मी तुला दाखवीन. लगेचच मी आत्म्याने संचरित झालो, तेव्हा पाहा, स्वर्गात राजासन मांडलेले होते, आणि* ***'त्या राजासनावर कोणीएक बसलेला होता.'*** *जो बसलेला होता तो दिसण्यात यास्फे व सार्दि [दोन मौल्यवान दगड[२६८]] ह्या रत्नांसारखा होता. 'राजासनाभोवती' दिसण्यात पाचूसारखे 'मेघधनुष्य होते.'"* (प्रकटीकरण ४:१-३)

योहानाला स्वर्गाच्या राजासनाच्या खोलीचे वर्णन करण्यास संघर्ष झाला. ते अवर्णनीय तेजस्वी होते. राजासनाच्या भोवती घिरटया घालणारे देवदूत होते जे निरंतर घोषणा देत होते : *"**पवित्र, पवित्र, पवित्र**, 'जो आहे व जो येणार तो 'सर्वसमर्थ प्रभू देव!"* (प्रकटीकरण ४:८)

योहान फक्त अहवाल देऊ शकला की त्याने जे पाहिले ते पृथ्वीवरील काही गोष्टींसारखे होते, पण सर्वकाही अमर्यादितपणे अधिक सुंदर आणि नेत्रदीपक होते. त्याने चमकदार प्रकाश, आणि प्रखर, आणि अलौकिक रंगांच्या जागेकडे पाहिले. त्याने गडगडाट करणारे आवाज आणि असंख्य आनंदी आणि स्तुतीने भरलेले आवाज ऐकले, पण राजासनावर बसलेला एकच ज्याने योहानाला अधिक मोहित केले.[२६९]

## थरार

जगातील अनेक धर्म स्वर्गाचे चित्रण अनेक मार्गांनी करतात.

काही वर्णने ही सकारात्मकरित्या कंटाळवाणी आहेत. कदाचित तुम्ही कार्टून पाहिले असेल : लोक मेघाभोवती बसलेले आहेत, कर्तव्यपूर्वक वीणा वाजवत आहेत. देवाच्या वैभवी निवासस्थानाचे वर्णन बायबल असे करत नाही.

इतर स्वर्गाचे वर्णन निरंतर कामुकतेची पुरुष-केंद्रित बाग म्हणून करतात. ती कल्पना देखील चुकीची आहे. जेव्हा प्रभू पृथ्वीवर होता, त्याने शिकवले होते, माझ्या पित्याच्या घरात, त्याचे मुक्त केलेले लोक *"लग्न करून घेत नाहीत व त्या लग्नात दिल्या जात नाहीत; तर स्वर्गातील*

*देवदूतांप्रमाणे असतात."* (मत्तय २२:३०)

स्वर्ग हे देव-केंद्रित क्षेत्र आहे जेथे अनंत ज्ञानाच्या उपस्थितीत जीवांचा आनंद, आश्चर्य आणि थरार कधीही मिटणार नाही. स्वर्ग हे एक ठिकाण आहे जेथे नातेसंबंध हे पृथ्वीवर माहित असलेल्यापेक्षा उच्च स्तरावर असतात. देवाने पृथ्वीवरील विवाहाची रचना केली की आपल्याला गौरवी नातेसंबंधाची अस्पष्ट कल्पना द्यावी जी परमेश्वर आणि त्याच्या मुक्त केलेल्या लोकांच्या मध्ये सार्वकालिकतेमध्ये अस्तित्वात असेल. तीव्र आनंद, आणि पवित्र सहवास ख्रिस्तासह एक असलेले लोक त्याच्यासोबत अनुभवतील त्याचे वर्णन स्पष्ट करण्यास पृथ्वीवरील सर्वोत्कृष्ट विवाह देखील कमी पडेल. पवित्र शास्त्र यास *"एक **मोठे** रहस्य"* म्हणते (इफिस. ५:३२) आणि पुढे म्हणते, *"**कोकऱ्याच्या लग्नाच्या मेजवानीस** बोलावलेले ते धन्य!"* (प्रकटीकरण १९:९)

स्वर्ग हे केवळ त्याच्यासोबत असण्याबद्दल आहे.

हजारो वर्षांपूवी निर्माण केलेले देवदूत आज देवाच्या उपस्थितीने पूर्वीपेक्षा जास्त घाबरलेले आहेत. तसेच हे आदामाच्या मुक्त केलेल्या संतानांसह असेल. देव जो आपला परमेश्वर याचे वैभव, ज्ञान आणि परिपूर्णता समजण्यासाठी आपल्याला सर्व सार्वकालिकतेची आवश्यकता लागेल.

> *"हे देवा, मला तुझे संकल्प किती मोलवान वाटतात! त्यांची संख्या किती मोठी आहे! ते मी गणू लागलो तर वाळूच्या कणांपेक्षा अधिक ठरतील; मला जाग येते तेव्हाही मी **तुझ्याजवळ** असतो."* (स्तोत्र. १३९:१७-१८)

प्रभूसोबत असण्याचा थरार आणि आनंद हा कधीही जुना होणार नाही. आपल्याला कधी कंटाळा येईल का हा प्रश्न नाही, परंतु याउलट, आपण त्याच्यावरून आपली नजर हटवू शकणार का?

*"जीवनाचा मार्ग तू मला दाखवशील; **तुझ्या सान्निध्यात पूर्णानंद आहे;** तुझ्या उजव्या हातात सौख्ये सदोदित आहेत."* (स्तोत्र. १६:११)

## लोकसमुदाय

प्रेषित योहानाला केवळ राजासनावरील प्रभूची झलकच मिळाली नाही, तर त्याने मुक्त केलेला लोकसमुदाय देखील पाहिला.

*"ह्यानंतर मी पाहिले* ***तो सर्व राष्ट्रे, वंश, लोक व निरनिराळ्या भाषा बोलणारे*** *ह्यांच्यापैकी कोणाला मोजता आला नाही असा शुभ्र झगे परिधान केलेला व हातात झावळ्या घेतलेला मोठा लोकसमुदाय राजासनासमोर व कोकऱ्यासमोर उभा राहिलेला माझ्या दृष्टीस पडला. ते उच्च स्वराने म्हणत होते: 'राजासनावर बसलेल्या आमच्या देवाकडून व कोकऱ्याकडून तारण आहे!"* (प्रकटीकरण ७:९-१०)

अब्राहाम, इसहाक आणि याकोबाच्या वंशजातून जन्म घेणाऱ्या तारणाऱ्याच्या द्वारे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना आणि लोकांना देवाने अभिवचन दिलेला त्याचा आशीर्वाद देण्याबद्दल तुम्हांला आठवते का?[२७०] देवाने योहानाला भविष्यात पाहू दिले आणि त्याच्या अभिवचनाच्या पूर्ततेची साक्ष होऊ दिले.

पृथ्वीवरील प्रत्येक लोक गट, प्रत्येक राष्ट्र, आणि प्रत्येक भाषा यांचे देवाच्या राजासनाभोवती प्रतिनिधित्व असेल. कृतज्ञतापूर्वक आणि आनंदी वाणीने, मुक्त केलेल्या पाप्यांचा असंख्य लोकसमुदाय कोकऱ्याची कायम स्तुती आणि उपासना करत राहतील ज्याने त्यांना सार्वकालिक मृत्यूपासून त्याचे रक्त वाहून सोडवले आहे आणि त्यांना सार्वकालिक जीवनाने आशीर्वादित केले आहे.

*"ते नवे गीत गाऊन म्हणतात : 'तू गुंडाळी घेण्यास व तिचे शिक्के फोडण्यास* ***योग्य आहेस; कारण तू वधला गेला होतास*** *आणि तू आपल्या रक्ताने सर्व वंश, निरनिराळ्या भाषा बोलणारे, लोक व राष्ट्रे ह्यांमधून आमच्या देवासाठी विकत घेतलेले आहेस. आणि आमच्या देवासाठी आम्हांला 'राजे' व 'याजक' असे केले आहेस आणि ते पृथ्वीवर राज्य करतील.' तेव्हा मी पाहिले तो राजासन, प्राणी व वडील ह्यांच्याभोवती अनेक देवदूतांची वाणी ऐकू आली; आणि त्यांची संख्या 'अयुतांची अयुते व सहस्रांची सहस्रे होती.' ते मोठयाने म्हणत होते :* ***'वधलेला कोकरा*** *सामर्थ्य, धन, ज्ञान, बल, सन्मान, गौरव व धन्यवाद हे घेण्यास* ***योग्य आहे!'"*** (प्रकटीकरण ५:९-१२)

**माझा उद्धारक!**

चार हजार वर्षांपूर्वी, ईयोब संदेष्टयाने उच्च स्वराने म्हटले :

> *"**मला तर ठाऊक आहे की माझा उद्धारक जिवंत आहे**. तो अंती पृथ्वीवर उभा राहील; ही माझी त्वचा छिन्नभिन्न होऊन नष्ट झाली, तरी मी देवाला देहविरहित पाहीन; **त्याला मी स्वतः पाहीन**, इतरांचे नव्हे तर **माझेच नेत्र त्याला पाहतील**; माझा अंतरात्मा **झुरत** आहे!"* (ईयोब १९:२५-२७)

*"देवाला पाहण्यासाठी"* ईयोबासारखे, तुमचे हृदय तळमळते का? तुमचा उद्धारक म्हणून तुम्ही त्याला ओळखता का?

ईयोबासारखी खात्रीशीर आशा सर्व खऱ्या विश्वासणाऱ्यांना आहे. माझ्या मित्रा, मी तुझ्यासाठी बोलू शकत नाही, परंतु मला ठाऊक आहे की मी माझ्या उद्धारकाला समोरासमोर पाहीन! *"देवाचा पुत्र, ज्याने **माझ्यावर** प्रीती केली आणि **माझ्यासाठी** स्वतःला अर्पण केले" **त्याच्या**बरोबर मी चालणार आणि बोलणार आहे.* (गलती. २:२०)

होय, मी माझे कुटुंबीय व मित्र जे आधीच प्रभूसोबत आहेत त्यांच्याबरोबर, आणि प्रत्येक युगातील देवाच्या लोकांसोबत सहभागीतेच्या त्या अद्भुत वेळेची वाट पाहत आहे, आणि तुम्ही देखील त्यांच्यामध्ये असाल अशी मनापासून मी आशा बाळगतो. परंतु, सर्वात जास्त, मला येशूला पाहायचे आहे!

त्याने माझा नरक माझ्यासाठी भोगला.

प्रश्नच नाही, माझे मन ज्याचा विचार करण्याचा प्रयत्न करू शकते ते सर्वात आश्चर्यकारक सत्यांपैकी हे आहे:

मी त्याच्यासोबत सार्वकालिकता व्यतीत करावी ही **त्याची** इच्छा आहे!

ज्या रात्री येशूला अटक झाली की दोषी ठरवावे आणि वधस्तंभावर खिळावे, त्याने प्रार्थना केली:

> *"**हे माझ्या पित्या, माझी अशी इच्छा आहे की, तू जे मला दिले आहेस त्यांनीही जेथे मी आहे तेथे माझ्याजवळ असावे**; ह्यासाठी की, जे माझे गौरव तू मला दिले आहेस ते त्यांनी पाहावे; कारण जगाच्या स्थापनेपूर्वी तू माझ्यावर प्रीती केलीस."* (योहान १७:२४)

देवाच्या संदेशाचा हा मुख्य भाग आहे. त्याने मानवाची रचना त्याच्यासोबत राहण्यासाठी केली होती, पण त्याचे आमंत्रण स्वीकारण्यासाठी तो तुमच्यावर दबाव टाकणार नाही.

तो निवड तुमच्यावर सोडतो.

*"..जो विजय मिळवतो त्याला, देवाच्या बागेत जे जीवनाचे झाड आहे, 'त्यावरचे' फळ मी 'खाण्यास देईन.'..येशू देवाचा पुत्र आहे असा विश्वास जो धरतो त्याच्यावाचून जगावर जय मिळवणारा कोण आहे?"* (प्रकटीकरण २:७; १ योहान ५:५)

## परिपूर्ण घर

बायबलचे शेवटचे दोन अध्याय योहानाला झालेल्या सार्वकालिक घराच्या ठिकाणाच्या झलकची नोंद करतात, जेथे प्रत्येक युगातील विश्वासणारे त्यांचा निर्माणकर्ता-उद्धारकासोबत राहतील आणि त्याच्या लोकांसाठी त्याने तयार केलेल्या सर्व गोष्टींमध्ये सहभाग घेतील.

*"नंतर मी **'नवे आकाश व नवी पृथ्वी'** ही पाहिली; पहिले आकाश व पहिली पृथ्वी ही निघून गेली होती आणि समुद्रही राहिला नाही; तेव्हा मी 'पवित्र नगरी, नवी यरुशलेम', देवापासून स्वर्गातून उतरताना पाहिली, ती नवऱ्यासाठी शृंगारलेल्या नवरीप्रमाणे' सजवलेली होती."* (प्रकटीकरण २१:१-२)

पुन्हा निर्माण केलेल्या आपल्या ग्रहावर आपल्यासोबत एकरूप होण्यासाठी ही वैभवशाली नगरी *"देवापासून स्वर्गातून खाली"* येईल. नवीन पृथ्वीवर *"आता समुद्र असणार नाही."* येथे आता विभक्त करणारे खंड असणार नाहीत.

*"तो [देव] त्यांच्या डोळ्यांचे 'सर्व अश्रू पुसून टाकील;' ह्यापुढे मरण नाही; 'शोक, रडणे' व कष्ट हे नाहीत; कारण 'पहिल्या गोष्टी' होऊन गेल्या."* (प्रकटीकरण २१:४)

सर्वकाही परिपूर्ण असेल. स्वर्गीय नगरी कल्पनेपलीकडे वैभवशाली असेल. योहानाला त्याचे वर्णन करण्यासाठी कठीण झाले.

*"नगरी 'चौरस' होती; तिची लांबी जितकी होती तितकीच तिची रुंदी होती; त्याने नगरीचे माप बोरूने घेतले. ते सहाशे कोस भरले [२२०० किलोमीटर]. तिची लांबी, रुंदी व उंची समान होती. ..... तिचा 'तट यास्फे' रत्नाचा होता; आणि नगरी शुद्ध काचेसारखी शुद्ध सोनेच होती. नगरीच्या तटाचे 'पाये' वेगवेगळ्या 'मूल्यवान रत्नांनी' शृंगारलेले होते..... बारा वेशी बारा मोत्यांच्या होत्या; एकेक वेस एकेका मोत्याची होती. **नगरीतील मार्ग पारदर्शक काचेसारखा शुद्ध सोनेच होता.** त्यात मंदिर माझ्या*

*पाहण्यात आले नाही; कारण सर्वसमर्थ प्रभू देव व कोकरा हेच तिचे मंदिर होते. नगरीला 'सूर्यचंद्राच्या प्रकाशाची' आवश्यकता नाही; कारण **'देवाच्या तेजाने' ती 'प्रकाशित केली आहे;' आणि हाच कोकरा तिचा दीप आहे.** राष्ट्रे तिच्या प्रकाशाने चालतील आणि पृथ्वीवरील राजे आपले 'वैभव' व सन्मान तिच्यात आणतात.... तिच्यात कोणत्याही निषिद्ध गोष्टी आणि अमंगळपणा व असत्य आचरणारा इसम ह्यांचा 'प्रवेश होणारच नाही' **तर कोकऱ्याच्या 'जीवनाच्या पुस्तकात लिहिलेल्या लोकांचा' मात्र होईल.**"* (प्रकटीकरण २१:१६-२४, २७)

ही विशाल नगरी प्रत्येक तपशीलात वैभवशाली असेल; तिचे रस्ते 'काचेसारखे, शुद्ध सोन्याचे" *आहेत. प्रत्येक घटक प्रभूच्या तेजाला प्रतिबिंबित करण्यासाठी तयार केले आहे. नगरीला मंदिर किंवा सूर्य नाही, कारण प्रभू स्वतःच नगरीचा उपासना केंद्र आणि प्रकाशाचा स्त्रोत आहे.* "कोकरा तिचा दीप आहे." स्वर्ग हा त्याच एकमेव द्वारे प्रज्वलित असेल, ज्याने सृष्टी निर्मितीच्या पहिल्या दिवशी, म्हटले,

*"प्रकाश होवो."* (उत्पत्ती १:३)

त्या नगरीचा प्रकाश हा तोच तेजस्वी वैभव आहे जो निवासमंडपाच्या परमपवित्र स्थानात आणि मंदिरात, आणि स्वयं प्रभू येशूमध्ये निवास करत असे जो म्हणाला,

*"**मीच** जगाचा **प्रकाश** आहे."* (योहान ८:१२)

स्वर्गीय नगरीला एक परिपूर्ण आयाती आकार असेल, जसे निवासमंडपात परमपवित्र स्थानाचे होते जे स्वर्गाचे प्रतिक आहे. नगरीचे मोजमाप, लांबी, रुंदी आणि उंची, प्रत्येक दिशेला २२०० किलोमीटर (१५०० मैल) आहे. उघडपणे, नगरी ही नवीन पृथ्वीच्या वातावरणातून वर अवकाशात वर आलेली दिसेल.

वैभवी घरात जन्म घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी पुष्कळ खोल्या असतील. तथापि, सर्व लोक तेथे असणार नाहीत, *"परंतु फक्त तेच असतील ज्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली आहेत."*

शेवटचा अध्याय नगरात सापडलेल्या बागेचे वर्णन करतो.

*"नंतर त्याने देवाच्या व कोकऱ्याच्या राजासनातून 'निघालेली' नगरीच्या मार्गावरून वाहणारी 'जीवनाच्या पाण्याची' स्फटिकासारखी नितळ 'नदी' मला दाखवली.*

*नदीच्या 'दोन्ही बाजूंना' बारा जातींची फळे देणारे **जीवनाचे झाड** होते, ते 'दर महिन्यास आपली फळे' देते आणि त्या झाडाची 'पाने' राष्ट्रांच्या 'आरोग्यासाठी' उपयोगी पडतात. पुढे काहीही शापित असणार नाही; तर तिच्यामध्ये देवाचे व **कोकऱ्या**चे राजासन असेल; आणि त्याचे दास त्याची सेवा करतील. 'ते **त्याचे मुख** पाहतील' व त्याचे नाव त्यांच्या कपाळावर असेल. पुढे रात्र असणार नाही आणि त्यांना दिव्याच्या अथवा सूर्याच्या प्रकाशाची गरज नाही; कारण प्रभू देव त्यांच्यावर 'प्रकाश पाडील; आणि ते युगानुयुग **राज्य** करतील.'"* (प्रकटीकरण २२:१-५)

## परिपूर्ण कथा

देवाची कथा आता पूर्ण झाली आहे.

*"नदीच्या 'दोन्ही बाजूंना' बारा जातींची फळे देणारे **जीवनाचे झाड** होते."*

जे एका सुंदर बागेत सुरु झाले ते एका वैभवी नगरीमध्ये उत्कृष्ट बागेत पूर्ण होते. एदेन बागेच्या तुलनेत, स्वर्गीय सुखलोकात बऱ्या-वाईटाचे ज्ञान करून देणारे झाड नसेल, पण त्यात जीवनाचे झाड असेल जेथून आदाम व हव्वेला हद्दपार केले होते जेव्हा त्यांनी पाप केले होते. परिपूर्ण पवित्रता आणि सार्वकालिक जीवन हेच केवळ स्वर्गीय नगरीत पर्याय असतील.

परीक्षा आणि विश्वासाने जगण्याचा समय इतिहास होऊन जाईल.

*"तर तिच्यामध्ये **देवाचे** व **कोकऱ्याचे** राजासन असेल; आणि त्याचे दास त्याची सेवा करतील. 'ते **त्याचे मुख** पाहतील'.... आणि ते **युगानुयुग राज्य करतील**."*

देवाचे लोक त्यांचे असहाय्य आत्मे न्यायापासून मुक्त करण्यासाठी आणि त्याच्याबरोबर सदैव राहण्यास पात्र करण्यासाठी *"देव आणि ....कोकऱ्याने"* भरपाई केलेल्या महान किमतीला सार्वकालिकतेमध्ये कधीही विसरणार नाहीत.

परमेश्वर आणि त्याच्या लोकांमध्ये मधुर, अतूट सहभागीता ही एक स्थिर वैशिष्टय असेल. तो देव आपल्यासोबत असला पाहिजे आणि आपण त्याच्यासोबत असले पाहिजे हे आदाम व हव्वेने जर पाप केले नसते तर जे त्यांना माहित असू शकले असते त्याहूनही जास्त अद्भुत असेल.

ते इतके जास्त अद्भुत का असेल?

उत्तर हे ***मुक्ती*** या शब्दामध्ये सापडते.

*"त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून **काढून** आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात **आणून ठेवले**. त्या पुत्राच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून प्राप्त केलेली **मुक्ती** म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे."* (कलस्सै. १:१३-१४)

पाप आणि मृत्यूच्या अंधाऱ्या डोहात नियमशास्त्र मोडणारे दोषी म्हणून सर्वात वाईट संभाव्य नाशिबापासून सोडवले जावे, आणि मग देवाच्या प्रकाशाच्या आणि प्रीतीच्या राज्यात त्याचे प्रिय नागरिक म्हणून उत्तम संभाव्य परिस्थितीत **आणले जावे** यापेक्षा जास्त अद्भुत काय असू शकते?

हेच ते आपला निर्माणकर्ता-उद्धारकाने त्या सर्वांसाठी केले आहे जे तारणासाठी फक्त त्याच्यावर विश्वास ठेवतात. त्याची महान प्रीती, त्याच्या अनंत मौल्यवान रक्ताने, त्याने असहाय्य पाप्यांना नरकापासून सोडवले आणि त्यांना स्वर्गासाठी पात्र ठरवले आहे.

ही एक परिपूर्ण कथा आहे, उद्धाराची कथा ज्याची सार्वकालिकतेभर पुनरावलोकन करावे आणि प्रशंसा करावी.

*"ह्यानंतर मी पाहिले तो सर्व राष्ट्रे, वंश, लोक व निरनिराळ्या भाषा बोलणारे ह्यांच्यापैकी कोणाला मोजता आला नाही असा शुभ्र झगे परिधान केलेला व हातात झावळ्या घेतलेला मोठा लोकसमुदाय राजासनासमोर व कोकऱ्यासमोर उभा राहिलेला माझ्या दृष्टीस पडला. ते उच्च स्वराने म्हणत होते: '**राजासनावर बसलेल्या आमच्या देवाकडून व कोकऱ्याकडून तारण आहे!**'"* (प्रकटीकरण ७:९-१०)

## त्यानंतर सदैव आनंदी

जागतिक स्तरावर, सर्व युगातील लोकांना रोमांच आणि सुटका करणे, शेवट आनंदाने होणाऱ्या कथा आवडतात.[२७१]

रात्रीच्या आकाशाखाली लखलखणाऱ्या आगीच्या भोवती दाटीने बसलेल्या गटाला खेडयातील कथाकाराने नाट्यमय केलेली प्राचीन आख्यायिका किंवा झोपेच्या वेळी पालकांनी मुलांना सांगितलेली परीकथा असो, कथांमध्ये समान रचना असते. ती काही अशासारखी असते :

संकटात सापडलेली एक तरुण युवती, काही दुष्ट चारीत्र्यांनी बंदिस्त केलेली असताना, एक शूर योद्धा किंवा देखणा राजकुमार आणि अलौकिक हस्तक्षेप यांच्या संयोगाने तिच्या

निराशाजनक स्थितीतून सोडवली गेलेली आहे. तिच्या प्रिय व्यक्तीला सोडवल्यावर, तिचा नायक तिला आपली वधू म्हणून त्याच्या वैभवी घरात त्याच्यासोबत राहण्यासाठी घेऊन जातो.

आणि परीकथेचा शेवट कसा होतो?

**आणि त्यानंतर ते सदैव आनंदी जीवन जगले.**

लोक अशा कथा का सांगतात? ते त्यांना सांगतात कारण देवाने मानवाच्या जीवात वाईटापासून सोडवले जावे, प्रीती केली जावी आणि त्यानंतर सदैव आनंदाने जीवन जगावे अशी इच्छा निर्माण केली आहे. म्हणूनच मुले आणि प्रौढ दोघांनाही अशा परीकथा आवडतात.

परंतु देवाची कथा ही काही काल्पनिक परीकथा नाही.

कल्पनेची कल्पकता इतिहासात रुजलेली नाही किंवा पुरातत्वशास्त्रानेही त्याची पुष्टी केलेली नाही. तयार केलेली कथा ही काही पंधराशे शतकांमध्ये डझनभर लोकांद्वारे लिहिली गेलेली नाही किंवा शेकडो तपशीलवार भविष्यावाण्यांद्वारे हे सांगितले गेलेले नाही. एक बनावटी-विश्वासू नायक येशूच्या स्वर्गीय ज्ञानासह बोलू शकत नाही, किंवा तो सोडवण्यासाठी आला आहे हे तो त्यांना सांगू शकणार नाही:



*"पाहा, आपण वर यरुशलेमेस चाललो आहोत, आणि मनुष्याच्या पुत्राविषयी संदेष्ट्यांच्या द्वारे लिहिण्यात आलेल्या सर्व गोष्टी पूर्ण होणार आहेत. म्हणजे .....त्याची कुचेष्टा व विटंबना होईल, त्याच्यावर थुंकतील, त्याला फटके मारतील, त्याचा जीव घेतील आणि तो तिसऱ्या दिवशी पुन्हा उठेल."* (लूक १८:३१-३३)

काल्पनिक कथा नरकात अडकलेल्या पाप्यांना शुद्ध विवेक आणि सार्वकालिक जीवनाची खात्री देऊ शकत नाही.

कल्पनारम्य कथा आपल्याला आपल्या निर्माणकर्त्यासह वैयक्तिक नातेसंबंध देऊ शकत

नाही आणि आपल्या पापी आणि स्वार्थी हृदयांना देवाचे गौरव करण्यासाठी आणि इतरांची सेवा करण्याच्या आवेशामध्ये परिवर्तीत करू शकत नाही.

फक्त देवाची कथाच हे करू शकते.

ही एक खरी गोष्ट आहे.

सारांश :

एक सत्य देवाची कथा आणि संदेश हा त्याच्या सार्वकालिक पुत्राविषयी आहे जो एक मनुष्य झाला, एक परिपूर्ण जीवन जगला, त्याचे परिपूर्ण रक्त वाहिले, आणि सैतान, पाप, मृत्यू, आणि नरकापासून असहाय्य पाप्यांना सोडवण्यासाठी मृतातून उठला, जेणेकरून विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसोबत त्याच्या पित्याच्या घराच्या वैभवात त्याच्या ज्ञानाच्या आणि प्रीतीच्या अंतहीन आनंदात तो सहभागी होऊ शकेन.

निराशेमध्ये असणाऱ्या जगासाठी हीच देवाची सुवार्ता आहे.

त्याने आपल्यासाठी काय केले आहे यामुळे आपण येथून पुढे सदैव आनंदी जीवन जगू शकतो.

*"मला हे देखील समजून आले की देव जे काही करतो ते* ***सर्वकाळ*** *राहणार."*
(उपदेशक ३:१४)

## आमंत्रण आणि चेतावणी

देवाचे पुस्तक या शब्दांनी निष्कर्ष करते :

*"ह्या गोष्टींविषयी तुम्हांला साक्ष देण्याकरता* ***मी येशूने*** *आपल्या दूताला मंडळ्यांकरता पाठवले आहे...'मी अल्फा व ओमेगा म्हणजे 'पहिला व शेवटला,' आदी व अंत असा आहे....* ***आत्मा व वधू*** *म्हणतात, "ये," ऐकणाराही* ***म्हणो, "ये,"*** *आणि 'तान्हेला येवो;'* ***ज्याला पाहिजे तो 'जीवनाचे पाणी फुकट' घेवो****. ह्या पुस्तकातील 'संदेशवचने' ऐकणाऱ्या प्रत्येकाला मी निश्चयपूर्वक सांगतो की,* ***जो कोणी 'ह्यांत भर घालील*** *त्याच्यावर ह्या पुस्तकात लिहिलेल्या' पीडा देव आणील; 'आणि' जो कोणी ह्या संदेशाच्या पुस्तकातील* ***वचनांतून काही 'काढून टाकील'*** *त्याचा वाटा ह्या पुस्तकात वर्णन केलेल्या जीवनाच्या झाडातून व पवित्र नगरीतून देव काढून टाकील. ह्या गोष्टींविषयी साक्ष देणारा म्हणतो,*

***होय, मी त्वरेने येतो.***

***आमेन. ये, प्रभू येशू, ये.***

प्रभू येशूची कृपा तुम्हां सर्वांबरोबर असो. आमेन. (प्रकटीकरण २२:१६, १३, १७-२१)

अशा प्रकारे, अंतिम *"आमेन"* (म्हणजे, तो विश्वासू आणि सत्य आहे) बरोबर, लेखक, जो काळाच्या बाहेर अस्तित्वात आहे, त्याची कथा आणि संदेशाचा निष्कर्ष करतो.

## देव आणि मनुष्य एकत्र

तुम्हांला आदामाचे उत्तर आठवते का जेव्हा परमेश्वर बागेत *"तू कुठे आहेस?"* अशी हाक मारत आला होता.

आदामाने लाजिरवाणे उत्तर दिले होते :

*"मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मला भीती वाटली होती."* (उत्पत्ती ३:१०)

पुरुष व स्त्रीने त्यांचा निर्माणकर्ता-मालकापासून लपण्याचा प्रयत्न केला कारण त्यांनी पाप केले होते.

परंतु आता, इतिहासाच्या शेवटी, विश्वास ठेवणारे पुरुष, स्त्रिया, आणि मुले त्यांचा निर्माणकर्ता-उद्धारकाच्या येण्याला आणि त्याच्यासोबत कायमचे राहण्यासाठी त्यांना घेऊन जाण्याच्या अभिवचनावर कशी प्रतिक्रिया देतात?

ते आनंदाने प्रतिसाद देतात :

***आमेन. ये, प्रभू येशू, ये!"*** (प्रकटीकरण २२:२०)

असे परिवर्तन कशाने आणले? आदामाच्या काही वंशजांना आतापासून त्यांच्या परमेश्वरापासून लपण्याची इच्छा का नाही? त्याऐवजी त्याला समोरासमोर पाहण्याच्या शक्यतेबद्दल ते आवेशी का आहेत?

एका सत्य देवाच्या संदेशामध्ये उत्तर सापडते :

*"देवाने आमच्या कृत्यांप्रमाणे नव्हे तर स्वतःच्या संकल्पाप्रमाणे व कृपेप्रमाणे आम्हांला तारले व पवित्र आचरणाने पाचारले आहे; ही कृपा युगांच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्या ठायी आपल्यावर करण्यात आली होती; ती आता आपला तारणारा ख्रिस्त येशू ह्याच्या प्रकट होण्याने दृश्यमान झाली आहे. त्याने मरण नाहीसे केले, आणि सुवार्तेच्या द्वारे जीवन व अविनाशिता ही प्रकाशित केली आहेत."* (२ तीमथ्य. १:९-१०)

## एक नियम

ज्याप्रमाणे देवाने पृथ्वीवरील सुखलोकाच्या बागेत आदामाला एक नियम स्पष्ट केला होता, त्याप्रमाणेच त्याने सुखलोकाच्या स्वर्गीय नगरीत आदामाच्या वंशजांसंबंधी एक नियम स्पष्ट केला आहे :

> *"तिच्यात **कोणत्याही** निषिद्ध गोष्टी आणि अमंगळपणा व असत्य आचरणारा इसम ह्यांचा 'प्रवेश होणारच नाही' तर कोकऱ्याच्या 'जीवनाच्या पुस्तकात लिहिलेल्या लोकांचा' **मात्र होईल.**"* (प्रकटीकरण २१:२७)

कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात **तुमचे** नाव लिहिलेले आहे का? जर आहे, तर मग तुमच्यासाठी त्याच्याकडून हा वैयक्तिक संदेश आहे :

> *"तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ नये; देवावर विश्वास ठेवा आणि माझ्यावरही विश्वास ठेवा. माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर **मी** तुम्हांला तसे सांगितले असते; **मी** तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो. आणि **मी** जाऊन तुमच्यासाठी जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हांला आपल्याजवळ घेईन; ह्यासाठी की, जेथे* **मी** *आहे तेथे तुम्हीही असावे... येशूने त्याला म्हटले, **"मार्ग, सत्य व जीवन मीच आहे**; माझ्या द्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही."* -येशू (योहान १४:१-३, ६)

# समारोप

हे पुस्तक लिहिणे हा माझ्यासाठी आनंददायक प्रवास होता. माझ्या गौरवी निर्माणकर्ता-उद्धारकाचे व्यक्तिमत्व, कथा आणि संदेशावर विचार करण्यात मी वर्णनापलीकडे आशीर्वादित झालो आहे. त्याची उपस्थिती आणि मार्गदर्शन या संपूर्ण प्रकल्पात उघड होते. सर्व स्तुती त्यास असो.

## धन्यवाद

नावांच्या लांबलचक यादीचा समावेश करण्यापासून जरी मी टाळले असले तरी, माझी अद्भुत पत्नी कॅरोलचे संयमी साहाय्य आणि कुशल मित्र आणि कुटुंबाच्या अमुल्य विचारांवाचून हे पुस्तक जसे आहे तसे असू शकले नसते. पुस्तकाचा पृष्ठभाग आणि चित्रे ही माझा भाऊ डेवचे काम आहे. मनापासून मी सर्वांचा आभारी आहे.

> *"कारण तुमचे कार्य व तुम्ही पवित्र जनांची केलेली व करत असलेली सेवा आणि तुम्ही देवावर दाखवलेली प्रीती, ही विसरून जाण्यास तो अन्यायी नाही."* (इब्री. ६:१०)

चौकशी करणाऱ्या असंख्य मुस्लीम लोकांचा देखील मी ऋणी आहे ज्यांच्या ई-मेल नी मला लिहिण्यास प्रेरणा दिली.

या सर्वांपेक्षा, या लहान प्रवासात माझ्याबरोबर सामील होण्यासाठी मी तुमचा आभारी आहे. मी यास लहान म्हणतो कारण हे जास्त मोठे असू शकले असते. पवित्र शास्त्रातील वचने जी या प्रवासात आपण वाचली आहेत ती बायबलच्या एकंदर वचनातून ४ टक्यापेक्षा कमी आहेत. म्हणून जरी आपण आपल्या प्रवासाच्या शेवटी आलो आहोत, तरी आपण खरेच आता सुरुवात केली आहे.

## प्रवास सुरु राहतो

हे समजायचे आहे त्या सर्वांसाठी एका सत्य देवाने त्याचा संदेश सरळ केला असतानाही, तो स्वतः जटील, गहन आणि अनंत आहे. त्याच्याबद्दल जे सर्वकाही समजायचे आहे ते मनुष्य

किंवा देवदूत कधीही समजू शकणार नाहीत. प्रेषित योहानाने सुवार्ता नोंदीच्या शेवटच्या वचनात ही सत्यात व्यक्त केली आहे :

*"येशूने केलेली दुसरीही पुष्कळ कृत्ये आहेत, ती सर्व एकेक लिहिली तर लिहिलेली पुस्तके ह्या जगात मावणार नाहीत, असे मला वाटते."* (योहान २१:२५)

मी त्याशी सहमत आहे. एकच देव एकच संदेश लिहिण्यासंबंधित कदाचित सर्वात आव्हानात्मक पैलू हा कोणती वचने निवडावी आणि कोणती सोडावी हे होते. खरेच, देवाचे वचन न संपणारे आहे. ते प्राणासाठी स्वादिष्ट आणि समाधान देणारे आहे. जसे लेबानन येथील आपल्या मित्राने शोधले होते (धडा ७), *"मी हे जाणतो की* "मी बायबल वाचले आहे" *हे म्हणणे पुरेसे नाही. हे एक पुस्तक आहे ज्याला सतत वाचण्याची आवश्यकता आहे."*

आता मग जेव्हा तुम्ही हा प्रवास पूर्ण केला आहे, तुम्हांला एकच देव एकच संदेश हे पुस्तक पुन्हा वाचावे असे वाटू शकते आणि त्यात संदर्भ दिलेली वचने बायबलमध्ये पाहावी, तो भाग वाचवा जेथे हे संदर्भ आढळतात. तरीही उत्तम, तुमच्या निर्माणकर्त्याचा संपूर्ण ग्रंथ, एकेक पुस्तक वाचा, जेव्हा तुम्ही त्याच्याजवळ ही प्रार्थना करत आहात:

***"तू माझे नेत्र उघड, म्हणजे तुझ्या नियमशास्त्रातील अद्भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील."*** (स्तोत्र. ११९:१८)

जर तुम्हांला आणखी दस्तावेज किंवा स्पष्टीकरणाची आवश्यकता असेल, तर शेवटी दिलेल्या टिप्पण्या पाहा. पुस्तकाच्या शेवटी धडयातील पुनरावलोकन प्रश्न पाहण्यासाठी वेळ दया. आणि तुमच्या टिप्पण्या किंवा प्रश्नांसह मला लिहिण्यास अजिबात संकोच करू नका.

३,५०० वर्षे-जुन्या या आशीर्वाद वचनांसह मी तुमचा निरोप घेत आहे:

*"परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो; परमेश्वर आपला मुखप्रकाश तुझ्यावर पाडो व तुझ्यावर कृपा करो; परमेश्वर तुझ्याकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांती देवो."* (गणना ६:२४-२६)



पॉल डॅन ब्रॅमसेन

www.One-God-One-Message.com

# अंतिम टिप्पण्या

*"जे मला दिसत नाही ते मला दाखव."* (ईयोब ३४:३२)

**प्रस्तावना**

**१.** साहेल : अर्धशुष्क संक्रमण क्षेत्र जो आफ्रिकेच्या सहाराला त्याच्या उष्णकटिबंधीय वर्षावनांपासून वेगळे करतो. वाळू आणि स्क्रब-ब्रशचा हा पट्टा सेनेगलपासून सुदानपर्यंत पसरलेला आहे.

**२.** एकेश्वरवादी एका देवावर विश्वास ठेवतात, बहुदेववादी अनेक देव आणि देवींवर विश्वास ठेवतात, सर्वेश्वरवादी सर्व गोष्टींना देव म्हणून पाहतात, धर्मनिरपेक्ष मानवतावादी देवाऐवजी मनुष्याला उंच करतात, आणि नास्तिक देव नाही असा दावा करतात.

**धडा १ : सत्य विकत घ्या**

**३.** एकच देव एकच संदेश यामध्ये, हे विधान संदेष्टयांच्या लेखातून १,००० पेक्षा अधिक संदर्भ बायबलमधून येतात. कधीकधी एखाद्या वचनाचा फक्त एकच भागाचा संदर्भ घेतलेला असतो, जसे येथे आहे. नीतिसूत्रे अध्याय २३, वचन २३, संपूर्ण असे वाचले जाते : "सत्य, सुज्ञता, शिक्षण व समंजसपणा ही विकत घे, विकू नकोस."

**४.** बॅरेट, डेव्हिड बी., जॉर्ज टी. कुरियन अँड टॉड एम. जॉन्सन. वर्ल्ड क्रिस्चियन एनसायक्लोपेडीया : अ कम्प्यारीटीव सर्वे ऑफ चर्चेस अँड रीलीजीयंस इन द मॉर्डन वर्ल्ड. लंडन: ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेस, २००१.

**५.** "आज, पवित्र शास्त्र २,४७९ पेक्षा कमी नसलेल्या भाषांमध्ये उपलब्ध आहे, संपूर्ण बायबल कमीत कमी ४५१ भाषांमध्ये भाषांतरीत केलेला आहे, आणि नवीन करार काही १, १८५ भाषांमध्ये भाषांतरित केला आहे. त्यासोबत, बायबलचे काही भाग आणखी ८४३ भाषांमध्ये उपलब्ध केले गेले आहे." (युनायटेड बायबल सोसायटी, २०१०, www.ubs-translations.org/aboutus)

**६.** फॉक्स, जॉन (जी. ए. विल्यमसन द्वारे संपादित). फॉक्सेस बुक ऑफ मार्टीएर्स. टोरोंटो : लिटल, ब्राउन अँड कंपनी, 1965

**७.** कोणत्याही राष्ट्राबद्दल ते एक "ख्रिस्ती राष्ट्र' आहे असे म्हणणे चुकीचे आहे कारण ख्रिस्ताने म्हटले, "माझे राज्य ह्या जगाचे नाही, माझे राज्य ह्या जगाचे असते तर मी यहूद्यांच्या स्वाधीन केला जाऊ नये म्हणून माझ्या सेवकांनी लढाई केली असती; परंतु आता माझे राज्य येथले नाही." (योहान. १८:३६)

**८.** वूर्मब्रँड रिचर्ड्स टॉर्चेडफॉर ख्राईस्ट30 वी वर्धापनदिन आवृत्ती. बार्टलेसविले,ओके : लिविंग सैक्रीफाईस बुक कंपनी., १९९८.

**९.** द वे ऑफ रायचीयसनेस रेडीओ मालिकेला जगभर प्रसारित करण्यासाठी १०० भाषांमध्ये भाषांतरित केले आहे किंवा केले जात आहे. www.one-god-one-message.com

**१०.** कुराणचे संपूर्ण वचन स्पष्ट करते : "आम्ही येशू मसीहाला (आधीच्या पैगंबरांच्या) पदचिन्हांचे अनुसरण करण्यासाठी तसेच तोरा (पैकी जे काही लोकांकडे शिल्लक होते), त्याची सत्यता प्रमाणित करण्यासाठी पाठवले होते. आम्ही त्याला गॉस्पल (बायबल) हा ग्रंथ प्रदान केला होता, ज्यात (अल्लाहचा) उपदेश व (सन्मार्ग दाखवणारा) प्रकाश होता. आणि तोरा (या ग्रंथापैकी) जे (लोकांजवळ) शिल्लक राहिले होते त्याची सत्यता प्रमाणित करणारे होते. आणि त्या (ग्रंथात) अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांसाठी (पुरेपूर) मार्गदर्शन व हितोपदेश होते" (सुरह ५:४६). अन्यथा सूचित, मराठी भाषांतर ज्याचा वापर एकच देव एकच संदेश मध्ये केला आहे तो मौलाना वहिदुद्दिन खां यांचा आहे. कुराणचे भाषांतर. न्यू दिल्ली: गुडवर्ड बुक्स, २०१४. **नोट** : कुराणाचे विभाजन अध्यायांमध्ये केले आहे त्यास सुरह म्हणतात. वचनाची संख्या कुराणच्या भाषांतरावर आधारित कदाचित थोडीशी बदलू शकते. जेव्हा वचनाकडे पाहतात, तेव्हा सभोवतालच्या वचनांचा शोध घेणे आवश्यक होऊ शकते.

**११.** "आपण" कोण आहे? कुराणमध्ये, अल्लाहला नेहमी प्रथम व्यक्ती अनेकवचनमध्ये संबोधले आहे. बायबलमध्ये, परमेश्वर देखील कधीकधी स्वतःला अनेकवचनात संबोधतो. **नोट** : अरबी बोलणारे "अल्लाह" शब्दाचा वापर दोन मार्गांनी करतात : " अरब ख्रिस्ती, इतर गैर-मुस्लीम, आणि मुस्लीम लोकांद्वारे 'देव' साठी मूळ शब्द "अल्लाह" हा वापरला आहे. जेव्हा अशा प्रकारे वापरले जाते तेव्हा ते देवाचे योग्य नाव नाही. अरबी बोलणाऱ्यांमध्ये, मूळ शब्द अल्लाह हा कोणत्याही एका गटाचा नाही. मुस्लीम लोक देवाचे प्राथमिक योग्य नाव म्हणून "अल्लाह" शब्दाचा वापर करतात. याविषयी आणखी धडा ९ मध्ये.

**१२.** एकच देव एकच संदेश मधील ई-मेल उतारे ज्यांनी लिहिले आहेत त्यांची ओळख संरक्षित ठेवण्यासाठी बेनामी सादर केले आहेत.

**१३.** "पी. बी. यु. एच." चा अर्थ "पीस बी अपॉन हीम," पैगंबराचे नाव लिहिले किंवा बोलले गेल्यावर मुस्लीम लोक हे नेहमी बोलतात. मुहम्मदच्या नावानंतर अरबी सूत्र ज्याचा वापर मुस्लीम

लोक करतात तो हा आहे: सला अलैहू अलैही वा सल्लम (एस. ए. डब्लू), म्हणजे : त्याच्यावर अल्लाहच्या प्रार्थना आणि शांती.” कुराणच्या या वचनावर आधारित ते याचे पालन करतात : “अल्लाह आपल्या पैगंबरावर कृपावर्षाव करीत असतो, तसेच त्याचे स्वर्गदूत त्याच्यावर कृपावर्षाव व्हावा (यासाठी अल्लाहकडे नेहमी याचना करीत असतात). श्रद्धावंतांनो! तुम्ही देखील त्याच्यावर (अल्लाहची) कृपा व्हावी यासाठी (अल्लाहकडे) प्रार्थना करीत राहा आणि पैगंबराला ‘शांती लाभो’ असे अभिवादन करीत राहा” (सुरह ३३:५६). या सूत्राचा वापर बायबलसह सुसंगत नाही, जे म्हणते: “ज्या अर्थी माणसांना एकदाच मरणे व त्यानंतर न्याय होणे नेमून ठेवले आहे” (इब्री. ९:२७). एकदा की व्यक्ती मरण पावला, त्याचे किंवा तिचे सार्वकालिक नशीब निश्चित केले गेले आहे. तो किंवा ती सार्वकालिकता कोठे किंवा कसे घालवतील याला कितीही प्रार्थना बदलू शकत नाहीत (प्रकटीकरण २२:११).

**१४.** “अशा प्रकारे’ आणि “म्हणून” साठी [सीक] हे लॅटिन आहे. छापलेल्या संदर्भांनंतर ते कंसात वापरले जाते हे दाखवण्यासाठी की मूळ हे अचूकपणे नकल केले गेले आहे जरी त्यात उघड चुका असतात. **नोट** : शब्दलेखन आणि व्याकरण संकुचित आणि दुरुस्त करणे वगळता (त्यांना जास्त सोप्यारीतीने समजण्यासाठी), ई-मेल संदर्भ जे एकच देव एकच संदेश मध्ये वापरले आहेत ते जसे प्राप्त केले आहे तसेच सादर केले आहेत. उदाहरणार्थ, “अहमद” कडून हा विशेष ई-मेल मध्ये स्पष्टपणे मोठी अक्षरे नाहीत. ते दुरुस्त केले गेले आहे.

**१५.** कुराण, अनुवादक मौलाना वहिदुद्दिन खां, प्रकाशन- दिल्ली, गुडवर्ड बुक्स, २०१४, इलेक्ट्रॉनिक आवृत्ती.

**१६.** उदाहरणार्थ, कुराण सुरह (अध्याय) ४०, वचने ७०-७२मध्ये म्हणते : “त्यांनी या (ईश्वरीय) ग्रंथाला खोटे ठरवले, तसेच त्या संदेशांनाही ज्यासह आम्ही आमच्या (आधीच्या) पैगंबरांना पाठवले होते. त्यांना (न्यायाच्या दिवशी) कळून चुकेल की, (ते किती आंधळे लोक होते), तेव्हा त्यांच्या मानेभोवती लोखंडी कडे आणि साखळदंड घातलेले असतील. आणि (त्याद्वारे पाणी पाजण्यासाठी) त्यांना फरफटत नेले जाईल. उकळत्या पाण्यातून (ते पितील), मग परत त्यांना आगीत (जळत राहण्यासाठी) फेकून दिले जाईल.” तसेच : “आम्ही येशू मसीहला (आधीच्या पैगंबरांच्या) पदचिन्हांचे अनुसरण करण्यासाठी तसेच तोरा (पैकी जे काही लोकांकडे शिल्लक होते), त्याची सत्यता प्रमाणित करण्यासाठी पाठवले होते. आम्ही त्याला गॉस्पल (बायबल) हा ग्रंथ प्रदान केला होता, ज्यात (अल्लाहचा) उपदेश व (सन्मार्ग दाखवणारा) प्रकाश होता. आणि तोरा (या ग्रंथापैकी) जे (लोकांजवळ) शिल्लक राहिले होते त्याची सत्यता प्रमाणित करणारे होते. आणि त्या (ग्रंथात) अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांसाठी (पुरेपूर) मार्गदर्शन व हितोपदेश होते” (सुरह ५:४६). “इमान धारण केलेल्या लोकांनो! (खऱ्या अर्थाने) विश्वास ठेवणारे बना, अल्लाहवर व त्याच्या पैगंबरावर व (त्याच्या)

ग्रंथावर जो (पैगंबर मुहम्मदवर) अवतरीत केला गेला, आणि जो यापूर्वी अवतरीत केला गेला त्यावर. आणि जो कोणी अल्लाहला आणि त्याच्या दूतांना आणि त्याच्या ग्रंथांना आणि त्याच्या पैगंबरांना (न्यायाच्या) अंतिम दिवसाला मानण्यास नकार देईल, तर तो निश्चितपणे (कुमार्गावर) भरकटत फार दूर निघून गेला...ज्याप्रकारे आम्ही (पैगंबर) नूहकडे आणि त्याच्यानंतरच्या पैगंबरांकडे (आमचा) संदेश पाठवला होता. तशाच प्रकारे आम्ही तुमच्याकडे (आमचा) संदेश पाठवला आहे. तसेच आम्ही इब्राहीम व इस्माईल आणि इसहाक व याकुब आणि याकुबचे वंशज, तसेच येशू (ईसा), अय्यूब व युनूस आणि हारून व सुलेमान (या सर्व पैगंबरांकडे आमचा संदेश पाठवला होता). आणि आम्ही (पैगंबर) दाऊद यांना 'जबुर' (नावाचा ग्रंथ) दिला होता'' (सुरह ४:१३६, १६३). अशा अनेक कुराणच्या विधानांसाठी, धडा ३ चे पहिले पान पाहा आणि त्यासोबत अंतिम टिप्पण्या पाहा.

**१७.** नीतिसूत्रे २३:२३. सत्य ''विकत'' घेण्याऐवजी, पुष्कळ लोक जर त्यांना बायबल (जरी ते जगातील सर्वात जास्त विकले जाणारे पुस्तक आहे आणि त्यात प्राचीन लेख आहेत, ज्यावर विश्वास ठेवण्यास कुराण मुस्लीम लोकांना आज्ञा देते) अभ्यास करताना पाहिले गेले तर कुटुंब किंवा मित्र काय विचार करतील या भीतीने ते ''विकतात''.

## धडा २ : अडथळ्यांवर मात करणे

**१८.** डॉयल, सर आर्थर कोनन. ट्रेजरी ऑफ वर्ल्ड मास्टरपिसेस : द सेलेब्रेटेड केसेस ऑफ शेरलॉक होम्स आर. आर. डोंनेले अँड सन्स कंपनी, १९८१, पान, १७, (१८९१ मध्ये ग्रेट ब्रिटनमध्ये प्रथम प्रकाशित.)

**१९.** रोमकरांस पत्र १४:१-१५:७; मत्तय ७:१-५

**२०.** डॉयल, पान. १६.

**२१.** गणना १२

**२२.** २ राजे ५

**२३.** योना ४

**२४.** बायबलमधील ही पुस्तके पाहा : दानीएल, एज्रा आणि एस्तेर

**२५.** योहान. ४

**२६.** ''द ग्रेटेस्ट जर्नी,'' नॅशनल जिओग्राफ मासिक, मार्च, २००६, पान. ६२.

**२७.** स्तोत्र. ९०:१-१२; मार्क ८:३६; २करिंथ. ४:१६-१८; रोम. ८:१८; याकोब ४:१३-१५

**२८.** मानवी इतिहासात, देवाने पृथ्वीवर विविध विध्वंसक घटनांना होऊ दिले आणि/किंवा पाठवले. नोहाच्या पिढीमध्ये, शंभर वर्षांच्या संयम आणि चेतावणीनंतर, देवाने जागतिक

जलप्रलय पाठवला ज्यामध्ये फक्त आठ सोडून सर्व जीवांचा नाश झाला (उत्पत्ती ६-८). (पुष्कळ जण जागतिक जलप्रलयास एक काल्पनिक कथा म्हणून पाहतात जरी भूवैज्ञानिक आणि जीवाश्म नोंदी याला पुष्टी देतात.). अब्राहामाच्या काळात, अग्नी जो सदोम व गमोरावर पडला त्यात फक्त तीन सोडून सर्व जीवांचा नाश झाला. मोशेच्या काळादरम्यान आणि नंतर, देवाने कनानी राष्ट्रांना नष्ट करण्याची इस्राएली लोकांना आज्ञा दिली (यहोशवा १-१०). ही युद्धे देवाकडून विशेष आज्ञेद्वारे पूर्ण करण्यात आली आणि त्यात नेहमी स्वर्गातून चमत्कारिक मध्यस्थी होत गेली, जसे इस्राएली लोकांनी नगराभोवती सात वेळा प्रदक्षिणा घातल्या, तसे यरीहोची भिंत (पुरातत्वशास्त्र याची पुष्टी करते) जागच्या जागी धसली. या राष्ट्रांचा न्याय करण्याअगोदर देवाने शंभर वर्षे वाट पाहिली, पश्चात्ताप करण्यासाठी आणि मूर्तीपूजा, अनैक्तिकता, आणि मानवी अर्पण करण्यापासून वळण्यासाठी त्यांना वेळ दिला (उत्पत्ती १५:१६; निर्गम १२:४०), तरीही त्यांनी अब्राहाम, योसेफ आणि मोशेसारख्या धार्मिक मनुष्यांच्या साक्षीकडे दुर्लक्ष केले. फक्त थोडया कनानी लोकांनी पश्चात्ताप केला आणि एका सत्य देवावर विश्वास ठेवला ज्याने मिसर देशावर दहा अलौकिक पीडा पाठवल्या होत्या आणि तांबडया समुद्रामधून मार्ग उघडला होता. जेव्हा देवाने त्याचा न्याय करण्यासाठी त्याच्या या प्राचीन लोकांचा वापर केला , तेव्हा तो योग्य आणि निष्पक्ष राहिला. उदाहरणार्थ, तोरा नोंद करते की देवाने प्रथम इस्राएली लोकांना मरीने शिक्षा दिली (त्यांच्या मूर्तीपूजा आणि व्यभिचारामुळे) ज्यामध्ये २४,००० इस्राएली लोक मरण पावले होते (गणना २५-३१). देवाने इस्राएल लोकांचा न्याय केल्यानंतरच त्याने सभोवतालच्या भ्रष्ट आणि वाईट राष्ट्रांवर त्याचा न्याय पूर्ण करण्यासाठी त्यांना पाठवले होते. असे अनुमान लावणे चुकीचे आहे की ही राष्ट्रे निष्पाप होती. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की ते इतके घोर भ्रष्ट होते की "तो देश आपल्या रहिवाशांचा त्याग करीत होता" (लेवीय १८:२५). देवाचा चांगुलपणा आणि संयम हे मोठे आहे, परंतु त्याचा क्रोध हा देखील मोठा आणि त्याचा न्याय निश्चित आहे.

**२९.** पाप्यांना पश्चात्ताप करण्यास आणि तारणाच्या त्याच्या तरतुदीला स्वीकारण्यासाठी वेळ देण्यासाठी देव त्वरित वाइटाचा न्याय करत नाही हे एक कारण आहे : "तरी प्रियजनहो, ही एक गोष्ट तुम्ही विसरू नका की, प्रभूला एक दिवस हजार वर्षांसारखा आहे आणि 'हजार वर्षे' एक 'दिवसासारखी' आहेत. कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करत नाही, तर तो तुमचे धीराने सहन करतो; कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी पश्चात्ताप करावा अशी आहे." (२ पेत्र ३:८-९)

**३०.** एकच देव एकच संदेश या पुस्तकाच्या ८, १२, २८ आणि २९व्या धडयांमध्ये या तीन कथित विरोधाभासाला उत्तर प्रदान करते.

**३१.** मत्तय ७:१-२०; ची रोम. १४ आणि १करिंथ ६ बरोबर तुलना करा.

**३२.** अनेक वेबसाईट बायबलमधील १०१ स्पष्ट विरोधाभासांच्या" यादीला सतत दाखवत असतात, तरी पुष्कळ वर्षे आणखी एक लेख तेथे दिला गेला आहे ज्यास म्हणतात : "बायबलमधील १०१ विरोधाभासांना स्पष्ट केले गेले आहे." www.debate.org.uk/topics/apolog/contrads

**३३.** बायबलमधील कोणत्याही वचनाला योग्यरीत्या भाषांतरित करण्यासाठी दोन नियम : सभोवतालचा संदर्भ वाचा. वचनाची वचनाशी तुलना करा. उदाहरणार्थ, अनुवाद (बायबलचे पाचवे पुस्तक), मोशे ही भविष्यवाणी इस्राएल लोकांसाठी बोलला : "तुझा देव परमेश्वर तुझ्यामधून म्हणजे तुझ्या भाऊबंदांमधून माझ्यासारखा एक संदेष्टा तुझ्याकरता उभा करील, त्याचे तुम्ही ऐका" (अनुवाद १८:१५). मोशेचे म्हणणे काय होते जेव्हा त्याने इस्राएली लोकांना सांगितले की देव तुझ्यामधून म्हणजे तुझ्या भाऊबंदांमधून माझ्यासारखा एक संदेष्टा तुझ्याकरता उभा करील"? काही म्हणतात मोशे इश्माएली लोकांबद्दल बोलत होता; इतर म्हणतात इस्राएली लोकांबद्दल. सभोवतालचा संदर्भ योग्य उत्तर प्रदान कारतो (उदाहरणार्थ, अनुवाद १७:१५, २०; १८:२, ५ इत्यादी.). हा खास "संदेष्टा" कोण होता ज्याच्याविषयी देवाने त्याला "उभा करण्या" बद्दल बोलले होते? पुष्कळ जण या भविष्यवाणीला एखाद्या विशेष धर्माच्या संस्थापकाशी योग्य बसवण्याचा प्रयत्न करत असले तरी, योग्य भाषांतर हे पवित्र शास्त्रात नंतर स्पष्ट केले आहे. योहान ५:४३-४७, योहान ६;१४, आणि प्रेषित. ३;२२-२६ वाचा.

**३४.** बीसी.=बिफोर ख्राईस्ट (ख्रि.पू.) /एडी (इसवी सन)=अन्नो डोमिनी, म्हणजे, "आपल्या प्रभूच्या वर्षात." आज पुष्कळ जण बीसीइ (बिफोर कॉमन इरा) आणि सीइ (कॉमन इरा) म्हणून वापरतात जे संक्षिप्तपणे लिहिण्यास "ख्राईस्ट" ला काढून टाकते जरी इतिहासातील विभाजन बिंदू हा अजूनही ख्रिस्ताचा जन्म आहे.

**३५.** जर तुम्ही कधी बँकेतून पैसे उधार घेतले असतील, तर मग तुम्ही एक प्रकारची साक्ष-एक कायदेशीर दस्ताऐवजवर स्वाक्षरी केली असेन. या करारात बँकेचा भाग हा वचन दिलेली रक्कम तुम्हांला द्यावी हा होता; तुमचा भाग हा एका विशेष कालावधीत कर्जाची रक्कम परत द्यावी. कराराचा तुमच्या भागाचा आदर करण्यात चुकला तर नाखुशीचे परिणाम उद्भवतात. त्याचप्रमाणे, बायबल मानवजातीसाठी आपल्या निर्माणकर्त्याने दिलेला करार सांगते, आश्वासने जी तुमच्या आणि माझ्यासारखे लोकांना त्याच्या सार्वकालिक आशीर्वादांचा आनंद घेण्यासाठी शक्य करते. देव त्याच्या लोकांसोबत "एक करार" (यिर्मया ३१:३१) करत आहे तो बायबलच्या लेखामध्ये अद्वितीय आहे.

**३६.** पवित्र शास्त्राच्या या दैवी वैशिष्टयावर आपण ५व्या धडयात विचार करणार आहोत. इतिहास घडण्यापूर्वीच त्याच्याबद्दल देव घोषणा करत आहे याचे एक सामर्थ्यशाली उदाहरण

दानीएलाचे पुस्तक, अध्याय ७ ते १२ मध्ये आढळते. दानीएल ख्रि.पू. ४०० पासून ते ख्रिस्ताच्या काळापर्यंतचा जगाच्या साम्राज्याचा इतिहासाचे वर्णन करतो आणि शेवटच्या काळात होणाऱ्या घटनांचे वर्णन पुढे करतो. दानीएलाने हे सर्व ख्रि.पू. ६०० आणि ५३० च्या मध्ये लिहिले आहे.

**धडा ३ : भ्रष्ट की जतन केलेले?**

**३७.** पवित्र शास्त हे देवाकडून प्रेरित आहे हे मुस्लीम लोकांना सांगण्यासाठी कुराण मधील आणखी उदाहरणे : सुरह २:८७-९१, १०१, १३६, २८५; ३:३-४; ४:४७, ५४, १३६, १६३; ५:४३-४८, ६८; ६:९२; १०:९४; २०:१३३; २१:१०५; २८:४३; २९:४६; ३२:२३; ४०:५३-५४, ७०-७२; ४५:१६; ४६:१२; ५७:२७, इत्यादी.

**३८.** शतकानुशतके, जुन्या कराराचे लेख यहूदी धार्मिक समाजाने आवेशीपणाने संरक्षित केले होते. याबद्दल विचार करा. त्यांनी त्यांच्या पवित्र लेखांमध्ये कोणालाही काही फेरफार करू दिली असती का, पुस्तके ज्यासाठी पुष्कळ जण स्वेच्छेने मरण्यास तयार होते? इतिहासात अशा कोणत्याही प्रकरणाची नोंद नाही जेथे एका धार्मिक समाजाने (ख्रिस्ती) त्यांचा विश्वास एका पुस्तकावर (जुना करार) आधारला होता ज्याचे दुसऱ्या धार्मिक समाजाने (एकनिष्ठ यहूदी) सन्मान आणि संरक्षण केले होते. केवळ या वास्तविकतेनेच जुना कराराच्या लेखांमध्ये फेरफार करणे कोणालाही अशक्य झाले नसते का?

**३९.** कुराण, अनुवादक मौलाना वहिदुद्दिन खां, प्रकाशन- दिल्ली, गुडवर्ड बुक्स, २०१४, ऑनलाईन आवृत्ती.

**४०.** मेट्झगर, ब्रुस एम. अँड मायकल डी. कुगन. द ऑक्सफर्ड कम्प्यानियन टू द बायबल. न्यूयॉर्क : ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेस, १९९३, पान. ७५४.

**४१.** अंतिम टिप्पण्या नंबर ३७ पाहा.

**४२.** आपल्याकडे इसवीसन ७५०च्या (मुहम्मदच्या मृत्यूनंतर १०० वर्षांपेक्षा जास्त काळ) पूर्वीचे कुराण किंवा इस्लामचे कोणतेही पडताळणी करण्यायोग्य दस्तावेज नाहीत. www.debate.org.uk/debate-topics/historical/is-quran

**४३.** मेट्झगर आणि कुगन, पान. ६८३.

**४४.** प्राचीन हस्तलिखितांमध्ये आढळलेल्या स्पष्ट रूपांचे उदाहरण येथे आहे. जुन्या करारातील दुसरे राजे पुस्तकात, आपण वाचतो : "यहोयाखीन राज्य करू लागला तेव्हा तो अठरा वर्षांचा होता" (२ राजे २४:८) त्यादरम्यान, दुसऱ्या इतिहासाचे पुस्तक स्पष्ट करते : "यहोयाखीन आठ वर्षांचा असता राज्य करू लागला" (२ इतिहास ३६:९). असा फरक कसा स्पष्ट केला जाऊ शकतो? काही विद्वान सुचवतात की वयाच्या ८व्या वर्षी तरुण यहोयाखीनच्या वडिलांनी त्याला राज्या.त भागीदार म्हणून घेतले होते, आणि त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर वयाच्या १८व्या वर्षी तो राज्य

करू लागला, जे शक्य आहे. तथापि, या संख्यात्मक फरकाचे अधिक संभाव्य स्पष्टीकरण हे सरळपणे पूर्वीच्या-शतकांतील शास्त्र्यांनी "१८" ऐवजी "८" लिहिले असावे हा आहे. जर हे असे आहे, तर तो चुकीचा आकडा हा इतर सर्व हस्तलिखितांमध्ये हस्तांतरित झाला असता जे त्या शास्त्र्याच्या प्रतीपासून "उतरले" होते. प्रकरण काहीही असो, असा बदल देवाच्या संदेशाला कोणत्याही प्रकारे परिणाम किंवा बदल करू शकत नाही. बऱ्याच प्रकरणात, प्राचीन बायबल हस्तलिखितांचा निव्वळ खंड विद्वानांना विविध वचनांची तुलना करण्याद्वारे योग्य गोष्टीला निश्चित करू देत होते.

**४५.** हदीस नोंद करते : ज़ैद बिन थाबित, 'अब्दुल्लाह बिन अझ-झुबेर, सैद बिन अल-अस आणि अब्दुर रहमान बिन हरी-बिन हिशाम ला उसमानने मग आज्ञा दिली की परिपूर्ण प्रतींमध्ये हस्तलिखीताना पुन्हा लिहा.... त्यांनी तसे केले, आणि जेव्हा त्यांनी पुष्कळ प्रती लिहिल्या, 'उसमानने मूळ हस्तलिखित हफ्साला परत दिली. 'उसमानने मग प्रत्येक मुस्लिम प्रांताला एक प्रती पाठवून दिली जी त्यांनी नकल केली होती, आणि आज्ञा दिली की कुराणचे इतर सर्व साहित्य मग ते हस्तलिखितांचे काही भाग किंवा संपूर्ण प्रत असो, ती जाळून टाकावी." (हदीस, सही बुखारी, खंड, नंबर ५१०) (हदीस ["बोलणे"] हे मुहम्मदच्या पत्नी आणि सहकाऱ्यांकडून प्राचीन लेख आहेत. मुस्लीम लोक पुष्कळ विश्वास आणि आचरण हदीसवर आधारित करतात.)

**४६.** मृत समुद्राजवळच्या गुंडाळया साबित करतात की पवित्र शास्त्र हे बदललेले नाही, त्याचा शोध लागण्याच्या आधी एखादा व्यक्ती सरळपणे वर्तमान दिवसातील जुना कराराचे लेख सेप्टूयाजींटबरोबर (जुन्या कराराचा ग्रीक भाषांतर जे ख्रि.पू. २७०च्या आसपास पूर्ण झाले होते) तुलना करू शकत होते. सेप्टूयाजींट या दाव्याची पुष्टी करते की जुन्या कराराचे लेख हे अभ्रष्ट आणि जतन केलेले आहेत.

**४७.** अबेग, मार्टिन जुनियर., पीटर फ्लींट आणि इयुजीन उलरीच. द डेड सी स्क्रोल्स बायबल. सॅन फ्रान्सिस्को: हार्पर, १९९९, पान १६.

**४८.** मॅकडोवेल, जोश. अ रेडी डिफेन्स. नॅशविले : थॉमस नेल्सन पब्लिशर्स, १९९३, पाने ४२-४८.

**४९.** नवीन कराराचे लेख हे काही प्राथमिक ग्रीक लेखांमधून (मेजॉरिटी लेख, टेक्स्टस रीसेप्टस, अलेक्झांड्रीयन लेख) भाषांतरित केलेले आहेत. एनकेजेवी नवीन कराराचे भाषांतर टेक्स्टस रीसेप्टसवरून करते, तर एनआयवी अलेक्झांड्रीयन लेखापासून करते. जेथे ग्रीक नवीन करारात "महत्वपूर्ण" विविधता आढळते, तेथे बहुतेक बायबल भाषांतरे मार्जिन मध्ये एक टिप्पणी देतात हे दर्शवण्यासाठी की ती विविधता आहे. सर्वात मोठा उतारा ज्यावर प्रश्नचिन्ह आहे तो मार्क १६:९-२० आणि योहान. ७:५३-८:११ आहे, प्रत्येक १२ वचने इतके मोठे आहे. जुन्या संरक्षित

राहिलेल्या थोडया हस्तलिखितांमध्ये (अलेक्झांड्रीयन लेख) हे उतारे अनुपस्थितीत असले तरी, ते इतर (मेजॉरिटी लेख) शेकडोमध्ये आढळतात. हे लक्षात ठेवा की जुने म्हणजे आवश्यक नाही की ते जास्त अचूक असतील, कारण विविध लेख हे वेगवेगळया प्राचीन प्रतींमधून आलेले आहेत. हे होऊ शकते की गोंधळलेल्या शास्त्र्याने योगायोगाने हा भाग वगळला असेन. प्रकरण काहीही असो, या उताऱ्यात शिकवलेले सर्व सत्य हे पवित्र शास्त्रात इतरत्र देखील शिकवले गेले आहेत. देवाचा संदेश हा अप्रभावीतच राहतो. देवाचा संदेश नाकारणे हा शहाणपणा आहे का कारण काही प्राचीन प्रतींमध्ये काही थोडे भाग नाहीत-असे विभाग देवाच्या संदेशाला कोणत्याही प्रकारे बदलू शकत नाही?

**५०.** वर्तमान काळात, पुस्तके प्रकाशित केली जातात आणि चित्रपटे निर्माण केली जातात जी बायबलवर शंका निर्माण करण्यासाठी योजनाबद्द केलेली आहेत. काही बायबल टीकाकार "बदललेले शुभवर्तमान" या विरोधाभासाकडे इशारा देतात. असे सर्व "शुभवर्तमान" हे मसीहाच्या काळानंतर खूप वर्षांनी लिहिलेले आहेत आणि त्यामध्ये ऐतिहासिक पुष्टीकरणाचा अभाव आहे.

**५१.** हे विधान पुढील संदर्भात देखील सापडते : मत्तय ११:१५; १३:४३; मार्क ४:९, २३; ७:१६; लूक ८:८, १४:३५; प्रकटीकरण २:७, ११, २९; ३:६, १३, २२; १३:९.

## धडा ४ : विज्ञान आणि बायबल

**५२.** वेब्स्टर्स न्यू वर्ल्ड कॉलेज डिक्शनरी. न्यू यॉर्क : सायमन आणि शुस्टर, १९९७. पाहा: विज्ञान

**५३.** बुकैले, मौरीस. ला बायबल, ले कोराण एट ला सायन्स. सेघर्स, १९७६, पान. ३५. डॉ. बुकैलेच्या पुस्तकाच्या प्रतिसादात डॉ. विल्यम कॅम्पबेल यांनी द कुराण अँड द बायबल इन द लाईट ऑफ हिस्टरी अँड सायन्स हे लिहिले. दुसरी आवृत्ती; मिडल इस्ट स्त्रोत, २००२. डॉ. कॅम्पबेल यांचे काळजीपूर्वक –संशोधन खंडण हे देखील ऑनलाईन सात भाषांमधून वाचले जाऊ शकते. https://answering-islam.org/Campbell

**५४.** जैविक क्रांती सूचित करते की वनस्पती आणि वानर यांसारख्या जीवनाची लोकसंख्या आहे, जेव्हा सहस्राब्दी पिढयांमध्ये पसरले जाते, तेव्हा ते वनस्पती आणि लोकांच्या लोकसंख्येमध्ये बदलते. उत्क्रांतीनुसार, मनुष्य, माकडे, आणि लहान माशांचे समान पूर्वज आहेत. सत्य हे आहे की स्वैरपणे घडलेली उत्क्रांती किंवा उद्देशपूर्ण निर्मिती असो, त्यांना आधुनिक विज्ञानाद्वारे साबित केले जाऊ शकते. दोघांमध्ये विश्वास आवश्यक आहे.

**५५.** http://www.gma.org/space1/navmap.html

**५६.** जलस्तरीय चक्राची पुष्टी करणारी आणखी वचने : स्तोत्र. १३५:७; यिर्मया १०;१३;

उपदेशक १:७; यशाया ५५:१०

**५७.** न्यूजवीक मॅगेझीन : "(शास्त्रज्ञांना] डीएनएच्या चाचणीने एका एकटया स्त्री कडे नेले जिच्याकडून आपण सर्व जण आलो आहोत." न्यूजवीक, जानेवारी, ११, १९८८, पाने, ४६-५२.

**५८.** टाईम मॅगेझीन : "...तेथे पूर्वज 'आदाम' होता ज्याच्या गुणसूत्रावरील आनुवंशिक सामग्री पृथ्वीवरील प्रत्येक माणसांमध्ये समान आहे." टाईम, डिसेंबर ४, १९९५, पान. २९. **नोट** : शास्त्रज्ञ दावा करतात की आपला समान पुरुष पूर्वज हा आपल्या समान स्त्री पूर्वजाइतका जुना नाही. त्यांचा दावा बायबलशी सहमत आहे, जे दाखवते की आपण सर्व नोहापासून आलो आहोत. परंतु आपली समान माता ही हव्वा आहे, कारण नोहाला तीन पुत्र आणि तीन सुना होत्या ज्यांपासून सर्व लोक आलेत.

**५९.** www.pbs.org/wnet/redgold/basics/bloodletting.html

**६०.** www.bible.ca/tracks/matthew-fontaine-maury-pathfinder-of-sea-ps8.htm. **नोट** : मौरीने हे शोधून काढले की समुद्राचे मार्ग इतके निश्चित आहेत की नेव्हीगेटर अक्षरशः समुद्र ओलांडून "त्यांचा मार्ग शोधू" शकतो." (रोझवाडोव्स्की, हेलन एम. फातोमिंग द ओशन. केंब्रीज, एमए: द बेल्कनॅप प्रेस ऑफ हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, २००५, पान. ४०; ( जेव्हा दाविदाने "समुद्रातील मार्गा" बद्दल लिहिले, तेव्हा त्यांला आणि त्याच्या लोकांना फक्त हेच समुद्र ठाऊक होते ते म्हणजे मध्य सागर, गालील समुद्र, मृत समुद्र आणि तांबडा समुद्र. पाण्याच्या या क्षेत्रांना "मार्ग' किंवा महत्वपूर्ण निरीक्षण करण्याजोगे प्रवाह नाहीत.

**६१.** वर्ल्ड बुक एनसायक्लोपेडीया १९८६; स्टार्स.

**६२.** "एका स्पष्ट अंधाऱ्या रात्री, काही हजारो तारे उघडया डोळयांना दिसतात. दुर्बिणी आणि शक्तिशाली दुर्बिणींद्वारे, आपण इतके तारे पाहू शकतो की आपण त्यांची गणना करू शकत नाही. जरी प्रत्येक वेगळा तारा हा अद्वितीय असा आहे, तरी सर्व तारे समान असे दिसतात." (कॉर्नेल युनिवर्सिटी ऐस्ट्रोनॉमी वेबसाईट : http://curious.astro.cornell.edu/stars.php) बायबल हे देखील स्पष्ट करते की ताऱ्यांची गणना करू शकत नाही. (उत्पत्ती १५:५; २२:१७)

**६३.** रामसे, सर विल्यम मिशेल. द बियारिंग ऑफ रिसेंट डिस्कवरी ऑन द ट्रस्टवर्दीनेस ऑफ द न्यू टेस्टामेंट. ग्रँड रॅपिड्स, एमआय : बेकर बुक हाऊस, १९५३, पान. २२२.

**६४.** जोसेफस, फ्लावीयस. जोसेफस : द इसेंशीयल वर्क्स. (पौल एल. मायर, संपादक) ग्रँड रॅपिड्स, एमआय: क्रेगल पब्लिकेशन्स, १९८८, पाने. २६८-२७७.

**६५.** ब्रूस, एफ. एफ. आर्कियोलॉजिकल कन्फर्मेशन ऑफ द न्यू टेस्टामेंट. (रीविलेशन अँड द बायबल. कार्ल हेन्रीकडून संपादन) ग्रँड रॅपिड्स, एमआय: बेकर बुक हाऊस, १९६९.

**६६.** जोसेफस, फ्लावियस. अँटिक्युटीस १८:२, २; ४, ३

**६७.** कयफाला पुरल्याच्या बॉक्सचे फोटो आणि तपशील: http://www.kchanson.com/ANCDOCS/westsem/caiaphas.html
**६८.** ग्लुयेक, नेल्सन. रिवर्स इन द डेजर्ट. एनवाय : फरार, स्ट्रास अँड कुडाही, १९५९, पान. १३६. ग्लुयेक मध्य पूर्व उत्खनात कुशल होता.
**६९.** मॉर्मोनिजम हा एक धर्म आहे ज्याचे जगभरातील लाखो लोक अनुयायी आहेत. बायबलसारखे, मॉर्मोनचे पुस्तक हे पुरातत्वशास्त्राने पुष्टी केलेले नाही. वाशिंग्टन येथील स्मिथसोनीयन संस्था, डीसी ने निष्कर्ष काढला: "स्मिथसोनीयन पुरातत्वशास्त्रज्ञ नवीन जगाचे पुरातत्वशास्त्र आणि [मॉर्मोनचे पुस्तक] या विषय वस्तूमध्ये कोणताही सरळ संबंध पाहत नाहीत. [मार्टिन, वाल्टर. द किंग्डम ऑफ द कल्टस. मिनियापोलीस, एमएन : बेथानी हाऊस पब्लिशर्स, १९९७, पाने २००-२०२.) धडा ६ मध्ये त्या विषयावर अंतिम टिप्पणी ९१ देखील पाहा. पुरातत्वशास्त्राच्या तुलनात्मक दृष्टिकोनासाठी कारण ते बायबल आणि कुराणशी संबंध दाखवते, पाहा : http://www.debate.org.uk/?s=archaeology
**७०.** फ्री, जोसेफ, पी. अँड हॉवर्ड एफ. वॉस. आर्कियालॉजी अँड बायबल हिस्टरी. ग्रँड रॅपिड्स, एमआय : झोंडरवन, १९९२, पान. २९४.
**७१.** मुस्लीम आणि मॉर्मोन दोघेही दावा करतात की एक सर्वात मोठा पुरावा हा आहे की त्यांची पवित्र पुस्तके ही देवाकडून आहेत जी त्या साहित्यिक शैलीत लिहिलेली आहेत त्यात दिसून येतात. एक मुस्लीम वेबसाईट स्पष्ट करते : 'पवित्र कुराण... मोठे आव्हान:...जेव्हापासून कुराण प्रकट केले गेले आहे, चौदाशे शतकांपूर्वी, तेव्हापासून त्याची सुंदरता, वकृत्व शैली, आणि वैभवात कुराणच्या अध्यायांसारखे एखादा अध्याय देखील निर्माण करण्यास कोणीही सक्षम नाही..." (www.islam-guide. com/frm-ch1-2.htm). मॉर्मोन वेबसाईट समान दावा करते : 'मॉर्मोनचे पुस्तक ....तुम्हांला आव्हान देते: ....प्राचीन इब्री कविता आणि लिहिण्याच्या शैलींच्या संखेच्या वापर करून तुम्ही तुमची नोंद लिहिली पाहिजे आणि तुमची नोंद प्रकाशित केल्यानंतर अनेक वर्षांनी इंग्रजी बोलणारे जग त्याला पुन्हा शोधू शकणार नाहीत आणि घोषणा करू शकणार नाही. ..." www.fwrb.org/BOMChallenge.html
**७२.** स्तोत्र ११९, बायबलमधील सर्वात मोठा अध्याय, पवित्र शास्त्रात सापडणाऱ्या साहित्यिक रचनेच्या गुंगागुंतीचे उदाहरण देते. स्तोत्र ११९ हे वर्णमाला परीवर्णी काव्य आहे, जे प्रत्येक विभागात ८ वचनांसह २२ विभागांनी बनवलेले आहे. प्रत्येक विभागाची सर्व ८ वचने इब्री वर्णमालाच्या समान अक्षराने सुरुवात होतात. विभाग १ मध्ये, प्रत्येक वचन आलेफ (इब्री वर्णमालेचे पहिले अक्षर) या अक्षराने सुरु होते. विभाग २, सर्व आठ वचने बेथ (वर्णमालेचा दुसरा अक्षर) या अक्षराने सुरु होते. आणि असे संपूर्ण इब्री वर्णमालेभर राहते. त्याची नक्कल करण्याचा

प्रयत्न करा. नाही. करू नका. त्याऐवजी, स्तोत्र ११९ वाचा आणि त्याच्या शब्दाच्या शक्तीमध्ये स्वतः मग्न व्हा. "माझ्या सर्व शिक्षकांपेक्षा मी अधिक समंजस आहे. कारण मी तुझ्या निर्बंधांचे मनन करतो." (स्तोत्र ११९:९९)

**धडा ५ : देवाची स्वाक्षरी**

**७३.** वालनफेल्स, रोनाल्ड अँड जॅक एम. ससून. द ऐंशीयंट नियर इस्ट. खंड. ४. एनवाय: चार्ल्स स्क्रीबनर्स सन्स, २०००; तसेच पाहा: कार्ल रोबक. द वर्ल्ड ऑफ ऐंशीयंट टाईम्स. एनवाय : चार्ल्स स्क्रीबनर्स सन्स, १९६६, पान. ३५५.

**७४.** अलेक्झांडर द ग्रेटने नऊ महिन्यांच्या (ख्रि.पू. ३३२) वेढयानंतर नगरीला पतनाकडे आणले होते, जरी त्याने तिला पूर्णपणे नष्ट केले नाही. या आघातामुळे सोर पुन्हा कधीही पुन:स्थापित झाले नाही .." (ऐवरी, कॅथरीन बी. अँड जोथाम जॉन्सन. द न्यू सेंच्युरी क्लासिकल हैंडबुक. एनवाय : अप्पलेटन-सेंच्युरी-क्रोफ्टस, इंक., १९६२, पान. ११३०.)

**७५.** मॅथ्यूज, सॅम्युअल डब्ल्यू. "द फोनिशियन्स : सी लॉर्ड्स ऑफ अँटिक्युटी," वॉशिंग्टन, डीसी : नॅशनल जिओग्राफिक, ऑगस्ट १९७४, पान. १६५.

**७६.** उत्पत्ती २६:३; २८:१५ **नोट** : राष्ट्राला देवाने अभिवचन दिलेला प्रदेश अब्राहाम, इसहाक आणि याकोबापासून येतो तो रणनीतीदृष्टया "राष्ट्रांच्या मध्ये" होता. (यहेज्केल ५:५) तसेच प्रेषित. १:८; २:५ देखील पाहा.

**७७.** जोसेफस, फ्लावीयस. द कम्प्लीट वर्क्स ऑफ जोसेफस. (विल्यम व्हिस्टन) ग्रँड रॅपिड्स, एमआय : क्रेगल पब्लिकेशन्स, १९६७, पाने ५६६-५६८, ५८०-५८३, ५८८-५८९.

**७८.** दुसऱ्या महायुद्धाच्या आधी, उदाहरणासाठी, असंख्य यहूदी लोकांना हिटलरच्या जर्मनीमध्ये यहूदी म्हणून ओळख दाखवायची नव्हती. ते जर्मन बोलत, जर्मन कर देत आणि दुसऱ्या महायुद्धात जर्मनीसाठी युद्ध लढले. तरीही नाझी लोकांनी त्यांना यहूदी लेबल लावले. आणि काही थोडया वर्षांच्या आतच, "मानवी विध्वंस.....इतिहासातील उत्तम दस्तावेज ठेवलेले अपराध ज्यास म्हणतात" त्यामध्ये ६० लाख यहूद्यांचा वध करण्यात आला होता. (फिलिप्स, जॉन. एकस्प्लोरिंग द वर्ल्ड ऑफ द ज्यू. नेपच्यून, एनजे : लॉईझीऑक्स ब्रदर्स, १९९३, पान. १०९) तसेच मुख्य लेख देखील पाहा : "नाझी मानतात की त्यांनी युरोपमध्ये ६० लाख यहूद्यांचा खून केला." बोर्ने, एरिक. द पॅलेस्टाईन पोस्ट, संडे, डिसेंबर १६, १९४५.

**७९.** यशया ४४:१८; यिर्मया ५:२१; योहान. ५:३९-४७; २ करिंथ. ३;१२-१६; रोम. ९-११. **नोट** : २६०० वर्षांपूवी, देवाने इस्राएलचा नवीन जन्म हा तीन विभिन्न टप्प्यामध्ये घडेल असे यहेज्केलला प्रकट केले. त्याने इस्राएलची तुलना कोरडया हाडांनी भरलेल्या खोऱ्याशी केली,

जे मग एकत्र येतील की एक शरीर बनवावे आणि शेवटी त्यांच्यामध्ये जीवनाचा श्वास फुंकला जाईल. (यहेज्केल ३७:१-१४)

**८०.** शुभवर्तमान नोंद केलेल्या येशूच्या जीवनाची तुलना उत्पत्ती अध्याय ३७-५०बरोबर करा. शिफारस केलेले वाचन : योसेफ मेक्स मी थिंक ऑफ जीजस, विल्यम मॅकडोनाल्ड द्वारे, ग्रँड रॅपिड्स, एमआय : गॉस्पल फोलियो प्रेस.

**धडा ६ : सातत्यपूर्ण साक्ष**

**८१.** "कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थावरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत; अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये" (रोम. १:१९-२०). लोक ज्यांच्याकडे पवित्र शास्त्र नाही ते देखील, "नियमशास्त्रातील आचार आपल्या अंत:करणात लिहिलेला आहे असे दाखवतात; त्यांच्याबरोबर त्यांची सदसद्विवेकबुद्धीही त्यांना साक्ष देते आणि त्यांचे एकमेकांविषयीचे विचार दोष लावणारे किंवा दोषमुक्त करणारे असे असतात" (रोम. २:१५). तरीही, अधिक सत्य शोधण्याऐवजी, पुष्कळ लोक असत्याच्या मागे लागतात.

**८२.** बायबलमध्ये नोदविलेल्या वंशावळींच्या वयोगटांची गणना करून, आपण शिकलो की नोहाच्या वडिलांचे (आदामापासून ९वी पिढी) वय ५० वर्षांपेक्षा अधिक नव्हते (उत्पत्ती ५) तोपर्यंत आदाम मरण पावला नाही.

**८३.** "मग जादुगार फारोला म्हणाले, 'ह्यांत देवाचा हात आहे.'" (निर्गम ८:१९). तसेच निर्गम १२:३०-३३ देखील पाहा. संपूर्ण कथेसाठी : निर्गम ५-१४.

**८४.** मोशे पवित्र शास्त्राचा पहिला भाग लिहित असताना, ईयोबाचे पुस्तक तोरा (अब्राहामाचा काळाच्या आसपास) पूर्वी लिहिलेले असण्याची शक्यता आहे, जे त्यास पूर्ण साहित्याच्या अस्तित्वातील सर्वात जुने बनवते. जर ही तारीख बरोबर आहे, तर मग बायबल हे २,००० वर्षांच्या कालावधीत लिहिले गेले आहे.

**८५.** डेहान, डेनिस. आवर डेली ब्रेड, मे ६, २००६. ग्रँड रॅपिड्स, एमआय : आरबीसी मिनिस्ट्रीस.

**८६.** काही विचारतात, " देव खोटया संदेष्टयांना फसवणुकीचा संदेश का घोषित करू देईल?" मोशेने त्याचे उत्तर तोरामध्ये दिले आहे. "तुमच्यामध्ये एखादा संदेष्टा अथवा स्वप्न पाहणारा प्रकट झाला व त्याने तुम्हांला काही चिन्ह अथवा चमत्कार दाखवला, आणि त्या चिन्हाचा किंवा त्या चमत्काराचा तुम्हांला प्रत्यय आला, आणि तुम्हांला अपरिचित अशा अन्य देवांना अनुसरून त्यांची सेवा करण्याचे त्याने तुम्हांला सुचवले, तरी त्या संदेष्टयाचे किंवा त्या स्वप्न

पाहणाऱ्याचे तुम्ही एकू नका; कारण तुम्ही आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने व संपूर्ण जीवाने प्रीती करता की नाही हे पाहण्यासाठी तुमचा देव परमेश्वर तुमची ही अशी परीक्षा पाहत आहे." (अनुवाद १३:१-३)

**८७.** १ राजे १८; १ राजे १९:१८; रोम. ११:१४

**८८.** स्मिथ, जेम्स इ. वाट द बायबल टीचेस अबाउट द प्रॉमिस्ड मसीहा. नॅशविले, टीएन : थॉमस नेल्सन पब्लिशर्स, १९९३, पाने. ४७०-४७४; तसेच : फिलिप्स, जॉन. फिलिप्स, जॉन. एकस्प्लोरिंग द वर्ल्ड ऑफ द ज्यू. नेपच्यून, एनजे : लॉईझीऑक्स ब्रदर्स, १९९३, पाने. ८०-८१.

**८९.** टेलर, जॉन. "जोन्स कॅप्टीवेटेड सॅन फ्रान्सिस्कोस लिबरल इलायट," सॅन फ्रान्सिस्को क्रोनिकल, नोव्हेंबर १२, १९९८.

**९०.** स्मिथ, जोसेफ, पर्ल ऑफ ग्रेट प्राईज. जोसेफ स्मिथ- हिस्टरी; १:१५-१६.

**९१.** बायबलच्या विपरीत, जे इतिहास आणि पुरातत्वशास्त्राने पुष्टी केलेले आहे, मॉर्मोनचे पुस्तक पुष्टी केलेले नाही. प्राध्यापक थॉमस स्टूअर्ट फर्गुसनने मॉर्मोनिजमच्या स्वतःच्या ब्रीघम यंग युनिव्हर्सिटी येथे केवळ त्यांच्या "पवित्र पुस्तकासाठी" पुष्टी करणारे प्रमाण शोधण्याच्या उद्धेशाने पुरातत्वशास्त्र विभाग स्थापन केला. २५ वर्षांच्या समर्पित संशोधनानंतर, मॉर्मोनच्या पुस्तकात वर्णन केलेल्या वनस्पती, प्राणी, स्थलाकृती, भूगोल, लोक, नाणी, किंवा वसाहती यांची पुष्टी करण्यासाठी विभागाला काहीही आढळले नाही. फर्गुसनने निष्कर्ष काढला की मॉर्मोनच्या पुस्तकाचा भूगोल "काल्पनिक" आहे. (मार्टिन, वाल्टर. द किंग्डम ऑफ द कल्टस. मिनियापोलीस, एमएन : बेथानी हाऊस पब्लिशर्स, १९९७, पाने २००-२०२.)

**धडा ७ : आधारपाया**

**९२.** बायबलमध्ये ६६ वैयक्तिक पुस्तके आहेत-३९ जुन्या करारात आणि २७ नवीन करारात. नंतर इतिहासात, रोमन कॅथलीक चर्चने (जे, अनेक प्रॉटेस्टंट चर्चसारखे, देवाच्या वचनापेक्षा त्यांच्या चर्च परंपरांना उच्च करतात) निर्णय घेतला की जुन्या आणि नवीन कराराच्या मध्ये आणखी ११ अतिरिक्त पुस्तके जोडावी. ह्या पुस्तकांना अपोक्रिपा (किंवा ड्यूटेरोकॅनॉनिकल पुस्तके) म्हणतात, ती प्रामुख्याने जुन्या आणि नवीन कराराच्या मधील काळात लिहिली गेली आहेत. त्यामध्ये मनोरंजक ऐतिहासिक आणि पुराण साहित्य समाविष्ट असले तरी, इब्री विश्वासणाऱ्यांनी त्यांना प्रेरित शास्त्र म्हणून कधीही त्यांचा स्वीकार केला नाही. मृत समुद्राजवळील पुष्कळ गुंडाळया ज्या १९४७मध्ये सापडल्या त्या भाष्यग्रंथ आहेत जे केवळ जुन्या कराराच्या ३९ पुस्तकांवरच भाष्य करतात आणि अपोक्रिपावर करत नाहीत. जेव्हा मसीहा पृथ्वीवर होता, त्याने जुन्या कराराचा सतत संदर्भ दिला, पण अपोक्रिपाच्या पुस्तकामधून कधीही नाही. अपोक्रिपाचा नवीन करारात

कोठेही संदर्भ दिला गेलेला नाही. जुन्या करारात असलेली ३९ पुस्तके संदेष्टयांद्वारे लिहिली गेली आहेत ज्यांच्याबरोबर देव स्पष्ट बोलला आणि ज्यांना त्याने त्याच्या वचनाची पुष्टी केली, "त्यांच्याबरोबर देवानेही चिन्हे, अद्भुते व नाना प्रकारचे पराक्रम करून आणि आपल्या इच्छेप्रमाणे पवित्र आत्म्याची दाने वाटून देऊन साक्ष दिली" (इब्री. २:४). नवीन कराराचा विचार केला तर, ख्रिस्त पृथ्वीवर येऊन गेल्यानंतरच्या काळातील विश्वासणाऱ्यांनी प्रेषितांचा अधिकार आणि नवीन कराराच्या ग्रंथाला जुन्या कराराचे संदेष्टे आणि लेखासमान स्वीकारले. असे अपोक्रिपाच्या बाबतीत बोलले जाऊ शकत नाही.

**९३.** लूक २४:२५-४८; योहान ५:३९-४७. स्त्रोत जे देवाचा संदेश कालक्रमानुसार सादर करतात: www.one-god-one-message.com www.goodseed.com

**धडा ८ : देव कसा आहे**

**९४.** विश्वाचा इतिहास शोधण्याचा विश्वशास्त्रज्ञांचा प्रयत्न "एकत्रित निरीक्षणात्मक आणि सिद्धांतिक प्रयत्नांवर" आधारित आहे. (लोएब, अब्राहाम. "द डार्क एजेस ऑफ द युनिवर्स," सायंटिफिक अमेरिकन, नोव्हेंबर २००६) त्यांचे ज्ञान निरीक्षण आणि सिद्धांतावर आधारित असताना, बायबलवर विश्वास ठेवणाऱ्यांचे ज्ञान हे निरीक्षण आणि प्रकटीकरणावर आधारित आहे-प्रकटीकरण ज्यास दैवी स्वाक्षरी आहे (जसे एकच देव एकच संदेश पुस्तकाच्या ५ आणि ६ धडयात पाहिले गेले आहे). देवाने त्याचे सत्य अशा प्रकारे प्रकट केले आहे की ते सत्य आहे हे आपण समजू शकतो.

**९५.** ईयोबाचे पुस्तक अध्याय ३८: ६-७ मध्ये दर्शवते की देवदूत हे निरीक्षण आणि आनंद करत होते जेव्हा देवाने पृथ्वी निर्माण केली. ईयोब हे एक काव्यात्मक पुस्तक आहे; अशा प्रकारे देवदूतांना "प्रभातीचे तारे" आणि "देवाचे पुत्र" म्हणून वर्णन केले आहे. हे दोन वक्तव्ये वेगळे जीव दर्शवत नाही. हे दुहेरी वर्णन समांतरतेचे उदाहरण आहे, इब्री कवितेचे वैशिष्टय. ईयोब १:६; २:१ देखील पाहा.

**९६.** बायबलच्या ६६ पुस्तकांपैकी अर्ध्यापेक्षा जास्त पुस्तके देवदूतांचा संदर्भ देतात. उदाहरणार्थ; उत्पती ३;२४; १६:७-११; १८:१-१९:१; १ राजे १९:५-७; स्तोत्र. १०३:२०-२१; १०४:४; दानीएल ६:२२; इब्री. १:४-७, १४; १२:२२; मत्तय १:२०; २;१३, १९-२०; २२:३०; २६:५३; लूक १ आणि २; २ थेस्सल. १:७; प्रकटीकरण ५:११; १८:१; २२:६-१६, इत्यादी. (प्रकटीकरणात देवदूत किंवा अनेक देवदूत हा शब्द ७० पेक्षा अधिक वेळा वापरला आहे.)

**९७.** अनुवाद १०:१४; २ करिंथ. १२:२, ४; योहान १४:२; स्तोत्र. ३३:१३; ११५:३; १ राजे ८:३९

**९८.** वाईन, डब्लू. इ., एम. ए. अन एक्स्पोजीटरी डिक्शनरी ऑफ न्यू टेस्टामेंट वर्डस. वेस्टवूड,

एनजे : फ्लेमिंग एच. रेवेल कंपनी; १९६६, पान. २२९.

**९९.** देवाचे सृष्टी निर्मितीचे सहा दिवस आणि विसावा घेण्याच्या सातवा दिवसाने मानवजातीसाठी दैवीपणे वेळेचे चक्र नियुक्त करण्याची सुरुवात केली जी आज जगभरात पाळली जात आहे. दिवस, महिने आणि वर्षांच्या विपरीत, आठवडा खगोलशास्त्राशी संबंधित नाही. तो देवाने निश्चित केला आहे.

**१००.** "बिग बँग" कल्पनेचे समर्थक असे सिद्धांत मांडतात की सूर्य आणि पृथ्वीच्या काही ९,०००, ०००, ००० वर्षांपूर्वीपासून प्रकाश अस्तित्वात होता! (लोएब, अब्राहाम. "द डार्क एजेस ऑफ द युनिवर्स," सायंटिफिक अमेरिकन, नोव्हेंबर २००६, पान. ४९.)

**१०१.** पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही पाणी पिता, तुम्हांला तुमच्या निर्माणकर्त्याला, "तुझे आभार!" असे बोलावयास वाटेल. या वस्तुस्थिती व्यतिरिक्त की $H2O$ (पाणी) आपली तहान भगवते आणि आपल्याला जिवंत ठेवते, हे खरेच अद्भुत आहे. पाणी हे केवळ द्रव आहे जे गोठल्यावर वाढते; अशा प्रकारे ते कमी घन होते आणि तरंगते. जर पाणी इतर पदार्थांसारखे वागू लागला आणि गोठल्यावर कमी झाला, तर ते समुद्र, तलाव आणि नद्यांच्या तळावर बुडून जाईल. त्यापैकी बरेच हे वितळणार नाही आणि शेवटी आपले ताजे पाणी हे बंद होईल, गोठेल आणि तळावरच राहील. चांगली गोष्ट आहे आपल्या निर्माणकर्त्याने याचा विचार केला!

**१०२.** चंद्राची अंधारी बाजू एका माणसाने डिसेंबर २४, १९६८ला प्रथम पाहिली, जेव्हा अपोलो ८ अवकाशयानाने चंद्राभोवती फेऱ्या मारल्या होत्या. मनोरंजकपणे, त्याच दिवशी, तीन खगोल शास्त्रज्ञांनी उत्पत्ती अध्याय १ वाचला जेव्हा प्रेक्षकांनी त्यांना टेलीव्हिजनवर पाहिले. (रेनॉल्ड्स, डेव्हीड वेस्ट. अपोलो : द एपिक जर्नी टू द मून. एनवाय; हारकोर्ट, इंक., २००२, पाने ११०-१११)

## धडा ९ : त्याच्यासारखे कोणीही नाही

**१०३.** बायबलमध्ये अतिरिक्त उदाहरणे जेथे देव स्वतःला "आपण" आणि "आम्ही" असे संबोधतो: उत्पत्ती ३:२२; ११:७; यशया ६:८ (नोट : कुराणमध्ये, "अल्लाह" सतत अनेकवचनी प्रकारात बोलतो. एकच देव एकच संदेश या पुस्तकाच्या ३ऱ्या धडयात कुराणमध्ये दिलेल्या वचनाचा संदर्भ हे दर्शवतो.)

**१०४.** उत्पत्ती १:१-३, उत्पत्तीचा सुरुवातीचा विभाग त्रि-एकता म्हणून देवाच्या अस्तित्वाला स्पष्ट करत नसले तरी, ज्याप्रकारे ते लिहिले गेले आहे ते बायबलमध्ये नंतर प्रकट केलेल्या स्पष्टीकरणासह एका परिपूर्ण ऐक्यात आहे. देवत्वाचे तिन्हीही व्यक्ती निर्मितीमध्ये सामील होते हे पवित्र शास्त्र हे स्पष्ट करते.

**१०५.** जेव्हा दावीद इस्राएलाचा राजा झाला, पवित्र शास्त्र कथन करते : "बन्यामिनी लोक अबनेरामागे एकवट होऊन एक [एकाद] फौज बनवून एका पहाडाच्या शिखरावर उभे राहिले" (२

शमुवेल २:२५). तोच शब्द हे घोषित करण्यासाठी वापरला जातो: "प्रभू एकच आहे" या एकतेचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो ज्यामध्ये तेथे बहुवचन आहे.

**१०६.** जुन्या करारातील पुष्कळ वचने देवाच्या जटील एकतेची पुष्टी करतात : उत्पत्ती १७:१-३; १८:१-३३ देव अब्राहामाला शारीरिक प्रकारात प्रकट झाला. ह्या समोरासमोर भेटी होत्या आणि ते एक स्वप्न किंवा दृष्टांत नव्हता. उत्पत्ती ३५:९-१५; निर्गम ३:१-६; ६:२-३; २४:९-११; ३३:१०-११. निर्गम ३३;११ की निर्गम ३३:२०बरोबर तुलना करा. देवत्वाच्या एका व्यक्ती बरोबर (पुत्र) मोशे समोरासमोर बोलला, पण देवत्वाच्या इतर व्यक्तीचे मुख (पिता) त्याला पाहू दिले नाही. जटील? होय. देव देव आहे. योहान. १:१-१८ पाहा. येथे जुन्या करारातील आणखी काही उतारे आहेत जे देवाच्या बहुवचनी एकतेवाचून समजू शकत नाहीत : स्तोत्र.२; स्तोत्र. ११०:१ ( मत्तय २२:४१-४६बरोबर तुलना करा); नीतिसूत्रे ३०;४; यशया ६:१-३ (योहान १२:४१ बरोबर तुलना करा); यशया २६:३-४; यशया ४०:३-११; यशया ४३:१०-११ (यशया ७:१४; ९:६-७); यशया ४८:१६; यशया ६३:१-१४; यशया ४९:१-७; यिर्मया २३:५-६; दानीएल ७:१३-१४; होशेय १२:३-५; मीखा ५:२; मलाखी ३;१-२, इत्यादी.

**१०७.** लूक १५:११-३२; योहानाचे पहिले पत्र देखील वाचा.

**१०८.** स्तोत्र. २ वाचा, ज्यामध्ये दावीद संदेष्टा मसीहाला देवाचा पुत्र म्हणून संबोधतो. पुत्राची इतर काही नावे आणि उपाधींचा देखील विचार करा. त्यास असे म्हणतात : "दार" (योहान १०) परंतु याचा अर्थ हा नाही की तो लाकूड किंवा धातूचे दार आहे. त्यास हे देखील म्हणतात : "जीवनाची भाकर" (योहान ६) परंतु याचा अर्थ हा नाही की तो भाकरीचा एक तुकडा आहे. "देवाचा पुत्र" याचा हा अर्थ देखील नाही की देवाने एक बायको केली आणि त्याला एक पुत्र झाला. योहान. अध्याय १, ३ आणि ५ वाचा.

**१०९.** ले सोलेली, मार्च १४, १९८४ : «Bienfaiteur sincère, il considérait ses 2.000 employés comme ses enfants et partageait leur problèmes, leur soucis et leur joie. Le 'Vieux' comme l'appelaient familièrement et tendrement son personnel, était un grand fils du Sénégal.» (भाषांतर : एक प्रामाणिक मानवतावादी, तो त्याच्या २००० कर्मचाऱ्यांना त्याची मुले समजत होता, त्यांच्या समस्या, काळजी आणि आनंदात सहभागी होत असे. त्याचे सहयोगी सौम्यपणे त्याला "वृद्ध माणूस', म्हणत असे, तो सेनेगलचा एक महान पुत्र होता.")

**११०.** स्वयं देवासारखे, पवित्र आत्मा आपल्या पूर्वकल्पित प्रकारात जबरदस्ती टाकला जाणार नाही. देवाच्या संदेष्टयांपैकी एक, ज्याला स्वर्गाची झलक दिली होती, त्याने पवित्र आत्म्याला "पेटलेल्या सात मशाली राजासनापुढे जळत होत्या; त्या देवाचे सात आत्मे आहेत" असे पाहिले (प्रकटीकरण ४:५). आणखी एका संदेष्टयाने त्याचे वर्णन एकच जो सात गुणधर्म प्रदान करतो जे

केवळ देवापासूनच येतात असे केले आहे : “परमेश्वराचा आत्मा, सुज्ञानाचा व समंजसपणाचा आत्मा, सुसंकल्पाचा आत्मा, व सामर्थ्याचा आत्मा, परमेश्वराच्या ज्ञानाचा व भयाचा आत्मा त्याच्यावर राहील.” (यशया ११:२)

**१११.** पृथ्वीवर असताना, देवाच्या पुत्राने त्याच्या शिष्यांना अभिवचन दिले, “तरी ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हांला सर्वकाही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांला आठवण करून देईल” (योहान. १४:२६). ही वचने परिपूर्ण एकता दर्शवतात जी पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या मध्ये नेहमीच अस्तित्वात आहे. पिता आणि पुत्रासारखे, पवित्र आत्मा एक वैयक्तिक जीव (“तो..”) आहे. पवित्र आत्म्याबद्दल आणखी माहितीसाठी, १६, २२ आणि २८ धडयात पाहा. तरीही उत्तम असे, पवित्र आत्म्याच्या भुमिकेकडे बारकाईने लक्ष देत, बायबलमधून पत्रे आणि प्रेषितांची कृत्ये वाचा.

**११२.** पुत्र पित्याशी “जग होण्यापूर्वी जे माझे गौरव तुझ्याजवळ होते” हे बोलत आहे याबद्दल शुभवर्तमान नोंद करते. पुत्र हे बोलताना देखील आपण ऐकतो : ‘पित्या ...कारण जगाच्या स्थापनेपूर्वी तू माझ्यावर प्रीती केलीस” (योहान. १७:५, २४). मीखा ५:२; यशया ९:६ देखील पाहा. पवित्र आत्म्याबद्दल, त्याची एक उपाधी “सार्वकालिक आत्मा” आहे. (इब्री. ९:१४)

**११३.** निर्गम २०:२२; इब्री. १२:२५; लूक ३:२२; ५:२४; योहान १:१-१८; ३:१६-१९; १७:२२; प्रेषित. ५:३; ७:५१; गलती. ४:६; इत्यादी.

**११४.** अरबी भाषेमध्ये, अल्लाह शब्द, त्याच्या मूळ अर्थात, इंग्रजी देव शब्दाचा अरबी समतुल्य आहे. मग जुन्या करारातील वचन जसे उत्पत्ती १:१: “प्रारंभी देवाने ....निर्माण केले,” किंवा नवीन करारातील वचन जसे योहान १:१: “प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता.” देवासाठी मूळ शब्द अरबी मध्ये अल्लाह आहे, त्याचा अर्थ सर्वोच्च जीव. हे समजणे महत्वाचे आहे की सर्वोच्च जीवाला वैयक्तिक नाव आहे ज्याद्वारे त्याला ओळखावे अशी याची इच्छा आहे. “अल्लाह” हे देवाचे योग्य नाव नाही, वैयक्तिक नाव आहे, जरी ते तसे असावे म्हणून पुष्कळ विश्वास ठेवतात. किंवा “देव” त्याचे योग्य, वैयक्तिक नाव नाही, जरी ते तसे आहे म्हणून काही विचार करतात.

## धडा १० : एक विशेष निर्मिती

**११५.** गिनीज, अल्मा इ. एबीसी ऑफ द ह्युमन बॉडी. कॉर्पोरेट ऑथर : द रीडर्स डायजेस्ट असोसिएशन, १९८७, पान. २२.

**११६.** गेट्स, बील. द रोड अहेड. एनवाय : पेंग्विन ग्रुप, १९९५, पान. १८८.

**११७.** मोठे आध्यामिक सत्य स्पष्ट करण्यासाठी, बायबल मानवी शरीराच्या सुसंवादी प्रणालीचे

वर्णन करते : “त्याच्यापासून पुरवठा करणाऱ्या प्रत्येक सांध्याच्या योगे, सबंध शरीराची जुळवणूक व जमवाजमव होत असते, आणि प्रत्येक अंग आपापल्या परिमाणाने कार्य करत असता आपली रचना प्रितीमध्ये होण्यासाठी शरीर आपली वृद्धी करून घेते.” (इफिस. ४:१६)

**११८.** हे विचार जॉन फिलिप्सच्या उत्पत्तीच्या उत्कृष्ट भाष्यग्रंथावरून घेतले आहेत (फिलिप्स, जॉन. एकस्प्लोरिंग जेनेसीस. चीकागो : मुडी प्रेस, १९८०). **नोट** : पवित्र शास्त्र आत्मा, प्राण आणि शरीरामध्ये फरक करते. १ थेस्सल. ५:२३; इब्री ४:१२-१३; योहान ४:२४.

**११९.** एदेन हे इराकच्या क्षेत्रामध्ये स्थित आहे हे मत उत्पत्ती २;१३-१४ वरील भौगोलिक माहितीच्या आधारावर आहे. **नोट** : काही जण एदेन बागेला सुखलोकाची बाग म्हणून संबोधतात, जरी पवित्र शास्त्र तसे करत नाही. पृथ्वीवरील एदेनास स्वर्गीय सुखलोकाशी जोडून गोंधळ करू नये.

**१२०.** हेन्री, मॅथ्यू. मॅथ्यू हेन्रीस कॉमेंटरी. ग्रँड रॅपिड्स, एमआय : झोंडरवन, १९६०, पान. ७.

**१२१.** आदाम (आदामा) हा माणसासाठी इब्री शब्द आहे, त्याचा शब्दशः अर्थ लाल माती कारण त्यास जमिनीतून घेतले आहे. हव्वा (चव्वा) म्हणजे जीवन-“कारण ती अवघ्या जीवाधारी जनांची माता होती.” (उत्पत्ती ३:१९-२०)

## धडा ११ : वाइटाचे प्रवेशद्वार

**१२२.** “हे लूसीफरा, प्रभातपुत्रा, तू आकाशातून कसा पडलास! राष्ट्रांना लोळवणाऱ्या तुला धुळीत कसे टाकले!” (यशया १४:१२). या वचनात, लूसीफर नावाचा, अर्थ प्रकाश वाहक, हे इब्री लेखात आढळत नाही. इब्री शब्द हेलेलचे हे लॅटिन भाषांतर आहे, म्हणजे चमकणारा व्यक्ती. यशया १४ आणि यहेज्केल २८ दुहेरी भाषांतराच्या नियमाचे उदाहरण देतात. वरवर पाहता, हे उतारे पृथ्वीवरील राजाला संबोधतात. यशया “बाबेलचा राजा” आणि यहेज्केल “सोरच्या राजकुमारचा” संदर्भ देतात. तरीही हे दोन्ही उतारे हे विधान करतात जे केवळ माणसाला लागू केले जाऊ शकत नाही. जेव्हा ह्या वचनांचा इतर वचनांच्या प्रकाशात अध्ययन केले जाईल (लूक १०:१८; ईयोब १:६-१२; प्रकटीकरण १२:१०; १ पेत्र ५:८; इत्यादी.), तेव्हा हे स्पष्ट होते की हे उतारे सैतानाच्या पतनावरील भाष्य आहेत, जो या दुष्ट राजांना चेतविणारा आणि प्रभावित करणारा आहे.

**१२३.** प्रकटीकरण १२:४

**१२४.** मत्तय १०:२८; २३:२३; मार्क ९:४३-४८

**१२५.** प्रकटीकरण २०:१०-१५

## धडा १२ : पाप आणि मृत्यूचा नियम

**१२६.** एक सामान्य प्रश्न : बालके आणि लहान मुलांच्या बाबतीत काय जेव्हा ते मरतात? त्यांच्या जन्मजात पापी स्वभावासाठी त्यांचा न्याय केला जाईल का (स्तोत्र. ५१:५; ५८:३)? नीतिमान न्यायाधीश योग्य करेल (उत्पत्ती १८:२५). तो एखाद्या व्यक्तीला तो किंवा ती जे समजण्यास असमर्थ आहेत त्यासाठी दोषी ठरवणार नाही. लोक ज्यांनी देवाचे सत्य शोधण्याचा विचार केला असता तर जे त्यांना कळले असते आणि कळू शकले असते त्याबद्दल तो लोकांना जबाबदार धरतो (रोम. २:११-१५; स्तोत्र ३४:१०; यशया ५५:६). एक मानव देवासमोर जबाबदार ठरतो जेव्हा तो किंवा ती नैतिक निवड करण्यासाठी पुरेसे परिपक्व असतात (अनुवाद १:३९; यशया ७:१६; २ शमुवेल १२:२३; मत्तय १८:१०; २ तीमथ्य. ३;१४-१७). एखादा व्यक्ती त्याच्या किंवा तिच्या पापासाठी आणि निवडीसाठी केव्हा जबाबदार होतो हे फक्त देवालाच ठाऊक आहे. प्रकरण काहीही असो, देवाचा संदेश आपल्या प्रत्येकासाठी हा आहे: "पाहा, आताच 'समय अनुकूल आहे;' पाहा, आताच 'तारणाचा दिवस' आहे." (२ करिंथ. ६:२)

**१२७.** प्रकटीकरण २०:१४-१५; २:२२; २१:८; मत्तय २५:४६

## धडा १३ : दया आणि न्याय

या धडयात काहीही अंतिम टिप्पण्या नाहीत.

## धडा १४ : शाप

**१२८.** "अजगर आणि बोआ कनस्त्रीक्टर..यांना त्यांच्या कातडीच्या खाली लहान गाठीसारखे पाय असतात आणि लहान, अर्धा इंच नखे असतात जे गाठीच्या वर बाहेर येतात परंतु गुदद्वाराजवळ त्यांच्या पोटाजवळ चिकटून असतात. प्रत्यक्षात, ती लहान गाठ देखील पाय नाहीत पण त्याऐवजी वरील-पायाच्या अवशेषाची (मांडी किंवा माकड हाड) हाडे असतात. नर अजूनही नखे वापरतात, परंतु केवळ प्रेमसंबंध आणि लढाई दरम्यान, चालण्यासाठी नाही. इतर कोणत्याही सर्पांना पाय नाहीत." http://usatoday30.usatoday.com/tech/columnist/aprilholladay/2005-06- 10-wonderquestx.htm

काही जण या जैविक वस्तुस्थितीचा त्यांच्या उत्क्रांतीवाद गृहीत धरण्यास आधार म्हणून अर्थ लावतात. एक मुद्दा येथे लक्षात घेतला पाहिजे तो हा : सापांचे शरीरशास्त्र हजारो वर्षांपूर्वी पवित्र शास्त्रात नोदवलेल्या गोष्टींशी सुसंगत आहे.

**१२९.** तसेच : प्रकटीकरण २०:२; लूक १०:१८ आणि २ करिंथ. ११:३, १४: "जसे सर्पाने त्याच्या धूर्तपणाने हव्वेला फसवले," तसेच "सैतान स्वतः प्रकाशाचा दूत म्हणून रूप धारण

करतो."

**१३०.** निर्गम २९:७; १ शमुवेल १०:१, २ राजे ९:६; स्तोत्र. ४५:७

**१३१.** १८व्या धडयात देवाने सोडवण्याची त्याची योजना सांकेतिक का केली याबद्दल तीन कारणे सादर करतो. पवित्र शास्त्राचा कालक्रमानुसार अध्ययन करण्याचा एक आनंद हा पाप्यांना सैतान, पाप आणि मृत्यूपासून सोडवण्याच्या देवाच्या योजनेच्या नाट्याचे अनावरण करणे आहे. देवाने, त्याच्या ज्ञानाने, त्याची योजना उत्तोरोत्तर प्रकट केली, "कानूवर कानू; थोडे येथे, थोडे तेथे." (यशया २८:१०)

**१३२.** "तू त्याला बुद्धिमान बोल" हे शीर्षक असलेल्या हास्यचित्र कथेमध्ये, टाईम मॅगझीन बुद्धिमान रचनाकाराच्या (देव) कल्पनेला कमी लेखतो : "वृद्ध होण्याला अधिक प्रतिभा आणि प्रतिष्ठेने हाताळले जाऊ शकले नसते का? उदाहरणार्थ : वृद्ध लोक सुरकुत्या आणि जीर्ण होण्याऐवजी केवळ काव्यमयपणे विरून गेले असते तर?" (हँडी, ब्रूस अँड ग्लीनीस स्विनी. टाईम, जुलै ४, २००५, पान ९०). तसेच, इमप्रोबेबिलीटी ऑफ गॉड या पुस्तकात 'नायदर इंटेलीजंट नॉर डिजाईन्ड हे शीर्षक असलेल्या अध्यायात, स्पष्ट करतो; 'अशा खराब रचना केलेल्या प्राण्याला बुद्धिमान रचना प्रस्तावित करणारा मानवी अहंकारापेक्षा काही जास्त आहे का?" (ब्रूस अँड फ्रान्सिस मार्टिन इमप्रोबेबिलीटी ऑफ गॉड मध्ये मायकल मार्टिन अँड रिकी मोनियर द्वारे. एमहर्स्ट, एनवाय : प्रोमेथियुस बुक्स, २००६, पान. २२०)

## धडा १५ : दुहेरी समस्या

**१३३.** असोसिएटेड प्रेस, मे २०, २००६ http://forums.anandtech.com/ archive/index. php/t-1869858.html

**१३४.** विधीपूर्वक धुणे हे जुन्या कराराच्या नियमाचा भाग होता (लेवीय पाहा). पाप्यांना देवासमोर त्यांच्या आध्यात्मिक अशुद्धतेची जाणीव करून देण्याचा त्यांचा हेतू होता. कारण देवाने मसीहा द्वारे पूर्ण शुद्धता आणि धार्मिकता प्रदान केली आहे, येथून पुढे देवाला अशा विधींची आवश्यकता नाही. प्रेषित. १० आणि कलस्सै. २ वाचा. आजपर्यंत, पुष्कळ धर्म शुद्धतेच्या बाह्य विधींवर जोर देतात. लंडन येथील एका मुस्लीमकडून हा ई-मेला मला मिळाला: 'ख्रिस्ती लोकांसोबत सर्व गैर-मुस्लीम हे घाणेरडे आहेत....मुस्लीम लोक इतके शुद्ध आणि अल्लाहजवळ आहे कारण ते धुतात....."

**१३५.** देवाने मौखिकपणे आज्ञांची घोषणा केल्यावर (निर्गम २०), त्याने मोशेला पर्वतावर बोलावले आणि त्याला दगडाच्या दोन पाटया दिल्या ज्यावर परमेश्वराने स्वतः आज्ञा लिहिल्या होत्या (निर्गम २४:१२; ३१:१८). "ह्या पाटया देवाने केलेल्या होत्या आणि त्यांच्यावर खोदलेला

लेख देवाने लिहिलेला होता.'' (निर्गम ३२:१६)

**१३६.** लूक १८:९-१४; इफिस. २:८-९ पाहा.

**१३७.** मसीहा हा एकमात्र आहे ज्याने देवाचे सर्व नियमशास्त्र पाळले आहे आणि म्हणू शकतो, ''हे माझ्या देवा, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यात मला आनंद आहे; तुझे शास्त्र माझ्या अंतर्यामी आहे'' (स्तोत्र. ४०:८). नियमशास्त्र आपल्याला त्याच्याकडे इशारा करते. ''ह्यावरून आपण विश्वासाने नीतिमान ठरवले जावे म्हणून नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्ताकडे पोहचवणारे बालरक्षक होते'' (गलती. ३:२४). मनुष्याच्या पापासाठी देवाचा उपाय हा रोम. ३:२०-२७ मध्ये सामर्थ्याने रुपरेखीत केलेला आहे.

## धडा १६ : स्त्रीचे संतान

**१३८.** ''कारण जसे आदामामध्ये सर्व मरतात तसे ख्रिस्तामध्ये सर्व जिवंत केले जातील'' (१ करिंथ. १५:२२); रोम. अध्याय ५; गलती. ४:४-५ देखील वाचा.

**१३९.** न्युओबर्थ प्रेग्नन्सी केअर सेंटर : www.neobirth.org.za/development. html

**१४०.** ''बेथलेहेम एफ्राथा'' हे बेथलेहेम साठी जुने नाव होते, यरुशलेमेच्या दक्षिणेकडील एक नगर (उत्पती ३५:१६-१९; ४८:७). राजा दावीद बेथलेहेम येथे जन्मला होता (१ शमुवेल १६:१, १८-१९; १७:१२), जसे त्याचा महान वंशज तेथे जन्मला होता (मत्तय. २;१-६; लूक २:१-१२). यहूदी जे येशूच्या काळात राहत होते ते गोंधळात होते कारण तो नासरेथ, गालीलमध्ये मोठा झाला होता (योहान ७:४१-४२).

**१४१.** पवित्र शास्त्रातील संदर्भांसाठी, ५व्या धडयातील भविष्यवाण्यांची यादी पाहा.

**१४२.** ''मसीहा'' च्या अर्थाबद्दल अधिक माहितीसाठी, ''दोन ''बीज'': या उपशीर्षकाखाली, १४वा धडा पाहा.

**१४३.** उत्पत्ती १;२; देवाच्या पवित्र आत्म्याला गब्रीएलशी जोडून गोंधळ करू नये. देवदूत गब्रीएल हा एक निर्मित जीव होता. पवित्र आत्मा हा अनिर्मित आहे, देवाचा स्वयं सदैव सक्रीय आत्मा. ९ आणि २८ धडे पाहा.

**१४४.** येशूचा जन्म झाल्यानंतर, मरीया तिचा पती योसेफबरोबर एका सामान्य जोडप्यासारखी राहिली, आणि एकत्र मिळून त्यांना पुत्र आणि कन्या झाल्या (मत्तय १३:५५-५६; लूक ८:१९; योहान ७:३-१०)

**१४५.** संदेष्टयांनी भविष्यवाणी केली की मसीहा एका कुमारीकेच्या पोटी जन्म होईल : यशया ७:१४; अब्राहाम, इसहाक, याकोब आणि यहूदाच्या वंशातून तो असेल: उत्पत्ती १७:१८-२१; २६:३-४;; २८:१३-१४; ४९:८-१०; तो दावीद राजाच्या राजेशाही वंशातून असेल : २ शमुवेल

७:१६; त्याचा जन्म बेथलेहेममध्ये होईल : मीखा ५:२.

**१४६.** मत्तय २. राजा हेरोद दुसरा "राजा" जन्मला आहे या विचाराने मत्सरात होता आणि बेथलेहेमच्या आसपास दोन वर्षाचे आणि त्या खालील सर्व पुरुष बाळांचा वध करण्याची आज्ञा देण्याद्वारे त्याने येशूचा नाश करण्याचा प्रयत्न केला. सैतान या सर्वांमागे होता. त्याचे ध्येय हे स्त्रीच्या संतानाचा नाश करण्याचे होते, ज्याने "त्याच्या क्षेत्रात" शिरकाव केला होता! तथापि, देवाने योसेफाला चेतावणी देऊन येशूला मारण्याच्या सैतानाच्या प्रयत्नांना प्रतिबंध केला आणि त्याला निर्देश दिला की मरीया आणि बाळाला घेऊन मिसर देशात आश्रयाला जा. ह्या घटनांची संदेष्टयांनी देखील भविष्यवाणी केली होती (मत्तय अध्याय २; मीखा ५;२; होशेय ११:१; यिर्मया ३२:१५). राजा हेरोद मरण पावल्यानंतर, योसेफ, मरीया आणि येशू नासरेथला परत आले जेथे बाळ येशू प्रौढ झाला.

**धडा १७ : हा कोण आहे?**

**१४७**. जय्युसीकडून घेतलेले, सल्मा खाद्रा. टेल्स ऑफ जुहा. इंटरलींक बुक्स, नॉर्थम्पटन, एमए, २००२, पान. १९.

**१४८.** येथे काही प्राचीन, पवित्र शास्त्राबाहेरील ऐतिहासिक लेखक आहेत ज्यांनी नासरेथच्या येशूचा संदर्भ दिला : टॅसिटस, रोमन इतिहासकार (इ.स. ५५-१२०) [टॅसिटस, १५:४४]; जोसेफस, यहूदी इतिहासकार (इ.स. ३७-१०१) [अँटिक्युटीस १८:३]; तालमूद, तौरातचे धार्मिक गुरूंचे भाष्य [बाबेलचे तालमूद. सन्हेद्रीन, ४३अ]; एक ग्रीक नाव लुसियन [द डेथ ऑफ पेरेक्वायर, पाने ११-१३, समासोटाची कामे यात, एच. डब्लू फौलर अँड एफ. जी. फौलर द्वारे भाषांतरी, ४ खंड. ऑक्सफोर्ड: क्लारेंडन प्रेस, १९४९; सुटोनियस (इ.स. ६९-१२२), सम्राट हद्रीयनचा प्रमुख सेक्रेटरी [क्लौडीयस, २५]. **नोट** : जे. ओस्वाल्ड सँडर्सने लिहिले : "बायबलचा ख्रिस्त हा केवळ मानवी कल्पनेतील संतती आहे आणि त्याला ऐतिहासिक वास्तविकता नाही हे म्हणणे, शुभवर्तमानांना साहित्याच्या क्षेत्रातील एक मोठा चमत्कार करणे आहे  जसे इतिहासाच्या क्षेत्रात जिवंत ख्रिस्त आहे. अर्नेस्ट रेननने अशी टिप्पणी केली की येशूचा शोध लावण्यासाठी येशूच लागेल. जे. जे. रुससेयुने टिप्पणी केली की एकाने त्याचा विषय बनवला पाहिजे यापेक्षा पुष्कळ व्यक्तींनी असा इतिहास लिहिण्यासाठी सहमत झाले पाहिजे हे अधिक अकल्पनीय आहे." (सँडर्स जे. ओस्वाल्ड. द इनकम्प्यारेबल ख्राईस्ट. मुडी प्रेस. शिकागो, १९७१, पान. ५७.)

**१४९.** मत्तय १३:५५-५६. येशू नासरेथमध्ये मोठा झाला (मत्तय २:२२-२३; लूक २:५१-५२), त्याचा कायदेशीर पिता, योसेफ बरोबर सुतार काम करत होता (मार्क ६:३). येशूचा साधारणपणा त्यांना अपमानित करत होता ज्यांना एक ताबा मिळवणारा नायक हवा होता, एक नम्र सेवक नाही.

**१५०.** "येशूने आपल्या कार्याचा आरंभ केला तेव्हा तो सुमारे तीस वर्षांचा होता. लोक त्याला योसेफाचा पुत्र असे समजत...." (लूक ३:२३)

**१५१.** येशूने सतत स्वतःला "मनुष्याचा पुत्र" असे संबोधले, मसीहाविषयक एक उपाधी ज्याचा अर्थ, "मनुष्याचा/मानवजातीचा पुत्र" (ग्रीक : एन्थ्रोपोस). काय हे शीर्षक! मग ते आपल्याला आवडो की नाही, आपण सर्व जण मानवजातीचे पुत्र (नातेवाईक) आहोत. परंतु देवाच्या अत्युच्च पुत्राच्या बाबतीत, त्याने मनुष्याचा पुत्र होण्याची आणि मानवजातीबरोबर स्वतःची ओळख करण्याची निवड केली. अशा प्रकारे, हे शीर्षक येशूचे दैवत्व तसेच त्याच्या मानवतेवर देखील अवश्य जोर देते, कारण ते मानवजातीमध्ये देवाच्या वैयक्तिक मध्यस्थीकडे इशारा करते. दानीएल ७;१३-१४; मत्तय ८:२०; लूक ५:२४; २२:६९-७०; योहान ५;२७; १३:३१; प्रकटीकरण १;१३-१८; १४:१४ वाचा.

**१५२.** उदाहरणार्थ, जुन्या कराराचे हे वचन ज्याचा संदर्भ येशूने केला (लूक. ४:४ मध्ये) ते मोशेच्या तोरामधून आहे; अनुवाद ८:३.

**१५३.** माणसाच्या पापामुळे, सैतान वास्तवात "जगाचा शासक" आणि "अंतरीक्षातील राज्याचा अधिपती म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपती" झाला (योहान १२:३१; इफिस. २:२). देवाचा पुत्र मनुष्याचे प्रभूत्व पुन:स्थापित करण्यासाठी आला होता जे त्याने पापाने गमावले होते.

**१५४.** स्तोत्र. ११० आणि स्तोत्र. २; मत्तय २१:४१-४६

**१५५.** कुराण १९;१९; ची ४८:२; ४७:१९ बरोबर तुलना करा.

**१५६.** कुराण १९:१९; ३:४५-५१; ५:११०-११२; १९:१९

**१५७.** कुराण ४:१७१

**१५८.** इस्लाममध्ये अंतिम पाप हे "शिर्क" आहे (जोडण्यासाठी अरबी मध्ये). शिर्क हे काहीही किंवा कोणालाही देवाबरोबर समान लेखण्याचे पाप आहे.

**१५९.** अभिवचन दिलेल्या मसीहाला दिलेल्या उपाधींकडे लक्ष दया : अद्भुत=केवळ देवासाठीच वापरलेली उपाधी. त्याचा अर्थ सामन्यांमधून. मंत्री= मसीहा हा ज्ञानाचे व्यक्तिमत्व असेल. समर्थ देव= देव स्वतः एक मानवी शरीर धारण करेल. सनातन पिता=सार्वकालिकतेचा ताबा त्याच्याजवळ असेल. शांतीचा अधिपती= जे त्याच्यावर विश्वास ठेवतात त्या सर्वांना तो प्रदान करेल : देवासोबत शांती (रोम. ५:१), इतरांसोबत शांती (इफिस. २:१४-१८), मनाची शांती (फिलिप्पै. ४:७), आणि शेवटी, जागतिक शांती (अध्याय २९ पाहा).

**१६०.** दावीद संदेष्टयाने पृथ्वीवर व्यक्तीमध्ये प्रभूच्या येण्याविषयी भाकीत केले : "पाहा, मी आलो आहे; ग्रंथपटात माझ्याविषयी लिहून ठेवले आहे" (स्तोत्र. ४०:७). मलाखीने भविष्यवाणी

केली की देव "प्रभूच्या" आगमनापूर्वी लोकांना तयार करण्यासाठी अग्रदूत पाठवेल. (मलाखी ३:१)

**१६१.** आपल्या स्तरावर खाली येणे हे देवाच्या वैभवाच्याखाली आहे का? तुम्ही आणि तुमचा मित्र दोन आध्यात्मिक गुरु, ओमर आणि अहरोन यांच्याबद्दल बोलत आहात याची कल्पना करा. तुमचा मित्र म्हणतो, "अहरोन खेळण्यांच्या कार सोबत खेळतो, पण ओमर तसे करत नाही." अहरोनसाठी मोठा आदर असण्याबद्दल तुम्ही उत्तर देता, "कधीही नाही! हे अहरोनापासून दूरच राहो की त्याने खेळण्याच्या कारसोबत खेळले पाहिजे!" सुरुवातीला अशी प्रतिक्रिया योग्य वाटत नाही. मग कथा स्पष्ट होते की ओमर आणि अहरोन दोघांनाही तरुण पुत्र आहेत ज्यांना त्यांचे वडील आवडतात जे त्यांचे खेळणे खेळण्यासाठी त्यांच्यासोबत खाली जमिनीवर येतात आणि त्यांच्यात सामील होतात. आता जर आपल्याला हे कळले की अहरोन अशा प्रकारे त्याच्या पुत्रासोबत वेळ घालवण्यात आनंदी होता तर मग काय, तर ओमरने असे करण्यास नकार दिला कारण त्याला वाटले हे त्याच्या प्रतिष्ठेच्या खाली आहे? माणूस आणि नेता, कोण उत्तम पिता असेल, ओमर की अहरोन? त्याचप्रमाणे, जेव्हा लोक म्हणतात, "सर्वसमर्थाच्या वैभवाच्या खाली आहे की त्याने पृथ्वीवर एक माणूस म्हणून दिसले पाहिजे, " त्यांचा हेतू हा चांगला असू शकतो, पण देवाची वैभव वाढण्याऐवजी, ते त्यास बिघडवत आहेत.

**१६२.** योहान १३ येशू त्याच्या शिष्यांचे पाय धूत आहे याबद्दल बोलते, एका सेवकाचे काम! शुभवर्तमान वाचणे हे सर्वोच्च सेवकाला भेटणे आहे: प्रभूला स्वयं.

**१६३.** मत्तय १४; मार्क ६; योहान ६

**१६४.** येशू जो मसीहा त्याच्या सार्वकालिक अस्तित्वाची घोषणा करत आहे. जर त्याला केवळ हे म्हणायचे असते की तो अब्राहामापूर्वी अस्तित्वात होता, तर तसे त्याने म्हटले असते, अब्राहामापूर्वी, मी आहे याऐवजी "अब्राहाम होता त्यापूर्वी मी होतो," असे म्हटले असते. आयएच डब्लूएच विषयी धडा ९ पाहा (निर्गम ३:१४).

**१६५.** येशूची उपासना जे करत होते त्यांच्यासंबंधात उपासनेसाठी वापरला जाणारा शब्द हा तोच शब्द आहे जो देवाची उपासना करण्यासाठी वापरला जातो. (मत्तय ८:२ ची प्रकटीकरण ७:११शी तुलना करा. दोन्हीही अध्यायात, उपासना हा ग्रीक शब्द आहे, प्रोस्कुनियो म्हणजे प्रशंसा, उपासनेमध्ये स्वतः पालथे पडणे.)

**१६६.** जर तुम्ही अजूनही अपुष्टी केलेल्या मताला धरून राहाल की बायबलच्या लेखामध्ये फेरफार केली गेली आहे, तर धडा ३ पुन्हा वाचा, ज्याचे शीर्षक: भ्रष्ट किंवा जतन केलेले?"

**१६७.** लेवीस. सी. एस. मियर ख्रिस्चीयानीटी. एनवाय : मॅकमिलन-कोलियर, १९६०, पाने, ५५-५६.

**१६८.** देवाच्या जटील एकतेवर पुनरावलोकन करण्यासाठी, धडा ८ पुन्हा वाचा.

**१६९.** येशू आणि श्रीमंत तरुण शासकाच्या कथेच्या दुसऱ्या पैलूवर अनेक लोक अडखळतात. माणूस येशूकडे धावत आला आणि विचारले, “उत्तम गुरुजी, मला सार्वकालिक जीवन वतन मिळावे म्हणून मी कोणते चांगले काम करावे?” (मत्तय १९:१६; मार्क १०:१७; लूक १०:२५). जमावाला, श्रीमंत माणसाचा प्रश्न चांगला वाटला, पण प्रभूला चांगला वाटला नाही. येशूला माहित होते या धार्मिक माणसाने अजूनही देवाच्या अमर्यादित पवित्रतेला आणि मनुष्याच्या अत्यंत पापीपणाबद्दल आधारभूत सत्य स्वीकारलेले नाही. या स्वार्थी-धार्मिक माणसाने कल्पना केली की तो स्वर्गात जाण्यासाठी त्याचा मार्ग कमावू शकतो; हे की तो कसेतरी पुरेसा चांगला आहे. तो एका मुलासारखा होता जो धूसर मुठीत तांब्याच्या नाणी धरून जगाच्या संपन्न माणसासमोर उभा होता आणि त्याला विचारत होता, “तुझी संपत्ती मला मिळावी म्हणून तुला मी किती देऊ? येशूने त्या माणसाला कसे उत्तर दिले? त्याने त्याला पुन्हा तोरा आणि दहा आज्ञांकडे पाहण्यास सांगितले त्याला हे दाखवण्यासाठी की तो त्याच्या स्वतःच्या शक्तीने, परिपूर्ण धार्मिकतेच्या देवाच्या प्रमाणाचे समाधान कधीही करू शकणार नाही. येथे त्यांच्यासाठी ‘सार्वकालिक जीवन” नाही जे असा विचार करतात की ते काही “चांगली कामे” करण्याने स्वतः गुणवत्ता प्राप्त करू शकतात.

**१७०.** येशूने हे देखील म्हटले : “तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ नये; देवावर विश्वास ठेवा आणि माझ्यावरही विश्वास ठेवा...मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही.....ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर आम्हांला पिता दाखवा असे तू कसे म्हणतोस? मी पित्यामध्ये व पिता माझ्यामध्ये आहे असा विश्वास तू धरत नाहीस काय? ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगतो त्या मी आपल्या मनाच्या सांगत नाही; माझ्यामध्ये राहणारा पिता स्वतःची कार्ये करतो. मी पित्यामध्ये व पिता माझ्यामध्ये आहे हे माझे तुम्ही खरे माना; नाहीतर माझ्या कृत्यांमुळे तरी माझे खरे माना.” (योहान १४:१, ६, ९-११)

**१७१.** यशया ५३:१; योहान.१२:३८; लूक १:५१; तसेच यशया ४०:१०-११; ५१:५; ५२:१०; ५९:१६; ६३:५; यिर्मया ३२:१७ देखील पाहा.

**१७२.** देवाने दोन संदेष्टयांना (एलीया आणि अलीशा) मृत व्यक्तीला पुन्हा जिवंत करण्यासाठी सक्षम केले असतानाही, कोणत्याही संदेष्टयाने कधीही जीवनाचा स्त्रोत असल्याचा दावा केला नाही. येशू एकटाच हे म्हणू शकतो, “पुनरुत्थान व जीवन मीच आहे.”

**१७३.** मसीहा पृथ्वीवर येण्यापूर्वी, तो स्वर्गात होता. लूसीफरला जेव्हा हाकलून देण्यात आले तेव्हा तो तेथे होता. म्हणूनच, येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला: “सैतान आकाशातून विजेसारखा पडला हे मी पाहिले.” (लूक १०:१८)

## धडा १८ : देवाची सार्वकालिक योजना

**१७४.** इब्री. ११:६; यिर्मया २९:१३; यशया २९:११; मत्तय ११:२५; १३:१३-१४; लूक ८:४-१५; योहान ६. देवाची पुष्कळ सत्ये एका निश्चित हेतूने अमर्यादितपणे प्रकट केली गेली आहेत, म्हणजे केवळ त्याच्या सत्याचा शोध घेणारेच ते प्राप्त करतील. देव लोकांवर ऐकण्यासाठी, समजण्यासाठी आणि विश्वास ठेवण्यासाठी जबरदस्ती करणार नाही. ते जे इच्छुक आहेत त्यांनाच ते सत्य मिळेल. ते जे जाणूनबुजून आंधळे आहेत त्यांना मिळणार नाही.

**१७५.** पुष्कळ भविष्यवाण्या ह्या भूतकाळात लिहिल्या गेल्या आहेत जरी त्या घटना घडण्यापूर्वी ते शेकडो वर्षांपूर्वी लिहिल्या गेल्या होत्या हे तुम्ही पाहिले का ? देवाच्या योजना हाणून पाडल्या जाऊ शकत नाही. जेव्हा निर्माणकर्ता काहीतरी बोलतो ते घडून येते, पूर्ण केले आहे इतके ते उत्तम आहे. म्हणूनच मसीहाने असे म्हटले ‘‘जगाच्या स्थापनेपासून वधलेला कोकरा.’’ (प्रकटीकरण १३:८)

**१७६.** स्तोत्र.२ वाचा, मसीहाचे पृथ्वीवर पहिल्या वेळी येण्याच्या १००० वर्षांपूर्वी लिहिले होते. पवित्र शास्त्रात इतरत्र, मसीहा, त्याच्या दुसऱ्या आगमनाची वेळ (एकच देव एकच संदेश या पुस्तकाच्या धडा २९ मध्ये वर्णन केले आहे), ही स्वर्गातून एक विशाल दगड पडला त्याच्याशी केली आहे. ते सर्व ज्यांना अधीन होण्यास नकार दिला त्यांना तो ‘‘दगड’ ‘‘भुगाभुगा’’ करेल. (दानीएल २:३४-३५; मत्तय २१:३३-४४).

**१७७.** पेत्राच्या वचनाविषयी आणखी काही, प्रेषित अध्याय २-५; प्रेषित. १०; १ पेत्र १:१०-१२; २:२१-२५; ३:१८ इत्यादी. देखील वाचा. प्रेषित पौलाने लिहिलेल्या या वचनांचा देखील विचार करा : ‘‘कारण ज्यांचा नाश होत आहे त्यांना वधस्तंभाविषयीचा संदेश मूर्खपणाचा आहे; पण ज्यांना तारण प्राप्त होत आहे अशा आपणांस तो देवाचे सामर्थ्य असा आहे....देवाची दुर्बळता माणसांच्या बळाहून श्रेष्ठ आहे...जे बलवान ते लाजवावे म्हणून देवाने जगातील जे दुर्बळ ते निवडले.’’ (१ करिंथ. १:१८, २५, २७)

## धडा १९ : अर्पण करण्याचा नियम

**१७८.** हे सर्व करणे हाबेलास कसे ठाऊक होते? देवाने ते त्याला सांगितले होते. इब्री. ११:४ आपल्याला सांगते की त्याने अर्पण विश्वासाने’’ आणले-विश्वास हा ज्यामध्ये देवाने आज्ञा दिली आणि अभिवचन दिले होते. नंतर, पवित्र शास्त्र हाबेलाने आज्ञापूर्वक खूप पूर्वी सादर केले होते त्या पर्यायी अर्पणासंबंधी देवाचे तपशीलवार नियम लिखित स्वरुपात प्रदान करते. उत्पत्ती ४;४ स्पष्ट करते की हाबेलाने ‘‘त्याच्या कळपातून’’ (लेवीय ५:६ पाहा) ‘‘प्रथम जन्मलेला’’ (निर्गम १३;१२-१३शी तुलना करा) एक कोकरा आणला आणि ‘‘त्याची चर्बी’’ (लेवीय ३:१६ पाहा) अर्पण केली. हे

स्पष्ट केलेले नाही की हाबेलाने वेदीवर त्याचा कोकरा अर्पण केला, पण त्याने तसे केले याची संभावना आहे, ज्याप्रमाणे त्याच्यानंतर येणाऱ्या विश्वासणाऱ्यांनी केले होते. उत्पत्ती ८:२०; १२:७; १३:४, १८; २२:८-९; निर्गम २०:२४-२६; लेवीय १७:११ इत्यादी.

**१७९.** दानीएल ६; एस्तेर ३:८-१५; ८:७-१७

**१८०.** स्ट्रॉंग, जेम्स. द एक्झोस्टीव कॉन्कॉर्डन्स ऑफ द बायबल. एनवाय: अबिंग्डन-कॉक्सबरी प्रेस, १९४८, पान ५७. लेवीय ५:१८ ("प्रायश्चित्त) ची उत्पत्ती ६:१४ शी ("झाकणे") तुलना करा. तोच इब्री शब्द कफार (प्रायश्चित्त) या वचनांमध्ये वापरला आहे.

**१८१.** लेवीय ५:७

**१८२.** पवित्र शास्त्र ५० पेक्षा अधिक वेळा घोषित करते की अर्पण हे "दोषहीन" असावे. उदाहरणार्थ, "शेरडामेंढरांतले होमार्पण करायचे असल्यास त्याने दोषहीन नर अर्पावा." (लेवीय १:१०)

## धडा २० : एक महत्त्वपूर्ण अर्पण

**१८३.** ईद अल-अधा हा इस्लामिक वार्षिक सुट्टीचा सर्वात महत्वाचा दिवस आहे. ते त्या घटनेकडे इशारा करते जेव्हा देवाने अब्राहामाला त्याच्या पुत्राच्या ठिकाणी अर्पण करण्यासाठी एक एडका दिला होता. जगभर प्रसिद्ध मुस्लीम विश्वासानुसार पुत्र ज्याचे अर्पण द्यायचे होते तो इश्माएल होता, इसहाक नाही-जरी कुराण तसे कधीही स्पष्ट करत नाही की तो इश्माएल होता, आणि बायबल स्पष्ट करते की तो इसहाक होता. जगभरातील मुस्लीम लोक ईदचे अर्पण करतात. मक्का येथील यात्रेचा (हज) शेवटचा विधी म्हणून देखील ते केले जाते. ईदची सकाळची प्रार्थना झाल्यानंतर प्राण्याचे (सामान्यपणे एक मेंढरू किंवा एक गाय) रक्त वाहण्याद्वारे यात्रेकरू हज पूर्ण करतात. पुष्कळ मुस्लीम लोक विश्वास ठेवतात की हे विधी त्यांना "नवीन जन्माचा" प्रकार प्रदान करतात आणि हे की जर त्यांनी ते योग्यपणे पूर्ण केले तर त्यांची पापे ही पुसून जातात. तथापि, मुस्लीम लोक हे देखील मानतात की हे विधी तारणाची शास्वती देऊ शकत नाही कारण हज आणि ईदच्या अर्पणानंतर ताबडतोब त्यांची अधिक पापे जमा होण्यास सुरु होतात. (पवित्र शास्त्रातील सदर्भासाठी, इब्री अध्याय १० आणि योहानाचा अध्याय ३ वाचा.)

**१८४.** पहिल्या प्रथम, अब्राहामाचे नाव अब्राम होते. जागेच्या अभावामुळे, एकच देव एकच संदेश या पुस्तकात या कथेच्या भागाला स्पष्ट केलेले नाही. उत्पत्ती १७ पाहा. अब्राहामाच्या पूर्ण कथेसाठी, उत्पत्ती ११ते २५ वाचा; तसेच रोम. ४, गलती. ४ आणि इब्री. ११ देखील वाचा.

**१८५.** अनुवाद ७:६-७; १४:२

**१८६.** येथे काही उदाहरणे आहेत ज्यामध्ये देवाने इस्राएली राष्ट्राचा गैर-यहूदी लोकांना आशीर्वाद देण्यासाठी उपयोग केला : योसेफाने लाखो मिसरी लोकांची जीवने वाचवली (उत्पत्ती ३७-५०).

नामी, अब्राहामाची एक कन्या, दोन मोआबी स्त्रिया, अर्पा व रुथ यांसाठी आशीर्वाद झाली (जुन्या करारातील रुथचे पुस्तक). संदेष्टा एलीया सीदोन येथील विधवेसाठी आशीर्वाद झाला (१ राजे १७; लूक. ४:२६). योना, जरी अनिच्छेने, निनवेच्या लोकांना तारणाचा संदेश सांगितला होता (योना). राजा शलमोन अरबच्या राणी शबासाठी आशीर्वाद झाला (१ राजे १०; लूक. ११:३१). दानीएलाने बाबेलच्या लोकांना आशीर्वादित केले (दानीएल १-६). एस्तेर आणि मर्दखय या दोघांनी पर्शियन साम्राज्याला आशीर्वाद आणला (एस्तेर), इत्यादी.

**१८७.** उत्पत्ती १२:२-३; २२:१६-१८; इब्री. ६:१३-२०; योहान. ४:२२; प्रेषित. १-१० इत्यादी.

**१८८.** "अब्राहामाने आपली परीक्षा होत असता विश्वासाने इसहाकाचे अर्पण केले; ज्याने वचने स्वीकारली होती तो आपल्या 'एकुलत्या एक पुत्राचे' अर्पण करत होता; त्याला असे सांगितले होते की, 'इसहाकाच्याच वंशाला तुझे संतान म्हणतील.' तेव्हा मेलेल्यांतून देखील उठवण्यास देव समर्थ आहे, हे त्याने मानले आणि त्या स्थितीतून लाक्षणिक अर्थाने तो त्याला परत मिळाला." (इब्री. ११:१७-१९)

## धडा २१ : जास्त रक्त वाहिले

**१८९.** मी जुन्या करारातील "अर्पणाच्या कथांना" मोजण्यास सुरुवात केली, पण २०० कथेपर्यंत पोहचल्यावर मोजणे मी सोडून दिले! चार शब्द: "रक्त," "बलिदान", "अर्पण" आणि "वेदी" हे बायबलमध्ये १४०० पेक्षा अधिक वेळा सापडते.

**१९०.** उत्पत्ती १५:१३-१४. परमेश्वर अब्रामाला म्हणाला, 'तू निश्चितपणे समज की जो देश स्वतःचा नाही, अशा देशात तुझे संतान उपरे होऊन राहील व तेथील लोकांचे दास्य करील, आणि ते लोक चारशे वर्षे त्यांना छळतील. मग ज्या राष्ट्राचे दास्य ते करतील त्याचे मी पारिपत्य करीन, त्यानंतर ते पुष्कळ धन घेऊन तेथून निघतील." देवाच्या अभिवचनाची पूर्तता निर्गम १;१-१२; १२:३५-४१ मध्ये नोंदली आहे. देव सर्वसत्ताधारी आहे. त्याच्या योजना नेहमीच पूर्ण होतात.

**१९१.** निर्गम ५-११

**१९२.** काही काळापूर्वी, जळत्या झुडुपात सीनाय पर्वतावर, देवाने मोशेला अभिवचन दिले होते : "खचित मी तुझ्याबरोबर असेन; मी तुला पाठवले ह्याची खूण हीच: तू लोकांना मिसरातून काढून आणल्यावर ह्याच डोंगरावर तुम्ही देवाची सेवा कराल." (निर्गम ३:१२)

**१९३.** निर्गम १३-१७; "त्याने खडक फोडला तेव्हा पाणी निघाले; ते नदीप्रमाणे रुक्ष प्रदेशातून वाहू लागले." (स्तोत्र. १०५:४१)

**१९४.** निर्गम २८:९-१९; नंतर, जेव्हा मसीहा पृथ्वीवर होता, तेव्हा तो म्हणाला, "मी दार आहे. माझ्या द्वारे कोणी आत जाईल तर त्याला तारणप्राप्ती होईल" (योहान १०:९). निवासमंडपातील प्रत्येक घटक त्याचे व्यक्तित्व आणि कामाकडे इशारा करते.

**१९५.** "त्याने आपल्या अर्पणाच्या डोक्यावर आपला हात ठेवावा व दर्शनमंडपाच्या दाराशी त्याचा वध करावा आणि अहरोनाचे मुलगे जे याजक त्यांनी त्याचे रक्त वेदीवर सभोवती शिंपडावे. ... हे सर्व घेऊन अहरोनाच्या मुलांनी वेदीवर ....त्याचा होम करावा." (लेवीय ३:२, ५)
**१९६.** निवासमंडप तारणाऱ्याचे एका प्रकारचे चित्र सादर करते जो स्वर्गातून पृथ्वीवर येणार होता. तो तारणारा ज्यांना खरेच माहित आहे त्यांच्यासाठी, "तो सर्वस्वी मनोहर आहे" (गीतरत्न ५:१६), निवासमंडपाच्या आतील बाजुसारखे. जे त्याला ओळखत नाहीत त्यांच्यासाठी, "त्याच्यावर मन बसेल असे त्याच्या ठायी सौंदर्य नाही" (यशया ५३:२-३), निवासमंडपाच्या बाहेरील बाजुसारखे.
**१९७**. आदाम (आदामा) हा "माणसा" साठी इब्री शब्द आहे आणि त्याचा अक्षरशः अर्थ "लाल माती," आहे कारण देवाने आदामाच्या शरीराला पृथ्वीच्या मातीतून घडवले होते.
**१९८**. गणना ३:२३-३९
**१९९.** लेवीय १६; आज यहूदी लोक प्रायश्चीत्ताच्या दिवसाला योम किप्पुर म्हणतात, परंतु तो दिवस त्याच्या मूळ अर्थापासून वेगळा आहे कारण त्यांना मंदिर नाही, याजकपण नाही आणि अर्पणाचा कोकरा नाही. उपरोधिकपणे, यहूदी धर्माच्या प्रतीकांपैकी एक प्रतिक ही आज एक भिंत आहे (पश्चिम भिंत; मंदिर टेकडीचा क्षेत्र वाढवण्यासाठी महान हेरोदाने बांधलेली ही राखीव भिंत). यहूदी लोक दररोज तिच्यासमोर उभे राहतात आणि मसीहासाठी प्रार्थना करतात-जो आधीच आला आहे-आला आहे! जसे संदेष्टयांद्वारे भविष्यवाणी केली होती, यहूदी राष्ट्र हे आध्यात्मिकदृष्टया आंधळे आहेत (यशया ६:१०; ५३:१; यिर्मया ५:२१; यहेज्केल १२:२; २ करिंथ. ३:१२-४:६). हा येशूच (येशुआ) आहे जो मंदिर, याजकपण आणि बलीदानाच्या प्रतीकांना पूर्ण करतो (इब्री. ८-१०; इफिस. २) हे समजण्यासाठी एके दिवशी त्यांचे डोळे उघडले जातील. अध्यात्मिक आंधळेपणाची भिंत पडून जाईल (इफिस. २:१४; रोम. ९-११). या पुस्तकातील धडा ५: या उपशिर्षकात: लोकांविषयी भविष्यवाण्या' यामध्ये पाहा. तसेच अंतिम टिप्पण्या पुन्हा वाचा.
**२००.** उत्पत्ती २२:२ चा २ इतिहास ३:१शी तुलना करा. हे याच ठिकाणी मुस्लिम लोकांनी ७व्या शतकात खडकाचे घुम्मट मशीद बनवली होती.
**२०१.** २ इतिहास ७:५

### धडा २२ : कोकरा

**२०२.** पवित्र शास्त्रात परमेश्वराच्या शिर्षकांपैकी एक हे इम्मानुएल आहे, त्याचा अक्षरशः अर्थ, "देव आमच्याबरोबर." (यशया ७:१४; मत्तय १:२३)
**२०३.** २ करिंथ. ५:१-४; १ करिंथ. ६;१९; २ पेत्र १:१३-१४; इफिस. २:२१
**२०४.** यशया ४०:३-९; मलाखी ३:१; लूक १; योहान १

**२०५.** संपूर्ण बायबलमध्ये, जेव्हाजेव्हा एखाद्या माणसाला एक याजक किंवा राजा होण्यासाठी देव निवडतो, तेव्हा एखादा अधिकृत व्यक्ती जसे एखादा संदेष्टा त्याला देवाने एका विशेष कार्यासाठी निवडलेले आहे हे दाखवण्यासाठी तेलाने अभिषेक करतो. देवाने त्याच्या पुत्राला स्वयं पवित्र आत्म्याने अभिषेक केला. पवित्र शास्त्रात, तेल हे नेहमी पवित्र आत्म्याचे प्रतिक म्हणून वापरलेले आहे. **नोट** : ज्याप्रमाणे सृष्टी निर्मितीच्या कार्यात दैवत्वाचे तिन्हीही व्यक्ती सामील होते, त्याप्रमाणेच पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा उद्धाराच्या कार्यात देखील सामील आहेत.

**२०६.** "नीतिमान तर आपल्या विश्वासाने वाचेल" (हबक्कूक २:४). येशू जे अर्पण करण्यासाठी आला होता ते "जगाची पापे हरण करण्यासाठी" पुरेसे असले तरी, येशूचे अर्पण हे त्यांच्यासाठी होते जे त्यावर विश्वास ठेवतील केवळ त्यांनाच त्याचा लाभ मिळेल. या सत्याला सेनेगलमधील आमच्या रेडीओ कार्यक्रम "धार्मिकतेचा मार्ग' यावरून स्पष्ट केले जाऊ शकते (www.twor.com; www.lesprophetes.com). (www.twor.com; www.lesprophetes.com). अनेक प्रसारणांवर, ऐकणाऱ्यांसाठी पवित्र शास्त्राची एक प्रत मोफत दिली होती. ते सर्व जे लिहितील आणि मागतील, ते त्यास मोफत प्राप्त करतील. ही संधी जे सर्व लाखो लोक ते ऐकतील त्यांच्यासाठी वैध आहे का? होय. पवित्र शास्त्राच्या त्यांच्या मोफत प्रतीची मागणी सर्व ऐकणारे करतात का? नाही. या संधीचा बहुतेक लोक लाभ घेत नाहीत. त्याचप्रमाणे, जरी देवाने त्याच्या पुत्राचे संपूर्णरीत्या पुरेसे अर्पण सर्वांच्या क्षमेसाठी आणि सार्वकालिक जीवनासाठी पुरवले असले. तथापि, केवळ आदामाच्या संततीपैकी फार थोडेच लोक देवाच्या या संधीला स्वीकारतात. लूक १४:१५-२४ पाहा.

### धडा २३ : शास्त्रलेख पूर्ण करणे

**२०७**. यशया ५३; स्तोत्र. २२. दानीएल ९:२४-२७ देखील पाहा, जे देवाच्या युगाच्या योजनेची रूपरेखा देते. या संपूर्ण योजनेचा काही हिस्सा हा: "अभिषिक्ताचा वध होईल व त्याला काही उरणार नाही." (दानीएल ९:२६)

**२०८.** मत्तय अध्याय २१ ते २५

**२०९.** विश्वासघात केला; स्तोत्र. ४१:९; जखऱ्या ११:१२-१३ आणि मत्तय २६:१४-१६; २७:३-१० पाहा.

**२१०.** जेव्हा यहूदी लोक त्यांचा वार्षिक वल्हांडण सण साजरा करत होते, येशू वल्हांडणाचा अंतिम आणि परिपूर्ण कोकरा होणार होता, पापाच्या विरोधातील देवाच्या क्रोधापासून विश्वासणाऱ्यांना सोडवणार होता. "कारण आपला वल्हांडणाचा यज्ञपशू जो ख्रिस्त त्याचे

आपल्यासाठी अर्पण झाले.” (१ करिंथ. ५:७)

**२११.** योहानाचे शुभवर्तमान, अध्याय १३ ते १७

**२१२.** येशूला अटक करायला आलेल्यांना येशूने काय म्हटले ते सरळपणे, “मी आहे” हे होते. वाक्प्रचार “मी तो आहे” हे जसे इंग्रजी अनुवादकाने दिले तसेच आहे, पण “तो” शब्द ग्रीक लेखात आढळत नाही. येशू कोण आहे हे घोषित करत होता: सार्वकालिक स्वयं-अस्तित्वात असणारा “मी आहे” जो स्वर्गातून खाली आला होता. यात काही आश्चर्य नाही, त्यामुळे, जेव्हा येशूने बोलले, “मी आहे,” धार्मिक गुरु आणि सैनिक मागे हटले आणि जमिनीवर पडले.

**२१३.** “तेव्हा मी रात्रीच्या दृष्टांतात पाहिले तर आकाशातील मेघांवर आरूढ होऊन, मानवपुत्रासारखा कोणी आला;” (दानीएल ७:१३). **नोट**: तीव्र शोक किंवा क्रोध दाखवण्याचा नेहमीचा मार्ग हा आपले वस्त्र फाडणे होता. मनोरंजकपणे, नियमशास्त्र जे देवाने मोशेला दिले ते स्पष्ट करते, “आपल्या भावांमध्ये जो मुख्य याजक आहे,...आणि पवित्र वस्त्रे परिधान करण्यासाठी ज्याच्यावर संस्कार झाला आहे, ....त्याने आपली वस्त्रे फाडू नयेत” (लेवीय २१:१०). या कायद्यानुसार (मत्तय २७:६५; मार्क. १४:६३), कयफाने स्वतःला मुख्य याजक म्हणून अपात्र ठरविले. नवीन सार्वकालिक मुख्य याजक स्वयं येशू होता जो अर्पण म्हणून त्याच्या स्वतःचे शरीर अर्पण करण्यासाठी पृथ्वीवर आला होता. तोच फक्त एकमात्र आहे जो पवित्र देवाकडे पापी मनुष्याचा समेट खरेच करू शकतो (इब्री. २:१७; ३:१; ४:१४-१६; ७:२६; ८:१; ९:११, २५; १०:१९-२२)

**२१४.** योहान १८:३८; १९:४, ६; योहान १९:१५; लूक २३:२१

## धडा २४ : पूर्ण भरपाई केली

**२१५.** जर तुम्ही एकच देव एकच परमेश्वर या पुस्तकाचे धडे ८ व ९ आणि १६ व १७ समजले आहेत, तर तुम्हांला हे वाक्य निंदाजनक असे वाटू शकेल. मी काहींना व्यंगात्मक असे देखील बोलताना ऐकले आहे, “म्हणजे देव जेव्हा कुमारीच्या पोटात होता, आणि नंतर जेव्हा वधस्तंभावर होता, तेव्हा विश्वाची काळजी कोण करत होता?” हा प्रश्न पवित्र शास्त्राचा आणि परमेश्वर ज्याने तो त्यांना दिला त्याच्याबद्दल सदोष दृष्टीकोन प्रकट करतो. “येशूने त्यांना उत्तर दिले, ‘तुम्ही शास्त्र व देवाचे सामर्थ्य जाणत नसल्यामुळे भ्रमात पडला आहात” (मत्तय. २२:२९). कारण देव हा नेहमीच एक जटील त्रि-एकता म्हणून अस्तित्वात आहे, पृथ्वीवर असणे आणि त्याच वेळी स्वर्गात असणे यामुळे कोणतीही समस्या उद्भवत नाही. जर सूर्य बाहेर अवकाशात असू शकतो आणि त्याच वेळी त्याचे किरण आणि उष्णता येथे पृथ्वीवर असतात, तर मग सूर्य निर्माण करणारा एकाच वेळी स्वर्ग आणि पृथ्वीवर का असू शकत नाही?

**२१६.** कलवरी (क्रयानियॉन) हे इब्री गुलगुथासाठी ग्रीक नाव आहे, त्याचा अर्थ खोपडीची जागा (मत्तय २७:३३; मार्क १५:२२; योहान १९;१७). ही टेकडी जेथे येशूला वधस्तंभी खिळले होते, जुन्या यरुशलेमेच्या बाहेर होती आणि ती कवटी सारखी गोल होती, ती त्याच पर्वत रांगांचा भाग होती जेथे अब्राहामाने त्याच्या पुत्राच्या ठिकाणी एडका अर्पण केला होता.

**२१७.** इतिहासकार जोसेफसने अहवाल दिला की इसवीसन ७०मध्ये यरुशलेमेच्या पतनाअगोदर, रोमी सैनिकांनी "प्रत्येक दिवशी पाचशे यहूद्यांना अटक केली होती; नाही, काही दिवशी जास्त लोकांना धरले होते...सैनिकांनी, यहूद्यांवरील राग आणि द्वेषामुळे, ज्यांना त्यांनी धरले होते त्यांना वधस्तंभावर खिळले होते, प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारे, आणि आणखी काही मार्गांनी, कृसित केले होते, थट्टेच्या मार्गाने; जेव्हा त्यांची संख्या इतकी जास्त असे, तेव्हा त्या खोलीला वधस्तंभांची आवश्यकता लागत होती, आणि वधस्तंभांना शरीराची." जोसेफसने हे देखील लिहिले की बळी पडलेल्यांना "प्रथम फटके मारण्यात येत असे, आणि मग सर्व प्रकारच्या छळाने यातना दिली जात असे." (योसेफस, अँटिक्युटीस ११:१, पान ५६३)

**२१८.** यहूदी लोक वेळेची गणना सकाळी ६.०० वाजल्यापासून सुरु करत असत. "तेव्हा तिसरा तास झाला होता (६.०० +३ तास=९.००), आणि त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले.. जेव्हा सहावा तास ( दुपारी १२.००) आला, तेव्हा नवव्या तासापासून (दुपारी ३.००) देशभर अंधार पडला." (मार्क १५:२५, ३३)

**२१९.** उत्पत्ती ८;२०; २२:२-८; निर्गम २९:१८. वाक्प्रचार "होमार्पण" हे जुन्या करारात १६९ वेळा सापडते. येशू पापासाठी अंतिम पापार्पण झाला. मार्क १२:३३; इब्री. १०:६-१४. **नोट** : प्रभू येशू वधस्तंभावर असताना देवाने त्याचे मुख का दुसरीकडे केले हे आणखी समजण्यासाठी, यशया ५३ आणि स्तोत्र. २२ वाचा. त्याच स्तोत्रामध्ये जेथे दाविदाने भविष्य केले होते की मसीहा हे म्हणेल, "माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?" (स्तोत्र. २२:१), देवाने त्याच्या पुत्रापासून त्याचे तोंड का वळवले हे दावीद आपल्याला सांगतो. "तू पवित्र आहेस!" (स्तोत्र. २२:३) देव येशूपासून वळला, कारण देव हा परिपूर्णपणे पवित्र आहे आणि दुष्टाईकडे पाहू शकत नाही" (हबक्कूक १:१३). अंधाराच्या त्या काळात, मनुष्याचा निष्पाप पुत्र दुष्टांच्या ठिकाणी दु:खसहन करत होता कारण देवाने त्याला फटकारले होते की जसे काही तो पापी होता. येशू, देवाचा पवित्र कोकरा, पाप-वाहक बनला (पापी झाल्याशिवाय). गीतकारने चांगले व्यक्त केले आहे : "हे एक गूढ रहस्य आहे! अमर्त्य मरण पावला! कोण त्याच्या विचित्र रचनेचे स्पष्टीकरण करू शकतो?" (अमेझिंग लव, चार्ल्स, वेस्ली, १७०७-१७८८)

**२२०.** एडेरशेम, अल्फ्रेड. द लाईफ अँड टाईम्स ऑफ जीजस द मसीहा. १८८३, पान ६१४.

**२२१.** इब्री ९ आणि १० वाचा. **नोट**: एकच देव एकच परमेश्वर या पुस्तकाच्या २२व्या धडयात

जसे स्पष्ट केले आहे, देवाचे तेज, जे एकदा निवासमंडप आणि मंदिरात परमपवित्र स्थानात निवास करत असे, ते येथून पुढे पडद्यामागे नव्हते. ते आता येशूमध्ये होते.

**२२२**. योहान १९:३१-३७; निर्गम १२:४६; स्तोत्र. ३४:२०; जखऱ्या १२:१०; १३:६

## धडा २५ : मृत्यूचा पराभव झाला

**२२३.** मत्तय २८; मार्क १६; लूक. २४; योहान २०-२१; १ करिंथ. १५. **नोट** : येशूचे पुनरुत्थान खोटे ठरवण्यासाठी निघालेल्या अनेकांनी जबरदस्त पुराव्यांची घोषणा करणारी पुस्तके लिहिली आहेत की येशू वास्तवात मृतातून उठला आहे. उदाहरणार्थ: मॉरीसन, फ्रैंक. हू मुव्ड द स्टोन? ग्रँड रॅपिड्स, एमआय: झोंडरवन, १९८७; मॅकडोवेल, जोश: एविडंस दयाट डिमांड्स अ वर्डीक्ट. नॅशविले, टीएन: थॉमस नेल्सन, इंक., १९९३; स्ट्रोबेल, ली. द केस फॉर ख्राईस्ट. ग्रँड रॅपिड्स, एमआय: झोंडरवन, १९९८.

**२२४** येशूने केवळ एवढेच म्हटले नाही की तो ''तिसऱ्या दिवशी उठेल,'' (मत्तय १६:२१) पण त्याने हे सुद्धा म्हटले, ''जसा योना तीन दिवस व तीन रात्री मोठया माशाच्या पोटात होता तसा मनुष्याचा पुत्र तीन दिवस व तीन रात्री पृथ्वीच्या पोटात राहील'' (मत्तय १२:४०). पुष्कळ समजून वादविवाद करतात की जर येशूला शुक्रवारी रात्री कबरेत ठेवले होते, आणि फक्त रविवार सकाळपर्यंतच तो कबरेत होता, तर ते पूर्ण तीन दिवस नाहीत. तथापि, कालावधी ज्या दरम्यान येशू कबरेत होता हे पूर्ण अंकांमध्ये व्यक्त केले आहे, यहूदी लोकांच्या बोलण्यानुसार, ज्या दिवसाचा कोणताही भाग, कितीही लहान असला तरी तो पूर्ण दिवस मानायचा (उदाहरणार्थ., मत्तय २७:६३-६४; उत्पत्ती ४२:१७-१८; १ शमुवेल ३०:१२-१३; एस्तेर ४:१६-५:१). येथे आणखी एक मुद्दा आहे : पवित्र शास्त्र हे सांगत नाही की येशूला शुक्रवारी वधस्तंभावर खिळण्यात आले. जरी पुष्कळ जण ''विरोधाभास'' असे ओरडण्यास तत्पर असले तरी येथे बायबलमधील स्पष्ट ''विरोधाभासावर'' उपाय काढण्यासाठी पुष्कळ चांगली स्पष्टीकरणे आहेत.

**२२५.** प्रेषित. ११:२६; २६:२८; १ पेत्र ४:१६

**२२६.** प्रेषित. ५:४१ ''ते तर त्याच्या नावासाठी आपण अपमानास पात्र ठरवण्यात आलो म्हणून आनंद करत न्यायसभेपुढून निघून गेले.'' पेत्राला तुरुंगात टाकले आणि मारले गेले : प्रेषित. ५; प्रेषित. १२ देखील पाहा. येशूने पेत्राचे हुतात्मा म्हणून मृत्यूचे भाकीत केले होते: योहान २१:१८-१९.

**२२७.** येशूने एका परराष्ट्रीय स्त्रीला काय म्हटले त्याचा संदर्भ देतात, ''इस्राएलाच्या घराण्यातील हरवलेल्या मेंढरांखेरीज इतर कोणाकडे मला पाठवलेले नाही'' (मत्तय १५:२४), परंतु ते हे सांगत नाही की येशूने तिच्या मुलीला बरे केले! (गैर-यहूद्यांसाठी येशूची सेवा आणि करुणेच्या आणखी

उदाहरणांसाठी मत्तय १२:४१-४२; २१:३३-४३; लूक ९:५१-५५; १०:३०-३६; १७:११-१९; योहान ४; १ योहान २:१-२; लूक २४:४५-४८. पाहा)

**२२८.** स्तोत्र. ६८:१८; ११०:१; स्तोत्र. २४

**२२९.** येशू "सर्वोच्च ठिकाणी वैभवाच्या उजव्या हाताकडे बसला" कारण "त्याने स्वतः आमच्या पापांची शुद्धी केली" (इब्री. १:३). "प्रत्येक याजक प्रतिदिवशी सेवा करत आणि जे यज्ञ पापे दूर करायला कदापि समर्थ नाहीत तेच यज्ञ वारंवार करत उभा असतो; परंतु पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पून हा 'देवाच्या उजवीकडे बसला आहे;'" (इब्री. १०:११-१२) इब्री. ८:१; १२:२; प्रकटीकरण ३:२१ देखील पाहा.

## धडा २६ : धार्मिक आणि देवापासून फार दूर

**२३०.** याकोब २:१८; मत्तय ५;१३-१६; इब्री. ११

**२३१.** देव राज्यांना त्यांच्या लोकांचे समर्थन करण्याचा अधिकार देत असताना आणि त्यांना जबाबदारी नियुक्त करत असताना "तलवारीचा" वापर "देवाचे सेवक, जे दुष्ट आचरण ठेवतात त्यांच्यावर क्रोधाचा बदला घेण्यासाठी करावा" (रोम. १३;१-४; उत्पत्ती ९:६), देवाचे सत्य पसरवण्यासाठी हिंसेचा वापर हे येशूचे उदाहरण आणि शिकवणीच्या पूर्णपणे विरोधात आहे, ज्याने म्हटले, "आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर, असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद दया, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा आणि जे तुमचा छळ करतात व तुमच्या पाठीस लागतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे; कारण तो वाईटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगवतो आणि नीतिमानांवर व अनीतीमानांवर पाऊस पाडतो. कारण जे तुमच्यावर प्रीती करतात त्यांच्यावर तुम्ही प्रीती केली तर तुमचे प्रतिफळ काय? जकातदारही तसेच करतात ना? आणि तुम्ही आपल्या बंधूजनांना मात्र प्रणाम करत असलात तर त्यात विशेष काय करता? परराष्ट्रीयही तसेच करतात ना? (मत्तय ५: ४३-४७) याच्या उलट, कुराण म्हणते : "आधीचे ग्रंथ असलेल्या त्या लोकांशी लढा, जे न अल्लाहवर श्रद्धा ठेवतात, ना अंतिम दिवसावर, तसेच अल्लाह व त्याच्या पैगंबराने ज्या गोष्टी निषिद्ध म्हणून जाहीर केल्या आहेत, त्यांना निषिद्ध मानत नाहीत आणि सत्य धर्माचे पालन करत नाहीत (ज्याचे पालन करण्याचे अल्लाहने त्यांना आदेश दिले आहे). त्यांच्याशी तो पर्यंत लढा जोपर्यंत ते (तुमच्यासमोर) शरणागती पत्करून स्वेच्छेने (तुमचे राजकीय वर्चस्व स्वीकारत नाही) सरकारी कर (म्हणजे जिंजया कर) देत नाहीत." (कुराण, सुरह ९:२९)

**२३२.** "जो संदेश तुम्ही प्रारंभापासून ऐकला तो हाच आहे की, आपण एकमेकांवर प्रीती करावी.

काइन त्या दुष्टाचा होता व त्याने आपल्या बंधूचा वध केला, त्याच्यासारखे आपण नसावे. त्याने त्याचा वध कशासाठी केला? कारण काइनाची कृत्ये दुष्ट होती आणि त्याच्या बंधूची नीतीची होती" (१ योहान ३:११-१२). दोन प्रेरणा देणाऱ्या शक्ती ज्यांनी काइनाला हाबेलाचा वध करण्याकडे नेले ते सैतान आणि मत्सर होते (मत्तय २७:१८शी तुलना करा)

**२३३.** प्रश्न विचारणाऱ्यांच्या उत्कृष्ट आव्हानांचा सामना कसा करावा : "काइनाला पत्नी कोठून मिळाली?" उत्पत्ती ५ उत्तर देते. आदाम व हव्वेला आणखी "पुत्र व कन्या" झाल्या (उत्पत्ती ५:४). स्पष्ट आहे, काइनाने त्याच्या बहिणींपैकी एकीशी विवाह केला असेन. ते तेव्हा आनुवंशिकरीतीने काही हानिकारक परिणाम निर्माण करत नव्हते. नंतर, देवाने अशा विवाहाला प्रतिबंध केला. आणि हाबेलाला मारल्यावर काय घडले? हाबेलाचे शरीर पुन्हा मातीला जाऊन मिळाले, पण त्याचा प्राण आणि आत्मा स्वर्गात गेले, कारण देवाने त्याला त्याच्या पापांपासून क्षमा केली होती आणि त्याला त्याच्या विश्वासाच्या आधारावर धर्मी घोषित केले होते. इब्री. ११:४.

**२३४.** मोशे आणि इतर संदेष्ट्यांनी जागतिक जलप्रलय आणि नोहाच्या काळातील भौगोलिक उलथापालथीचे वर्णन केले आहे : उत्पत्ती ७-८; स्तोत्र. १०४:६-८; ईयोब २२:१६; मत्तय २४:३७-३९; २ पेत्र २:५-६.

## धडा २७ : टप्पा १ : देवाचा भूतकाळातील कार्यक्रम

**२३५.** एक किंवा दुसऱ्या मार्गाने, बायबलचा प्रत्येक भाग तीन विषयांपैकी एकाशी संबंधित आहे : देवाने काय केले आहे देव काय करत आहे देव काय करणार आहे ईश्वरविज्ञानी शब्दात, पवित्र शास्त्राचे ह्या तीन विषयांना असे वर्गीकृत केले आहे : न्यायी ठरवणे=जेव्हा तुम्ही सुवार्तेवर विश्वास ठेवता, देव तुमचे स्थान पूर्णपणे नीतिमान घोषित करतो (रोम. ३-५). पवित्रीकरण= आता जेव्हा तुम्ही न्यायी ठरवले गेले आहात, तेव्हा तुमच्या आचरणात तुम्हांला नीतिमान जीवन जगण्यास मदत करण्यासाठी देव तुमच्या जीवनात सक्रीय आहे (रोम. ६-८ आणि १२-१५). गौरवीकरण=स्वर्गात तुमचे स्थान आणि तुमचे आचरण या दोन्हीमध्ये तुम्ही परिपूर्णपणे नीतिमान असाल. (प्रकटीकरण २१-२२)

**२३६.** रिचर्डसन, डॉन. लॉर्डस ऑफ द अर्थ. ऑक्सनार्ड, सीए : रिगल बुक्स, १९७७, पाने. ३५४. (डॉन रिचर्डसन द्वारे आणखी एक उत्कृष्ट नरभक्षक-परिवर्तन कथेसाठी वाचा : पीस चाईल्ड. ऑक्सनार्ड, सीए : रिगल बुक्स, १९७७, पाने. ३५४. ऑक्सनार्ड, सीए : रिगल बुक्स, १९७५.

**२३७.** प्रेषित. २६:९-११; ७:५८-६०; ८:१-३; ९:१-२

**२३८.** प्रेषित. ९:१-३१; तसेच प्रेषित. अध्याय ११; १३-१४; १६-२८. प्रेषितांची कृत्ये पुस्तकात, अध्याय २२ आणि २६, पौल त्याच्या परिवर्तनाची कथा सांगतो. गलती. १:१३, २३; फिलिप्पै.

३:६; १ करिंथ. १५:९; इत्यादी देखील पाहा.

**२३९.** "संत" हा शब्द पवित्र शास्त्राच्या शब्दात एक जो देवासाठी वेगळा केलेला आहे; एक ज्याला विश्वासाने क्षमेच्या आणि नीतिमत्तेच्या त्याच्या मार्गाने पवित्र घोषित केलेले आहे. काही निश्चित मरण पावलेल्या लोकांना मनुष्य-रचित परंपरांनी "धर्माच्या नियमांनी प्रमाणभूत" करणे आणि त्याद्वारे त्यांना "संत" बनवणे हे पूर्णपणे बायबलच्या शिकवणीच्या विरोधात आहे (अनुवाद ३३:२-३; स्तोत्र. ३०:४; नीतिसूत्रे २:८; दानीएल ७:२१-२७; मत्तय २७:५२; प्रेषित. २६:१०; इफिस. १:१, २:१९ इत्यादी.).

**धडा २८ : टप्पा २ : देवाचा वर्तमानकाळातील कार्यक्रम**

**२४०.** पुष्कळ जण हे समजत नाहीत जेव्हा ते संरक्षणासाठी अशा पद्धतींचा वापर करत आहेत तेव्हा ते शत्रूच्या पक्षाचे होत आहेत. अनुवाद १८:१०-१४; यशया ४७:१३; प्रेषित. १९:१९; गलती. ५:१९-२१

**२४१.** १ योहान २:१; योहान १४-१६

**२४२.** १ल्या धडयात, आपण अहमदकडून आलेल्या ई-मेलचा संदर्भ दिला आहे ज्यात त्याने लिहिले होते : "....तेथे तुमच्या बायबलमध्ये भविष्यवाण्या आहेत, मूळ भविष्यवाण्या, आणि जुन्या करारात देखील आहेत, ज्या मुहम्मदच्या (पीबीयुएच) येण्याबद्दल आहेत, आता सुद्धा उताऱ्यांमधील एक मुख्य उतारा ज्याचा अहमद संदर्भ देत आह तो योहान १४-१६ आहे.

**२४३.** पेंटेकॉस्ट म्हणजे पन्नासावा. हा जुन्या कराराचा सण होता ज्यामध्ये इस्राएली लोक देवाला त्याच्या आशीर्वादांसाठी धन्यवाद देतात (लेवीय २३:१६). प्रारंभापासून, या दिवशी अंतिम आशीर्वाद खाली पाठविण्याची देवाने योजना केली: त्याचा पवित्र आत्मा.

**२४४.** १ करिंथ. १२:२७; इफिस. ४:२१; ५:२५-३२; प्रकटीकरण १९:७-९; २२:१७; योहान. ३:२९

**२४५.** १ योहान. १:८-१०; २:१-२; रोम. ६-८

**२४६.** ज्याक्षणी तुम्ही तुमच्या चुकीच्या विचारांचा पश्चात्ताप करता आणि प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवता जो तुमच्या पापांसाठी मरण पावला आणि पुन्हा उठला, त्याक्षणी तुमचा "ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा" होतो (रोम. ६:३), पाण्याने नाही (ते नंतर घडते), पण पवित्र आत्म्याने (रोम. ६:१-५; प्रेषित. १:५; १ करिंथ. १२:१३). "च्यामध्ये बाप्तिस्मा" होणे म्हणजे "त्याच्याबरोबर ऐक्यात, त्याच्या ओळखीत." जेव्हा तुम्ही विश्वास ठेवता, तेव्हा देवाच्या स्वतःच्या कुटुंबाचा हिस्सा होता, हे त्या सर्वांनी बनलेले आहे जे त्याच्या निष्पाप पुत्रासह (रोम. ६:५) "एकत्र केले गेलेले आहे". "ख्रिस्तामधील" तुमचे नवीन, सार्वकालिक स्थान.

**२४७.** प्रेषित. २४;१५; लूक १४:१४; योहान ५;२८-२९; दानीएल १२:२; प्रकटीकरण २०:६, ११-१५; प्रकटीकरण २२:१२.

**२४८.** २ करिंथ. ५;१०. पवित्र शास्त्र पाच पेक्षा कमी नसलेल्या अशा खास मुकुटांबद्दल (पदके/पुरस्कार) बोलते, जे विश्वासणारे प्राप्त करतील: १ करिंथ. ९:२५; १ पेत्र ५:४; याकोब १:१२; १ थेस्सल. २:१९-२०; २ तीमथ्य. ४:८. हे मुकुट आपल्या गौरवाकरता नाहीत, पण त्याच्या गौरवाकरता (प्रकटीकरण ४:१०). त्याच्या मुक्त केलेल्या लोकांनी त्याच्या नावासाठी आणि त्याच्या गौरवाकरता केलेल्या कोणत्याही चांगल्या कामाला परमेश्वर विसरणार नाही (मत्तय १०:४१-४२; इब्री. ६:१०).

**२४९.** शेख, बिल्किस. आय डेअर टू कॉल हीम फादर. न्यूयॉर्क : फ्लेमिंग एच. रीवेल कंपनी, १९७८; पान. ५३.

**२५०.** १ योहान २:२७; योहान ४;१४; १४;२६; १६:१३; यिर्मया ३१:३३-३४; इफिस. ४;२१

**२५१.** यंत्रवत प्रार्थना पठण करणे आणि देवासोबत खरेच जुळणे आणि आपल्या प्रार्थनांना देवाकडून उत्तर मिळवणे यामध्ये एक महत्वाचा फरक आहे. रोम. ८:२६-२७; इफिस. ६;१८; १ योहान ५:१४-१५; योहान १४:१३-१४; १५:७; फिलिप्पै. ४:६-९

**२५२.** रोम. १२; १ करिंथ. १२; इफिस. ४

**२५३.** २ करिंथ. ३:१८; फिलिप्पै. १:६; ३:२०-२१

### धडा २९ : टप्पा ३ : देवाचा भावी काळातील कार्यक्रम

**२५४.** येथून पुढे काही पानांनंतर आपण जुन्या करारातून अनेक वचने वाचणार आहोत ज्यामध्ये संदेष्टयांनी मसीहाच्या पृथ्वीवरील दुसऱ्या आगमनाबद्दल भविष्यवाण्या केल्या आहेत आणि त्या घटनांचे वर्णन केले आहे जे त्याच्या आगमनासह घडतील. त्यापैकी काही उतारे ज्यांचा आपण विचार करू ते जखऱ्या, अध्याय १४, दानीएल ७;१३-१४, स्तोत्र. ७२ आणि यशया ९:६-७.

**२५५.** १ थेस्सल. ४;१३-१८; १ करिंथ. १५:५१-५८

**२५६.** धडा २८ मध्ये उपशिर्षक : दोन न्यायाचे दिवस पाहा.

**२५७.** इफिस. ५:२७ आणि सभोवतालची वचने वाचा. एकच देव एकच संदेश या पुस्तकाच्या धडा १० मध्ये या विस्मयकारक विषयाचा अभ्यास केला आहे. पवित्र शास्त्र निरंतर प्रभूला “वर” आणि त्याच्या लोकांना त्याची “वधू” म्हणून चित्रित करते. विवाह, त्याच्या मुलभूत प्रकारात, आपल्याला परमेश्वर देव सार्वकालिकतेमध्ये त्याच्या लोकांसोबत घनिष्ठ, आध्यात्मिक संबंधाचा आनंद घेतो याची पुसटशी कल्पना आपल्याला देण्यासाठी त्याची रचना केली होती. (यशया ५४;५; ६२:५; स्तोत्र. ४५; गीतरत्न; होशेय २:१६, १९, २०; मत्तय ९:१५; २५:१-१३; योहान ३:२९; २ करिंथ.

११:२-३; इफिस. ५:२२-३३; प्रकटीकरण २१:२, ९; २२:१७).

**२५८.** मत्तय २४:२१; प्रकटीकरण ७:१४; महासंकटाच्या काळाचे सर्वात पूर्ण वर्णन प्रकटीकरण अध्याय ६ ते १९ मध्ये आढळते.

**२५९.** रोम. ११:२६-२७; **नोट** : उत्पत्ती ३७-४५ मध्ये योसेफाच्या कथेमध्ये ही घटना पूर्वचित्रित केलेली आहे. अद्भुत साम्य!

**२६०.** १ करिंथ. १५:४५-४७; रोम. ५:१२-२१. शब्द जसे "पहिला आदाम" आणि "शेवटला आदाम" हे देखील एकच देव एकच संदेश या पुस्तकाच्या १६व्या धडयात उल्लेखलेले आहेत. ज्याप्रमाणे आदामाच्या पापाने सर्व मनुष्यांना मरण आणले, त्याप्रमाणेच येशूच्या नीतिमत्वाने आणि वाहिलेल्या रक्ताने विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना सार्वकालिक जीवन पुन: स्थापित केले गेले आहे.

**२६१.** २ थेस्सल. १:७-१०; प्रकटीकरण १९:६-१४; यहूदा १४; जखऱ्या १४:५

**२६२.** यशया ५३:७; योहान १:२९; प्रकटीकरण ५:५; २ थेस्सल. १:५-१०; योहान ३:१७-१८; १२:४७; दानीएल ९:२४-२७; जखऱ्या १४बरोबर यशया ५३ची तुलना करा. तसेच या उताऱ्यांमध्ये "दु:खसहन" आणि "गौरव" यांच्यामधील फरकावर विचार करा; लूक२४:२५-२६; १ पेत्र १:१०-१२; इब्री. २:९; फिलिप्पै. २:५-११; स्तोत्र. २२; इत्यादी.

**२६३.** स्तोत्र. ७२ चे शीर्षक: "शलमोनाचे स्तोत्र" आहे. हे स्पष्ट होते की हे स्तोत्र शलमोनाने लिहिले, जरी त्याचा निष्कर्ष या वाक्याने होतो : "इशाय पुत्र दाविदाच्या प्रार्थना संपल्या" (स्तोत्र. ७२:२०). हे वचन स्त्रोत्रसंहितेच्या पुस्तकात आढळणाऱ्या पाच विभागांपैकी दुसऱ्या विभागाच्या शेवटाला चिन्हित करते. दावीद या दुसऱ्या विभागाचा प्रमुख लेखक होता.

**२६४.** कोणाला कायमचे दोषी ठरवण्यात येईल? "भित्रे [आणि] अविश्वासणारे," म्हणजे, ज्यांनी देवाच्या संदेशावर विश्वास ठेवला नाही कारण त्यांचे कुटुंबीय आणि मित्र त्यांना काय बोलतील किंवा करतील त्याबद्दल त्यांना भीती वाटत होती. जेव्हा येशू पृथ्वीवर होता, तेव्हा त्याने त्याच्या श्रोत्यांना सरळपणे चेतावणी दिली होती, "जे शरीराचा घात करतात पण आत्म्याचा घात करण्यास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका, तर आत्मा व शरीर ह्या दोहोंचा नरकात नाश करण्यास जो समर्थ आहे त्याला भ्या...मी पृथ्वीवर शांतता आणण्यास आलो असे समजू नका. मी शांतता आणण्यास नव्हे तर तलवार चालवण्यास आलो आहे. कारण 'मुलगा व बाप, मुलगी व आई, सून व सासू ह्यांच्यात फूट' पाडण्यास मी आलो आहे; आणि 'मनुष्याच्या घरचेच लोक त्याचे वैरी होतील.' जो माझ्यापेक्षा आपल्या बापावर किंवा आईवर अधिक प्रेम करतो तो मला योग्य नाही; जो माझ्यापेक्षा मुलावर किंवा मुलीवर अधिक प्रेम करतो तो मला योग्य नाही." (मत्तय १०:२८, ३४-३७)

## धडा ३० : स्वर्गाचे पूर्वावलोकन

**२६५.** मत्तय १३:२४-३०. चांगले आणि वाईटांचे एकत्र राहणे हे काही मर्यादित वेळेसाठी सहन करावे लागेल हे येशूचा हा दाखला घोषित करतो.

**२६६.** प्रकटीकरणाच्या पहिल्या अध्यायाचा उरलेला भाग प्रभू येशूचे अद्भुत-प्रेरणा देणारे वर्णन प्रदान करते, त्याच्याबद्दल विलक्षण वेगळे चित्र जे जास्तकरून पुस्तके, चित्रपट आणि धर्मांमध्ये पाहिले जाते.

**२६७.** मार्क ३:१४-१९; योहान १९:२६-२७; योहानाने बायबलमधील पुढील पुस्तके लिहिली आहेत: योहानाचे शुभवर्तमान, १ योहान, २ योहान आणि ३ योहान आणि प्रकटीकरण.

**२६८.** जास्पर दगड अनेक रंगांमध्ये येतो. कार्नेलीयन दगड हा सामान्यपणे पारदर्शक निळा असतो. सूर्यप्रकाशात त्याचा रंग गडद होतो.

**२६९.** पाहा राजासनावर कोण आहे. योहान १२:३६-४१ची यशया ६ (यशयाचा दृष्टांत, तसेच तो एकच देव एकच संदेश या पुस्तकाच्या १५व्या धडयात देखील सादर केला आहे) बरोबर तुलना करा.

**२७०.** उत्पत्ती १२:२-३; मत्तय १. (देवाचे अब्राहामाला अभिवचन यावर अधिक माहितीसाठी, एकच देव एकच संदेश या पुस्तकाच्या धडा २० चे पुनरावलोकन करा.)

**२७१.** उदाहरणार्थ, सिंड्रेलाची उत्कृष्ट परीकथा, प्रथम चीनमध्ये सांगितली गेली, ती मग युरोप, अमेरिका, पर्शिया, इराक, मिसर, कोरिया, भारत इत्यादी साठी देखील आवृत्त्यांमध्ये आली. प्रत्येक देशाकडे त्यांची आवृत्ती आहे, पण विषय सारखाच आहे. मुक्ती आणि सार्वकालिक जीवनासाठी आतुरता ही जगभरातील लोकांच्या हृदयात वसलेली आहे. शलमोनाने लिहिले: “आपापल्या समयी होणारी हरएक वस्तू त्याने सुंदर बनवली आहे; त्याने मनुष्याच्या मनात अनंतकालाविषयीची कल्पना उत्पन्न केली आहे; तरी देवाचा आदिपासून अंतापर्यंतचा कार्यक्रम मनुष्याला उमगत नाही.” (उपदेशक ३:११)

# प्रवासावर चिंतन करावे

## चर्चा मार्गदर्शिका
## अध्याय पुनरावलोकन प्रश्न



**पवित्र शास्त्राच्या माध्यमातून तुमच्या प्रवासाला जास्तीत जास्त लाभ मिळावा म्हणून या विभागातील प्रश्न अशी रचली आहेत. संदेष्टयांचा प्रमुख संदेश तुम्हांला समजला का? तुम्ही त्या संदेशावर विश्वास ठेवता का? इतरांना देवाची कथा आणि संदेश पुन्हा सांगण्यासाठी तुम्ही तयार आहात का? या शेवटच्या विभागावर विचार करणे तुम्हांला या प्रश्नांवर स्पष्टतेसह आणि आत्मविश्वासाने उत्तर देण्यास सज्ज करू शकते.**

**तुम्ही अध्याय पुनरावलोकन प्रश्नांना मुक्तपणे नक्कल करू शकता. वैयक्तिक चिंतन किंवा लहान गटाच्या अध्ययनात, वर्गात, तुरुंगात, घरी किंवा पत्रव्यवहाराने अभ्यास करण्यासाठी त्याचा उपयोग केला जाऊ शकतो.**

*“हे देवा, माझी झडती घेऊन माझे हृदय जाण; मला कसोटीस लावून माझे मनोगत जाण....आणि मला सनातन मार्गाने चालव.”* –संदेष्टा दावीद (स्तोत्र. १३९:२३-२४)



# धडा १

# सत्य विकत घ्या

१. जगभरातील १०,००० धर्मांसह, चुकापासून सत्याचा फरक करणे हे शक्य आहे का? तुमचा वैयक्तिक दृष्टीकोन सांगा. (पाने ६-७)

२. बायबल हे सर्वात जास्त विक्री झालेले पुस्तक आहे आणि इतिहासातील सर्वात जास्त वेळा अनुवादित पुस्तक आहे. तुमच्या मते, ते इतके प्रसिद्ध का आहे? (पान ७)

३. बायबलच्या लेखाबद्दल कुराण ज्या तीन गोष्टी सांगते त्यांची नांवे सांगा. (पान ९)

४. एखाद्या माणसावर तुम्ही सुरक्षितपणे विश्वास ठेवण्यापूर्वी तुम्हांला त्याच्याविषयी काय जाणण्याची आवश्यकता असते? देवावर तुम्ही तुमचा विश्वास ठेवण्यापूर्वी देवाविषयी तुम्हांला काय जाणण्याची आवश्यकता असते? (पान १०)

५. तुम्ही सार्वकालिकता कोठे व्यतीत कराल हे निश्चितपणे जाणणे शक्य आहे असे तुम्हांला वाटते का? तुमचा प्रतिसाद स्पष्ट करा. (पाने १५-१६)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

नीतिसूत्रे २३:२३ स्पष्ट करा. "सत्य, सुज्ञता, शिक्षण व समंजसपणा ही विकत घे, विकू नकोस." (पाने ६, १६)



# धडा २

# अडथळ्यांवर मात करणे

१. "तुम्ही पाहता, पण तुम्ही निरीक्षण करत नाही" असे शेरलॉक होल्म्सने डॉ. वाटसनला म्हटले. "पाहणे" आणि "निरीक्षण" यांच्यामध्ये काय फरक आहे? (पान १८)

२. जगातील सर्वात जास्त विक्री होणाऱ्या पुस्तकाला वाचण्यासाठी वेळ नाही यासाठी सुशिक्षित लोक देऊ शकतील अशा तीन कारणांची यादी करा. यापैकी कोणतेही कारण वैध आहे असे तुम्हांला वाटते का? (पाने १७-२९)

३. जे विश्वास ठेवण्याचा दावा करतात त्या काही लोकांच्या लज्जास्पद जीवनशैलीच्या कारणामुळे बायबलचा संदेश नाकारणे हे शहाणपणाचे आहे का? तुमचे मत स्पष्ट करा. (पाने १९-२०)

४. लोकांना बायबल समजण्यासाठी मदत करू शकतील अशा तीन मार्गदर्शक तत्वांची यादी करा. (पान २७)

५. बायबलमध्ये जुना करार आणि नवीन करार आहेत याची कमीत कमी एक किंवा दोन कारणे दया. (पाने २७-२९ )

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

होशेय ४:६ स्पष्ट करा. *"ज्ञानाच्या अभावी माझ्या लोकांचा नाश झाला आहे."* (पान १७)



# धडा ३

# भ्रष्ट किंवा जतन केलेले?

१. कुराणनुसार, देवाने पवित्र शास्त्राच्या पुस्तकांना (तोरा, स्तोत्र. शुभवर्तमान) मानवजातीसाठी कोणत्या उद्देशाने प्रकट केले? (पान ३१)

२. बायबल खोटे असल्याचा दावा करणाऱ्या कोणालाही तुम्ही कोणते तीन विचार-करायला लावणारे प्रश्न विचारू शकता? (पाने ३२-३३)

३. पुष्कळ विद्वान बायबलला इतिहासातील सर्वात उत्तमरित्या-दस्ताऐवज केलेले वचन मानतात. तुम्ही सहमत आहात का? तुमचे मत स्पष्ट करा. (पाने ३६-३७)

४. पवित्र शास्त्राची हस्तलिखिते आणि पवित्र शास्त्राचे भाषांतर यामध्ये काय फरक आहे? (पाने ३७-३८)

५. पुष्कळ लोक बायबलकडे दुर्लक्ष करतात याची दोन किंवा तीन खऱ्या कारणांची नावे सांगा. (पाने ३९-४१)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

लूक १६:३१ स्पष्ट करा. "ते मोशेचे व संदेष्टयांचे ऐकत नसतील तर मेलेल्यांमधूनही कोणी उठला तरी त्यांची खातरी होणार नाही." (पान ४१))

# धडा ४



# विज्ञान आणि बायबल

१. बायबलमध्ये हजारो वर्षांपूर्वी घोषित केलेल्या तीन वैज्ञानिक वास्तविकतेची तीन नांवे सांगा, जे सध्याच्या शतकात आधुनिक विज्ञानद्वारे पुष्टी केले गेले आहेत. (पाने ४३-४५)

२. बायबलला अंधविश्वास किंवा बुद्धिमान विश्वासाची आवश्यकता लागते का? तुमचा प्रतिसाद स्पष्ट करा. (पान ४५)

३. बायबलच्या अचूकतेबद्दल इतिहास आणि पुरातत्वशास्त्र कशी पुष्टी देते? (पाने ४६-४८)

४. सुरह २:२३ मध्ये दिलेले कुराणचे आव्हान काय साबित करते? स्पष्ट करा. (पाने ४९-५०)

५. स्वतःहूनच, विज्ञान, पुरातत्वशास्त्र आणि कविता कथित “पवित्र पुस्तकाला” देवाचे प्रेरित वचन म्हणून साबित करू शकते का? तुमच्या मताचे समर्थन करा. (पाने ४८-५०)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

ईयोब ३८:४ स्पष्ट करा. “मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हा तू कोठे होतास? तुला समजण्याची अक्कल असेल तर सांग.” (पान ४२)



# धडा ५

# देवाची स्वाक्षरी

१. बायबल भूतकाळ, वर्तमान, आणि भविष्याबद्दल जे घोषित करते ते अचूक आहे याबद्दल आपण आत्मविश्वासू असू शकतो का? स्पष्ट करा. (पाने ५१-५२, ५९-६०)

२. बायबलमध्ये सापडणाऱ्या भविष्यवाण्या आणि जादुगार डॉक्टर, भविष्य सांगणारे आणि माध्यमांनी केलेल्या भविष्यवाण्या यांच्यामध्ये काय फरक आहे? (पान ५२)

३. पवित्र शास्त्रातील एखादया भविष्यवाणीबद्दल सांगा जिला धर्मनिरपेक्ष इतिहास अचूकपणे पूर्ण झाल्याची पुष्टी देते. (पाने ५२-५८)

४. बायबलमध्ये भविष्यवाणीचा काय उद्देश आहे? (पाने ५९-६०)

५. पूर्ण झालेली भविष्यवाणी कोणत्या मार्गाने "देवाची स्वाक्षरी" आहे? (पाने ५१-५२, ५९-६०)

तुमच्या स्वतःच्या शब्दात

योहान १३:१९ स्पष्ट करा. "हे मी तुम्हांला आता म्हणजे हे घडण्यापूर्वी सांगतो, ह्यासाठी की, जेव्हा हे घडेल तेव्हा तुम्ही विश्वास ठेवावा की, मी तो आहे." (पान ५९)



# धडा ६

# सातत्यपूर्ण साक्ष

१. तुमच्या मते, सत्याला सिद्ध करण्यासाठी एक मानवी साक्ष अपुरी का आहे? (पान ६२)

२. सर्व लोकांना सर्वत्र देवाने कोणत्या दोन "साक्षी" दिल्या आहेत? (पान ६२)

३. मानवजातीसाठी त्याचा संदेश लिहिण्यासाठी देवाने वापरलेल्या दहा लोकांची नावे सांगा. (पाने ६३-६४)

४. एखाद्या साक्षीच्या विश्वसनीयतेची परीक्षा कशी करू शकतात? (पान ६५)

५. एका खोटया संदेष्टयापासून एका खऱ्या संदेष्टयाचा फरक कसा केला जाऊ शकतो? (पाने ६६-६९)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

मत्तय ७:१५-१७वर टिप्पणी करा. "खोटया संदेष्टयांविषयी जपून राहा. ते मेंढरांच्या वेषाने तुमच्याकडे येतात, पण ते अंतरी क्रूर लांडगे आहेत. त्यांच्या फळांवरून तुम्ही त्यांना ओळखाल. काटेरी झाडांवरून द्राक्षे व रिंगणीच्या झाडांवरून अंजीर काढतात काय? त्याप्रमाणे प्रत्येक चांगल्या झाडाला चांगले फळ येते आणि वाईट झाडाला वाईट फळ येते." (पान ६६)



# धडा ७

## आधारपाया

१. येशूच्या डोंगरावरील प्रवचनात, बुद्धिमान माणूस आणि मूर्ख माणसाच्या मध्ये काय फरक होता? इमारतीसाठी- आणि विश्वासासाठी पाये इतके महत्वाचे का आहेत? (पाने ७०-७१)

२. उत्पत्तीचे (म्हणजे उगम) पुस्तक जीवनाच्या मोठया पुष्कळ रहस्यांना उत्तरे देते. जीवनाची काही सर्वात मोठी प्रश्ने काय आहेत? पान ७१)

३. जेव्हा आपण एखादी कथा सांगता, तेव्हा आपण कोठून सुरुवात करतो? का? (पान ७२)

४. देवाने प्रकट केलेल्या सत्याची वनस्पती आणि भ्रूणशी तुलना कशा प्रकारे केली जाऊ शकते? (पाने ७२-७३)

५. लेखकाच्या लेबनानमधील मित्राने स्वतःसाठी बायबल वाचल्यानंतर काय प्राप्त केले? (पाने ७२-७४)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

यशया ५५:९ मधील देवाच्या घोषणेचा सारांश करा. *''कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत.''* (पान ७५)



# धडा ८

## देव कसा आहे ?

१. तुमच्या मते, त्याच्या पुस्तकाच्या पहिल्या अध्यायात, देव त्याच्या अस्तित्वाला सिद्ध करण्याचा प्रयत्न का करत नाही? (पाने ७९-८१)

२. देवदूत काय आहेत आणि देवाने त्यांना का निर्माण केले? (पान ८३)

३. देव एकच कसा असू शकतो, तरीही एकाच वेळी एकापेक्षा अधिक ठिकाणी असू शकतो? (पाने ८२, ८४-८५)

४. देवाचे व्यक्तिमत्व आणि चरित्राबद्दल काहीतरी आपल्याला जाणणे का महत्वाचे आहे? (पान ८६)

५. देवाच्या सहा चारित्र्यवैशिष्ट्यांची (गुणधर्मे) यादी करा ज्याला त्याने सृष्टी निर्मितीच्या सहाव्या दिवशी प्रदर्शित केले. या सहा गुणधर्मांपैकी, एखादी तरी आहे का ज्यासाठी तुम्ही आज धन्यवादी आहात? का? (पाने ८६-९३)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

स्तोत्र. ३३:९ स्पष्ट करा. *"कारण तो बोलला आणि अवघे झाले; त्याने आज्ञा केली आणि सर्वकाही स्थिर झाले."* (पान ८८)



# धडा ९

# त्याच्यासारखे कोणीही नाही

१. उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायात, देव, जो एकच आहे, स्वतःला अनेकवचनी नामे “आपण” आणि “आम्ही” यांनी परिचित करतो. यासाठी उत्तम स्पष्टीकरण काय असावे असे तुम्हांला वाटते? (पाने ९४-९८)

२. जीवनाच्या दैनंदिन व्यवहारातून तीन-एका-मध्ये आपल्याला आपल्या निर्माणकर्त्याच्या जटील स्वरूपाला उत्तमरित्या समजण्यासाठी मदत करू शकते का? स्पष्ट करा. (पाने ९८-९९)

३. “देवाचा पुत्र” हा शब्द हे लागू करत नाही? (पाने १०१-१०३)

४. पवित्र आत्म्याविषयी पवित्र शास्त्र तीन गोष्टी प्रकट करते ते स्पष्ट करा. (पाने १०३-१०४)

५. देव हा एक अज्ञात शक्ती आहे या प्रसिद्ध कल्पनेपेक्षा पवित्र शास्त्रातील देवाची व्याख्या कशी वेगळी आहे? (पाने १०६-१०८)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

स्तोत्र. ९:१० स्पष्ट करा. *“ज्यांना तुझ्या नावाची ओळख झालेली आहे ते तुझ्यावर भाव ठेवतील, कारण, हे परमेश्वरा, जे तुझा शोध करतात त्यांना तू टाकले नाहीस.”* (पान १०६)



# धडा १०

# एक विशेष निर्मिती

१. पहिला पुरुष आणि स्त्रीला "देवाच्या प्रतिरूपात" निर्माण केले होते. तीन मानवी गुणधर्मे जी यास मानतात त्यांची नावे सांगा. (पाने १०९-११०)

२. देवाने स्वर्ग आणि पृथ्वीला कोणत्या 'साधनाने" निर्माण केले होते? त्याने पहिल्या मानवाला कशाने निर्माण केले होते? (पान ११०)

३. देवाने मानवाची निर्मिती करण्यामागील दोन महान उद्देशांची नावे सांगा. (पाने ११२, ११७-११९)

४. कोणती दोन टोकाची आचरणे आहेत जी स्त्रियांना कमी लेखतात आणि मानवजातीसाठी देवाच्या योजनेच्या विरोधात जातात? (पाने ११५)

५. सृष्टी निर्मितीच्या सातव्या दिवसाचे महत्व काय आहे? (पान ११९)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

योहान ८;३५ स्पष्ट करा. *"दास घरात सदासर्वदा राहत नाही, पुत्र सदासर्वदा राहतो."* (पान ११७)



# धडा ११

# वाइटाचे प्रवेशद्वार

१. जे सर्वकाही देवाने निर्माण केले होते ते परिपूर्णपणे चांगले होते. तर मग सैतान आणि पाप कोठून आले? (पाने १२०-१२१)

२. देवाचे संदेष्टे पुष्कळ स्पष्ट पापाच्या व्याख्या प्रदान करतात. त्यातील एखादी व्याख्या सांगा आणि मग एखाद्या वैयक्तिक कथेने त्यास स्पष्ट करा. (पाने १२१-१२२)

३. बायबलमध्ये नरकाला दर्शवण्याकरता कोणत्या शब्द-चित्राचा वापर केला आहे? (पान १२३)

४. सैतानाच्या ध्येयांमधून एक कोणते आहे? (पाने १२३-१२४)

५. देवाने मनुष्याला काय होईल म्हणून सांगितले होते जर त्याने बरे आणि वाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाल्ले? (पान १२४) सैतानाने काय घडेल म्हणून बोलले? (पान १२६)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

याकोब २:१९ स्पष्ट करा. *"एकच देव आहे, असा विश्वास तू धरतोस काय? ते बरे करतोस; भुतेही तसाच विश्वास धरतात व थरथर कापतात."* (पान १२७)



# धडा १२

## पाप आणि मृत्यूचा नियम

१. कोणता शब्द मृत्यूचे उत्तमपणे वर्णन करतो? एक तुटलेली फांदी यास कसे स्पष्ट करते? (पान १३०)

२. देवाने आदामाला म्हटले, “कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील” (उत्पत्ती २:१७). आदामाने ज्या दिवशी ते निषिद्ध फळ खाल्ले त्याच दिवशी आदाम कोणत्या प्रकारे मरण पावला? (पाने १३१, १३४)

३. आदामाच्या पापाने तुम्हांला व तुमच्या कुटुंबाला कसे प्रभावित केले आहे? (पाने १३१-१३३)

४. तीन प्रकारच्या मृत्यूंची नावे सांगा जी आदामाच्या एका पापामुळे संपूर्ण मानवजातीमध्ये पसरली. कोणत्या प्रकारचा मृत्यू हा जास्त प्राणघातक आहे? (पाने १३१-१३४)

५. पापाने कोणत्या मार्गाने लज्जा निर्माण केली? (पाने १३५)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

यहेज्केल १८:२० मध्ये स्पष्ट केलेल्या पाप आणि मृत्यूच्या नियमाला स्पष्ट करा. *“जो जीवात्मा पाप करेल तोच मरेल.”* (पान १३७)



# धडा १३

## दया आणि न्याय

१. मानव काय करू शकतो जे देव करू शकत नाही? (पान १३८)

२. काल्पनिक न्यायालयाच्या दृश्यात, न्यायाधीशाची दया न्यायाच्या विरोधात कशी गेली? (पाने १३९-१४०)

३. देव दया दाखवण्याकरता न्यायाकडे दुर्लक्ष का करू शकत नाही? (पाने १४०-१४२)

४. देवाने आदाम व हव्वेला प्रश्न का केला जेव्हा त्याला आधीच माहित होते जे त्यांनी केले होते? (पान १४३)

५. संपूर्ण मानवजातीला पाप आणि मृत्यूच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी देवाने आदामाला जबाबदार का धरले? (पाने १४३-१४४)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

स्तोत्र. ८९:१४ स्पष्ट करा. *''नीती व न्याय ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत; दया व सत्य तुझे सेवक आहेत.''* (पान १४०)



# धडा १४

## शाप

१. “सर्पाचे” काय महत्व आहे आणि देवाने त्याला शाप का दिला? (पाने १४५-१४६)

२.  अभिवचन असलेले “स्त्रीचे संतान” कोण आहे? या शब्दाबद्दल अद्वितीय असे काय आहे? (पान १४७)

३. शापाने आपल्या जगाला प्रभावित केलेल्या काही मार्गांची नावे सांगा. (पाने १४८-१४९)

४. शोक, दु:ख आणि मृत्यू हे देवाच्या सृष्टी निर्मितीच्या मूळ रचनेमध्ये सामान्य भाग आहेत का? स्पष्ट करा. (पाने १४८-१५०)

५. आदाम व हव्वेने पाप केल्यानंतर, त्यांना लाज वाटली आणि त्यांनी स्वतःसाठी अंजिराच्या पानांचे पांघरूण केले. देवाने त्यांच्या स्वयं-प्रयत्नांना स्वीकारले का? त्यांची लाज झाकण्यासाठी देवाने त्यांना काय पुरवले? (पान १५०)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

उत्पत्ती ३:२१ मध्ये प्रदर्शित केलेल्या “कृपेचा” अर्थ स्पष्ट करा. *“परमेश्वराने आदाम व त्याची स्त्री ह्यांच्यासाठी चर्मवस्त्रे करून त्यांना घातली.”* (पाने १५०-१५१)



# धडा १५

# दुहेरी समस्या

१. आपल्याला आपल्या स्वतःचा अचूक दृष्टीकोन असणे का महत्वाचे आहे? (पान १५५-१५६)

२. आपल्याला देवाचा अचूक दृष्टीकोन असणे का महत्वाचे आहे? (पाने १५६--१५७)

३. दहा आज्ञांपैकी किती आज्ञा तुम्ही परिपूर्णपणे पाळल्या आहेत? (पाने १५८-१६०)

४. उदाहरणाने स्पष्ट करण्यासाठी आरशाचा वापरू करून, दहा आज्ञांचा प्रमुख उद्देश स्पष्ट करा. (पाने १६१-१६२)

५. देवाच्या दृष्टीसमोर मनुष्याची "दुहेरी समस्या" काय आहे? (पाने १६४)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

याकोब २:१० स्पष्ट करा. *"कारण जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो तो सर्वांविषयी दोषी होतो."* (पान १६०)



# धडा १६

# स्त्रीचे संतान

१. मसीहा स्त्रीकडून जन्म घेणे का आवश्यक होते, पण एका पुरुषाकडून नव्हे? (पाने १६५-१६७)

२. पवित्र शास्त्र मसीहाला "शेवटचा आदाम" आणि "दुसरा आदाम" म्हणून का संबोधते? (पान १६८-१६९)

३. मसीहाच्या आगमनाविषयी संदेष्टयांनी भविष्यवाणी केलेल्या कमीत कमी पाच गोष्टींची नावे सांगा. (पान १६९; तसेच पाने ५७-५८ देखील पाहा)

४. गब्रीएलने मरीयेला सांगितले की तिच्या नवीन जन्मलेल्या बाळाला "देवाचा पुत्र" म्हणतील. लूक १:२६-३७ पुन्हा वाचा, (पान १७०-१७१) पाने १०१-१०३ (धडा ९) पुनरावलोकन करा, आणि मग तुमचे संक्षिप्त स्पष्टीकरण दया की येशूला देवाचा पुत्र का म्हणतात.

५. नाव "येशू"चा अक्षरशः अर्थ काय आहे? (पान १७१)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

लूक २:१०-११ स्पष्ट करा. *"तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला, 'भिऊ नका; कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांना होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांला सांगतो; ती ही की, तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे, तो ख्रिस्त प्रभू आहे."* (पाने १७३-१७४)



# धडा १७

## हा कोण आहे

१. मसीहा इतर सर्व मानवांपेक्षा पूर्णपणे कसा वेगळा होता? (पाने १७५-१७६)

२. यहूदी धार्मिक गुरूंनी येशूला दगडमार करण्याचा प्रयत्न का केला? (पाने १८२, १८७, १९०)

३. येशू "एका संदेष्ट्यापेक्षा अधिक नाही" असे जे म्हणतात त्यांच्याशी तुम्ही सहमत आहात का? का किंवा का नाही? पाने १८८-१८९, १८०-१८१)

४. कोणत्या मार्गाने येशूची कामे त्याच्या शब्दांना न्याय ठरवतात? (पान १९१)

५. धार्मिक नेत्यांपेक्षा भुतांनी येशूला मोठा आदर व्यक्त केला यावर तुम्ही सहमत आहात का? तुमच्या मताचे समर्थन करा. (पाने १९२-१९३)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

मत्तय २२:४२ मध्ये येशूच्या प्रश्नाचे उत्तर आहे. *"ख्रिस्ताविषयी तुम्हांला काय वाटते? तो कोणाचा पुत्र आहे?"* (पाने १७९-१८२)



# धडा १८

# देवाची सार्वकालिक योजना

१. संदेष्टयांपेक्षा तुम्ही कोणत्या मार्गाने जास्त सौभाग्यशाली आहात? (पान १९४)

२. काहीतरी किंवा कोणालातरी "मुक्त करणे" याचा अर्थ काय आहे हे एखाद्या मुलाला तुम्ही कसे स्पष्ट कराल? (पाने १९६-१९७)

३. मसीहाविषयी दावीद संदेष्टयाने भविष्यवाणी केलेल्या दोन मुख्य घटनांची नावे सांगा. (पान १९८)

४. "अंडयाने खडकाशी कुस्ती नाही केली पाहिजे" या वोलोफ म्हणीपासून कोणते महत्वाचे धडे आपण शिकू शकतो? (पान १९९)

५. देवाच्या उद्धाराच्या योजनेचा कोणता भाग समजण्यास पेत्र अपयशी ठरला होता? (पाने २००-२०१)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

गलती. ४:४-५ स्पष्ट करा. *"परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. ह्यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे, आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा."* (पान १९६)



# धडा १९

# अर्पण करण्याचा नियम

१. आदाम व हव्वेचा पहिला पुत्र जन्मल्यावर जास्त समय झाला नसेल तेव्हा त्यांनी कोणती अप्रसन्न सत्यता कळली? (पाने २०२-२०३)

२. देवाने हाबेल आणि त्याच्या अर्पणाचा स्वीकार केला यासाठी दोन मुख्य कारणे दया. देवाने काइन व त्याच्या अर्पणाचा अस्वीकार केला यासाठी दोन मुख्य कारणे दया. (पाने २०५-२०७)

३. तुमची पापे पुसून टाकण्यासाठी तुम्ही काहीही करू शकता याबद्दल तुम्हांला काहीतरी माहित आहे का? प्रार्थना आणि चांगल्या कामांनी पापाच्या-ऋणाची भरपाई करणे का अशक्य आहे? (पाने २०७-२०८)

४. देवाने सर्व पापाला दंडित केले पाहिजे. पाप्याला शिक्षा दिल्यावाचून पापाला दंडित करण्यासाठी देवाजवळ एखादा मार्ग आहे का? (पाने २०८-२०९)

५. पाप आणि मृत्यूच्या नियमाला अर्पणाच्या नियमाने “मात” कशी केली हे स्पष्ट करा. (पाने २०८-२११)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

“प्रायश्चित्त” परिभाषित करा आणि लेवीय १७:११ मध्ये देवाचे मोशेला बोलणे स्पष्ट करा. *“शरीराचे जीवन तर रक्तात असते, आणि तुमच्या जीवांबद्दल वेदीवर प्रायश्चित्त करण्यासाठी ते मी तुम्हांला दिले आहे; कारण रक्तात जीवन असल्याकारणाने रक्तानेच प्रायश्चित्त होते.”* वचन- (पाने २०८-२०९)



# धडा २०

# एक महत्त्वपूर्ण अर्पण

१. देवाने अब्राहामापासून एक मोठे राष्ट्र निर्माण करण्याचे आणि त्याच्या वंशजांना कनान देश देण्याचे अभिवचन दिले. अब्राहामाच्या परिस्थितीत कोणत्या वास्तविकतेने या दोन अभिवचनांना जवळपास अशक्य असे केले होते? (पान २१२-२१३)

२. देवाने अब्राहामाला नीतिमान असे का घोषित केले? "देवावर विश्वास" ठेवणे म्हणजे काय? (पान २१४)

३. इस्राएलच्या प्राचीन राष्ट्राद्वारे सर्व राष्ट्रांना त्याचे सत्य आणि आशीर्वाद सांगण्यासाठी देवाच्या तीन मार्गांची नावे सांगा. (पाने २१६-२१८)

४. देवाने अब्राहामाला त्याचा पुत्र इसहाक याला होमार्पण म्हणून अर्पण करण्यास सांगितले. अब्राहामाने निष्कर्ष काढला का की देवाने त्याचे अभिवचन (इसहाकाच्या वंशजांतून एक मोठे राष्ट्र निर्माण करणार) तोडले आहे? स्पष्ट करा. (पान २१८-२१९; तसेच अंतिम टिप्पण्या १८८ पाहा)

५. अब्राहामाचा पुत्र वेदीवर मरण का पावला नाही? (पाने २२० -२२१)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

उत्पत्ती २२:१४ची तुमची समज व्यक्त करा. *"म्हणून अब्राहामाने त्या ठिकाणाचे नाव याव्हे-यिरे (परमेश्वर पाहून देईल) असे ठेवले; त्याजवरून परमेश्वराच्या गिरीवर पाहून देण्यात येईल असे आजवर बोलतात."* वचन- (पान २२१)



# धडा २१

## जास्त रक्त वाहिले

१. वल्हांडणाच्या कथेमध्ये, संपूर्ण मिसर देशातील प्रत्येक घराण्याने कोणत्या मार्गाने मृत्यू पाहिला? (पान २२४)

२. निवासमंडपापासून लोकांनी शिकावे म्हणून देवाचा हेतू असलेल्या दोन महत्वाच्या धडयांची नावे सांगा. (पान २२५)

३. कराराचा कोश कशाचे प्रतिक होता? (पान २२६)

४. निवासमंडप पूर्ण झाल्यानंतर, देवाने स्वर्गातून काय पाठवले? (पाने २२८-२२९)

५. अंतरपटाचा उद्देश काय होता? (पान २२७) अंतरपटाच्याही पुढे जाण्यासाठी आणि परम पवित्र स्थानात प्रवेश करण्याचा तेथे एखादा मार्ग होता का? स्पष्ट करा. (पान २३०)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

इब्री. ९:२२ स्पष्ट करा. *"नियमशास्त्राप्रमाणे रक्ताने बहुतेक सर्वकाही शुद्ध होते, आणि रक्त ओतल्यावाचून पापक्षमा होत नाही."* (पान २२२)

# धडा २२



## कोकरा

१. देवाच्या पुस्तकाचा मुख्य विषय काय आहे? (पान २३२)

२. मसीहाने निवासमंडपाच्या प्रतीकाला पूर्ण केले याविषयी कमीत कमी दोन मार्गांची नावे सांगा. (पाने २३३-२३६)

३. दैनंदिन जीवनातून उदाहरण वापरून, "पश्चात्ताप" करणे म्हणजे काय ते स्पष्ट करा. (पाने २३६-२३७)

४. देवाने येशूविषयी काय म्हटले जे तो इतर कोणत्याही व्यक्तीविषयी बोलू शकत नव्हता? (पाने २३८-२३९)

५. मानवजातीच्या पापाच्या ऋणाची भरपाई करण्यासाठी देवाच्या योजनेबद्दल छाया आणि प्रतिक म्हणून अर्पण केलेल्या कोकऱ्याने कोणत्या मार्गाने प्रदान केले? (पाने २४०-२४३)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

योहान. १:२९ स्पष्ट करा. *"दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून तो म्हणाला, 'हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा!'"* (पान २३९)



# धडा २३

## शास्त्रलेख पूर्ण करणे

१. “अभिवचन हे मेघ आहे; पूर्णता हा पाऊस आहे.” ह्या अरब म्हणीचा उपयोग पृथ्वीवर एक तारणारा पाठवण्याच्या देवाच्या योजनेला स्पष्ट करण्यासाठी कसे केले जाऊ शकते ते स्पष्ट करा. (पान २४४)

२. येशूने त्याला वल्हांडण सणाच्या मेजवानी दरम्यान मारले जाईल असे त्याच्या शिष्यांना सांगितले. या विशेष समयी त्याचा पुत्र मारला जाण्यासाठी देवाने योजना का केली असावी याबद्दल तुम्हांला काय वाटते? (पाने २४६-२४७; तसेच पाने २२३-२२४ देखील पाहा)

३. त्याच्या शिष्यांसोबत वल्हांडण सणाच्या भोजनाच्या वेळी, येशूने काही भाकर मोडली आणि प्याला पण त्यांना दिला. भाकर कशाचे प्रतिनिधित्व करते? प्याला कशाचे प्रतिनिधित्व करतो? (पाने २४७-२४८)

४. जेव्हा सैनिक त्याला अटक करण्यासाठी आले तेव्हा येशूने स्वतःचा बचाव का केला नाही? (पाने २४८-२४९)

५. मुख्य याजकाने निंदा करण्याचा येशूवर दोष का लावला? (पाने २५०-२५१)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

उत्पत्ती २२मध्ये, वचने ८ आणि १२मध्ये अब्राहामाच्या दोन भविष्यवाण्या स्पष्ट करा. *“देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल,...परमेश्वराच्या गिरीवर पाहून देण्यात येईल.”*(पान २५२)



# धडा २४

## पूर्ण भरपाई केली

१. वध करण्याची राज्य-प्रायोजित सर्वात क्रूर पद्धत तुम्हांला कोणती वाटते? धार्मिक आणि राजकीय नेत्यांनी येशूचा वध करण्यासाठी कोणती पद्धत निवडली? (पान २५३)

२. पापाद्वारे विभक्तपणाचे तीन स्तर कोणते आहेत? तुम्हांला त्या कल्पनेबद्दल काय वाटते, वधस्तंभावर, येशूने तिन्ही स्तरांना अनुभवले? (पान २५७) [मृत्युच्या तीन-पदरी विभक्त होण्याचे पुनरावलोकन करण्यासाठी, पाने १३0-१३४ पाहा]

३. वधस्तंभावर मरणे येशूसाठी का आवश्यक होते? (पाने २५५-२५९)

४. प्रभू येशू काही तासात पाप्यांसाठी सार्वकालिक शिक्षा कशी भोगू शकेल ? (पाने २५७-२५८)

५. मंदिराचा पडदा वरपासून खालपर्यंत फाटला याचे काय महत्व होते? (पाने २६०--२६१)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

योहान १९:३० स्पष्ट करा. *“येशूने आंब घेतल्यानंतर, ‘पूर्ण झाले आहे,’ असे म्हटले; आणि मस्तक लववून आपला आत्मा समर्पण केला.”* (पाने २५८-२५९)



# धडा २५

## मृत्यूचा पराभव झाला

१. शिष्यांनी येशूचे शरीर कबरेतून चोरले आहे अशी अफवा पसरवण्यास सुरुवात केली ? त्यांनी अशी कथा का बनवली? (पाने २६५-२६६)

२. येशूचा मृत्यू, पुरणे, आणि पुनरुत्थानाच्या घटना कोणत्या मार्गाने सैतानासाठी पराभव होत्या? (पाने २६७-२६८)

३. येशू पुनरुत्थित झाला हे सिद्ध करण्यासाठी कोणता पुरावा तुम्ही सादर करू शकता? (पाने २६८-२७०)

४. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून आपल्या प्रवासाच्या सुरुवातीला, देवाने सृष्टी निर्मितीचे त्याचे काम पूर्ण केल्यानंतर ‘‘विसावा’’ घेतला हे आपण पाहिले. देवाच्या उद्धाराच्या कामासंबंधापासून कोणते महत्वाचे धडे आपण शिकू शकतो? (पान २७३)

५. येशू जिवंत झाल्यानंतर चाळीस दिवस त्याने काय केले? तर मग काय, जर काहीही, ज्याबद्दल तुम्हांला जास्त थरार असे वाटते? (पाने २७३-२७५)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

१ करिंथ. १५:३-४ च्या महत्वाला स्पष्ट करा. *‘‘शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांबद्दल मरण पावला; तो पुरला गेला; ...शास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा उठवण्यात आले.’’* वचन- (पान २६७)



# धडा २६

# धार्मिक आणि देवापासून फार दूर

१. येशूचा मृत्यू आणि पुनरुत्थानाअगोदर देवाने पापांची क्षमा कशी केली? देव आज पापांची क्षमा कशी करतो? पापे जी झाकली गेली आहेत आणि पापे जी रद्द केली गेली आहेत यांच्यामधील फरकाबद्दल संक्षिप्त स्पष्टीकरण समाविष्ट करा. (पाने २७७-२७९; तसेच पाने २३९-२४३ पाहा)

२. आपल्या विश्वासाच्या शक्तीपेक्षा (किंवा प्रमाण) आपल्या विश्वासाचे ध्येय जास्त महत्वाचे का आहे? (पाने २७९-२८०)

३. लोकांची चांगली कृत्ये वाईट कृत्यांपेक्षा जास्त असली तर देव त्याच्या स्वर्गीय घरात लोकांना येऊ देईल असे तुम्हांला वाटते का? तारणाच्या या ‘‘मोजमाप कल्पनेवर’’ तुमचे मत स्पष्ट करा. (पाने २७९-२८०)

४. बायबल नुसार, एक पापी सार्वकालिक न्यायापासून कसा वाचू शकतो आणि देवाच्या शुद्ध आणि परिपूर्ण उपस्थितीत कायमचे राहण्यासाठी पात्र कसा ठरू शकतो? (पाने २८१-२८३)

५. चांगली कामे तारणासाठी आवश्यकता होण्यापेक्षा तारणाचे परिणाम का आहेत? (पाने २८३-२८४)

### तुमच्या स्वतःच्या शब्दात

प्रेषित. १६:३१ स्पष्ट करा. *‘‘प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल.’’* वचन - (पान २९२)



# धडा २७

## टप्पा १ : देवाचा भूतकाळातील कार्यक्रम

१. अध्याय २७ मध्ये सत्य-शोधणाऱ्या प्रवासी (पाने २९५-२९९), एक क्रुसित अपराधी (पाने ३०१-३०२), एक नरभक्षक जाती (पान ३०३), एक आत्महत्त्या करणारी तरुण मुलगी (पाने ३०३-३०४), एक धार्मिक आवेशी (पान ३०५), आणि एक धार्मिक मुस्लीम तरुण माणूस (पाने ३१२-३१४) यांच्या कथा समाविष्ट आहेत. कोणत्या कथेने तुम्ही चांगले ओळखले जाता आणि का?

२. वधस्तंभावरील अपराध्याला, येशूने म्हटले, “तू आज मजबरोबर सुखलोकात असशील!” हा पश्चातापी अपराधी सार्वकालिकरित्या कशापासून तारला गेला? तसेच, येशूच्या अभिवचनावर आधारित, तारला गेलेला अपराधी मरण पावला त्याक्षणी त्याने स्वतःला कोणत्या ठिकाणी पाहिले? (पाने ३०१-३०२)

३. न्याय, दया आणि कृपेची कल्पना तुम्ही एखाद्या मुलाला कसे स्पष्ट कराल? (पाने ३०६-३०७)

४. मनुष्याची “दुहेरी समस्या” काय आहे? देवाचा “दुहेरी उपाय” काय आहे? (पाने ३०९-३१०)

५. बायबलनुसार, लोक सार्वकालिकता कोठे व्यतीत करतील हे त्यांना समजू शकते का? तुम्ही मरण पावल्यानंतर कोठे जाणार हे तुम्हांला माहित आहे का? तुमचा प्रतिसाद स्पष्ट करा. (पाने ३१२-३१४)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

२ करिंथ. ५:२१ स्पष्ट करा. *“ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे.”* वचन- (पाने ३१०-३११)



# धडा २८

## टप्पा २ :

## देवाचा वर्तमानकाळातील कार्यक्रम

१. आज पुष्कळ लोक भीतीच्या मगरमिठीत का जगतात? (पान ३१५)

२. पवित्र शास्त्रानुसार, पवित्र आत्मा कोण आहे आणि ज्यांनी त्यांचा विश्वास ख्रिस्तावर ठेवला आहे त्यांच्यासाठी तो काय करतो? (पाने ३१६-३१८)

३. कोणीतरी जो देवाच्या आत्म्याने जन्मला आहे त्याला सतत पाप आणि देवाला अप्रसन्न करत राहावेसे वाटेल का? "प्रीतीच्या यादीचे" उदाहरण वापरून, एक व्यक्ती जो एखादया धर्माचे केवळ अनुसरण करतो आणि एक व्यक्ती जो देवासोबत एक प्रामाणिक नातेसंबंधाचा खरेच आनंद घेतो यांच्यामधील फरक स्पष्ट करा. (पाने ३२३-३२४)

४. पाण्याने बाप्तिस्म्याचा खरा अर्थ काय आहे? (पाने ३२५-३२६)

५. एका विश्वासणाऱ्याचे स्थान आणि एका विश्वासणाऱ्याची अवस्था यांच्यामध्ये येथे महत्वाचा फरक आहे. पिता/पुत्र उदाहरण वापरून, फरकाचे वर्णन करा. (पाने ३२९-३३०)

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

१ पेत्र १:१६ स्पष्ट करा. *"पवित्र बना, कारण मी पवित्र आहे."* वचन- (पान ३३१)

# धडा २९



## टप्पा ३ :
## देवाचा भावी काळातील कार्यक्रम

१. सैतानाला ठेचण्यासाठी आणि पापाला काढून टाकण्यासाठी देवाच्या योजनेच्या तीन टप्प्यांचे वर्णन करा. (पाने ३३४; तसेच पान २९९ देखील पाहा)

२. मसीहाचे पृथ्वीवरील दुसरे आगमन हे त्याच्या पहिल्या आगमनापेक्षा आश्चर्यकारकपणे वेगळे कसे असेल ते सांगा. (पाने ३४०-३४१)

३. स्तोत्र. ७२:७-१९ पुन्हा वाचा, मग येशू जो मसीहा-राजा याला त्यांची अधीनता दाखवण्यासाठी जगाचे शासक आणि लोकांच्या काही मार्गांची यादी करा. (पाने ३४२-३४३)

४. येशू ख्रिस्ताच्या हजार वर्षांच्या राज्यादरम्यान, आदामाच्या पापाने आणलेले शाप हे जास्तकरून काढून टाकले जाईल. पृथ्वी ग्रहावर त्याचा कोणता सकारात्मक प्रभाव असेल? (पाने ३४६-३४७)

५. प्रकटीकरण २०:१०-१५ इतिहासातील सर्वात गंभीर घटनेचे वर्णन करते याबद्दल तुम्ही सहमत आहात का? तुमचा प्रतिसाद स्पष्ट करा. (पाने ३४८-३४९)

तुमच्या स्वतःच्या शब्दात

१ योहान ३:२ मध्ये तुम्ही जे पाहिले ते स्पष्ट करा. *"प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण त्याच्यासारखे होऊ हे आपल्याला माहित आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल."* (पान ३५१)

# धडा ३०

# स्वर्गाचे पूर्वावलोकन

१. “यीन-यांग” जागतिक दृष्टीकोन कोणत्या प्रकारे बायबलच्या विरोधात आहे? (पाने ३५३-३५४)

२. स्वर्गाबद्दल लोकांना दोन चुकीचे दृष्टीकोन आहेत त्यांची नावे सांगा. देवाच्या स्वर्गीय घराचे खरे ध्येय काय आहे? (पाने ३५६-३५७)

३. उद्धाराची अद्भुत कथा जी उत्पत्तीमध्ये सुरु झाली आणि प्रकटीकरणात संपते. एक किंवा दोन मिनिटापेक्षा जास्त न घेता (किंवा जर लिहिले तर, जास्तीत जास्त ३०० शब्दे), देवाने असहाय्य पाप्यांना सैतान, पाप आणि सार्वकालिक मृत्यूपासून कसे सोडवले त्या कथेबद्दल सारांश करा. (पाने ३५४; ३६२-३६४)

४. “त्यानंतर सदासर्वदा आनंदी” अशा कथा सांगण्यास लोकांना आवडते याबद्दल तुम्हांला काय वाटते? तुम्ही यानंतर सदासर्वदा आनंदी असे राहाल का? तुमच्या उत्तराचा आधार काय आहे? (पाने ३६४-३६७)

५. पवित्र शास्त्राच्या माध्यमातून हा सावकाश प्रवास तुमच्यासाठी कसा लाभदायक ठरला आहे का?

**तुमच्या स्वतःच्या शब्दात**

प्रकटीकरण २१:२७ मध्ये वर्णन केलेल्या चित्रात तुम्ही कोठे व्यवस्थित बसू शकता ते सांगा. *“तिच्यात कोणत्याही निषिद्ध गोष्टी आणि अमंगळपणा व असत्य आचरणारा इसम ह्यांचा प्रवेश होणारच नाही, तर कोकऱ्याच्या ‘जीवनाच्या पुस्तकात लिहिलेल्या लोकांचा’ मात्र होईल.”* (पान ३६७)

# नियतकालिक

# नियतकालिक

# नियतकालिक





# नियतकालिक

# गौरवाचा राजा

## सचित्र पुस्तक




### संदेष्ट्यांचे लेख ७० दृश्यात संक्षिप्त केलेले आहेत

पी. डी. ब्रॅमसेन, लेखक
अर्मिन्डा सॅन मार्टिन, चित्रकार

आतापर्यंत सांगितलेली सर्वोत्तम कथा आणि संदेश- वाचण्यास-सोप्या रीतीने ७० कथांमध्ये अनावरण केलेले आहे आणि त्यासोबत ७० प्रखर आणि ठळक चित्रे आहेत. हे कालक्रमानुसार कथानक विश्वाच्या राजाविषयी आणि सर्व युगांतील लोकांसाठी त्याच्या बंडखोर प्रजेला सोडवण्याबद्दल त्याची योजना आहे.

*"आम्हांला ती आवडते. ती इतकी चांगली केली आहे. येथे कितीतरी आत्मसात करण्यासाठी आहे. आम्ही एक कुटुंब म्हणून ती वाचत आहोत, ७ किंवा ८ दृश्ये एका रात्री. आमच्या १२ वर्षांच्या मुलाने ते त्याच्या खोलीत नेले आणि ते तो खाली ठेवू शकला नाही. त्याने आम्हांला सांगितले, "बाबा आणि आई, बायबल शिकवण्याचा मी कधी ऐकला नाही असा हा एक अद्भुत मार्ग आहे.'"* -होली, चार लेकरांची आई, साउथ पॅसिफिक



**रॉक इंटरनॅशनल**

सादर करत आहे

# गौरवाचा राजा

## चित्रपट



एक मनमोहक, डोळे उघडणारे, पुस्तकाच्या माध्यमातून शब्द-न शब्द ऑडीओ-दृश्य प्रवास

• २२२ मिनिटे • ७० दृश्यांना १५ मालिकांमध्ये आयोजित केले आहे • सर्व वयोगटातील आणि संस्कृतीसाठी • पुष्कळ भाषांमध्ये

**www.king-of-glory.com**






# एकच देव
# एकच संदेश



## हे सांगा!

**लक्षवेधक स्पष्टतेसह, संदेष्टयांच्या पवित्र शास्त्राच्या माध्यमातून केलेला हा आमंत्रित करणारा आणि माहिती पुरवणारा प्रवास समय आणि सार्वकालिकतेसाठी आशा देतो. पुष्कळ भाषांमध्ये उपलब्ध.**




**www.One-God-One-Message.com**

*"हे पुस्तक वाचल्यानंतर बायबलमधील तर्काचा अर्थ लागतो आणि माझ्या मनाला स्पर्श होतो. त्यामुळे माझ्या मनात बायबल वाचण्याची आवड निर्माण झाली आहे."* -मोहम्मद, मध्य पूर्व

*"हे पुस्तक सत्याची खाण आहे; लेखनाची शैली ही अद्वितीय आहे; ती पूर्णपणे मानवी स्वारस्याने भरलेली आहे."* -विल्यम मॅकडोनाल्ड, बिलीवर्स बायबल भाष्याचा लेखक

Relief Opportunity & Care for Kids

ROCK INTERNATIONAL

Resources Of Crucial Knowledge

**www.rockintl.org**

**रॉक इंटरनॅशनल ही एक ना-नफा संस्था आहे जी दुखावलेल्या जगात येशूचे प्रेम दाखवू इच्छित आहे; एक ठिकाण जेथे मुलांना धोका, अत्याचार आणि दुर्लक्षतेच्या मध्ये सुटका, संधी, आणि काळजी प्राप्त होते; एक ठिकाण जेथे तरुण आणि प्रौढ सारखेच स्त्रोत प्राप्त करतात जे आतापर्यंत सांगितलेली सर्वोत्तम कथा आणि संदेशाच्या स्पष्ट समजेकडे नेते.**